| 21 | उत्तर कोकण | 307 | 1177.71 | 1177.71 | 18524 | 70 | 1476.88 | 1476.88 | 53611 | 149 | 4091.06 | 4091.06 | 83380 | 526 | 6745.65 | 6745.65 | 155515 |
| 22 | मध्य कोकण | 67 | 259.89 | 259.89 | 14064 | 35 | 196.12 | 196.12 | 9950 | 149 | 326.69 | 326.69 | 21121 | 251 | 782.7 | 782.7 | 45135 |
| 23 | वासिष्ठी | 88 | 16.32 | 29.79 | 2127 | 62 | 101.48 | 101.85 | 6985 | 106 | 80.54 | 86.88 | 4916 | 256 | 198 | 219 | 14028 |
| 24 | दक्षिण कोकण अ) रत्नागिरी | 142 | 30.095 | 47.09 | 3568 | 76 | 139.91 | 140.101 | 7675 | 111 | 225.093 | 214.692 | 14595 | 329 | 395 | 402 | 25838 |
| | आ) सिंधुदुर्ग | 247 | 39.867 | 77.392 | 6334 | 124 | 526.726 | 525.384 | 31478 | 54 | 238.785 | 240.262 | 17984 | 424 | 805 | 843 | 55796 |
| 25 | तेरेखोल - तिल्लारी | 50.00 | 10.84 | 17.69 | 1478 | 29 | 467.66 | 453.42 | 7169 | 8 | 153.51 | 140.98 | 9805 | 87 | 632 | 612 | 18452 |
| | **कोकणातील पश्चिम वाहिन्या** | **950** | **1576.97** | **1651.40** | **49281** | **462** | **2971.96** | **2956.94** | **121235** | **635** | **6665.79** | **6425.81** | **173061** | **2046** | **11214** | **11034** | **343577** |
| | **महाराष्ट्र राज्य** | **9613** | **21696.79** | **24093.77** | **2403947** | **2207** | **21453.69** | **28884.95** | **3097106** | **2951** | **14850.44** | **16182.00** | **1319741** | **14753** | **58001** | **69161** | **6820794** |

**आलेख - 1**


**लागवडीयोग्य क्षेत्राच्या दर हेक्टरी उपलब्धता**

(टीप : स्तंभ अनुक्रमाने उपखोऱ्यातील उपलब्धता दर्शवितात)




आलेख - 2

गोदावरी खोऱ्यातील जलसंपत्ती




आलेख - 3

तापी खोऱ्यातील जलसंपत्ती




आलेख - 4

कृष्णा खो-यातील [illegible]




आलेख - 5

कोकणातील [illegible]




16

नकाशा 0.1




प्रमाण

30 किमी 0 60 120 किमी

## नियोजनासाठी प्रस्तावित उपखोरी

| उपखोरे क्रमांक | उपखोरे |
|---|---|
| 1. | ऊर्ध्व गोदावरी (पैठण धरणा पर्यन्त) उपखोरे |
| | अ) गोदावरी (मुळा व प्रवरा व्यतिरीक्त) घटक |
| | आ) मुळा व प्रवरा घटक |
| 2. | गोदावरी निम्नस्रोत (पैठण धरणाखाली) उपखोरे |
| 3. | पूर्णा (दुधनासहीत) उपखोरे |
| 4. | मांजरा उपखोरे |
| 5. | गोदावरी - सुधा - स्वर्णा उपखोरे |
| 6. | पैनगंगा उपखोरे |
| 7. | वर्धा उपखोरे |
| 8. | मध्य वैनगंगा उपखोरे |
| 9. | निम्न वैनगंगा उपखोरे |
| | अ) वैनगंगा - प्राणहिता घटक |
| | आ) इंचमपल्लीपरिसर घटक |
| | इ) इंद्रावती घटक |
| 10. | पूर्णा (तापी) उपखोरे |
| 11. | गिरणा उपखोरे |
| 12. | पांझरा उपखोरे |
| 13. | मध्य तापी उपखोरे समूह |
| | अ) तापी ( सातपुडा ) घटक समूह |
| | आ) तापी (दक्षिण) घटक समूह |
| 14. | नर्मदा उपखोरे समूह |
| 15. | ऊर्ध्व कृष्णा (पश्चिम) उपखोरे |
| | अ) (पश्चिम - उत्तर) घटक |
| | आ) (पश्चिम - दक्षिण ) घटक |
| 16. | ऊर्ध्व कृष्णा (पूर्व)उपखोरे |
| | अ) येरळा घटक |
| | आ) अग्रणी घटक |
| 17. | ऊर्ध्व भीमा ( उजनीपर्यन्त ) उपखोरे |
| 18. | उर्वरीत भीमा उपखोरे |
| | अ) नीरा घटक |
| | आ) उजनीखाली (माणसहीत ) घटक |
| 19. | सीना - बोरी - बेनेतुरा उपखोरे समूह |
| | अ) सीना घटक |
| | आ) बोरी-बेनेतुरा घटक |
| 20. | दमणगंगा - पार खोरे समूह |
| 21. | उत्तर कोकण खोरे समूह |
| 22. | मध्य कोकण खोरे समूह |
| 23. | वासिष्ठी खोरे |
| 24. | दक्षिण कोकण खोरे समूह |
| | अ) रत्नागिरी घटक |
| | आ) सिंधुदुर्ग घटक |
| 25. | तेरेखोल - तिल्लारी खोरे समूह |

### संदर्भ सूची

1. राज्य सरहद्द
2. जिल्हा सरहद्द
3. राजधानीचे ठिकाण
4. जिल्हा मुख्यालय
5. उपखोऱ्याची सीमा
6. घटक क्षेत्र हद्द
7. नदी, नाला
8. समपर्जन्यमान रेषा (मिमी)
9. मोठ्या जलाशयाचे ठिकाण
   - पूर्ण
   - बांधकामाधीन
   - भविष्यकालीन

## महाराष्ट्र जल व सिंचन आयोग

# महाराष्ट्राचा दर्शक नकाशा

जून 1999

The territorial waters of India extend into the sea to a distance of twelve nautical miles measured from the appropriate base line.

# उपखोरे : 1

# ऊर्ध्व गोदावरी (पैठण धरणापर्यंत)

## 1.0 भौगोलिक तपशील

गोदावरी नदी दक्षिण भारतातील सर्वात मोठी नदी आहे. या नदीचा उगम नाशिक जिल्ह्यात त्र्यंबकेश्वरजवळ होतो व ती नाशिक,अहमदनगर व औरंगाबाद जिल्ह्यातून वाहत पुढे आंध्रप्रदेशातून बंगालच्या उपसागरास मिळते. या उपखोऱ्यात कळसूबाई हे सहयाद्रीतील सर्वात उंच ( 1646 मीटर ) शिखर आहे.

गोदावरी नदीचे पैठण धरणा पर्यन्तचे स्रवण क्षेत्र उपखोरे 1 म्हणून संबोधित करण्यात आले असून त्यास `ऊर्ध्व गोदावरी (पैठण धरणापर्यन्त)' असे संबोधले (नकाशा 1.1) आहे. या उपखोऱ्याचे एकूण क्षेत्रफळ 22349 चौकिमी आहे. अभ्यासाच्या दृष्टीने या उपखोऱ्याचे खालील प्रमाणे दोन भाग करण्यात आले आहेत.

(अ) ऊर्ध्व गोदावरी (मुळा व प्रवरा व्यतिरिक्त)

(आ) मुळा व प्रवरा

त्यांचे क्षेत्रफळ अनुक्रमे 15780 चौकिमी व 6569 चौकिमी आहे. या उपखोऱ्यात नाशिक,अहमदनगर,पुणे व औरंगाबाद जिल्ह्यातील खालील तालुक्यांचे क्षेत्र येते.

**(अ) ऊर्ध्व गोदावरी (मुळा व प्रवरा व्यतिरीक्त)**

**नाशिक** : 1)नाशिक 2)दिंडोरी 3)चांदवड 4)नांदगाव 5)येवला 6)निफाड7)सिन्नर 8) इगतपुरी

**अहमदनगर** : 1)श्रीरामपूर 2)नेवासा 3)शेवगाव 4)पाथर्डी 5)संगमनेर 6)कोपरगाव

**औरंगाबाद** : 1)औरंगाबाद 2)खुलताबाद 3)कन्नड 4)पैठण 5)गंगापूर 6)वैजापूर

**(आ) मुळा व प्रवरा**

**नाशिक** : 1) सिन्नर

**पुणे** : 1) जुन्नर

**अहमदनगर** : 1) अहमदनगर 2) राहुरी 3) श्रीरामपूर 4) नेवासा 5) पारनेर 6) अकोले 7) संगमनेर

मुख्य नदी, तिच्या उपनद्या इत्यादीचा तपशील खालील प्रमाणे आहे.

लांबी-किमी ,तलांक-मी

| नदी | उपनदी | लांबी | उगमस्थान | | संगमस्थान | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | ठिकाण | तलांक | ठिकाण | तलांक |
| गोदावरी | | 275* | त्र्यंबकेश्वर | 1280 | आंध्रप्रदेशात राजमहेंद्री जवळ बंगालच्या उपसागरास | 0 |
| | कडवा | 44 | कळसुबाई | 1646 | दारणा संगम | 552 |
| | कादवा | 65 | केमचा डोंगर | 757 | नांदुर मधमेश्वर बंधारा | 533 |
| | मुळा | 215 | हरिश्चंद्रगड | 1100 | पाचेगाव | 480 |

* महाराष्ट्रातील उपखोऱ्याच्या मर्यादेत.

लांबी-किमी ,तलाक-मी

| नदी | उपनदी | लांबी | उगमस्थान | | संगमस्थान | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | ठिकाण | तलांक | ठिकाण | तलांक |
| | दोडणी (ढोरनदी) | 50 | अगरगाव | 981 | गोदावरी नदीस ताजनापूर ता.शेवगाव | 469 |
| | शिवना | 110 | कळंकी | 941 | गोदावरी नदीस सालेगाव ता.गंगापूर | 469 |
| | प्रवरा | 230 | घाटघर | 1070 | प्रवरा संगम | 465 |
| | दारणा | 88 | जामुडी | 797 | तासपडी | 445 |

1.2 विस्तार : या उपखोऱ्याचा क्षेत्रीय विस्तार खालील प्रमाणे आहे.

**अ) ऊर्ध्व गोदावरी (मुळा व प्रवरा व्यतिरिक्त)** : अक्षांश 19°42' ते 20°28' उत्तर व रेखांश 73°26' ते 75°31' पूर्व यामध्ये आहे.

**आ) मुळा व प्रवरा** : अक्षांश 19°02' ते 19°45' उत्तर व रेखांश 73°40' ते 75°02' पूर्व यामध्ये आहे.

1.3 चतु:सीमा : उपखोऱ्याच्या चतु:सीमा खालीलप्रमाणे आहेत.

| अक्र | दिशा | तपशील | |
|---|---|---|---|
| | | ऊर्ध्व गोदावरी मुळा व प्रवरा व्यतिरिक्त | मुळा व प्रवरा |
| 1 | उत्तर | गिरणा उपखोरे क.11 | ऊर्ध्व गोदावरी घटक क्षेत्र 1 (अ) |
| 2 | पूर्व | पूर्णा दुधनेसह उपखोरे क. 3 व निम्न गोदावरी उपखोरे क.2 | ऊर्ध्व गोदावरी घटक क्षेत्र 1 (अ) |
| 3 | पश्चिम | सहयाद्री पर्वताच्या रांगा, दमणगंगा उपखोरे क्र. 20 व उत्तर कोकण उपखोरे क्र. 21 | सहयाद्री पर्वतीय रांगा, उत्तर कोकण उपखोरे क्र. 21 |
| 4 | दक्षिण | ऊर्ध्व गोदावरी घटक क्षेत्र 1 (आ) | ऊर्ध्व भीमा (उजनीपर्यंत) उपखोरे क्र.17 |

## 2.0 हवामान

**अ) ऊर्ध्व गोदावरी (मुळा व प्रवरा व्यतिरिक्त)**

उपखोऱ्याचे एकत्रित वार्षिक सरासरी पर्जन्यमान 941 मिमी असले तरी या उपखोऱ्यातील बव्हंश क्षेत्र म्हणजे 80 टक्क्याहून अधिक क्षेत्र कमी पावसाच्या (700 मिमीहून कमी) प्रदेशात येते. या क्षेत्रात साधारणतः 68 टक्के पाऊस नैऋत्य मोसमी वाऱ्यामुळे जून ते सप्टेंबर दरम्यान तर 27 टक्के पाऊस ईशान्य मोसमी वाऱ्यामुळे सप्टेंबर ते डिसेंबर दरम्यान पडतो. उर्वरीत 5 टक्के पाऊस डिसेंबरनंतर पडतो. या उपखोऱ्यातील हवामान, पर्जन्यमानातील दोलायमानता, इत्यादी माहिती पूढील प्रमाणे आहे.

पर्जन्य-मिमी; तपमान-अंश से

| अक्र | वैशिष्टय | परिमाण | वर्ष/महिना | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1 | सर्वात अधिक पाऊस | 4856 | 1970 | त्र्यंबकेश्वर |
| 2 | सर्वात कमी पाऊस | 93 | 1961 | कळवण |
| 3 | सर्वात अधिक तपमान | 42.40 | मे 1960 | नाशिक |
| 4 | सर्वात कमी तपमान | 0.6 | जानेवारी 1945 | नाशिक |

कृषि हवामान वर्गीकरणानुसार या घटकक्षेत्राचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

3-घाट विभाग (GH), 4-संक्रमण विभाग-1 लाल ते लालसर तपकिरी रंगाच्या जमिनीचा विभाग (TR-1), 5- संक्रमण विभाग-2 करड्या रंगाच्या जमिनीचा विभाग (TR-2), 6-अवर्षण (कमी पावसाचा) विभाग (SC) व 7-निश्चित पावसाचा मुख्यत:खरीप पिकांचा विभाग (ARK).

पर्जन्य-मिमी; तपमान-अंश से

**आ) मुळा व प्रवरा**

| अक्र | वैशिष्टय | परिमाण | वर्ष-महिना | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1 | सर्वात अधिक पाऊस | 4856 | 1970 | इगतपूरी |
| 2 | सर्वात कमी पाऊस | 83 | 1980 | पडोसी |
| 3 | सर्वात अधिक तपमान | 42.4 | मे 1960 | नाशिक |
| 4 | सर्वात कमी तपमान | 0.6 | जानेवारी 1945 | नाशिक |

कृषि हवामान वर्गीकरणानुसार या घटकक्षेत्राचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

4-संक्रमण विभाग-1 लाल ते लालसर तपकिरी रंगाच्या जमिनीचा विभाग (TR-1), 5-संक्रमण विभाग-2 करडया रंगाच्या जमिनीचा विभाग (TR-2) व 6-अवर्षण (कमी पावसाचा) विभाग (SC).

या घटकक्षेत्रातील पर्जन्यमानातील दोलायमानता गुणांक खालील प्रमाणे आहे.

| घटक | प्रमाप विचलन | सरासरी | दोलायमानता गुणांक |
|---|---|---|---|
| गोदावरी उगमस्थान ते ना.म.बंधाऱ्यापर्यन्त | 447.53 | 1418.04 | 31.56 |
| गोदावरी ना.म.बंधारा ते शिवणा नानी | 486.27 | 1378.75 | 35.27 |
| ना. म. बंधारा ते पैठण धरणापर्यन्त (शिवना उपखोरे) | 143.43 | 592.11 | 24.22 |
| ना. म. बंधारा ते पैठण धरणापर्यन्त (नानी उपखोरे) | 198.40 | 525.32 | 37.77 |
| ना.म.बंधारा ते पैठण धरणापर्यन्त (शिवनाखालील उर्वरीत गोदावरी) | 169.88 | 644.42 | 26.36 |

सरासरी पर्जन्यमानाचा माहवार तपशील सारणी 1.1 मध्ये दिला आहे. पर्जन्यमापन केंद्रांचा तपशील सारणी 1.2 मध्ये दिला आहे

2.2 बाष्पीभवन : या उपखोऱ्यातील सर्वाधिक बाष्पीभवन मे महिन्यात सरासरी 240 मिमी तर सर्वात कमी बाष्पीभवन डिसेंबर महिन्यात 90 मिमी होते. माहवार व हंगामनिहाय बाष्पीभवन सारणी 1.1 मध्ये दर्शविले आहे.

**3.0 जलसंपत्तिची उपलब्धता**

3.1 भुपृष्ठीय जलसंपत्ति : या उपखोऱ्यात गेली शंभर वर्षे वेगवेगळ्या पध्दतींनी प्रकल्पांच्या संदर्भात नदीप्रवाहाची मोजणी केली गेली असली तरी (उदा: दारणा, गंगापूर, भंडारदरा, मुळा) आधुनिक प्रणालीनुसार स्थायी स्वरुपाचा सरितामापन केंद्रांचा विकास हा अलिकडचा आहे. या नव्या मोजणीप्रमाणे या उपखोऱ्यातील ऊर्ध्व गोदावरी (मुळा व प्रवरा व्यतिरिक्त) घटकातील एकूण सरासरी येवा 5137 दलघमी आहे तर मुळा व प्रवरा घटकातील वार्षिक सरासरी उपलब्धता 2130 दलघमी आहे. उपलब्ध मालीकांच्या आधारे काढलेली पाण्याची उपलब्धता पुढील प्रमाणे आहे.

उपलब्धता-दलघमी

| विश्वासार्हता | 1 (अ) | 1( आ) |
|---|---|---|
| | आधारभूत कालावधी | |
| | 1939-1995 (57 वर्षे) | 1949-1995 (47 वर्षे) |
| 75 % | 3594 | 1648 |
| 50 % | 4576 | 2141 |

येवा मोजण्याची ठिकाणे खालील प्रमाणे आहेत. या मोजणीत अवर्षणाची वर्षे आलेली नाहीत. त्यामुळे सरासरी उपलब्धी वास्तवात बरीच कमी राहणार आहे.

येवा - दलघमी

| अक्र | सरिता मापन केंद्राचे नाव | स्वामित्व | आधारसामुग्री उपलब्धता कालावधी | वार्षिक सरासरी येवा |
|---|---|---|---|---|
| 1अ) | ऊर्ध्व गोदावरी (मुळा व प्रवरा व्यतिरिक्त) | | | |
| 1 | कोपरगाव | पा.खा. | 1990 ते 95 | 1210 |
| 2 | नागमठाण (नेवरगाव) | पा.खा. | 1987 ते 95 | 1954 |
| 3 | टाकळी (नाशिक) | पा.खा. | 1985 ते 95 | 190 |
| 1आ) | मुळा व प्रवरा | | | |
| 4 | संगमनेर | पा.खा. | 1990 - 96 | 1363 |
| 5 | पानेगाव | पा.खा. | 1990 - 96 | 49 |
| 6 | नेवासा | पा.खा. | 1990 - 96 | 111 |

वेगवेगळ्या विश्वासार्हतेच्या येव्यांची कांही मर्यादित माहिती सारणी 1.3 मध्ये दिली आहे. नाथसागर जलाशयातील 1955 पासूनच्या उपलब्ध येव्याची माहितीही या सारणी मध्ये दिली आहे.

3.2 भूशैलीय रचना : मुळा व प्रवरा व्यतिरिक्त घटकातील जवळपास 87 टक्के क्षेत्र बेसाल्ट, 9 टक्के मुरुम, वाळूचा प्रदेश आणि 4 टक्के गाळ व खडक (जांभा खडक) या प्रस्तरांनी व्यापलेले आहे.

मुळा व प्रवरा घटकातील जवळपास 80 टक्के क्षेत्र बेसाल्ट, 19 टक्के गाळाचा प्रदेश व 1 टक्का जांभा खडक या प्रस्तरांनी व्यापलेले आहे.

भूपृष्ठीय स्थिति (भूरुप वर्णन) : मुळा व प्रवरा व्यतिरिक्त घटकातील एकूण क्षेत्राच्या साधारण 17 टक्के भूभाग अतिविच्छेदीत व डोंगराळ, 61 टक्के पठारी व 22 टक्के सपाट व नदीलगतच्या गाळाने व्यापलेला आहे.

उपखोऱ्यात भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा निर्देशित एकूण 73 पाणलोट क्षेत्रे आहेत.

मुळा व प्रवरा घटकातील एकूण क्षेत्राच्या साधारण 14 टक्के भूभाग अतिविच्छेदीत व डोंगराळ, 71 टक्के पठारी व 15 टक्के सपाट व नदीलगतच्या गाळाने व्यापलेला आहे. यात भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा निर्देशित 29 पाणलोट क्षेत्रे आहेत.

भूपृष्ठीय शैलस्थिति : मुळा व प्रवरा व्यतिरिक्त घटकांत मुख्यतः लाव्हा थरांपासून तयार झालेला बहुस्तरीय दक्षिणी कातळ खडक (डेक्कन ट्रॅप प्रस्तर) आढळतो. त्यावर अलिकडील काळात तयार झालेले गाळाचे पट्टे प्रामुख्याने गोदावरी व शिवना नदीच्या काठावर आढळतात. त्यांची जाडी सरासरी 10 ते 25 मीटर आहे. त्यात माती (Clay), रेव (Silt) व वाळूचे थर आहेत.दक्षिणी कातळ खडकात प्रामुख्याने भरीत-कुहरी बेसाल्टचा (Amygdoloidal Basalt) अंतर्भाव असून त्यातील रंध्रे दुय्यम खनिजांनी भरलेले आहेत. नाशिक जिल्ह्याच्या पूर्वेकडील व औरंगाबाद जिल्ह्याच्या पश्चिमेकडील भागात दक्षिणी कातळ खडकात शैलभित्ती (Dykes) भरपूर आहेत.

मुळा व प्रवरा घटकातही मूख्यतः लाव्हा थरांपासून तयार झालेले बहुस्तरीय दक्षिणी कातळ खडक आढळतात. त्यावर अलिकडील काळात तयार झालेले गाळाचे पट्टे विशेषतः प्रवरा नदीच्या काठावर आढळतात. गाळाच्या पट्ट्यांची लांबी मर्यादित असून जाडी सरासरी 15-20 मीटर आहे. त्यात माती व रेव यांचा अंतर्भाव अधिक असून काही वाळूचे थर सुध्दा आढळतात.बहुस्तरीय दक्षिणी कातळ खडकात भरित-कुहरी बेसाल्टचे प्रमाण अधिक असून दोन लाव्हाथर गेरुच्या स्तरांनी विभागलेले आहेत. त्याचप्रमाणे या खडकात शैलभित्ती देखील आढळतात.

3.3 भूजल संपत्ति : मुळा व प्रवरा व्यतिरिक्त घटकक्षेत्रांत भूजल धारक प्रस्तर सर्वदूर सारखा असल्यामुळे भूजल संपत्ति मुख्यतः भूरुपावरच जास्त अवलंबून आहे. भूजल संपत्ति अतिविच्छेदीत व डोंगराळ भागात कमी, पठारी भागात मध्यम आणि सपाट व नदी लगतच्या क्षेत्रात अधिक असे प्रमाण आहे. उपखोऱ्यात उथळ भूजल धारक प्रस्तर (प्रामुख्याने कुजलेल्या खडकात) उपजावू असून त्याची व्याप्ती विघटीत भागापूरतीच मर्यादित आहे. सर्वसाधारणपणे पठारी,सपाट व गाळाचे पट्टे यांचे प्रमाण अधिक असून त्यात भूजल उपलब्धीस अनुकूलता असल्यामुळे विहिरींची संख्या व पर्यायाने उपसा सुध्दा जास्त आहे. शिवना नदी काठचा गाळाचा पट्टा भूजल धारणेस अनुकूल असून काही भागात सिंचनासाठी नलिकाकूप सुध्दा घेण्यात आलेल्या आहेत. त्याच प्रमाणे कोपरगाव, श्रीरामपूर भागात

गोदावरीकाठी असलेले गाळाचे पट्टे वाळूयुक्त असून त्यांची जलधारण क्षमता चांगली आहे. सिंचन कालव्यांच्या क्षेत्रातही पुनर्भरणामुळे क्षमता वाढलेली आहे.

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या 1990 च्या अंदाजानुसार एकूण पुनर्भरण (सिंचित क्षेत्रातील भरी सकट) 1641 दलघमी असून सिंचनाखालील (उघडया) विहिरींची संख्या 1.60 लक्ष आहे. त्याच प्रमाणे 9 लघुपाणलोट क्षेत्रे अतिविकसित (डार्क) (85 टक्क्या पेक्षा जास्त उपसा) व 12 विकसित (ग्रे) (65 ते 85 टक्के उपसा) आहेत. ते खालील प्रमाणे आहेत.

**अतिविकसीत** - गो-7 6/9, 7/9, गो-15 2/2, गो-21 2/8, 3/8, 5/8 व गो-38 ब 1/3, 2/3, (तालुकेः श्रीरामपूर, निफाड, सिन्नर, दिंडोरी, नाशिक).

**विकसित** -गो-2,गो-8,गो-16,गो-17,गो-19, गो-25, गो-25 ब, गो-26अ, गो-29ब, गो-33अ, गो-42, गो-137 (तालुके :नाशिक,येवला,निफाड,सिन्नर,दिंडोरी,चांदवड,कोपरगांव, संगमनेर,नेवासा आणि वैजापूर).

सद्यस्थितितील विहिरींची वाढती संख्या व त्याद्वारे होणारा उपसा विचारात घेता त्यावर नियंत्रण आणून भूजलाच्या व्यवस्थापनावर अधिक भर देणे या उपखोऱ्यात अतिशय आवश्यक आहे. त्याकरिता सिंचनासाठी अस्तित्वात असलेल्या विंधण विहिरी/ नलिका कूप, पिण्याच्या पाण्यासाठी व औद्योगिक विकासासाठीच्या विहिरी, विंधण विहिरी/ नलिका कूप आणि त्याद्वारे होणारा उपसा याचा संपूर्ण तपशील उपलब्ध होणे तातडीने गरजेचे आहे.

**(आ) मुळा व प्रवरा**

मुळा व प्रवरा नदीकाठचा सपाट व गाळाचा भाग कमी उतार व जाड विघटीत थरामुळे भूजल धारणेस अनुकूल असून त्यात भूजल उपलब्धी चांगली आहे. त्याच्या खालोखाल अकोले, संगमनेर भागात पठारी क्षेत्र पुनर्भरणास अनुकूल असून त्यात भूजल उपलब्धी मध्यम स्वरुपाची आहे. या दोन्ही क्षेत्रातच भूजल विकासास वाव असल्यामुळे व भूपृष्ठावरील साठया बरोबरच कालव्याद्वारे अतिरिक्त पुनर्भरणाची सोय असल्यामुळे भूजल उपसा मोठया प्रमाणावर होतो. अतिविच्छेदीत भागात मात्र जास्त उतारामुळे भूजल उपलब्धता अत्यल्प आहे.

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या 1990 च्या भूजल अंदाजाप्रमाणे (सिंचित क्षेत्रातील भरीसकट) 613 दलघमी एकूण पुनर्भरण असून सिंचनासाठीच्या विहिरींची संख्या 0.65 लक्ष इतकी आहे. विहिरींची घनता प्रति चौकिमी 10 इतकी आहे.10 लघुपाणलोट क्षेत्रे अतिविकसित व 2 विकसित अवस्थेत आहेत.

अतिविकसितः गो-107 4/6,5/6,6/6, गो-109 3/4,4/4, गो-117 3/5,4/5,5/5, गो-123 2/5,5/5 (तालुकेः संगमनेर व राहूरी).

विकसितः गो-102,गो-126 (तालुके : अकोले व संगमनेर).

विहिरींची घनता व संख्या वाढीचे प्रमाण बघता यावर नियंत्रण आणून व्यवस्थापनावर भर देणे गरजेचे आहे.

3.4 अवर्षणप्रवण क्षेत्रः या उपखोऱ्याचे क्षेत्र 25 तालूक्यात पसरलेले आहे. ते सर्व तालुके सुकथनकर समितीच्या अहवालानंतर शासनाने अवर्षणप्रवण घोषित केले आहेत. त्यांचा तपशील सारणी 1.4 मध्ये दिला आहे.

**4.0 जमिनीचा तपशील**

या उपखोऱ्यातील जमीन बेसाल्ट दगडापासून बनलेली आहे व जमिनीची उत्पादन क्षमता एकंदरीने चांगली आहे. जमिनीचे वर्गीकरण खालील प्रमाणे आहे.

| अक्र | तपशील | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | तांबूस तपकिरी डोंगर उतारावरील जमीन | 25 |
| 2 | भरड व उथळ जमीन | 31 |
| 3 | मध्यम काळी जमीन | 21 |
| 4 | खोल काळी जमीन | 23 |

**5.0 जमिनीचा वापर**

लागवडीयोग्य क्षेत्र, वनखात्याच्या ताब्यातील क्षेत्र, पडीक क्षेत्र इत्यादी बाबतचा तपशील खालील प्रमाणे आहे.

क्षेत्र - हजार हेक्टर

| अक्र | वापर | उर्ध्व गोदावरी,(मुळा व प्रवरा व्यतिरीक्त) | | मुळा व प्रवरा | |
|---|---|---|---|---|---|
| | | क्षेत्र | भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी | क्षेत्र | भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी |
| 1 | भौगोलिक क्षेत्र | 1578 | | 657 | |
| 2 | वनखात्याच्या ताब्यातील क्षेत्र | 226 | 14.3 | 66 | 10.0 |
| 3 | पेरणीसाठी उपलब्ध नसलेले क्षेत्र | | | | |
| | अ) ओसाड जमीन | 124 | 7.9 | 54 | 8.2 |
| | ब) बिगरशेती उपयोगाकरिता आणलेली जमीन | 40 | 2.5 | 6 | 0.9 |
| 4 | मशागतयोग्य पडीक जमीन | 20 | 1.2 | 7 | 1.1 |
| 5 | कायमची कुरणे व चराऊ कुरणे | 41 | 2.6 | 16 | 2.4 |
| 6 | किरकोळ झाडे झुडपे यांच्या समुहाखालील क्षेत्र | 4 | 0.3 | 1 | 0.2 |
| 7 | चालू पडीक जमीन | 61 | 3.9 | 30 | 4.6 |
| 8 | इतर पडीक जमीन | 55 | 3.5 | 29 | 4.4 |
| 9 | पेरणीचे निव्वळ क्षेत्र | 1007 | 63.8 | 448 | 68.2 |
| 10 | लागवडीयोग्य क्षेत्र (4+5+6+7+8+9) | 1188 | 75.0 | 531 | 81.0 |
| 11 | दुसोटा क्षेत्र | 216 | | 77 | |
| 12 | पिकाखालील एकूण क्षेत्र (9+11) | 1223 | | 525 | |
| 13 | पीक घनता (12÷9×100) | 121 | | 117 | |

## 6.0 लोकसंख्या व पशुधन

6.1 सन 1991 च्या जनगणनेनुसार या उपखोऱ्यातील एकूण लोकसंख्या 54.43 लक्ष आहे. या उपखोऱ्यात सन 2030 पर्यंत होणारी लोकसंख्येतील वाढ व लोकसंख्या घनता खालील प्रमाणे अपेक्षित आहे.यात आजवरच्या सर्वसाधारण लोकसंख्या वाढीचाच केवळ विचार न करता कारखानदारीमुळे व इतर व्यवसायामुळे जी स्थलांतरातून अतिरिक्त वाढ होण्याची शक्यता आहे त्याचा विचार धरलेला आहे. त्यामुळे '1 अ' हे घटक क्षेत्र विशेषतः अतिघन लोकसंख्येचे व नागरीकरणाचे क्षेत्र तयार होणार असून, त्या दृष्टीने या घटक क्षेत्राचे व उपखोऱ्यातील पाण्याच्या वापराचे नियोजन करावे लागेल.

लोकसंख्या - हजारात,घनता-प्रति चौकिमी

| अक्र | लोकसंख्या तपशील | 1991 | | 2030 | |
|---|---|---|---|---|---|
| | | 1अ | 1आ | 1अ | 1आ |
| 1 | नागरी | 1731 | 103 | 7233 | 215 |
| 2 | ग्रामीण | 2515 | 1094 | 5030 | 2188 |
| 3 | एकूण | 4246 | 1197 | 12263 | 2403 |
| 4 | लोकसंख्या घनता | 269 | 182 | 777 | 366 |
| 5 | ग्रामीण लोकसंख्या घनता | 159 | 167 | 319 | 333 |

6.2 पशुधन : सन 1992 च्या पशुगणनेनुसार या उपखोऱ्यात एकूण पशुधन 3.26 लक्ष आहे.तपशील पुढील प्रमाणे आहे.

| घटकक्षेत्र | म्हैस व रेडे | गाय व बैल | एकखुरी व उंट | शेळ्या मेंढया | डुकरे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 अ | 195235 | 1039387 | 7231 | 980201 | 23066 | 2245120 |
| 1 आ | 60046 | 436530 | 2809 | 504607 | 10176 | 1014168 |
| एकूण | 255281 | 1475917 | 10040 | 1484808 | 33242 | 3259288 |

6.3 इतर तपशील : या उपखोऱ्यात नाशिक व औरंगाबाद या दोन महानगरपालिका आहेत. व औद्योगिकरणहि मोठया प्रमाणात झालेले आहे. त्यामुळे शेत मजूरांची संख्या 13.34 लक्ष आहे. तर इतर मजूरांची संख्या 20.01 लक्ष आहे. या क्षेत्रातील नगरपालिकांची संख्याही मोठी आहे. (एकूण 24) एकंदरीनेच नागरी लोकसंख्येचे प्रमाण 40 टक्क्याहून अधिक आहे व ते 60 टक्के होईल असे दिसते.

नगरपालिका असलेली शहरे :

**1 (अ) ऊर्ध्व गोदावरी (मुळा व प्रवरा व्यतिरीक्त)**

**नाशिक** :1)इगतपुरी 2)सिन्नर 3)निफाड 4)चांदवड 5)येवला 6)मनमाड 7)त्रिंबक 8)भगूर

**अहमदनगर** :1) शेवगाव 2)संगमनेर 3)कोपरगाव 4)अकोले 5)पाथर्डी 6) शिर्डी 7)रहाता

**औरंगाबाद** :1) वैजापूर 2)गंगापूर 3)कन्नड 4) खुलताबाद

**1 (आ) मुळा व प्रवरा :**

**पूणे** : 1) जुन्नर

**अहमदनगर :** 1) श्रीरामपूर 2)संगमनेर 3)राहुरी 4)देवळाली प्रवरा

**7.0 पाणीवापर**

7.1 सिंचनासाठी वापर :उपखोऱ्यातील वर्गनिहाय प्रकल्प म्हणजे मोठे, मध्यम, लघु प्रकल्प, कोल्हापूर पध्दतीचे बंधारे यांची संख्या, पाणीसाठा, पाणीवापर, सिंचनक्षेत्र यांची तसेच पूर्ण झालेले, प्रगतिपथावरील व भविष्यकालीन प्रकल्प यांची तपशीलवार माहिती सारणी 1.5 मध्ये दिलेली आहे. सध्याची पूर्ण झालेल्या प्रकल्पांची सिंचन क्षमता 268434 हेक्टर असून, त्यातील प्रस्तावित पाणीवापर 2589 दलघमी आहे. म्हणजे सध्याच तो उपखोऱ्याच्या सरासरी येव्याच्या तुलनेत 35% आहे. सिंचनासाठी आणखी 173132 हेक्टर क्षेत्र उपलब्ध होऊ शकते पण त्यासाठी सध्याच्या पाणीवापर पध्दतीप्रमाणे 1361 दलघमी पाणी लागेल. पाण्याच्या बचतीचे व काटकसरी पध्दतींचे ठिबक सिंचनासारखे आधुनिक उपाय वापरल्या शिवाय सिंचनक्षेत्राचा विस्तार शक्य होणार नाही हे स्पष्ट आहे.

7.2 सिंचनेतर पाण्याचा वापर : सिंचनेतर उपयोगासाठी या उपखोऱ्यातील सध्याची गरज 291 दलघमी आहे. सन 2030 पर्यन्त ती 1017 दलघमी होईल. म्हणजे सरासरी येव्याच्या जवळजवळ 15 टक्के होईल. या गरजांचा तपशील खालील प्रमाणे असेल :

पाणी-दलघमी

| अक्र | तपशील | 1991 | | 2030 | |
|---|---|---|---|---|---|
| | | 1अ | 1आ | 1अ | 1आ |
| 1 | घरगुती वापरासाठी | 169 | 42 | 520 | 76 |
| 2 | उद्योगासाठी | 74 | 6 | 309 | 12 |
| | एकूण | 243 | 48 | 929 | 88 |

उपखोऱ्यातील घरगूती वापरासाठीच्या पाण्याचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

| घटक | वर्ष | पाणी-दलघमी | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पाण्याची गरज | | | |
| | | नागरी | ग्रामीण | पशूधन | एकूण |
| अ | 1991 | 79 | 50 | 40 | 169 |
| | 2030 | 364 | 101 | 55 | 520 |
| आ | 1991 | 4 | 22 | 16 | 42 |
| | 2030 | 9 | 44 | 23 | 76 |

7.3 जलसंपत्तिचा ताळेबंद: एकूण (भूपृष्ठावरील व भूपृष्ठाखालील),आणि घरगूती वापरासाठी व सिंचनासाठी पाणीवापर, यातून होणारा पुनरुद्भव याचा ताळेबंद सारणी 1.6 मध्ये दिला आहे.

7.4 लाभक्षेत्र विकास : सद्यःस्थिति खालील प्रमाणे आहे.

क्षेत्र -हजार हेक्टर

| भाग-1ची( शेतचाऱ्या इ.) कामे | | | भाग-2 ची (सपाटीकरण इ)कामे | | | प्रकल्पाच्या लाभक्षेत्रा व्यतिरिक्त अन्य क्षेत्रात |
|---|---|---|---|---|---|---|
| लाक्षेविप्रा कडील प्रकल्प | लाक्षेविप्रा बाहेरील प्रकल्प | एकूण | लाक्षेविप्रा कडील प्रकल्प | लाक्षेविप्रा बाहेरील प्रकल्प | एकूण | झालेले जमीन सपाटीकरणाचे (भाग-2) क्षेत्र |
| **अ) ऊर्ध्व गोदावरी ( मुळा व प्रवरा व्यतिरिक्त)** | | | | | | |
| 77.59 | 60.62 | 138.21 | 22.86 | 50.79 | 73.65 | 24.36 |
| **आ) मुळा व प्रवरा** | | | | | | |
| 102.46 | 14.61 | 117.07 | 36.26 | 10.58 | 46.84 | 13.81 |

सिंचित क्षेत्राच्या तुलनेने लाभक्षेत्र विकासाची प्राकृतिक व्यवस्था फार कमी क्षेत्रावर (25 टक्के) पूर्ण झालेली दिसते. दुसोटा क्षेत्राच्या तुलनेत ते मुळा व प्रवरा घटकांत दीडपट आहे, पण 'अ' घटकात फक्त 60 टक्केच आहे. पाण्याचा ज्या प्रमाणात काटकसरी वापर वाढायला हवा आहे, तो पहाता पाणी उपयोजन व्यवस्थेत सुधारणा करण्याच्या दृष्टीने या उपखोऱ्यातील लाभक्षेत्र विकास कामांची आमूलाग्र पुनर्रचना होणे अगत्याचे आहे.

7.5 सन 1970 पूर्वीची धरणे : 25 वर्षाहून अधिक आयुष्य झालेली 6 मोठी धरणे या उपखोऱ्यात आहेत, व त्यातील दारणा धरण 80 वर्षे वापरात आहे, तर भंडारदरा 70 वर्षे या दोघांचेहि मजबुतीकरण 15 वर्षापूर्वी झालेले आहे.

| अक्र | प्रकल्पाचे नाव | बांधकामाचे वर्ष |
|---|---|---|
| **अ) ऊर्ध्व गोदावरी ( मुळा व प्रवरा व्यतिरिक्त)** | | |
| 1 | गंगापूर | 1962 |
| 2 | पालखेड | 1960 |
| 3 | दारणा | 1916 |
| 4 | ढेकू | 1960 |
| 5 | कोल्ही | 1966 |
| **आ) मुळा व प्रवरा** | | |
| 1 | भंडारदरा | 1926 |

**8.0 पीकरचना**

उपखोऱ्यात पेरणीखालचे क्षेत्र 10.07 लक्ष हेक्टर आहे. त्यांत अन्नधान्य पिकांचे क्षेत्र सर्वात मोठे आहे. त्यांत खरीपाचा वाटा मोठा आहे. ज्वारी हे प्रमूख पीक आहे. धान्य पिकांची दर हेक्टरी सरासरी उत्पादकता मात्र फारच कमी आहे.

उत्पादकता-क्विंटल/हेक्टर

| अक्र | पीक | उत्पादकता |
|---|---|---|
| अ) गोदावरी (मुळा व प्रवरा व्यतिरिक्त) | | |
| 1 | रब्बी ज्वारी | 4.88 |
| 2 | बाजरी | 7.74 |
| आ)मुळा व प्रवरा | | |
| 3 | रब्बी ज्वारी | 3.98 |
| 4 | बाजरी | 6.86 |

## 9.0 उद्योगधंदे

कृषि आधारित उद्योगधंद्यांचा विकास, विशेषतः ऊस उत्पन्नावर आधारित कारखान्यांची संख्या मोठी आहे. एकूण 20 कारखाने आहेत.

| अक्र | तपशील | संख्या | |
|---|---|---|---|
| | | 1(अ) | 1 (आ) |
| 1 | साखर कारखाने | 10 | 10 |
| 2 | सूत गिरण्या | 1 | 2 |
| 3 | कापड गिरण्या | - | 1 |
| 4 | कागद कारखाने | 1 | 3 |
| 5 | मद्यार्क कारखाने | 5 | 2 |
| 6 | अल्कोहोल आधारित | 1 | 1 |

## 10.0 जलविद्युत निर्मिति

1 अ : या घटकक्षेत्रात पैठण धरणपायथा जलविद्यूत प्रकल्प आहे.

1 आ : या घटकक्षेत्रात भंडारदरा प्रकल्प आहे.

या दोन्ही प्रकल्पांची कामे पूर्ण झालेली आहेत. पण दोघांची मिळून क्षमता केवळ 22 मेवॅ आहे. याउलट या उपखोऱ्यांत असलेल्या एकलहरे औष्णिक केंद्राची 910 मेवॅ वीजनिर्मिति क्षमता आहे व त्यासाठी 40 दलघमी पाणी वापरले जाते. प्रस्तावित जलविद्युत प्रकल्पांची माहिती सारणी 1.7 मध्ये दिली आहे.

## 11.0 दळणवळणाची साधने

या उपखोऱ्यात नाशिक व औरंगाबाद येथे विमानतळ आहेत. तसेच मुंबई-भुसावळ दुहेरी ब्रॉडगेज रेल्वे मार्ग व मनमाड - दौंड व मनमाड-मुदखेड एकेरी ब्रॉडगेज रेल्वे मार्ग जातात. शिवाय दोन राष्ट्रीय महामार्ग मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्ग क्र.3 व नाशिक - पुणे राष्ट्रीय महामार्ग क्र.50 या उपखोऱ्यातून जातात व पुढे दर्शविलेल्या राज्य महामार्गांचाहि लाभ या उपखोऱ्याला होतो तेंव्हा एकंदरीने वहातूकीच्या सोयी चांगल्या विकसीत झालेल्या आहेत.

| अक्र | मार्गाचे नाव | मार्ग क्रमांक |
|---|---|---|
| **1 अ) उर्ध्व गोदावरी (मुळा - प्रवरा व्यतिरिक्त)** | | |
| 1 | औरंगाबाद-नाशिक | 16 |
| 2 | औरंगाबाद-अहमदनगर | 60 |
| 3 | नाशिक-अहमदनगर | 29 |
| 4 | अहमदनगर-शेवगाव | 148 |
| 5 | नाशिक-वैजापूर-औरंगाबाद | 30 |
| **1आ) मुळा व प्रवरा** | | |
| 1 | औरंगाबाद-श्रीरामपूर-संगमनेर | 47 |
| 2 | अहमदनगर-ढोरेगाव-वाळूज-औरंगाबाद | 6 |

## 12.0 भावी नियोजनाची दिशा

12.1 या उपखोऱ्यात सरासरी जलसंपत्ति (पैठण धरणस्थळापर्यन्त) 7267 दलघमी आहे. गोदावरी लवादाच्या निर्णयानुसार पैठण धरणापर्यन्त 100 टक्के पाणी वापरास मुभा आहे. तथापि या व अधस्थित उपखोऱ्याच्या (उपखोरे क्र 2 गोदावरी निम्नस्रोत) बरोबर सीमारेषेवर नाथसागर (पैठण) जलाशय आहे. जलाशयाच्या अवतीभोवती मोठया प्रमाणावर उपसा सिंचन योजनामुळे या उपखोऱ्यातील भूप्रदेशावरच सिंचनाचा विकास झालेला आहे. आजमितीस त्याचा पाणीवापर उपखोऱ्यातील एकूण उपलब्ध पाण्याच्या तुलनेत अंदाजे 10 टक्के म्हणजे 750 दलघमी असावा. या उपखोऱ्याच्या खालच्या बाजूस असलेल्या उपखोरे क्र 2 मधील क्षेत्रासाठी या उपखोरे क्र 1 मध्ये निर्माण होणाऱ्या पाण्यापैकी (जलाशयावरील उपसा वगळता) 2163 दलघमी म्हणजे सुमारे 30 टक्के पाणी वापरण्यासाठी प्रस्तावित आहे. त्यांतील जलाशयातून उचलले जाणारे व उपखोरे क्रमांक 1 मध्येच वापरले जाणारे पाणी वगळता उपखोरे 1 मधील उर्वरीत क्षेत्रासाठी निव्वळ उपलब्धी 5104 दलघमी एवढी येते. या उपखोऱ्यात गोदावरी व तिच्या उपनद्यांवर पैठण धरणापर्यन्त 9 मोठे, 6 मध्यम व 107 लघु प्रकल्पांच्या माध्यमातून 1930 दलघमी चल पाणीसाठा करण्याची क्षमता निर्माण करण्यात आली आहे. ही साठवणक्षमता व पैठण जलाशयाची 2293 दलघमी क्षमता यांचा एकत्रित विचार केला तर या उपखोऱ्यांतील सरासरीने उपलब्ध असलेल्या पाण्याचा पूर्ण उपयोग अगोदरच प्रस्तावित आहे. या उपखोऱ्यात जायकवाडी या मोठया पाटबंधारे प्रकल्पांतर्गत असलेले पैठणधरण हे महत्वाचे धरण म्हणून ओळखले जाते. पैठण जलाशयाचा एकूण पाणीसाठा 2909 दलघमी आहे.(महत्तम उंची 100 मी पेक्षा जास्त वा एकूण धारणक्षमता 1000 दलघमी पेक्षा जास्त असलेली धरणे राष्ट्रीयदृष्टया मोठीधरणे म्हणून गणली जातात).

या उपखोऱ्यातील येव्यामध्ये तीव्र दोलायमानता आहे. हे सारणी 1.3 वरुन सहजपणे दिसून येते. 90 टक्के उपलब्धता व 10 टक्के उपलब्धता ( म्हणजे एकांतिक अतिपावसाची व अतिअवर्षणाची वर्षे सोडून असलेली उपलब्धता) यातील गुणक जवळजवळ 3 आहे; पण 75 टक्के व 50 टक्के उपलब्धता यातील गुणक मात्र केवळ 1.2 आहे. याचाच अर्थ 50 टक्केहून कमी उपलब्धतेच्या पाण्याच्या वापराचा विचार अनुकूल पाण्याच्या वर्षासाठी या उपखोऱ्यात होणे आवश्यक आहे. विशेषतः सन 1990 ते 95 किंवा सन 1968 ते 70 या सलग चांगल्या वर्षांच्या पाण्याच्या उपलब्धतेचे समृध्दीत रुपांतर करता यायला हवे, किंवा 1963, 1975, 1986 या दुष्काळापाठोपाठ येणाऱ्या अनुकूल वर्षांच्या उत्पादनातील घट भरून काढण्यासाठी

अधिकाधिक उपयोग करता यायला हवा. यादृष्टीने या उपखोऱ्याच्या पाण्याचे फेरनियोजन तात्काळ हाती घेतले जाणे आवश्यक आहे.

वाईट वर्षे दोनदोन सलगपणे येतांना दिसतात. उदा. 1942 व 43,1948 व 49, 1957 व 58 तर 1951, 52 व 53 आणि 1965, 66 व 67 ही तीन तीन सलग वर्षे आणि 1977, 78,79 व 80 ही सलग चार तुटीची वर्षे यांचेहि भान ठेवून तुटींच्या वर्षामध्ये अर्थव्यवस्था विस्कळीत होणार नाही अशी व्यवस्था करायला हवी.

चांगल्या पावसाच्या वर्षातील अतिरिक्त पाणी अडविण्याची व्यवस्था करून कमी पावसाच्या वर्षात कॅरीओव्हरच्या तरतूदीतून पाणी वापराचे फेरनियोजन होण्याची शक्यता दिसते. आर्थिक लाभव्ययाच्या प्रमाणाची मर्यादा जिथपर्यन्त परवानगी देईल तिथपर्यन्त कमी विश्वासार्हतेचे (सरासरी पेक्षाही खाली) पाणी वापरणे हितावह राहणार आहे. पाण्याच्या साठवणीचा यादृष्टीने फेरविचार व्हायला हवा. धरणांच्या उंच्या वाढविणे, पूरपातळीवर पाझर कालवे काढून भूजलाचे साठे वाढविणे, कालव्यावरील मोठया सीडी वर्क्सच्या ठिकाणी नाल्यावर (जलसेतू इ.) मार्गस्थ पाणीसाठे (एन-रूट रिझर्वायर) निर्माण करणे, नदीपात्रात बंधारे बांधून ओळीने साठे निर्माण करणे, इत्यादींचा या संदर्भात तपशीलवार अभ्यास करण्याची व उपखोऱ्याचा एकत्रित विचार करून पाणीव्यवस्थापनाचा एकात्मिक प्रकल्प करण्याची गरज आहे. नाथसागर जलाशयात गेल्या 39 वर्षातील उपलब्ध येवा सारणी 1.3 मध्ये दर्शविली आहे.

12.2 ज्या उपक्षेत्रांची मदार एकाच नदीप्रवाहावर आहे त्यांच्यातील तुटीचे तसेच विपुलतेचे वाटपही त्यांच्यात होण्याची सुनियोजित व्यवस्था असणे गरजेचे आहे. म्हणून प्रकल्पांच्या नियोजनाऐवजी उपखोऱ्याच्या नियोजनाचा अंगिकार होणे ही या उपखोऱ्याची (उपखोरे क्र 2 सह) गरज आहे. यासाठी उपखोरेनिहाय नियोजनाची व नियंत्रणाची व्यवस्था बसविणे गरजेचे राहील.

सरासरीने केवळ 5137 घमी पाणी उपलब्ध असलेल्या ऊर्ध्व गोदावरी-पैठण धरणापर्यंत (मुळा व प्रवरा व्यतिरिक्त) या घटकातील तुटीची अंशतः भरपाई करण्यासाठी वैतरणा उपखोऱ्यातील (जलविद्युत प्रकल्प) सरासरीने उपलब्ध होणारे 70-85 दलघमी (2500-3000 दलघफू) पाणी पूर्वेकडे या उपखोऱ्यात वळविणे हितावह राहणार आहे.

नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यातील वैतरणा नदीवर धारगाव गावाजवळ 2 धरणे बांधली आहेत. त्यातील अळवंडी धरण सांडव्यासहीत असून वैतरणा धरण विनासांडव्याचा भाग आहे.

वैतरणा प्रकल्पाची मूळ उद्दीष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

1) बृहन्मुंबई महानगरपालिकेस पाणी पूरवठा करणे.

2) विद्युत निर्मिति करणे.

वैतरणा प्रकल्पाचे काम 1965-66 साली सुरु करून विद्युत निर्मिति 1975-76 या वर्षापासून करण्यात आली.

या धरणाचे पाणलोट क्षेत्र 160.80 चौकिमी आहे. सर्वसाधारण जलनिष्पत्ती 267.10 दलघमी आहे. 75 टक्के जलनिष्पत्ती 176.10 दलघमी तर 90 टक्के जलनिष्पत्ती 121.30 दलघमी आहे. वरील जलनिष्पतीचा वापर करून 353.96 दलघमी उपयुक्त साठा असलेली धरणे बांधली आहेत. पिण्याचे पाणी व जलविद्युत निर्मितिचे उद्दीष्ट असल्याने 103 दलघमी निभावणीसाठा ठेवला आहे.

गेल्या 35 वर्षात धरणस्थळापर्यन्त आलेल्या येव्या वरुन 50 टक्के विश्वासार्हतेचा येवा 285.49 दलघमी येतो.

यावरून असे दिसून येईल की, वैतरणा प्रकल्पातून सांडव्यावरून अंदाजे 72.41 दलघमी (2050 दलघफू) पाणी वाहून गेले. तसेच अपेक्षित साठयापेक्षा 17657 दलघमी पाणी जास्त शिल्लक राहिले. एकंदर 17729.41 दलघमी पाणी अतिरिक्त असावे असा प्राथमिक अंदाज काढता येईल.

वैतरणा कटक धरण हे मुकणे धरणाच्या पाणलोट क्षेत्रातच आहे. त्यामुळे वैतरणा धरणाचे पाणी मुकणे धरणात वळविण्याचा विचार झाल्यास कटक बंधाऱ्या ऐवजी द्वारसहीत सांडवा बांधावा लागेल.

12.3 पुढील 30 वर्षात नागरी व औद्योगिक पाण्याची गरज जवळजवळ 500 घमी ने या उपखोऱ्यात वाढणार आहे. त्यातील फार मोठा भाग वैतरणेतून पुरा करता येऊ शकेल. भंडारदऱ्याच्या पश्चिमेस होणाऱ्या घाटघर उदंचन प्रकल्पातून पाण्याची चक्रिय आवर्तने वीजनिर्मितिसाठी होणार आहेत. त्यांचा उपयोग करून पावसाळ्यातील कोकणचे पाणी कांही अल्प प्रमाणात रात्रीच्या कमी वीजदराच्या वेळी पूर्वेस आणण्याच्या दृष्टीने यथाकाल पुढे विचार करता येईल.हे दोन टप्प्यात घडवून आणणे शक्य आहे. प्रथमतः सध्याच्या आळवंडी धरणाच्या सांडव्यावरून पश्चिमेकडे वाहणारे पाणी पूर्वेकडे उपयोगात आणून व त्यानंतरच्या दहा वर्षात वैतरणा जलविद्युत प्रकल्पाचाच आमूलाग्र फेरविचार व फेरबांधणी करून वैतरणा जलविद्युत केंद्र हा उदंचन प्रकल्प म्हणून कार्यान्वित करावा लागेल. स्थापित विद्युतनिर्मिति क्षमतेमध्ये घट न येऊ देता हा बदल करणे शक्य होईल. एरव्ही सुध्दा 1972 मधे कार्यान्वित झालेली विद्यूत जनित्रे 25 वर्षे वापरामुळे लवकरच बदलण्याची वेळ येईल. या पाण्याच्या स्थलांतरणामुळे मुंबई महानगरपालिकेला 121 दलघमी इतक्या पाण्याची भरपाई करून देण्यासाठी उल्हास उपखोऱ्यातील पश्चिमवाहिनी नद्यांवर नवीन साठवण करून देणे येत्या वीस वर्षात अवघड नाही. त्याचा खर्च मात्र पूर्वेकडील पाण्याचा नागरी व औद्योगिक वापर करणाऱ्या लाभधारकांनी उचलणे आवश्यक आहे. या उपखोऱ्यातील पाण्याच्या दराचा वेळीच फेरविचार त्या संदर्भात इष्ट राहील.

12.4 पार,दमणगंगा नदीखोऱ्याचा स्थानिक गरजांसाठी यथोचित उपयोग झाल्यानंतर उरणारे पाणी गोदावरी खोऱ्यात पूर्वेकडे उदंचन प्रक्रियेने वळवून पुढे वापर करता येईल. सन 2020 ते 2030 या कालखंडात असा विचार करावा लागेल. त्यासाठी 2020 पर्यन्त पार दमणगंगेच्या स्थानिक विकासांची गरज प्रथमतः पूर्ण होईल असे पहावे लागेल.

वर उल्लेख केल्याप्रमाणे पश्चिमेकडील वाहून जाणारे अतिरिक्त पाणी गोदावरी खोऱ्याकरिता वळविणेसंबधी ढोबळमानाने विवेचन मांडले आहे. इतरत्रही प्रवाही वा उपसा पध्दतीने पश्चिमेकडील वाहून जाणारे पाणी पूर्वेकडे वळविण्याचे अभ्यास हाती घेणे आवश्यक वाटते. हे अतिरिक्त पाणी वळविण्याचे नियोजन झाल्यास, त्याचा वापर अतिरिक्त सिंचनक्षमता निर्माण करण्यास वापरावयाचे किंवा सध्याची गोदावरी खोऱ्यामध्ये पाण्याची जी कमतरता आहे, त्याकरिता गृहीत धरावयाचे किंवा कसे? ही बाब धोरणात्मक राहील.

12.5 नाशिकच्या अवस्रोत भागात गोदावरी नदीवर दगडी बंधारा बांधून ( नांदूर - मधमेश्वर ) कालव्याव्दारे सिंचनास 80 वर्षापूर्वी (1916 साली) सुरूवात करण्यात आली पण गाळ पाणगवत व बेशरमीच्या झुडपामुळे बंधाऱ्यातील नियंत्रण व्यवस्थेत फार मोठा अडथळा येतो आहे. तो लवकर दूर व्हावयला हवा व त्या दृष्टीने नांदूर - मधमेश्वर बंधाऱ्याचीही प्रस्तावित फेरबांधणी लवकर पूर्ण व्हायला हवी.अनेक वर्षापासून प्रवाही सिंचनाची सुविधा उपलब्ध झालेला कोपरगावचा हा भाग आहे. तेथूनच आता गंगापूर वैजापूर साठी सुध्दा नव्या डाव्या दीर्घ पल्ल्याच्या कालव्यातून पाण्याचे वितरण होणार आहे.

बाजारपेठांची उपलब्धता आणि साखर कारखान्याच्या माध्यमातून प्रक्रिया केंद्राची व्यवस्था या मुळे ऊस या पिकाची या उपखोऱ्यात विस्तृत वाढ झालेली आहे. उपखोऱ्यातील पाण्याच्या तुटीचा विचार करता ऊस पिकास प्रोत्साहन देणे या उपखोऱ्यांत हितावह नाही. विद्यमान कारखान्यांची ऊसाची गरज भागविण्यासाठी व ऊस क्षेत्राची उत्पादकता वाढविण्यासाठी (क्षेत्र न वाढविता) ठिबकसारख्या सिंचन पध्दतीचा वापर या उपखोऱ्यात सर्वत्र अनिवार्य करणे आवश्यक आहे. तरच पाण्याची बचत होऊ शकेल. 20 साखर कारखान्यासाठी मिळून सध्याच्या उपखोऱ्याच्या उपलब्ध पाण्यापैकी किमान 2000 दलघमी पाणी तरी वापरले जात असावे. ठिबकसिंचनाच्या वापराने त्यांत निदान 1000 दलघमी बचत करण्याचे उद्दिष्ट पुढील दहा वर्षात साध्य करायला हवे.

12.6 हवामानाच्या अनुकुलतेमुळे द्राक्षांचे पीक आता मोठया प्रमाणावर घेण्यात येत आहे. द्राक्षाची निर्यात पण होत आहे. कांदा पण खूप पिकतो. या भागास फळभाज्यांची टोपली म्हणतात. या भागात तसेच देवगिरी परीसरात पेरुचे व सिताफळाचे उत्पादन पण चांगले आहे. या सर्व प्राथमिक उत्पादनावर प्रक्रिया करून त्यांचे मूल्यदायी दुय्यम तिय्यम पदार्थात रुपांतर करण्याची गरज आहे. या बरोबरच मालाची साठवणूक, वाहतूक, बाजारपेठा उपलब्ध करून देणे पण तितकेच गरजेचे आहे. लासलगाव, मनमाड, पिंपळगाव या कांद्याच्या मोठया बाजारपेठा आहेत. या ठिकाणाहून कांदा निर्यात पण केला जातो. कांदा हा नाशवंत पदार्थ आहे. याचे निर्जलीकरण करून टिकाऊ पदार्थात रुपांतर करून निर्यातीस वाव देण्यास भरपूर संधी आहे.

12.7 या उपखोऱ्यातील दारणा, कादवा, शिवना या उपनद्यांची मर्यादित लांबी (100 किमी पर्यन्तच) पण प्रवाहपात्राचा उतार मात्र 300 हून अधिक मीटर ही भूपृष्ठीय स्थिति जलविद्युत निर्मितिस आकर्षक आहे. त्यादृष्टीने या उपनद्यांच्या क्षमतेचा विकास करण्याचा विचार होणे इष्ट राहील. धरणांच्या साठवणीचाही शक्य असेल तेथे उंची वाढवून व साठवण वाढवून लघू जलविद्युत प्रकल्पासाठी फेरविचार होणे आवश्यक आहे.

12.8 या उपखोऱ्यात गोदावरी नदीच्या पाण्यावर अवलंबून रहाणाऱ्या नाशिक व औरंगाबाद या दोन महानगरपालिका आहेत. एकलहरा येथे औष्णिक विद्युतनिर्मिति केंद्र आहे. या तिन्हीचे सांडपाणी प्रक्रियाविना गोदावरी नदीत मिसळून गोदावरी नदी प्रदूषित होत आहे. या प्रदूषणाचा परिणाम नदीकाठाच्या भूजलाच्या प्रदूषणात पण दिसून येऊ लागला आहे.या दोन्ही शहराभोवतीचे वाढते औद्योगिकरण या प्रदूषणात मोठया प्रमाणात भर घालीत आहे. या नागरी व औद्योगिक पाण्याचा सध्याचा वापर अंदाजे 163 दलघमी आहे. या तुटीच्या खोऱ्यात हे सर्व पाणी शुध्द होऊन त्याचा स्थानिक उपयोगासाठी पुनर्वापर करणे अतिशय निकडीचे आहे. म्हणून यादृष्टीने नियोजन होऊन व प्रोत्साहनपर कारवाई येत्या 10 वर्षात पूर्ण होणे हितावह राहील. खोऱ्याबाहेरचे पाणी आणावयाच्या खर्चापेक्षा, पुनर्वापरातून पाण्याचा स्थानिक वापर करणे बरेच कमी खर्चाचे राहील.

12.9 या उपखोऱ्यातील सर्वच 25 तालुके अवर्षणप्रवण आहेत. भाजीपाला, फळे अशी सर्वच मूल्यदायी पिके पाण्याची यापुढे वाढती काटकसर करण्याच्या दृष्टिकोनातून द्रुतगतीने ठिबक,तुषार आणि पॉलीहाऊसेस या आधुनिक पध्दतीकडे घेऊन जाणे आवश्यक आहे. त्यासाठी स्वतंत्र प्रोत्साहन कार्यक्रम हाती घेण्याची गरज आहे. ऊसापासूनही क्रमाक्रमाने दूर जावून राष्ट्रीय व जागतिक बाजारपेठेशी अनुकूल अशी नवी पिकरचना पुढील वीस वर्षात विकसित करणे इष्ट राहील. अलिकडे या भागात आधुनिक पध्दतीने फूलशेती, मिरे व कॉफीच्या बागा वाढविण्याचे पण प्रयोग होत आहेत. यास निर्यातीची जोड मिळत आहे. हे एक चांगले पाऊल आहे. अशा प्रयोगांना विशेष प्रोत्साहन देणे गरजेचे आहे.

या उपखोऱ्यातील आणखी एक आशादायी सुचिन्ह म्हणजे उपखोऱ्यात पाणीवापर संस्थेचे जाळे चांगले निर्माण होत आहे. पालखेड, ओझरखेड सारख्या प्रकल्पातील 50 टक्के पेक्षा जास्त लाभक्षेत्राचे सिंचन व्यवस्थापन लाभधारकांच्या संस्थाकडे हस्तांतरित झालेले आहे. एक अतिशय उत्साहजनक पाऊल आहे. समाज परिवर्तन केंद्र यासारखी संस्था हे काम करण्यात अग्रेसर आहे. त्यांच्या अनुभवाचा लाभ घेऊन या उपखोऱ्यातील सर्वच सिंचन प्रणालीचे हस्तांतरण येत्या दहा वर्षात लाभधारकांच्या संस्थाकडे करणे अशक्य होऊ नये त्यामुळे पाण्याच्या डोळस वापराबरोबरच पाण्याच्या दर घनमीटर उत्पादकतेचाहि अधिक जागरूक विचार वाढीस लागेल. या उपखोऱ्यासाठी तयार करावयाच्या पुढील तीन दशकांच्या कार्यसूचीत या कार्यक्रमास विशेष प्राधान्य देण्यात यावे.

12.10 या उपखोऱ्यात नाशिक येथे वैद्यकिय विद्यापीठ व मुक्त विद्यापीठ, औरंगाबाद येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, राहुरी येथे कृषि विद्यापीठ अशा चार महत्वाच्या शैक्षणिक उच्चसंस्था कार्यरत आहेत. अनेक अभियांत्रिकी महाविद्यालये आहेत. पाटबंधारे खात्याच्या महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना व अभियांत्रिकी अधिकारी महाविद्यालय या शीर्षस्थ संस्था नाशिक येथे कार्यरत आहेत व जल व भूमी व्यवस्थापन संस्था औरंगाबाद येथे आहे. सामाजिक आर्थिक व पर्यावरणीय दृष्टीकोनातून या संस्थांच्या माध्यमातून या उपखोऱ्याचा सर्वांगीण अभ्यास करून घेणे व पुढील तीस वर्षाचा तपशीलवार पाण्याच्या संबंधातील विकास कार्यक्रम तयार करणे अवघड नाही. बदलत्या स्थितिचा वेळोवेळी वेध घेऊन नवी कारवाई करण्याच्या सूचना सुध्दा या संस्थांच्या सामूहिक विचार विमर्षातून घडवून आणता येतील. त्यासाठी सध्या कांही औपचारिक मंच उपलब्ध नाही. त्याची तातडीने निर्मिति होणे आवश्यक आहे.

12.11 एखाद्याच शहराभोवतीचे केंद्रीभूत औद्योगीकरण थांबवून औद्योगिकरणास पर्यायी दिशा देण्याच्या दृष्टीने या उपखोऱ्यात सिन्नर या ठिकाणी पंचतारांकित औद्योगिक वसाहत नापिक व पडिक जमिनीवर शहरापासून दूर विकसित होत आहे. औद्योगिकरणाचे ते एक उत्तम उदाहरण आहे. ग्रामीण लोकांना ग्रामीण भागात रोजगार उपलब्ध होण्यास अशा औद्योगिकीकरणामूळे फार मोठी मदत होते आहे. पाण्याची अतीव दोलायमानता लक्षात घेता या उपखोऱ्याच्या आर्थिक समृध्दिचा आधार कृषि उत्पादनांपेक्षा औद्योगिक उत्पादनांकडे वळणे इष्ट रहाणार आहे. त्यासाठी सिन्नरसारखी आणखी औद्योगिक केंद्रे - उदाः कन्नड/वैजापूर वेळीच विकसित करण्याचा विचार व्हायला हवा.

12.12 नाशिक शहर हे गंगापूर धरणाच्या पायथ्याशी आहे आणि त्यामुळे या शहरास पूराचा धोका आहे. त्यास प्रदीर्घ पूर्व सूचना मिळण्याचा संभवहि फार कमी आहे कारण स्रवणक्षेत्र लहान आहे. या दृष्टीने गंगापूर जलाशयाच्या पूर हाताळण्याच्या पध्दतीमध्ये अधिक सतर्कता व आधुनिक दूरसंदेश व्यवस्थेचा अंतर्भाव मोठया प्रमाणात करण्याची गरज आहे. पूर व्यवस्थापना संबंधीचा एकंदरीत सविस्तर उहापोह प्रकरण 6.10 खंड 1 मध्ये केलेला आहेच.

—000—

सारणी 1.1

**उपखोऱ्याच्या भौगोलिक प्रदेशाचे एकत्रित**
**माहवार सरासरी पर्जन्यमान व बाष्पीभवन**

पर्जन्यमान, बाष्पीभवन-मिमी

| अक्र | महिना | पर्जन्यमान | | बाष्पीभवन | |
|---|---|---|---|---|---|
| | | 1अ | 1आ | 1अ | 1आ |
| 1 | जानेवारी | 15 | 2 | 136 | 99 |
| 2 | फेब्रुवारी | 25 | 4 | 154 | 115 |
| 3 | मार्च | 8 | 2 | 201 | 160 |
| 4 | एप्रिल | 2 | 20 | 224 | 184 |
| 5 | मे | 1 | 25 | 240 | 208 |
| 6 | जून | 55 | 110 | 166 | 154 |
| 7 | जुलै | 204 | 250 | 130 | 126 |
| 8 | ऑगस्ट | 190 | 150 | 127 | 123 |
| 9 | सप्टेंबर | 185 | 140 | 153 | 116 |
| 10 | ऑक्टोबर | 151 | 110 | 162 | 127 |
| 11 | नोव्हेंबर | 95 | 40 | 142 | 103 |
| 12 | डिसेंबर | 55 | 42 | 126 | 90 |
| | एकूण | 986 | 896 | 1961 | 1605 |

हंगाम निहाय बाष्पीभवन

| अक्र | हंगाम | बाष्पीभवन | |
|---|---|---|---|
| | | 1 अ | 1 आ |
| 1 | खरीप | 576 | 519 |
| 2 | रब्बी | 566 | 419 |
| 3 | उन्हाळी | 819 | 667 |
| | एकूण | 1961 | 1605 |

टीप : या उपखोऱ्यात पश्चिमेच्या सह्याद्रीचा पर्वतीय प्रदेश व त्यानंतरचा पैठण पर्यन्तचा पठारी प्रदेश यांचा एकत्रीत समावेश आहे. पश्चिमेचा पर्वतीय प्रदेश 15 टक्केच आहे. पण त्याचे सरासरी पर्जन्यमान 1500 मिमी आहे. तर उर्वरित 85 टक्के पठारी प्रदेशावरील फार मोठया क्षेत्राचे सरासरी पर्जन्यमान केवळ 600 मिमी आहे. तर वार्षिक बाष्पीभवर 2500 मिमी आहे. पाणी वापर हा बव्हंश पठारी प्रदेशावर होत असल्याने त्याचा स्वतंत्र जलवैज्ञानिक तपशिलवार संलग्न अभ्यास होउन त्याचे निष्कर्ष तात्काळ प्रसिध्द व्हायला हवेत.

## सारणी 1.2
## पर्जन्यमापन केंद्रनिहाय तपशील
### 1अ) गोदावरी (मुळा व प्रवरा व्यतिरिक्त)

पर्जन्य- मिमी

| अक्र | केंद्राचे नाव | प्रकार | स्वामित्व | आधार सामुग्री उपलब्धिचा कालावधी | वार्षिक सरासरी पर्जन्य |
|---|---|---|---|---|---|
| 1 | त्रिंबक | सा.प. स्व.प. | भा.ह.खा. | 1939 - 85 | 2499 |
| 2 | नाशिक | सा.प. | भा.ह.खा. | 1940 - 85 | 593 |
| 3 | दिंडोरी | सा.प. | भा.ह.खा. | 1941 - 85 | 797 |
| 4 | निफाड | सा.प. | पा.खा. | 1942 - 85 | 449 |
| 5 | इगतपूरी | सा.प. | भा.ह.खा. | 1943 - 85 | 3000 |
| 6 | सिन्नर | सा.प. | भा.ह.खा. | 1944 - 85 | 592 |
| 7 | कळवण | सा.प. | पा.खा. | 1945 - 85 | 735 |
| 8 | पेठ | सा.प. | भा.ह.खा. | 1946 - 85 | 2185 |
| 9 | अकोले | सा.प. | भू.स.वि.यं. | 1901 - 80 | 600 |
| 10 | येवला | सा.प. | भू.स.वि.यं. | 1902 - 80 | 555 |
| 11 | औरंगाबाद | सा.प. | भू.स.वि.यं. | 1903 - 80 | 731 |
| 12 | नेवासा | सा.प. | भू.स.वि.यं. | 1904 - 80 | 587 |
| 13 | संगमनेर | सा.प. | भू.स.वि.यं. | 1905 - 80 | 479 |
| 14 | राहुरी | सा.प. | भू.स.वि.यं. | 1906 - 80 | 525 |
| | | | **1आ) मुळा व प्रवरा** | | |
| 1 | अकोले | सा.प. | पा.खा. | 1901 - 81 | 600 |
| 2 | नेवासा | सा.प. | भा.ह.खा. | 1901 - 81 | 557 |
| 3 | संगमनेर | सा.प. | भा.ह.खा. | 1901 - 81 | 409 |
| 4 | राहुरी | सा.प. स्व.प. | भा.ह.खा. | 1901 - 81 | 525 |
| 5 | पारनेर | सा.प. | भा.ह.खा. | 1901 - 81 | 566 |
| 6 | जुन्नर | सा.प. | भा.ह.खा. | 1901 - 81 | 733 |
| 7 | अहमदनगर | सा.प. | भा.ह.खा. | 1901 - 81 | 604 |
| 8 | पाथर्डी | सा.प. | भा.ह.खा. | 1901 - 81 | 536 |

सारणी 1.3

**जलसंपत्तीची उपलब्धता**

**1अ) गोदावरी (मुळा व प्रवरा व्यतिरिक्त)**

गोदावरी उगमस्थान ते नांदूर मधमेश्वर बंधाऱ्या पर्यन्त

येवा - दलघमी

| अक्र | वर्ष | वार्षिक सरासरी येवा | उतरत्या क्रमाने येवा | संगत वर्ष | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | 1939 | 1839 | 8129 | 1994 | |
| 2 | 1940 | 2904 | 6749 | 1990 | |
| 3 | 1941 | 2405 | 6365 | 1993 | |
| 4 | 1942 | 2328 | 5561 | 1988 | |
| 5 | 1943 | 2325 | 5200 | 1991 | |
| 6 | 1944 | 3771 | 4519 | 1989 | 10 |
| 7 | 1945 | 2268 | 4394 | 1963 | |
| 8 | 1946 | 2345 | 3935 | 1986 | |
| 9 | 1947 | 2467 | 3880 | 1987 | |
| 10 | 1948 | 2065 | 3868 | 1992 | |
| 11 | 1949 | 2348 | 3771 | 1944 | 20 |
| 12 | 1950 | 3014 | 3597 | 1956 | |
| 13 | 1951 | 1733 | 3503 | 1995 | |
| 14 | 1952 | 1834 | 3440 | 1970 | |
| 15 | 1953 | 2032 | 3235 | 1959 | |
| 16 | 1954 | 2810 | 3233 | 1969 | |
| 17 | 1955 | 2152 | 3045 | 1976 | 30 |
| 18 | 1956 | 3597 | 3014 | 1950 | |
| 19 | 1957 | 1239 | 2934 | 1968 | |
| 20 | 1958 | 2337 | 2904 | 1940 | |
| 21 | 1959 | 3235 | 2904 | 1973 | |
| 22 | 1960 | 1656 | 2810 | 1954 | |
| 23 | 1961 | 2406 | 2724 | 1975 | 40 |
| 24 | 1962 | 1375 | 2615 | 1971 | |
| 25 | 1963 | 4394 | 2596 | 1984 | |
| 26 | 1964 | 2076 | 2555 | 1943 | |
| 27 | 1965 | 1860 | 2467 | 1947 | |

| अक्र | वर्ष | वार्षिक सरासरी येवा | उतरत्या क्रमाने येवा | संगत वर्ष | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 28 | 1966 | 1806 | 2406 | 1961 | |
| 29 | 1967 | 2322 | 2405 | 1941 | 50 |
| 30 | 1968 | 2934 | 2405 | 1981 | |
| 31 | 1969 | 3233 | 2345 | 1946 | |
| 32 | 1970 | 3440 | 2337 | 1958 | |
| 33 | 1971 | 2615 | 2348 | 1949 | |
| 34 | 1972 | 948 | 2328 | 1942 | 60 |
| 35 | 1973 | 2904 | 2325 | 1943 | |
| 36 | 1974 | 1205 | 2322 | 1967 | |
| 37 | 1975 | 2724 | 2268 | 1945 | |
| 38 | 1976 | 3045 | 2229 | 1977 | |
| 39 | 1977 | 2229 | 2152 | 1955 | |
| 40 | 1978 | 1791 | 2128 | 1980 | 70 |
| 41 | 1979 | 2084 | 2084 | 1979 | |
| 42 | 1980 | 2128 | 2076 | 1964 | |
| 43 | 1981 | 2405 | 2065 | 1948 | 75 |
| 44 | 1982 | 1519 | 2032 | 1953 | |
| 45 | 1983 | 2325 | 1860 | 1965 | |
| 46 | 1984 | 2596 | 1839 | 1939 | 80 |
| 47 | 1985 | 1511 | 1834 | 1952 | |
| 48 | 1986 | 3935 | 1806 | 1966 | |
| 49 | 1987 | 3880 | 1791 | 1978 | |
| 50 | 1988 | 5561 | 1733 | 1951 | |
| 51 | 1989 | 4519 | 1656 | 1960 | 90 |
| 52 | 1990 | 6749 | 1519 | 1982 | |
| 53 | 1991 | 5200 | 1511 | 1985 | |
| 54 | 1992 | 3868 | 1375 | 1962 | |
| 55 | 1993 | 6365 | 1269 | 1957 | |
| 56 | 1994 | 8129 | 1205 | 1974 | |
| 57 | 1995 | 3503 | 948 | 1972 | |

वार्षिक सरासरी येवा = 2993.69

(10 टक्के उपलब्धता) / (90 टक्के उपलब्धता) = 2.73

(50 टक्के उपलब्धता) / (90 टक्के उपलब्धता) = 1.45

(50 टक्के उपलब्धता) / (75 टक्के उपलब्धता) = 1.16

| अक्र | वर्ष | वार्षिक सरासरी येवा | उतरत्या क्रमाने येवा | संगत वर्ष | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| | | **1आ) मुळा व प्रवरा** | | | |
| | | मुळा धरणा पर्यन्त | | | |
| 1 | 1948 | 1061 | 1789 | 1956 | |
| 2 | 1949 | 1391 | 1661 | 1954 | |
| 3 | 1950 | 1236 | 1629 | 1969 | 10 |
| 4 | 1951 | 1227 | 1409 | 1959 | |
| 5 | 1952 | 1168 | 1391 | 1949 | |
| 6 | 1953 | 1117 | 1336 | 1955 | |
| 7 | 1954 | 1661 | 1330 | 1973 | |
| 8 | 1955 | 1336 | 1247 | 1970 | |
| 9 | 1956 | 1789 | 1273 | 1957 | |
| 10 | 1957 | 1273 | 1270 | 1994 | 20 |
| 11 | 1958 | 1220 | 1246 | 1961 | |
| 12 | 1959 | 1409 | 1241 | 1960 | |
| 13 | 1960 | 1241 | 1236 | 1950 | |
| 14 | 1961 | 1246 | 1227 | 1951 | 30 |
| 15 | 1962 | 837 | 1220 | 1958 | |
| 16 | 1963 | 699 | 1168 | 1952 | |
| 17 | 1964 | 875 | 1117 | 1953 | |
| 18 | 1965 | 915 | 1116 | 1971 | |
| 19 | 1966 | 791 | 1082 | 1993 | 40 |
| 20 | 1967 | 1032 | 1075 | 1975 | |
| 21 | 1968 | 970 | 1061 | 1948 | |
| 22 | 1969 | 1629 | 1054 | 1976 | |
| 23 | 1970 | 1275 | 1032 | 1967 | |
| 24 | 1971 | 1116 | 1008 | 1979 | 50 |
| 25 | 1972 | 447 | 978 | 1983 | |
| 26 | 1973 | 1330 | 970 | 1968 | |
| 27 | 1974 | 796 | 915 | 1965 | |
| 28 | 1975 | 1075 | 897 | 1980 | |
| 29 | 1976 | 1054 | 875 | 1964 | 60 |
| 30 | 1977 | 764 | 837 | 1962 | |

| अक्र | वर्ष | वार्षिक सरासरी येवा | उतरत्या क्रमाने येवा | संगत वर्ष | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 31 | 1978 | 562 | 796 | 1974 | |
| 32 | 1979 | 1008 | 791 | 1966 | |
| 33 | 1980 | 897 | 790 | 1981 | |
| 34 | 1981 | 790 | 764 | 1977 | 70 |
| 35 | 1982 | 576 | 747 | 1992 | |
| 36 | 1983 | 978 | 721 | 1984 | 75 |
| 37 | 1984 | 721 | 700 | 1963 | |
| 38 | 1985 | 445 | 692 | 1990 | 80 |
| 39 | 1986 | 410 | 605 | 1991 | |
| 40 | 1987 | 265 | 576 | 1982 | |
| 41 | 1988 | 444 | 562 | 1978 | |
| 42 | 1989 | 447 | 467 | 1995 | |
| 43 | 1990 | 692 | 447 | 1989 | 90 |
| 44 | 1991 | 605 | 447 | 1972 | |
| 45 | 1992 | 747 | 445 | 1985 | |
| 46 | 1993 | 1082 | 444 | 1988 | |
| 47 | 1994 | 1270 | 410 | 1986 | |
| 48 | 1995 | 467 | 265 | 1987 | |

वार्षिक सरासरी येवा = 966.39

$$\frac{\text{10 टक्के उपलब्धता}}{\text{90 टक्के उपलब्धता}} = 3.64 \qquad \frac{\text{50 टक्के उपलब्धता}}{\text{90 टक्के उपलब्धता}} = 2.25$$

$$\frac{\text{50 टक्के उपलब्धता}}{\text{75 टक्के उपलब्धता}} = 1.39$$

सारणी : 1.3(चालू)

**नाथसागर जलाशयातील उपलब्ध येवा**

येवा-दलघमी

| वर्ष / महिना | येवा | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1955 | 1956 | 1957 | 1958 | 1959 | 1960 | 1961 | 1962 | 1963 | 1964 | 1965 | 1966 | 1967 | 1968 | 1969 | 1970 | 1971 | 1972 | 1973 | 1974 | 1975 | 1976 | 1977 |
| जुलै | 947 | 2615 | 828 | 623 | 623 | 934 | 750 | 628 | 610 | 831 | 644 | 784 | 1010 | 999 | 1952 | 811 | 528 | 118 | 607 | 1112 | 215 | 2396 | 823 |
| ऑगस्ट | 783 | 996 | 535 | 999 | 764 | 511 | 737 | 858 | 822 | 815 | 930 | 357 | 443 | 536 | 1608 | 768 | 770 | 362 | 930 | 311 | 1049 | 3352 | 457 |
| सप्टेंबर | 1538 | 417 | 620 | 1441 | 1233 | 657 | 1322 | 676 | 1273 | 749 | 716 | 557 | 660 | 698 | 412 | 718 | 590 | 160 | 1366 | 647 | 1470 | 635 | 554 |
| ऑक्टोबर | 421 | 124 | 308 | 398 | 343 | 326 | 365 | 333 | 348 | 371 | 358 | 278 | 328 | 350 | 122 | 366 | 303 | 189 | 378 | 333 | 510 | 81 | 74 |
| नोव्हेंबर | 146 | 310 | 239 | 149 | 141 | 252 | 137 | 252 | 119 | 285 | 286 | 222 | 256 | 282 | 303 | 315 | 266 | 151 | 146 | 273 | 29 | 64 | 157 |
| डिसेंबर | 140 | 152 | 64 | 143 | 135 | 67 | 131 | 68 | 114 | 76 | 77 | 60 | 69 | 76 | 149 | 84 | 71 | 35 | 140 | 73 | 41 | 61 | 62 |
| जानेवारी | 149 | 106 | 34 | 153 | 144 | 36 | 140 | 36 | 121 | 41 | 41 | 32 | 37 | 40 | 104 | 45 | 38 | 12 | 149 | 39 | 32 | 76 | 41 |
| फेब्रुवारी | 53 | 52 | 14 | 54 | 51 | 15 | 50 | 15 | 43 | 17 | 17 | 14 | 16 | 17 | 51 | 19 | 16 | 0 | 53 | 17 | 19 | 66 | 52 |
| मार्च | 29 | 24 | 7 | 30 | 28 | 7 | 27 | 7 | 24 | 8 | 8 | 6 | 7 | 8 | 24 | 9 | 8 | 0 | 29 | 8 | 31 | 87 | 71 |
| एप्रिल | 35 | 26 | 5 | 36 | 34 | 5 | 33 | 5 | 29 | 6 | 6 | 5 | 5 | 6 | 25 | 7 | 6 | 0 | 35 | 6 | 40 | 88 | 93 |
| मे | 19 | 12 | 3 | 20 | 19 | 4 | 18 | 4 | 16 | 4 | 4 | 3 | 4 | 4 | 12 | 5 | 4 | 0 | 19 | 4 | 35 | 84 | 105 |
| जून | 556 | 248 | 160 | 154 | 263 | 165 | 270 | 159 | 299 | 286 | 153 | 264 | 279 | 549 | 287 | 236 | 98 | 171 | 259 | 185 | 825 | 242 | 108 |
| एकूण : | 4816 | 5082 | 2817 | 4200 | 3778 | 2979 | 3980 | 3041 | 3818 | 3489 | 3240 | 2582 | 3114 | 3565 | 5049 | 3383 | 2698 | 1198 | 4111 | 3008 | 4296 | 7232 | 2597 |

**सारणी : 1.3(चालू)**

**माथसागर जलाशयातील उपलब्ध येवा**

येवा-दलघमी

| वर्ष / महिना | 1978 | 1979 | 1980 | 1981 | 1982 | 1983 | 1984 | 1985 | 1986 | 1987 | 1988 | 1989 | 1990 | 1991 | 1992 | 1993 | 1994 | कमाल | किमान | सरासरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जुलै | 238 | 132 | 584 | 820 | 94 | 312 | 270 | 59 | 92 | 142 | 199 | 647 | 416 | 1430 | 37 | 404 | 1434 | 2615 | 37 | 718 |
| ऑगस्ट | 261 | 1207 | 1767 | 856 | 502 | 633 | 431 | 256 | 359 | 287 | 454 | 378 | 1230 | 978 | 227 | 146 | 1206 | 3353 | 146 | 772 |
| सप्टेंबर | 264 | 1370 | 455 | 976 | 260 | 1738 | 304 | 67 | 69 | 58 | 1277 | 501 | 254 | 175 | 424 | 207 | 1393 | 1736 | 58 | 722 |
| ऑक्टोबर | 106 | 314 | 108 | 184 | 135 | 313 | 178 | 93 | 32 | 116 | 310 | 157 | 1684 | 27 | 17 | 370 | 21 | 1684 | 17 | 279 |
| नोव्हेंबर | 46 | 421 | 65 | 117 | 96 | 112 | 29 | 19 | 13 | 18 | 19 | 30 | 120 | 17 | 15 | 22 | 49 | 421 | 13 | 150 |
| डिसेंबर | 72 | 113 | 78 | 88 | 114 | 98 | 27 | 23 | 11 | 15 | 26 | 41 | 33 | 20 | 11 | 32 | 19 | 152 | 11 | 73 |
| जानेवारी | 61 | 62 | 51 | 88 | 81 | 120 | 29 | 11 | 11 | 11 | 57 | 45 | 35 | 20 | 12 | 20 | 16 | 153 | 11 | 59 |
| फेब्रुवारी | 64 | 125 | 61 | 97 | 93 | 81 | 25 | 12 | 14 | 14 | 46 | 38 | 13 | 25 | 6 | 29 | 8 | 125 | 0 | 37 |
| मार्च | 67 | 145 | 89 | 117 | 106 | 140 | 40 | 24 | 24 | 46 | 48 | 58 | 37 | 11 | 10 | 30 | 23 | 145 | 0 | 38 |
| एप्रिल | 85 | 123 | 99 | 124 | 119 | 177 | 26 | 25 | 6 | 20 | 40 | 51 | 70 | 22 | 20 | 19 | 30 | 177 | 0 | 40 |
| मे | 77 | 122 | 94 | 134 | 111 | 178 | 51 | 25 | 3 | 4 | 43 | 88 | 45 | 3 | 7 | 30 | 21 | 178 | 0 | 35 |
| जून | 106 | 389 | 102 | 176 | 100 | 123 | 77 | 87 | 105 | 101 | 72 | 107 | 898 | 110 | 16 | 29 | 31 | 898 | 16 | 227 |
| एकूण : | 1447 | 4523 | 3553 | 3777 | 1811 | 4025 | 1487 | 701 | 739 | 832 | 2591 | 2141 | 4844 | 2838 | 802 | 1338 | 4251 | | | 3151 |

टीपा : 1 क) प्रकल्प अहवाल (1967) प्रमाणे 75 टक्के विश्वासार्हतेचा येवा 2953 दलघमी

ख) माथसागर जलाशयात उपलब्ध प्रत्यक्ष 75 टक्के विश्वासार्हतेचा येवा 2582 दलघमी

ग) माथसागर जलाशयात उपलब्ध प्रत्यक्ष 50 टक्के विश्वासार्हतेचा येवा 3240 दलघमी

घ) माथसागर जलाशयात उपलब्ध प्रत्यक्ष 90 टक्के विश्वासार्हतेचा येवा 1198 दलघमी

2 माथसागर जलाशय निर्मिती पूर्वीचा येवा स्ट्रेंज सुत्र प्रमाणे (Strange's tables) काढला आहे.

3 नक्त येव्याचे आकडे उर्ध्वस्थित जलाशये, वापर सोडून आहेत.

4 अ) 90 टक्के विश्वासार्हतेचा येवा व 10 टक्के विश्वासार्हतेचा येवा यांचे गुणोत्तर 4.8 आहे. (पूर्ण खोऱ्यासाठी हे गुणोत्तर फक्त 3 आहे.)

आ) 75 टक्के विश्वासार्हतेचा येवा व 50 टक्के विश्वासार्हतेचा येवा यांचे गुणोत्तर 1.25 आहे. ( पूर्ण खोऱ्यासाठीही हे गुणोत्तर 1.25 च आहे.)

सारणी:1.4

**अवर्षणप्रवण क्षेत्र**

**1अ) गोदावरी (मुळा व प्रवरा व्यतिरिक्त)**

क्षेत्र - चौकिमी

लोकसंख्या -हजारात, पर्जन्यमान - मिमी.

| अक्र | जिल्हा | तालुका | क्षेत्र | लोकसंख्या | वार्षिक सरासरी पर्जन्यमान |
|---|---|---|---|---|---|
| 1 | नाशिक | नाशिक | 1140 | 872 | 593 |
| 2 | | इगतपूरी | 837 | 166 | 3000 |
| 3 | | दिंडोरी | 1191 | 187 | 797 |
| 4 | | सिन्नर | 1252 | 196 | 592 |
| 5 | | निफाड | 1052 | 357 | 449 |
| 6 | | चांदवड | 747 | 129 | 545 |
| 7 | | येवला | 1007 | 179 | 525 |
| 8 | | नांदगांव | 55 | 10 | 624 |
| 9 | अहमदनगर | शेवगांव | 1130 | 171 | 519 |
| 10 | | संगमनेर | 185 | 39 | 409 |
| 11 | | कोपरगांव | 1045 | 337 | 493 |
| 12 | | श्रीरामपूर | 387 | 163 | 483 |
| 13 | | पाथर्डी | 992 | 167 | 536 |
| 14 | औरंगाबाद | औरंगाबाद | 290 | 149 | 595 |
| 15 | | वैजापूर | 1510 | 219 | 553 |
| 16 | | गंगापूर | 1308 | 209 | 649 |
| 17 | | कन्नड | 840 | 136 | 754 |
| 18 | | खुलताबाद | 192 | 33 | 800 |
| 19 | | पैठण | 1328 | 224 | 623 |
| | | **1आ) मुळा व प्रवरा** | | | |
| 1 | अहमदनगर | अहमदनगर | 212 | 67 | 604 |
| 2 | | अकोले | 845 | 222 | 600 |
| 3 | | संगमनेर | 889 | 316 | 409 |
| 4 | | श्रीरामपूर | 351 | 177 | 483 |
| 5 | | राहुरी | 1042 | 253 | 525 |
| 6 | | नेवासा | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| 7 | | पारनेर | 858 | 103 | 566 |
| 8 | नाशिक | सिन्नर | 205 | 32 | 592 |
| 9 | पूणे | जुन्नर | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |

## सारणी : 1.5

### प्रकल्पांची सद्यस्थिती

### ऊर्ध्व गोदावरी (पैठण धरणापर्यंत मुळा व प्रवरा वगळून)

चलपाणीसाठा - दलघमी

पाणीवापर - दलघमी

सिंचनक्षेत्र - हेक्टर

| अक्र | प्रकल्पाचा संवर्ग | पूर्ण झालेले प्रकल्प | | | | प्रगतीपथावरील प्रकल्प | | | | भविष्यकालीन प्रकल्प | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 1 | मोठे | गंगापूर | 204 | 223 | 9506 | भाम | 70 | 75 | | | | | | | 273 | 298 | 9506 |
| | | दारणा | 213 | 279 | 38772 | वाहुली | 41 | 47 | | | | | | | 253 | 326 | 38772 |
| | | करंजवण | 166 | 23 | | वाकी | 56 | 61 | | | | | | | 222 | 84 | 0 |
| | | वाघाड | 70 | 54 | 6750 | मुकनी | 122 | 142 | 37603 | | | | | | 192 | 196 | 44353 |
| | | पालखेड | 21 | 276 | 38500 | कारवा | 53 | 81 | 10117 | | | | | | 74 | 357 | 48617 |
| | | ओझरखेड | 60 | 92 | 10400 | | | | | | | | | | 60 | 92 | 10400 |
| | | नांदुरमधमेश्वर | 11 | 86 | 11282 | | | | | | | | | | 11 | 86 | 11282 |
| | | 7 | 745 | 1032 | 115210 | 5 | 342 | 407 | 47720 | 0 | 0 | 0 | 0 | 13 | 1087 | 1439 | 162930 |
| 2 | मध्यम | ढेकू | 12 | 18 | 3562 | खेर्डा | 16 | 24 | 3401 | वालदेवी | 32 | 42 | 2358 | | 60 | 84 | 9321 |
| | | कोल्ही | 3 | 3 | 1068 | शिवनाटाकळी | 36 | 44 | 6600 | गोदावरी | 38 | 49 | 6850 | | 77 | 95 | 14518 |
| | | अंबाडी | 9 | 13 | 2375 | बोरदहेगांव | 13 | 17 | 3117 | उर्ध्वकालवा | 16 | 25 | 3310 | | 39 | 55 | 8802 |
| | | | | | | टेंभापूरी | 20 | 25 | 7484 | | | | | | 20 | 25 | 7484 |
| | | | | | | नारंगी | 12 | 8 | 2940 | | | | | | 12 | 8 | 2940 |
| | | | | | | आळंदी | 38 | 41 | 1268 | | | | | | 38 | 41 | 1268 |
| | | | | | | कश्यपी | 33 | 46 | 2076 | | | | | | 33 | 46 | 2076 |
| | | 3 | 25 | 34 | 7005 | 7 | 169 | 204 | 26886 | 3 | 85 | 115 | 12518 | 13 | 279 | 353 | 46409 |
| 3 | लघु | 76 | 137 | 171 | 22540 | 15 | 184 | 230 | 5660 | 9 | 22 | 27 | 3552 | 100 | 342 | 428 | 31752 |
| सर्व एकूण : | | 86 | 907 | 1237 | 144755 | 27 | 694 | 840 | 80266 | 12 | 107 | 142 | 16070 | 126 | 1708 | 2220 | 241091 |

सारणी : 1.5(चालू)

**प्रकल्पांची सद्य:स्थिती**

**मुळा व प्रवरा घटक क्षेत्रातील**

चलपाणीसाठा - दलघमी

पाणीवापर - दलघमी

सिंचनक्षेत्र - हेक्टर

| अक्र | प्रकल्पाचा संवर्ग | पूर्ण झालेले प्रकल्प | | | | प्रगतीपथावरील प्रकल्प | | | | भविष्यकालीन प्रकल्प | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| अ | मोठे प्रकल्प | मुळा | 609 | 825 | 80810 | महालदेवी | 245 | 326 | 66900 | 0 | | | | | 853 | 1150 | 147710 |
| | | भंडारदरा | 313 | 413 | 23077 | | | | | 0 | | | | | 313 | 413 | 23077 |
| | | 2 | 921 | 1238 | 103887 | 1 | 245 | 326 | 66900 | 0 | 0 | 0 | 0 | 3 | 1166 | 1564 | 170787 |
| ब | मध्यम प्रकल्प | मंडहोळ | 9 | 9 | 2226 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | | 9 | 9 | 2226 |
| | | आढळा | 28 | 28 | 3913 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | | 28 | 28 | 3913 |
| | | भोजपूर | 18 | 18 | 4372 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | | 18 | 18 | 4372 |
| | | 3 | 54 | 54 | 10511 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 3 | 54 | 54 | 10511 |
| क | लघु प्रकल्प | 31 | 47 | 59 | 9281 | 12 | 26 | 32 | 6275 | 7 | 17 | 21 | 3621 | 50 | 90 | 112 | 19177 |
| | **सर्व एकूण :** | 36 | 1023 | 1352 | 123679 | 13 | 270 | 358 | 73175 | 7 | 17 | 21 | 3621 | 56 | 1310 | 1730 | 200475 |

सारणी : 1 .6

**जलसंपत्तीचा ताळेबंद**

**गोदावरी (मुळा व प्रवरा व्यतिरिक्त)**

जलसंपत्ती - दलघमी

| अक्र | उपलब्धता | | अक्र | वापर (सन2030) | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | भूपृष्ठावरील | | 4 | भूपृष्ठावरील | |
| | अ) नैसर्गिक | | | अ) घरगुती वापरासाठी | |
| | 1) 75 टक्के विश्वासार्हतेने | 3594 | | 1) नागरी | 364 |
| | 2) 50 टक्के विश्वासार्हतेने | 4576 | | 2) ग्रामीण | 101 |
| | 3) सरासरीने | 5137 | | 3) पशुधन | 55 |
| | 4) नियोजनासाठी | 5137 | | एकूण | 520 |
| | ब) मानवप्रबंधित | | | ब) उद्योगधंदयासाठी | 159 |
| | 1) नागरी वापरातून पुनरुद्भव (80 %) | 291 | | एकूण सिंचनेतर वापर | 679 |
| | 2) उद्योग धंदयातील पुनरुद्भव (97.5%) | 155 | 5 | इतर उपखोऱ्यात स्थलांतरीत पाणी | 2163 |
| | 3) इतर खोऱ्यातून संक्रमित झालेले पाणी | 355 | 6 | सिंचनासाठी उपलब्ध भूपृष्ठावरील पाणी (5137+801-679-2163+310) | 3406 |
| | एकूण (1 ब) | 801 | | | |
| 2 | मानवनिर्मित<br>लाभक्षेत्रातील पुनर्भरण (5137+801-679-2163)=3096 च्या10 % | 310 | | | |
| 3 | एकूण उपलब्धता (5137+801+310) | 6248 | 7 | एकूण वापर | 6248 |
| | 1) भूजल उपलब्धता (वार्षिक एकूण पुनर्भरण ) | 1641 | | अ) भूजलाचा सध्याचा सिंचनासाठी वापर | 749 |
| | 2) भूजल वापरास मुभा ( 1641 च्या 65 %) | 1067 | | | |

टीपा : 1) भूजल उपलब्धतेमुळे उपखोऱ्याच्या एकूण उपलब्धतेत वाढ होणार नाही ; भूजलाचा जेवढा उपसा होईल तेवढा नदी प्रवाह घटत जाईल म्हणून एकूण उपलब्धतेचा आकडा काढताना भूजल उपलब्धतेचा विचार घेतलेला नाही.

2) संकलीत अंदाजासाठी सर्व पाण्याचा उपयोग भूपृष्ठावरील पाण्यातून दाखविला आहे. पण एकूण वापरापैकी अधिकाधिक 1067+310= 1377 भूजल माध्यमातून शक्य आहे.

3) पाणीवापराचे नियोजन उपलब्ध येवा मालिकेवर आधारित आहे.

सारणी:1.6 (चालू)

**जलसंपत्तीचा ताळेबंद**

जलसंपत्ती - दलघमी

| अक्र | उपलब्धता | | अक्र | वापर (सन2030) | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **भूपृष्ठावरील** | | 4 | **भूपृष्ठावरील** | |
| | अ) नैसर्गिक | | | अ) घरगुती वापरासाठी | |
| | 1) 75 टक्के विश्वासार्हतेने. | 1648 | | 1) नागरी | 9 |
| | 2) 50 टक्के विश्वासार्हतेने | 2141 | | 2) ग्रामीण | 44 |
| | 3) सरासरीने | 2130 | | 3) पशुधन | 23 |
| | 4) नियोजनासाठी | 2130 | | एकूण | 76 |
| | ब) मानवप्रबंधित | | | ब) उद्योगधंदयासाठी | 12 |
| | 1) नागरी वापरातून पुनरुद्भव (80 %) | 7 | | एकूण सिंचनेतर वापर | 88 |
| | 2) उद्योग धंदयातील पुनरुद्भव (97.5%) | 12 | 5 | इतर उपखोऱ्यात स्थलांतरीत पाणी | 355 |
| | 3) इतर उपखोऱ्यातून संक्रमित झालेले पाणी | 0 | 6 | सिंचनासाठी उपलब्ध भूपृष्ठावरील पाणी (2130+19-88-355+171) | 1877 |
| | **एकूण (1 ब)** | **19** | | | |
| 2 | मानवनिर्मित<br>लाभक्षेत्रातील पुनर्भरण (2130+19-88-355)=1706 च्या10 % | 171 | | | |
| 3 | **एकूण उपलब्धता [2130+19+171]** | **2320** | 7 | एकूण वापर | **2320** |
| | 1) भूजल उपलब्धता (वार्षिक एकूण पुनर्भरण ) | 613 | | अ) भूजलाचा सध्याचा सिंचनासाठी वापर | 251 |
| | 2) भूजल वापरास मुभा ( 613 च्या 65 %) | 398 | | | |

टीपा : 1) भूजल उपलब्धतेमुळे उपखोऱ्याच्या एकूण उपलब्धतेत वाढ होणार नाही ; भूजलाचा जेवढा उपसा होईल तेवढा नदी प्रवाह घटत जाईल म्हणून एकूण उपलब्धतेचा आकडा काढताना भूजल उपलब्धतेचा विचार घेतलेला नाही.

2) संकलीत अंदाजासाठी सर्व पाण्याचा उपयोग भूपृष्ठावरील पाण्यातून दाखविला आहे. पण एकूण वापरापैकी अधिकाधिक 398+171= 569 भूजल माध्यमातून शक्य आहे.


3) पाणीवापराचे नियोजन उपलब्ध येवा मालिकेवर आधारित आहे.


## सारणी : 1.7

### प्रस्तावित जलविद्युत प्रकल्प

जलनिष्पत्ती, संचय क्षमता-दलघमी, शीर्ष-मी, विसर्ग-घमी/सेकंद, क्षमता-किवॅ, वार्षिक वीजनिर्मिती-दल एकक

| अक्र | योजनेचे नाव | जलनियोजन | | जलनिष्पत्ती | | धरण संचय क्षमता | शीर्ष | विसर्ग | प्रस्तावित स्थापित क्षमता | वार्षिक वीजनिर्मिती | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 50 टक्के | 75 टक्के | 50 टक्के | 75 टक्के | | | | | 50 टक्के | 75 टक्के |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 1 | मुकणे जलविद्युत प्रकल्प | * | | 214 | 142 | 214 | 17 | 10 | 2 x 750 | 3.807 | 2.101 |
| 2 | दारणा जलविद्युत प्रकल्प | | * | | 285 | 208 | 18 | 7 | 2 x 1500 | | 10.633 |
| 3 | कडवा जलविद्युत प्रकल्प | | * | 110 | 82 | 60 | 12 | 7 | 1 x 500 | 1.866 | 1.5361 |
| 4 | भाम जलविद्युत प्रकल्प | | * | | 75 | 75 | 20 | 8 | 1 x 1000 | | 2.622 |
| 5 | गंगापूर प्रपात जलविद्युत प्रकल्प | | * | | 199 | | 7 | 9 | 1 x 500 | | 3.101 |
| 6 | कश्यपी जलविद्युत प्रकल्प | * | | 60 | 43 | 53 | 32 | 3 | 1 x 900 | 2.784 | 1.782 |
| 7 | गौतमी (गोदावरी)जलविद्युत प्रकल्प | * | | 53 | 44 | 53 | 48 | 3 | 1 x 750 | 4.119 | 3.539 |
| 8 | वालदेवी जलविद्युत प्रकल्प | | * | 42 | 32 | 34 | 26 | 3 | 1 x 600 | 1.2382 | 0.9888 |
| 9 | भावली जलविद्युत प्रकल्प | | * | | 47 | 45 | 18 | 3 | 1 x 1000 | | 1.044 |
| 10 | वाकी जलविद्युत प्रकल्प | | * | | 61 | 58 | 23 | 8 | 1 x 1000 | | 2.257 |
| 11 | निळवंडे जलविद्युत प्रकल्प | | | | | | | | | | |
| | उच्चस्तर (निळवंडे कालवा) | | * | 671 | 579 | 236 | 24 | 40 | 1 x 2500 | 6.743 | 5.873 |
| | निम्नस्तर (ओझर कालवा) | | * | 671 | 579 | 236 | 43 | 50 | 1 x 8000 | 14.909 | 13.438 |
| 12 | मुळा जलविद्युत प्रकल्प | | | | | | | | | | |
| | उजवा तट कालवा | | * | | 994 | 736 | 11 | 47 | 1 x 5000 | | 15.1 |
| | डावा तट कालवा | | * | | 994 | 736 | 10 | 9 | 1 x 750 | | 2.35 |




| उप खोऱ्याचे स्थान | उपखोरे क्र. | उपखोऱ्यांची नावे | उपखोरे क्र. | उपखोऱ्यांची नावे |
|---|---|---|---|---|
|  | 3 | पूर्णा (दुधनासहीत) | 21 | उत्तर कोकण |
| | 2 | गोदावरी निम्नस्रोत (पैठण धरणाखाली) | 17 | उर्ध्व भीमा (उजनीपर्यंत) |
| | 11 | गिरणा | 19 | सीना-बोरी-बेनेतुरा |
| | 20 | दमणगंगा - पार | | |

महाराष्ट्र जल व सिंचन आयोग

## उर्ध्व गोदावरी
## (पैठण धरणा पर्यंत) उपखोरे

(अ) गोदावरी (मुळा व प्रवरा व्यतिरिक्त) घटक,
(आ) मुळा व प्रवरा घटक

जून 1999

# उपखोरे:2

# गोदावरी निम्नस्रोत (पैठण धरणाखाली)

## 1.0 भौगोलिक तपशील

गोदावरी नदी राज्यात सर्वात मोठी नदी असून ती नाशिक जिल्हयातील त्र्यंबकेश्वर जवळ उगम पावते व राज्याच्या बाहेर वाहत जाऊन आंध्र प्रदेशात बंगालच्या उपसागरास मिळते. नांदेड हे ठिकाण गोदावरी खोऱ्याच्या मध्यभागी येते. या उपखोऱ्यात पैठण धरणाखालील व राज्य सीमेपर्यंतचा प्रदेश (दुधना,पूर्णा,मांजरा सोडून) व सिंदफना उपखोऱ्याचा समावेश (नकाशा 2.1) आहे. या उपखोऱ्याचे एकूण क्षेत्रफळ 17616 चौकिमी आहे. उपखोऱ्यात अहमदनगर, औरंगाबाद, जालना, परभणी, बीड, नांदेड व लातूर जिल्ह्यातील खालील तालुक्यांचे क्षेत्र येते.

**अहमदनगर** :1) शेवगाव 2) पाथर्डी.

**औरंगाबाद** :1) पैठण.

**जालना** :1) अंबड 2) घनसावंगी 3) परतूर.

**परभणी** :1) परभणी 2) पाथरी 3) गंगाखेड 4) कळमनुरी 5) वसमत 6) पालम 7) पूर्णा 8) औंढा (नागनाथ).

**बीड** :1) बीड 2) गेवराई 3) माजलगाव 4) अंबाजोगाई 5) केज 6) पाटोदा 7) आष्टी 8) धारुर 9) परळी.

**नांदेड** :1) नांदेड 2) हदगाव 3) भोकर 4) बिलोली 5) कंधार 6) लोहा.

**लातूर** :1) अहमदपूर.

मुख्य नदी, तिच्या उपनद्या इत्यादीचा तपशील खालील प्रमाणे आहे.

लांबी - किमी; तलांक-मी

| अक्र | नदी | उपनदी | लांबी | उगमस्थान | | संगमस्थान | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ठिकाण | तलांक | ठिकाण | तलांक |
| 1 | गोदावरी | | 457* | त्र्यंबकेश्वर | 1280 | आंध्र प्रदेशात राजमहेंद्री जवळ बंगालच्या उपसागरास | 0 |
| 2 | | वाण | 75 | तांबा | 756 | गोदावरीला दुडगाव ता.परळी | 380 |
| 3 | | बोरना | 40 | घाटनांदूर | 625 | गोदावरीला गौंडगांव | 372 |
| 4 | | सरस्वती | 70 | कारी | 550 | गोदावरीला पोहनेर | 385 |
| 5 | | गल्हाटी | 52 | ब्राम्हणगाव ता.पैठण | 658 | साडेगाव ता.अंबड | 410 |
| 6 | | मासोळी | 35 | आंतरवेली ता.गंगाखेड | 557 | गोदावरीला शेन ता.गंगाखेड | 557 |

* महाराष्ट्रातील उपखोऱ्याच्या मर्यादेत

लांबी - किमी; तलांक-मी

| अक्र | नदी | उपनदी | लांबी | उगमस्थान | | संगमस्थान | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ठिकाण | तलांक | ठिकाण | तलांक |
| 7 | | आसना | 45 | हिरडगाव ता.वसमत | 425 | गोदावरीला बोंदार ता.नांदेड | 341 |
| 8 | | सिंधफना | 118 | पाटोदा ता.वेदरवाडी | 695 | गोदावरीला ढालेगाव . | 390 |
| 9 | | बिंदूसरा | 45 | बेनसूर ता.बीड | 767 | सिंधफनेला येरगाव . | 477 |
| 10 | | कुंडलिका | 39 | हंगरवाडी ता.केज | 700 | सिंधफनेला पुनंदगाव . | 430 |

1.2 विस्तार - या उपखोऱ्याचा क्षेत्रीय विस्तार अक्षांश 18°42′ ते 19°42′ उत्तर व रेखांश 75°11′ ते 77°56′ पूर्व यामध्ये आहे.

1.3 चतु:सीमा - या उपखोऱ्याच्या चतु:सीमा पुढीलप्रमाणे आहेत.

| अक्र | दिशा | तपशील |
|---|---|---|
| 1 | उत्तर | पूर्णा दुधनेसह उपखोरे क्र.3 |
| 2 | दक्षिण | मांजरा उपखोरे क्र.4 |
| 3 | पूर्व | राज्यसीमा, आंध्रपदेश |
| 4 | पश्चिम | ऊर्ध्व गोदावरी (मुळा व प्रवरा घटक) |

## 2.0 हवामान

2.1 या उपखो-यातील बरेचसे क्षेत्र निश्चित पावसाच्या प्रदेशात येते व जवळ जवळ एक तृतीयांश क्षेत्र अवर्षणप्रवण आहे. येथील हवामान समशितोष्ण आहे. या क्षेत्रात साधारणतः 84 टक्के पाऊस नैऋत्य मोसमी वाऱ्यांमूळे जून ते सप्टेंबर दरम्यान, 12 टक्के पाऊस ईशान्य मोसमी वाऱ्यांमूळे सप्टेंबर ते डिसेंबर या कालावधीत तर 4 टक्के पाऊस डिसेंबरनंतर पडतो. वार्षिक सरासरी पर्जन्यमान 784 मिमी आहे. या उपखोऱ्यातील हवामान विषयक इतर बाबी व पर्जन्यमानातील दोलायमानता इत्यादी माहिती पुढीलप्रमाणे आहे.

पर्जन्यमान-मिमी; तपमान-अंश से

| अक्र | वैशिष्टये | परिमाण | वर्ष | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1 | सर्वात अधिक पाऊस | 1066 | 1989 | हदगाव |
| 2 | सर्वात कमी पाऊस | 290 | 1991 | बीड |
| 3 | सर्वात अधिक तपमान | 46.6 | मे -1964 | नांदेड |
| 4 | सर्वात कमी तपमान | 7 | जानेवारी-1993 | नांदेड |

कृषि हवामान वर्गीकरणानुसार या उपखोऱ्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

6-अवर्षण (कमी पावसाचा) विभाग (SC), 7- निश्चित पावसाचा मुख्यतः खरीप पिकांचा विभाग (ARK) व 8- मध्यम ते साधारण जास्त पावसाचा विभाग (MR).

या उपखोऱ्यातील पर्जन्यमानातील दोलायमानता गुणांक 33 (तक्ता 2.5.8) आहे. पर्जन्यमानाचा माहवार तपशील सारणी 2.1 मध्ये दर्शविला आहे. पर्जन्यमापनाचा केंद्रनिहाय तपशील सारणी 2.2 मध्ये दिलेला आहे.

2.2 बाष्पीभवन : या उपखोऱ्यात सर्वाधिक सरासरी बाष्पीभवन मे महिन्यात 240 मिमी तर सर्वात कमी बाष्पीभवन डिसेंबर महिन्यात 126 मिमी होते.बाष्पीभवनाचा माहवार तपशील सारणी 2.1 मध्ये दर्शविला आहे.

## 3.0 जलसंपत्तिची उपलब्धता

3.1 भूपृष्ठीय जलसंपत्ति : उपखोऱ्यातील वार्षिक सरासरी येवा 4778 दलघमी आहे. 1951 ते 1997 या 47 वर्षांची माहिती आधारभूत घेऊन भूपृष्ठावरील पाण्याची उपलब्धता खालीलप्रमाणे आहे-

75 % विश्वासार्हतेने 2703 दलघमी

50 % विश्वासार्हतेने 3887 दलघमी.

येवा मोजण्याची ठिकाणे पुढील प्रमाणे आहेत.

येवा-दलघमी

| अक्र | सरीतामापन केंद्राचे नाव | स्वामित्व | आधार सामुग्री उपलब्धता कालावधी | वार्षिक सरासरी येवा |
|---|---|---|---|---|
| 1 | पाटेगाव | पा.खा. | 1984-95 | 227 |
| 2 | हातगड | पा.खा. | 1978-95 | 736 |
| 3 | नागापूर | पा.खा. | 1978-95 | 3640 |
| 4 | येळी | कें.ज.आ. | 1978-96 | 4781 |

वार्षीक येवा व विश्वासार्हता याची काही मर्यादित माहिती सारणी 2.3 मध्ये दिली आहे.

या उपखोऱ्यात गोदावरी लवादानुसार पैठण धरणाखाली, पूर्णा सिध्देश्वर धरणाखाली व निजामसागर धरणाखाली परंतु पोचमपाडवरील राज्यसीमेपर्यंतच्या भागात दिनांक 6.10.75 पूर्वी मंजूर झालेले सर्व प्रकल्पाचे पाणी व दिनांक 6.10.75 नंतर करावयाच्या पाणी वापरासाठी 1699 दलघमी (60 अघफू) असा पाणीवापर मंजूर आहे. त्यामुळे या ठिकाणी मंजूर झालेल्या प्रकल्पांचा पाणीवापर 536 दलघमी करावा लागणार आहे. अशा प्रकारे या क्षेत्रातील एकूण 1586 दलघमी पाणी या उपखोरे क्षेत्रात वापरता येईल. त्यांत पैठण धरणातून मिळणाऱ्या 2163 दलघमी पाण्याची आणखी भर राहील.

3.2 भूशैलीय रचना :

भूपृष्ठीयस्थिती (भूरुप वर्णन) : साधारण 15 टक्के भूभाग अतिविच्छेदीत व डोंगराळ,57 टक्के पठारी व उर्वरीत 28 टक्के भूभाग सपाट व नदीलगतच्या गाळाचा आहे. यात भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा निर्देशित 81 पाणलोट क्षेत्रे आहेत.

भूपृष्ठीय शैलस्थिती :उपखोऱ्यात मुख्यत: तीन प्रकारचे भूस्तर आढळतात. सर्वात जुने ग्रॅनाईट नाईस त्यावर लाव्हा थरांपासून तयार झालेला बहुस्तरीय दक्षिण कातळ खडक (डेक्कन ट्रॅप) व सर्वात वर नद्यांच्या काठावरचा गाळ.

ग्रॅनाईट नाईस उपखोऱ्याच्या पूर्व भागात कमी उठावाच्या टेकडयाच्या स्वरुपात बिलोली व देगलूर तालुक्यात उघडा पडलेला आहे व त्याचे विघटन मोठया प्रमाणावर झालेले आहे.उर्वरीत भागात लाव्हा थरापासून तयार झालेला बहुस्तरीय दक्षिण कातळ खडक (डेक्कन ट्रॅप प्रस्तर )आढळतो. त्यावर अलिकडच्या काळात तयार झालेला गाळ मुख्यत: गोदावरी,सिंदफना या नद्यांच्या काठावर आढळतो. गाळाचा स्तर खूप मर्यादीत असून त्याची जाडी 15 ते 30 मीटर आहे. त्यात मातीचे प्रमाण अधिक आहे. दक्षिण कातळ खडकात (डेक्कन ट्रॅप प्रस्तरात) प्रामुख्याने अकुहरी बेसाल्टचे प्राबल्य असून त्यात आकुंचन संधीच्या भेगा व तडे सुध्दा आहेत.

3.3 भूजल संपत्ति : भूजल संपत्तिची व्यापकता व हालचाल मुख्यत्वे भूजलधारक प्रस्तराचे स्वरुपावर अवलंबून असून पर्जन्यमान व भूभागाचा उतार ही परिमाणे सुध्दा उपखोऱ्यात महत्वाची आहेत. अकुहरी बेसाल्ट मध्ये आकुंचन संधीच्या भेगा व तडयांबरोबरच विघटनामुळे द्वितीयक सच्छिद्रता निर्माण झाल्यामुळे त्यांची भूजल धारण क्षमता चांगली आहे. या उलट भरित कुहरी बेसाल्ट मध्ये मात्र भूजल धारण क्षमता कमी आहे.गोदावरी नदीलगत असलेल्या गाळाच्या प्रदेशाबरोबरच कमी उतारांच्या व सपाट भागात भूजल उपलब्धी चांगली असून विहिरीद्वारे सिंचनासाठी अनूकूल क्षेत्र आहे. पठारी भागात भूजल उपलब्धी मध्यम स्वरुपाची असून विहिरीद्वारे हंगामी पिकासाठी अनुकूल असे क्षेत्र आहे. या दोन्ही भागात भूपृष्ठीय जलसाठयाबरोबरच कालव्याद्वारे सोय उपलब्ध असून पाण्याचा संयुक्त वापर करून अतिरिक्त पुनर्भरणासाठी भूजल उपसा करण्यास वाव आहे. अतिविच्छेदीत भागात (उदा:पाथरी, गंगाखेड भागात )मात्र भूजल उपलब्धी खूप कमी आहे.

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या 1990 च्या भूजल मूल्यांकनानुसार एकूण पुनर्भरण (सींचित क्षेत्रातील भरीसकट) 2498 दलघमी असून विहिरींची संख्या 0.79 लक्ष आहे. या उपखोऱ्यात गो 56 (तालुका शेवगाव) पाणलोट क्षेत्रातील भूजल उपसा 65 ते 85 टक्के असून ते विकसित (ग्रे)अवस्थेत आहे.

3.4 अवर्षणप्रवण क्षेत्र : या उपखोऱ्याचे क्षेत्र 30 तालूक्यात पसरले आहे. त्यापैकी 11 तालूके सुकथनकर समितीच्या अहवालानंतर शासनाने घोषित केल्या प्रमाणे अवर्षणप्रवण आहेत, अशा तालुक्यांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

पर्जन्यमान - मिमी,लोकसंख्या-हजारात,क्षेत्रफळ - चौकिमी

| अक्र | जिल्हा | तालुका | क्षेत्रफळ | लोकसंख्या | सरासरी वार्षिक पर्जन्यमान |
|---|---|---|---|---|---|
| 1 | औरंगाबाद | पैठण | 686 | 241 | 608 |
| 2 | जालना | अंबड | 1735 | 175 | 731 |
| 3 | बीड | बीड | 1080 | 337 | 784 |
| 4 | बीड | पाटोदा | 895 | 173 | 709 |
| 5 | बीड | गेवराई | 1560 | 236 | 748 |
| 6 | बीड | माजलगाव | 1610 | 190 | 792 |
| 7 | बीड | केज | 651 | 204 | 734 |
| 8 | अहमदनगर | शेवगाव | 460 | 170 | 558 |

पर्जन्यमान - मिमी, लोकसंख्या-हजारात, क्षेत्रफळ - चौकिमी

| अक्र | जिल्हा | तालुका | क्षेत्रफळ | लोकसंख्या | सरासरी वार्षिक पर्जन्यमान |
|---|---|---|---|---|---|
| 9 | नांदेड | भोकर | 640 | 169 | 903 |
| 10 | परभणी | कळमनुरी | 165 | 66 | 804 |
| 11 | परभणी | गंगाखेड | 1712 | 199 | 845 |

**4.0 जमिनीचा तपशील**

जमिनीचे सविस्तर वर्गीकरण खालील प्रमाणे आहे.

| अक्र | तपशील | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | भरड व उथळ जमीन | 23 |
| 2 | मध्यम काळी जमीन | 55 |
| 3 | खोल काळी जमीन | 11 |
| 4 | गाळाची जमीन | 9 |
| 5 | लालसर संमिश्र जमीन | 2 |

**5.0 जमिनीचा वापर**

लागवडीयोग्य क्षेत्र, वनखात्याच्या ताब्यातील क्षेत्र, पडीत क्षेत्र इत्यादी पुढीलप्रमाणे आहे.

क्षेत्र - हजार हेक्टर

| अक्र | वापर | क्षेत्र | भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | भौगोलिक क्षेत्र | 1761 | |
| 2 | वनखात्याच्या ताब्यातील क्षेत्र | 55 | 3.1 |
| 3 | पेरणीसाठी उपलब्ध नसलेले क्षेत्र | | |
| | अ) ओसाड जमीन | 30 | 1.7 |
| | ब) बिगरशेती उपयोगाकरीता आणलेली जमीन | 60 | 3.4 |
| 4 | मशागतयोग्य पडीक जमीन | 57 | 3.2 |
| 5 | कायमची व चराऊ कुरणे | 68 | 3.9 |
| 6 | किरकोळ झाडेझुडपे यांच्या समुहाखालील क्षेत्र | 6 | 0.3 |
| 7 | चालू पडीक जमीन | 101 | 5.7 |
| 8 | इतर पडीक जमीन | 59 | 3.4 |
| 9 | पेरणीचे निव्वळ क्षेत्र | 1325 | 75.3 |

क्षेत्र - हजार हेक्टर

| अक्र | वापर | क्षेत्र | भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी |
|---|---|---|---|
| 10 | लागवडीयोग्य क्षेत्र (4+5+6+7+8+9) | 1616 | 92 |
| 11 | दुसोटा क्षेत्र | 282 | |
| 12 | पिकाखालील एकूण क्षेत्र (9+11) | 1607 | |
| 13 | पीक घनता टक्केवारी (12 +9×100) | 121 | |

**6.0 लोकसंख्या व पशुधनः**

6.1 लोकसंख्या : सन 1991 च्या जनगणनेनुसार या उपखो-यातील एकूण लोकसंख्या 34.45 लक्ष आहे. सन 2030 पर्यन्त होणारी लोकसंख्या,लोकसंख्या घनता इत्यादी खालील प्रमाणे अपेक्षित आहे.

लोकसंख्या-हजारात, घनता -प्रति चौकिमी

| अक्र | तपशील | 1991 | 2030 |
|---|---|---|---|
| 1 | नागरी | 791 | 2766 |
| 2 | ग्रामीण | 2654 | 5308 |
| 3 | एकूण | 3445 | 8074 |
| 4 | लोकसंख्या घनता | 196 | 458 |
| 5 | ग्रामीण लोकसंख्या घनता | 151 | 302 |

या पैकी शेत मजूर संख्या 2 लक्ष 46 हजार व इतर मजूरांची संख्या 3 हजार आठशे आहे.

6.2 पशुधनः सन 1992 च्या गणनेनुसार या उपखो-यात एकूण पशुधन 2185633 आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| म्हैस व रेडे | गाय व बैल | एकखुरी व उंट | शेळी व मेंढी | डुकरे | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| 275806 | 1056481 | 10559 | 815545 | 27242 | 2185633 |

6.3 इतर तपशील : या उपखो-यात नांदेड-वाघाळा ही एकमेव महानगरपालिका आहे व खालील नगरपालिका आहेत.

1)अंबड 2) परतूर 3) बीड 4) गेवराई 5) माजलगाव 6) केज 7) धारुर 8) परळी 9) कळमनुरी 10)गंगाखेड 18) वसमत 19) मुदखेड 20) उमरी 21) सोनपेठ 22) लोहा 23) धर्माबाद 24) कोंडलवाडी 25) शेवगाव 26) पाथर्डी 27) पैठण .

**7.0 पाणीवापर**

7.1 सिंचनासाठी वापरः या उपखो-यातील वर्गनिहाय प्रकल्प म्हणजे मोठे,मध्यम,लघु प्रकल्प, कोल्हापूर पध्दतीचे बंधारे यांची संख्या, पाणीसाठा, पाणीवापर, सिंचन क्षेत्र तसेच पूर्ण झालेले, प्रगतिपथावरील व भविष्यकालिन प्रकल्प याची तपशीलवार माहिती सारणी 2.4

मध्ये दर्शविली आहे.पूर्ण झालेल्या प्रकल्पांची निर्मित सिंचन क्षमता 144362 हेक्टर असून त्याचा पाणीवापर 1052 दलघमी आहे. नियोजना प्रमाणे 62898 हेक्टर अधिक सिंचनक्षेत्र उपलब्ध होईल व पाणी वापरात 550 दलघमी ची भर पडेल.

7.2 सिंचनेतर पाण्याचा वापर : सिंचनेतर उपयोगासाठी या उपखो-यातील सध्याची गरज 170 दलघमी आहे. सन 2030 पर्यन्त ती गरज 392 दलघमी होईल. यात औद्योगिकरणासाठी लागणाऱ्या 92 दलघमी पाण्याचा समावेश आहे. विविध प्रयोजनासाठी लागणा-या पाण्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

पाण्याची गरज- दलघमी

| अक्र | तपशील | 1991 | | | | 2030 |
|---|---|---|---|---|---|---|
| | | नागरी | ग्रामीण | पशुधन | एकूण | |
| 1 | घरगुती वापरासाठी | 35 | 53 | 42 | 130 | 300 |
| 2 | उद्योगासाठी पाणी | | | | 40 | 92 |
| | एकूण | | | | 170 | 392 |

7.3 जलसंपत्तिचा ताळेबंदः या उपखो-यात गोदावरी लवादातील तरतुदीमुळे पाणीवापरावर बंधने आहेत. घरगूती वापरासाठी, उद्योगासाठी व सिंचनासाठी पाणीवापर व त्यातून होणारा पाण्याचा पुनरुद्भव याचा ताळेबंद सारणी 2.5 मध्ये दर्शविला आहे. त्यानुसार उपखोऱ्यात भूजलाचा उपयोग वगळता अधिकाधिक 5447 दलघमी पाणी वापरता येईल.

7.4 लाभक्षेत्र विकास : सद्यःस्थिती खालील प्रमाणे आहे.

क्षेत्र -हजार हेक्टर

| भूविकास भाग-1ची कामे | | | भूविकास भाग-2 ची कामे | | | प्रकल्पाच्या लाभक्षेत्रा |
|---|---|---|---|---|---|---|
| लाक्षेविप्रा कडील प्रकल्प | लाक्षेविप्रा बाहेरील प्रकल्प | एकूण | लाक्षेविप्रा कडील प्रकल्प | लाक्षेविप्रा बाहेरील प्रकल्प | एकूण | व्यतिरिक्त अन्य क्षेत्रात झालेले जमीन सपाटीकरणाचे(भाग-2) क्षेत्र |
| 252.68 | 35.48 | 288.16 | 158.73 | 27.92 | 186.65 | 24.77 |

7.5 सन 1970 पूर्वीची धरणे: या उपखो-यात 1970 पूर्वी बिंदुसरा(1955), वाण(1966), गल्हाटी(1966) व सिंधफना (1963) ही प्रमूख धरणे बांधली गेली आहेत.

**8.0 पीक रचना**

उपखो-यातील एकूण लागवडीयोग्य क्षेत्र 16.16 लक्ष हेक्टर आहे. त्यापैकी पिकाखाली16.07 लक्ष हेक्टर आहे. हे प्रामुख्याने खरीप पिकक्षेत्र आहे. उपखोऱ्यातील कांही पिकांची उत्पादकता पुढील प्रमाणे आहे.

उत्पादकता-क्विंटल/हेक्टर

| अक्र | पीक | उत्पादकता |
|---|---|---|
| 1 | खरीप ज्वारी | 14.83 |
| 2 | रब्बी ज्वारी | 6.91 |
| 3 | कापूस | 1.35* |

**9.0 उद्योगधंदे:**

या उपखो-यात शेती हाच प्रमुख व्यवसाय असून तुलनेने औद्योगिकीकरण कमी झालेले आहे. नांदेड जवळ कृष्णूर येथे केंद्रशासनामार्फत पंचतारांकित औद्योगिक क्षेत्र विकसित होत आहे. उपखो-यातील कृषीवर आधारित प्रमुख उद्योगाची स्थिती खालील प्रमाणे आहे.

| अक्र | तपशील | संख्या |
|---|---|---|
| 1 | साखर कारखाने | 6 |
| 2 | सूत गिरण्या | 8 |

**10.0 जलविद्युत निर्मिति**

या उपखो-यात एकाही जलविद्युत प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण झालेले नाही. माजलगाव धरणपायथ्याशी जलविद्युत प्रकल्पाची उभारणी होत आहे. त्याची क्षमता 2.25 मेवॅ आहे.

**11.0 दळणवळणाची साधने**

या उपखो-यात नांदेड येथे हवाईपट्टी आहे.उपखो-यातून मनमाड-मुदखेड, पूर्णा - परळी ब्रॉडगेज रेल्वेमार्ग, मुदखेड–किनवट मीटरगेज, मुदखेड काचीगुडा मीटरगेज रेल्वेमार्ग आहेत. राज्य महामार्गाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अक्र | मार्गाचे नाव | क्रमांक |
|---|---|---|
| 1 | औरंगाबाद-पैठण | 30 |
| 2 | औरंगाबाद-बीड | 1 |
| 3 | औरंगाबाद-जालना-वाटूर-परतूर-सेलू-परभणी | 6 |
| 4 | जालना-जिंतूर-औंढा-नांदेड | 220 |
| 5 | जालना-गेवराई | 176 |
| 6 | जालना-भोकरदन | 181 |
| 7 | परभणी-गंगाखेड | 217 |
| 8 | बीड-परळी- गंगाखेड-नांदेड | 2 |

* कापसाचे उत्पादन गाठीत दर्शविले आहे.

## 12.0 भावी नियोजनाची दिशा

12.1 या उपखोऱ्यातील जलसंपत्तिची सरासरी उपलब्धता 4778 दलघमी आहे. गोदावरी लवादाच्या निर्णयानुसार पैठण खाली लवादाच्या उपखोऱ्यामधे प्रतिवर्षी 1699 दलघमी (60 अघफू) पाणी वापरायला अनुमती आहे. त्यातून आयोगाने प्रस्तावित केलेल्या या उपखोऱ्यात जलक्षेत्रानुसार 1699 दलघमी पैकी 1050 दलघमी वापरता येईल. शिवाय जायकवाडी जलाशयांतून 2163 घमी पाण्याचा वापर या उपखोऱ्यात करता येईल. पैनगंगा उपखोऱ्यातून इसापूर उजवा कालव्याद्वारे 655 दलघमी तसेच मानार प्रकल्पांतर्गत (उपखोरे क्र. 4 : मांजरा) असलेल्या गोदावरी-मानार शाखा कालव्याद्वारे 132 दलघमी पाणी तर ऊर्ध्व मानार प्रकल्पातून 42 दलघमी या उपखोऱ्यासाठी उपलब्ध होते. अशा तऱ्हेने या उपखोऱ्यातील वापरासाठी एकूण पाण्याची उपलब्धता खालील प्रमाणे.

पाणी-दलघमी

| | | |
|---|---|---|
| 1) | जायकवाडी धरणातून | 2163 |
| 2) | लवादाच्या G(1+3+4+5)मधील वाटा | 1050 |
| 3) | ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्पातील वाटा | 655 |
| 4) | निम्न मानार प्रकल्पाच्या शाखा कालवा क्रमांक 1 व 2 नुसार स्थलांतरण | 132 |
| 5) | 6.10.75 पूर्वीचा मंजूर पाणी वापर | 536 |
| 6) | ऊर्ध्व मानार प्रकल्पातून स्थलांतरण | 42 |
| 7) | पूर्णा पाटबंधारे प्रकल्पातून स्थलांतरण | 434 |
| 8) | पूर्णा (दुधनासहीत) उपखोऱ्यात- जायकवाडी प्रकल्प टप्पा-1 मधून स्थलांतरण | (-) 405 |
| | एकूण : | 3021 |

12.2 या उपखोऱ्याचे तलांक व आजूबाजूच्या पाण्याच्या आधिक्य असलेल्या उपखोऱ्याचे तलांक पहाता आर्थिक व्यवहार्यतेच्या दृष्टीतून पाणी स्थलांतरणास वाव दिसत नाही.

अशा प्रकारे पाण्याच्या दृष्टीने हे तुटीचे खोरे रहाणार आहे. पाणी उपलब्धतेतील दोलायमानता अतितीव्र आहे हे सारणी 2.3 वरून स्पष्ट होते. दर 4-5 वर्षातून एकदाच धरणे भरतात. या नैसर्गिक अडचणीवर मात करून लवादाने मंजूर केलेल्या पाणीवापराचा पूर्णतः दरवर्षी कसा उपयोग करून घेता येईल या दृष्टीने उपखोऱ्यातील पाण्याच्या सर्व साठयांच्या संलग्न एकत्रित नियोजनाची गरज आहे. त्या दृष्टीने या उपखोऱ्यातील पाण्याचे नियोजन पूर्ण झाले आहे असे दिसून येत नाही. ते सत्वर हाती घेणे आवश्यक आहे. सध्याच्या नियोजनातून पाणीवापराच्या 70 टक्के पर्यन्तच जेमतेम पाणीवापर प्रत्यक्षात करता येईल असे दिसते.

12.3 या उपखोऱ्यात सर्वसाधारणतः खरीपामध्ये सिंचनाची गरज भासत नाही. 10 वर्षातून एखादे वर्षी तुटवडा जाणवला तर खरीपामध्ये एखाद दुसरे पाणी देण्याची गरज भासते. अन्यथा खरीपामधील वापर नगण्य आहे. म्हणून या उपखोऱ्यातील पाण्याचे फेरनियोजन खरीपातील पाण्याचा वापर वगळून करणे आवश्यक आहे. त्यासाठी यापूर्वी दाखवण्यात आलेले पाणी आज न वापरता वाहून जात आहे, ते साठवून घेऊन त्याचा उन्हाळयात उपयोग करावयाचे नियोजन व्हायला हवे. जास्तीत जास्त वापरासाठी वार्षिक दोलायमानता व क्षेत्रीय पाण्याच्या उपलब्धतेतील दोलायमानता लक्षात घेता पाण्याचे साठे संकल्पित वापराच्या मर्यादेपेक्षा साधारणतः 30 टक्के पर्यंत तरी वाढवावे लागतील. ही निभावणीच्या साठयाची (carry over)

तरतूद तुटीच्या वर्षात वापरून काही प्रमाणात पिकांना लाभ देता येईल. या पाण्याचा उपयोग सिंचनेतर वापरासाठी पण होईल. जायकवाडी व माजलगाव जलाशयाचे नियोजन कमी विश्वासार्हतेला (सरासरी पेक्षाही कमी) आणण्याच्या दृष्टिनेही प्रयास करण्याची गरज आहे. पाण्याचे साठे वाढविण्याचे पर्याय, जसे उपलब्ध धरणांची उंची वाढविणे, अन्य ठिकाणी अतिरिक्त जलाशयसाठे निर्माण करणे, कालव्यावरील आडव्या जाणाऱ्या नाल्यावर मार्गस्थ तलाव निर्माण करणे, पूर पाझर कालवे काढून भूजलसाठे निर्माण करणे, नदीवर विष्णुपूरीसारख्या बंधाऱ्याची मालीका निर्माण करणे या सर्वांचा विचार नियोजनात होण्याची नितांत गरज आहे. बंधाऱ्यामुळे निर्माण झालेले पाणी नदी काठावरील भागास देऊन कालव्याच्या चढीच्या अंगाचे क्षेत्र उपसा सिंचन पध्दतीने आर्थिक दृष्ट्या पेलवेल इतक्या मर्यादेपर्यंत उचलण्याची व्यवस्था करता येण्यासारखी आहे.

12.4 हे उपखोरे अत्यंत कोरडया हवामानाचे आहे. आणि बाष्पीभवनाचा वेग जास्त आहे म्हणून पाण्याच्या तुटीचा विचार करता बाष्पीभवनावर मर्यादा आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्याची नितांत गरज आहे. विशेषतः जायकवाडी सारख्या जलाशयातील होणारी बाष्पीभवनातील किमान 10 टक्के घट ही फार मोलाची ठरणार आहे. त्या दृष्टीने विविध संशोधने होणे पण आवश्यक आहे.

12.5 या उपखोऱ्यातील जायकवाडी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील जमीन ही काळ्या मातीची आहे. काळ्या मातीमध्ये वितरिकांचे जाळे टिकाव धरू शकत नाही आणि म्हणून पर्यायी व्यवस्था म्हणून बंद पाईपचे जाळे आणि ठिबकव्दारे सिंचन आणि त्या अनुरूप अशी पिकव्यवस्था (जसे मोसंबी, भाजीपाला, डाळींब, द्राक्षे, कापूस इ.) बसविण्याचा लाभार्थींच्या सहयोगातून विचार करता येईल.

12.6 जायकवाडी प्रकल्पाच्या डाव्या कालव्यावरील महाकाळा येथील बराचसा भाग पाणथळ व क्षारयुक्त झालां आहे. या भागाला आयोगाने भेट दिली. अशाच प्रकारचे पाणथळ व क्षारयुक्त पट्टे या लाभक्षेत्राच्या अन्य भागात पण निर्माण झाले असल्याचे समजले. पाण्याचा अतिवापर, निचरा होण्यास प्रतिकूल परिस्थती, नैसर्गिक नाले तुंबलेले आणि एकूणच जमिनीला उतार कमी अशी सर्वसाधारपणे कारणे पुढे आली.

भूमिगत पाणी निचऱ्याची व्यवस्था करून (चिमणी ड्रेन्स) जमिनीतील पाण्याचा निचरा करून जमिनी उपयोगात आणण्याचा प्रयोग झालेला आहे. तो फार खर्चिक दिसतो म्हणून अन्य पर्यायांचा विचार व्हायला हवा आहे.

लाभक्षेत्रांतील लागवडीखालील सर्व जमिनी 'सिंचनक्षम' म्हणजे सिंचनाला योग्य असू शकत नाहीत किंवा निदान त्या पारंपारिक रूढ प्रवाही सिंचनाला तरी योग्य आहेत असे नाही. लाभक्षेत्रातील (कालवे व नद्या या मधील) अशा जमिनी शोधून लाभक्षेत्रातून त्या वगळून त्या ऐवजी पर्यायी दुसऱ्या चांगल्या जमिनीसाठी तेच पाणी वापरता येईल किंवा या जमिनीवर सिंचन करावयाचे झाले तर त्यावरील पीक रचना, सिंचन पध्दती हे देखील बदलणे आवश्यक आहे. या जमिनीसाठी सिंचन वितरणाचे जाळे निर्माण करणे व परिणामी जमिनी नापीक व पडीक होणे व त्यांच्या दुरुस्तीसाठी पुन्हापुन्हा खर्च करणे हे परवडणारे नाही. म्हणून अशा जमिनीवर प्रवाही सिंचन न देता कालव्याच्या वरच्या भागात ज्या ठिकाणी सिंचनास योग्य पर्यायी जमिनी आहेत त्याला उपशाद्वारे सिंचनाचा लाभ देणे इष्ट राहिल. अवतीभोवतीच्या सिंचनामुळे अशा जमिनीला विहिरीद्वारा सिंचनाचा लाभ होतोच.यामुळे अशा ठिकाणी विहिरीवर भर दिला तर जमिनीही चांगल्या राहतील व सिंचनाचाही लाभ मिळेल. लाभक्षेत्रातील पाणी वापराची अशा प्रकारे फेरआखणी होणे तातडीने आवश्यक आहे. शिवाय

जायकवाडी प्रकल्प कालव्यांचे जाळे हलक्या जमिनीतून विस्तारीत करून चांगल्या पावसाच्या वर्षी या कालव्यांचा पाझर कालवे म्हणून वापर करून भूजलात वाढ करणे शक्य होणार आहे.

12.7 माजलगांव प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात गंगामसला शाखा कालवा गतिशील नियमनाचा पथदर्शक प्रकल्प (पायलट प्रोजेक्ट फॉर डायनॉमिक रेग्युलेशन) म्हणून कार्यान्वित करण्यात आलेला आहे. यातून खात्याला स्वयंचलित दरवाज्यांचा अनुभव, पाणी वापरातील काटकसर आणि गरजेनुसार पाणी वापराची सुलभता याचा अनुभव व अभ्यास व्हावा असे अपेक्षित आहे. येत्या 15-20 वर्षात सिंचन या दिशेने वाटचाल करणार आहे.

या उपखोऱ्यातील शेती कापूस उत्पादनास अनुकूल आहे. एकेकाळी हा भाग कापासाचे कोठार म्हणवला जात असे. नांदेड येथे कापूस संशोधन केंद्र असून येथील नांदेड 44 ही संकरीत जात राज्यात प्रसिध्द आहे. कापसाला पाणी मर्यादित पुरते. परंतु केवळ कापसाच्या प्राथमिक उत्पादनातून लाभक्षेत्राचा अपेक्षित विकास पूर्ण होऊ शकणार नाही. कापसावर प्रक्रिया होऊन कापसापासून सूत तयार करणे त्याच्या पासून कापड बनवणे अशी प्रक्रिया साखळी मूल्यवाढ देते. आधुनिक सिंचन पध्दतीच्या अवलंबनातून कापसाच्या पिकांचे उत्पादन वाढवून त्यांच्या प्रक्रियासांखळीवर लक्ष केंद्रित करणे हे या उपखोऱ्याच्या समृध्दीच्या दृष्टीने आवश्यक आहे असे एकंदरीत दिसते. सहकारी सूत गिरण्या या ठिकाणी विकसित झाल्या नाहीत.

12.8 या उपखोऱ्यात बीड सारखा अवर्षणप्रवण भाग येतो. तो स्थलांतरप्रवण मजूरांसाठी ओळखला जातो. या मजूरांना काम देण्यासाठी स्थायी रोजगार निर्मितिची प्रक्रिया केंद्रे निर्माण झाली की या उपखोऱ्यातच त्यांना रोजगाराच्या संधी मिळतील.

12.9 या उपखोऱ्यात् रब्बी ज्वारीचे पीक फार मोठया प्रमाणात होते. परभणी कृषि विद्यापीठाचे हे कार्यक्षेत्र आहे. त्यामुळे ज्वारीपासून स्टार्च साखर तयार करण्याच्या प्रक्रिया केंद्राचा विचार पुढे करता येण्यासारखा आहे. ऊसापासून साखरे ऐवजी क्रमाक्रमाने ज्वारीपासून साखर निर्मितिस प्रोत्साहन लाभदायी ठरेल. या दृष्टीने संशोधनाची व प्रयोगांची गरज दिसते. सिंचनाच्या सोईमूळे व ऊसास साखर कारखान्याच्या माध्यमातून प्रक्रिया केंद्राची उपलब्धी झाल्यामूळे या उपखोऱ्यात केळीचे व ऊसाचे क्षेत्र वाढत आहे. पाण्याच्या तूटीचा विचार करता ऊस व केळी सारख्या पिकास या उपखोऱ्यात प्रोत्साहन देणे हितावह राहणार नाही. विद्यमान साखर कारखान्याची गरज भागविण्यासाठी व पाण्याची बचत करण्यासाठी या पिकासाठी उपखोऱ्यात सर्वत्र ठिबक सारख्या सिंचन पध्दतीचा अवलंब अनिवार्य करणे आवश्यक आहे.

12.10 उपखोऱ्यात तेलबिया, मिरची, हळद, कापूस, तूर, मूग, उडीद, हरभरा ही पिके सुध्दा परंपरेने मोठया प्रमाणात येतात. सिंचन सुविधांच्या आधारांनी त्यांचे उत्पादन खूप वाढवता येऊ शकेल व त्या उत्पादनावर प्रक्रिया उद्योग वाढीस लागू शकतील

12.11 या उपखोऱ्यातील वाण, मांसोळी हे प्रकल्प भुईमूगाचे आगार आहेत. या प्राथमिक उत्पादनाचे मूल्यदायी टिकावू पदार्थात रुपांतर करण्याची व्यवस्था त्याच उपखोऱ्यात बसवण्याची गरज आहे.

12.12 केळी व मोसंबी हे या उपखोऱ्यात् वाढत आहे. अलिकडे या उपखोऱ्यात सिताफळ हे प्रसिध्द फळ आहे. सिंदफना खोऱ्यातील या फळांना बाजारपेठा उपलब्ध करून देण्याची गरज आहे.

12.13 या उपखोऱ्यात परभणी कृषि विद्यापीठ व नांदेड येथील स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ आहे यांच्या समन्वयातून प्रकल्पाचे आर्थिक सामाजिक व पर्यावरणीय अभ्यास वारंवार करून घेणे येथे सहज शक्य होईल.

12.14 पर्यटनाच्या दृष्टीने पैठण-आपेगांव-जाम येथे गोदावरी नदीच्या पात्राचा उचित विकास झाला तर उपयुक्त ठरेल. नांदेड येथे गुरुगोविंदसिंग (शिखांचे नववे गुरू) यांची समाधी आहे व हे

अमृतसर नंतर दुसऱ्या क्रमांकाचे तीर्थक्षेत्र आहे. गोदावरी नदीवरील विष्णूपुरी बंधाऱ्याच्या जलाशयाचा पर्यटनाच्या व जलक्रीडेच्या दृष्टीने विकास करण्याचा प्रयत्न करता येण्यासारखा आहे.

12.15 गोदावरी व तिच्या उपनद्यांच्या पुराच्या अभ्यासावरून पुराचे पाणी पैठण पासून नांदेड पर्यन्त पोहचण्यास खालील प्रमाणे वेळ लागतो.

अंतर-किमी,वेळ-तास

| अक्र | ठिकाण | अंतर | लागणारा वेळ |
|---|---|---|---|
| 1 | पैठण-ढालेगाव | 109 | 24 |
| 2 | ढालेगाव-गंगाखेड | 102 | 16 |
| 3 | गंगाखेड-नांदेड | 75 | 8 |

गोदावरी नदीवरील आंधातील श्रीरामसागर जलाशयाच्या फुगवटयामुळे नांदेड जिल्हयातील मांजरा नदीच्या काठचा बिलोली तालुक्यातील कांही भाग पूराच्या तडाक्यात सापडतो. नांदेड शहर पण बऱ्याच वेळा पुराच्या धोक्यात येते, म्हणून या उपखोऱ्यातील पूरसंदेश यंत्रणा कार्यक्षम असणे हे अतिशय गरजेचे आहे. शिवाय वरच्या भागातील धरणाच्या दरवाज्याच्या हाताळणीत सतर्कता असणे गरजेचे आहे.

12.16 या उपखोऱ्यात इतिहास कालीन सुमारे 350 वर्षापूर्वीची प्रगत अशी सिंचन व्यवस्था 'खजाना विहिर' च्या आधाराने अजूनहि कार्यरत आहे. बीड शहराच्या दक्षिणेकडे बिंदूसरा नदीच्या खोऱ्यात भूपृष्ठाखालील पाण्याचे स्रोत एकत्रित करून मोठया विहिरी मध्ये या पाण्याचा 'खजाना' निर्माण करून ही प्रवाही सिंचन व्यवस्था बसवलेली आहे. विहिरीतून उपशाने नव्हे तर बोगद्यातूनच पैलतीरावरील शेतीक्षेत्राला पाणी पोचविले आहे. आज उत्तर भारतात प्रचलित असणाऱ्या वाराबंदी पध्दतीचा अवलंब या सिंचनव्यवस्थेत जुन्या काळापासून केला गेल्याचे दिसून येते. आठवडयात वेगवेगळ्या वारी चालणाऱ्या शेतचाऱ्यांना त्या वारांचीच नावे आहेत. बीड शहराच्या वाढीमूळे खजाना विहिरीवरील विकसित लाभक्षेत्र आकुंचन पावते आहे. ते थांबवून या जुन्या व्यवस्थेचे बदललेल्या काळानुरूप पुनरुज्जीवन करून रक्षण करणे आवश्यक वाटते.

12.17 गोदावरी नदीवर विष्णूपूरी या ठिकाणी उपसा सिंचन योजना राबविण्यात आली आहे. तेथे उभे दरवाजे असणारा मोठा बंधारा (असरजन) यशस्वीपणे कार्यान्वित करण्यात आला आहे. या बंधाऱ्याच्या मागेच गोदावरी नदीवर राज्यातील सिमांत साठवणूकीची सुविधा निर्माण झाली आहे. पण त्या सिमांत साठवणीला प्रदूषणाचा वाढता धोका जाणवणार आहे.

12.18 या उपखोऱ्यात गोदावरी नदीच्या काठावर नांदेड व जवळच उपनद्यांवर परभणी, परळी, बीड अशी मोठे शहरे वाढलेली आहेत. अलीकडच्या काळात तेथील लोकसंख्येत भराभर वाढ होते आहे. परळी येथे औष्णिक वीजकेंद्र देखील कार्यान्वित आहे. शहरा भोवतीच्या उद्योगधंद्याची वाढ त्यातून निर्माण होणारे सांडपाणी व नागरीकरणाचे सांडपाणी या सर्वामधून नदीचा प्रवाह प्रदूषित होत आहे. या सांडपाण्यावर वेळीच प्रक्रिया होऊन त्याचा वापर त्या त्या शहराच्या भोवतीच्या जमिनीसाठी करून देणे आवश्यक आहे. गोदावरी तीरावरील शहरांसाठी अशा सांडपाण्यावर प्रक्रिया केंद्रे कार्यान्वित करणे हे विचाराधीन असल्याचे समजते. या योजनेस गति देणे आवश्यक आहे.

12.19 या उपखोऱ्यातील सिंचनाचे पाणी, औद्योगिकीकरणासाठी पाणी व नागरी पाणी यांचा समन्वय घालण्याचे काम येत्या काळात तातडीने हाती घ्यावे लागणार आहे. या उपखोऱ्याच्या पाण्यावरच नाशिक व औरंगाबादची नागरी वस्ती व औद्योगिक विस्तार अवलंबून आहे.

–000–

## सारणी : 2.1
## उपखोऱ्यातील महिनावार सरासरी
## पर्जन्यमान व बाष्पीभवन

पर्जन्यमान, बाष्पीभवन-मिमी

| अक्र | महिना | पर्जन्यमान | बाष्पीभवन |
|---|---|---|---|
| 1 | जानेवारी | 4 | 136 ** |
| 2 | फेब्रूवारी | 3 | 154 ** |
| 3 | मार्च | 5 | 201 ** |
| 4 | एप्रिल | 7 | 224 * |
| 5 | मे | 18 | 240 * |
| 6 | जून | 133 | 166 ** |
| 7 | जुलै | 165 | 130 ** |
| 8 | ऑगस्ट | 174 | 127 ** |
| 9 | सप्टेंबर | 184 | 153 ** |
| 10 | ऑक्टोबर | 55 | 162 ** |
| 11 | नोव्हेंबर | 23 | 142 ** |
| 12 | डिसेंबर | 13 | 126 ** |
| | एकूण | 784 | 1961 |

### हंगामनिहाय बाष्पीभवनाचा तपशील

बाष्पीभवन - मिमी

| अक्र | हंगाम | बाष्पीभवन |
|---|---|---|
| 1 | खरीप | 576 |
| 2 | रब्बी | 566 |
| 3 | उन्हाळी | 819 |
| | एकूण | 1961 |

* सरासरी प्रतिदिन 8 मिमी

** सरासरी प्रतिदिन 4 मिमी पेक्षा जास्त

सारणी :2.2

**पर्जन्यमापन केंद्रनिहाय तपशील**

पर्जन्य- मिमी

| अक्र | केंद्राचे नाव | प्रकार | स्वामित्व | आधार सामुग्री उपलब्धीचा कालावधी | वार्षिक सरासरी पर्जन्य |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | पैठण | सा.प. | म.खा. | 1951-95 | 561 |
| 2 | जालना | सा.प. | म.खा. | 1951-95 | 754 |
| 3 | अंबड | स्व.प. | म.खा. | 1951-95 | 731 |
| 4 | परतूर | सा.प. | म.खा. | 1951-95 | 899 |
| 5 | परभणी | सा.प. | म.खा. | 1951-95 | 842 |
| 6 | जिंतूर | स्व.प. | म.खा. | 1951-95 | 816 |
| 7 | गंगाखेड | सा.प. | म.खा. | 1951-95 | 845 |
| 8 | पाथरी | स्व.प. | म.खा. | 1951-95 | 947 |
| 9 | नांदेड | सा.प. | म.खा. | 1951-95 | 899 |
| 10 | बिलोली | सा.प. | म.खा. | 1951-95 | 909 |
| 11 | बीड | सा.प. | म.खा. | 1951-95 | 784 |
| 12 | अंबाजोगाई | सा.प. | म.खा. | 1951-95 | 738 |
| 13 | गेवराई | स्व.प. | म.खा. | 1951-95 | 748 |
| 14 | माजलगाव | स्व.प. | म.खा. | 1951-95 | 792 |
| 15 | पाथर्डी | सा.प. | म.खा. | 1951-95 | 605 |
| 16 | पाटोदा | सा.प. | म.खा. | 1951-95 | 675 |

## सारणी : 2.3

## जलसंपत्तीची उपलब्धता

ठिकाण-नांदेड वार्षिक येवा-दलघमी

| अक्र | वर्ष | वार्षिक येवा | उतरत्या क्रमाने वार्षिक येवा | संगत वर्ष | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1951 | 3341 | 12200 | 1989 | |
| 2 | 1953 | 4663 | 11315 | 1988 | |
| 3 | 1954 | 5835 | 10823 | 1975 | 10 |
| 4 | 1955 | 10102 | 10113 | 1991 | |
| 5 | 1956 | 6274 | 10102 | 1955 | |
| 6 | 1957 | 5873 | 8223 | 1963 | |
| 7 | 1958 | 6044 | 7795 | 1990 | 20 |
| 8 | 1959 | 6483 | 7141 | 1961 | |
| 9 | 1960 | 3871 | 6829 | 1980 | |
| 10 | 1961 | 7141 | 6483 | 1959 | |
| 11 | 1962 | 4274 | 6274 | 1956 | |
| 12 | 1963 | 8223 | 6055 | 1970 | 30 |
| 13 | 1964 | 3549 | 6044 | 1958 | |
| 14 | 1965 | 2734 | 5873 | 1957 | |
| 15 | 1966 | 819 | 5835 | 1954 | |
| 16 | 1967 | 3880 | 5589 | 1973 | 40 |
| 17 | 1968 | 2736 | 5114 | 1969 | |
| 18 | 1969 | 5214 | 4663 | 1953 | |
| 19 | 1970 | 6055 | 4274 | 1962 | |
| 20 | 1971 | 2703 | 3924 | 1977 | |
| 21 | 1973 | 5589 | 3871 | 1960 | |
| 22 | 1974 | 1146 | 3838 | 1979 | 50 |
| 23 | 1975 | 10823 | 3806 | 1992 | |
| 24 | 1976 | 343 | 3571 | 1993 | |
| 25 | 1977 | 3924 | 3549 | 1964 | 60 |
| 26 | 1978 | 2518 | 3341 | 1951 | |

ठिकाण-नांदेड वार्षिक येवा-दलघमी

| अक्र | वर्ष | वार्षिक येवा | उतरत्या क्रमाने वार्षिक येवा | संगत वर्ष | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 27 | 1979 | 3838 | 2887 | 1967 | |
| 28 | 1980 | 6829 | 2760 | 1981 | 70 |
| 29 | 1981 | 2760 | 2736 | 1968 | |
| 30 | 1982 | 1214 | 2734 | 1965 | |
| 31 | 1983 | 11991 | 2703 | 1971 | 75 |
| 32 | 1984 | 1424 | 2582 | 1996 | |
| 33 | 1985 | 936 | 2518 | 1978 | |
| 34 | 1986 | 830 | 1808 | 1987 | 80 |
| 35 | 1987 | 1808 | 1424 | 1984 | |
| 36 | 1988 | 11315 | 1214 | 1982 | |
| 37 | 1989 | 12200 | 1146 | 1974 | |
| 38 | 1990 | 7765 | 936 | 1985 | |
| 39 | 1991 | 10113 | 830 | 1986 | |
| 40 | 1992 | 3806 | 819 | 1966 | 90 |
| 41 | 1993 | 3571 | 343 | 1976 | |
| 42 | 1994 | 3887 | 186 | 1995 | |
| 43 | 1995 | 186 | 0 | 0 | |
| 44 | 1996 | 2582 | 0 | 0 | |
| सरासरी | | | 4626 | | |

टीप : 90 टक्के विश्वासार्ह पाण्यापेक्षा 50 टक्के विश्वासार्ह पाणी 4 1/2 पट आहे.

75 टक्के विश्वासार्ह पाण्यापेक्षा सरासरी पाणी 30 टक्के जास्त आहे.

$\frac{\text{10 टक्के उपलब्धता}}{\text{90 टक्के उपलब्धता}} = 13.21$ $\frac{\text{50 टक्के उपलब्धता}}{\text{90 टक्के उपलब्धता}} = 4.68$

$\frac{\text{50 टक्के उपलब्धता}}{\text{[illegible]}} = 1.42$

सारणी : 2.4

**प्रकल्पांची सद्यस्थिती**

चलपाणीसाठा - दलघमी
पाणीवापर - दलघमी
सिंचनक्षेत्र - हेक्टर

| अक्र | प्रकल्पाचा संवर्ग | पूर्ण झालेले प्रकल्प | | | | प्रगतीपथावरील प्रकल्प | | | | प्रशासकीय मान्यता प्राप्त प्रकल्प | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| | मोठे प्रकल्प | जायकवाडी | 2169 | 2293 | 183320 | | | | | | | | | | 2169 | 2293 | 183320 |
| | | माजलगाव | 311 | 547 | 73052 | | | | | | | | | | 311 | 547 | 73052 |
| | एकूण अ | 2 | 2480 | 2840 | 256372 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 2480 | 2840 | 256372 |
| ब | मध्यम प्रकल्प | | | | | | | | | | | | | | 0 | 0 | 0 |
| | | बिंदुसरा | 15 | 17 | 1612 | | | | | | | | | | 15 | 17 | 1612 |
| | | सिंदफणा | 11 | 19 | 1782 | | | | | | | | | | 11 | 19 | 1782 |
| | | कुंडलिका | 34 | 47 | 4400 | | | | | | | | | | 34 | 47 | 4400 |
| | | घाटशिळ | 8 | 8 | 720 | | | | | | | | | | 8 | 8 | 720 |
| | | बेलापारा | 5 | 5 | 1050 | | | | | | | | | | 5 | 5 | 1050 |
| | एकूण ब | 5 | 73 | 96 | 9564 | | | | | | | | | 5 | 73 | 96 | 9564 |
| क | स्थानिकस्तर | 81 | 19 | 24 | 2308 | 20 | 4 | 5 | 840 | 12 | 2 | 2 | 270 | | 25 | 31 | 3418 |
| | राज्यस्तर | 24 | 34 | 43 | 9819 | 6 | 31 | 40 | 5996 | 5 | 8 | 10 | 1736 | | 73 | 93 | 17551 |
| | एकूण क | 105 | 53 | 67 | 12127 | 26 | 35 | 45 | 6836 | 17 | 10 | 12 | 2006 | 148 | 98 | 124 | 20969 |
| | एकूण (अ.ब.क) | 112 | 437 | 710 | 94743 | 26 | 35 | 45 | 6836 | 17 | 10 | 12 | 2006 | 155 | 482 | 767 | 103585 |

| अक्र | प्रकल्पाचा संवर्ग | पूर्ण झालेले प्रकल्प | | | | प्रगतीपथावरील प्रकल्प | | | | प्रशासकीय मान्यता प्राप्त प्रकल्प | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| | ब) गोदावरी खोरे (पैठण धरणाखाली ते राज्य संपेपर्यंत) | | | | | | | | | | | | | | 0 | 0 | 0 |
| | अ) मोठे | | | | | निम्नगोदावरी | 83 | 323 | 28340 | | | | | 1 | 83 | 323 | 28340 |
| | एकूण अ | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 83 | 323 | 28340 | | | | | 1 | 83 | 323 | 28340 |
| | ब मध्यम | गल्हाटी | 18 | 23 | 4681 | तळणी | 7 | 18 | 2145 | बाभळीबंधारा | 49 | 61 | 7995 | | 74 | 102 | 14821 |
| | | बोधेगांव | 4 | 7 | 1107 | | | | | | | | | | 4 | 7 | 1107 |
| | | सरस्वती | 6 | 7 | 1368 | | | | | | | | | | 6 | 7 | 1368 |
| | | वाण | 22 | 40 | 5262 | | | | | | | | | | 22 | 40 | 5262 |
| | | मासोळी | 27 | 51 | 3360 | | | | | | | | | | 27 | 51 | 3360 |
| | | कुडाळा | 4 | 7 | 560 | | | | | | | | | | 4 | 7 | 560 |
| | | बोरना | 9 | 12 | 1376 | | | | | | | | | | 9 | 12 | 1376 |
| | एकूण ब | 7 | 90 | 147 | 17714 | 1 | 7 | 18 | 2145 | 1 | 49 | 61 | 7995 | 9 | 146 | 226 | 27854 |
| | क) लघु | | | | | | | | | | | | | | | | |
| | राज्यस्तर | 47 | 114 | 142 | 23099 | 12 | 48 | 60 | 8634 | 1 | 6 | 7 | 775 | 60 | 168 | 209 | 32508 |
| | स्थानिकस्तर | 149 | 42 | 53 | 8806 | 78 | 12 | 16 | 3994 | 53 | 6 | 8 | 2173 | 280 | 60 | 77 | 14973 |
| | एकूण क | 196 | 156 | 195 | 31905 | 90 | 60 | 76 | 12628 | 54 | 12 | 15 | 2948 | 340 | 228 | 286 | 47481 |
| | एकूण अ,ब,क, | 203 | 246 | 342 | 49619 | 92 | 150 | 417 | 43113 | 55 | 61 | 76 | 10943 | 350 | 457 | 835 | 103675 |
| | **एकूण अ,ब** | 315 | 683 | 1052 | 144362 | 118 | 185 | 462 | 49949 | 72 | 71 | 88 | 12949 | 505 | 939 | 1602 | 207260 |

## सारणी : 2.5

## जलसंपत्तीचा ताळेबंद

जलसंपत्ती - दलघमी

| अक्र | उपलब्धता | | अक्र | वापर (सन2030) | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **भूपृष्ठावरील** | | 4 | **भूपृष्ठावरील** | |
| | अ) नैसर्गिक | | | अ) घरगुती वापरासाठी | |
| | 1) 75 टक्के विश्वासार्हतेने | 2703 | | 1) नागरी | 348 |
| | 2) 50 टक्के विश्वासार्हतेने | 3887 | | 2) ग्रामीण | 107 |
| | 3) सरासरीने | 4778 | | 3) पशुधन | 58 |
| | 4) नियोजनासाठी | 1586 | | एकूण | 513 |
| | ब) मानवप्रबंधित | | | ब) उद्योगधंदयासाठी | 136 |
| | 1) नागरी वापरातून पुनरुद्भव (80 %) | 278 | | एकूण सिंचनेतर वापर | 649 |
| | 2) उद्योग धंदयातील पुनरुद्भव (97.5%) | 133 | 5 | इतर उपखोऱ्यात स्थलांतरित पाणी (उपखोरे क्र.3 मध्ये) | 82 |
| | 3) इतर उपखोऱ्यातून संक्रमित झालेले पाणी | 3021 | 6 | सिंचनासाठी उपलब्ध भूपृष्ठावरील पाणी =(1586+3512-731)+429 | 4716 |
| | एकूण (1 ब) | 3432 | | | |
| 2 | मानवनिर्मित<br>लाभक्षेत्रातील पुनर्भरण (1586+3432-649)+च्या10 % | 429 | | 5447 | |
| 3 | एकूण उपलब्धता (1586+3432+437) | 5447 | 7 | एकूण वापर | 5447 |
| | 1) भूजल उपलब्धता (वार्षिक एकूण पुनर्भरण) | 2497 | | अ) भूजलाचा सध्याचा सिंचनासाठी वापर | 441 |
| | 2) भूजल वापरास मुभा ( 2497 च्या 65 %) | 1623 | | | |


टीपा : 1) भूजल उपलब्धतेमुळे उपखोऱ्याच्या एकूण उपलब्धतेत वाढ होणार नाही ; भूजलाचा जेवढा उपसा होईल तेवढा नदी प्रवाह घटत जाईल म्हणून एकूण उपलब्धतेचा आकडा काढतांना भूजल उपलब्धतेचा विचार घेतलेला नाही.


2) संकलीत अंदाजासाठी सर्व पाण्याचा उपयोग भूपृष्ठावरील पाण्यातून दाखविला आहे. पण एकूण वापरापैकी अधिकाधिक

1623+429= 2052 भूजल माध्यमातून शक्य आहे.

3) पाणीवापराचे नियोजन उपलब्ध येवा मालिकेवर आधारित आहे.

**नकाशा - 2 . 1**





**• संदर्भ सूची •**

1. राज्य सरहद्द
2. जिल्हा सरहद्द
3. तालुका सरहद्द
4. जिल्हा मुख्यालय
5. तालुका मुख्यालय
6. रेल्वे मार्ग
7. रस्ते
8. नद्या व नाले
9. समपर्जन्यमान रेषा (मिमी) 800
10. धरणाचे ठिकाण व बुडीत क्षेत्र — पूर्ण, बांधकामाधीन, भविष्यकालिन
11. औद्योगिक क्षेत्र
12. महानगरपालिका
13. नगर पालिका
14. आंतरखोरे पाणी स्थलांतराच्या योजना
   - कार्यरत
   - बांधकामाधीन

## महाराष्ट्र जल व सिंचन आयोग

## गोदावरी निम्नस्रोत उपखोरे
(पैठण धरणाखाली)

जून 1999

| उपखोऱ्याचे स्थान | उपखोरे क्र. | उपखोऱ्यांची नावे |
|---|---|---|
|  | 1 | ऊर्ध्व गोदावरी (पैठण धरणा पर्यंत) |
| | 3 | पूर्णा (दुधनासहीत) |
| | 4 | मांजरा |
| | 5 | गोदावरी - सुधा - स्वर्णा |
| | 6 | पैनगंगा |
| | 19 | सीना-बोरी-बेनेतुरा |

# उपखोरे : 3

# पूर्णा ( दुधनासहीत )

## 1.0 भौगोलिक तपशील

या उपखो-यात पूर्णा ही मुख्य नदी आहे. पूर्णा नदी औरंगाबाद जिल्ह्यातील कन्नड तालुक्यातील अजिंठा पर्वताच्या रांगातील गौताळा डोंगरातून उगम पावते व परभणी जिल्ह्यात पूर्णा तालुक्यातील संगम या गावाजवळ गोदावरीला डाव्या बाजूला मिळते. या उपखो-याचे एकूण क्षेत्रफळ 17252 चौकिमी आहे. या उपखो-यात औरंगाबाद, जालना, परभणी, बुलढाणा व अकोला या जिल्ह्यातील क्षेत्र (नकाशा 3.1) येते. उपखोऱ्यात खालील तालुक्यांतील क्षेत्राचा समावेश होतो.

**औरंगाबाद** : 1) औरंगाबाद 2) खुलताबाद 3) कन्नड 4) सिल्लोड 5) पैठण.

**जालना** : 1) जालना 2) अंबड 3) जाफराबाद 4) भोकरदन 5) बदनापूर 6) घनसावंगी 7) मंठा 8) परतूर.

**परभणी** : 1) परभणी 2) जिंतूर 3) हिंगोली 4) वसमत 5) पाथरी 6) सेलू 7) पूर्णा 8) औंढा नागनाथ 9) सेनगाव.

**बुलढाणा** : 1) बुलढाणा 2) देऊळगाव राजा 3) सिंदखेड राजा 4) लोणार.

**अकोला** : 1) रिसोड.

मुख्य नदी व तिच्या उपनद्या इत्यादी बाबतची माहिती पुढील प्रमाणे आहे.

लांबी-किमी, तलांक-मी

| अक्र | नदी | उपनदी | लांबी | उगमस्थान | | संगमस्थान | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ठिकाण | तलांक | ठिकाण | तलांक |
| 1 | पूर्णा | | 402 | गौताळा ता.कन्नड | 731 | गोदावरी नदीला संगम ता.पूर्णा | 355 |
| 2 | | दुधना | 238 | कंकरा ता.औरंगाबाद | 763 | पूर्णा नदीला संगम ता.परभणी | 368 |
| 3 | | लाहूकी | 46 | माहोली ता.औरंगाबाद | 894 | दुधना नदीला सायगावजवळ ता.जालना | 501 |
| 4 | | सुखना | 64 | कोल्ठाण ता.औरंगाबाद | 700 | आलमगाव ता.अंबड | 500 |
| 5 | | खेळना | 89 | अदरवाडी ता.सिल्लोड | 854 | पूर्णा नदीला वातसा ता.जाफ्राबाद | 530 |
| 6 | | गिरिजा | 75 | खिर्डी ता.खुलताबाद | 893 | पूर्णा नदीला ता.जाफराबाद | 556 |
| 7 | | धामना | 48 | मादनी ता. जाफराबाद | 630 | पूर्णा नदीला नराळा ता.जाफराबाद | 526 |
| 8 | | पाताळगंगा | 175 | नशीराबाद | 605 | राहेरी(किनगाव राजा) | 496 |
| 9 | | कस्तुरा | 51 | मासेगाव ता.परतूर | 500 | दुधनेला गोगलगाव ता.परभणी | 406 |

1.1 विस्तार - या उपखोऱ्याचा क्षेत्रीय विस्तार अक्षांश 19°04′ ते 20°31′ उत्तर व रेखांश 75°14′ 77°07′ पूर्व यामध्ये आहे.

1.2 चतु:सीमा - या उपखोऱ्याच्या क्षेत्रीय चतु:सीमा पुढील प्रमाणे आहेत.

| अक्र | दिशा | तपशील |
|---|---|---|
| 1 | उत्तर | तापी(दक्षिण) घटकक्षेत्र |
| 2 | दक्षिण | गोदावरी निम्न स्त्रोत उपखोरे क्र 2 |
| 3 | पूर्व | पैनगंगा उपखोरे क्र 6 |
| 4 | पश्चिम | ऊर्ध्व गोदावरी (मुळा प्रवरा व्यतिरिक्त ) घटकक्षेत्र |

## 2.0 हवामान

या उपखोऱ्यातील क्षेत्र निश्चित पावसाच्या प्रदेशात येते. येथील हवामान समशितोष्ण आहे. या उपखोऱ्यात साधारणतः 86 टक्के पाऊस नैऋत्य मोसमी वाऱ्यामुळे जून ते सप्टेंबर महिन्यात,10 टक्के पाऊस ईशान्य वाऱ्यामुळे ऑक्टोबर ते डिसेंबर महिन्यात व उर्वरीत 4 टक्के पाऊस डिसेंबरनंतर पडतो. वार्षिक सरासरी पर्जन्यमान 814 मिमी आहे. उपखोऱ्यातील हवामानविषयक इतर बाबी व पर्जन्यमानातील दोलायमानता पुढील प्रमाणे आहे.

तपमान - अंश से.,पर्जन्यमान - मिमी

| अक्र | तपशील | परीमाण | वर्ष/महिना | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1 | सर्वात अधिक पाऊस | 1006 | 1975 | परतूर |
| 2 | सर्वात कमी पाऊस | 434 | 1960 | सिल्लोड |
| 2 | सर्वात अधिक तपमान | 45.60 | मे 1964 | चिकलठाणा (औरंगाबाद) |
| 3 | सर्वात कमी तपमान | 2.20 | फेब्रुवारी 1911 | चिकलठाणा (औरंगाबाद) |

कृषि हवामान वर्गीकरणानुसार या उपखोऱ्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

7- निश्चित पावसाचा मुख्यतः खरीप पिकांचा विभाग (ARK) 8- मध्यम ते साधारण जास्त पावसाचा विभाग (MR).

उपखोऱ्यातील पर्जन्यमानातील दोलायमानता गुणांक 30 (तक्ता 2.5.8) आहे. पर्जन्यमानाचा मासिक तपशील सारणी 3.1 मध्ये दर्शविला आहे.पर्जन्यमापन केंद्रांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

पर्जन्य- मिमी

| अक्र | केद्रांचे नाव | प्रकार | स्वामित्व | आधारसामुग्री उपलब्धतेचा कालावधी | वार्षिक सरासरी पर्जन्य |
|---|---|---|---|---|---|
| 1 | औरंगाबाद | सा.प. | म.खा. | 1951-95 | 768 |
| 2 | सिल्लोड | सा.प. | म.खा. | 1951-95 | 671 |
| 3 | जालना | सा.प. | पा.खा. | 1951-95 | 754 |
| 4 | भोकरदन | सा.प. | म.खा. | 1951-95 | 672 |
| 5 | जाफराबाद | सा.प. | पा.खा. | 1951-95 | 678 |
| 6 | परतूर | सा.प. | पा.खा. | 1951-95 | 899 |

पर्जन्य- मिमी

| अक्र | केंद्रांचे नाव | प्रकार | स्वामित्व | आधारसामुग्री उपलब्धतेचा कालावधी | वार्षिक सरासरी पर्जन्य |
|---|---|---|---|---|---|
| 7 | जिंतूर | सा.प. | पा.खा. | 1951-95 | 816 |
| 8 | बुलढाणा | सा.प. | म.खा. | 1951-95 | 788 |
| 9 | देऊळगावराजा | सा.प. | पा.खा. | 1951-95 | 717 |
| 10 | सिंदखेडराजा | सा.प. | म.खा. | 1951-95 | 678 |
| 11 | लोणार | सा.प. | पा.खा. | 1951-95 | 712 |

टीप : सा.प.-सामान्य पर्जन्यमापन केंद्र.पा.खा.- पाटबंधारे खाते म.खा.- महसूल खाते

2.1 बाष्पीभवन : या उपखो-यातील सर्वाधिक बाष्पीभवन मे महिन्यात सरासरी 251 मिमी तर सर्वात कमी बाष्पीभवन डिसेंबर महिन्यात 127 मिमी होते. मासिक व हंगामनिहाय बाष्पीभवन सारणी 3.1 मध्ये दर्शविले आहे.

**3.0 जलसंपत्तिची उपलब्धता**

3.1 भूपृष्ठीय जलसंपत्ति : उपखो-यातील वार्षिक सरासरी येवा 3316 दलघमी आहे. 1951-52 ते 1995-96 या 45 वर्षांची माहिती आधारभूत घेऊन भूपृष्ठावरील जलसंपत्तिची उपलब्धता खालीलप्रमाणे आहे-

| | |
|---|---|
| 75 % विश्वासार्हतेने | 2094 दलघमी |
| 50 % विश्वासार्हतेने | 2999 दलघमी. |

येवा मोजण्याची ठिकाणे पुढीलप्रमाणे आहेत-

येवा - दलघमी

| अक्र | सरीतामापन केंद्राचे नाव | स्वामित्व | आधारसामुग्री उपलब्धतेचा कालावधी | वार्षिक सरासरी येवा |
|---|---|---|---|---|
| 1 | चिंचखेडभूवन | पाटबंधारे खाते | 1978-95 | 81 |
| 2 | जाफराबाद | पाटबंधारे खाते | 1984-95 | 196 |
| 3 | राहेरी | पाटबंधारे खाते | 1986-95 | 247 |
| 4 | राजेवाडी | पाटबंधारे खाते | 1978-95 | 318 |
| 5 | झरी | पाटबंधारे खाते | 1979-95 | 479 |

वेगवेगळ्या विश्वासार्हतेच्या येव्याची काही मर्यादित माहिती सारणी 3.2 मध्ये दिलेली आहे.

3.2 भूशैलीय रचना :

भूपृष्ठीय स्थिति (भूरूप वर्णन) : साधारण 15 टक्के भूभाग अतिविच्छेदित व डोंगराळ, 69 टक्के पठारी व 16 टक्के सपाट व नदीलगतच्या गाळाचा आहे. यात भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा निर्देशित 102 पाणलोट क्षेत्रे आहेत.

भुपृष्ठीय शैलस्थिति : उपखोऱ्यात मुख्यत्वे लाव्हा थरापासून तयार झालेले बहुस्तरीय दक्षिणी कातळाचे दगड(डेक्कन ट्रॅप प्रस्तर) आढळतात. त्यावर अलिकडील काळात तयार झालेले गाळाचे पट्टे विभक्त स्वरुपात प्रामुख्याने पूर्णा, गिरिजा, दूधना, नद्यांच्या काठावर आहेत.

गाळाच्या पट्टयांची लांबी मर्यादित असून जाडी सरासरी 10 ते 15 मीटर आहे. त्यात माती (clay), रेव (cilt) बरोबर वाळू व कंकर तुरळक प्रमाणात आढळतात. दक्षिणी कातळ खडकात अकुहरी बेसाल्टचे प्रमाण तुलनेने जास्त आहे. त्याच प्रमाणे दोन लाव्हा थर गेरूच्या स्तराने विभागलेले असून, परभणी जिल्ह्यात कांही तुरळक ठिकाणी या स्तराच्या खाली क्ले व चर्टी लाईमस्टोन सुध्दा आढळतात.

3.3 भूजल संपत्ति :भूजल संपत्तिचा भूरूपासोबत (Land forms) चांगला सहसंबंध असून एका भूरूपातील भूजलाचे गुणधर्म जवळजवळ सारखे आहेत. पूर्णा, खेळणा, दुधना, गिरिजा व सुखना काठचा सपाट व गाळाचा भाग, कमी उतार, जाड विघटीत थर व मातीच्या थरामुळे भूजल धारणेस अनुकूल असून त्यात भूजल उपलब्धी चांगली आहे. परंतु पठारी भागात मात्र विघटीत थराची जाडी कमी असल्यामुळे भूजल उपलब्धता मर्यादित आहे. त्यात सिल्लोड, भोकरदन,जाफ्राबाद,परतूर,जालना,जिंतूर,परभणी तालुक्यातील भागांचा समावेश आहे. अतिविच्छेदीत भागात (जास्त उतारामुळे) भूजल उपलब्धता अत्यल्प आहे. भूपृष्ठावरील साठयाबरोबरच कालव्याव्दारे अतिरिक्त पुनर्भरणाची सोय असलेल्या क्षेत्रात भूजल उपलब्धी चांगली आहे. पाण्याच्या संयुक्त वापरामुळे सिंचन विकासाची स्थिति चांगली आहे.

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या 1990 च्या भूजल अंदाजा प्रमाणे 1905 दलघमी एकूण पुनर्भरण आहे. सिंचनाखालील विहिरींची संख्या जवळजवळ 0.97 लक्ष आहे. उपसा अधिक झाल्यामुळे औरंगाबाद व जालना जिल्ह्यातील अनुक्रमे गोपू (गोदावरी-पूर्णा) 2,3 (कन्नड,सिल्लोड व खुलताबाद)आणि 13,15(भोकरदन,जाफ्राबाद) विकसित अवस्थेत आहेत. उपखोऱ्यात भूजल विकासास वाव असून विहिरींचा कार्यक्रम राबवितांना मात्र भूजल उपशाचा निश्चित अंदाज बांधणे गरजेचे आहे.

3.4 अवर्षणप्रवण क्षेत्र :या उपखोऱ्याचे क्षेत्र 27 तालूक्यात पसरलेले आहे. सुकथनकर समितीच्या अहवालानंतर शासनाने घोषीत केलेले 12 तालूके अवर्षणप्रवण आहेत. अशा तालूक्यांचा तपशील सारणी 3.3 मध्ये दर्शविला आहे.

## 4.0 जमिनीचे प्रकार

जमीन मुख्यतः बेसाल्टपासून बनलेली आहे या जमिनीची उत्पादन क्षमता चांगली आहे. जमिनीचे सविस्तर वर्गीकरण पुढील प्रमाणे आहे.

| अक्र | तपशील | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | भरड उथळ जमीन | 26 |
| 2 | मध्यम काळी जमीन | 53 |
| 3 | खोल काळी जमीन | 15 |
| 4 | गाळाची जमीन | 6 |

## 5.0 जमिनीचा वापर

लागवडीयोग्य, वनखात्याच्या ताब्यातील क्षेत्र, पडीत क्षेत्र इत्यादी बाबतची माहिती पुढील प्रमाणे आहे.

क्षेत्र - हजार हेक्टर

| अक्र | तपशील | क्षेत्र | भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | भौगोलिक क्षेत्र | 1725 | |
| 2 | वनखात्याच्या ताब्यातील क्षेत्र | 76 | 4.4 |
| 3 | पेरणीसाठी उपलब्ध नसलेले क्षेत्र | | |
| | अ) ओसाड जमीन | 30 | 1.7 |
| | ब) बिगरशेती उपयोगाकरीता आणलेली जमीन | 63 | 3.7 |
| 4 | मशागतयोग्य पडीक जमीन | 38 | 2.2 |
| 5 | कायमची व चराऊ कुरणे | 60 | 3.5 |
| 6 | किरकोळ झाडेझुडपे यांच्या समुहाखालील क्षेत्र | 11 | 0.6 |
| 7 | चालू पडीक जमीन | 87 | 5.0 |
| 8 | इतर पडीक जमीन | 55 | 3.2 |
| 9 | पेरणीचे निव्वळ क्षेत्र | 1305 | 75.7 |
| 10 | लागवडीयोग्य क्षेत्र (4+5+6+7+8+9) | 1556 | 90 |
| 11 | दुसोटा क्षेत्र | 427 | -- |
| 12 | पिकाखालील एकूण क्षेत्र (9+11) | 1732 | -- |
| 13 | पीक घनता टक्केवारी (12÷9×100) | 133 | -- |

## 6.0 लोकसंख्या व पशुधन

6.1 <u>लोकसंख्या</u> : सन 1991 च्या जनगणनेनुसार उपखो-यातील एकूण लोकसंख्या 31.64 लक्ष आहे. सन 2030 पर्यंत होणारी लोकसंख्येतील वाढ,लोकसंख्या घनता इत्यादी खालील प्रमाणे अपेक्षीत आहे.

लोकसंख्या - हजारात,घनता-प्रति चौकिमी

| अक्र | लोकसंख्या तपशील | 1991 | 2030 |
|---|---|---|---|
| 1 | नागरी | 603 | 2233 |
| 2 | ग्रामीण | 2561 | 5122 |
| 3 | एकूण | 3164 | 7355 |
| 4 | लोकसंख्या घनता | 183 | 426 |
| 5 | ग्रामीण लोकसंख्या घनता | 148 | 297 |

6.2 <u>पशुधन</u> : सन 1992 च्या गणनेनुसार उपखो-यात एकूण पशूधन 19.85 लक्ष आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| म्हैस व रेडे | गाय व बैल | एकखुरी व उंट | शेळी व मेंढी | डुकरे | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| 206503 | 1041671 | 9539 | 704689 | 22902 | 1985304 |

6.3 इतर तपशील :या उपखो-यात औरंगाबाद महानगरपालिकेच्या पूर्वेकडील सिडको, चिकलठाणा या भागाचा समावेश आहे. त्याचे सांडपाणी या उपखोऱ्यातील नद्यांमध्ये येत असल्यामुळे (सुखना) त्या बाबत अधिक दक्षतेची गरज निर्माण झाली आहे. या उपखो-यात निम्नदर्शित नगर पालिका आहेत.

**औरंगाबाद** : 1) खुलताबाद 2) सिल्लोड.

**जालना** : 1) जालना 2) जाफराबाद 3) परतूर 4) भोकरदन.

**परभणी** : 1) परभणी 2) सेलू 3) जिंतूर 4) पूर्णा 5) मानवत.

**बुलढाणा** : 1) देऊळगाव राजा 2) सिंदखेडराजा 3) लोणार.

या उपखो-यात शेत मजूर व इतर मजुरांची संख्या 20 लक्ष आहे.

**7.0 पाणी वापर**

7.1 सिंचनासाठी वापर : मराठवाडयातील पहिला मोठा सिंचन प्रकल्प (येलदरी सिध्देश्वर) व पहिले जलविद्युतगृह येलदरी या उपखोऱ्यात उभे राहिले. या उपखोऱ्यात भूपृष्ठीय जलसिंचनाला फारसा जुना इतिहास नाही. येलदरी सारखा मोठा जलाशय 1968 ला पूर्ण झाला तर इतर मध्यम प्रकल्प सहाव्या दशकातच पूर्ण झालेले आहेत. येलदरी/सिध्देश्वर धरणाचे पाणी तर शेतकरी सुरुवातीस वापरण्यास तयार नव्हते. आता मात्र अधिक पाणी मिळविण्यासाठी शेतकरी धडपडत आहेत.

लाहुकी धरणापासून खालच्या बाजूस एक किमी अंतरावर एक जुन्या काळातील वळण बंधारा घडीव दगड व चुन्यात बांधलेला आहे. याचा कालावधी निश्चित सांगता येत नाही, परंतु त्याची रचना खाम नदीवरील वळण बंधाऱ्यासारखीच आहे. पन्नास-साठ वर्षापूर्वी म्हणजे 1945-50 च्या दरम्यान वळण बंधाऱ्याचा कालवा चालू होता असे जवळच्या दुधड गावातील वृध्द लोक सांगतात.

सन 1960 पुर्वी या उपखोऱ्यात अत्यंत नगण्य विहीरबागायत होते. भूपृष्ठीय सिंचनाची सुरुवात 1960 च्या जुई धरणाने झाली. अवघ्या चार दशकांचा इतिहास या भागातील सार्वजनिक सिंचनाचा आहे.

उपखो-यातील वर्गनिहाय प्रकल्प म्हणजे मोठे,मध्यम,बृहतलघु,लघु, कोल्हापूर पध्दतीचे बंधारे यांची संख्या,पाणी साठा, पाणीवापर, सिंचन क्षेत्र याची, तसेच पूर्ण झालेले, प्रगतिपथावरील व भविष्यकालीन प्रकल्प, याची माहिती सारणी 3.4 मध्ये दर्शविली आहे. पूर्ण झालेल्या प्रकल्पांची निर्मित सिंचन क्षमता 120127 हेक्टर असून त्याचा पाणी वापर 1229 दलघमी आहे. 2030 सालापर्यन्त आणखी 68513 हेक्टर उपलब्ध होईल व त्याला 643 दलघमी पाणी लागेल.

7.2 सिंचनेतर पाण्याचा वापर : सिंचनेतर उपयोगासाठी उपखोऱ्यातील सध्याची गरज 123 दलघमी आहे. सन 2030 पर्यन्त ची ती 332 दलघमी होईल.यातील औद्योगीकरणासाठी लागणाऱ्या पाण्याचा वाटा 66 दलघमी आहे.या गरजांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

पाण्याची गरज-दलघमी

| तपशील | 1991 | | | | 2030 |
|---|---|---|---|---|---|
| | नागरी | ग्रामीण | पशुधन | एकूण | |
| घरगुती वापरासाठी | 27 | 51 | 42 | 120 | 266 |
| उद्योगासाठी पाणी | | | | 3 | 66 |
| एकूण | | | | 123 | 332 |

7.3 जलसंपत्तिचा ताळेबंदः भूपृष्ठावरील व भूपृष्ठाखालील उपलब्ध जलसंपत्ति, भूजलाचे वार्षिक पूनर्भरण, पाण्याचा पुनरुद्भव, इतर उपखो-यातील पाण्याचे संक्रमण व त्याचा वापर याचा ताळेबंद सारणी 3.5 मध्ये दर्शविला आहे.

7.4 लाभक्षेत्र विकास : सद्यःस्थिति पुढील प्रमाणे आहे.

क्षेत्र -हजार हेक्टर

| भूविकास भाग-1ची कामे | | | भूविकास भाग-2 ची कामे | | | प्रकल्पाच्या लाभक्षेत्रा |
|---|---|---|---|---|---|---|
| लाक्षेविप्रा कडील प्रकल्प | लाक्षेविप्रा बाहेरील प्रकल्प | एकूण | लाक्षेविप्रा कडील प्रकल्प | लाक्षेविप्रा बाहेरील प्रकल्प | एकूण | व्यतिरिक्त अन्य क्षेत्रात झालेले जमीन सपाटी - करणाचे (भाग-2) क्षेत्र |
| 78.48 | 25.15 | 103.63 | 64.23 | 24.68 | 88.91 | 18.60 |

7.5 सन 1970 पुर्वीची धरणे : उपखोऱ्यात सन 1970 पूर्वी खालील प्रमुख प्रकल्प पूर्ण झाले आहेत.

| अक्र | प्रकल्पाचे नांव | वर्ष |
|---|---|---|
| 1 | येलदरी | 1968 |
| 2 | सिध्देश्वर | 1968 |
| 3 | खेळणा | 1963 |
| 4 | जीवरेखा | 1966 |
| 5 | जुई | 1960 |
| 6 | सुखना | 1968 |
| 7 | अप्परदुधना | 1964 |
| 8 | कर्परा | |

**8.0 पीकरचना :**

उपखोऱ्यातील एकूण लागवडीयोग्य क्षेत्र 15.56 लक्ष हेक्टर आहे. कांही प्रमुख पिकाची दरहेक्टरी उत्पादकता पुढील प्रमाणे आहे.

उत्पादकता-क्विंटल/हेक्टर

| अक्र | पीक | उत्पादकता |
|---|---|---|
| 1 | खरीप ज्वारी | 16.27 |
| 2 | रब्बी ज्वारी | 6.95 |
| 3 | कापूस | 1.46 |

**9.0 उद्योगधंदे**

उपखो-यात मुख्य व्यवसाय शेती आहे. शेती बरोबरच औद्योगिक व्यवसाय चालतो. उपखोऱ्यात कार्यान्वित असलेल्या प्रमुख कृषि आधारित उद्योगधंद्यांची सद्यस्थिति खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| साखर कारखाने | 4 |
| तेलगिरण्या | 10 |

**10.0 जलविद्युत निर्मिति**

येलदरी येथे 22.50 मॅगावॅट क्षमतेचे जलविद्युत केंद्र आहे. भविष्यात निम्नदुधना प्रकल्पाच्या कालव्यावर 0.60 मॅगवॅट जलविद्युत निर्मिति होईल.

**11.0 दळणवळणाची साधने**

उपखोऱ्यातून पूर्व - पश्चिम असा मुंबई - मुदखेड ब्रॉडगेज रेल्वे मार्ग व पूर्णा - खाडवा मीटरगेज मार्ग पण जातो. उपखो-यातून जाणा-या राज्य महामार्गांचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

| अक्र | मार्गाचे नाव | क्रमांक |
|---|---|---|
| 1 | औरंगाबाद - सिल्लोड- जळगाव (प्र.रा.मा) | 8 |
| 2 | कन्नड - सिल्लोड - जाफराबाद - देऊळगावराजा | 183 |
| 3 | भोकरदन - जालना -अंबड | 181 |
| 4 | जालना -देऊळगावराजा-चिखली | 176 |
| 5 | जालना- परतूर- सेलू- परभणी (प्र.रा.मा) | 6 |
| 6 | मंठा - लोणार | 171 |
| 7 | मंठा - जिंतूर - औढा - नांदेड | 220 |
| 8 | औरंगाबाद-सिल्लोड-बुलढाणा-जळगाव | 21 |
| 9 | औरंगाबाद- जालना-परभणी | 291 |
| 10 | औरंगाबाद- जालना-जिंतूर- नांदेड | 107 |

## 12.0 भावी नियोजनासाठी सूचना

**12.1** या उपखोऱ्यातील नैसर्गिक जलसंपत्तिची सरासरी उपलब्धता 3316 दलघमी आहे. गोदावरी पाणी वाटप लवादाच्या निर्णयाप्रमाणे वापरासाठी खालील प्रमाणे पाणी उपलब्ध आहे:

पाणी-दलघमी

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | सिध्देश्वर धरणापर्यन्त (100 टक्के पाणी) सरासरी उपलब्धता | — | 1367 |
| 2) | सिध्देश्वर धरणाखाली (दुधनासह) | | |
| | अ) | 6.10.75 पूर्वी मंजूर | 178 |
| | ब) | 6.10.75 नंतर मंजूर | 409 |
| | | एकूण : | 1954 |

या उपखोऱ्याशी संबधीत खालील आंतरखोरे स्थलांतरण योजना आहेत-

पाणी - दलघमी

| अक्र | योजना | संबंधीत उपखोरे | स्थलांतरीत पाणी |
|---|---|---|---|
| 1 | जायकवाडी प्रकल्प टप्पा-1 | गोदावरी निम्नस्रोत | (+) 405 |
| 2 | पूर्णा पाटबंधारे प्रकल्प | गोदावरी निम्नस्रोत | (-) 434 |
| 3 | खडकपूर्णा पाटबंधारे प्रकल्प | पैनगंगा | (-) 15 |

अशाप्रकारे एकदरीत पाणी वापराच्या नियोजनासाठी उपलब्धी 1910 दलघमी येते. पूर्णा (दुधना सहीत) उपखोरे एकंदरीत तुटीचे उपखोरे आहे हे वरील आकडेवारीवरुन दिसून येते.

पूर्णा नदीवरील येलदरी येथील सुरवातीपासूनच्या येव्याच्या उपलब्धतेवरून (1968 ते 1995) असे दिसून येते की, येव्यातील दोलायमानता देखील अति तीव्र आहे 26 वर्षात 10 वर्षी फक्त धरण भरलेले आहे. सोबत येव्याची सारणी जोडली आहे.पूर्णा-दुधना या दोन्ही नद्यांचे उगम व त्यांच्या उत्स्रोत अंगातील उपनद्यांचे उगम अजिंठा पर्वताच्या दक्षिण उतारावर आहेत. सहयाद्री प्रमाणे हमखास पावसाचा लाभ या उताराला मिळत नाही. त्यामुळे वर्षा वर्षातील पाण्याच्या येव्यात फार फरक पडतो.

सिध्देश्वर धरणापर्यत 100 % पाणी वापरास मुभा असल्यामुळे सरासरी व त्याही पेक्षा कमी विश्वासार्हतेचे नियोजन आर्थिकदृष्टया परवडणारे असेल तर तसे करणे या उपखोऱ्यात शक्य आहे व एकंदर तुटीची स्थिति पहाता इष्टही राहील. सध्याचे नियोजन सिध्देश्वर धरणापर्यन्त 75 % विश्वासार्हतेने केलेले आहे असे दिसते. उपखोऱ्यातील सिध्देश्वर धरणाच्या खालील प्रदेशात मात्र लवादाने घालून दिलेल्या मर्यादेत पाण्याचा दरवर्षी जास्तीत जास्त वापर करण्याच्या दृष्टीने नियोजन करण्याची गरज आहे. या दृष्टीने विचार करता सिध्देश्वर धरणापर्यन्त आणि धरणाच्या खाली पाण्याचे फेरनियोजन करणे तातडीने आवश्यक आहे. त्याच प्रमाणे मंजूर सर्व पाण्याचा वापर होण्याच्या दृष्टीने धरणामागील साठवण क्षमतांचाहि फेरविचार करायला हवा आहे. आगामी वर्षासाठी कॅरीओव्हर साठवणीचे तत्वही अमलांत आणणे इष्ट राहील.

12.2 या उपखोऱ्यामध्ये खरीपामध्ये सर्वसाधारणपणे सिंचनाची गरज भासत नाही. पाऊस गरजे इतका पडतो आणि ज्या वर्षी पाऊस नसेल त्या वर्षी जलाशयात पण पाण्याची उपलब्धता नसते. कारण पूर्णा या नदीचा उगम हा तुटीच्या पावसाच्या प्रदेशामधूनच झालेला आहे. सध्याच्या नियोजनानुसार खरीपासाठी म्हणून जे पाणी गृहीत धरले गेले आहे ते पूर्ण वापरा अभावी वाहून जाते आहे. त्यांची साठवण होण्याची गरज आहे म्हणजे रब्बी/उन्हाळीचे क्षेत्र वाढू शकेल.

12.3 पाण्याचे साठे वाढविण्याचे पर्याय जसे सध्याच्या धरणाची उंची वाढविणे, अन्यत्र योग्य ठिकाणी अतिरिक्त साठे निर्माण करणे, मुख्य कालव्याला आडव्या जाणाऱ्या मोठ्या नाल्यावर मार्गस्थ जलाशये निर्माण करणे, पूर पाझर कालवे काढून भूजलाचे साठे निर्माण करणे, नदीत बंधारे बांधणे हे असू शकतात. त्यानुसार पूर्णा नदीचा तपशीलवार अभ्यास होणे गरजेचे आहे. पैठण प्रमाणेच येलदरी/सिध्देश्वर पर्यन्तच्या सर्व पाण्याचा वापर करण्याचे नियोजन व्हायला हवे आहे.

12.4 पूर्णा उपखोरे हे चिंचोळे खोरे आहे. व भूस्तर अनुकूल आहेत म्हणून पुनर्भरणास हे खोरे अनुकूल आहे. या उपखोऱ्यात निसर्गतःच मान्सूनोत्तर प्रवाह जास्त असतो. त्यामुळे मुख्य नद्यांमध्ये बंधाऱ्यांची साखळी निर्माण करून पाणी साठवावे व ते पाणी नदीकाठावरच्या भागास आर्थिक निकषांच्या मर्यादेत पुरवणे कितपत,कोठे शक्य आहे याची पहाणी होऊन एक बृहत् आराखडा करावा.

12.5 औरंगाबादला मराठवाडा कृषि विद्यापीठाचे फळसंशोधन केंद्र पूर्णा खोऱ्याच्या उगमस्थानाला लागून आहे तर संगमाजवळ मराठवाडा कृषि विद्यापीठ आहे शिवाय मध्यावर बदनापूर येथेही कृषि संशोधन केंद्र आहे.

12.6 या उपखोऱ्यातील जमीन, हवामान,पाण्याची उपलब्धता यानुसार उगमाचा विच्छेदित प्रदेश, मधला प्रदेश व दुधना पूर्णा संगमा जवळील प्रदेश या तीन भिन्न घटक भूक्षेत्रासाठी सिंचनाच्या आधाराने विकसित होऊ शकेल अशी वेगवेगळी पीकरचना संशोधन आणि प्रयोगाच्या आधारे स्थिर करावी लागेल. त्या बरोबर उपखोऱ्यातील 45 % भूक्षेत्र व 34 % लोकसंख्या अवर्षणप्रवण क्षेत्रात येत असल्यामुळे विशेषतः उगमाजवळील प्रदेशांमधे जलव्यवस्थापनात अत्याधुनिकता तातडीने आणावी लागेल. तसेच या भागात जलसंवर्धनाची कामे ही मोठ्या प्रमाणांत घ्यावी लागतील.

12.7 पूर्णा व दुधना नि त्यांच्या उगमाजवळील उपनद्या सरासरी 700-750 मिमी पाऊस पडणाऱ्या प्रदेशातून उगम पावून सरासरी 800-850 मिमी पाऊस पडणाऱ्या प्रदेशाकडे म्हणजे कमी पावसाच्या प्रदेशाकडून जास्त पावसाच्या प्रदेशाकडे वाहत जातात. स्वाभाविकतः माथ्याकडील भागातील अपधाव स्थानिक प्रदेशामधे वापरण्याचा व्यवस्थेला प्राधान्य द्यावे लागेल.

12.8 75 % जमीन भरड उथळ व मध्यम काळी असल्याने एकंदरीने उपखोऱ्याचे क्षेत्र निचरा होणारे क्षेत्र आहे. त्यामुळे सिंचित पिकांसाठी अनुकूल भूरचना आहे. फळबागा व खरीप व रब्बी हंगामातील पिके निश्चित घेण्याच्या दृष्टीने सिंचन व्यवस्था बसवावी लागेल. पूर्णा उपखोऱ्यात सिंचनावर भुईमूग विकसित झाला आहे तर दुधना खोरे तूर या दाळवर्गीय पिकासाठी प्रसिध्द आहे. याला अनुरुप यावर प्रक्रिया करणारी केंद्रे याच उपखोऱ्यात विकसीत होणे गरजेचे आहे. पूर्णा या उपखोऱ्यात सिंचनाच्या सोईमुळे ऊस व केळीच्या पिकात विस्तृत वाढ झालेली आहे. उपखोऱ्यातील पाण्याच्या तुटीचा विचार करता या पिकांना प्रोत्साहन देणे हिताचे राहणार नाही. विद्यमान साखर कारखान्याची ऊसाची गरज भागविण्यासाठी,ऊस क्षेत्राची उत्पादकता वाढविण्यासाठी व पाण्याची बचत करण्यासाठी ठिबकसारख्या सिंचन

पध्दतीचा अवलंब करणे या उपखोऱ्यात अनिवार्य ठरणार आहे. हेच तत्व केळी या पिकास पण लागू आहे.

12.9 अजिंठयाच्या डोंगर रांगांत अद्यापही साग, बिब्बा, बेहडा, चारोळी, पळस, मोह, निंब अशी अत्यंत मूल्यदायी वनवृक्ष व चिंच, बोर, सिताफळ, करवंद अशी रानफळझाडे आहेत. त्यांच्या योजनाबध्द, संवर्धनाला भरपूर वाव दिसतो. अजिंठ्याच्या माथ्याजवळील प्रदेशाची यादृष्टीने स्वतंत्र विकास व्यवस्था या उपखोऱ्यात उभी होणे शक्य वाटते. परंतु या प्रदेशातील सर्वच उपखोऱ्याचा चिंचोळेपणा उपशांच्या उंची यांचा आर्थिक संदर्भात नीट विचार होऊनच नदी बंधाऱ्यातून, नदीपात्रातून, उपसा माध्यमातून कोणत्या प्रकारच्या उपयोगासाठी पाणी उचलणे शक्य आहे व रास्त आहे याचा विचार व्हावा लागेल.

12.10 निचरा होणारी जमीन व अनुकूल हवामानामुळे या उपखोऱ्यातील औरंगाबाद व जालना जिल्ह्यांच्या प्रदेशात व थोडया प्रमाणात लगतच्या भागांतही मोसंबीच्या बागा अगोदरच विकसित झाल्या आहेत. अलीकडेच केसर या आंब्याच्या बागांची त्यात भर पडत आहे. या आंब्यास परदेशी बाजारपेठ पण मिळत आहे. शेतकऱ्यांच्या दृष्टीने इतर नगदी बागायती पिकांच्या तुलनेने कमी पाणी लागणारी ही फळपिके आहेत. विशेष प्रयास केल्यास या उपखोऱ्यात हीच प्रमुख मूल्यदायी पिके ठरु शकतील. त्यादृष्टीने सर्वकष नियोजनाचा (लागवड, प्रक्रिया व विपणन) विचार करता येण्यासारखा आहे. विशेषतः ठिबकसारख्या आधुनिक सिंचन तंत्राच्या मदतीने विस्तीर्ण फळबागांची घन लागवड या उपखोऱ्यात शक्य होईल असे दिसते.

या भागातील पूर्वापार प्रसिध्द असलेली जालना येथील बाजारपेठ या खोऱ्याच्या मधोमध असून त्यांचा विशेष विकास या उद्देशाने करता येईल. या उपखोऱ्यातील तेलगिरण्या व दाल गिरण्याचा विस्तार करण्याची गरज आहे.

12.11 या उपखोऱ्यात औरंगाबाद शहरातील चिकलठाणा औद्योगिक परिसर, वाळूज व शेंद्रा येथील पंचतारांकीत वसाहत व जालना शहर औद्योगिक परिसर असून नागरी व औद्योगिक जल पुरवठयाची व्यवस्था जायकवाडी धरणातून व गोदावरीच्या पात्रातून केलेली आहे. दुधनेची उपनदी असलेल्या सुखनावरील जलाशय चिकलठाणा औद्योगिक क्षेत्रातील व नागरी भागातील सांडपाण्याने अगोदरच प्रदूषित झाला आहे. त्यामुळे या भागातील जलजीवन व कृषि व्यवसायावर विपरित परिणाम वाढतो आहे. तसेच जालना शहराचे व औद्योगिक परिसराचे पाणी कुंडलिका या दुधनेच्या उपनदीत सोडले जात असल्याने बांधकामाधीन असलेल्या निम्न दुधना जलाशयालाही यापुढे प्रदूषणाचा धोका रहाणार आहे.

12.12 हे खोरे तुटीचे असल्यामुळे नागरी व औद्योगिक वापराच्या पाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा पुनर्वापर हा अनिवार्य ठरणार आहे.

## सारणी 3.1

## माहवार सरासरी पर्जन्यमान व बाष्पीभवन

पर्जन्यमान, बाष्पीभवन-मिमी

| अक्र | महिना | पर्जन्यमान | बाष्पीभवन |
|---|---|---|---|
| 1 | जानेवारी | 4 | 140 |
| 2 | फेब्रूवारी | 3 | 157 |
| 3 | मार्च | 5 | 204 |
| 4 | एप्रिल | 10 | 228 |
| 5 | मे | 16 | 251 * |
| 6 | जून | 150 | 197 |
| 7 | जुलै | 203 | 146 |
| 8 | ऑगष्ट | 183 | 143 |
| 9 | सप्टेंबर | 160 | 148 |
| 10 | ऑक्टोबर | 50 | 160 |
| 11 | नोव्हेंबर | 18 | 140 |
| 12 | डिसेंबर | 12 | 127 |
| | एकूण | 814 | 2041 |

हंगाम निहाय बाष्पीभवन

| अक्र | हंगाम | |
|---|---|---|
| 1 | खरीप | 714 |
| 2 | रब्बी | 638 |
| 3 | उन्हाळी | 689 |
| | एकूण | 2041 |

* सरासरी बाष्पीभवन प्रतिदिन 8 मिमी

सारणी:3.2

**जलसंपत्तीची उपलब्धता**

येवा-दलघमी

| अक्र | वर्ष | पूर्णा खोऱ्यातील सिध्देश्वर धरणापर्यन्त एकूण येवा | उतरत्या क्रमाने वार्षिक येवा | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | संगत वर्ष | वार्षिक येवा | विश्वासार्हता टक्केवारी |
| 1 | 1951-52 | 1374 | 1975-76 | 2752 | |
| 2 | 1952-53 | 600 | 1970-71 | 2736 | |
| 3 | 1953- 54 | 1612 | 1988- 89 | 2294 | |
| 4 | 1954- 55 | 1759 | 1955 56 | 2107 | 10 |
| 5 | 1955- 56 | 2107 | 1983- 84 | 2103 | |
| 6 | 1956- 57 | 1818 | 1958- 59 | 2055 | |
| 7 | 1957- 58 | 1215 | 1969- 70 | 1989 | |
| 8 | 1958- 59 | 2055 | 1961-62 | 1986 | |
| 9 | 1959- 60 | 1765 | 1963- 64 | 1847 | 20 |
| 10 | 1960- 61 | 1125 | 1956-57 | 1818 | |
| 11 | 1961- 62 | 1886 | 1959- 60 | 1965 | |
| 12 | 1962-63 | 1428 | 1954- 55 | 1759 | |
| 13 | 1963- 64 | • 1847 | 1990- 91 | 1662 | 30 |
| 14 | 1964 -65 | 1069 | 1987- 88 | 1629 | |
| 15 | 1965- 66 | 1113 | 1953- 54 | 1612 | |
| 16 | 1966- 67 | 1265 | 1992- 93 | 1579 | |
| 17 | 1967- 68 | 963 | 198— 90 | 1503 | |
| 18 | 1968- 69 | 1274 | 1979- 80 | 1445 | 40 |
| 19 | 1969- 70 | 1989 | 1962 - 63 | 1428 | |
| 20 | 1970- 71 | 2736 | 1951- 52 | 1374 | |
| 21 | 1971- 71 | 743 | 1973 -74 | 1373 | |
| 22 | 1972- 73 | 277 | 1993- 94 | 1355 | 50 |
| 23 | 1973- 74 | 1373 | 1968- 69 | 1274 | |
| 24 | 1974- 75 | 590 | 1966- 67 | 1265 | |
| 25 | 1975- 76 | 2752 | 1957- 58 | 1215 | |
| 26 | 1976 -77 | 940 | 1977- 78 | 1183 | 60 |
| 27 | 1977- 78 | 1183 | 1978- 79 | 1142 | |
| 28 | 1978- 79 | 1142 | 1960- 61 | 1125 | |
| 29 | 1979- 80 | 1445 | 1965- 66 | 1113 | |
| 30 | 1980- 81 | 1108 | 1980- 81 | 1108 | |
| 31 | 1981- 82 | 922 | 1964- 65 | 1069 | |
| 32 | 1982- 83 | 352 | 1986 -87 | 1062 | |
| 33 | 1983-84 | 2103 | 1994- 95 | 1018 | 75 |
| 34 | 1984- 85 | 815 | 1991- 92 | 1000 | |

येवा-दलघमी

| अक्र | वर्ष | पूर्णा खोऱ्यातील सिध्देश्वर धरणापर्यन्त एकूण येवा | उतरत्या क्रमाने वार्षिक येवा | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | संगत वर्ष | वार्षिक येवा | विश्वासार्हता टक्केवारी |
| 35 | 1985- 86 | 756 | 1967- 68 | 963 | |
| 36 | 1986- 87 | 1062 | 1976 -77 | 940 | 80 |
| 37 | 1987- 88 | 1629 | 1981- 82 | 922 | |
| 38 | 1988- 89 | 2294 | 1984- 85 | 815 | |
| 39 | 1989- 90 | 1503 | 1985- 86 | 756 | |
| 40 | 1990- 91 | 1662 | 1971- 72 | 743 | 90 |
| 41 | 1991- 92 | 1000 | 1995- 96 | 634 | |
| 42 | 1992- 93 | 1579 | 1971-72 | 600 | |
| 43 | 1993- 94 | 1355 | 1974-75 | 590 | |
| 44 | 1994-95 | 1018 | 1982- 83 | 352 | |
| 45 | 1995- 96 | 634 | 1972 -73 | 277 | |
| | सरासरी | 1361 | | | |

निष्कर्ष : $\frac{\text{10 टक्के उपलब्धता}}{\text{90 टक्के उपलब्धता}} = 2.84$ $\frac{\text{50 टक्के उपलब्धता}}{\text{90 टक्के उपलब्धता}} = 1.82$

$\frac{\text{50 टक्के उपलब्धता}}{\text{75 टक्के उपलब्धता}} = 1.33$

सारणी : 3.2 (चालू)

**पूर्णा प्रकल्पातील उपलब्ध येवा**

येवा-दलघमी

| अक्र | वर्ष | पूर्णा प्रकल्पापर्यन्त प्रत्यक्ष येवा | वरील बाजूस पूर्ण झालेल्या प्रकल्पाचा पाणी वापर | एकूण येवा |
|---|---|---|---|---|
| 1 | 1969 - 70 | 2182 | 43 | 2225 |
| 2 | 1970 - 71 | 1843 | 48 | 1891 |
| 3 | 1971 - 72 | 745 | 52 | 797 |
| 4 | 1972 - 73 | 79 | 57 | 135 |
| 5 | 1973 - 74 | 1260 | 76 | 1336 |
| 6 | 1974 - 75 | 431 | 81 | 512 |
| 7 | 1975 - 76 | 2310 | 85 | 2395 |
| 8 | 1976 - 77 | 972 | 90 | 1061 |
| 9 | 1977 - 78 | 1129 | 94 | 1223 |
| 10 | 1978 - 79 | 863 | 99 | 962 |
| 11 | 1979 - 80 | 1408 | 109 | 1516 |
| 12 | 1980 - 81 | 863 | 113 | 976 |
| 13 | 1981 - 82 | 651 | 118 | 769 |
| 14 | 1982 - 83 | 239 | 122 | 362 |
| 15 | 1983 - 84 | 1887 | 127 | 2005 |
| 16 | 1984 - 85 | 519 | 131 | 650 |
| 17 | 1985 - 86 | 308 | 136 | 443 |
| 18 | 1986 - 87 | 402 | 167 | 648 |
| 19 | 1987 - 88 | 1068 | 171 | 1239 |
| 20 | 1988 - 89 | 2398 | 176 | 2574 |
| 21 | 1989 - 90 | 1400 | 180 | 1580 |
| 22 | 1990 - 91 | 1982 | 184 | 2167 |
| 23 | 1991 - 92 | 825 | 189 | 1014 |
| 24 | 1992 - 93 | 834 | 193 | 1027 |
| 25 | 1993 - 94 | 431 | 198 | 629 |
| 26 | 1994 - 95 | 156 | 203 | 359 |

टीप : प्रकल्पाची एकूण साठवण क्षमता 793 दलघमी

निष्कर्ष 26 वर्षात धरण 16 वेळा भरले

सारणी:3.3

**अवर्षणप्रवण क्षेत्र**

क्षेत्र-चौकिमी, पर्जन्यमान-मिमी, लोकसंख्या-हजारात

| अंक | जिल्हा | तालूका | क्षेत्र | सरासरी वार्षिक पर्जन्यमान | लोकसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | औरंगाबाद | औरंगाबाद | 353 | 768 | 733 |
| 2 | | कन्नड | 568 | 651 | 184 |
| 3 | | पैठण | 79 | 561 | 29 |
| 4 | | खुलताबाद | 286 | 761 | 98 |
| 5 | जालना | अंबड | 775 | 731 | 292 |
| 6 | | जाफराबाद | 684 | 678 | 316 |
| 7 | | भोकरदन | 1141 | 688 | 209 |
| 8 | | हिंगोली | 509 | 970 | 249 |
| 9 | परभणी | जिंतूर | 1732 | 816 | 212 |
| 10 | बुलढाणा | बुलढाणा | 213 | 853 | 62 |
| 11 | | देऊळगावराजा | 812 | 735 | 113 |
| 12 | | लोणार | 540 | 768 | 72 |
| | एकूण | | 7690 | | 2568 |

सारणी : 3.4

## प्रकल्पांची सद्यस्थिती

चलपाणीसाठा - दलघमी
पाणीवापर - दलघमी
सिंचनक्षेत्र - हेक्टर

| अक्र | प्रकल्पाचा संवर्ग | पूर्ण झालेले प्रकल्प | | | | प्रगतीपथावरील प्रकल्प | | | | भविष्यकालीन प्रकल्प | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या नाव | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | संख्या नाव | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | संख्या नाव | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | संख्या नाव | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 1 | मोठे | येलदरी | 891 | 802 | 57988 | निम्नदुधना | 245 | 359 | 28698 | | | | | | 1136 | 1161 | 86686 |
| | | | | | | खडकपूर्णा | 159 | 117 | 18000 | | | | | | 159 | 117 | 18000 |
| | | 1 | 891 | 802 | 57988 | 2 | 404 | 476 | 46698 | 0 | 0 | 0 | 0 | 3 | 1295 | 1278 | 104686 |
| 2 | मध्यम | खेळणा | 11 | 20 | 2499 | पूर्णा नेवपूर | 9 | 13 | 1695 | | | | | | 20 | 33 | 4194 |
| | | जिवरेखा | 6 | 8 | 1299 | अंजना पळशी | 14 | 18 | 2030 | | | | | | 20 | 26 | 3329 |
| | | धामणा | 8 | 15 | 1788 | वाकोद | 12 | 14 | 2335 | | | | | | 20 | 29 | 4123 |
| | | गिरजा | 20 | 26 | 3477 | | | | | | | | | | 20 | 26 | 3477 |
| | | जुई | 8 | 11 | 2163 | | | | | | | | | | 8 | 11 | 2163 |
| | | मांडवा | 3 | 6 | 1156 | | | | | | | | | | 3 | 6 | 1156 |
| | | सुखना | 19 | 27 | 2509 | | | | | | | | | | 19 | 27 | 2509 |
| | | लाहुकी | 5 | 7 | 992 | | | | | | | | | | 5 | 7 | 992 |
| | | अप्परदुधना | 13 | 20 | 3394 | | | | | | | | | | 13 | 20 | 3394 |
| | | कल्याणगिरजा | 8 | 15 | 1376 | | | | | | | | | | 8 | 15 | 1376 |
| | | पिरकल्याण | 13 | 13 | 2020 | | | | | | | | | | 13 | 13 | 2020 |
| | | करपरा | 25 | 36 | 2145 | | | | | | | | | | 25 | 36 | 2145 |
| | | 12 | 140 | 204 | 24818 | 3 | 35 | 45 | 6060 | | | | | 15 | 175 | 249 | 30878 |
| 3 | लघु | 222 | 150 | 223 | 37321 | 91 | 95 | 116 | 13783 | 52 | 5 | 6 | 1972 | 365 | 250 | 345 | 53076 |
| | **सर्व एकूण** | 235 | 1180 | 1229 | 120127 | 96 | 534 | 637 | 66541 | 52 | 5 | 6 | 1972 | 383 | 1720 | 1872 | 188640 |

सारणी : 3.5

**जलसंपत्तीचा ताळेबंद**

जलसंपत्ती - दलघमी

| अक्र | उपलब्धता | | अक्र | वापर (सन2030) | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **भूपृष्ठावरील** | | 4 | **भूपृष्ठावरील** | |
| | अ) नैसर्गिक | | | अ) घरगुती वापरासाठी | |
| | 1) 75 टक्के विश्वासार्हतेने | 2094 | | 1) नागरी | 109 |
| | 2) 50 टक्के विश्वासार्हतेने | 2999 | | 2) ग्रामीण | 103 |
| | 3) सरासरीने | 3316 | | 3) पशुधन | 54 |
| | 4) नियोजनासाठी | 1954 | | एकूण | 266 |
| | ब) मानवप्रभावित | | | ब) उद्योगधंदयासाठी | 89 |
| | 1) नागरी वापरातून पुनरुद्भव (80 %) | 87 | | एकूण सिंचनेतर वापर | 355 |
| | 2) उद्योग धंदयातील पुनरुद्भव (97.5%) | 87 | 5 | इतर उपखोऱ्यात स्थलांतरीत पाणी | 449 |
| | 3) इतर खोऱ्यातून संक्रमित झालेले पाणी | 405 | 6 | सिंचनासाठी उपलब्ध भूपृष्ठावरील पाणी (1954+579-355-449+173 ) | 1902 |
| | एकूण (1 ब) | 579 | | | |
| 2 | मानवनिर्मित | | | | |
| | लाभक्षेत्रातील पुनर्भरण (1954+579-355-449) च्या10 % | 173 | 1729 | | |
| 3 | एकूण उपलब्धता [1954+579+173] | 2706 | 7 | एकूण वापर | 2706 |

1) भूजल उपलब्धता (वार्षिक एकूण पुनर्भरण ) 1905 — अ) भूजलाचा सध्याचा सिंचनासाठी वापर 521


2) भूजल वापरास मुभा ( 1905 च्या 65 %) 1238

टीपा : 1) भूजल उपलब्धतमुळे उपखोऱ्याच्या एकूण उपलब्धतेत वाढ होणार नाही ; भूजलाचा जेवढा उपसा होईल तेवढा नदी प्रवाह घटत जाईल ;म्हणून एकूण उपलब्धतेचा आकडा काढताना भूजल उपलब्धता विचारात घेतलेली नाही.

2) संकलीत अंदाजासाठी सर्व पाण्याचा उपयोग भूपृष्ठावरील पाण्यातून दाखविला आहे. पण एकूण वापरापैकी अधिकाधिक (1238+173)= 1411 भूजल माध्यमातून शक्य आहे.

3) पाणीवापराचे नियोजन उपलब्ध येवा मालिकेवर आधारित आहे.

4) गोदावरी निम्नस्रोत उपखोरे क्रमांक 2 मधून या उपखोऱ्यात 82 दलघमी पाणीउद्योगासाठी वापरले जाते.



नकाशा - 3 . 1
16 Km 0 16 32 Km
गिरणा उप खोरे
मध्य तापी उपखोरे
जळगांव कडे
पैनगंगा
खडकपूर्णा प्रकल्प
पैनगंगा उपखोरे
ऊर्ध्व गोदावरी उपखोरे
गोदावरी निम्न स्रोत उपखोरे
गोदावरी निम्नस्रोत उपखोरे
खेळणा
वामणा
जुई
नेवपूर
अंजनापळशी
कन्नड
सिल्लोड
भोकरदन
जाफ्राबाद
जीवरेखा
खडकपूर्णा
मांडवा
गिरजा
चिकलठाणा
शेंद्रा
औरंगाबाद
लाहुकी
अप्पर दुधना
जालना
पीरकल्याण
देऊळगावराजा
सिंदखेडराजा
लोणार
सुखना
कल्याण गिरीजा
येलदरी
हिंगोली
वाशीम कडे
मंठा
अंबड
बीड कडे
परतूर
निम्न दुधना
जिंतूर
सिध्देश्वर
करपरा
सेलू
औंढा
पूर्णा पाटबंधारे प्रकल्प
नांदेड कडे
मानवत रोड
मानवत
पाथ्री
परभणी
पूर्णा
गोदावरी नदी
जायकवाडी पाटबंधारे प्रकल्प टप्पा-1
गंगाखेड कडे
पैठण कडे
700
800
900
महाराष्ट्र राज्य
3 पूर्णा (दुधनासहीत)
• संदर्भ सूची •
1. राज्य सरहद्द
2. जिल्हा सरहद्द
3. तालुका सरहद्द
4. उपखोरे सरहद्द
5. जिल्हा मुख्यालय
6. तालुका मुख्यालय
7. रेल्वे मार्ग
8. रस्ते
9. नद्या व नाले
10. समपर्जन्यमान रेषा (मिमी)
11. धरणाचे ठिकाण व बुडीत क्षेत्र पूर्ण बांधकामाधीन भविष्यकालिन
12. औद्योगिक क्षेत्र
13. महानगरपालिका
14. नगर पालिका
15. आंतरखोरे पाणी स्थलांतराच्या योजना
– कार्यरत
– बांधकामाधीन
उपखोऱ्याचे स्थान
उपखोरे क्र.
उपखोऱ्यांची नावे
1 ऊर्ध्व गोदावरी (पैठण धरणा पर्यंत)
2 गोदावरी निम्न स्रोत (पैठण धरणा खाली)
6 पैनगंगा
11 गिरणा
13 मध्य तापी
महाराष्ट्र जल व सिंचन आयोग
पूर्णा (दुधनासहीत) उपखोरे
जून 1999

# उपखोरे : 4

# मांजरा

## 1.0 भौगोलिक तपशील

या उपखोऱ्यातील मुख्य नदी मांजरा आहे. तिचा उगम गौरवाडी ता. पाटोदा जि. बीड येथे होतो. बीड, उस्मानाबाद व लातूर जिल्ह्यातून वाहत पुढे ही नदी कर्नाटक राज्यातून आंध्रप्रदेशात जाते व परत राज्याच्या सीमेवर येऊन ती नांदेड जिल्ह्यात संगम गावाजवळ गोदावरी नदीस उजव्या बाजूने मिळते. उपखोऱ्याचे एकूण क्षेत्रफळ 16439 चौकिमी आहे. त्यापैकी 14821 चौकिमी क्षेत्र महाराष्ट्रात आहे. तिच्या एकूण 720 किमी लांबी पैकी 258 किमी महाराष्ट्रात आहे. अति अवर्षणप्रदेशात उगम पावून अवर्षण प्रदेशातूनच मुख्यतः वाहणारी व अखेरी मात्र चांगल्या पावसाच्या प्रदेशांत संगम करणारी मांजरा नदी आहे. त्यामुळे तिची नैसर्गिक वैज्ञानिक वैशिष्टये सहयाद्रिवरून उगम पावणाऱ्या व पूर्व दिशेनेच वाहणाऱ्या इतर नद्यांपेक्षा एकदम वेगळी आहेत. मांजरेच्या या वेगळया वैशिष्टयांची अधिक शास्त्रीय चिकित्सा होणे आवश्यक आहे. या उपखोऱ्यात राज्यातील अहमदनगर, बीड,लातूर, उस्मानाबाद व नांदेड या जिल्ह्यांचे क्षेत्र (नकाशा 4.1) येते. या उपखोऱ्यात खालील तालुक्यांचा समावेश होतो

**अहमदनगर** : 1) जामखेड
**बीड** : 1) पाटोदा 2) बीड 3) अंबाजोगाई 4) केज 5) धारूर
**लातूर** : 1) लातूर 2) रेणापूर 3) अहमदपूर 4) चाकूर 5) उदगीर 6) निलंगा 7) औसा
**उस्मानाबाद** : 1) उस्मानाबाद 2) कळंब 3) उमरगा 4) भूम
**नांदेड** : 1) बिलोली 2) देगलूर 3) मुखेड 4) कंधार 5) लोहा

मुख्य नदी व तिच्या उपनद्या इत्यादीचा तपशील खालील प्रमाणे आहे.

लांबी-किमी; तलांक-मी

| अक्र | नदी | उपनदी | लांबी | उगमस्थान | | संगमस्थान | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ठिकाण | तलांक | ठिकाण | तलांक |
| 1 | मांजरा | | 258* | गौरवाडी ता.पाटोदा | 824 | संगम ता.बिलोली | 324 |
| 2 | | तेरणा | 150 | तेरखेड | 722 | औराद शहाजनी ता.निलंगा | 583 |
| 3 | | रेणा | 60 | सावरगाव ता.अंबाजोगाई | 679 | मांजरा नदीस भातांगळी ता.निलंगा | 597 |
| 4 | | लेन्डी | 80 | उदगीर | 650 | मांजरा नदीस मंतगा ता.देगलूर | 362 |
| 5 | | मानार | 162 | खडकी ता.अहमदपूर | 610 | सगरोळी ता.बिलोली | 334 |

* महाराष्ट्रातील उपखोऱ्याच्या मर्यादेत

1.1 विस्तार : या उपखोऱ्याचा क्षेत्रीय विस्तार खालील प्रमाणे आहे.
अक्षांश 17° 51' ते 18° 55' उत्तर व रेखांश 75° 25' ते 77° 48' पूर्व यामध्ये आहे.

1.2 चतु:सीमा : या उपखोऱ्याचा आकार सर्वसाधारणपणे पसरट पानासारखा आहे. उपखोऱ्याच्या चतु:सीमा बद्दलची माहिती पुढील प्रमाणे आहे.

| अक्र | दिशा | तपशील |
|---|---|---|
| 1 | उत्तर | गोदावरी उपखोरे, बीड, परभणी, नांदेड जिल्हे |
| 2 | पूर्व | आंध्रप्रदेश, कर्नाटक |
| 3 | पश्चिम | बालाघाट रांगा, अहमदनगर व सोलापूर जिल्हे |
| 4 | दक्षिण | कर्नाटक |

## 2.0 हवामान

महाराष्ट्रात सर्वात उंचीवर असलेले हे उपखोरे आहे. या उपखोऱ्याची समुद्रसपाटीपासून सरासरी उंची 574 मीटर आहे. त्यामुळे येथील हवेत तुलनेने गारवा व कोरडेपणा आहे व ती आरोग्यदायी म्हणून प्रसिध्द आहे. येथील हवामान समशितोष्ण आहे. साधारणतः 80 टक्के पाऊस नैऋत्य मोसमी वाऱ्यांमुळे जून ते सप्टेंबर दरम्यान, 17 टक्के पाऊस ईशान्य मोसमी वाऱ्यामुळे सप्टेंबर ते डिसेंबर या कालावधीत व 3 टक्के पाऊस डिसेंबर नंतर पडतो. वार्षिक सरासरी पर्जन्यमान 800 मिमी असले तरी पावसाच्या प्रमाणात फार दोलायमानता आहे.उपखोऱ्यातील पाटोदा, बीड, कळंब, निलंगा, औसा, लातूर, रेणापूर व उमरगा या तालुक्यात सरासरी 700 मिमीपेक्षा कमी पाऊस पडतो. त्यातही पाटोदा तालुक्याच्या पश्चिम भागात व भूम तालुक्याच्या क्षेत्रात सरासरी 600 मिमीपेक्षाही पर्जन्य कमी आहे तर उर्वरीत भागात सरासरी 700 पेक्षा जास्त पर्जन्य आहे.उपखोऱ्याच्या पूर्वेकडील देगलूर व बिलोली तालुक्यात पावसाची सरासरी 1000 मिमी आहे.सरासरी पर्जन्यमानाचा माहवार तपशील सारणी 4.1 मध्ये दिला आहे.

कृषि हवामान वर्गीकरणानुसार या उपखोऱ्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

7-निश्चित पावसाचा मुख्यतः खरीप पिकांचा विभाग (ARK) व 8-मध्यम ते साधारण जास्त पावसाचा विभाग (MR).

पर्जन्यमानातील दोलायमानता गुणांक 32 (तक्ता 5.2.8) आहे. उपखोऱ्यातील पर्जन्यमापन केंद्राचा तपशील खालील प्रमाणे आहे.

सरासरी पर्जन्य- मिमी

| अक्र | केंद्र | प्रकार | स्वामित्व | आधार सामुग्री उपलब्धीचा कालावधी | वार्षिक सरासरी पर्जन्य |
|---|---|---|---|---|---|
| 1 | पाटोदा | सा.प. | महसूल खाते | 1951 -83 | 675 |
| 2 | केज | सा.प. | महसूल खाते | 1951 83 | 687 |
| 3 | उस्मानाबाद | सा.प. | महसूल खाते | 1901 -83 | 871 |
| 4 | लातूर | सा.प. | महसूल खाते | 1901 -83 | 829 |
| 5 | उदगीर | सा.प. | महसूल खाते | 1901 -83 | 886 |
| 6 | उमरगा | सा.प. | महसूल खाते | 1901 -83 | 739 |
| 7 | देगलूर | सा.प. | महसूल खाते | 1901 -83 | 978 |

2.2 <u>बाष्पीभवन</u> : या उपखोऱ्यात सर्वाधिक बाष्पीभवन मे महिन्यात 239 मिमी तर सर्वात कमी बाष्पीभवन ऑगस्ट महिन्यात 132 मिमी होते. माहवार व हंगामनिहाय बाष्पीभवन सारणी 4.1 मध्ये दर्शविले आहे.

## 3.0 जलसंपत्तिची उपलब्धता

3.1 <u>भूपृष्ठीय जलसंपत्ति</u> : या उपखोऱ्यातील वार्षिक सरासरी येवा महाराष्ट्रातील भूक्षेत्रावर 3370 दलघमी आहे. मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना,नाशिकने दीर्घकालिन पर्जन्यमानाचा वेध घेऊन या उपखोऱ्यातील उपलब्धतेचा अभ्यास केला आहे. त्याआधारे आलेली उपलब्धता खालीलप्रमाणे आहे-

| | |
|---|---|
| **75 % विश्वासार्हतेने** | **1488 दलघमी** |
| **50 % विश्वासार्हतेने** | **2598 दलघमी.** |

उपखोऱ्यातील सरितामापन केंद्रे पुढील प्रमाणे आहेत-

येवा-दलघमी

| अक्र | सरिता मापन केंद्राचे नाव | स्वामित्व | आधार सामुग्री उपलब्धीचा कालावधी | वार्षिक सरासरी येवा |
|---|---|---|---|---|
| 1 | औराद शहाजनी | पा.खा. | 1971-96 | 247 |
| 2 | टाकळी | पा.खा. | 1972-96 | 718 |
| 3 | केसराळी | पा.खा. | 1985-96 | 310 |
| 4 | सुंडगी | पा.खा. | 1984-96 | 327 |

वर्ष 1950-51 ते 1995-96 (मांजरा), 1961-95 (लेंडी) व 1964-1995 (मानार) या कालावधीच्या माहितीवर आधारभूत भूपृष्ठावरील जल संपत्तिची उपलब्धता क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी निश्चित केली आहे. त्यानुसार येणाऱ्या वेगवेगळया विश्वासार्हतेचा येवा सारणी 4.2 मध्ये दर्शविला आहे.

3.2 <u>भूशैलीय रचना</u>

<u>भूपृष्ठीय स्थिति (भूरूप वर्णन)</u> : उपखोऱ्यातील साधारणपणे 24 टक्के भूभाग अतिविच्छेदित व डोंगराळ, 65 टक्के पठारी व 11 टक्के सपाट व नदी लगतच्या गाळाने व्यापलेला आहे. मराठवाडयातील सर्वाधिक पठारी प्रदेश या भागात आहे व त्यातील कांही गवताळ कूरणांचा आहे. उपखोऱ्यात भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा निर्देशित एकूण 79 पाणलोट क्षेत्रे आहेत.

<u>भूपृष्ठीय शैलस्थिति</u> : उपखोऱ्यातील साधारण 30 टक्के क्षेत्राच्या तळाशी सर्वात जुना ग्रॅनाईट नाईसेस खडक असून त्यावर लाव्हा थरांनी तयार झालेला बहुस्तरीय दक्षिणी कातळ खडक (डेक्कन ट्रॅप प्रस्तर)आणि सर्वात वर गाळाचा प्रदेश आहे. भिन्न शैलथरांच्या सांध्यामुळे किल्लारी प्रदेशाला कधी कधी भूकंपाचा उपसर्ग पोचतो असा अंदाज आहे.दक्षिण कातळाची अधिकाधिक सरासरी जाडी 350 मीटर आहे.दक्षिणी कातळ खडकात (डेक्कन ट्रॅप प्रस्तरात) प्रामुख्याने दोन प्रकार आढळतात. लातूर, उस्मानाबाद व बीड जिल्ह्यात प्रामुख्याने संधी व भेगा असलेला अकुहरी-बेसाल्ट व बीड जिल्ह्यातील पाटोदा, उस्मानाबाद जिल्ह्याचा काही भाग व नांदेड जिल्ह्यातील मुखेड व कंधार या भागात प्रामुख्याने भरीत-कूहरी

बेसाल्ट आढळतो. भरीत–कुहरी बेसाल्ट मध्ये विघटीत भागात आडव्या संधीच्या भेगा आढळतात. नांदेड जिल्ह्यातील देगलूर व बिलोली भागात प्रामुख्याने ग्रॅनाईट हा खडक आढळतो. लातूर, उस्मानाबाद व बीड जिल्ह्यात उपग्रहांवरून जाणवणाऱ्या भूरेखांचे प्रमाण जास्त आहे.

3.3 <u>भूजलसंपत्ति</u> : या उपखोऱ्यात उथळ भूजलधारक प्रस्तराबरोबर अतिखोलीवरील भूजलधारक प्रस्तर (deep aquifer) सुध्दा उपजाऊ आहेत. अकुहरी बेसाल्ट मधील संधी, भेगांबरोबर विघटीत भागाचे प्रमाण जास्त असल्यामुळे भूजल धारणक्षमता चांगली आहे. पर्यायाने त्यातील विहिरींना पाणी मुबलक आहे. त्यामुळे सिंचनासाठी भूजलाचा उपसा मोठया प्रमाणावर करण्यात येत आहे. उस्मानाबाद जिल्ह्यातील मां-36 अे व मां-9 (तालुका कळंब व उमरगा) पाणलोट क्षेत्रातील भूजल उपसा अधिक असून ती विकसीत अवस्थेत आहेत. अनेक पाणलोट क्षेत्रातील भूस्तरीय रचना भूजल पुनर्भरणास खूप अनुकुल असून, त्यात पुनर्भरणाचे उपाय प्राधान्याने करणे गरजेचे आहे. भरीत-कुहरी बेसॉल्ट मध्ये विघटीत भागाचे प्रमाण कमी असून, संधी व भेगांच्या अभावामुळे त्यातील जलधारण क्षमता खूपच कमी आहे. पर्यायाने त्यातील विहिरींना सुध्दा पाणी कमी आहे. पावसाचे पाणी मुरण्यास खूप मर्यादा असल्यामुळे या खडकाचे प्राबल्य असलेल्या तालुक्यांमधे अवर्षणाची स्थिति अवघड असते.

ग्रॅनाईट खडक सुध्दा अपार्य असून त्यातील भूजल उपलब्धता विघटीत स्तरापूरतीच मर्यादीत आहे. त्यामुळे तेथेही विहिरींना पाणी कमीच आहे. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या 1990 च्या भूजल अंदाजानुसार उपखोऱ्यातील एकूण पुर्नभरण 1719 दलघमी असून सिंचनासाठीच्या विहिरींची संख्या 0.60 लक्ष इतकी आहे.

भूजल उपलब्धतेच्या दृष्टीने अनुकूल असलेल्या पाणलोट क्षेत्रात सिंचनासाठी आणखी काही विहिरी घेण्यास वाव आहे. परंतु उपलब्धतेच्या मर्यादेत हा कार्यक्रम राबविण्याची गरज आहे.

3.4 <u>अवर्षणप्रवण क्षेत्र</u> : या उपखोऱ्याचे क्षेत्र 22 तालुक्यात पसरलेले आहे. सुकथनकर समितीच्या अहवाला नंतर शासनाने13 तालुके अवर्षणप्रवण घोषित केलेले आहेत. अशा तालुक्यांचा तपशील खालील प्रमाणे आहेत.

पर्जन्यमान - मिमी; क्षेत्र-चौकिमी; लोकसंख्या - हजारात

| अक्र | तालुका | सरासरी वार्षिक पर्जन्यमान | क्षेत्रफळ | लोकसंख्या |
|---|---|---|---|---|
| 1 | पाटोदा | 675 | 317 | 42 |
| 2 | केज | 678 | 1429 | 175 |
| 3 | बीड | 694 | 422 | 94 |
| 4 | कळंब | 800 | 1227 | 208 |
| 5 | भूम | 650 | 290 | 41 |
| 6 | उस्मानाबाद | 871 | 1088 | 249 |
| 7 | औसा | 725 | 1212 | 226 |
| 8 | अहमदपूर | 850 | 1578 | 181 |
| 9 | निलंगा | 722 | 1388 | 300 |

पर्जन्यमान - मिमी; क्षेत्र-चौकिमी; लोकसंख्या - हजारात

| अक्र | तालुका | सरासरी वार्षिक पर्जन्यमान | क्षेत्रफळ | लोकसंख्या |
|---|---|---|---|---|
| 10 | उदगीर | 886 | 1638 | 334 |
| 11 | मुखेड | 808 | 675 | 205 |
| 12 | देगलूर | 1050 | 679 | 170 |
| 13 | जामखेड | 674 | 131 | 18 |

## 4.0 मृदेचे (Soils) प्रकार

या उपखोऱ्यातील मृदेचे वर्गीकरण खालील प्रमाणे आहे.

| अक्र | तपशील | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | भरड उथळ जमीन | 7 |
| 2 | मध्यम काळी जमीन | 46 |
| 3 | खोल काळी जमीन | 29 |
| 4 | गाळाची जमीन | 17 |
| 5 | लालसर संमिश्र जमीन | 1 |

## 5.0 जमिनीचा वापर

लागवडीयोग्य क्षेत्र ,वन खात्याच्या ताब्यातील क्षेत्र, पडीक क्षेत्र इत्यादी तपशील पुढीलप्रमाणे आहे.

क्षेत्र - हजार हेक्टर

| अक्र | वापर | क्षेत्र | भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | भौगोलिक क्षेत्र | 1482 | |
| 2 | वन खात्याच्या ताब्यातील क्षेत्र | 58 | 3.9 |
| 3 | पेरणीसाठी उपलब्ध नसलेले क्षेत्र | | |
| | अ) ओसाड जमीन | 49 | 3.3 |
| | ब) बिगर शेती उपयोगाकरीता आणलेली जमीन | 38 | 2.5 |
| 4 | मशागतीयोग्य पडीक जमीन | 59 | 3.9 |
| 5 | कायमची कुरणे व चराऊ कुरणे | 48 | 3.3 |
| 6 | किरकोळ झाडे झुडपे यांच्या समुहाखालील क्षेत्र | 15 | 1.0 |
| 7 | चालू पडीक जमीन | 93 | 6.4 |
| 8 | इतर पडीक जमीन | 70 | 4.7 |

क्षेत्र - हजार हेक्टर

| अक्र | वापर | क्षेत्र | भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी |
|---|---|---|---|
| 9 | पेरणीचे निव्वळ क्षेत्र | 1052 | 71 |
| 10 | लागवडीयोग्य क्षेत्र (4+5+6+7+8+9) | 1337 | 90 |
| 11 | दुसोटा क्षेत्र | 263 | |
| 12 | पिकाखालील एकूण क्षेत्र (9+11) | 1315 | |
| 13 | पीक घनता (12÷9×100) | 125 | |

पेरणी क्षेत्राच्या तुलनेत 30% क्षेत्र पडिक आहे याची कारणे स्थानिक माती प्रकार, हवामान व त्यामुळे रोजगारासाठी स्थलांतरणाची सामाजिक गरज अशी संमिश्र आहेत. येथील वनक्षेत्रहि उपजाऊ प्रकारातले नाही. या सर्व क्षेत्राचा एकंदर विकास रचनेत वेगळ्या प्रकारे विचार होणे आवश्यक दिसते.

**6.0 लोकसंख्या व पशुधन**

6.1 लोकसंख्या : सन 1991 च्या जनगणनेनुसार या उपखोऱ्यातील लोकसंख्या 30 लक्ष 10 हजार आहे. सन 2030 ची संभाव्य लोकसंख्या व लोकसंख्येची घनता खालील प्रमाणे अपेक्षित आहे.

लोकसंख्या - हजारात,घनता-प्रती चौकिमी

| अक्र | तपशील | वर्ष | |
|---|---|---|---|
| | | 1991 | 2030 |
| 1 | नागरी | 505 | 1872 |
| 2 | ग्रामीण | 2505 | 5010 |
| 3 | एकूण | 3010 | 6882 |
| 4 | एकूण लोकसंख्येची घनता | 203 | 464 |
| 5 | ग्रामीण लोकसंख्येची घनता | 169 | 338 |

6.2 पशुधन : या उपखोऱ्यात 1992 च्या मोजणीनुसार एकूण पशुधन 19.57 लक्ष आहे तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| म्हैस व रेडे | गायी व बैल | एकखुरी व उंट | डुकरे | शेळ्या व मेंढया | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| 342023 | 831841 | 13226 | 25277 | 745442 | 1957809 |

6.3 इतर तपशील : या उपखोऱ्यात खालील नगरपालिका आहेत .

1) पाटोदा 2) केज 3) कळंब 4) उस्मानाबाद 5) औसा 6) लातूर 7) निलंगा 8) अहमदपूर 9) उदगीर 10) मुखेड 11) कंधार 12) देगलूर 13) बिलोली 14) अंबाजोगाई.

या उपखोऱ्यात कृषिक्षेत्र जास्त आहे,त्यामुळे शेत मजूरांची संख्या 18.65 लक्ष आहे तर इतर मजूरांची संख्या 7.83 लक्ष आहे.

## 7.0 पाणी वापर

7.1 <u>सिंचनासाठी वापर</u> : उपखोऱ्यातील वर्गनिहाय प्रकल्प म्हणजे मोठे,मध्यम, बृहत लघू,लघू,कोल्हापूर पध्दतीचे बंधारे,पाणीसाठा, पाणीवापर, सिंचन क्षेत्र याची तसेच पूर्ण झालेले, प्रगतिपथावरील व भविष्यकालीन प्रकल्प याच्या तपशीलवार माहितीसाठी सारणी 4.3 पहावी. पूर्ण झालेल्या प्रकल्पांची निर्मित सिंचन क्षमता 138069 हेक्टर असून त्याचा पाणी वापर 1077 दलघमी आहे. सन 2030 पर्यंत 93740 हेक्टर क्षेत्र नव्याने सिंचनाखाली येईल व त्याचा पाणी वापर 598 दलघमी होईल.

7.2 <u>सिंचनेतर पाण्याचा वापर</u> : सिंचनेतर उपयोगासाठी या उपखोऱ्यातील पाण्याची सध्याची गरज 111 दलघमी आहे. सन 2030 पर्यंतची ती 268 दलघमी होईल. यातील औद्योगिकरणासाठी लागणाऱ्या पाण्याचा वाटा 25 दलघमी आहे. या पाण्याचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

पाण्याची गरज - दलघमी

| अक्र | तपशील | वर्ष | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1991 | | | | 2030 |
| | | नागरी | ग्रामीण | पशुधन | एकूण | |
| 1 | घरगुती वापरासाठी | 21 | 51 | 36 | 108 | 243 |
| 2 | उद्योगासाठी | | | | 3 | 25 |
| | | | | एकूण : | 111 | 268 |

7.3 <u>जलसंपत्तिचा ताळेबंद</u> : भूपृष्ठावरील व भूपृष्ठाखालील उपलब्ध जलसंपत्ति, घरगुती वापरासाठी, उद्योगासाठी व सिंचनासाठी पाणीवापर यातून होणारा पुनरुद्भव इत्यादीचा ताळेबंद सारणी 4.4 मध्ये दिला आहे.

7.4 <u>लाभक्षेत्र विकास</u> : सद्य:स्थिति खालील प्रमाणे आहे:-

क्षेत्र -हजार हेक्टर

| भूविकास भाग-1ची कामे | | भूविकास भाग-2 ची कामे | | प्रकल्पाच्या लाभक्षेत्रा व्यतिरिक्त अन्य क्षेत्रात झालेले जमीन सपाटी - करणाचे (भाग-2) क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| लाक्षेविप्रा कडील प्रकल्प | लाक्षेविप्रा बाहेरील प्रकल्प | लाक्षेविप्रा कडील प्रकल्प | लाक्षेविप्रा बाहेरील प्रकल्प | |
| 20.69 | 51.36 | 6.76 | 51.08 | 26.20 |

7.5 <u>सन 1970 पूर्वीची धरणे</u> : उपखोऱ्यातील 1970 पूर्वीची प्रमुख धरणे खालील प्रमाणे आहेत.

<u>मोठे प्रकल्प</u>

1. मानार 1968

<u>मध्यम प्रकल्प</u>

1 तेरणा 1970

2 मोहसांगवी 1965 3 कुंद्राळा 1969

## 8.0 पीकरचना

उपखोऱ्यातील पेरणीखालचे क्षेत्र 10.52 लक्ष हेक्टर आहे. उपखोऱ्यातील बहुतांश भाग खरीप क्षेत्र आहे. कांही प्रमुख पिकाची दरहेक्टरी उत्पादकता पुढील प्रमाणे आहे.

उत्पादकता - क्विंटल प्रति हेक्टर

| अक्र | प्रमुख पिके | उत्पादकता |
|---|---|---|
| 1 | खरीप ज्वारी | 15.13 |
| 2 | रब्बी ज्वारी | 6.90 |

## 9.0 उद्योगधंदे

उपखोऱ्यातील प्रमुख कृषि आधारित उद्योगधंद्यांची सद्य स्थिति पुढील प्रमाणे आहे.

| अक्र | तपशील | उद्योगधंदे |
|---|---|---|
| 1 | साखर कारखाने | 6 |
| 2 | सूत गिरण्या | 4 |
| 3 | कापड गिरण्या | 4 |

## 10.0 जलविद्युत निर्मिति

भौगोलिक परिस्थितिमुळे या उपखोऱ्यात जलविद्युत निर्मितिस वाव दिसत नाही.

## 11.0 दळण वळणाची साधने

या उपखोऱ्यातून परळी - हैद्राबाद एकेरी ब्रॉडगेज व लातूर - मिरज नॅरोगेज हे रेल्वे मार्ग जातात. उपखोऱ्यातील राज्य महामार्गाची माहिती खालील प्रमाणे आहे.

| अक्र | मार्गाचे नाव | मार्ग क्रमांक |
|---|---|---|
| 1. | औरंगाबाद- बीड | |
| 2. | उस्मानाबाद - तुळजापूर - सोलापूर | 1 |
| 3. | कळंब - उस्मानाबाद | 159 |
| 4. | परळी- अंबेजागाई-केज-बीड | |
| 5. | तुळजापूर - लातूर - अहमदपूर - नांदेड | 3 |
| 6. | तुळजापूर- सोलापूर | |
| 7. | कळंब - लातूर | 107 |
| 8. | लातूर - धारूर | 144 |
| 9. | उमरगा - निलंगा - चाकूर | 167 |
| 10. | अहमदपूर - अंबेजोगाई | |
| 11. | उदगीर - देगलूर | 168 |
| 12. | देगलूर - नांदेड | 6 |
| 13. | शिरूर ताजबंद - बिलोली | 225 |

## 12.0 नियोजनाची दिशा

12.1 या उपखोऱ्यातील पाण्याची वार्षिक सरासरी उपलब्धता 3770 दलघमी आहे. गोदावरी लवादाच्या निर्णयानुसार वापरासाठी उपलब्ध पाणी खालील प्रमाणे आहे-

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | 6.10.75 पूर्वीच्या प्रकल्पाचे | – 660 दलघमी | दरवर्षी पेक्षा जास्त नाही. |
| ब) | 6.10.75 नंतर | – 887 दलघमी | दरवर्षी पेक्षा जास्त नाही. |
| | एकूण | : 1547 दलघमी | |

या उपखोऱ्यातून गोदावरी निम्नस्रोत (उपखोरे क्र 2) या उपखोऱ्यात ऊर्ध्व मानार प्रकल्पातून 42 दलघमी तर निम्न मानार प्रकल्पाच्या शाखा कालव्यातून 132 दलघमी पाणी आंतरखोरे स्थलांतराने वळविलेले आहे. परिणामी या उपखोऱ्यात वापरासाठी निव्वळ उपलब्धी 1373 दलघमी येते.

साधारणतः खरीपामध्ये सिंचनासाठी पाणी लागत नाही. ज्यावेळी खरिपात सिंचनासाठी पाण्याची गरज भासते त्यावेळी जलाशयात पण पाणी उपलब्ध नसते. मांजरा नदीचा उगम हा तुटीच्या भागातच झाल्यामुळे ही परिस्थिति उद्भवते.

लवादाप्रमाणे उपलब्ध झालेल्या पाण्याचा पूर्ण वापर करण्याच्या दृष्टीने साठवणीचे तत्काळ फेरनियोजन करण्याची गरज आहे. यानुसार या उपखोऱ्यामध्ये साठवण वाढविण्याची गरज आहे. उपलब्ध झालेल्या पाण्याचा वापर करण्याच्या दृष्टीने साधारणतः 30 % तरी जास्त पाण्याचे साठे निर्माण करावे लागतील.

या उपलब्ध येव्यावरून आणि पावसाच्या आकडेवारीवरून दोलायमानता तीव्र असल्याचे दिसून येते. सोबत मांजरा जलाशयातील येव्याचे उपलब्ध आकडेवारी सारणी 4.2 मध्ये दिलेली आहे. 15 वर्षांतून फक्त 6 वर्षी जलाशय भरलेला दिसून येतो. पाण्याचे साठे वाढविण्यासाठी सध्याच्या धरणांच्या उंच्या वाढविणे, नवीन जलसाठे निर्माण करणे, कालव्यातून मार्गस्थ जलाशये निर्माण करणे, भूजलाचे साठे वाढविणे, नदी पात्रात बॅरेजेस, को.प.बंधारे बांधून साठे निर्माण करणे इ. पर्यायांचा अभ्यास करण्याची गरज आहे. दोलायमानतेवर मात करण्यासाठी जलाशयातील साठयांमध्ये निभावणी साठयाची (carry over)तरतूद करण्याची पण गरज आहे.

12.2 या उपखोऱ्यात नदीच्या उगमस्थानापासून खालच्या भागामध्ये पावसाचे प्रमाण पण बदलत जाते. उगमस्थानाच्या भागात 600 मिमी मध्यभागात 700 मिमी, आणि शेवटच्या भागात साधारणतः 900 मिमी इतका पाऊस पडतो असे दिसते. त्यामुळे विकासाच्या नियोजनात या उपखोऱ्याचे 3 भाग संकल्पून त्यांच्यासाठी वेगवेगळया विकास प्रक्रियांचे उचित मिश्रण सुचवावे लागेल.

12.3 हे उपखोरे कोरडे उपखोरे आहे. या उपखोऱ्यातील 12074 चौकिमी क्षेत्र अवर्षणप्रवण भागात मोडते. म्हणून जलाशयातून होणाऱ्या बाष्पीभवनात घट कशी करता येईल याचा अभ्यास होणे गरजेचे आहे.

हे उपखोरे तुलनेते इतर उपखोऱ्यापेक्षा जास्त उंचीवर आहे. शेजारचे उपखोरेपण (सीना, गोदावरी) तुटीचेच उपखोरे आहेत. म्हणून शेजारच्या वा इतर उपखोऱ्यातून पाणी स्थलांतरणाच्या पर्यायास वाव दिसत नाही.

12.4 हे उपखोरे तुटीचे आहे व दर 3-4 वर्षांनी तेथे दुष्काळाला तोंड द्यावे लागते. पाण्याचा अत्यंत काटकसरीने वापर करण्याच्या सिंचन व्यवस्थापनात ठिबक, तुषारसारख्या आधुनिक

सिंचनाच्या पध्दतीचा अवलंब करण्याची गरज, त्यानुसार या सिंचन पध्दतीला अनुकूल अशी पण कमी पाणी वापरणारी पीकरचना (फळबागा, भाजीपाला, कापूस) येथे राबविण्याची गरज आहे.

हवा कोरडी, उंचावरील क्षेत्र, भरपूर सूर्यप्रकाश यामुळे आरोग्याला लाभदायी असे वातावरण या उपखोऱ्यात आहे. या नैसर्गिक उपलब्धतेतील अनुकुलतेमुळे या उपखोऱ्यात अंबाजोगाई येथे मोठा दवाखाना (क्षय,पोटाचे विकार इ) फार पूर्वीपासून उघडण्यात आला आहे. यादृष्टीने आरोग्यविषयक संस्था, दवाखाने, शैक्षणिक संस्था, व्यापारी केंद्रे विकसित करणे अनुकूल राहणार आहे त्यातून स्थानिक लोकांना रोजगाराची निर्मिति वाढेल. केवळ सिंचनाच्या माध्यमातून उत्पादन व समृध्दी निर्मितिला या उपखोऱ्यात फारच मर्यादा आहेत.

12.5 या उपखोऱ्यातील दरडोई व दरहेक्टरी पाण्याची उपलब्धता पाहता फक्त शेतीचा विकास करण्यासाठीही फार मर्यादा आहेत.सर्वसाधारण जीवनमानासाठी एका कुटुंबाला किमान 1 हेक्टर सिंचनक्षेत्राची गरज आहे. त्यासाठी प्रति हेक्टर सिंचनासाठी3000 घमी पाणी उपलब्ध करून देण्याची गरज राहणार आहे. त्या तुलनेत दर हेक्टरी उपलब्धताच फक्त 1100 घमी आहे. त्यांतही उपखोऱ्याच्या पश्चिम भागात तर ती फारच कमी आहे. यानुसार शेतीवर भार टाकून या भागाचा विकास करण्यास मर्यादा आहेत आणि म्हणून या भागाच्या विकासासाठी कमी पाणी वापराच्या शेतीव्यतिरिक्तच्या अन्य उद्योगधंद्यास प्रोत्साहन देऊन शेतीवरील लोकसंख्येचा भार हलका करणे तातडीने गरजेचे आहे.

12.6 या उपखोऱ्यात ज्वारीचे प्रमुख पीक असून त्या खालोखाल कपाशीचे पीक आहे. येथे ज्वारीवर व कापसावर प्रक्रिया करणारे उद्योग काढण्यास भरपूर वाव आहे. या उपखोऱ्यात आंबा व सिताफळ या फळपिकांचे क्षेत्र भरपूर आहे. या उपखोऱ्यातील सर्वसाधारण जमीन मध्यम प्रकारची आहे. त्यामुळे फळबागा वाढीस भरपूर वाव आहे. उपखोऱ्यातील लिंबागणेश येथे द्राक्ष उत्पादना बाबतचे अग्रणी (पायोनिअरींग) प्रयोग झाले होते. किल्लारी व उमरगा येथील द्राक्षाची परदेशात निर्यात होत आहे. येथील हवामान फळाफुलांना तसेच दुग्धोत्पादनास अनुकूल आहे पण त्यासाठी नियोजन करणे आवश्यक आहे.

12.7 उपखोऱ्यात तीळ, भूईमूग, कारळ, सूर्यफूल व करडी या तेलबियांचे उत्पादन मोठया प्रमाणात होते. त्यामुळे लातूर येथे तेलगिरण्या आहेत. सिंचनाच्या आधाराने उत्पादने वाढवून अजून तेलगिरण्या व्यवसाय उभारणीस प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. मूग, उडीद, तूर, हरभरा, इत्यादी डाळीचे उत्पादनही उपखोऱ्यात मोठया प्रमाणावर होते, त्यावर चालणाऱ्या डाळ गिरण्यासही येथे वाव आहे, म्हणून डाळीच्या उत्पादनाला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. बाजारपेठांची उपलब्धता व साखर कारखान्यांची निर्मिति यामुळे या तुटीच्या खोऱ्यात ऊस खूप वाढलेला दिसतो. उपखोऱ्यातील पाण्याच्या तुटीचा विचार करता ऊस या पिकास प्रोत्साहन देणे हितावह राहणार नाही. विद्यमान साखर कारखान्याची गरज भागविण्यासाठी व पाण्याची काटकसर करण्यासाठी ठिबक सारख्या सिंचन पध्दतींचा वापर उपखोऱ्यात सर्वत्र अनिवार्य करणे आवश्यक वाटते.

12.8 उपखोऱ्यातील किल्लारी येथे 30 सप्टेंबर 1993 रोजी प्रलयंकारी भूकंप झाला. त्यात दहा हजारावर जीवित हानि झाली. लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील पन्नासच्यावर गावे पुनर्वसित करावी लागली. अलीकडे पण अधूनमधून भूकंपाचे धक्के बसतात.

12.9 उपखोऱ्यात लातूर हे एक मोठे व्यापारी केंद्र आहे. परंतु येथे विशेष कारखाने नाहीत. लातूर व अंबाजोगाई शहरे शैक्षणिक केंद्र म्हणून विकसित झाली आहेत. स्वातंत्र्यापूर्वीपासून या भागात आर्यसमाजाचे कार्य होते. त्यामुळे खेडोपाडी शाळा स्थापन झाल्या.परिणामी या उपखोऱ्यात ग्रामीण साक्षरतेचे प्रमाण बरेच वरचे आहे. त्याचा उपयोग सिंचनाच्या आधुनिक पध्दती

(ठिबक/तुषार) व त्यातून कापूस / डाळी, तेलबिया यांचे उत्पादन वाढवण्यासाठी चांगला करता येईल. त्याच प्रमाणे यांत्रिकी निर्मितिच्या उद्योगांनाही चालना देता येईल. त्यांना पाणी फार कमी लागते. मराठवाडा मुक्ति संग्रामात या उपखोऱ्यातील जनतेचा सिंहाचा वाटा आहे. उपखोऱ्यातील देवणी जातीचे वळू जगप्रसिध्द आहेत.

12.10 या उपखोऱ्याच्या सीमेवर (मानार या घटकक्षेत्रात) असलेला लेंडी प्रकल्प हा आंतरराज्यीय प्रकल्प आहे व अनेक वर्षापासून रेंगाळला आहे. या प्रकल्पातील पाण्याचा एकूण वापर 179 दलघमी आहे. त्यातील महाराष्ट्राचा वाटा 112 दलघमी तर आंध्रप्रदेशचा वाटा 67 दलघमी आहे. या भागाच्या विकासासाठी या प्रकल्पाला गती देणे आवश्यक आहे. मुख्य साठवण महाराष्ट्रातच असल्यामुळे ती पूर्ण करून महाराष्ट्रातील कामे पूर्ण करता येणे शक्य आहे. आंध्रप्रदेशाचा खर्चाचा वाटा आल्यानंतर त्यांच्या वाटयाचे पाणी त्यांना देता येईल. मानार या घटक क्षेत्रातील या व इतर प्रकल्पांना गती देण्यासाठी वेगळा विचार करावा लागेल.

सारणी:4.1

**माहवार सरासरी पर्जन्यमान व बाष्पीभवन**

पर्जन्यमान, बाष्पीभवन-मिमी

| अक्र | महिना | पर्जन्यमान | बाष्पीभवन |
|---|---|---|---|
| 1 | जानेवारी | 2 | 143 |
| 2 | फेब्रूवारी | 3 | 159 |
| 3 | मार्च | 3 | 206 |
| 4 | एप्रिल | 5 | 224 |
| 5 | मे | 12 | 239 |
| 6 | जून | 141 | 163 |
| 7 | जुलै | 171 | 139 |
| 8 | ऑगस्ट | 147 | 132 |
| 9 | सप्टेंबर | 182 | 145 |
| 10 | ऑक्टोबर | 113 | 160 |
| 11 | नोव्हेंबर | 19 | 141 |
| 12 | डिसेंबर | 2 | 133 |
| | एकूण | 800 | 1985 |

**हंगामनिहाय बाष्पीभवनाचा तपशील**

बाष्पीभवन - मिमी

| अक्र | हंगाम | बाष्पीभवन |
|---|---|---|
| 1 | खरीप | 579 |
| 2 | रब्बी | 577 |
| 3 | उन्हाळी | 829 |
| | एकूण | 1985 |

सारणी:4.2

**जलसंपत्तीची उपलब्धता**

उगमापासून ते सायगावपर्यंत

वार्षिक येवा - दलघमी

| अक्र | उपलब्धता कालावधी | वार्षिक येवा | उतरत्या क्रमाने येवा | संगत वर्षे | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | 1950 - 51 | 1372 | 3273 | 1955 56 | |
| 2 | 1951 - 52 | 1462 | 2506 | 1975-76 | |
| 3 | 1952 - 53 | 639 | 2483 | 1970-71 | 10 |
| 4 | 1953 - 54 | 1887 | 2364 | 1954-55 | |
| 5 | 1954 - 55 | 2364 | 2234 | 1958-59 | |
| 6 | 1955 - 56 | 3273 | 2149 | 1961-62 | 20 |
| 7 | 1956 - 57 | 2007 | 2148 | 1959-60 | |
| 8 | 1957 - 58 | 1599 | 2007 | 1956-57 | |
| 9 | 1958 - 59 | 2234 | 2004 | 1962-63 | 30 |
| 10 | 1959 - 60 | 2148 | 1998 | 1963-64 | |
| 11 | 1960 - 61 | 1168 | 1887 | 1953-54 | |
| 12 | 1961 - 62 | 2149 | 1856 | 1964-65 | |
| 13 | 1962 - 63 | 2004 | 1771 | 1981-82 | |
| 14 | 1963 - 64 | 1998 | 1722 | 1969-70 | |
| 15 | 1964 - 65 | 1856 | 1599 | 1957-58 | |
| 16 | 1965 - 66 | 1052 | 1545 | 1978-79 | 50 |
| 17 | 1966 - 67 | 1074 | 1462 | 1951-52 | |
| 18 | 1967 - 68 | 1316 | 1461 | 1973-74 | 60 |
| 19 | 1968 - 69 | 710 | 1372 | 1950-51 | |
| 20 | 1969 - 70 | 1722 | 1334 | 1979-80 | |
| 21 | 1970 - 71 | 2483 | 1316 | 1967-68 | |
| 22 | 1971 - 72 | 1090 | 1168 | 1960-61 | |
| 23 | 1972 - 73 | 144 | 1136 | 1980-81 | |
| 24 | 1973 - 74 | 1461 | 1090 | 1971-72 | 75 |
| 25 | 1974 - 75 | 815 | 1074 | 1966-67 | |
| 26 | 1975 - 76 | 2505 | 1052 | 1965-66 | |
| 27 | 1976 - 77 | 657 | 815 | 1974-75 | |
| 28 | 1977 - 78 | 387 | 710 | 1968-69 | 90 |
| 29 | 1978 - 79 | 1545 | 657 | 1976-77 | |
| 30 | 1979 - 80 | 1334 | 639 | 1952-53 | |
| 31 | 1980 - 81 | 1136 | 387 | 1977-78 | |
| 32 | 1981 - 82 | 1771 | 144 | 1972-73 | |
| | **सरासरी** | 1543 | | | |

निष्कर्ष : 90 टक्के विश्वासार्हतेच्या पाण्याच्या तुलनेत सरासरी उपलब्धता दुपटीहून अधिक आहे. 75 टक्के विश्वासार्हतेच्या तुलनेत सरासरी उपलब्धता दीडपट आहे.

$$\frac{\text{10 टक्के उपलब्धता}}{\text{90 टक्के उपलब्धता}} = 3.49 \qquad \frac{\text{50 टक्के उपलब्धता}}{\text{90 टक्के उपलब्धता}} = 2.18$$

$$\frac{\text{50 टक्के उपलब्धता}}{\text{75 टक्के उपलब्धता}} = 1.42$$

सारणी 4.2 (चालू)

**मांजरा प्रकल्पातील उपलब्ध येवा**

येवा - दलघमी

| अक्र | वर्ष | उपयुक्त साठा |
|---|---|---|
| 1 | 1982 | 8 |
| 2 | 1983 | 136 |
| 3 | 1984 | 145 |
| 4 | 1985 | 53 |
| 5 | 1986 | उना |
| 6 | 1987 | 84 |
| 7 | 1988 | 173 |
| 8 | 1989 | 173 |
| 9 | 1990 | 173 |
| 10 | 1991 | 74 |
| 11 | 1992 | 173 |
| 12 | 1993 | 173 |
| 13 | 1994 | 31 |
| 14 | 1995 | उना |
| 15 | 1996 | 173 |

टीप : मांजरा प्रकल्पाची साठवण क्षमता =173 दलघमी

निष्कर्ष : 15 वर्षात जलाशय केवळ 6 वेळेला भरला

## सारणी: 4.3
## प्रकल्पांची सद्यस्थिती

चलपाणीसाठा - दलघमी
पाणीवापर - दलघमी
सिंचनक्षेत्र - हेक्टर

| अक्र | प्रकल्पाचा संवर्ग | पूर्ण झालेले प्रकल्प | | | | प्रगतीपथावरील प्रकल्प | | | | भविष्यकालीन प्रकल्प | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 1 | मोठे | मांजरा | 184 | 256 | 18233 | निम्नतेरणा | 100 | 159 | 15587 | | | | | | 284 | 414 | 33820 |
| | | मानार | 129 | 243 | 23310 | लेंडी | 159 | 100 | 15789 | | | | | | 288 | 343 | 39099 |
| | | 2 | 313 | 499 | 41543 | 2 | 259 | 258 | 31376 | | | | | 4 | 572 | 758 | 72919 |
| 2 | मध्यम | सांगवी | 6 | 8 | 1943 | संगमेश्वर | 16 | 18 | 3350 | | | | | | 22 | 26 | 5293 |
| | | अप्परतेरणा | 19 | 26 | 2178 | देवर्जन | 12 | 11 | 2419 | | | | | | 31 | 37 | 4597 |
| | | घरणी | 22 | 28 | 2834 | बोकर्णी | 9 | 9 | 1458 | | | | | | 31 | 37 | 4292 |
| | | तावरजा | 17 | 29 | 3078 | साकोळ | 11 | 13 | 2064 | | | | | | 28 | 42 | 5142 |
| | | बाभुळगांव | 4 | 4 | 769 | मसलगा | 9 | 15 | 3000 | | | | | | 13 | 20 | 3769 |
| | | गिरकचाळ | 6 | 6 | 4047 | काजळा | 10 | 8 | 2610 | | | | | | 16 | 14 | 6657 |
| | | रूई | 9 | 11 | 1902 | रेणापूर | 36 | 23 | 4856 | | | | | | 45 | 34 | 6758 |
| | | औरादशहाजनी | 12 | 15 | 883 | अप्परमानार | 68 | 65 | 6862 | | | | | | 80 | 80 | 7745 |
| | | रायगव्हाण | 12 | 14 | 2712 | जामखेड | 11 | 13 | 1429 | | | | | | 23 | 27 | 4141 |
| | | वडाळा | 5 | 6 | 1184 | | | | | | | | | | 5 | 6 | 1184 |
| | | सारोळा | 3 | 5 | 717 | | | | | | | | | | 3 | 5 | 717 |
| | | तिरू | 15 | 27 | 2348 | | | | | | | | | | 15 | 27 | 2348 |

चलपाणीसाठा - दलघमी

पाणीवापर - दलघमी

सिंचनक्षेत्र - हेक्टर

| अक्र | प्रकल्पाचा संवर्ग | पूर्ण झालेले प्रकल्प | | | | प्रगतीपथावरील प्रकल्प | | | | भविष्यकालीन प्रकल्प | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| | | कुंद्राळ | 10 | 19 | 1012 | | | | | | | | | | 10 | 19 | 1012 |
| | | करडखेड | 11 | 17 | 1122 | | | | | | | | | | 11 | 17 | 1122 |
| | | महालिंगी | 3 | 6 | 820 | | | | | | | | | | 3 | 6 | 820 |
| | | पेठवडज | 9 | 12 | 1477 | | | | | | | | | | 9 | 12 | 1477 |
| | | व्हटी | 8 | 12 | 1358 | | | | | | | | | | 8 | 12 | 1358 |
| | | वाकी | 6 | 7 | 1158 | | | | | | | | | | 6 | 7 | 1158 |
| | | 18 | 179 | 250 | 31542 | 9 | 182.99 | 175 | 28048 | 0 | 0 | 0 | 0 | 27 | 362 | 425 | 59590 |
| 3 | लघु | 684 | 279 | 328 | 64984 | 334 | 122 | 144 | 29525 | 84 | 17 | 20 | 4791 | 1102 | 418 | 492 | 99300 |
| | एकूण | 704 | 771 | 1077 | 138069 | 345 | 564 | 577 | 88949 | 84 | 17 | 20 | 4791 | 1133 | 1351 | 1675 | 231809 |

सारणी 4.4

**जलसंपत्तीचा ताळेबंद**

जलसंपत्ती - दलघमी

| अक्र | उपलब्धता | | अक्र | वापर (सन2030) | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **भूपृष्ठावरील** | | 4 | **भूपृष्ठावरील** | |
| | अ) नैसर्गिक | | | अ) घरगुती वापरासाठी | |
| | 1) 75 टक्के विश्वासार्हतेने | 1488 | | 1) नागरी | 92 |
| | 2) 50 टक्के विश्वासार्हतेने | 2598 | | 2) ग्रामीण | 101 |
| | 3) सरासरीने | 3770 | | 3) पशुधन | 50 |
| | 4) नियोजनासाठी | 1547 | | एकूण – (4 अ) | 243 |
| | ब) मानवप्रबंधित | | | ब) उद्योगधंदयासाठी | 25 |
| | 1) नागरी वापरातून पुनरुद्भव (80 %) | 74 | | एकूण सिंचनेतर वापर | 268 |
| | 2) उद्योग धंदयातील पुनरुद्भव (97.5%) | 24 | 5 | इतर उपखोऱ्यात स्थलांतरीत पाणी | 174 |
| | 3) इतर खोऱ्यातून संक्रमित झालेले पाणी | 0 | 6 | सिंचनासाठी उपलब्ध भूपृष्ठावरील पाणी (1547+98-268-174+111) | 1314 |
| | **एकूण (1 ब)** | 98 | | | |
| 2 | **मानवनिर्मित** | | | | |
| | लाभक्षेत्रातील पुनर्भरण (1547-268-174=1105) च्या10 % | 111 | | | |
| 3 | एकूण उपलब्धता [1547+98+120] | 1756 | 7 | एकूण वापर | 1756 |
| | 1) भूजल उपलब्धता (वार्षिक एकूण पुनर्भरण ) | 1719 | | अ) भूजलाचा सध्याचा सिंचनासाठी वापर | 430 |
| | 2) भूजल वापरास मुभा ( 1719 च्या 65 %) | 1117 | | | |

टीपा : 1) भूजल उपलब्धतेमुळे उपखोऱ्याच्या एकूण उपलब्धतेत वाढ होणार नाही ; भूजलाचा जेवढा उपसा होईल तेवढा नदी प्रवाह घटत जाईल म्हणून एकूण उपलब्धतेचा आकडा काढताना भूजल उपलब्धतेचा विचार घेतलेला नाही.

2) संकलीत अंदाजासाठी सर्व पाण्याचा उपयोग भूपृष्ठावरील पाण्यातून दाखविला आहे. पण एकूण वापरापैकी अधिकाधिक 1117+111= 1228 भूजल माध्यमातून शक्य आहे.

3) पाणीवापराचे नियोजन उपलब्ध येवा मालिकेवर आधारित आहे.

नकाशा - 4.1




| उपखोऱ्याचे स्थान | उपखोरे क्र. | उपखोऱ्यांची नावे |
|---|---|---|
| 2 | 2 | गोदावरी निम्न स्रोत |
| 19 कर्नाटक | 19 | सीना – बोरी – बेनेतुरा |

महाराष्ट्र जल व सिंचन आयोग

## मांजरा उपखोरे

जून 1999

# उपखोरे : 5
# गोदावरी उर्वरीत

## 1.0 भौगोलिक तपशील

या उपखोऱ्यामध्ये नांदेड जिल्ह्यातील स्वर्णा व सुधा या दोन नद्यांचा समावेश (नकाशा 5.1) आहे. या उपखोऱ्याचे क्षेत्रफळ 693 चौकिमी असून नांदेड जिल्ह्यातील खालील तालूक्यांचे क्षेत्र येते.

**नांदेड :** 1) हदगाव 2) भोकर

मुख्यनद्यांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

लांबी-किमी, तलांक-मी

| मुख्यनद्या | लांबी | उगमस्थान | | संगमस्थान | |
|---|---|---|---|---|---|
| | | ठिकाण | तलांक | ठिकाण | तलांक |
| स्वर्णा | 21* | तालुका भोकर | 527 | आंध्र प्रदेशात म्हैशाजवळ सुधा नदीस | 469 |
| सुधा | 36* | आमदरी तालुका भोकर | 342 | कोंडाळी, जिल्हा आदिलाबाद आंध्रप्रदेशात गोदावरी नदीस . | 320 |

1.2 <u>विस्तार</u> :- या उपखोऱ्याचा क्षेत्रीय विस्तार अक्षांश 19° 05′ ते 19°18′ उत्तर व रेखांश 77°35′ ते 78°15′ पूर्व यामध्ये आहे.

1.3 <u>चतु:सीमा</u> : उपखोऱ्याच्या चतु:सीमा खालील प्रमाणे आहेत.

| अक्र | दिशा | तपशील |
|---|---|---|
| 1 | उत्तर | हदगाव तालुका, पैनगंगा उपखोरे क्र.6 |
| 2 | पूर्व | आंध्रप्रदेश |
| 3 | पश्चिम | नांदेड व भोकर तालुके आणि आंध्रप्रदेश |
| 4 | दक्षिण | बिलोली तालुका व आंध्रप्रदेश |

## 2.0 हवामान

या उपखोऱ्यातील क्षेत्र मध्यम पावसाच्या प्रदेशात येते. साधारणत: 90 टक्के पाऊस नैऋत्य मोसमी वाऱ्यामुळे जून ते सप्टेंबर या कालावधीत, 6 टक्के पाऊस ईशान्य मोसमी वाऱ्यामुळे सप्टेंबर ते डिसेंबर या कालावधीत व 4 टक्के पाऊस डिसेंबर नंतर पडतो. महाराष्ट्राच्या पठारी प्रदेशाच्या तुलनेत या क्षेत्राचे पर्जन्यमान उत्तम आहे व विचलनहि कमी आहे. शिवाय येथील जमिनीहि चांगल्या सुपीक आहेत. वार्षिक सरासरी पर्जन्यमान 1044 मिमी आहे. या उपखोऱ्यातील हवामानविषयक इतर बाबी, पर्जन्यमानातील दोलायमानता इत्यादी पुढील प्रमाणे आहे.

---

* महाराष्ट्रातील उपखोऱ्याच्या मर्यादित

पर्जन्य-मिमी; तपमान-अंश से.

| अक्र | वैशिष्ठये | परिमाण | वर्ष व महिना | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1 | सर्वात अधिक पाऊस | 2286 | 1988 | भोकर |
| 2 | सर्वात अधिक तपमान | 46.60 | मे-1964 | नांदेड |
| 3 | सर्वात कमी तपमान | 7.0 | जानेवारी-1993 | नांदेड |

टीप : उपखोऱ्यातील सर्वात अधिक व सर्वात कमी तपमानाची नोंद उपलब्ध नसल्यामूळे जवळच्या नांदेड येथील सर्वात अधिक व सर्वात कमी तपमान दर्शविले आहे.

कृषि हवामान वर्गीकरणानूसार या उपखोऱ्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

8-मध्यम ते साधारण जास्त पावसाचा विभाग (MR).

या उपखोऱ्याच्या क्षेत्राचा पर्जन्यमानातील दोलायमानता गुणाक 38 (तक्ता 2.5.8)आहे.

पर्जन्यमापन केंद्राचा तपशील

पर्जन्यमान- मिमी

| अक्र | केंद्राचे नाव | प्रकार | स्वामित्व | आधारसामुग्री उपलब्धीचा कालावधी | वार्षिक सरासरी पर्जन्यमान |
|---|---|---|---|---|---|
| 1 | भोकर | सा.प. | महसूल खाते | 1951-52 ते 1994-95 | 1044 |

पर्जन्यमानाचा माहवार तपशील सारणी 5.1 मध्ये दर्शविला आहे.

2.1 <u>बाष्पीभवन :</u> या उपखोऱ्यातील सर्वात अधिक बाष्पीभवन मे महिन्यात 251 मिमी तर सर्वात कमी बाष्पीभवन डिसेंबर महिन्यात 127 मिमी होते. माहवार तपशील सारणी 5.1 मध्ये दर्शविला आहे.

**3.0 जलसंपत्तिची उपलब्धता**

3.1 <u>भुपृष्ठीय जलसंपत्ति</u>: या उपखो-यातील एकूण सरासरी येवा 274 दलघमी आहे.

वर्ष 1955 ते 1994 या 40 वर्षाची माहिती आधारभूत धरून काढलेली पाण्याची उपलब्धता खालील प्रमाणे आहे-

| | |
|---|---|
| 75 % विश्वासार्हतेने | 135 दलघमी |
| 50 % विश्वासार्हतेने | 216 दलघमी. |

वेगवेगळ्या विश्वासार्हतेच्या येव्यांची काही मर्यादित माहिती सारणी 5.2 मध्ये दिली आहे.

3.2 <u>भूशैलीय रचना</u>

<u>भुपृष्ठीय स्थिति (भूरुप वर्णन )</u>: उपखोऱ्यातील भूभाग साधारण 38 टक्के अतिविच्छेदीत व डोंगराळ, 61 टक्के पटारी व 1 टक्का सपाट व नदीलगतच्या गाळाचा आहे. यात भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा निर्देशित 2 पाणलोट क्षेत्रे आहेत मर्यादित क्षेत्रविस्तारामुळे या उपखोऱ्याचा विकास मुख्यतः पाणलोट क्षेत्र विकासाच्या तत्वांच्या आधारानेच करावा लागेल. रचना विकासाच्या दृष्टीने येथे सर्व नैसर्गिक अनुकूलता आहे.

भूपृष्ठीय शैलस्थिति : उपखोऱ्यात मुख्यत्वे लाव्हा थरांपासून तयार झालेला बहुस्तरीय दक्षिणी कातळ खडक (डेक्कन ट्रॅप प्रस्तर) आढळतो. त्यात मुख्यत्वे अकुहरी बेसाल्टचे प्रमाण अधिक आहे.

3.3 भूजल संपत्ति : भूजल संपत्ति मुख्यत्वे भूरुपावरच अवलंबून असून भूजल धारक प्रस्तर विघटीत भागापूरताच मर्यादित आहे. अति विच्छेदीत डोंगराळ व पठारी भागाचे प्रमाण जास्त असून त्यात विघटीत प्रस्तराची जाडी कमी असून भूजल संपत्तिस मर्यादा आहेत.

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या 1990 च्या भूजल अंदाजानुसार एकूण पुनर्भरण (सिंचित क्षेत्रातील भरीसकट) 66 दलघमी असून सिंचनाखालील (उघडया) विहिरींची संख्या 1400 आहे.

भूजल विकासास वाव असून विहिरींचा कार्यक्रम राबविण्यासाठी अतिरिक्त पुनर्भरणाची जोड देणे गरजेचे आहे.

3.4 अवर्षणप्रवण क्षेत्र : या उपखोऱ्याचे क्षेत्र 2 तालुक्यात पसरले असून त्यापैकी भोकर हा तालुका सुकठणकर समिती च्या अहवालानंतर शासनाने अवर्षणप्रवण घोषित केला आहे. यात तालुक्याचे 600 हेक्टर क्षेत्र व 1 लक्ष 2 हजार लोकसंख्या येते. सरासरी पर्जन्यमान 1044 मिमी आहे.

## 4.0 जमिनीचा तपशील

या उपखोऱ्यातील जमीन बेसाल्ट दगडापासून बनलेली आहे. व जमिनीची उत्पादन क्षमता एकंदरीने चांगली आहे. जमिनीचे सविस्तर वर्गीकरण पुढीलप्रमाणे आहे.

| अक्र | तपशील | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | भरड उथळ जमीन | 10 |
| 2 | लालसर (संमिश्र) जमीन | 20 |
| 3 | मध्यम काळी जमीन | 70 |

## 5.0 जमिनीचा वापर

लागवडीयोग्य, वन खात्याच्या ताब्यातील क्षेत्र, पडीक क्षेत्र इत्यादी बाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

क्षेत्र - हजार हेक्टर

| अक्र | वापर | क्षेत्र | भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | भौगोलिक क्षेत्र | 69 | |
| 2 | वन खात्याच्या ताब्यातील क्षेत्र | 7 | 10.2 |
| 3 | पेरणीसाठी उपलब्ध नसलेले क्षेत्र | | |
| | अ) ओसाडी क्षेत्र (पडीक) | 1 | 1.4 |
| | ब) बिगर शेती उपयोगा करीता असलेली जमीन | 2 | 2.9 |
| 4 | मशागतयोग्य पडीक जमीन | 2 | 2.9 |
| 5 | कायमची व चराऊ कुरणे | 4 | 5.8 |
| 6 | किरकोळ झाडेझुडपे यांच्या समुहाखालील क्षेत्र | --- | |
| 7 | चालू पडीक जमीन | 4 | 5.8 |

| | | | |
|---|---|---|---|
| 8 | इतर पडीक जमीन | 1 | 1.4 |
| 9 | पेरणीचे निव्वळ क्षेत्र | 48 | 69.6 |
| 10 | लागवडीयोग्य क्षेत्र (4+5+6+7+8+9) | 59 | 86 |
| 11 | दुसोटा क्षेत्र | 4 | |
| 12 | पिकाखालील एकूण क्षेत्र (9+11) | 52 | |
| 13 | पीक घनता (12÷9×100) | 108 | |

**6.0 लोकसंख्या व पशुधन**

6.1 लोकसंख्या : सन1991 च्या जनगणनेनुसार या उपखोऱ्यातील एकूण लोकसंख्या 1 लक्ष 20 हजार आहे. सन 2030 पर्यंत होणारी लोकसंख्येतील वाढ व लोकसंख्या घनता पुढीलप्रमाणे अपेक्षित आहे. या उपखोऱ्यात नागरी लोकसंख्या नाही. पूर्णतः ग्रामीण क्षेत्र असलेले हे उपखोरे आहे.

लोकसंख्या-हजारात, घनता-प्रति चौकिमी

| अक्र | लोकसंख्या तपशील | 1991 | 2030 |
|---|---|---|---|
| 1 | नागरी | | |
| 2 | ग्रामीण | 120 | 240 |
| 3 | एकूण | 120 | 240 |
| 4 | लोकसंख्या घनता | 176 | 346 |

6.2 पशुधन : सन 1992 च्या गणनेनुसार या उपखोऱ्यात एकूण पशूधन 91484 आहे पशूंची वर्गनिहाय संख्या पुढील प्रमाणे आहे.

| म्हैस व रेडे | एकखूरी व उंट | गाय व बैल | डूकरे | शेळी-मेंढी | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| 15620 | 815 | 46804 | 888 | 27357 | 91484 |

6.3 इतर तपशील : उपखोऱ्यातील शेत मजुरांची संख्या 44530 आहे.

**7.0 पाणी वापर**

7.1 सिंचनासाठी वापर: उपखोऱ्यात मोठया व मध्यम प्रकल्पास वाव नाही.बृहत् लघु प्रकल्पांची संख्या, पाणीसाठा, पाणीवापर, सिंचन क्षेत्र यांची; तसेच पूर्ण झालेले, प्रगतिपथावरील व भविष्यकालिन प्रकल्प याची तपशीलवार माहिती सारणी 5.3 मध्ये दिली आहे.पूर्ण झालेल्या प्रकल्पांची निर्मित सिंचन क्षमता 3257 हेक्टर असून त्याच्यातील प्रस्तावित पाणीवापर 15 दलघमी आहे म्हणजे सध्याच तो उपखोऱ्याच्या वापरासाठी उपलब्धीच्या तुलनेत 42 टक्के आहे. सिंचनासाठी आणखी 2138 हेक्टर क्षेत्र उपलब्ध होऊ शकते; पण त्यासाठी सध्याच्या पाणीवापर पध्दतीप्रमाणे एकूण पाणी वापर 13 दलघमी लागेल. पाण्याच्या बचतीचे व काटकसरी पध्दतीचे ठिबक सिंचनासारखे आधुनिक उपाय वापरल्याशिवाय सिंचन क्षेत्राचा विस्तार शक्य दिसत नाही.

7.2 सिंचनेतर पाण्याचा वापर : सिंचनेतर उपयोगासाठी या उपखो-यातील सध्याची गरज 5 दलघमी आहे सन 2030 पर्यंतची ती 9 दलघमी होईल.म्हणजे वापरास उपलब्ध येव्याच्या

जवळ जवळ 28 टक्के होईल. यात उद्योगिकरणासाठी लागणाऱ्या 1 दलघमी पाण्याचा समावेश आहे.

पाण्याची गरज - दलघमी

| अक्र | तपशील | 1991 | | | | 2030 |
|---|---|---|---|---|---|---|
| | | नागरी | ग्रामीण | पशूधन | एकूण | |
| 1 | घरगुती वापरासाठी | - | 2 | 2 | 4 | 8 |
| 2 | उद्योगासाठी | | | | 1 | 1 |
| | एकूण | | | | 5 | 9 |

7.3 जलसंपत्तिचा ताळेबंद : एकूण (भूपृष्ठावरील व भूपृष्ठाखालील) आणि घरगुती वापरासाठी व सिंचनासाठी पाणी वापर, यातून होणारा पूनरुदभव याचा ताळेबंद सारणी 5.4 मध्ये दिला आहे.

7.4 लाभक्षेत्र विकास : उपखोऱ्यात लाभक्षेत्र विकासाची कामे झालेली नाहीत.

7.5 सन 1970 पूर्वीची धरणे : उपखोऱ्यात सन 1970 पूर्वी एकही धरण झालेले नाही.

**8.0 पीक रचना**

उपखोऱ्यात पेरणी खालचे क्षेत्र 48 हजार हेक्टर आहे.काही प्रमुख पिकाची दर हेक्टरी सरासरी उत्पादकता पुढीलप्रमाणे आहे.

उत्पादकता-क्विंटल/हेक्टर

| अक्र | प्रमुख पिके | उत्पादकता |
|---|---|---|
| 1 | खरीप ज्वारी | 16.25 |
| 2 | कापूस | 1.06 |

**9.0 उद्योगधंदे**

उपखोऱ्यात कृषिआधारित प्रमुख उद्योगधंदे नाहीत.

**10.0 जलविद्युत निर्मिति**

उपखोऱ्यात जलविद्युत प्रकल्प नाहीत.

**11.0 दळणवळणाची साधने**

उपखोऱ्यातून खालील राज्य महामार्ग जातात.

| अक्र | मार्ग | मार्गाचे नाव | मार्ग क्र. |
|---|---|---|---|
| 1 | राष्ट्रीय महामार्ग नाहीत. | | |
| 2 | राज्य महामार्ग | नांदेड - भोकर - म्हैसा | 2 |
| | | भोकर - मुदखेड | 230 |
| | | भोकर - हदगाव | 229 |
| | | भोकर - हिमायतनगर - किनवट | 230 |

**12.0 भावी नियोजनाची दिशा :**

12.1 उपखोऱ्यातील जलसंपत्तिची सरासरी उपलब्धता 274 दलघमी आहे. गोदावरी लवादानुसार या उपखोऱ्यात वापरास मुभा खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | पोचमपाडचे वर गोदावरी खोऱ्यात 6.10.75 पूर्वीचा मंजूर पाणी वापर | 12 दलघमी |
| 2. | 1698 दलघमी पैकी या भागाचा हिस्सा | 13 दलघमी |
| 3. | पोचमपाडचे खाली राज्याचा लवादानुसार हिस्सा | 11 दलघमी. |

अशा प्रकारे 36 दलघमी भूपृष्ठावरील प्रवाही पाणी वापरास उपलब्ध आहे. उपखोऱ्यातील सध्याची पाण्याची साठवणूक 13 दलघमी आहे. लवादानुसार उपलब्ध झालेल्या पाण्याचा वापर करण्यासाठी किमान 25 ते 30 टक्के जास्त साठा निर्माण करण्याची गरज आहे. त्यानुसार अतिरिक्त साठवणुकीचा फेरविचार करण्याची गरज आहे.

12.2 उपखोऱ्यातील येव्यामध्ये तीव्र दोलायमानता आहे. हे सारणी 5.2 वरून दिसते.10 टक्के उपलब्धता व 90 टक्के उपलब्धता (म्हणजे एकांतिक अतिपावसाची व अति अवर्षणाची वर्षे सोडून असलेली उपलब्धता) यातील गुणक जवळ जवळ 4.85 आहे.90 टक्के उपलब्धता व 50 टक्के उपलब्धता यातील गुणक 2.23 आहे. पण 75 टक्के व 50 टक्के उपलब्धता यातील गुणक मात्र केवळ 1.6 आहे. याचाच अर्थ 50 टक्केहून कमी उपलब्धतेच्या पाण्याच्या वापराचा विचार अनुकूल पाण्याच्या वर्षासाठी या उपखोऱ्यात होणे आवश्यक आहे. विशेषतः इ.स. 1988,1983,1959 या चांगल्या वर्षाच्या पाण्याच्या उपलब्धतेचे समृध्दीत रुपांतर करता यायला हवे किंवा 1981,1983,1988,1990 या अवर्षणापाठोपाठ येणाऱ्या अनुकूल वर्षाच्या उत्पादनातील घट भरून काढण्यासाठी अधिकाधिक उपयोग करता यायला हवा. या दृष्टीने या उपखोऱ्याच्या पाण्याचे फेरनियोजन तात्काळ हाती घेणे आवश्यक आहे. वाईट वर्षे सलगपणे येताना दिसतात (उदा-1967,1968 व 1971,1972) या तुटीच्या वर्षाचेही भान ठेवून तुटीच्या वर्षामध्ये अर्थव्यवस्था विस्कळीत होणार नाही अशी व्यवस्था करायला हवी. आर्थिक लाभव्ययाच्या प्रमाणाची मर्यादा जिथपर्यन्त परवानगी देईल तिथपर्यन्त कमी विश्वासार्हतेचे (सरासरी पेक्षाही खाली) पाणी वापरणे हितावह राहणार आहे. पाण्याच्या साठवणीचा या दृष्टीने फेरविचार व्हायला हवा.

12.3 उपखोऱ्यात वन खात्याच्या ताब्यातील क्षेत्र 10 टक्के आहे. या वनामध्ये सागवानाचे प्रमाण जास्त आहे. सागवानापासून विनियर बनविण्याचा उद्योग या भागात सुरू केल्यास स्थानिक रोजगार निर्माण होईल व या भागातून इतरत्र होणारे मजुरांचे स्थलांतर थांबेल.

12.4 उपखोऱ्यातील वनामध्ये बिब्बा, बेहडा,पळस, मोह,निंब अशी अत्यंत मूल्यदायी जंगलवृक्ष व चिंच, बोर अशी रान फळझाडे आहेत. त्यांच्यावर प्रक्रिया करण्याचे उद्योग या भागात उभारुन त्यांचे मूल्यदायी दुय्यम उत्पादनात रुपांतर करण्यास वाव आहे.

12.5 उपखोऱ्यातील प्रमुख पिके खरीप ज्वारी व कापूस ही आहेत. कापसावर प्रक्रिया करणारे उद्योग जसे, जिनिंग, प्रेसिंग, विव्हींग इत्यादी उभारण्यास वाव आहे. या उद्योग उभारणीमुळे स्थानिक रोजगाराचा प्रश्न काही प्रमाणात सुटेल.

सारणी:5.1

**माहवार सरासरी पर्जन्यमान व बाष्पीभवन**

पर्जन्यमान, बाष्पीभवन-मिमी

| अक्र | महिना | पर्जन्यमान | बाष्पीभवन |
|---|---|---|---|
| 1 | जानेवारी | 6 | 140 |
| 2 | फेब्रूवारी | 13 | 157 |
| 3 | मार्च | 8 | 204 |
| 4 | एप्रिल | 13 | 228 |
| 5 | मे | 6 | 251 |
| 6 | जून | 278 | 197 |
| 7 | जुलै | 278 | 146 |
| 8 | ऑगस्ट | 190 | 143 |
| 9 | सप्टेंबर | 195 | 148 |
| 10 | ऑक्टोबर | 34 | 160 |
| 11 | नोव्हेंबर | 19 | 140 |
| 12 | डिसेंबर | 4 | 127 |
| | एकूण | 1044 | 2041 |

**हंगामनिहाय बाष्पीभवनाचा तपशील**

बाष्पीभवन - मिमी

| अक्र | हंगाम | बाष्पीभवन |
|---|---|---|
| 1 | खरीप | 714 |
| 2 | रब्बी | 644 |
| 3 | उन्हाळी | 683 |
| | एकूण | 2041 |

सारणी: 5.2

**जलसंपत्तीची उपलब्धता**

येवा - दलघमी

| अ.क्र. | वर्ष | वार्षिक येवा | उतरत्या क्रमाने वार्षिक येवा | संगत वर्ष | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1955 | 483 | 1346 | 1988 | |
| 2 | 1956 | 268 | 799 | 1983 | |
| 3 | 1957 | 7390 | 727 | 1959 | |
| 4 | 1958 | 410 | 485 | 1963 | 10 |
| 5 | 1959 | 727 | 483 | 1955 | |
| 6 | 1960 | 136 | 452 | 1990 | |
| 7 | 1961 | 431 | 434 | 1962 | |
| 8 | 1962 | 434 | 431 | 1961 | 20 |
| 9 | 1963 | 485 | 429 | 1981 | |
| 10 | 1964 | 201 | 410 | 1958 | |
| 11 | 1965 | 177 | 399 | 1957 | |
| 12 | 1966 | 145 | 365 | 1973 | 30 |
| 13 | 1967 | 113 | 278 | 1970 | |
| 14 | 1968 | 108 | 268 | 1966 | |
| 15 | 1969 | 208 | 264 | 1975 | |
| 16 | 1970 | 278 | 247 | 1982 | |
| 17 | 1971 | 71 | 231 | 1978 | |
| 18 | 1972 | 20 | 228 | 1980 | |
| 19 | 1973 | 365 | 225 | 1976 | |
| 20 | 1974 | 100 | 223 | 1989 | 50 |
| 21 | 1975 | 264 | 208 | 1969 | |
| 22 | 1976 | 225 | 201 | 1964 | |
| 23 | 1977 | 156 | 198 | 1979 | |
| 24 | 1978 | 231 | 177 | 1965 | |
| 25 | 1979 | 198 | 174 | 1986 | |
| 26 | 1980 | 228 | 173 | 1993 | |
| 27 | 1981 | 429 | 156 | 1977 | |
| 28 | 1982 | 247 | 145 | 1966 | |
| 29 | 1983 | 799 | 142 | 1992 | 75 |
| 30 | 1984 | 57 | 142 | 1985 | |
| 31 | 1985 | 142 | 136 | 1960 | |
| 32 | 1986 | 174 | 134 | 1987 | |
| 33 | 1987 | 134 | 113 | 1967 | |
| 34 | 1988 | 1346 | 109 | 1994 | |
| 35 | 1989 | 223 | 108 | 1968 | |
| 36 | 1990 | 452 | 100 | 1974 | 90 |
| 37 | 1991 | 26 | 71 | 1971 | |
| 38 | 1992 | 142 | 57 | 1984 | |
| 39 | 1993 | 173 | 26 | 1991 | |
| 40 | 1994 | 109 | 39 | 1972 | |
| | | सरासरी | 283 | | |

10 टक्के उपलब्धता / 90 टक्के उपलब्धता = 4.85

50 टक्के उपलब्धता / 90 टक्के उपलब्धता = 2.23

50 टक्के उपलब्धता / 75 टक्के उपलब्धता = 1.57

सारणी : 5.3

## प्रकल्पांची सद्यस्थिती

चलपाणीसाठा - दलघमी

पाणीवापर - दलघमी

सिंचनक्षेत्र - हेक्टर

| अक्र | प्रकल्पाचा संवर्ग | पूर्ण झालेले प्रकल्प | | | | प्रगतीपथावरील प्रकल्प | | | | भविष्यकालीन प्रकल्प | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 1 | मोटे | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 2 | मध्यम | | | | | | | | | | | | | | 0 | 0 | 0 |
| 3 | लघु | धानोरा | 2.82 | 3.66 | 627 | रेणापूर | 7.95 | 8.67 | 950 | | | | | | 10.77 | 12.33 | 1577 |
| | | आमठाणा | 1.23 | 1.47 | 344 | कडदेव | 0.88 | 0.96 | 159 | वाकी | 2.09 | 2.55 | 390 | | 4.2 | 4.98 | 893 |
| | | भुरभुशी | 1.14 | 1.48 | 227 | | | | | | | | | | 1.14 | 1.48 | 227 |
| | | किनी | 2.19 | 2.48 | 688 | | | | | | | | | | 2.19 | 2.48 | 688 |
| | | खांडली को | 1.254 | 1.5 | 300 | | | | | | | | | | 1.254 | 1.5 | 300 |
| | | रावणगांव को | 0.77 | 0.25 | 380 | | | | | वंजारवाडी | 0.89 | 1.05 | 200 | | 1.66 | 1.3 | 580 |
| | | लामकानी | 2.9 | 3.32 | 522 | | | | | कोरुमेर | 1.43 | 1.65 | 127 | | 4.33 | 4.97 | 649 |
| | | थोरा | 1.02 | 1.1 | 169 | | | | | वंजारा | 1.76 | 2.2 | 312 | | 2.78 | 3.3 | 481 |
| | **एकूण** | 8 | 13.324 | 15.26 | 3257 | 2 | 8.83 | 9.63 | 1109 | 4 | 6.17 | 7.45 | 1029 | 14 | 28.32 | 32.34 | 5395 |

## सारणी : 5.4

## जलसंपत्तीचा ताळेबंद

जलसंपत्ती - दलघमी

| अक्र | उपलब्धता | | अक्र | वापर (सन2030) | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | भूपृष्ठावरील | | 4 | भूपृष्ठावरील | |
| | अ) नैसर्गिक | | | अ) घरगुती वापरासाठी | |
| | 1) 75 टक्के विश्वासार्हतेने | 135 | | 1) नागरी | |
| | 2) 50 टक्के विश्वासार्हतेने | 216 | | 2) ग्रामीण | 5 |
| | 3) सरासरीने | 274 | | 3) पशुधन | 3 |
| | 4) नियोजनासाठी | 36 | | एकूण | 8 |
| | ब) मानवप्रबंधित | | | ब) उद्योगधंदयासाठी | 1 |
| | 1) नागरी वापरातून पुनरुद्भव (80 %) | 0 | | एकूण सिंचनेतर वापर | 9 |
| | 2) उद्योग धंदयातील पुनरुद्भव (97.5%) | 0 | 5 | इतर उपखोऱ्यात स्थलांतरीत पाणी | |
| | 3) इतर खोऱ्यातून संक्रमित झालेले पाणी | 0 | 6 | सिंचनासाठी उपलब्ध भूपृष्ठावरील पाणी(36-9+3) | 30 |
| | एकूण (1 ब) | 0 | | | |
| 2 | मानवनिर्मित<br>लाभक्षेत्रातील पुनभरण (36-9=27) च्या10 % | 3 | | | |
| 3 | एकूण उपलब्धता [36+3] | 39 | 7 | एकूण वापर | 39 |

1) भूजल उपलब्धता (वार्षिक एकूण पुनर्भरण) 66 — अ) भूजलाचा सध्याचा सिंचनासाठी वापर 10

2) भूजल वापरास मुभा ( 66 च्या 65 %) 43


टीपा : 1) भूजल उपलब्धतमुळे उपखोऱ्याच्या एकूण उपलब्धतेत वाढ होणार नाही ; भूजलाचा जेवढा उपसा होईल तेवढा नदी प्रवाह घटत जाईल म्हणून एकूण उपलब्धतेचा आकडा काढतांना भूजल उपलब्धतेचा विचार घेतलेला नाही.

2) संकलीत अंदाजासाठी सर्व पाण्याचा उपयोग भूपृष्ठावरील पाण्यातून दाखविला आहे. पण एकूण वापरापैकी अधिकाधिक 43+3= 46 भूजल माध्यमातून शक्य आहे.


3) पाणीवापराचे नियोजन उपलब्ध येवा मालिकेवर आधारित आहे.

4) उद्योगधंद्यासाठी पाणीवापर फक्त 1 दलघमी असल्यामुळे उद्योगधद्यातील पुनरुद्भव धरला नाही.

नकाशा - 5.1





3 Km 0 3 6 Km




• संदर्भ सूची •

1. राज्य सरहद्द
2. जिल्हा सरहद्द
3. तालुका सरहद्द
4. उपखोरे सरहद्द
5. जिल्हा मुख्यालय
6. तालुका मुख्यालय
7. रेल्वे मार्ग
8. रस्ते
9. नद्या व नाले
10. समपर्जन्यमान रेषा (मिमी) 900
11. धरणाचे ठिकाण व बुडीत क्षेत्र — पूर्ण, बांधकामाधीन, भविष्यकालिन
12. औद्योगिक क्षेत्र
13. महानगरपालिका
14. नगर पालिका

| उपखोऱ्याचे स्थान | उपखोरे क्र. | उपखोऱ्यांची नावे |
|---|---|---|
|   | 2 | गोदावरी निम्न स्रोत (पैठण धरणाखाली) |
| | 6 | पैनगंगा |

**महाराष्ट्र जल व सिंचन आयोग**

## गोदावरी सुधा-स्वर्णा उपखोरे

जून 1999

# उपखोरे : 6

## पैनगंगा

### 1.0 भौगोलिक तपशील

या उपखोऱ्यात पैनगंगा ही मुख्य नदी आहे. पैनगंगा नदी अजिंठा पर्वतरांगातून माधा या कमी पावसाच्या प्रदेशातून उगम पावते. तिची महत्वाची उपनदी अडाण ही सुध्दा कमी पावसाच्या प्रदेशातून जास्त पावसाच्या प्रदेशाकडे वहात जाते. या उपखोऱ्याचे भौगोलिक क्षेत्रफळ 21462 चौकिमी आहे. उपखोऱ्यात बुलढाणा, अकोला, यवतमाळ, नांदेड, परभणी, व चंद्रपूर या जिल्ह्यातील खालील तालुक्यांचा (नकाशा 6.1) समावेश होतो.

**बुलढाणा** : 1) बुलढाणा 2) मेहकर 3) चिखली 4) लोणार 5) देऊळगावराजा 6) सिंदखेडराजा.

**अकोला** : 1) कारंजा 2) मंगरूळपीर 3) मानोरा 4) वाशीम 5) रिसोड 6) मालेगाव.

**यवतमाळ** : 1) यवतमाळ 2) दारव्हा 3) दिग्रस 4) आर्णी 5) घाटंजी 6) झरी 7) वणी 8) पुसद 9) उमरखेड 10) महागाव 11) कळंब 12) राळेगाव 13) मोरगाव 14) केळापूर 15) नेर.

**चंद्रपूर** : 1) राजूरा.

**नांदेड** : 1) हदगाव 2) किनवट.

**परभणी** : 1) सेनगाव 2) हिंगोली 3) कळमनुरी 4) वसमत 5) औंढा नागनाथ.

मुख्य नदी, तिच्या उपनद्या इत्यादी बाबतची माहिती खालील प्रमाणे आहे.

लांबी - किमी, तलांक - मी

| अक्र | नदी | उपनदी | लांबी | उगमस्थान | | संगमस्थान | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ठिकाण | तलांक | ठिकाण | तलांक |
| 1 | | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पैनगंगा | | 590 | माधा | 590 | बोथेगाव | 181 |
| 2 | | पूस | 74 | कोरड | 536 | अनंतवाडी | 269 |
| 3 | | अडाण | 124 | पारडी | 580 | चिमळा | 252 |
| 4 | | वाघाडी | 72 | भावई | 500 | सावंगी | 228 |
| 5 | | खुणी | 44 | मासद | 300 | कोराह | 213 |
| 6 | | कयाधू | 121 | अगरवाडी | 538 | भानेगाव | 393 |
| 7 | | वैदर्भ | 40 | रायपूर | 298 | मोथा कोळसा | 198 |
| 8 | | अरूणावती | 108 | मंगरूळपीरच्या दक्षिणेस | उ.ना. | खडका ता.आर्णी | उ.ना. |

1.1 विस्तार : उपखो-याचा क्षेत्रीय विस्तार अक्षांश 19°17' ते 20°32' उत्तर व रेखांश 75°57' ते 79°15' पूर्व यामध्ये आहे.

1.2 चतु:सीमा : उपखो-याच्या चतु:सीमा खालील प्रमाणे आहेत-

| अक्र | दिशा | तपशील |
|---|---|---|
| 1 | उत्तर | पूर्णा तापी उपखोरे व वर्धा उपखोरे क्र 7 |
| 2 | पूर्व | आंध्रप्रदेश, वर्धा उपखोरे क्र.7 |
| 3 | पश्चिम | पूर्णा दुधनेसह उपखोरे क्र.3, |
| 4 | दक्षिण | गोदावरी निम्नस्रोत उपखोरे क्र 2, उर्वरीत गोदावरी उपखोरे क्र 5 व आंध्रप्रदेश |

## 2.0 हवामान

या उपखो-यात साधारणतः 81 टक्के पाऊस नैऋत्य मोसमी वाऱ्यामुळे जून ते सप्टेंबर या कालावधीत, 14.5 टक्के पाऊस ईशान्य वाऱ्यामुळे सप्टेंबर ते डिसेंबर दरम्यान व उर्वरीत 4.5 टक्के पाऊस डिसेंबरनंतर पडतो. या उपखोऱ्याचे एकत्रिक वार्षिक सरासरी पर्जनमान 999 मिमी आहे. ज्या उपखोऱ्यांना 10 टक्के पेक्षा अधिक पाऊस सप्टेंबर नंतर मिळतो अशा थोडया खोऱ्यांपैकी हे एक उपखोरे आहे. त्यामुळे पिकरचनेमधे रब्बी प्रवणता अधिक आहे. या उपखोऱ्यातील हवामान, पर्जन्यमानातील दोलायमानता इ. खालील प्रमाणे आहे.

पर्जन्यमान-मिमी, तपमान - अंश.से

| अक्र | | परीमाण | वर्ष महिना | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1 | सर्वात अधिक पाऊस | 1749 | जुलै-1981 | ताउसावली |
| 2 | सर्वात अधिक तपमान | 42 | मे -1988 | अकोला |
| 3 | सर्वात कमी तपमान | 13.0 | डिसेंबर | अकोला |

कृषि-हवामान वर्गीकरणानुसार या उपखोऱ्याचा तपशील खालील प्रमाणे आहे-

7-निश्चित पावसाचा मुख्यतः खरीप पिकांचा विभाग (ARK) व 8-मध्यम ते साधारण जास्त पावसाचा विभाग (MR).

पर्जन्यमानातील दोलायमानता गुणांक 27 (तक्ता 2.5.8) आहे.सरासरी पर्जन्यमानाचा माहवार तपशील सारणी 6.1 मध्ये दिला आहे.पर्जन्यमापन केंद्रनिहाय तपशील सारणी 6.2 मध्ये दर्शविला आहे.

2.1 बाष्पीभवन : या उपखो-यातील सर्वाधिक बाष्पीभवन एप्रिल महिन्यात सरासरी 306 मिमी तर सर्वात कमी बाष्पीभवन जुलै महिन्यात सरासरी 78 मिमी होते. माहवार व हंगामनिहाय बाष्पीभवन सारणी 6.1 मध्ये दर्शविले आहे.

## 3.0 जलसंपत्तिची उपलब्धता

3.1 भूपृष्ठीय जलसंपत्ति : आधुनिक प्रणालीनुसार स्थायी स्वरुपाच्या सरिता मापन केंद्रांचा विकास हा अलीकडचा आहे. या नव्या मोजणी प्रमाणे या उपखो-यातील एकूण सरासरी येवा 5500 दलघमी आहे. वर्ष 1932 ते 1992 या 61 वर्षांच्या माहितीवर आधारभूत भूपृष्ठावरील पाण्याची उपलब्धता खालीलप्रमाणे आहे-

75 % विश्वासार्हतेने 4584 दलघमी

50 % विश्वासार्हतेने 6417 दलघमी.

वेगवेगळ्या विश्वासार्हतेच्या येव्यांची काही मर्यादित माहिती सारणी 6.3 मध्ये दिली आहे. या मोजणीत अवर्षणाची वर्षे आलेली नाहीत; त्यामुळे सरासरी उपलब्धी वास्तवात बरीच कमी राहणार आहे.

3.2 भूशैलीय रचना :

भूपृष्ठीय स्थिति(भूरूप वर्णन): उपखोऱ्यातील साधारण 27 टक्के भूभाग अतिविच्छेदीत व डोंगराळ, 67 टक्के पठारी व 6 टक्के सपाट व नदी लगतच्या गाळाचा आहे.

भूपृष्ठीय शैल स्थिति : उपखोऱ्यात विविध प्रकारचे भूस्तर आढळतात.त्यात सर्वात खाली सर्वात जुने ग्रॅनाईट नाईस त्यावर विंध्यन संघनीकृत गाळाचे खडक, त्यावर गोंडवन अर्ध संघनीकृत गाळस्तरांचे खडक त्यावर लाव्हा थरांपासून तयार झालेले बहुस्तरीय दक्षिणी कातळाचे खडक (डेक्कन ट्रॅप) व सर्वात वर नद्यांचा काठचा गाळाचा प्रस्तर.

उपखोऱ्याच्या दक्षिण पूर्वेकडील भागात पैनगंगा नदीच्या काठावरील व त्याबाजूचा अगदी थोडा भाग ग्रॅनाईट नाईसने व्यापलेला आहे.त्याच प्रमाणे उपखोऱ्यातील पूर्वेकडील (वणी, केळापूर, तालुके) भाग विध्यंन संघनीकृत गाळाचे खडकांनी (शेल, चुनखडी व सॅंडस्टोन ) व्यापलेला आहे. याचेवर व त्याच भागात गोंडवन अर्धसंघनीकृत गाळस्तरांचे खडक सुध्दा आढळतात. त्यात सॅंडस्टोन, कोळश्यांचे सस्तर, यांचा समावेश आहे. उर्वरीत भाग लाव्हा थरांनी तयार झालेल्या दक्षिणी कातळ खडकाने (डेक्कन ट्रॅप प्रस्तरांनी) व्यापलेला आहे. त्यात मुख्यत्वे अकुहरी बेसाल्ट आढळतो. पैनगंगा नदीच्या काठावर विभक्त स्वरूपात गाळाचे पट्टे आढळतात व त्यांची जाडी खुपच कमी आहे.यात संधी, तडे व भ्रंश सुध्दा आढळतात. 'कंडब' भ्रंशांचा आंध्रप्रदेशापासून महाराष्ट्रापर्यंत विस्तार असून दिशा वायव्य अग्नेय आहे. त्या व्दारे पैनगंगा व पूस नद्यांच्या प्रवाहांच्या दिशा नियंत्रीत केलेल्या आहेत.

3.3 भूजलसंपत्ति : उपखोऱ्यातील भूजलाची स्थिति वेगवेगळ्या भूस्तरांमुळे गुंतागुंतीची आहे. दक्षिणी कातळ खडकातील भूजल उपलब्धता विघट्रीत भागाबरोबरच आकूंचन संधीच्या भेगा व तडयांपूरतीच मर्यादित आहे.गोंडवन गाळस्तरातील जाड कणांच्या सॅंडस्टोन मध्ये प्राथमिक सच्छिद्रतेमुळे भूजल उपलब्धता खूप चांगली आहे. विंध्यन गाळाच्या खडकातील लाईमस्टोन व डोलोमाईट मध्ये प्राथमिक सच्छिद्रता कमी असून पोकळया तयार झालेल्या भागात मात्र भूजल उपलब्धता मूबलक आहे. ग्रॅनाईट नाईसेस मध्ये मात्र विघटीत स्तरांतच भूजल उपलब्ध होत असून त्याला ही खूप मर्यादा आहेत. भूस्तराबरोबरच भूरूपावरही भूजलाचे अस्तित्व अवलंबून आहे. अतिविच्छेदित व डोंगराळ भागात विघटीत भाग कमी असल्यामुळे भूजल उपलब्धता अल्प आहे. पठारी भागात मध्यम आणि सपाट व नदी लगतच्या भागात सर्वाधिक भूजल उपलब्धता आहे.

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या 1990 च्या भूजल अंदाजानुसार 2449 दलघमी एकूण पुर्नभरण (सिंचित क्षेत्रातील भरीसकट) असूनही विहिरींची सध्याची संख्या मात्र फक्त 0.56 लक्ष आहे. भूजल विकासाला या उपखोऱ्यांत अजून खूपच मोठा वाव आहे. उपखोऱ्यात गोंडवन गाळ स्तरांचे खडकात व काही प्रमाणात विंध्यन गाळाचे खडकात भूजल विकासास वाव आहे. त्याच प्रमाणे इतर भूस्तरात देखील विहिरी घेण्यास वाव असून कार्यक्रम राबवितांना मात्र पाणलोटशः भूजल उपलब्धी व उपशाचा संपूर्ण तपशील उपलब्ध होणे तातडीने गरजेचे आहे.

3.4 अवर्षणप्रवण क्षेत्र : या उपखो-याचे क्षेत्रफळ 35 तालुक्यात पसरले आहे. त्यापैकी 20 तालुके सुकथनकर समितीच्या अहवालानंतर शासनाने अवर्षणप्रवण घोषित केले आहेत. त्याचा तपशील सारणी 6.4 मध्ये दिला आहे.

**4.0 जमिनीचा तपशील :**

उपखो-यातील जमिनींचे वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे.

| अक्र | तपशील | टक्केवारी | अभिप्राय |
|---|---|---|---|
| 1 | भरड उथळ जमीन | 44 | पाण्याची जास्त गरज असणारी |
| 2 | मध्यम काळी जमीन | 32 | सिंचनाला अनुकूल |
| 3 | खोल काळी जमीन | 18 | सिंचन नियमनाला अवघड |
| 4 | गाळाची जमीन | 6 | |

**5.0 जमिनीचा वापरः**

लागवडीयोग्य क्षेत्र, वन खात्याच्या ताब्यातील क्षेत्र,पडीक क्षेत्र इ.बाबतची माहिती खालील प्रमाणे आहे.

क्षेत्र - हजार हेक्टर

| अक्र | जमिनीचा वापर | क्षेत्र | भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | भौगोलिक क्षेत्र | 2146 | |
| 2 | वन खात्याच्या ताब्यातील क्षेत्र | 300 | 13.9 |
| 3 | पेरणीसाठी उपलब्ध नसलेले क्षेत्र | | |
| | अ) ओसाड जमीन | 57 | 2.7 |
| | ब) बिगर शेती उपयोगा करिता आणलेली जमीन | 80 | 3.7 |
| 4 | मशागतयोग्य पडिक जमीन | 43 | 2 |
| 5 | कायमची कुरणे व चराऊ कुरणे | 94 | 4.5 |
| 6 | किरकोळ झाडे झुडपे यांच्या समुहाखालील क्षेत्र | 15 | 0.7 |
| 7 | चालू पडिक जमीन | 58 | 2.7 |
| 8 | इतर पडिक जमीन | 41 | 1.9 |
| 9 | पेरणीचे निव्वळ क्षेत्र | 1458 | 67.9 |
| 10 | लागवडीयोग्य क्षेत्र (4+5+6+7+8+9) | 1709 | 80 |
| 11 | दुसोटा क्षेत्र | 247 | – |
| 12 | पिकाखालील एकूण क्षेत्र (9+11) | 1705 | – |
| 13 | पीक घनता (12 ÷9×100) | 117 | – |

उपखोऱ्यात दुसोटा क्षेत्र लागवड क्षेत्राच्या तुलनेत फारच कमी आहे. विहिरींच्या संख्येत तातडीने भर घालून दुसोटा क्षेत्र वाढवणे सहज शक्य दिसते.

## 6.0 लोकसंख्या व पशुधन

6.1 लोकसंख्या : सन 1991 च्या जनगणनेनुसार या उपखोऱ्यातील एकूण लोकसंख्या 36.38 लक्ष आहे. या उपखोऱ्यात सन 2030 पर्यंत होणारी लोकसंख्येतील वाढ, लोकसंख्या घनता पुढीलप्रमाणे अपेक्षित आहे.

लोकसंख्या - हजारात,घनता-प्रति चौकिमी

| अक्र | लोकसंख्या तपशील | 1991 | 2030 |
|---|---|---|---|
| 1 | नागरी | 586 | 1964 |
| 2 | ग्रामीण | 3052 | 6104 |
| 3 | एकूण | 3638 | 8068 |
| 4 | लोकसंख्या घनता | 170 | 376 |
| 5 | ग्रामीण लोकसंख्या घनता | 142 | 284 |

6.2 पशुधन : सन 1992 च्या गणनेनुसार या उपखो-यात एकूण 23.03 लक्ष पशुधन आहे. तपशील खालील प्रमाणे आहे.

| म्हैस व रेडे | गाय व बैल | एकखुरी व उंट | शेळी मेंढी | डुकरे | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| 284545 | 1327283 | 9278 | 659241 | 22361 | 2302708 |

6.3 इतर तपशील : या उपखोऱ्यात 1) मेहकर, 2) वाशीम, 3) मंगरुळपीर 4) यवतमाळ 5) दारव्हा, 6) दिग्रस 7) घाटंजी 8) पांढरकवडा 9) पुसद 10) केळापूर 11) कळंब 12) उमरखेड 13) आर्णी 14) हदगाव 15) कळमनुरी 16) हिंगोली 17) किनवट अशा 17 नगरपालिका आहेत. शेत मजुरांची 9.55 लक्ष तर इतर मजुरांची संख्या 5.77 लक्ष आहे.

## 7.0 पाणी वापर

7.1 सिंचनासाठी वापर : या उपखो-यातील वर्गनिहाय म्हणजे मोठे,मध्यम,बृहत् लघु,लघु प्रकल्प, यांची संख्या, चलपाणीसाठा, पाणीवापर सिंचनक्षेत्र तसेच पूर्ण झालेले प्रगतिपथावरील व भविष्यकालीन प्रकल्प याची तपशीलवार माहिती सारणी 6.5 मध्ये दिली आहे. पूर्ण झालेल्या प्रकल्पांची निर्मित सिंचन क्षमता 114522 हेक्टर असून त्यातील प्रस्तावित पाणीवापर 799 दलघमी आहे. सिंचनासाठी आणखी 382916 हेक्टर क्षेत्र उपलब्ध होऊ शकेल पण त्यासाठी सध्याच्या पाणीवापर पध्दती प्रमाणे पाणीवापर 3119 दलघमी होईल. पाण्याच्या बचतीचे व काटकसरी पध्दतीचे ठिबक सिंचनासारखे आधुनिक उपाय वापरल्या शिवाय सिंचनक्षेत्राचा विस्तार शक्य होणार नाही हे स्पष्ट आहे.

7.2 सिंचनेतर पाण्याचा वापर : सिंचनेतर उपयोगासाठी या उपखोऱ्यातील सध्याची गरज 136 दलघमी आहे. सन 2030 पर्यन्तची ती 307 दलघमी होईल. या गरजांचा तपशील खालील प्रमाणे असेल.

पाणी - दलघमी

| अक्र | तपशील | सन 1991 | | | | सन 2030 |
|---|---|---|---|---|---|---|
| | | नागरी | ग्रामीण | पशुधन | एकूण | |
| 1 | घरगुती वापरासाठी | 22 | 61 | 50 | 133 | 289 |
| 2 | उद्योगासाठी पाणी | | | | 3 | 18 |
| | एकूण | | | | 136 | 307 |

7.3 जलसंपत्तिचा ताळेबंद : एकूण (भूपृष्ठावरील व भूपृष्ठाखालील) आणि घरगुती वापरासाठी व सिंचनासाठी पाणी वापर यातून होणारा पुनरुद्भव याचा ताळेबंद सारणी 6.6 मध्ये दिला आहे.

7.4 लाभक्षेत्र विकास : सद्य:स्थिति खालील प्रमाणे आहे-

क्षेत्र -हजार हेक्टर

| भूविकास भाग-1ची (शेतचाऱ्या इ) कामे | | | भूविकास भाग-2 ची (सपाटीकरण इ) कामे | | | प्रकल्पाच्या लाभक्षेत्रा व्यतिरिक्त अन्य क्षेत्रात |
|---|---|---|---|---|---|---|
| लाक्षेविप्रा कडील प्रकल्प | लाक्षेविप्रा बाहेरील प्रकल्प | एकूण | लाक्षेविप्रा कडील प्रकल्प | लाक्षेविप्रा बाहेरील प्रकल्प | एकूण | झालेले जमीन सपाटी करणाचे (भाग-2) क्षेत्र |
| 48.19 | 66.66 | 114.85 | 1.97 | 43.51 | 45.48 | 7.05 |

7.5 सन1970 पूर्वीची धरणे: सन 1970 पूर्वी या उपखोऱ्यात पूर्ण झालेली खालील मुख्य धरणे आहेत. सिंचनाबाबतचा 30 वर्षाचा अनुभव उपखोऱ्याच्या पाठीशी आहे. व त्याचा उपयोग यापुढे व्यवस्थापनेत होणे आवश्यक आहे.

| अक्र | प्रकल्पाचे नाव | वर्ष |
|---|---|---|
| 1 | निगनूर | 1969 |
| 2 | अंबोना | 1968 |
| 3 | रुई | 1967 |

8.0 **पीक रचना**

या उपखोऱ्यातील पेरणीखालचे क्षेत्र 14.58 लक्ष हेक्टर आहे. जमीन व हवामानानुसार अनुकूल प्रमुख पिके खरीप ज्वारी,कापूस,तूर,सोयाबीन,उन्हाळी भुईमूग,मिरची,भाजीपाला आहेत. काही प्रमुख पिकांची दर हेक्टरी सरासरी उत्पादकता खालील प्रमाणे आहे-

उत्पादकता - क्विं/हेक्टर

| अक्र | प्रमुख पिके | उत्पादकता |
|---|---|---|
| 1 | खरीप ज्वारी | 15.27 |
| 2 | कापूस | 1.32 |

कापसाची सध्याची उत्पादकता फारच कमी आहे. ती वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न उपखोऱ्यात आवश्यक आहेत.

## 9.0 उद्योगधंदे

या उपखोऱ्यात कापूस,दाळी,तेलबिया व ज्वारी या पिकांच्या प्राथमिक उत्पन्नावर प्रक्रिया करणारे कृषि आधारीत उद्योगधंदे सुरु करण्यास वाव आहे. उपखोऱ्यात सध्या 4 साखर कारखाने आहेत.

## 10.0 जलविद्युत निर्मिति

या उपखोऱ्यात सध्या जलविद्यूत प्रकल्प नाहीत पण भविष्यात 4 लघु जलविद्यूत प्रकल्प प्रस्तावित आहेत व यांची क्षमता 6.1 मेवॅ आहे. तपशील पुढील प्रमाणे आहे-

क्षमता - मेवॅ

| अक्र | प्रकल्पाचे नाव | निर्मिती क्षमता |
|---|---|---|
| 1 | निम्न पैनगंगा प्रकल्प | 4.60 |
| 2 | अरुणावती डावा कालवा | 0.35 |
| 3 | पेनटाकळी | 0.35 |
| 4 | बेंबळा | 0.80 |

## 11.0 दळणवळणाची साधने

उपखोऱ्यातील दळणवळणाची साधने खालीलप्रमाणे आहेत-

| अक्र | मार्गाचा प्रकार | मार्गाचे नाव |
|---|---|---|
| 1 | ब्रॉडगेज | कलकत्ता -मुंबई |
| 2 | मीटरगेज | मुदखेड - अदिलाबाद |
| 3 | मीटरगेज | अदिलाबाद - खांडवा |
| 4 | मीटरगेज | यवतमाळ - अचलपूर |
| 5 | महामार्ग क्र.7 | अकोला - हैद्राबाद |
| 6 | प्रमुख राज्यमार्ग क्र.3 | नागपूर - नांदेड |
| 7 | प्रमुख राज्यमार्ग क्र.6 | अमरावती - चंद्रपूर |
| 8 | राज्यमार्ग क्र. 206 | बुलढाणा - रिसोड |
| 9 | राज्यमार्ग क्र. 207 | मालेगाव - मेहकर |
| 10 | राज्यमार्ग क्र. 183 | सिंदखेडराजा - लोणार - पुसद - महागाव - किनवट |
| 11 | राज्यमार्ग क्र. 171 | लोणार - मेहकर |
| 12 | राज्यमार्ग क्र. 208 | मालेगाव - रिसोड |
| 13 | राज्यमार्ग क्र. 204 | मालेगाव - हिंगोली |
| 14 | राज्यमार्ग क्र. 209 | वाशिम - मंगरुळपीर |
| 15 | राज्यमार्ग क्र. 210 | मंगरुळपीर - दारव्हा - राज्यमार्ग क्र.3 |
| 16 | राज्यमार्ग क्र. 197 | मंगरुळपीर - दिग्रस |
| 17 | राज्यमार्ग क्र. 213 | दारव्हा - दिग्रस - पुसद - उमरखेड - किनवट |
| 18 | राज्यमार्ग क्र. 215 | पुसद - कळमनुरी |
| 19 | राज्यमार्ग क्र. 233 | केळापूर - वणी |
| 20 | राज्यमार्ग क्र. 234 | राज्यमार्ग क्र 7 - वणी |

## 12.0 भावी नियोजनाची दिशा :

12.1 पैनगंगा उपखोऱ्यात पाण्याची वार्षिक सरासरी उपलब्धता 5500 दलघमी आहे. गोदावरी लवाद निर्णयानुसार पाणीवापरास खालील प्रमाणे अनुमती आहे-

| | | |
|---|---|---|
| क) | निम्न पैनगंगा धरण स्थळापर्यन्त, वाघाडी नदीवरील वाघाडी व खुणी नदीवरील साईखेडा स्थळापर्यन्त | 5078 दलघमी |
| ख) | वरील स्थळांच्या खालच्या भागात दरवर्षी वापरास उपलब्ध होणारे पाणी | 255 दलघमी |
| | एकूण : | 5333 दलघमी |

या खोऱ्यासंबंधीत आंतरखोरे स्थलांतराच्या योजना खालील प्रमाणे आहेत-

| अक्र | योजनेचे नाव | स्थलांतरीत पाणी(दलघमी) | संबंधीत उपखोरे |
|---|---|---|---|
| 1 | ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्प(टप्पा-1) | (-) 655 | गोदावरी निम्न स्रोत |
| 2 | पेनटाकळी सिंचन प्रकल्प | (-) 26 | पूर्णा(तापी) |
| 3 | खडकपूर्णा पाटबंधारे प्रकल्प | (+) 15 | पूर्णा(दुधनासहीत) |

परिणामी उपखोऱ्यात पाणी वापराच्या नियोजनासाठी उपलब्धता 4667 दलघमी येते.

पूर्ण, बांधकामाधीन, भविष्यकालिन प्रकल्पाचे पाणी नियोजनानुसार 3918 दलघमी इतका पाणीवापर होणार आहे. हा वापर वापरासाठी उपलब्ध असलेल्या पाण्यापेक्षा कमी आहे असे दिसते. यानुसार पाणी वापराचे फेरनियोजन करुन उपलब्ध सर्व पाण्याचा वापर होण्याच्या दृष्टीने नियोजन करणे आवश्यक आहे. उपलब्धतेतील दोलायमानतेवर पण मात करण्यासाठी निभावणी (carry over) साठयाच्या तत्वाचा अंगिकार करणे इष्ट दिसते. असे फेरनियोजन करीत असताना पाण्याचे साठे वाढविण्यासाठी सध्याची धरणाची उंची वाढविणे, नदीमध्ये ओळीने बंधारे बांधून व नवीन जलाशये निर्माण करून साठा वाढविणे किंवा मुख्य कालव्यावर मार्गस्थ जलाशये निर्माण करणे गरजेचे आहे. उपखोऱ्यात पैनगंगा नदीवर संगमाच्या अलिकडे सीमान्त साठवणुकी (Terminal Storages) ची व्यवस्था करणे आवश्यक वाटते. इतर खोऱ्यांमध्ये अशा प्रकारचे प्रस्ताव आहेत (उदाः मुख्य गोदावरीवर विष्णुपुरी व कृष्णेवर म्हैसाळ). तशीच योजना या नदीवर असणे उपलब्ध पाण्याचा पूर्ण वापर होण्याच्या दृष्टीने आवश्यक आहे.

12.2 या उपखोऱ्यातील येव्यामध्ये तीव्र दोलायमानता आहे हे सारणी 6.3 वरुन सहजपणे दिसून येते. 10 टक्के उपलब्धता व 90 टक्के उपलब्धता (म्हणजे एकांतिक अतिपावसाची व अतिअवर्षणाची वर्षे सोडून असलेली उपलब्धता) यातील गुणांक जवळ जवळ 8.7 आहे. पण 75 टक्के व 50 टक्के उपलब्धता यातील गुणांक मात्र केवळ 1.5 आहे. 50 टक्के व 90 टक्के विश्वासार्हतेच्या पाण्याचा गुणांक 2.7 आहे. याचाच अर्थ 50 टक्के हूनही कमी उपलब्धतेच्या पाण्याच्या वापराचा विचार अनुकूल पाण्याच्या वर्षासाठी या उपखोऱ्यात होणे आवश्यक आहे. विशेषतः सन 1980-81, 1983-84, 1988-89, 1992-93 व 1994-95 या चांगल्या वर्षाच्या पाण्याच्या उपलब्धतेचे समृध्दीत रुपांतर करता यायला हवे किंवा 1973-74, 1976-77 व 1988-89 या अवर्षणापाठोपाठ येणाऱ्या अनुकूल वर्षाच्या उत्पादनातील घट भरून काढण्यासाठी अधिकाधिक उपयोग करता यायला हवा. या दृष्टीने या उपखोऱ्याच्या पाण्याचे फेरनियोजन हाती घेतले जाणे आवश्यक आहे. वाईटवर्षे सलगपणे येतांना दिसतात (उदाः 1971-72 व 1972-73, 1974-75 व1975-76, 1984-85 व 1985-86, 1986-87 व 1987-

88) याचेही भान ठेवून तुटीच्या वर्षामध्ये अर्थव्यवस्था विस्कळीत होणार नाही अशी व्यवस्था करायला हवी. चांगल्या पावसाच्या वर्षातील अतिरिक्त पाणी अडविण्याची व्यवस्था करून कमी पावसाच्या वर्षात कॅरी ओव्हरच्या तरतूदीतून पाणी वापराचे फेरनियोजन होण्याची शक्यता दिसते.

12.3 आयोगाने सिंचना खालील पिकरचना व पैनगंगा उपखोऱ्यातील पाण्याचे नियोजन या विषयावर पुसद येथे दोन दिवसांची कार्यशाळा आयोजित केली होती. ऊर्ध्व पूस व निम्न पूस या दोन प्रकल्पांना आयोगाने भेटी पण दिल्या. या दोन्ही प्रकल्पांच्या लाभक्षेत्रात ऊसाची मोठया प्रमाणात लागवड झालेली आहे. लाभक्षेत्रात शेतीची बांधबंदिस्ती व उत्पादकता वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्याची गरज दिसून येते. लाभक्षेत्रातील खेडेगांवाच्या आर्थीक परिस्थितित बदल झालेला नाही. या प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात नुकताच एक नवीन साखर कारखाना कार्यान्वित झालेला आहे आणि त्यामुळे या दोन्ही प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात ऊस वाढविण्याकडे कल दिसून येतो. ऊस क्षेत्राची उत्पादकता वाढविण्यासाठी व पाण्याची बचत करण्यासाठी ऊस हे पीक ठिबक सारख्या आधुनिक सिंचन पध्दतीवर घेवून जाणे हितावह राहणार आहे.

12.4 निम्न पूस या जलाशयाचे पाणी मात्र प्रदूषित झाल्याचे आयोगाच्या भेटीत लक्षात आले. या प्रदूषित पाण्यामुळे मत्स्यव्यवसायावर देखील प्रतिकूल परिणाम झाल्याचे लक्षात आणून देण्यात आले. धरणाच्या बांधावरून चालत असतांनाही पाण्याचा उग्र वास येत होता. याचाच अर्थ हे पाणी पिण्यासाठी उपयोगी राहिलेले नाही असा होतो. या पाण्याच्या चाचण्या घेऊन जलाशयातील प्रदूषण टाळण्यासाठी वेळीच तातडीची उपाययोजना करणे या भागाच्या आरोग्यासाठी आवश्यक आहे.

12.5 या उपखोऱ्यात ऊसाचे चार ते पाच खोडवे घेण्याची पध्दत आहे. त्यामुळे जमिनीत बहुवार्षिक तणाचा प्रभाव वाढतो व जमिनीची सुपिकता कमी होते. त्यामुळे या पध्दतीचा फेरविचार करणे इष्ट राहील. या बाबत कृषि विद्यापीठाने तपशीलांत अभ्यास करून योग्य त्या पीक पध्दतीचा प्रस्ताव करणे आवश्यक आहे.

12.6 या उपखोऱ्यामध्ये उपलब्धतेच्या तुलनेत पाण्याचा वापर कमी आहे. खरीपामध्ये सिंचनासाठी पाण्याची मागणी (पावसाच्या निश्चितीमुळे) नसते. रब्बी हंगामात कापूस हे आठमाही पीक उभे असल्यामुळे व बऱ्याचवेळा नोव्हेंबर-डिसेंबर मधील पावसामुळे कापसाला पण पाण्याची गरज भासत नाही. यामुळे रब्बीमध्येही पाण्याचा वापर कमीच आहे. उन्हाळयामध्ये पाण्याचा वापर करण्याच्या दृष्टिने पीकपध्दतीत बदल घडवून आणणे गरजेचे आहे. यादृष्टीने विविध चाचण्या व प्रयोग यांची ताबडतोब आवश्यकता आहे.

या प्रकल्पाच्या इसापूर डाव्या कालव्याच्या किमी 42 नंतर उत्तरेस नवीन कालवा प्रस्तावित करून दहागाव (ता.उमरखेड) येथपर्यन्त 6 ते 7 किमी लांबीचा नवीन कालवा करून चुरमुरा गावाच्या दरीत पाणी सोडावे व हे पाणी खाली महागाव तालुक्यात दगडथर जवळ डोंगरात मोठा बांध घेवून अडवावे व तेथून पुढे महागाव तालुक्यातील उपरोक्त गावांना पाणी पुरवावे वा तालुक्यात सद्यःस्थितित असलेल्या वडव, बेलदरी, निंगनूर, शेणद, बोथा या तलावांत सोडावे; म्हणजे तेथून कालव्याद्वारे पाणी पुरवठा करता येऊ शकतो अशी एक मागणी पुढे येत आहे. चुरमुरा गावापासून महागांव तालुक्यात पाणी सोडावयाच्या ठिकाण प्रचंड दरी असून याची खोली अंदाजे 80 ते 100 मी आहे, म्हणजेच प्रस्तावित कालव्याचे पाणी 100 मी खाली पडून एक प्रचंड धबधबा निर्माण होईल. या संपूर्ण परिसरात अग्निजन्य खडक असून धबधब्यामुळे खालील भागाला कोणतेही नुकसान होऊ शकत नाही. याउलट तांत्रिक दृष्टया तपशिलवार सर्वेक्षण करून या ठिकाणी जलविद्युत प्रकल्पाची उभारणी करता येणे शक्य होईल. पैनगंगेच्या खोऱ्यातील सहस्रकुंड धबधब्यापेक्षा हा धबधबा तिप्पट मोठा असल्यामुळे

वीजनिर्मिति बरोबरच या ठिकाणाला एक चांगले पर्यटन स्थळ म्हणून मान्यता मिळू शकते असेही प्रतिपादन केले जाते. याचा सविस्तर अभ्यास करण्याची गरज आहे.

12.7 पैनगंगा हे उपखोरे सिंचनासाठी अनुकूल खोरे म्हणून प्रसिध्द आहे. पण पाण्याची एकूण उपलब्धता गरजेच्या तुलनेत मर्यादित आहे. व पूर्णा (तापी) या उपखोऱ्याच्या विभाजक रेषेवर (रीज लाईनवर) पिण्याच्या पाण्याची टंचाई आहे. पैनगंगा व आडान या नद्या विभाजक रेषेला समांतर आहेत.

या उपखोऱ्यातील ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्पाच्या वरच्या भागात पेनटाकळी हा प्रकल्प बांधकामाधिन आहे. पेनटाकळी प्रकल्पातील पाण्याचा प्रस्तावित वापर 80 दलघमी इतका आहे. पेनटाकळी या प्रकल्पापासून खालच्या भागात नदीवर अनेक को.प.बंधारे बांधून नदीच्या दोन्ही काठावर उपसा सिंचन पध्दतीने सिंचनाचा विस्तार करण्यात येत आहे. या प्रकल्पाचा कालवा हा नदीच्या काठाच्या जवळून जातो.या प्रकल्पाच्या डाव्या कालव्याच्या किमी 10 मधून प्रवाही पध्दतीने बोगद्याद्वारे शेजारच्या तापी खोऱ्यात 26 दलघमी पाण्याचे स्थलांतरण करुन 3893 हेक्टर सिंचनक्षेत्र भिजविण्याचे प्रस्तावित आहे.

या प्रकल्पाच्या कालव्यावर व त्याच प्रमाणे ऊर्ध्वपैनगंगा प्रकल्पाच्या उजव्या कालव्यावर दोन लहान जलविद्युत केंद्रे प्रस्तावित आहेत. याला गती येणे आवश्यक आहे.

12.8 अरुणावती नदीवर दिग्रस जवळ धरण बांधले आहे. या प्रकल्पाचे वैशिष्टय म्हणजे 75 टक्के येव्या पेक्षा जलाशयाचा साठा बराच मोठा ठेवलेला आहे. याचाच अर्थ हा प्रकल्प कमी विश्वासार्हतेला संकल्पित केला आहे. सर्वसाधारणतः 75 टक्के विश्वासार्हतेचे प्रकल्प संकल्पित करुन बांधण्याची जी पारंपारिक प्रथा आहे त्याला अरुणावती प्रकल्प हा वेगळे वळण देणारा ठरतो. कमी विश्वासार्हता म्हणजे मोठा साठा, जास्त क्षेत्राला पाण्याचा लाभ. पाण्याच्या दोलायमानेतवर उत्तर म्हणून मोठा साठा निर्माण करणे आवश्यक ठरते. जेणेकरुन तुटीच्या वर्षामध्ये कॅरी ओव्हर द्वारे पाण्याचा वापर होऊ शकतो. अधिक पावसाच्या वर्षात पाण्याचा अधिक साठा करता येतो व त्याबरोबरच वाहून जाणारे पाणी कालव्याव्दारे लाभक्षेत्रातील तलावात/साठवणूकीत भरता येते. त्यामुळे भूगर्भात पाण्याचे साठे निर्माण होतात आणि हा भूगर्भातील पाण्याचा साठा पुढच्या 2/3 वर्षाच्या काळात विहिरीद्वारे वापरता येतो. प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील उत्पादनात वाढ करता येते. जास्तीत जास्त क्षेत्राला पाण्याचा लाभ आणि त्यामुळे जास्तीत जास्त लोकांना न्याय हे यातील तत्व आहे. हे तत्व राज्यातील अनेक प्रकल्पांना लावण्यासाठी या प्रकल्पाच्या उपलब्धीचा खोलात अभ्यास होणे उपयुक्त ठरेल.

अरुणावती घटकक्षेत्रामध्ये मोठया प्रमाणावर जलसंधारणाची कामे हाती घेण्यास अनुकूलता आहे. पुनर्भरणास अनुकूल भूस्तरीय रचना असलेला हा भाग आहे.

12.9 उपखोऱ्यात पारंपारिक शेती करण्याकडे कल असल्याने आणि एकूणच वैज्ञानिक व सुधारीत पध्दतीचा अवलंब होत असल्याने खरीब रब्बी हंगामातील पेरण्याची योग्य वेळ साधली जात नाही त्यामुळे सिंचनाच्या पाळयामध्ये वेगळी शास्त्रीय पध्दत बसवणे आवश्यक आहे. इतर खोऱ्यातील पारंपारिक, पध्दतीपेक्षा वेगळ्या सिंचन आवर्तन पध्दतीची या उपखोऱ्यात गरज दिसते.

12.10 या उपखोऱ्यात चिखली, मेहकर, रिसोड, वाशिम, पुसद, यवतमाळ, उमरखेड,हदगांव इत्यादी नागरी वस्त्या आहेत त्यामुळे भाजीपाला उत्पादनास बाजारपेठा उपलब्ध असल्यामुळे मोठा वाव आहे.

12.11 कृषि उत्पादनावर आधारित उद्योगांच्या वाढीसाठी उपयुक्त वातावरण आहे. त्यामुळे सूत गिरण्या डाळीच्या गिरण्या, प्रक्रिया केंद्रे, वनस्पती तूप, रासायनिक खते इत्यादी उद्योगास

चालना आवश्यक आहे. उपखोऱ्यात भुईमुगाचे पीक वाढत आहे. तेलगिरण्यांचा विकास होणे गरजेचे आहे.

12.12 कापूस हे या उपखोऱ्यातील प्रमुख पीक आहे तेंव्हा कापसावर प्रक्रिया करणारे उद्योग जसे जिनींग, प्रेसिंग, सूतगिरण्या, कापडउद्योग व तयार कपडा उत्पादन, सरकीपासून तेल इत्यादी उद्योगास चालना द्यावी.

12.13 या उपखोऱ्यातील भूभागात नामांकित रायवळ आंबे, चारोळी व बिबे बऱ्याच प्रमाणात दिसतात. त्या झाडाचे संरक्षण व शास्त्रोक्त संवर्धन यासाठी विशेष प्रयत्न आवश्यक दिसतात.

12.14 सध्या उपखोऱ्यात चार साखर कारखाने सुरू आहेत तसेच दोन मोठी उद्योग केंद्रे यवतमाळ व हिंगोली येथे प्रस्तावित आहेत.

12.15 या उपखोऱ्यातील बरेच प्रकल्प वनजमिनीमुळे रखडले आहेत. तेव्हा वनजमिनीचा प्रश्न सोडवून प्रकल्पांना गती देणे गरजेचे आहे. निम्न पैनगंगा प्रकल्प नुकताच हाती घेण्यात आला आहे. त्याला पण गती देणे आवश्यक आहे.

12.16 पैनगंगा नदीवर सहस्रकुंड येथे नदीच्या प्रवाहातील प्रपातावर जलविद्युत निर्मितिस वाव आहे. त्याला गती देण्याची गरज आहे.

12.17 हे उपखोरे मध्यम व हलक्या जमिनीचे आहे. पुनर्भरणास अनुकूलता असलेला भाग आहे. पाणलोट् क्षेत्र विकासाच्या योजना राबवून पाण्याचे पुनर्भरण वाढवून विहीर बागायतीला बळकटी देणे आवश्यक आहे. चांगल्या पावसाच्या काळात कालवे चालवून भूजलाचा साठा वाढविणे गरजेचे आहे. अरुणावती प्रकल्पाच्या बाबतीत भूजल वाढविण्याची तरतूद प्रकल्पातच अंतर्भूत केलेली आहे.हेच तत्त्व इतर प्रकल्पांना पण लागू करण्याची गरज आहे. या उपखोऱ्यात विहिर बागायतही रुजलेली आहे. तिच्या विस्तारालाही अनुकूलता आहे. तेव्हा प्रवाही कालव्याच्या लाभक्षेत्रामध्ये त्याच प्रमाणे त्या लाभक्षेत्रांच्या बाहेरही भूजल वापराचे नियोजन व विस्तार होण्याचा सूत्रबध्द कार्यक्रम उपखोऱ्यासाठी तयार करणे उपयुक्त ठरेल.

सारणी:6.1

**उपखोऱ्याच्या भौगोलिक प्रदेशाचे एकत्रित**

**माहवार सरासरी पर्जन्यमान व बाष्पीभवन**

पर्जन्यमान, बाष्पीभवन-मिमी

| अक्र | महिना | पर्जन्यमान | | | | बाष्पीभवन |
|---|---|---|---|---|---|---|
| | | आसेगाव ता.मंगरुळ | पेनटाकळी ता.चिखली | खडका ता.यवतमाळ | सरासरी | फर्दापूर जि.बूलढाणा |
| 1 | जानेवारी | 9 | 0 | 3 | 4 | 175 |
| 2 | फेब्रुवारी | 4 | 0 | 0 | 1 | 138 |
| 3 | मार्च | 9 | 7 | 13 | 10 | 217 |
| 4 | एप्रिल | 8 | 9 | 16 | 11 | 306 |
| 5 | मे | 9 | 23 | 26 | 19 | 288 |
| 6 | जून | 112 | 160 | 202 | 158 | 120 |
| 7 | जुलै | 206 | 245 | 382 | 278 | 78 |
| 8 | ऑगस्ट | 182 | 162 | 388 | 244 | 81 |
| 9 | सप्टेंबर | 105 | 110 | 222 | 146 | 123 |
| 10 | ऑक्टोबर | 75 | 66 | 149 | 97 | 138 |
| 11 | नोव्हेंबर | 10 | 10 | 44 | 21 | 112 |
| 12 | डिसेंबर | 5 | 3 | 23 | 10 | 102 |
| | एकूण | | | | 999 | 1878 |

**हंगामनिहाय बाष्पीभवनाचा तपशील**

बाष्पीभवन - मिमी

| अक्र | हंगाम | बाष्पीभवन |
|---|---|---|
| 1 | खरीप | 351 |
| 2 | रब्बी | 596 |
| 3 | उन्हाळी | 931 |
| | एकूण | 1878 |

सारणी : 6.2

**पर्जन्यमापन केंद्रांचा तपशील**

पर्जन्यमान - मिमी

| अक्र | केंद्राचे नाव | प्रकार | स्वामित्व | आधार सामुग्रीचे प्रारंभिक वर्ष | वार्षिक सरासरी पर्जन्यमान |
|---|---|---|---|---|---|
| 1 | अकोला (मंगरूळपीर) | स्व.प. | पा.खा. | | 1128 |
| 2 | आसेगाव | स्व.प. | पा.खा. | 1981 | 774 |
| 3 | फ्लउमरी | स्व.प. | पा.खा. | 1981 | 725 |
| 4 | मंगरूळपीर | स्व.प. | पा.खा. | 1981 | 1200 |
| 5 | पालोरी | स्व.प. | पा.खा. | 1981 | 721 |
| 6 | सावरगाव | स्व.प. | पा.खा. | 1981 | 638 |
| 7 | मानोरा | स्व.प. | पा.खा. | 1981 | 823 |
| 8 | कळंब महाली | स्व.प. | पा.खा. | 1979 | 1035 |
| 9 | फर्दापूर | स्व.प. | पा.खा. | 1990 | 609 |
| 10 | पांगरी (केसापूर) | सा.प. | पा.खा. | 1981 | 751 |
| 11 | पेनटाकळी | सा.प. | पा.खा. | 1982 | 794 |
| 12 | अडाण | स्व.प. | पा.खा. | 1981 | 842 |
| 13 | लाडखेड | स्व.प. | पा.खा. | 1981 | 924 |
| 14 | रामगाव रामेश्वर | स्व.प. | पा.खा. | 1981 | 666 |
| 15 | धनत्र (बु) | स्व.प. | पा.खा. | 1981 | 576 |
| 16 | पारवा | स्व.प. | पा.खा. | 1981 | 780 |
| 17 | पाटणबोरी | सा.प. | पा.खा. | 1990 | 1044 |
| 18 | सायफळ | स्व.प. | पा.खा. | 1990 | 780 |
| 19 | सावरगाव (मांगी) | स्व.प. | पा.खा. | 1981 | 596 |
| 20 | येलबारा | स्व.प. | पा.खा. | 1981 | 1025 |
| 21 | ताडसावली | स्व.प. | पा.खा. | 1981 | 1749 |
| 22 | चौरांकुड | स्व.प. | पा.खा. | 1984 | 720 |
| 23 | कुन्हा तळणी | स्व.प. | पा.खा. | 1980 | 1640 |
| 24 | खडका | स्व.प. | पा.खा. | 1981 | 1467 |
| 25 | आर्णी | स्व.प. | पा.खा. | 1981 | 959 |
| 26 | कलगाव | स्व.प. | पा.खा. | 1981 | 1129 |
| 27 | सिंगद | स्व.प. | पा.खा. | 1981 | 1212 |
| 28 | रूई तलाव | स्व.प. | पा.खा. | 1981 | 1055 |
| 29 | कोरट | सा.प. | पा.खा. | 1990 | 1094 |
| 30 | सोनदाभी | सा.प. | पा.खा. | 1990 | 960 |
| 31 | सावरगाव बंगला | स्व.प. | पा.खा. | 1981 | 564 |
| 32 | शेंबाळपिंपरी | स्व.प. | पा.खा. | 1981 | 569 |
| 33 | ऊर्ध्व पुस | स्व.प. | पा.खा. | 1981 | 848 |
| 33 | मरसुळ | सा.प. | पा.खा. | 1981 | 840 |
| 34 | गारवाडी | सा.प. | पा.खा. | 1981 | 1140 |
| 35 | मोहदा | स्व.प. | पा.खा. | 1981 | 820 |
| 36 | निम्न पूस | स्व.प. | पा.खा. | 1981 | 1079 |
| 37 | मुरली | स्व.प. | पा.खा. | 1981 | 1150 |
| 38 | कोलगाव | सा.प. | पा.खा. | 1990 | 1129 |
| 39 | जामवाडी | सा.प. | पा.खा. | 1981 | 852 |
| 40 | महासनी | सा.प. | पा.खा. | 1981 | 840 |
| 41 | हिंगोली | सा.प. | पा.खा. | 1979 | 650 |
| 42 | कळमनुरी | सा.प. | पा.खा. | 1979 | 935 |
| 43 | हदगाव | सा.प. | पा.खा. | 1979 | 696 |
| 44 | किनवट | सा.प. | पा.खा. | 1979 | 1279 |

सारणी : 6.3

## जलसंपत्तीची उपलब्धता

ठिकाण : ताडसावली | येवा-दलघमी

| अक्र | वर्ष | वार्षिक सरासरी येवा | उतरत्या क्रमानुसार आयोजित | | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | | येवा | संगतवर्ष | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | 1965 - 66 | 3569 | 58713 | 1980 - 81 | |
| 2 | 1966 - 67 | 4404 | 14996 | 1990 - 91 | |
| 3 | 1967 - 68 | 3285 | 14262 | 1988 - 89 | 10 |
| 4 | 1968 - 69 | 2435 | 11170 | 1983 - 84 | |
| 5 | 1969 - 70 | 3837 | 9743 | 1994 - 95 | |
| 6 | 1970 - 71 | 7209 | 7903 | 1989 - 90 | 20 |
| 7 | 1971 - 72 | 1478 | 7209 | 1970 - 71 | |
| 8 | 1972 - 73 | 1415 | 6958 | 1973 - 74 | 30 |
| 9 | 1973 - 74 | 6958 | 6786 | 1992 - 93 | |
| 10 | 1974 - 75 | 1155 | 5252 | 1981 - 82 | |
| 11 | 1975 - 76 | 1566 | 4675 | 1993 - 94 | |
| 12 | 1976 - 77 | 4423 | 4625 | 1978 - 79 | |
| 13 | 1977 - 78 | 2078 | 4423 | 1976 - 77 | 50 |
| 14 | 1978 - 79 | 4625 | 4404 | 1966 - 67 | |
| 15 | 1979 - 80 | 4172 | 4172 | 1979 - 80 | |
| 16 | 1980 - 81 | 58713 | 3837 | 1969 - 70 | |
| 17 | 1981 - 82 | 5252 | 3569 | 1965 - 66 | |
| 18 | 1982 - 83 | 2142 | 3285 | 1967 - 68 | |
| 19 | 1983 - 84 | 11170 | 2846 | 1986 - 87 | 75 |
| 20 | 1984 - 85 | 659 | 2435 | 1968 - 69 | |
| 21 | 1985 - 86 | 1682 | 2191 | 1991 92 | |
| 22 | 1986 - 87 | 2846 | 2142 | 1982 - 83 | |
| 23 | 1987 - 88 | 1638 | 2078 | 1977 - 78 | |
| 24 | 1988 - 89 | 14262 | 1638 | 1987 - 88 | 90 |
| 25 | 1989 - 90 | 7903 | 1628 | 1985 - 86 | |
| 26 | 1990 - 91 | 14996 | 1566 | 1975 - 76 | |
| 27 | 1991 - 92 | 2191 | 1478 | 1971 - 72 | |
| 28 | 1992 - 93 | 6786 | 1415 | 1972 - 73 | |
| 29 | 1993 - 94 | 4675 | 1155 | 1974 - 75 | |
| 30 | 1994 - 95 | 9743 | 659 | 1984 - 85 | |
| | सरासरी | 6576 | | | |

$$\frac{\text{10 \% उपलब्धता}}{\text{90 \% उपलब्धता}} = 8.7$$

$$\frac{\text{50 \% उपलब्धता}}{\text{90 \% उपलब्धता}} = 2.7$$

$$\frac{\text{50 \% उपलब्धता}}{\text{75 \% उपलब्धता}} = 1.55$$

सारणी : 6.4

**अवर्षणप्रवण तालुक्यांचा तपशील**

पर्जन्यमान-मिमी

लोकसंख्या हजारात, क्षेत्रफळ - चौकिमी

| अक्र | जिल्हा | तालुका | सरासरी वार्षिक पर्जन्यमान | क्षेत्रफळ | लोकसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| 1 | बुलढाणा | मेहकर | 854 | 547 | 119 |
| 2 | | चिखली | 810 | 332 | 60 |
| 3 | | लोणार | 854 | 302 | 40 |
| 4 | अकोला | कारंजा | 875 | 105 | 19 |
| 5 | | मंगरूळपीर | 883 | 690 | 112 |
| 6 | | मानोरा | 775 | 828 | 113 |
| 7 | | वाशिम | 967 | 783 | 175 |
| 8 | | रिसोड | 880 | 784 | 140 |
| 9 | | मालेगाव | 880 | 316 | 41 |
| 10 | यवतमाळ | दारव्हा | 932 | 833 | 151 |
| 11 | | दिग्रस | 937 | 1025 | 119 |
| 12 | | घाटंजी | 996 | 1084 | 108 |
| 13 | | केळापूर | 1190 | 756 | 121 |
| 14 | | वणी | 1133 | 380 | 65 |
| 15 | | पुसद | 120 | 1078 | 235 |
| 16 | | उमरखेड | 988 | 1082 | 192 |
| 17 | नांदेड | किनवट | 1279 | 2127 | 243 |
| 18 | परभणी | हिंगोली | 911 | 484 | 81 |
| 19 | | कळमनुरी | 935 | 507 | 118 |
| 20 | चंद्रपूर | राजूरा | उ.ना. | 652 | 71 |

## सारणी : 6.5
## प्रकल्पांची सद्यस्थिती

जलपाणीसाठा - दलघमी
पाणीवापर - दलघमी
सिंचनक्षेत्र - हेक्टर

| अ.क्र. | प्रकल्पाचा संवर्ग | पूर्ण झालेले प्रकल्प | | | | प्रगतीपथावरील प्रकल्प | | | | भविष्यकालिन प्रकल्प | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नाव संख्या | जल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | जल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | जल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | जल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| अ | मोठे प्रकल्प | पूस | 116.722 | 116.722 | 9183 | उर्ध्व पैनगंगा | 1151 | 1151 | 134300 | निम्न पैनगंगा | 1164 | 1164 | 119970 | | | | |
| | | | | | | अरुणावती | 153 | 153 | 25155 | | | | | | | | |
| | | 1 | 116.722 | 116.722 | 9183 | 2 | 1304 | 1304 | 159455 | 1 | 1164 | 1164 | 119970 | 4 | 2585 | 2585 | 288608 |
| ब | मध्यम प्रकल्प | वाघाडी | 56.605 | 56.605 | 7760 | पैनटाकळी | 80 | 80 | 9505 | 2 | 31 | 31 | 3086 | 2 | | | |
| | | सोनल | 23.956 | 23.956 | 3156 | अडाण | 85 | 85 | 10067 | | | | | | | | |
| | | अधर पूस | 94.48 | 94.48 | 9110 | चापडोह | 31 | 31 | 4560 | | | | | | | | |
| | | गोकी | 57.57 | 57.57 | 7790 | पकडी गुड्डस | | | 3710 | | | | | | | | |
| | | लोणी | 10.83 | 10.83 | 1790 | | | | | | | | | | | | |
| | | नागझरी | 8.95 | 8.95 | 1250 | | | | | | | | | | | | |
| | | डोंगरगांव | 9.17 | 9.17 | 1260 | | | | | | | | | | | | |
| | | सायखेडा | 37.095 | 37.095 | 3116 | | | | | | | | | | | | |
| | | अमलनाला | 25.2 | 25.2 | 3900 | | | | | | | | | | | | |
| | | कोराडी | 37.064 | 37.064 | 3834 | | | | | | | | | | | | |
| | | एकबूर्जी | | | 2429 | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | 0 | | | |
| | | 11 | 360.92 | 360.92 | 45395 | 4 | 197 | 197 | 27842 | 2 | 31 | 31 | 3086 | 17 | 589 | 589 | 76323 |
| क | लघु राज्यस्तर | 129 | 260.816 | 260.816 | 48828 | 61 | 182 | 182 | 30659 | 11 | 30 | 30 | 5972 | 201 | | | |
| | | | | | | | | | | 109 | 200 | 200 | 32900 | 109 | | | |
| | | 129 | 260.816 | 260.816 | 48828 | 61 | 182 | 182 | 30659 | 120 | 230 | 230 | 38872 | 310 | 673 | 673 | 118359 |
| ड | लघु प्रकल्प स्थानिकस्तर | 168 | 59.999 | 59.999 | 11116 | 18 | 9 | 9 | 2074 | 17 | 2 | 2 | 336 | 203 | | | |
| | | | | | | | | | | 109 | 1 | 1 | 622 | 109 | | | |
| | | 168 | 59.999 | 59.999 | 11116 | 18 | 9 | 9 | 2074 | 126 | 3 | 3 | 958 | 312 | 71 | 71 | 14148 |
| | एकूण : | 309 | 798.457 | 798.457 | 114522 | 85 | 1692 | 1692 | 220030 | 249 | 1428 | 1428 | 162886 | 643 | 3918 | 3918 | 497438 |

सारणी : 6.6

**जलसंपत्तीचा ताळेबंद**

जलसंपत्ती - दलघमी


| अक्र | उपलब्धता | |
|---|---|---|
| 1 | **भूपृष्ठावरील** | |
| | अ) नैसर्गिक | |
| | 1) 75 टक्के विश्वासार्हतेने | 4584 |
| | 2) 50 टक्के विश्वासार्हतेने | 6417 |
| | 3) सरासरीने | 5500 |
| | 4) नियोजनासाठी | 5333 |
| | ब) मानवप्रबंधित | |
| | 1) नागरी वापरातून पुनरुद्भव (80 %) | 78 |
| | 2) उद्योग धंदयातील पुनरुद्भव (97.5%) | 18 |
| | 3) इतर खोऱ्यातून संक्रमित झालेले पाणी | 15 |
| | **एकूण (1 ब)** | **111** |
| 2 | मानवनिर्मित | |
| | लाभक्षेत्रातील पुनर्भरण (5333+111-307-681=4456) च्या10 % | 446 |
| **3** | **एकूण उपलब्धता (5333+111+436)** | **5890** |
| | 1) भूजल उपलब्धता (वार्षिक एकूण पुनर्भरण ) | 2449 |
| | 2) भूजल वापरास मुभा ( 2449 च्या 65 %) | 1592 |

| अक्र | वापर (सन2030) | |
|---|---|---|
| 4 | **भूपृष्ठावरील** | |
| | अ) घरगुती वापरासाठी | |
| | 1) नागरी | 97 |
| | 2) ग्रामीण | 123 |
| | 3) पशुधन | 69 |
| | एकूण | 289 |
| | ब) उद्योगधंदयासाठी | 18 |
| | एकूण सिंचनेतर वापर | **307** |
| 5 | इतर उपखोऱ्यात स्थलांतरीत पाणी | 681 |
| 6 | सिंचनासाठी उपलब्ध भूपृष्ठावरील पाणी (5333+111-307-681+446) | 4902 |
| **7** | एकूण वापर (307+681+4892) | **5890** |
| | अ) भूजलाचा सध्याचा सिंचनासाठी वापर | 298 |

टीपा : 1) भूजल उपलब्धतमुळे उपखोऱ्याच्या एकूण उपलब्धतेत वाढ होणार नाही ; भूजलाचा जेवढा उपसा होईल तेवढा नदी प्रवाह घटत जाईल; म्हणून एकूण उपलब्धतेचा आकडा काढताना भूजल उपलब्धतेचा विचार घेतलेला नाही.

2) संकलीत अंदाजासाठी सर्व पाण्याचा उपयोग भूपृष्ठावरील पाण्यातून दाखविला आहे. पण एकूण वापरापैकी अधिकाधिक 446+1592= 2038 भूजल माध्यमातून शक्य आहे.

3) पाणी वापरांचे नियोजन उपलब्ध येवा मालिकेवर आधारित आहे.




| उपखोऱ्याचे स्थान | उपखोरे क्र. | उपखोऱ्यांची नावे |
|---|---|---|
| | 10 | पूर्णा (तापी) |
| | 7 | वर्धा |
| | 5 | गोदावरी - सुधा - स्वर्णा |
| | 2 | गोदावरी निम्न स्रोत (पैठण धरणाखाली) |
| | 3 | पूर्णा (दुधना सहीत) |

# उपखोरे : 7

# वर्धा

## 1.0 भौगोलिक तपशील

या उपखोऱ्यात वर्धा ही मुख्य नदी आहे. वर्धा नदी मध्यप्रदेशातील सातपुडा पर्वताच्या दक्षिण भागातून उगम पावते व वैनगंगा नदीला चपराळा या गावाजवळ मिळते. या उपखोऱ्याचे भौगोलिक क्षेत्रफळ 22312 चौकिमी आहे. या उपखोऱ्यात अकोला, अमरावती, यवतमाळ, नागपूर, वर्धा व चंद्रपूर या जिल्ह्यातील खालील तालुक्यांचा समावेश (नकाशा 7.1) होतो. चांगल्या जमिनी असणारे व चांगला पाऊस मिळणारे सघन शेतीला अत्यंत अनुकूल असे हे उपखोरे आहे.

**अकोला** : 1) कारंजा ,

**अमरावती** : 1) अमरावती 2) चांदूर रेल्वे 3) चांदूर बाजार 4) तिवसा 5) वरूड 6) नांदगाव (खंडेश्वर) 7) मोर्शी

**यवतमाळ** : 1) यवतमाळ 2)बाभूळगाव 3)कळंब 4)राळेगाव 5)वणी 6)मोरगाव 7)नेर

**वर्धा** : 1) वर्धा 2) आर्वी 3) आष्टी 4) हिंगणघाट 5) कारंजा 6) सेलू 7) देवळी 8) समुद्रपूर

**नागपूर** : 1) नागपूर 2)काटोल 3)नरखेड 4)उमरेड 5)भिवापूर 6)कळमेश्वर 7) हिंगणा

**चंद्रपूर** : 1) चंद्रपूर 2) गोंडपिंपरी 3) भद्रावती 4) वरोरा 5) राजुरा 6) कोरपना

मुख्य नदी, तिच्या उपनद्या इत्यादी बाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

लांबी -किमी, तलांक - मी

| अक्र | नदी | उपनदी | लांबी | उगमस्थान | | संगमस्थान | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ठिकाण | तलांक | ठिकाण | तलांक |
| 1 | वर्धा | | 486 • | गाविलगड (म.प्र) | 780 | चपराळा वैनगंगा नदीस | 150 |
| 2 | | कार | 34 | पारडी | 457 | वहाज | 348 |
| 3 | | जाम | 47 | चणकापूर | 488 | आमनेर वर्धा नदीस | 378 |
| 4 | | वेणा | 129 | खैरी | 357 | दिंडोरा | 202 |
| 5 | | बेंबळा | 63 | पिंपळखुटा | 267 | सावंगी | 249 |
| 6 | | वाकळी | 35 | मांडाळा | 366 | आंतरडोह | 331 |

1.1 विस्तार : या उपखोऱ्याचा क्षेत्रिय विस्तार अक्षांश 19° 15′ ते 21° 27′ उत्तर व रेखांश 77° 25′ ते 79° 48′ पूर्व हयामध्ये आहे.

• महाराष्ट्रातील उपखोऱ्याच्या मर्यादेत.

1.2 चतु:सीमा : या उपखो-याचा आकार लांबट निमुळत्या पानासारखा आहे. उपखो-याच्या चतु:सीमा खालीलप्रमाणे आहेत.

| अक्र | दिशा | तपशील |
|---|---|---|
| 1 | उत्तर | सातपुडा पर्वत रांगा, मध्य प्रदेश |
| 2 | पूर्व | मध्य वैनगंगा उपखोरे क्र.8 |
| 3 | पश्चिम | पूर्णा (तापी) उपखोरे क्र.10 |
| 4 | दक्षिण | पैनगंगा उपखोरे क्र.6 |

## 2.0 हवामान

या उपखो-यातील वार्षिक सरासरी पर्जन्यमान 1039 मिमी आहे. हा मध्यम पावसाचा प्रदेश आहे. साधारणतः 85 टक्के पाऊस नैऋत्य मोसमी वाऱ्यामुळे जून ते सप्टेंबर दरम्यान, 8 टक्के पाऊस ईशान्य मोसमी वाऱ्यामुळे ऑक्टोबर ते डिसेंबर दरम्यान व 7 टक्के पाऊस डिसेंबर नंतर पडतो. उपखोऱ्यातील हवामान विषयक इतर माहिती व पर्जन्यमानातील दोलायमानता पुढे दिलेली आहे-

तपमान - अंश से,पर्जन्यमान-मिमी

| अक्र | | परिमाण | वर्ष | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1 | सर्वात अधिक पाऊस | 1374 | | डोंगरगाव (जि.चंद्रपूर) |
| 2 | सर्वात कमी पाऊस | 522 | -- | आमगाव (ता.हिंगणा) |
| 3 | सर्वात अधिक तपमान | 47 | 1993 | वर्धा |
| 4 | सर्वात कमी तपमान | 7 | 1968 | वर्धा |

कृषि- हवामान वर्गीकरणानुसार या उपखोऱ्याचा तपशील खालील प्रमाणे आहे:

7- निश्चित पावसाचा मुख्यतः खरीप पिकांचा विभाग (ARK) व 8- मध्यम ते साधारण जास्त पावसाचा विभाग (MR).

पर्जन्यमानातील दोलायमानता गुणांक 28 (तक्ता 2.5.8) आहे.उपखोऱ्यातील माहवार पर्जन्यमानाचा तपशील सारणी 7.1 मध्ये दिलेला आहे.उपखोऱ्यातील पर्जन्यमापन केंद्राचा तपशील सारणी 7.2 मध्ये दिला आहे.

2.1 बाष्पीभवन : या उपखोऱ्यातील सर्वाधिक बाष्पीभवन मे महिन्यात सरासरी 325 मिमी तर सर्वात कमी बाष्पीभवन डिसेंबर महिन्यात सरासरी 82 मिमी होते.माहवार बाष्पीभवना बाबतची माहिती सारणी 7.1 मध्ये दिलेली आहे.

## 3.0 जलसंपत्तिची उपलब्धता :

3.1 भूपृष्ठीय जलसंपत्ति या उपखोऱ्यातील एकूण सरासरी येवा 5633 दलघमी आहे. वर्ष 1960 ते 1981 या 22 वर्षाच्या माहितीवर आधारभूत या उपखोऱ्यातील जल उपलब्धता खालीलप्रमाणे आहे-

| | |
|---|---|
| 75 % विश्वासार्हतेने | 4177 दलघमी |
| 50 % विश्वासार्हतेने | 5067 दलघमी. |

येवा मोजण्याची ठिकाणे व वेगवगळ्या विश्वासार्हतेचा येवा याबाबतची माहिती अनुक्रमे सारणी 7.3 व 7.4 मध्ये दर्शविण्यात आली आहे.

3.2 भूशैलीय रचना

भूपृष्ठिय स्थिति (भूरुप वर्णन) : उपखोऱ्यात साधारण 10 टक्के भूभाग अतिविच्छेदीत व डोंगराळ , 52 टक्के पठारी, 36 टक्के सपाट व 2 टक्के गाळाचा आहे. यात भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा निर्देशित 117 पाणलोट क्षेत्रे आहेत. अशा प्रकारे पठारी आणि सपाट व गाळाच्या भागाचे प्रमाण 90 टक्के असून सलग शेतीला ही स्थिति अत्यंत अनुकूल आहे.

भूपृष्ठीय शैलस्थिति : उपखोऱ्यात विविध प्रकारचे भूस्तर आढळतात. सर्वात खाली जुने ग्रॅनाईट/ नाईस, त्यावर विंध्यन संघनीकृत गाळाचे खडक, त्यावर गोंडवन अर्धसंघनीकृत गाळस्तरांचे खडक, त्यावर लॅमेटा व त्यावर लाव्हा थरापासून तयार झालेला दक्षिणी कातळ खडक (डेक्कन ट्रॅप) व सर्वात वर नद्यांच्या काठचा गाळ.

उपखोऱ्यातील सर्वाधिक क्षेत्र दक्षिणी कातळ खडकाने व्यापलेले असून त्यात प्रामुख्याने अकुहरी बेसाल्टचे प्राबल्य आहे. गाळाचा प्रस्तर मुख्यत्वे वर्धा व इराई नद्यांच्याच काठावर असून त्याची जाडी साधारणपणे 10 ते 25 मीटर आहे.विंध्यन गाळाच्या खडकापैकी चुनखडीचा खडक (Limestone) सिमेंटसाठी खूपच उपयुक्त आहे. त्याच प्रमाणे गोंडवन गाळस्तराच्या खडकातील कोळशाचे संस्तर सुध्दा खनिज दृष्टया खूप उपयुक्त आहेत.

3.3 भूजल संपत्ति : उपखोऱ्यातील भूजलाची स्थिति विविध भूस्तरांमुळे अधिक गुंतागुतीची आहे. ग्रॅनाईट नाईसेस मध्ये विघटीत भागाबरोबरच त्यातील संधी व तडे असलेला भाग भूजलास उपयुक्त आहे. चुनखडीच्या खडकांत सुध्दा भूजल उपलब्धता मर्यादीत आहे. परंतू गोंडवन गाळस्तरातील सॅन्डस्टोन व कोळशांचे स्तर मात्र भूजलधारणेस खूपच उपयुक्त असून त्याची प्रचिती कोळशाच्या खाणी मधून मोठया प्रमाणावर होणाऱ्या भूजल उपशावरून येते.त्याच प्रमाणे या भागात नलिका कूपाचे यशस्वीतेचे प्रमाण अधिक असून त्यांची क्षमता (15 ते 35 घमी/तास) सुध्दा खूप असल्याचे केंद्रिय भूमीजल परिषदेने केलेल्या अन्वेषणात आढळून आलेले आहे.

दक्षिणी कातळ खडकातील भूजल उपलब्धी मात्र भूरुपस्थितिवर अधिक अवलंबून आहे. त्यामुळे अतिविच्छेदीत व डोंगराळ भागात कमी, पठारी भागात मध्यम आणि सपाट व गाळाच्या भागात भूजल उपलब्धीचे प्रमाण जास्त आहे.

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या 1990 च्या भूजल अंदाजानुसार 2298 दलघमी एकूण पुनर्भरण असून विहिरींची संख्या 1.08 लक्ष आहे. उपखोऱ्यातील 9 लघु पाणलोट क्षेत्रे अति उपशामुळे अतिविकसित व 1 पाणलोट क्षेत्र विकसित अवस्थेत आहेत.अतिविकसित : व 2-1/6,2/6,3/6,4/6, वजा (वर्धा जाम)1-3/5,वका (वर्धा कार)2-1/4,2/4,3/4,4/4, (तालुके वरूड,नरखेड,कारंजा).

विकसितः वजा-1 (वर्धा जाम)(तालुके-आष्टी,कारंजा).तरीपण एकंदर उपखोऱ्यात भूजल विकासास चांगला वाव असून भूजल संपत्तिचा निश्चित अंदाज घेऊनच विहिरींचा कार्यक्रम अधिक विस्तारित करणे शक्य आहे.

3.4 अवर्षणप्रवण क्षेत्र : या उपखोऱ्याचे क्षेत्र 36 तालुक्यात पसरले आहे. हे सर्व तालुके सुकथनकर समितीच्या अहवालानंतर शासनाने अवर्षणप्रवण घोषित केले आहेत. त्यांचा तपशील सारणी 7.5 मध्ये दिला आहे.

## 4.0 जमिनीचा तपशील

या उपखोऱ्यातील जमिनींचे वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे.

| अक्र | तपशील | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | भरड उथळ जमीन | 39 |
| 2 | मध्यम काळी जमीन | 47 |
| 3 | खोल काळी जमीन | 10 |
| 4 | गाळाची जमीन | 4 |

## 5.0 जमिनीचा वापर

लागवडीयोग्य क्षेत्र वनखात्याच्या अखत्यारीतील क्षेत्र,पडीतक्षेत्र इ.बाबतची माहिती खालील प्रमाणे आहे.

क्षेत्र - हजार हेक्टर

| अक्र | जमिनीचा वापर | क्षेत्र | भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | भौगोलिक क्षेत्र | 2231 | |
| 2 | वनखात्याच्या अखत्यारीतील क्षेत्र | 471 | 21.1 |
| 3 | पेरणीसाठी उपलब्ध नसलेले क्षेत्र | | |
| | अ) ओसाड जमीन | 65 | 2.8 |
| | ब) बिगर शेती उपयोगा करिता आणलेली जमीन | 128 | 5.7 |
| 4 | मशागतयोग्य पडिक जमीन | 46 | 2.2 |
| 5 | कायमची कुरणे व चराऊ कुरणे | 119 | 5.3 |
| 6 | किरकोळ झाडे झुडपे यांच्या समुहाखालील क्षेत्र | 21 | 0.9 |
| 7 | चालू पडिक जमीन | 69 | 3.1 |
| 8 | इतर पडिक जमीन | 50 | 2.3 |
| 9 | पेरणीचे निव्वळ क्षेत्र | 1262 | 56.6 |
| 10 | लागवडीयोग्य क्षेत्र (4+5+6+7+8+9) | 1567 | 70 |
| 11 | दुसोटा क्षेत्र | 156 | -- |
| 12 | पिकाखालील एकूण क्षेत्र (9 +11) | 1418 | -- |
| 13 | पीक घनता (12 ÷9 X 100) | 112 | -- |

पाण्याची, हवामानाची व जमिनीची अनुकूलता असूनही दुसोटा क्षेत्र या उपखोऱ्यात फार कमी आहे. शेतीची अनुकूलता असूनही ग्रामीण लोकसंख्येची घनताही इतर उपखोऱ्याच्या तुलनेने कमी आहे.

## 6.0 लोकसंख्या व पशुधन

6.1 लोकसंख्या :सन 1991 च्या जनगणनेनुसार या उपखोऱ्यातील एकूण लोकसंख्या 37.13 लक्ष आहे. या उपखोऱ्यात सन 2030 पर्यंत होणारी लोकसंख्येतील वाढ, लोकसंख्या घनता इ.खालील प्रमाणे अपेक्षित आहे.

लोकसंख्या - हजारात,लोकसंख्या घनता - प्रतिचौकिमी

| अक्र | लोकसंख्या तपशील | 1991 | 2030 |
|---|---|---|---|
| 1 | नागरी | 983 | 2012 |
| 2 | ग्रामीण | 2730 | 5460 |
| 3 | एकूण | 3713 | 7472 |
| 4 | लोकसंख्या घनता | 166 | 335 |
| 5 | ग्रामीण लोकसंख्या घनता | 122 | 244 |

6.2 पशुधन : सन 1992 च्या मोजणीनुसार या उपखोऱ्यात एकूण पशुधन 22.32 लक्ष इतके आहे. पशुंची वर्गनिहाय माहिती खालील प्रमाणे आहे-

| म्हैस व रेडे | गाय व बैल | एकखुरी व उंट | शेळी मेंढी | डुकरे | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| 213584 | 1327560 | 2096 | 662259 | 2632 | 2231828 |

6.3 इतर तपशील : या उपखोऱ्यात एकूण 37 नगरपरिषदा आहेत. नगर परिषदांची यादी सारणी 7.6 मध्ये दिली आहे. शेत मजुरांची संख्या 9.5 लक्ष असून इतर मजुरांची संख्या 5.8 लक्ष आहे.

## 7.0 पाणीवापर

7.1 सिंचनासाठी वापर : या उपखोऱ्यातील वर्गनिहाय प्रकल्प म्हणजे मोठे, मध्यम, लघु प्रकल्प, कोल्हापूर पध्दतीचे बंधारे, पाणीसाठा, पाणीवापर, सिंचनक्षेत्र, तसेच पूर्ण झालेले, प्रगतिपथावरील व भविष्यकालीन प्रकल्प यांच्या तपशीलवार माहितीसाठी सारणी 7.7 पहावी. पूर्ण झालेल्या प्रकल्पांची निर्मित सिंचन क्षमता 108587 हेक्टर असून त्याचा पाणीवापर 694 दलघमी आहे. सन 2030 पर्यंत एकूण क्षमता 430757 हेक्टर होईल व त्याचा पाणीवापर 2890 दलघमी राहिल.

7.2 सिंचनेतर पाण्याचा वापर : सिंचनेतर उपयोगासाठी या उपखोऱ्यातील सध्याची गरज 325 दलघमी आहे. सन 2030 पर्यंतची ती 564 दलघमी होईल. या पाण्याचा तपशील खालील प्रमाणे आहे. यात उद्योगासाठी लागणाऱ्या 291 दलघमी पाण्याचा अंतर्भाव आहे.

पाणी - दलघमी

| अक्र | तपशील | 1991 | | | | 2030 |
|---|---|---|---|---|---|---|
| | | नागरी | ग्रामीण | पशूधन | एकूण | |
| 1 | घरगुती वापरासाठी | 42 | 55 | 48 | 145 | 273 |
| 2 | उद्योगासाठी पाणी | | | | 180 | 291 |
| | एकूण | | | | 325 | 564 |

7.3 <u>जलसंपत्तिचा ताळेबंद:</u> भूपृष्ठावरील व भूपृष्ठाखालील उपलब्ध जलसंपत्ति घरगूती वापरासाठी, उद्योगासाठी व सिंचनासाठी वापर व त्यात होणारा पुनरुद्भव याचा ताळेबंद सारणी 7.8 मध्ये दिलेला आहे.

7.4 <u>लाभक्षेत्र विकास :</u> सद्य:स्थिति खालीलप्रमाणे आहे-

क्षेत्र -हजार हेक्टर

| भूविकास भाग-1ची कामे | | | भूविकास भाग-2 ची कामे | | | प्रकल्पाच्या लाभक्षेत्रा व्यतिरिक्त अन्य क्षेत्रात झालेले जमीन सपाटी-करणाचे (भाग-2) क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|
| लाक्षेविप्रा कडील प्रकल्प | लाक्षेविप्रा बाहेरील प्रकल्प | एकूण | लाक्षेविप्रा कडील प्रकल्प | लाक्षेविप्रा बाहेरील प्रकल्प | एकूण | |
| 26.39 | 52.19 | 78.58 | — | 24.95 | 24.95 | 1.09 |

7.5 <u>सन 1970 पूर्वीची धरणे:</u> सन1970 पूर्वी या उपखो-यात पूर्ण झालेली खालील प्रमुख धरणे आहेत. त्यांच्या दीर्घकालिन अनुभवाचा यापुढील नियोजनात उपयोग करून घेणे आवश्यक आहे.

| अक्र | प्रकल्पाचे नाव | वर्ष |
|---|---|---|
| 1 | बोर | 1965 |
| 2 | डोंगरगाव | उ.ना. |
| 3 | मालखेड | उ.ना. |

## 8.0 पीक रचना

उपखोऱ्यात पेरणीखालचे क्षेत्र 12.62 लक्ष हेक्टर आहे. जमीन व हवामानास अनुकूल प्रमुख पिके 1) खरीप ज्वारी 2) तूर 3) कापूस 4) सोयाबीन 5) मिरची 6) भाजीपाला 7) संत्रा 8) आवळा ही आहेत.काही प्रमुख पिकांची दर हेक्टरी सरासरी उत्पादकता खालील प्रमाणे आहे-

उत्पादकता - क्विं/हेक्टर

| अक्र | प्रमुख पिके | उत्पादकता |
|---|---|---|
| 1 | खरीप ज्वारी | 12.08 |
| 2 | तूर | 7.46 |
| 3 | कापूस | 1.52 |
| 4 | सोयाबीन | 9.67 |

कापूस हे महत्वाचे पीक असूनही त्या पिकांची उत्पादकता फार कमी आहे. ती वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न व्हावे लागतील.

## 9.0 उद्योगधंदे

या उपखोऱ्यात कृषि आधारित उद्योगधंदे सुरु करण्यास वाव आहे. तथापि सध्या सहा साखर कारखाने व 3 सूतगिरण्या आहेत.

## 10.0 जलविद्युत निर्मिति

उपखो-यात सध्या जलविद्युत प्रकल्प नाहीत; पण भविष्यात सहा लघु जलविद्युत प्रकल्प प्रस्तावित आहेत व यांची क्षमता 2.35 मेवॅ आहे. जलविद्युत प्रकल्पाची नावे व त्याची विद्युत निर्मिति क्षमता पुढील प्रमाणे आहे.

क्षमता - मेवॅ

| अक्र | प्रकल्पाचे नाव | क्षमता |
|---|---|---|
| 1 | निम्न वेणा | 0.25 |
| 2 | निम्न वेणा ( उजवा तट कालवा) | 020 |
| 3 | धाम | 0.75 |
| 4 | निम्न वर्धा | 1.00 |
| 5 | कार (डावा तट कालवा) | 0.10 |
| 6 | जाम कालवा प्रपात | 0.05 |

## 11.0 दळणवळणाची साधने

या उपखोऱ्यातून मुंबई-हावडा व चेन्नई-दिल्ली हे ब्रॉडगेज रेल्वे मार्ग तसेच आर्वी- पुलगाव नॅरोगेज मार्ग जातात.

धुळे-कलकत्ता राष्ट्रीय महामार्ग 6 व बनारस - नागपूर - हैद्राबाद राष्ट्रीय महामार्ग 7 व खालील राज्यमहामार्ग या उपखोऱ्यातून जातात.

| अक्र | महामार्गाचे नाव | महामार्ग |
|---|---|---|
| 1 | बोरी - वर्धा - देवळी - यवतमाळ | 3 |
| 2 | यवतमाळ - चंद्रपूर - दुर्ग | 7 |
| 3 | वणी - वरोरा | 233 |
| 4 | राळेगाव - वडकी - वणी | 236 |
| 5 | चांदूर बाजार - तिवसा - धामणगाव - यवतमाळ | 237 |
| 6 | आर्वी - देऊरवाडा | 241 |
| 7 | अमरावती - पुलगाव - हिंगणघाट | 243 |
| 8 | नरखेड - मोवाड | 246 |
| 9 | कोंढाळी - काटोल - सावरगाव - चिंचोली | 247 |
| 10 | नागपूर - काटोल - वरूड | 248 |
| 11 | नागपूर - हिंगणा - हिंगणी | 255 |
| 12 | आर्वी - वर्धा - वैगाव - राळेगाव | 257 |
| 13 | पुलगाव - वर्धा - समुद्रपूर - गिरड - उमरेड | 258 |
| 14 | राजूरा - गोविंदपूर - एदलाबाद | 265 |
| 15 | बल्लारपूर - गोंडपिंपरी | 267 |

## 12.0 भावी नियोजनाची दिशा :

12.1 या उपखोऱ्यातील पाण्याची वार्षिक सरासरी उपलब्धता 5633 दलघमी आहे. गोदावरी लवादाच्या निर्णयानुसार या उपखोऱ्यातील पाणी वापराची अनुमती खालील प्रमाणे आहे:-

| | | |
|---|---|---|
| 1) | तुलाना प्रकल्पस्थळापर्यन्त 100 टक्के उपलब्ध पाणी (मध्यप्रदेशचे 10 अघफू आरक्षण वगळून) | 1893 |
| 2) | चारगाव,निरगुडा,बेंडारा प्रकल्पस्थळापर्यन्त 100 टक्के उपलब्ध पाणी | 104 |
| 3) | उर्वरीत वर्धा खोऱ्यातील हिस्सा (26 अघफू) (कोणत्याही प्रकल्पस्थळी वार्षिक पाणीवापर 1.5 अघफू पेक्षा अधिक नको या अटीच्या अधीन) | 736 |

अशा प्रकारे 2733 दलघमी पाणी वापरास उपलब्ध आहे.

या उपखोऱ्यातील ऊर्ध्व वर्धा प्रकल्पातून अमरावती शहर परिसरात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला 681 दलघमी पाणीपुरवठा केला जातो. पूर्णा (तापी) (उपखोरे क्र 10) मध्ये अशा प्रकारे पाणी स्थलांतर होत असल्यामूळे वापरास निव्वळ उपलब्धी 2052 दलघमी येते.

वर्धा उपखोऱ्याच्या स्रवण क्षेत्रात 1996 पावेतो 12 मध्यम व 406 लघु प्रकल्प बांधून पूर्ण आहेत. एक माजी मालगुज़ारी तलावही आहे, ज्याची सिंचनक्षमता 142 हेक्टर आहे. या सर्व प्रकल्पाद्वारे 565 दलघमी पाणी साठा निर्माण करण्यात आलेला आहे. ऊर्ध्व वर्धा हा व इतर 3 मोठे प्रकल्प बांधकामाधीन आहेत.

वर्धा उपखोऱ्यामध्ये निश्चित झालेला पाणी वापर (1996 पावेतो) 694 दलघमी आहे.

वर्ष 2030 पर्यन्त या मध्ये 2196 दलघमी पाणी वापराची भर पडण्याचे निश्चित झाले आहे. अशा प्रकारे या खोऱ्याचा अंतिमतः निश्चित झालेला नियोजित पाणी वापर 2890 दलघमी आहे. पाणी वापराच्या व्यवस्थेत आजवर झालेल्या कामाच्या तुलनेत अजून तिप्पट काम होणे बाकी आहे.

12.2 वर्धा नदीचा प्रवाह प्रामुख्याने मध्यप्रदेश, महाराष्ट्र आणि आंध्रप्रदेश या तीन राज्यात आहे. वर्धा नदीवर आंतरराज्यीय प्रकल्प नाही. गोदावरी तंटा लवाद परिशिष्ट 'ग' भाग 4 मुद्दा 1 (ब) नुसार बांधकामाधीन प्रकल्पांना 254.7 दलघमी (9 अघफू) आणि भविष्यकालिन प्रकल्पांना 28.3 दलघमी (1 अघफू) पाणी असे एकूण 283.2दलघमी (10 अघफू) वापराची मुभा मध्यप्रदेश राज्याला देण्यात आलेली आहे. महाराष्ट्राला तुलाना, बेंडारा, निरगुडा आणि चारगाव प्रकल्पापर्यन्त संपूर्ण येवा (10 अघफू मध्यप्रदेशाचे आरक्षण सोडून) वापराची मुभा आहे. परंतु या प्रकल्पाखालील भागात सीमेपर्यन्त फक्त 736 दलघमी (26 अघफू) पाणी वापराची अनुमती महाराष्ट्र राज्याला आहे.

12.3 वर्धा उपखोऱ्यातील ऊर्ध्व वर्धा हा मोठा प्रकल्प बांधकामाधीन आहे. या प्रकल्पावरील वनजमिनीचा प्रश्न पण सुटलेला आहे. या उपखोऱ्यात तुलाना प्रकल्पस्थळापर्यन्त 100 टक्के पाणी वापरास मूभा असल्यामुळे आर्थिक व्यवहार्यतेच्या मर्यादेत राहून कमी विश्वासार्हतेने (किमान सरासरी) नियोजन करणे शक्य आहे. तुलाना (चारगांव, बेंडारा, निरगुडा) प्रकल्पस्थळाच्या खाली सुध्दा उर्वरीत वर्धा खोऱ्यात 736 दलघमी (26 टीएमसी पर्यन्त) पाणी वापरास मूभा आहे. पाण्याचा वापर करण्यासाठी साठवणूक वाढविण्याची गरज दिसते. यानुसार 100 टक्के पाणी उपलब्ध असलेल्या भागातील आणि उर्वरीत उपखोऱ्यातील पाण्याचे फेरनियोजन करण्याची गरज आहे. या उपखोऱ्यामध्ये मध्यप्रदेशातील पाण्याचा 283.1 दलघमी (10 टीएमसी) वापर होण्यास वन जमिनीच्या अडचणीमुळे बराचसा काळ जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. या दरम्यानच्या काळात या पाण्याचा फायदा राज्याला घेता येतो. नियोजनामध्ये तशी तरतूद करण्याची गरज आहे. याचाच अर्थ पाण्याच्या उपयोगाच्या सोईमध्ये वाढ करणे अभिप्रेत आहे. पाण्याचे साठे वाढविणे, धरणाची उंची

वाढविणे, नविन जलसाठे निर्माण करणे, कालव्याद्वारे भूजलामध्ये साठा वाढविणे अशा पर्यायांचा विचार करण्याची गरज आहे.

12.4 आयोगाने वर्धा उपखोऱ्यातील पाण्याच्या नियोजना बाबत अमरावती येथे एक कार्यशाळा आयोजित केली होती. या उपखोऱ्यामध्ये पाण्याचा वापर वाढविण्याच्या दृष्टीने पीकपध्दती बदलणे, शेतकऱ्यांची स्थिति नवी सिंचनव्यवस्था स्विकारण्याइतपत अनूकूल करणे. या बाबीकडे लक्ष देण्याची नितांत गरज आहे असे त्यामध्ये लक्षात आले.

खरीप हंगामामध्ये पावसाच्या निश्चितीमुळे सिंचनासाठी पाण्याचा वापर नगण्य आहे. संत्री हे पीक भूजलावर अवलंबून आहे. रब्बी हंगामात मुख्य पीक कापसाचे आहे. त्याची दरहेक्टरी उत्पादकता अत्यंत कमी आहे. ती वाढवण्यासाठी कापूस उत्पादनाच्या अधिक शास्त्रीय पध्दती रूढ करणे प्राथम्याने गरजेचे आहे. चांगल्या पावसाच्या वर्षात कापसाला सिंचनाच्या पाण्याची मागणी येत नाही आणि उन्हाळी हंगामात सिंचन करण्याची पध्दती अजून विकसित झालेली नाही. अशा परिस्थितित जलाशय प्रकल्पामध्ये पाण्याचा साठा भरपूर असून सुध्दा पाण्याचा वापर फारच कमी असे दिसून येते. बोर प्रकल्पाबद्दलही सध्या अशीच स्थिति आहे. गेल्या 40 वर्षातील पाणी वापरावरून असे दिसून येते की, या प्रकल्पात पाण्याच्या वापराच्या सुयोग्य पध्दती अजून प्रस्थापित झाल्या नाहीत. लाभक्षेत्रात विहिरीवरील सिंचनाद्वारे संत्री सारखे पीक मोठया प्रमाणामध्ये घेतले जाते.

12.5 या उपखोऱ्यात वर्धा नदीवर महाराष्ट्राच्या सरहद्दीवर बंधारा बांधून उपसा सिंचन पध्दतीने विकास करता येईल. वर्धा पैनगंगा संगमाच्या खाली टर्मिनल बंधाऱ्याची आवश्यकता भासते.

12.6 या उपखोऱ्यात वर्धा प्रकल्पाच्या वरच्या भागात (जलाशयाच्या पाणलोटक्षेत्रात) पाण्याची टंचाई आहे. या भागात संत्र्याच्या बागा आहेत. पण विहिरींना अति उपशामुळे पाणी नाही. याला पूरक म्हणून जलाशयामधून उपसा करुन संत्र्याच्या बागांचा विकास करण्याची गरज दिसते.

12.7 या उपखोऱ्यात लघु प्रकल्पांच्या पाण्याचा वापर अलिकडे वाढलेला आहे असे दिसून येते. यासाठी या उपखोऱ्यातील लघु प्रकल्पांना (बांधकामाधीन व भविष्यकालिन) गती देऊन उपखोऱ्याचा विकास करण्याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

12.8 संत्री हे प्रमुख बहुवार्षिक नगदी पीक आहे. पण कालव्याच्या सिंचनावर संत्री हे पीक विकसित होऊ शकत नाही असा अनुभव आहे. म्हणून संत्री या पिकाला भूजलावरच ठेवण्याची गरज आहे. अतिउपशामुळे भूजलामधील साठयामध्ये घट होऊन संत्री हे पीक अडचणीत येत आहे. मोठया प्रकल्पाच्याद्वारे कालवे चालवून त्याचा उपयोग भूजलाच्या साठयात वाढ करण्याच्या दृष्टीने करण्याची गरज आहे. जेणे करुन संत्री या नगदी पिकाला आधार मिळून त्याचा मोठया प्रमाणात विकास होऊ शकेल.

12.9 या उपखोऱ्यात केंद्रीय भूजल मंडळातर्फे बेनोडा (तालुका वरूड) या भागातील पाणलोट क्षेत्रात हवामान शास्त्रीय दृष्टिकोनातील अभ्यासावरून वर्षात 600 ते 650 मिमी पर्जन्य झाल्यास जलवाहक 1.5 मिटरने भरते असे दिसून आले आहे. तसेच संपूर्ण पावसाळयात एकूण पर्जन्याच्या 18.8 टक्के इतके पुनर्भरण होते. येथे 35 टक्यापर्यन्त पुनर्भरण वाढविणे शक्य आहे. त्यादृष्टीने पाणलोटक्षेत्र विकासाच्या कामांना प्राधान्य द्यावे लागेल.

12.10 या उपखोऱ्याच्या वरच्या भागात संत्र्याचे उत्पादन बऱ्याच मोठया प्रमाणात आहे. परंतू त्यावर आधारीत उद्योगधंदे या भागात नसल्यामुळे सर्व कच्चा माल उत्तर भारत व मुंबई भागातील बाजारपेठात ट्रकव्दारे पाठविण्यात येतो. कच्च्या मालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांना तेथे चालना मिळणे आवश्यक वाटते. तसेच संत्रा हा टिकाऊ माल नसल्यामुळे वेळ वाचविण्याचे उद्देशाने निर्यातीची व्यवस्था खोऱ्यातच होणे आवश्यक आहे.

12.11 उपखोऱ्याच्या खालील भागात औष्णीक विद्युतकेंद्रे (म.रा.वि.म. एन.टी.पी.सी., निप्पॉन डेन्रो) आहेत. या भागातील हवामान आधीच कोरडे व तपमान जास्त. त्यात या औष्णिक केंद्राभोंवती तपमानाची तीव्रता अधिकच जाणवते. तसेच ओपन कास्ट माईन्स असल्यामुळे कोळशाची धूळ, विद्युत केंद्रातील कोळशाची राख इत्यादीमुळे येथील एकंदर प्रदूषण वाढलेले आहे. उपखोऱ्यात बुटीबोरी येथे पंचतारांकित औद्योगिक क्षेत्र आहे

12.12 या उपखोऱ्यात वनखात्याच्या ताब्यातील क्षेत्राचे प्रमाण जास्त (भौगोलिक क्षेत्राच्या 21 टक्के) आहे. त्यामुळे वन खात्याच्या जमिनीमुळे 12 प्रकल्प प्रलंबित आहेत. त्यापैकी काही जमीन केवळ झुडपी जंगलाची आहे. तेंव्हा वनखात्याच्या ताब्यातील जमिनीच्या उपयोगाचा अधिक व्यावहारिक विचार होऊन अडलेले प्रकल्प कार्यान्वित करण्याची गरज आहे.

12.13 उपखोऱ्यात रेशिम उद्योगाला फार मोठया प्रमाणात वाव आहे.

12.14 या उपखोऱ्यात बल्लारपूर भागातील जंगलात व इतरत्र बांबू बऱ्याच प्रमाणात उपलब्ध आहे. त्यामुळे येथे कागद कारखाने मोठया प्रमाणावर आहेत.

सारणी : 7.1

## उपखोऱ्याच्या भौगोलिक प्रदेशाचा एकत्रित हवामानाचा तपशील

पर्जन्यमान, बाष्पीभवन-मिमी

| अक्र | महिना | पर्जन्यमान | बाष्पीभवन | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | उर्ध्व वर्धा धरणस्थळ | शिरपूर | सरासरी |
| 1 | जानेवारी | 11 | 80 | 92 | 86 |
| 2 | फेब्रुवारी | 18 | 130 | 102 | 116 |
| 3 | मार्च | 16 | 230 | 153 | 192 |
| 4 | एप्रिल | 9 | 270 | 179 | 225 |
| 5 | मे | 11 | 390 | 260 | 325 |
| 6 | जून | 174 | 290 | 162 | 226 |
| 7 | जुलै | 267 | 170 | 108 | 139 |
| 8 | ऑगस्ट | 299 | 130 | 126 | 128 |
| 9 | सप्टेंबर | 152 | 120 | 111 | 116 |
| 10 | ऑक्टोबर | 46 | 140 | 101 | 121 |
| 11 | नोव्हेंबर | 16 | 100 | 102 | 101 |
| 12 | डिसेंबर | 20 | 80 | 83 | 82 |
| | एकूण | 1039 | | | 1854 |

हंगाम निहाय बाष्पीभवन

| अक्र | हगाम | बाष्पीभवन |
|---|---|---|
| 1 | खरीप | 442 |
| 2 | रब्बी | 445 |
| 3 | उन्हाळी | 967 |
| | एकूण | 1854 |

सारणी : 7.2

**पर्जन्यमापन केंद्रांचा तपशील**

पर्जन्य-मिमी

| अक्र | केंद्राचे नाव | प्रकार | स्वामित्व | आधार सामुग्री उपलब्धतेचे प्रारंभिक वर्ष | वार्षिक सरासरी पर्जन्य |
|---|---|---|---|---|---|
| 1 | आमला | सा.प. | पा.खा. | 1980 | 643 |
| 2 | अंजन सिंधी | सा.प. | पा.खा. | 1980 | 755 |
| 3 | आर्वी मोठी | सा.प. | पा.खा. | 1980 | 736 |
| 4 | आर्वी लहान | सा.प. | पा.खा. | 1980 | 667 |
| 5 | गुमगाव | सा.प. | पा.खा. | 1980 | 924 |
| 6 | कुऱ्हा | सा.प. | पा.खा. | 1980 | 672 |
| 7 | माहुली चोर | सा.प. | पा.खा. | 1980 | 719 |
| 8 | मंगरूळ दसगीर | सा.प. | पा.खा. | 1980 | 828 |
| 9 | नांदगाव खंडे | सा.प. | पा.खा. | 1980 | 792 |
| 10 | नांदुरा (बु) | सा.प. | पा.खा. | 1980 | 755 |
| 11 | राजुरा | सा.प. | पा.खा. | 1980 | 634 |
| 12 | सायफळ | सा.प. | पा.खा. | 1980 | 806 |
| 13 | शिवनगाव | सा.प. | पा.खा. | 1980 | 562 |
| 14 | तळेगाव | सा.प. | पा.खा. | 1980 | 649 |
| 15 | आमगाव | सा.प. | पा.खा. | 1986 | 521 |
| 16 | बाजारगाव | सा.प. | पा.खा. | 1980 | 910 |
| 17 | मारसिंगी | सा.प. | पा.खा. | 1986 | 980 |
| 18 | देवळी | सा.प. | पा.खा. | 1980 | 898 |
| 19 | कगवाडा | सा.प. | पा.खा. | 1987 | 825 |
| 20 | हिंगणा | सा.प. | पा.खा. | 1980 | 1039 |
| 21 | कन्होली बारा | सा.प. | पा.खा. | 1976 | 843 |
| 22 | खरांगणा | सा.प. | पा.खा. | 1980 | 720 |
| 23 | माडेगाव | सा.प. | पा.खा. | 1980 | 823 |
| 24 | मरगसूर | सा.प. | पा.खा. | 1980 | 1368 |
| 25 | सिरपूर | सा.प. | पा.खा. | 1985 | 870 |
| 26 | बटीबोरी | सा.प. | पा.खा. | 1980 | 943 |
| 27 | बेसुर | सा.प. | पा.खा. | 1980 | 1529 |
| 28 | हिंगणघाट | सा.प. | पा.खा. | 1985 | 1263 |
| 29 | हमदापूर | सा.प. | पा.खा. | 1985 | 868 |
| 30 | कानगाव | सा.प. | पा.खा. | 1980 | 1118 |
| 31 | रिधोरा | सा.प. | पा.खा. | 1980 | 811 |

पर्जन्य-मिमी

| अक्र | केंद्राचे नाव | प्रकार | स्वामित्व | आधार सामुग्री उपलब्धतेचे प्रारंभिक वर्ष | वार्षिक सरासरी पर्जन्य |
|---|---|---|---|---|---|
| 32 | सिंधी | सा.प. | पा.खा. | 1980 | 861 |
| 33 | सिरसगाव | सा.प. | पा.खा. | 1980 | 906 |
| 34 | खंडेश्वर | सा.प. | पा.खा. | 1985 | 958 |
| 35 | वर्धा | सा.प. | पा.खा. | 1980 | 979 |
| 36 | गिरड | सा.प. | पा.खा. | 1990 | 957 |
| 37 | नेद्रा | सा.प. | पा.खा. | 1990 | 740 |
| 38 | समुद्रपूर | सा.प. | पा.खा. | 1990 | 957 |
| 39 | वांद्रा | सा.प. | पा.खा. | 1990 | 919 |
| 40 | दिंडोरा | सा.प. | पा.खा. | 1989 | 1118 |
| 41 | कोना | सा.प. | पा.खा. | 1980 | 1177 |
| 42 | मारेगांवरोड | सा.प. | पा.खा. | 1980 | 735 |
| 43 | पिंपरी | सा.प. | पा.खा. | 1980 | 887 |
| 44 | साखरा | सा.प. | पा.खा. | 1989 | 1030 |
| 45 | शेगांव बु. | सा.प. | पा.खा. | 1980 | 1018 |
| 46 | वरोरा | सा.प. | पा.खा. | 1980 | 821 |
| 47 | वडकी | सा.प. | पा.खा. | 1980 | 1013 |
| 48 | डोंगरगाव | सा.प. | पा.खा. | 1991 | 1374 |
| 49 | कोळगाव | सा.प. | पा.खा. | 1991 | 1080 |
| 50 | आनुसापूर | सा.प. | पा.खा. | 1980 | 1144 |
| 51 | बल्लारपूर | सा.प. | पा.खा. | 1980 | 1128 |
| 52 | घुग्गुस | सा.प. | पा.खा. | 1980 | 902 |
| 53 | कन्हारगाव | सा.प. | पा.खा. | 1980 | 1373 |
| 54 | शेनगाव | सा.प. | पा.खा. | 1980 | 1034 |
| 55 | चिकणी डोमणी | सा.प. | पा.खा. | 1980 | 970 |
| 56 | धनज बु. | सा.प. | पा.खा. | 1980 | 730 |
| 57 | सिंधीविहीरी | सा.प. | पा.खा. | 1981 | 929 |
| 58 | पिंपळ डोह | सा.प. | पा.खा. | 1981 | 883 |

सारणी :7.3
सरितामापन केंद्रांचा तपशील

येवा-दलघमी

| अक्र | केंद्राचे नाव | स्वामित्व | आधार सामुग्री उपलब्धतेचे प्रारंभिक वर्ष | वार्षिक सरासरी येवा |
|---|---|---|---|---|
| 1 | शिरपूर | पा.खा. | 1985 | 2149 |
| 2 | धाबा | पा.खा. | 1988 | 2210 |
| 3 | दिंडोरा | पा.खा. | 1987 | 2982 |
| 4 | वरुडबगाजी | पा.खा. | 1987 | 934 |
| 5 | हिंगणघाट | पा.खा. | 1987 | 1110 |
| 6 | नांदुरा (बु) | पा.खा. | 1987 | 636 |
| 7 | दुगवाडा | पा.खा. | 1987 | 1112 |
| 8 | जलालखेडा | पा.खा. | 1986 | 490 |
| 9 | साडेश्वर | पा.खा. | 1986 | 215 |
| 10 | वडगाव | पा.खा. | 1986 | 280 |
| 11 | नांदगाव | कें.ज.आ. | 1987 | 926 |
| 12 | विषनूर | कें.ज.आ. | 1988 | 854 |
| 13 | हिवरा | कें.ज.आ. | 1988 | 1676 |
| 14 | सिरपूर | कें.ज.आ. | 1985 | 13340 |
| 15 | घुग्गुस | कें.ज.आ. | 1985 | 5388 |
| 16 | बामनी | कें.ज.आ. | 1985 | 14049 |

सारणी : 7.4

**जलसंपत्तीची उपलब्धता**

वर्धा उपखोरे/वर्धा उगम ते ऊर्ध्व वर्धा धरण स्थळापर्यन्त

येवा-दलघमी

| अक्र | वर्ष | वार्षिक येवा | उतरत्या क्रमाने वार्षिक येवा | सगत वर्ष | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1929 | 936 | 2453 | 1944 | |
| 2 | 1930 | 644 | 2008 | 1931 | |
| 3 | 1931 | 2008 | 1983 | 1933 | |
| 4 | 1932 | 1307 | 1789 | 1983 | |
| 5 | 1933 | 1983 | 1745 | 1973 | |
| 6 | 1934 | 1456 | 1718 | 1955 | 10 |
| 7 | 1935 | 1112 | 1689 | 1962 | |
| 8 | 1936 | 887 | 1672 | 1961 | |
| 9 | 1937 | 1212 | 1669 | 1963 | |
| 10 | 1938 | 1403 | 1648 | 1949 | |
| 11 | 1939 | 1082 | 1647 | 1954 | |
| 12 | 1940 | 1512 | 1594 | 1981 | 20 |
| 13 | 1941 | 938 | 1591 | 1975 | |
| 14 | 1942 | 1423 | 1571 | 1959 | |
| 15 | 1943 | 1222 | 1548 | 1970 | |
| 16 | 1944 | 2453 | 1512 | 1940 | |
| 17 | 1945 | 1176 | 1493 | 1988 | |
| 18 | 1946 | 1046 | 1456 | 1934 | 30 |
| 19 | 1947 | 1250 | 1423 | 1942 | |
| 20 | 1948 | 1234 | 1403 | 1958 | |
| 21 | 1949 | 1648 | 1403 | 1938 | |
| 22 | 1950 | 768 | 1399 | 1964 | |
| 23 | 1951 | 1255 | 1389 | 1984 | |
| 24 | 1952 | 688 | 1335 | 1979 | 40 |
| 25 | 1953 | 1185 | 1307 | 1932 | |
| 26 | 1954 | 1647 | 1272 | 1976 | |
| 27 | 1955 | 1718 | 1262 | 1977 | |
| 28 | 1956 | 924 | 1255 | 1951 | |
| 29 | 1957 | 1199 | 1250 | 1947 | |
| 30 | 1958 | 1403 | 1234 | 1948 | 50 |
| 31 | 1959 | 1571 | 1222 | 1943 | |
| 32 | 1960 | 841 | 1218 | 1969 | |
| 33 | 1961 | 1672 | 1212 | 1937 | |

| अंक | वर्ष | वार्षिक येवा | उतरत्या क्रमाने वार्षिक येवा | संगत वर्ष | येवा-दलघमी विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 34 | 1962 | 1689 | 1199 | 1957 | |
| 35 | 1963 | 1669 | 1185 | 1953 | |
| 36 | 1964 | 1399 | 1183 | 1986 | |
| 37 | 1965 | 761 | 1176 | 1945 | |
| 38 | 1966 | 712 | 1112 | 1935 | |
| 39 | 1967 | 859 | 1082 | 1939 | |
| 40 | 1968 | 882 | 1077 | 1978 | |
| 41 | 1969 | 1218 | 1046 | 1946 | |
| 42 | 1970 | 1548 | 1029 | 1972 | |
| 43 | 1971 | 781 | 938 | 1941 | |
| 44 | 1972 | 1029 | 936 | 1929 | |
| 45 | 1973 | 1745 | 935 | 1974 | 75 |
| 46 | 1974 | 935 | 924 | 1956 | |
| 47 | 1975 | 1591 | 916 | 1985 | |
| 48 | 1976 | 1272 | 887 | 1936 | |
| 49 | 1977 | 1262 | 882 | 1968 | |
| 50 | 1978 | 1077 | 859 | 1967 | |
| 51 | 1979 | 1335 | 841 | 1960 | |
| 52 | 1980 | 823 | 823 | 1980 | |
| 53 | 1981 | 1594 | 790 | 1987 | |
| 54 | 1982 | 719 | 781 | 1971 | 90 |
| 55 | 1983 | 1789 | 768 | 1950 | |
| 56 | 1984 | 1389 | 761 | 1965 | |
| 57 | 1985 | 916 | 719 | 1982 | |
| 58 | 1986 | 1183 | 712 | 1966 | |
| 59 | 1987 | 790 | 688 | 1952 | |
| 60 | 1988 | 1493 | 644 | 1930 | |

$\frac{\text{10 टक्के उपलब्धता}}{\text{90 टक्के उपलब्धता}} = 2.2$ $\frac{\text{50 टक्के उपलब्धता}}{\text{90 टक्के उपलब्धता}} = 1.58$

$\frac{\text{50 टक्के उपलब्धता}}{\text{75 टक्के उपलब्धता}} = 1.32$

सारणी : 7.5

**अवर्षणप्रवण क्षेत्र**

क्षेत्र-चौकिमी, लोकसंख्या-हजारात, पर्जन्यमान-मिमी

| अक्र | तालुका | अवर्षणप्रवण | | सरासरी वार्षिक पर्जन्यमान |
|---|---|---|---|---|
| | | क्षेत्र | लोकसंख्या | |
| 1 | काटोल | 715 | 111 | 946 |
| 2 | नागपूर | 318 | 50 | 1112 |
| 3 | उमरेड | 482 | 59 | 1050 |
| 4 | नरखेड | 639 | 117 | 980 |
| 5 | भिवापूर | 206 | 25 | 930 |
| 6 | कळमेश्वर | 63 | 13 | 980 |
| 7 | हिंगणा | 778 | 114 | 1040 |
| 8 | आष्टी | 498 | 67 | 930 |
| 9 | आर्वी | 999 | 133 | 736 |
| 10 | कारंजा | 813 | 78 | 852 |
| 11 | सेलू | 665 | 115 | 861 |
| 12 | हिंगणघाट | 907 | 184 | 1263 |
| 13 | समुद्रपूर | 981 | 100 | 958 |
| 14 | देवळी | 655 | 144 | 899 |
| 15 | वर्धा | 791 | 246 | 979 |
| 16 | चंद्रपूर | 522 | 244 | 1129 |
| 17 | गोंडपिंपरी | 501 | 48 | 1145 |
| 18 | भद्रावती | 911 | 102 | 902 |
| 19 | वरोरा | 1209 | 151 | 821 |
| 20 | राजुरा | 652 | 71 | 1019 |
| 21 | कोरपना | 835 | 87 | 1019 |
| 22 | यवतमाळ | 195 | 50 | 976 |
| 23 | बाभुळगाव | 457 | 79 | 1080 |
| 24 | कळंब | 447 | 55 | 1014 |
| 25 | राळेगाव | 593 | 83 | 1013 |
| 26 | वणी | 571 | 97 | 1109 |
| 27 | मारेगाव | 943 | 61 | 736 |
| 28 | नेर | 452 | 62 | 850 |
| 29 | तिवसा | 890 | 124 | 650 |
| 30 | वरूड | 747 | 182 | 979 |
| 31 | चांदूर (बा) | 57 | 14 | 723 |
| 32 | अमरावती | 169 | 102 | 756 |
| 33 | नांदगाव (ख) | 616 | 92 | 793 |
| 34 | मोर्शी | 665 | 119 | 816 |
| 35 | चांदूर रेल्वे | 906 | 162 | 765 |
| 36 | कारंजा | 471 | 86 | 862 |

सारणी 7.6

**नगरपरिषदांची यादी**

| अक्र | जिल्हा | नांव |
| --- | --- | --- |
| 1 | अकोला | अकोला |
| 2 | अमरावती | चांदूर रेल्वे |
| 3 | | तिवसा |
| 4 | | वरूड |
| 5 | | चांदूर बाजार |
| 6 | | नांदगाव (खंडेश्वर) |
| 7 | | मुर्शी |
| 8 | यवतमाळ | यवतमाळ |
| 9 | | बाभूळगाव |
| 10 | | कळंब |
| 11 | | राळेगांव |
| 12 | | वणी |
| 13 | | मोरगांव |
| 14 | | नेर |
| 15 | वर्धा | वर्धा |
| 16 | | आर्वी |
| 17 | | आष्टी |
| 18 | | हिंगणघाट |
| 19 | | कारंजा |
| 20 | | सेलू |
| 21 | | देवळी |
| 22 | | समुद्रपूर |
| 23 | नागपूर | काटोल |
| 24 | | नरखेड |
| 25 | | उमरेड |
| 26 | | भिवापूर |
| 27 | | कळमेश्वर |
| 28 | | हिंगणा |
| 29 | चंद्रपूर | चंद्रपूर |
| 30 | | गोंडपिंपरी |
| 31 | | भद्रावती |
| 32 | | वरोरा |
| 33 | | राजूरा |
| 34 | | कोरपना |

सारणी : 7.7

**प्रकल्पांची सद्य:स्थिती**

चलपाणी साठा - दलघमी

पाणीवापर - दलघमी

सिंचनक्षेत्र - हेक्टर

| अक्र | प्रकल्पांचा संवर्ग | पूर्ण झालेले प्रकल्प | | | | प्रगतिपथावरील प्रकल्प | | | | भविष्यकालिन प्रकल्प | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 1 | मोठे प्रकल्प | 0 | 0 | 0 | 0 | उर्ध्व वर्धा | 461 | 586 | 80250 | आजनसरा | 22 | 184 | 23000 | | | | |
| | | 0 | 0 | 0 | 0 | बेंबळा | 169 | 263 | 46999 | | | | | | | | |
| | | 0 | 0 | 0 | 0 | निम्न वेणा | 136 | 216 | 25544 | | | | | | | | |
| | | 0 | 0 | 0 | 0 | निम्न वर्धा | 213 | 287 | 44150 | | | | | | | | |
| | एकूण | 0 | 0 | 0 | 0 | 4 | 978 | 1352 | 196943 | 1.00 | 22 | 184 | 23000 | 5 | 1000 | 1536 | 219943 |
| 2 | मध्यम प्रकल्प | टाकळी | 5 | 7 | 1249 | नवरगांव | 12 | 17 | 3430 | वेडली | 6 | 6 | 1755 | | | | |
| | | बोरगांव | 7 | 12 | 2634 | कार | 21 | 34 | 7394 | भेंडारा | 16 | 31 | 2955 | | | | |
| | | बोरगांव | 127 | 126 | 16194 | जाम | 23 | 33 | 6760 | हत्ती गोटा | 21 | 42 | 3682 | | | | |
| | | पोथरा | 35 | 31 | 4026 | मदन | 11 | 10 | 3275 | | | | | | | | |
| | | डोंगरगांव | 4 | 5 | 730 | लालनाला | 26 | 37 | 5350 | | | | | | | | |
| | | पंचधारा | 10 | 13 | 2460 | डोंगरगांव | 14 | 18 | 3590 | | | | | | | | |
| | | धाम | 63 | 67 | 6800 | सोनापूर टोमटो | | 40 | 2440 | | | | | | | | |
| | | खारगांव | 20 | 28 | 2120 | | | | | | | | | | | | |
| | | लभानसराड | 7 | 12 | 2000 | | | | | | | | | | | | |
| | | चंदई | 11 | 15 | 3390 | | | | | | | | | | | | |
| | | वेणा | 22 | 25 | 1214 | | | | | | | | | | | | |
| | | अतोळीबारा | 20 | 27 | 4244 | | | | | | | | | | | | |
| | एकूण | 12 | 331 | 367 | 47061 | 7 | 108 | 189 | 32239 | 3 | 43 | 79 | 8392 | 22 | 482 | 636 | 87692 |
| 3 | लघु प्रकल्प | शेकदरी | 5 | 5 | 1340 | चारगड | 9 | 11 | 1372 | तुरागोंदी | 5 | 5 | 640 | | | | |
| | | साखळी | 6 | 6 | 1460 | मोरगव्हाण | 3 | 5 | 1049 | लेखमापूर | 6 | 7 | 890 | | | | |
| | | मालखेडे | 9 | 12 | 1740 | वरूड | 3 | 7 | 1331 | बांधेली | 6 | 7 | 1295 | | | | |
| | | नेर | 6 | 7 | 729 | सिरसगांव | 4 | 8 | 1186 | व्हावी | 4 | 7 | 1225 | | | | |
| | | | | | | सावंगीनाला | 5 | 7 | 1465 | वामनडोह | 4 | 7 | 1365 | | | | |

चलपाणी साठा - दलघमी
पाणीवापर - दलघमी
सिंचनक्षेत्र - हेक्टर

| अक्र | प्रकल्पाचा संवर्ग | पूर्ण झालेले प्रकल्प | | | | प्रगतिपथावरील प्रकल्प | | | | भविष्यकालिन प्रकल्प | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| | | | | | | सिरसीनाला | 9 | 12 | 1578 | कोहळ | 6 | 12 | 1220 | | | | |
| | | | | | | चिखलीनाला | 5 | 6 | 1112 | हिवरा | 9 | 14 | 1428 | | | | |
| | | | | | | सुकळीनाला | 9 | 15 | 1720 | शिरूड | 8 | 12 | 1600 | | | | |
| | | | | | | | | | | लोपी | 6 | 13 | 1400 | | | | |
| | | | | | | | | | | धवलगिरी | | | | | | | |
| | एकूण | 4 | 26 | 30 | 5269 | 8 | 48 | 71 | 10813 | 9 | 56 | 84 | 11063 | 21 | 129 | 185 | 27145 |
| | लघु प्रकल्प | 119 | 179 | 212 | 39505 | 26 | 27 | 44 | 6853 | 70 | 50 | 104 | 19676 | 215 | | | |
| | 100 हे पेक्षा जास्त | | | | | | | | | 6 | 5 | 11 | 1610 | 6 | | | |
| | माजी मालगुजारी | 1 | 0 | 1 | 142 | निरंक | | | | निरंक | | | | 1 | | | |
| | तलाव 100 हे पेक्षा जास्त | | | | | | | | | | | | | 0 | | | |
| | लघु प्रकल्प | 283 | 30 | 83 | 16610 | 129 | 5 | 25 | 1092 | 154 | 14 | 35 | 6913 | 566 | | | |
| | 100 हे पेक्षा कमी | | | | | | | | | 76 | 7 | 18 | 3576 | 76 | | | |
| | एकूण लघु प्रकल्प | 403 | 209 | 296 | 56257 | 155 | 32 | 70 | 7945 | 306 | 77 | 167 | 31775 | 864 | 317 | 533 | 95977 |
| | सर्व एकूण | 419 | 565 | 694 | 108587 | 174 | 1166 | 1682 | 247940 | 319 | 198 | 514 | 74230 | 912 | 1929 | 2890 | 430757 |

सारणी : 7.8

## जलसंपत्तीचा ताळेबंद


जलसंपत्ती - दलघमी

| अक्र | उपलब्धता | | अक्र | वापर (सन2030) | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **भूपृष्ठावरील** | | 4 | **भूपृष्ठावरील** | |
| | अ) नैसर्गिक | | | अ) घरगुती वापरासाठी | |
| | 1) 75 टक्के विश्वासार्हतेने | 4177 | | 1) नागरी | 97 |
| | 2) 50 टक्के विश्वासार्हतेने | 5067 | | 2) ग्रामीण | 110 |
| | 3) सरासरीने | 5633 | | 3) पशुधन | 66 |
| | 4) नियोजनासाठी | 2733 | | एकूण | 273 |
| | ब) मानवप्रबोधित | | | ब) उद्योगधदयासाठी | 291 |
| | 1) नागरी वापरातून पुनरुद्भव (80 %) | 78 | | एकूण सिंचनेतर वापर | **564** |
| | 2) उद्योग धंदयातील पुनरुद्भव (97.5%) | 284 | 5 | इतर उपखोऱ्यात स्थलांतरीत पाणी | 681 |
| | 3) इतर खोऱ्यातून संक्रमित झालेले पाणी | 0 | 6 | सिंचनासाठी उपलब्ध भूपृष्ठावरील पाणी (2733+362-564-681+185) | 2035 |
| | **एकूण (1 ब)** | **362** | | | |
| 2 | मानवनिर्मित<br>लाभक्षेत्रातील पुनर्भरण (2733+362-564-681=1849) च्या10 % | 185 | | | |
| 3 | **एकूण उपलब्धता (2733+361+185)** | **3280** | 7 | एकूण वापर | **3280** |
| | 1) भूजल उपलब्धता (वार्षिक एकूण पुनर्भरण ) | 2298 | | अ) भूजलाचा सध्याचा सिंचनासाठी वापर | 430 |
| | 2) भूजल वापरास मुभा ( 2298 च्या 65 %) | 1494 | | | |

टीपा : 1) भूजल उपलब्धतेमुळे उपखोऱ्याच्या एकूण उपलब्धतेत वाढ होणार नाही ; भूजलाचा जेवढा उपसा होईल तेवढा नदी प्रवाह घटत जाईल ; म्हणून एकूण उपलब्धतेचा आकडा काढताना भूजल उपलब्धतेचा विचार घेतलेला नाही.

2) संकलीत अंदाजासाठी सर्व पाण्याचा उपयोग भूपृष्ठावरील पाण्यातून दाखविला आहे. पण एकूण वापरापैकी अधिकाधिक 1494+185= 1679 भूजल माध्यमातून शक्य आहे.

3) पाणीवापराचे नियोजन उपलब्ध येवा मालिकेवर आधारित आहे.



नकाशा - 7.1
वर्धा उपखोरे
महाराष्ट्र जल व सिंचन आयोग
जून 1999
• संदर्भ सूची •
1. राज्य सरहद्द
2. जिल्हा सरहद्द
3. तालुका सरहद्द
4. उपखोरे सरहद्द
5. जिल्हा मुख्यालय
6. तालुका मुख्यालय
7. रेल्वे मार्ग
8. रस्ते
9. नद्या व नाले
10. समपर्जन्यमान रेषा (मिमी)
11. धरणाचे ठिकाण व बुडीत क्षेत्र पूर्ण बांधकामाधीन भविष्यकालिन
12. औद्योगिक क्षेत्र
13. महानगरपालिका
14. नगर पालिका
15. आंतरखोरे पाणी स्थलांतराच्या योजना
- कार्यरत
- बांधकामाधीन
महाराष्ट्र राज्य
7 वर्धा उपखोरे
उपखोऱ्याचे स्थान
उपखोरे क्र.
उपखोऱ्यांची नावे
8 मध्य वैनगंगा
9 निम्न वैनगंगा
6 पैनगंगा
10 पूर्णा (तापी)
मध्य प्रदेश
आंध्र प्रदेश
अमरावती
वर्धा
यवतमाळ
चंद्रपूर
मोर्शी
वरूड
आष्टी
कारंजा
तिवसा
आर्वी
चांदुररेल्वे
पुलगाव
सेलू
सिंदी
देवळी
हिंगणघाट
समुद्रपूर
वरोरा
भद्रावती
वणी
घुग्गुस
बल्लारपूर
राजुरा
गोंडपिंपरी
ऊर्ध्व वर्धा
निम्न वर्धा
बेंबळा
अंजनसरा
लोअर वेणा
नांदगाव खंडेश्वर
बाभुळगांव
नेर
कळंब
राळेगाव

# उपखोरे : 8

# मध्य वैनगंगा

## 1.0 भौगोलिक तपशील

या उपखोऱ्यात वैनगंगा ही मुख्य नदी आहे. वैनगंगा नदी गोपालगंज जि. शिवनी (म.प्र.) येथे उगम पावते व गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा जवळ गोदावरी नदीस मिळते. वैनगंगा व वर्धा यांच्या संगमानंतर तयार होणाऱ्या नदीस प्राणहिता हे नाव आहे. या उपखोऱ्यात नागपूर, भंडारा, गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यातील खालील तालुक्यांचे क्षेत्र (नकाशा 8.1) येते. या उपखोऱ्याचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ 21445 चौकिमी आहे. गोसीखुर्द प्रकल्प हा या उपखोऱ्याच्या केंद्रस्थानी आहे. त्यांत पूर्ण पाणीवापराची अनुमती महाराष्ट्राला असल्यामुळे त्या प्रकल्पाच्या कालव्याचा विस्तार वैनगंगेच्या कडेने जेथवर होऊ शकतो त्या वरून या उपखोऱ्याची भौगोलिक व्याप्ति ठरवली आहे.

**नागपूर** : 1) नागपूर 2) सावनेर 3) पारशिवनी 4) रामटेक 5) मौदा 6) कामठी 7) कुही 8) भिवापूर 9) उमरेड 10) नागपूर ग्रामीण 11) काटोल 12) नरखेड 13) कळमेश्वर

**भंडारा** : 1) भंडारा 2) मोहाडी 3) तुमसर 4) शिरोडा 5) गोंदिया 6) आमगाव 7) गोरेगाव 8) सालेकसा 9) अर्जूनी(मोरगाव) 10) लाखांदूर 11)देवरी 12) साकोली 13) पवनी 14) अर्जुनी (सडक)

**गडचिरोली** : 1) गडचिरोली 2) आरमोरी 3) कुरखेडा 4) देसाईगंज 5) धानोरा 6) कोरची

**चंद्रपूर** : 1) ब्रम्हपुरी 2) नागभीड 3) सावली 4) सिंदेवाही

मुख्य नदी, तिच्या उपनद्या इत्यादी तपशील खालील प्रमाणे आहे.

लांबी - किमी ; तलांक - मी

| अक्र | नदी | उपनदी | लांबी | उगमस्थान | | संगमस्थान | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ठिकाण | तलांक | ठिकाण | तलांक |
| 1 | वैनगंगा | | 368* | गोपालगंज जि.शिवनी (म.प्र) | 610 | सिरोंचा येथे गोदावरीस | 98 |
| 2 | | बाघ | 90 | पवारझोला जि.भंडारा | 400 | बिरसोला | 267 |
| 3 | | पांगोली | 57 | लिंबा जि. भंडारा | 300 | छिपीया | 272 |
| 4 | | पूर्व बाघ | 50 | खोलझरा, जि.राजनांदगांव | 727 | चिचटोला जि. भंडारा | 285 |
| 5 | | बावनथडी | 42 | नयागाव जि.सिवनी (म.प्र.) | 600 | बपेरा ता.तुमसर | 259 |
| 6 | | सूर | 68 | सारखेड जि.नागपूर | 360 | टाकळी,ता.भंडारा | 240 |

* महाराष्ट्रातील उपखोऱ्याच्या मर्यादेत.

लांबी - किमी ; तलांक - मी

| अक्र | नदी | उपनदी | लांबी | उगमस्थान | | संगमस्थान | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ठिकाण | तलांक | ठिकाण | तलांक |
| 7 | | कन्हान | 113 | बिघवा जि.छिंदवाडा | 884 | तिढी | 230 |
| 8 | | पेंच | 56 | छिंदवाडा बोरखेडी जि.छिंदवाडा | 915 | (बिना) रोहना | 271 |
| 9 | | नाग | 56 | अंबाझरी जि.नागपूर | 340 | सावंगी | 240 |
| 10 | | कोलार | 43 | चोरखैरी जि.नागपूर | 455 | कामठी | 270 |
| 11 | | चंद्रभागा | 58 | चाणकापूर | 455 | पाटणसावंगी | 294 |
| 12 | | आम | 67 | दुधा | 300 | अंभोरा | 228 |
| 13 | | मरू | 53 | रानबोरी | 300 | घाटउमरी | 222 |
| 14 | | चुलबंद | 103 | आलेबेदर | 380 | सोनीचप्राळ | 210 |
| 15 | | गाढवी | 115 | मिसपीरी | 400 | शिवनी | 200 |
| 16 | | खोब्रागडी | 68 | कोहका जि.गडचिरोली | 415 | देवलगाव | 198 |
| 17 | | बुटीनदी | 45 | मोहाली | 300 | रानमोचन जि.चंद्रपूर | 203 |

महाराष्ट्रात प्रवेश करण्यापूर्वी वैनगंगा मध्यप्रदेशातून 274 किमी वाहते व महाराष्ट्र-मध्यप्रदेश सीमेपर्यन्त 109078 चौकिमी स्रवणक्षेत्रातील वार्षिक सरासरी10589 दलघमी पाणी निसर्गतः महाराष्ट्रात आणते.

1.1 विस्तार : या उपखोऱ्याचा क्षेत्रीय विस्तार अक्षांश 20°07′ ते 21°43′ उत्तर व रेखांश 78° 39′ ते 80° 41′ पूर्व यामध्ये आहे.

1.2 चतु:सीमा : उपखोऱ्याच्या चतु:सीमा खालील प्रमाणे आहेत.

| अक्र | दिशा | तपशील |
|---|---|---|
| 1 | उत्तर | सातपुडा पर्वत रांगा, मध्य प्रदेशातील बालाघाट जिल्हा |
| 2 | पूर्व | मध्य प्रदेशातील राजनांदगाव जिल्हा |
| 3 | पश्चिम | वर्धा उपखोरे 7 |
| 4 | दक्षिण | निम्न वैनगंगा उपखोरे 9 |

## 2.0 हवामान

या उपखोऱ्यातील क्षेत्र उत्तम पावसाच्या प्रदेशात येते. साधारणतः 88 टक्के पाऊस नैऋत्य मोसमी वाऱ्यांमुळे जून ते सप्टेंबर दरम्यान पडतो, 6 टक्के पाऊस ईशान्य मोसमी वाऱ्यांमुळे सप्टेंबर ते डिसेंबर दरम्यान व 6 टक्के पाऊस जानेवारी नंतर पडतो. वार्षिक सरासरी पर्जन्यमान 1250 मिमी आहे. उपखोऱ्यातील हवामान विषयक इतर बाबी व पर्जन्यमानातील दोलायमानता इ. तपशील पुढीलप्रमाणे आहे.

पर्जन्यमान-मिमी, तपमान - अंशसें

| अक्र | तपशील | परिमाण | महिना /वर्ष | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1 | सर्वात अधिक पाऊस | 2045 | 1979 | भटेगाव |
| 2 | सर्वात अधिक तपमान | 48 | मे 1954 | नागपूर |
| 3 | सर्वात कमी तपमान | 4 | जानेवारी 1937 | नागपूर |

कृषि- हवामान वर्गीकरणानुसार या उपखोऱ्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

8- मध्यम ते साधारण जास्त पावसाचा विभाग (MR) व 9- जास्त पावसाचा मिश्र खडकापासून बनलेल्या जमिनीचा विभाग (HRM).

या उपखोऱ्यातील पर्जन्यमानातील दोलायमानता गूणांक 28 (तक्ता 2.5.8) आहे. पर्जन्यमानाचा माहवार तपशील सारणी 8.1. मध्ये दर्शविला आहे.उपखोऱ्यातील पर्जन्यमापन केंद्रांचा तपशील सारणी 8.2 मध्ये दर्शविला आहे.

2.2 <u>बाष्पीभवन</u> : या उपखोऱ्यातील सर्वाधिक बाष्पीभवन मे महिन्यात 339 मिमी तर सर्वात कमी बाष्पीभवन डिसेंबर महिन्यात 93 मिमी होते. बाष्पीभवनाचा माहवार तपशील सारणी 8.1 मध्ये दर्शविला आहे.

## 3.0 जलसंपत्तिची उपलब्धता

3.1 <u>भूपृष्ठीय जलसंपत्ति</u> : पवनी येथील विसर्गमापनावर गोसीखुर्द प्रकल्पस्थळापर्यन्तचा येवा निश्चित केला आहे. मध्य वैनगंगा उपखोऱ्यासाठी पूर्ण क्षेत्राकरिता प्रत्यक्ष पर्जन्यमापनावरुन सुधारित येवा मालिका (1914-1977) तयार करुन वापरली आहे. त्या आधारे या उपखोऱ्याची स्वतःची वार्षिक सरासरी येवा उपलब्धी 10026 दलघमी येते व त्यात फार कमी विचलन आहे. त्यामुळे पाण्याच्या आधारावर उभ्या राहणाऱ्या विकास व्यवस्थेला येथे चांगली स्थिरता रहाणार आहे. येवा मोजण्याची ठिकाणे व वेगवेगळ्या विश्वासार्हतेच्या येव्याची काही मर्यादित माहिती सारणी 8.3 व 8.4 मध्ये दिलेली आहे. या मोजणीत अवर्षणाची वर्षे आलेली नाहीत;त्यामुळे सरासरी उपलब्धी वास्तवात बरीच कमी रहाणार आहे. याशिवाय मध्यप्रदेशातून येणाऱ्या प्रवाहातून मध्यप्रदेशाने न वापरलेल्या पाण्याचा लाभ या उपखोऱ्याला मिळत रहाणार आहे. त्यामुळे पाण्याची एकंदर उपलब्धता या उपखोऱ्यासाठी फार चांगली आहे. 1914 ते 1977 या 64 वर्षातील माहितीवर आधारभूत या उपखोऱ्यातील पाण्याची उपलब्धता खालीलप्रमाणे आहेः

| | |
|---|---|
| 75 % विश्वासार्हतेने | 8328 दलघमी |
| 50 % विश्वासार्हतेने | 9985 दलघमी. |

3.2 <u>भूशैलीय रचना</u> :

<u>भूपृष्ठीय स्थिति (भूरूप वर्णन)</u>: उपखोऱ्यातील साधारण 61 टक्के क्षेत्र अतिविच्छेदीत व डोंगराळ, 24 टक्के पठारी आणि 15 टक्के सपाट व नदीलगतच्या गाळाने व्यापलेले आहे. या उपखोऱ्यात भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा निर्देशित एकूण116 पाणलोट क्षेत्रे मोडतात.

<u>भूपृष्ठीय शैल स्थिति</u> : उपखोऱ्यात सर्वात खाली सर्वात जुने आर्कीयन परंपरेतील रुपांतरीत खडक (क्वार्टझाईट, शिस्ट, फिलाईट, नाईस, मार्बल इ) आढळतात. त्यावर गोंडवन महासमूहातील अर्धसंघनीकृत गाळस्तरांचे खडक व त्यावर लाव्हा थरांनी तयार झालेले

बहुस्तरीय दक्षिणी कातळाचे खडक (डेक्कन ट्रॅप प्रस्तर) आढळतात. सर्वात वर अर्वाचीन काळात तयार झालेले स्थानिक गाळाचे थर आढळतात. दक्षिणी कातळ खडकांत अकुहरी बेसाल्टचे प्राबल्य आहे.

3.3 भूजल संपत्ति : उपखोऱ्यातील कन्हान व वैनगंगा नदीलगतच्या गाळाचे क्षेत्रातील भूजल उपलब्धी खूप चांगली असून तेथे विहिरीद्वारे उपसा मोठया प्रमाणावर आहे. दोन्ही नद्या बाराही महिने वहात असल्यामुळे पुर्नभरण सुध्दा चांगले होते उदाः चौराहा पट्टा. या भागातील गाळाचे क्षेत्र (अंदाजे 110 चौकिमी) भूजलाने संपृक्त असून त्या भागात विहिरींवर सिंचन मोठ्या प्रमाणावर होते. सावनेर, कामठी या भागातील गोंडवन सॅन्डस्टोन भूजलाच्या दृष्टीने अतिशय समृध्द असून, भूजल दाबाखालील अवस्थेत आढळते. त्याभागातील संत्रा शेती पूर्णतः या भूजलावरच अवलंबून आहे. म्हणून या भागातील भूजल उपसा मोठया प्रमाणावर होत आहे. या व्यतिरिक्त संपूर्ण भंडारा जिल्ह्यात व इतरही भागात व्यापलेल्या विविध रुपांतरीत खडकात विघटीत, संधी व भेगात भूजल पृष्ठस्थितितच भूजल आढळते. विघटीत खडकांची खोली 4 ते 12 मीटर असून विहिरींची खोली सुध्दा त्याच प्रमाणात आहे. त्यामुळे विहिरींना खूप मर्यादा आहेत.भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या 1990 च्या भूजल अंदाजानुसार एकूण पुनर्भरण (सिंचन क्षेत्रातील भरीसकट) 3037 दलघमी,असून विहीरींची संख्या फक्त 0.50 लक्ष आहे.भूजलाच्या अतिउपशामुळे एक लघु पाणलोट क्षेत्र अतिविकसित (डार्क) वैककोचं 1-2/4 (वैनगंगा-कन्हान-कोल्हार-चंद्रभागा) (तालूका कळमेश्वर) व एक पाणलोट क्षेत्र वैकको-2 (वैनगंगा-कन्हान -कोलार) (तालूके सावनेर,नरखेड,काटोल) विकसित (ग्रे) अवस्थेत आहे.

भूजलाचा विकास सद्यस्थितित फारच अल्प असून या उपखोऱ्यात भूजल विकासास खूप वाव आहे. उपखोऱ्यातील संभाव्य जलविद्युत् निर्मितिशी भूजलाची सांगड घालून पंजाबमधील सतलज खोऱ्याप्रमाणे येथेहि भूजलाचा वापर खूप वाढवता येणे शक्य आहे.

3.4 अवर्षणप्रवण क्षेत्र : या उपखोऱ्याचे क्षेत्र 37 तालुक्यांत पसरले आहे. सुकथनगर समितीच्या अहवालानंतर शासनाने घोषीत केलेला कुही तालुका अवर्षणप्रवण आहे.त्याचा तपशील पुढील प्रमाणे आहे

क्षेत्र - चौकिमी, लोकसंख्या - हजारात, पर्जन्यमान - मिमी

| जिल्हा | तालुका | क्षेत्र | लोकसंख्या | वार्षिक सरासरी पर्जन्यमान |
|---|---|---|---|---|
| नागपूर | कुही | 815 | 108 | 1274 |

## 4.0 जमिनीचा तपशील

बहुतांश जमीन ही पिवळसर व तपकिरी रंगाची आहे. या जमिनीचे वर्गीकरण खालील प्रमाणे आहे.

| अक्र | जमीन | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | पिवळसर तपकिरी जमीन (मिश्र डोंगरमाथ्यावरील ) | 29 |
| 2 | भरड उथळ जमीन | 7 |
| 3 | पिवळसर तपकिरी सपाटीतील जमीन (मिश्र प्रकार) | 41 |
| 4 | मध्यम काळी जमीन | 11 |
| 5 | खोल काळी जमीन | 10 |
| 6 | गाळाची जमीन | 2 |

## 5.0 जमिनीचा वापर

लागवडीयोग्य क्षेत्र, वनखात्याच्या ताब्यातील क्षेत्र, पडीकक्षेत्र इत्यादी बाबतची माहिती खालील प्रमाणे आहे. कुरणांचे मोठे क्षेत्र हे या उपखोऱ्याचे एक आगळे वैशिष्ठय आहे.

क्षेत्र-हजार हेक्टर

| अक्र | वापर | क्षेत्र | भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | भौगोलिक क्षेत्र | 2145 | |
| 2 | वन खात्याच्या ताब्यातील क्षेत्र | 740 | 34.5 |
| 3 | पेरणीसाठी उपलब्ध नसलेले क्षेत्र | | |
| | अ) ओसाड जमीन | 38 | 1.8 |
| | ब) बिगर शेती उपयोगाकरिता आणलेली जमीन. | 158 | 7.4 |
| 4 | मशागतयोग्य पडिक जमीन. | 62 | 2.9 |
| 5 | कायमची कुरणे व चराऊ कुरणे | 215 | 10 |
| 6 | किरकोळ झाडे-झुडपे यांच्या समुहाखालील क्षेत्र | 17 | 0.8 |
| 7 | चालू पडीक जमीन | 25 | 1.2 |
| 8 | इतर पडीक जमीन | 30 | 1.4 |
| 9 | पेरणीचे निव्वळ क्षेत्र | 860 | 40.0 |
| 10 | लागवडीयोग्य क्षेत्र (4+5+6+7+8+9) | 1209 | 56 |
| 11 | दुसोटा क्षेत्र | 124 | – |
| 12 | पिकाखालील एकूण क्षेत्र (9+11) | 984 | – |
| 13 | पीक घनता (12 ÷9×100) | 114 | – |

## 6.0 लोकसंख्या व पशुधन

6.1 <u>लोकसंख्या</u> : सन 1991 च्या जनगणनेनुसार या उपखोऱ्यातील लोकसंख्या 53.59 लक्ष आहे. सन 2030 पर्यंत होणारी लोकसंख्येतील वाढ व लोकसंख्या घनता, पुढील प्रमाणे अपेक्षित आहे. यात आजवरच्या सर्वसाधारण लोकसंख्या वाढीचाच केवळ विचार न करता कारखानदारीमुळे व इतर व्यवसायामुळे जी स्थलांतरातून अतिरिक्त वाढ होण्याची शक्यता आहे त्याचा विचार धरलेला आहे. त्यामुळे हे उपखोरे अतिघन लोकसंख्येचे नागरीकरणाचे क्षेत्र तयार होणार असून त्यादृष्टीने या घटक क्षेत्राचे व उपखोऱ्यातील पाण्याच्या वापराचे नियोजन करावे लागेल.

लोकसंख्या-हजारात, घनता-प्रति चौकिमी

| अक्र | तपशील | 1991 | 2030 |
|---|---|---|---|
| 1 | नागरी | 2308 | 5977 |
| 2 | ग्रामीण | 3051 | 6102 |
| 3 | एकूण | 5359 | 12079 |
| 4 | लोकसंख्या घनता | 250 | 563 |
| 5 | ग्रामीण लोकसंख्या घनता | 142 | 284 |

6.2 पशुधन : या उपखोऱ्यात 1992 च्या गणनेनुसार एकूण पशुधन 23.15 लक्ष आहे. पशुंची वर्गनिहाय संख्या खालील प्रमाणे आहे.

| म्हैस व रेडे | गाय व बैल | एकखुरी व उंट | शेळी व मेंढी | डुकरे | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| 280343 | 1443017 | 2912 | 546824 | 42183 | 2315279 |

6.3 इतर तपशील : या उपखोऱ्यात नागपूर ही एकमेव महानगरपालिका आहे. उपखोऱ्यातील नगरपालिकांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

**नागपूर** : 1)काटोल 2) उमरेड 3) कळमेश्वर 4) सावनेर 5) रामटेक 6) पारशिवनी 7) कामठी8)नागपूर (ग्रामीण) 9) नरखेड 10) हिंगणा 11) मोहाडी 12) खापा

**भंडारा** : 1)भंडारा 2) तुमसर 3) तिरोडा 4) गोंदिया 5)पवनी,

**चंद्रपूर** : 1) ब्रम्हपुरी,

**गडचिरोली** : 1) वडसा.

## 7.0 पाणी वापर

7.1 सिंचनासाठी वापर : उपखोऱ्यातील वर्गनिहाय प्रकल्प म्हणजे मोठे, मध्यम, बृहत् लघु, लघु व कोल्हापूर पध्दतीचे बंधारे, पाणीसाठा, पाणीवापर, सिंचन क्षेत्र याची, तसेच पूर्ण झालेले, प्रगतिपथावरील व भविष्यकालीन प्रकल्प याची माहिती सारणी 8.5 मध्ये दर्शविली आहे. पूर्ण झालेल्या प्रकल्पांची निर्मित सिंचन क्षमता 287305 हेक्टर असून त्यातील प्रस्तावित पाणीवापर 2172 दलघमी आहे.अशा प्रकारे उपखोऱ्याच्या स्वतःच्या भूपृष्ठीय पाण्यापैकी सुध्दा केवळ 20 टक्के पाणीच सध्या उपयोगात आणले जात आहे. सिंचनाखाली आणखी 526694 हेक्टर उपलब्ध होऊ शकते पण त्यासाठी सध्याच्या पाणीवापर पध्दतीप्रमाणे पाणी 4765 दलघमी पाणी लागेल.

7.2 सिंचनेतर पाण्याचा वापर : सिंचनेतर उपयोगासाठी या उपखोऱ्यातील पाण्याची सध्याची गरज 356 दलघमी आहे. सन 2030 पर्यंतची ती 669 दलघमी होईल. या गरजांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे. यातील उद्योगीकरणासाठी लागणाऱ्या पाण्याचा वाटा 174 दलघमी आहे.

पाणी - दलघमी

| अक्र | तपशील | 1991 | | | | 2030 |
|---|---|---|---|---|---|---|
| | | नागरी | ग्रामीण | पशूधन | एकूण | |
| 1 | घरगुती वापरासाठी | 113 | 61 | 53 | 227 | 495 |
| 2 | उद्योगाचे पाणी | | | | 129 | 174 |
| | एकूण | | | | 356 | 669 |

7.3 जलसंपत्तिचा ताळेबंद : एकूण (भूपृष्ठावरील व भूपृष्ठाखालील) जलसंपत्ता आणि घरगुती वापरासाठी व सिंचनासाठी पाणी वापर यातून होणारा पुनरुद्भव याचा ताळेबंद सारणी 8.6 मध्ये दिला आहे.

7.4 लाभक्षेत्र विकास : सद्यःस्थिति खालील प्रमाणे आहे.

क्षेत्र -हजार हेक्टर

| भूविकास प्रकार-1ची(शेतचाऱ्या इ) कामे | | | भूविकास प्रकार-2 ची (सपाटीकरण इ)कामे | | | प्रकल्पाच्या लाभक्षेत्रा व्यतिरिक्त अन्य क्षेत्रात झालेले जमीन सपाटी करणाचे (भाग-2) क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|
| लाक्षेविप्रा कडील प्रकल्प | लाक्षेविप्रा बाहेरील प्रकल्प | एकूण | लाक्षेविप्रा कडील प्रकल्प | लाक्षेविप्रा बाहेरील प्रकल्प | एकूण | |
| 95.83 | 27.82 | 123.65 | 25.55 | 17.78 | 43.33 | 0.33 |

7.5 सन 1970 पूर्वीची धरणे : उपखोऱ्यात 1970 पूर्वी पूर्ण झालेल्या मोठ्या, मध्यम व लघु प्रकल्पांचा तपशील सारणी 8.7 मध्ये दिलेला आहे.एकूण 10 प्रकल्प 70 वर्षांहून जुने आहेत. शिवाय 13 प्रकल्प 25 वर्षांहून जुने आहेत. शिवाय गोंडकालीन तलावांचीही मोठी संख्या (3372) या उपखोऱ्यात आहे. अशा प्रकारे सकृत्‌दर्शनी सिंचनाचा प्रदीर्घ अनुभव पाठीशी असणारे हे उपखोरे आहे. पण त्यात मूल्यदायी पिकांचा पुरेशा प्रमाणात अंतर्भाव न झाल्यामुळे व पीक प्रक्रिया व्यवस्थाही पुरेशी विकसित न झाल्यामुळे पाण्याची मुबलकता असूनही हे उपखोरे आर्थिक दृष्टीने व्हावे तितके प्रगत होऊ शकले नाही.

## 8.0 पिकरचना

या उपखोऱ्यातील पेरणीखालचे क्षेत्र 8.6 लक्ष हेक्टर आहे. उपखोऱ्यात प्रामुख्याने खरीप पिकक्षेत्र आहे. उपखोऱ्यातील जमीन व हवामानानुसार अनुकूल पिके भात, सोयाबीन, मिरची, मोहरी, भाजीपाला, संत्रा ही आहेत. काही प्रमुख पिकांची दरहेक्टरी सरासरी उत्पादकता खालील प्रमाणे आहे.

उत्पादकता - क्विंटल / हेक्टर

| अक्र | पिके | उत्पादकता |
|---|---|---|
| 1 | भात | 12.49 |
| 2 | सोयाबीन | 11.29 |

## 9.0 उद्योगधंदे

कृषि आधारीत उद्योगधंद्यांचा विकास विशेषतः ऊस उत्पन्नावर आधारित कारखान्यांची संख्या 5 आहे. सद्यःस्थिति खालील प्रमाणे आहे.

| अक्र | तपशील | उद्योगांची संख्या |
|---|---|---|
| 1 | साखर कारखाने | 5 |
| 2 | सूत गिरण्या | 19 |

## 10.0 जलविद्युत निर्मिति

भौगोलिक परिस्थितिनुसार व जादा पाण्याची उपलब्धता यामुळे या उपखोऱ्यात जलविद्युत प्रकल्प उभारणीस पुष्कळ वाव आहे. पण आतापर्यंत या उपखोऱ्यात फक्त पेंच (तोतलाडोह) हा एकच जलविद्युत प्रकल्प पूर्ण झालेला आहे. त्याची विद्युत निर्मिति क्षमता 160 मेवॅ आहे. यापैकी महाराष्ट्राचा वाटा 53 मेवॅ आहे. उपखोऱ्यातील प्रस्तावित व भविष्यकालीन जलविद्युत प्रकल्प, अनुक्रमे 17 व 4 आहेत यामुळे एकूण 589.75 मेवॅ विजनिर्मिति क्षमता वाढेल. या बाबतचा तपशील सारणी 8.8 मध्ये दिला आहे.

## 11.0 दळणवळणाची साधने

या उपखोऱ्यात नागपूर येथे आंतरराज्य विमानतळ व आंतरराष्ट्रीय मालवाहतुकीसाठीचे (cargo) विमानतळ आहे. उपखोऱ्यातून जाणारे रेल्वे मार्ग, राष्ट्रीय महामार्ग व राज्यमहामार्ग याचा तपशील सारणी 8.9 मध्ये दिलेला आहे.

## 12.0 भावी नियोजनाची दिशा

12.1 <u>पाण्याची उपलब्धता व वापर</u> : मध्य वैनगंगा उपखोऱ्यातील पाण्याची नैसर्गिक वार्षिक सरासरी उपलब्धता 10026 दलघमी आहे. पण गोदावरी लवादाच्या निर्णयानुसार या उपखोऱ्यातील पाणी वापरावर खालील प्रमाणे मर्यादा आहेत

क) गोसीखुर्द प्रकल्पाचा वरील भाग

| | |
|---|---|
| 1) कन्हान खोरे | 3817 दलघमी |
| 2) वैनगंगा खोरे | 4277 दलघमी |

या भागामध्ये मध्यप्रदेशचा हिस्सा कन्हान व वैनगंगा खोऱ्यात अनुक्रमे 2529 व 7241 दलघमी आहे. या दोन्ही खोऱ्यातून प्रत्येकी 424.69 दलघमी (15 अघफू) महाराष्ट्राला नियमनाने पुरवठा करण्याची तरतूद आहे. त्याचा अंतर्भाव करुनच वरील आकडेवारी दिलेली आहे. गोसीखुर्द प्रकल्पस्थळापर्यन्तच्या पूर्ण पाणीवापराचे अधिकार महाराष्ट्राला आहेत. त्याचे परिमाण 8094 दलघमी येते.

ख) गोसीखुर्द प्रकल्पाच्या खालील भागातील लवादाने विनिर्देशित केलेल्या 16 प्रकल्पस्थळांपैकी 7 या उपखोऱ्यात मोडतात. या प्रकल्पस्थळांपर्यन्त निश्चित केलेली वार्षिक सरासरी उपलब्धता 1650 दलघमी आहे. तिच्या पूर्ण वापरास महाराष्ट्रास मुभा आहे.

ग) विनिर्देशित प्रकल्पस्थळांच्या खालील भागात लवादानुसार एकूण 16 विनिर्देशित प्रकल्पस्थळांच्या खालील भागात उर्वरीत वैनगंगा खोऱ्यात महाराष्ट्राला 1160.71 दलघमी (41 अघफू) चे पाणी वापराचे अधिकार (कोणत्याही एका स्थळी 1.5 अघफू पेक्षा अधिक पाणी वापर नको या अटीच्या अधीन राहून) दिलेले आहेत. या उपखोऱ्याच्या सीमेत येणाऱ्या

त्यातील 7 प्रकल्पस्थळांच्या खालील भागाचा यातील हिस्सा 423 दलघमी येतो. एकंदरीत या उपखोऱ्यात 8094+1650+423 =10167 दलघमी पाणी वापरास उपलब्ध आहे.

या उपखोऱ्यात असोलामेंढा नावाचा 1916 साली बांधलेला सिंचन प्रकल्प आहे. गोसीखुर्द प्रकल्पाच्या नियोजनात या प्रकल्पाची पाणीवापर क्षमता अतिरिक्त 433 दलघमी ने वर्धित करावयाचे प्रयोजन आहे. त्यामुळे निर्माण होणारे लाभक्षेत्र अंदाजे 1:1 प्रमाणात या व अध:स्थित निम्न वैनगंगा (अ) वैनगंगा- प्राणहिता (घटक 9 अ) मध्ये विखुरले गेले आहे. सबब 233 दलघमी पाणी वापराचा लाभ घटक 9 (अ) मधील क्षेत्राला होणार आहे. त्याप्रित्यर्थ या उपखोऱ्याच्या वापरास उपलब्ध असलेल्या जलसंपत्तितून 233 दलघमीची घट धरुन निव्वळ वापरास उपलब्धी 9934 दलघमी येते.

1996 पावेतो मध्य वैनगंगा उपखोऱ्यात 3 मोठे, 20 मध्यम व 89 लघु सिंचन प्रकल्प बांधलेले आहेत. या खेरीज 3372 माजी मालगुजारी तलाव देखील आहेत. या प्रकल्पांद्वारे 4162 दलघमी पाणीसाठा निर्माण झालेला आहे. प्रगतिपथावरील प्रकल्पांमध्ये गोसीखुर्द, बावनथडी,तुलतुली हे 3 मोठे प्रकल्प व धापेवाडा ही 5000 हे क्षेत्राला सिंचनलाभ मिळवून देणारी मोठी उपसा सिंचन योजना आहे. पैकी गोसीखुर्द प्रकल्पांतर्गत असलेले गोसीखुर्द धरण 'राष्ट्रीयदृष्टया महत्वाचे धरण' म्हणून गणले जाते. (महत्तम उंची 100 मी.पेक्षा जास्त वा एकूण साठवण क्षमता 1 अघमी पेक्षा अधिक असलेली धरणे राष्ट्रीय धरण सुरक्षा समितीने 'राष्ट्रीयदृष्टया महत्वाची धरणे' म्हणून घोषित केली आहेत. या धरणाची उंची 22.50 मीटर, साठवण क्षमता 1146 दलघमी व पाणीवापर क्षमता 1634 दलघमी आहे.

मध्य वैनगंगा उपखोऱ्यात 1996 पावेतो 877 दलघमी पाणी वापर झालेला आहे. यामध्ये 2071 दलघमी अतिरिक्त पाणी वापराची सन 2030 पर्यन्त भर पडणार आहे. अशा प्रकारे निश्चित झालेले पाणी 2948 दलघमी आहे.

12.2 या उपखोऱ्यात मध्यप्रदेशचा वाटा वगळता 100 टक्के पाणी वापरास मुभा आहे. पाणी विपूल आहे. जमीन पण सुपीक आहे. या दृष्टीने हे खोरे विपुलतेचे आहे. पाणी वापराचे नियोजन किमान सरासरी विश्वासार्हतेला आणणे गरजेचे आहे. यादृष्टीने अतिरीक्त साठयाचा अभ्यास गरजेचा आहे.

12.3 पाण्याचा जास्तीत जास्त वापर करण्याच्या दृष्टीने प्रकल्पाच्या विस्तार क्षमतेचा फेरअंदाज बांधण्याची आवश्यकता आहे. यानुसार जलाशयातून उपसा, मार्गस्थ जलाशये व पुच्छ जलाशये पाण्याने भरणे या पर्यायांचा विचार करण्याची गरज आहे.

12.4 सध्या 3060 दलघमी पाणी वापराचे प्रकल्प कागदोपत्री बांधकामाधीन म्हणून दाखविण्यात येत आहेत. पण प्रत्यक्षात हे प्रकल्प व्यवहारात बांधकामाधीन नाहीत अशी माहिती आहे. त्या भागातील वनजमीन, कोळशाच्या खाणी इ. मुळे अडचणी निर्माण झालेल्या आहेत. हे प्रश्न सोडवून या प्रकल्पांना गती देणे अतिशय गरजेचे आहे. अशा अडलेल्या प्रकल्पांची यादी सारणी 8.10 मध्ये दिली आहे.

12.5 या उपखोऱ्यात पेंच, बाघ, इटियाडोह हे तीन मोठे प्रकल्प पूर्ण झालेले आहेत. या तीन प्रकल्पांवर जवळ जवळ 1.83 लाख हेक्टर सिंचन क्षेत्र निर्माण झाले आहे. या प्रकल्पावर खरीपात प्रामुख्याने भाताचे पीक घेतले जाते व रब्बीमध्ये सुध्दा भातावर भात घेण्याकडे जास्त कल दिसून येतो. अलिकडे रब्बी मध्ये गहू, भुईमुग, भाजीपाला या सारखी पिके घेण्यास सुरवात झालेली आहे. अशी माहिती एप्रिल 1997 ला आयोगाने दिलेल्या क्षेत्रीय भेटीत मिळाली. पीक पध्दतीत बदल घडवून आणण्यासाठी शेतकऱ्यांचे प्रबोधन करण्याची गरज आहे. भातावर भात या पिकरचनेत सिंचनामुळे ग्रामीण भागात आर्थिक सुधारणा होण्याची शक्यता फार कमी आहे. भात हे जास्त पाणी लागणारे पीक आहे व मजूर देखील जास्त लागतात. आतापर्यन्त अनेक ठिकाणचा अनुभव असा आहे की, केवळ भात शेतीमधून त्या प्रदेशाला समृध्दी आलेली नाही. म्हणून लाभक्षेत्रातील पीक पध्दतीत बदल घडवून

आणण्यासाठी शेतकऱ्यांची प्रबोधन शिबिरे वाल्मी सारख्या संस्थेच्या माध्यमातून सातत्याने घेण्याची गरज आहे.

12.6 या उपखोऱ्यात दरहेक्टरी पाण्याची उपलब्धता 8 हजार घमी च्या वर आहे. म्हणून ऊस, केळी या सारखी अधिक मूल्यदायी पिकरचना या ठिकाणी राबविण्याची जास्त गरज आहे. ऊसावर प्रक्रिया करणाऱ्या साखर कारखान्यांची उणिव या भागात असल्याने ऊसाचे क्षेत्र वाढलेले नाही असे समजते. राज्यातील तुटीच्या उपखोऱ्यात कार्यान्वित असलेले साखर कारखाने क्रमाक्रमाने या उपखोऱ्यात स्थलांतरीत होणे इष्ट राहील.

12.7 या उपखोऱ्यात पेंच प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात नागपूर हे एक मोठे शहर वसलेले आहे. या शहराची झपाटयाने वाढणारी लोकसंख्या व त्याच्या अवताभवती पसरलेले औद्योगिक विकासाचे जाळे व त्यातच भर म्हणून औष्णिक केंद्राची उभारणी यामुळे सिंचनेतर पाण्याची गरज खूप वाढत आहे. सध्या या शहराला पाणीपूरवठा पेंच प्रकल्पाच्या कालव्यातून केला जातो. औद्योगिक व नागरी व्यवस्थेतून मोठया प्रमाणावर सांडपाणी उपलब्ध होते. हे सांडपाणी प्रक्रिया न करता आजूबाजूच्या नाल्यातून कन्हान या नदीमध्ये येते. या सांडपाण्यावर शहराच्या भोवताली मोठया प्रमाणात भाजीपाला पिकविला जात असल्याचे एप्रिल 1997 मध्ये आयोगाने दिलेल्या भेटीमध्ये दिसून आले. सांडपाण्यावर प्रक्रिया न करता त्यावर भाजीपाल्यासारखी पिके घेणे हे नागरी आरोग्याला हानिकारक होणार आहे.या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याची तात्काळ व्यवस्था बसविण्याची गरज आहे.या शुध्दीकरण केलेल्या पाण्याचा वापर परत औद्योगिकीकरणासाठी व सिंचनासाठी करण्याची गरज आहे.

12.8 या उपखोऱ्यात नागपूर सारखे मोठे औद्योगिक शहर वसलेले असल्यामुळे पाटबंधारे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात भाजीपाला, फळे या सारखी पिके घेणे बारमाही बाजारपेठ उपलब्ध झाल्यामुळे आवश्यक आहे. या बरोबरच अशा पिकासाठी साठवण व्यवस्था, त्याची वाहतूक व विक्रीची सोय देखील ग्रामीण भागाला अर्थलाभ करून त्याच्या विकासासाठी आवश्यक आहे.

12.9 पेंच पाटबंधारे प्रकल्पातील क्षेत्र खोल काळ्या मातीचे आहे. अशा काळ्या मातीतील वितरण व्यवस्था टिकाऊ नसते. मातीला भेगा पडून व पाणी झिरपून कालवे व चाऱ्या फुटतात. कालव्याच्या उतारावरून माती ढासळून मोठया प्रमाणात गाळ साचतो. त्या गाळावर मोठया प्रमाणात बाभूळ ,बेशर्मी व पाणगवतासारखी झाडे झुडपे वाढून त्याची दुरुस्ती करणे अडचणीचे व खर्चिक होते. त्या मातीत पोकळी निर्माण होऊन अस्तरीकरणास भेगा पडून ते टिकत नाही. तीव्र पावसामुळे शेतचाऱ्या,वितरिका नादुरुस्त होतात व वाहून जातात. पक्का पाया मिळत नसल्यामुळे वितरिकेवरील बांधकामाचा खर्च व त्याची दुरुस्ती करणे पण अवघड आणि दुरापास्त ठरते. मुरुम व दगड उपलब्ध नसल्यामुळे वितरण प्रणालीला स्थैर्य देणे जास्त खर्चिक व न परवडणारे ठरते. अशा मातीत पाण्याचा निचरा कमी होतो. पाणगवत, झाडेझुडपे यामुळे नाल्याचे वहन मार्ग बुजतात त्यातच भर म्हणून भातावर भात अशी जास्त पाण्याचा वापर करणारी पिके वाढल्यामुळे जमिनी पाणथळ होण्याच्या समस्या निर्माण होतात. अशा काळ्या मातीच्या प्रणालीतील वितरणास स्थैर्य देणे हा एक जटिल प्रश्न या भागात निर्माण झालेला आहे. या बिकट परिस्थितिमुळे पूर्णतः शासन नियंत्रित सिंचन व्यवस्था या अडचणीत आलेल्या आहेत असे दिसून येते. सिंचन व्यवस्थापनेमध्ये पाणीवापर संस्थांची निर्मिति करुन सिंचन व्यवस्थापन लाभधारकांना हस्तांतरीत करणे, व आधुनिक सिंचन पध्दतीचा वापर वाढविणे हे नितांत गरजेचे आहे.

12.10 सुपीक जमीन व विपुल पाणी उपलब्ध असल्यामुळे लाभक्षेत्र विकास यंत्रणा ही जास्त कार्यक्षम होणे अशा भागांचा विकास घडवून आणण्यासाठी तातडीची गरजेचे आहे. पीक रचना बदलणे, त्या पीकरचनेला अनुरुप प्रक्रिया केंद्रे (साखर कारखाने, भात गिरण्या, दाल मिल्स इ.), बाजारपेठांची व्यवस्था हे एकूणच विकासाच्या दृष्टीने आवश्यक आहे.

12.11 या उपखोऱ्यात 25 वर्षापेक्षा जास्त काळापासून कार्यान्वित असलेले 23 पाटबंधारे प्रकल्प आहेत. त्यातील खिंडसी हा प्रसिध्द प्रकल्प 1914 साली ब्रिटीशाच्या काळात कार्यान्वित झालेला आहे. या प्रकल्पाचे वैशिष्ठये म्हणजे हा प्रकल्प 30 टक्के विश्वासार्हतेने नियोजित केलेला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून या प्रकल्पावर लाभधारक सिंचनाचा फायदा घेत आहेत. दीर्घकालिन आर्थिक लाभ मिळवण्यासाठी प्रकल्प सरासरी पेक्षाही कमी विश्वासार्हतेला जुन्या काळातही नियोजित करण्यात आलेला आहे.

12.12 वैनगंगा या नदीचा उगम मध्यप्रदेशातून होतो. मध्यप्रदेशामध्ये या नदीवर धरण बांधून त्यातून 424.69 दलघमी (15 अघफू) पाणी महाराष्ट्राला लवादाच्या निर्णयामुळे मिळण्याची तरतूद आहे. वनजमीन वा अन्य कांही कारणामुळे मध्यप्रदेशात या नदीचे त्यांच्या हिश्याचे पाणी अडवून त्या पाण्याचा वापर नजिकच्या काळात होण्याची शक्यता कमी दिसते. या परिस्थितिचा नेमका उपयोग करून या उपखोऱ्यातील धरणे उंचीने व आकाराने मोठे करून त्यापासून सिंचनाबरोबरच वीजनिर्मितिचे नियोजन करणे व राज्याच्या विजेची गरज भागविण्याची आखणी करणे राज्याच्या हिताचे रहाणार आहे. यानुसार नियोजनाला दिशा देण्याची गरज आहे.

12.13 नागपूर शहर हे चांगल्या सूपीक जमीनीवर वसलेले आहे व आता या क्षेत्रास पेंच प्रकल्पाचा सिंचनाचा लाभ मिळत आहे. अशा सूपीक सिंचनाखालील जमिनीवर शहराची व उद्योगाची वाढ करणे हे एकूणच समाजाच्या व राज्याच्या हिताचे नाही. शहराची व उद्योगाची वाढ ही नापीक व ओसाड जमिनीवर होऊन सुपीक व सिंचित जमिनीपासून अन्नधान्याचे उत्पादन वाढविणे आवश्यक आहे. या दृष्टीने या उपखोऱ्यातील शहरीकरण व औद्योगीकरणाच्या प्रश्नाकडे पाहिले पाहिजे.

12.14 या उपखोऱ्यात भूजलाचा वापर 236 दलघमी इतकाच आहे. नागपूर शहरात पण भूजल मुबलक आहे. कारण सिंचनाची सोय असल्यामुळे सिंचनेतर पाण्याची गरज भूजलातून होण्याची शक्यता असणारी स्थिति आहे. अशा परिस्थितित पेंच प्रकल्पातून 112 दलघमी पाणी आणण्याची खर्चीक व्यवस्था बसविणे हे हितकारी नाही. यापुढील भूजलाच्या वापराचे नियोजन व वापर या दिशेने होणे गरजेचे आहे. सिंचनासाठी पण भूजलाचा वापर वाढविणे हे गरजेचे आहे.

12.15 या उपखोऱ्यामध्ये माजी मालगुजारी तलाव 3372 आहेत. 300-400 वर्षापूर्वी गौड राजाच्या कारकिर्दीत हे तलाव बांधले गेले आहेत. या तलावाद्वारे ऊसाचे पीक घेणे आणि भातशेतीला संरक्षण देणे असा दुहेरी हेतू असावा. सध्याच्या तलावांचा उपयोग फक्त भात शेतीला संरक्षण देण्यासाठी होतो. ऊसाचे पीक मात्र नामशेष झालेले आहे. ऊसापासून गुळ तयार करून त्यातून या भागाला समृध्दी आली असावी. तसे पुरावे आज पण सापडतात. अलिकडे याच उपखोऱ्यामध्ये साधारणतः 70-80 वर्षापूर्वी बांधण्यात आलेल्या असोला मेंढा प्रकल्पामध्ये ऊसाचे पीक घेतल्याच्या नोंदी आहेत. सध्या फक्त भाताच्या पिकावर (एकाच पिकावर) समाधान मानले जाते. ब्रिटीशांच्या काळात या तलावांची मालकी मालगुजाराकडे आली. महसूल जमा करण्यासाठीची सोय म्हणून ब्रिटीशांनी ही व्यवस्था अमलात आणली. कालांतराने देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर हे मालगुजारी तलाव शासनाने स्वतःच्या अखत्यारीत घेण्याचा प्रयत्न केला आणि लोकसहभागातून निर्माण झालेली ही व्यवस्था मोडकळीस आली. आज अनेक मालगुजारी तलाव हे नामशेष झालेले आहेत. जे शिल्लक आहेत त्यांची पुनर्बांधणी व फेररचना करण्याची गरज आहे. पारंपारिक लोकसहभागातून निर्माण झालेल्या सिंचन व्यवस्थापनाला पुनर्जिवीत करण्याची आवश्यकता आहे. आयोगाने मालगुजारी तलावाची फेररचना व वैनगंगा खोऱ्यातील पाण्याचे नियोजन या विषयावर भंडारा येथे कार्यशाळा घडवून आणली होती. त्यावरून अशा फेररचनेला या उपखोऱ्यात चांगला प्रतिसाद मिळेल असे समजण्यास वाव आहे.

12.16 आज या खोऱ्यामध्ये फक्त भाताचेच पीक घेतले जाते आणि उपलब्ध सर्व पाणी भात या पिकासाठीच खर्ची घालण्यात येते. भातासारखे फक्त पीक घेऊन समृध्दी येत नाही आणि म्हणून या उपखोऱ्यामध्ये पीक रचनेत आमूलाग्र बदल करण्याची आवश्यकता आहे.

गोसीखुर्द सारखा एक मोठा प्रकल्प या उपखोऱ्यामध्ये कार्यान्वित होत आहे. या प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात आता पासूनच पाणी वापर संस्था उभ्या करुन शेतकऱ्यांना प्रशिक्षण देऊन लाभक्षेत्राचा विकास करण्याच्या दृष्टीने पाऊले टाकण्याची गरज आहे. अन्यथा इतका मोठा प्रकल्प करोडो रुपये खर्च करून सुध्दा प्रकल्पाचा पूर्ण प्रभाव पडू शकणार नाही.

गोसीखुर्द धरण भंडारा जिल्ह्यातील गोसीखुर्द गावाजवळ आहे. या प्रकल्पाव्दारे भंडारा, नागपूर व चंद्रपूर जिल्ह्यातील 1 लक्ष 90 हजार हेक्टर जमीन ओलीताखाली येणार आहे. धरणाची एकूण लांबी 11.25 किमी असून महत्तम उंची 22.50 मीटर आहे. जलाशयाच्या पाण्याचा साठा 1146 दलघमी राहणार असून उजव्या कालव्याव्दारे 433 दलघमी पाणी असोलामेंढा जलाशयात साठविले जाईल. धरणाच्या सांडव्यावर 18.30 मी × 16.76 मी. आकाराचे 34 वक्राकार दरवाजे बसविण्यात येतील व त्याव्दारे सुमारे 67300 घमी / सेंकद एवढया पुराच्या नियंत्रणाची व्यवस्था हाईल.

या प्रकल्पांतर्गत चार उपसा सिंचन योजना देखील अंतर्भूत आहेत. त्यापैकी टेकेपार व पाघोरा या डाव्या तीरावर असून बंभोरा व मोरवाबडी या उजव्या तीरावर आहेत. टेकेपार व अंभोरा या दोन उपसा सिंचन योजनेव्दारे तलाव निर्मिति पूर्वीच सिंचनाचा लाभ होणार असल्यामुळे या योजना प्राथम्याने पूर्ण करण्याचे नियोजीले आहे. गोसीखुर्द प्रकल्पाचे टप्पे खालील प्रमाणे आहेत.-

टप्पा 1) टेकेपार व अंभोरा या दोन उपसा सिंचन योजनाव्दारे 195 कोटी रूपये खर्चात 20,000 हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होईल.

टप्पा 2) मुख्य धरणाचे बांधकाम पूर्ण करून मोखाबर्डी व पाघोरा या दोन उपसा सिंचन योजनाव्दारे 52,000 हेक्टर सिंचन क्षेत्र निर्माण होईल.

टप्पा 3) गोसीखुर्द धरणाच्या सा.क्र. 7875 मी. पासून 107 किमी लांबीचा उजवा मुख्य कालवा प्रस्तावित असून त्याव्दारे 66970 हेक्टर सिंचनाखाली येईल. तसेच असोलामेंढा तलावात पाणी सोडल्यामुळे असोलामेंढा कालव्याव्दारे 64978 हेक्टर क्षेत्र सिंचित होईल.

टप्पा 4) गोसीखुर्द धरणाच्या सा.क्र. 820 मी. पासून 22.93 किमी लांबीचा डावा मुख्य कालवा नियोजित असून त्याव्दारे 44968 हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येईल.

प्रत्येक टप्पा स्वतंत्रपणे 5-5 वर्षात पूर्ण केला तर वेगवेगळी लाभक्षेत्रे विकसित होतात व सिंचनाचे फायदे मिळणे सुरू होते. या प्रकल्पातील पाणी उपसा सिंचन पध्दतीने वापरण्याचे पण प्रस्तावित आहे. भातासारखे एकच पीक पारंपारिक पध्दतीने गोसीखुर्द प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात राबविल्यास या प्रकल्पाच्या लाभक्षेत्राचा अपेक्षित पूर्ण विकास होणे कठिण आहे. म्हणूनच आतापासून लोकांची मानसिकता बदलण्याचे काम लोकप्रबोधनातून करण्याची गरज आहे. पाणी वापर संस्था स्थापन करून लोकांना सिंचनाचे ज्ञान देऊन लाभ क्षेत्राचा विकास घडवून आणणे गरजेचे आहे. लाभक्षेत्र विकास यंत्रणेचे हे प्रमुख उद्दिष्ट राहणार आहे. खोऱ्यात उत्पादित झालेल्या पिकांवर प्रक्रिया करणारे कारखाने काढणे, मालाच्या साठवणुकीची व्यवस्था व बाजारपेठा उपलब्ध करून देणे हे तितकेच अगत्याचे आहे.

या प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात भात पिकाला महत्व दिलेले आहे. एकूण या प्रदेशांची पीक रचना पाहता भाताला पाण्याची गरज असल्याने त्याचे उत्पादनात वाढ व्हावी असा प्रयत्न केल्या जाणार आहे. त्याचे प्रमाण प्रकल्प अहवालात 40 % हून 60 % पर्यंत वाढविले आहे. सर्वसाधारणपणे लवकर, मध्यम व उशिरा येणाऱ्या भातास अनुक्रमे 30, 45व 60 दिवसात अंदाजे 100, 150 व 200 मिमी पाण्याचा ताण पडतो. सरासरी ताण 150 मिमी आणि आवश्यक ओलित 10 सेमी गृहीत धरल्यास एक हेक्टर भाताच्या पिकास संरक्षित ओलित

देण्याकरिता 1500 घनमीटर पाणी पुरेसे होते. त्याच बरोबर ऊस (20 %)मिरची (5 %), भुईमूग (3 %), भाज्या-फळे (3 %) इत्यादींचा सुध्दा पीक पध्दतीत समावेश करण्यात आला आहे. फळांकडे अधिक लक्ष दिल्यास त्यांचा चांगला परिणाम उत्पादकाला मिळू शकेल व शेतकऱ्यांच्या राहणीमानात सुधारणा होईल.

या प्रकल्पाच्या जलाशयाखाली एकूण 22258 हेक्टर क्षेत्र येणार असून 186 गावे पूर्णतः/अंशतः बाधित होणार आहेत; 6598 कुटुंबांचे पुनर्वसन करावे लागणार आहे. हा प्रकल्प इ.स.2007 पर्यंत पूर्ण करण्याच्या दृष्टीने कार्यक्रम तयार करण्यात आला आहे.

12.17 उपखोऱ्यात नागपूर येथे विद्यापीठ, महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोगिता केंद्र, राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्था, प्रादेशिक सुदूर संशोधन सेवा केंद्र या महत्वाच्या संस्था कार्यरत आहेत. अनेक अभियांत्रिकी महाविद्यालये आहेत. सामाजिक, आर्थिक व पर्यावरणीय दृष्टिकोनातून अशा संस्थांच्या माध्यमातून या उपखोऱ्याचा सर्वांगीण अभ्यास करून घेणे व पुढील 30 वर्षांच्या तपशीलवार पाण्याचा संबंधातील विकास कार्यक्रम तयार करणे अवघड नाही. बदलत्या स्थितिचा वेळोवेळी वेध घेवून नवी कारवाई करण्याच्या सूचना सुध्दा या संस्थांच्या सामूहिक विचारविमर्षातून घडवून आणता येईल.

12.18 उपखोऱ्यात नागपूर, भंडारा, गोंदिया, तुमसर इत्यादी शहरे आहेत. त्यामुळे या शहरां जवळच्या क्षेत्रास भाजीपाला वाढीस वाव आहे.

या उपखोऱ्याच्या चंद्रपूर जिल्ह्यातील भाग प्रामुख्याने विघटीत, स्फटीकिय, विकेंद्रीय आर्कियन भूस्तराने व्यापलेला असून हे सर्वात पुरातन असे रुपांतरित खडक आहेत. स्फटिकीय शिस्ट विभागणी करण्याजोगे नसलेले भूस्तराने व्यापलेले आहेत. हयावर धारवार समूहाचे रुपांतरित जलजन्य खडक विसावले आहेत. ग्रॅनाईट सारख्या खडकांनी त्यांना आरपार छेदलेले आहे.

स्फटिकीय रुपांतरित प्रस्तर हे मूलतः सच्छिद्र नसतात. परंतु त्यांच्यातील विघटनशीलता, जोडणक्षमता आणि भेगा आणि तुटकता त्यामुळे हयांच्यात जलधारक क्षमता काही प्रमाणात निर्माण होते. भेदकतेचे प्रमाण, जोडणीतील सांधा आणि विघटन शीलतेच्या प्रमाणावर त्याची जलधारण क्षमता अवलंबून असते आणि ही क्षमता प्रस्तरामध्ये विविध जागी आढळून येते. आर्कियन भुस्तर प्रस्तरामध्ये जोड आणि भेगा असलेल्या विघटीत प्रस्तरात भूजलाची उपलब्धता आढळते. असे भूजलधारक विभाग साधारणतः 27-40 मीटर खोलीपर्यन्त आढळून आलेले आहेत. या भागात भूजलाचा विकास प्रामुख्याने विहिरींद्वारे करण्यात येतो. विहिरीची सर्वसाधारण सरासरी खोली ही 8-12 मीटर पर्यन्त असून व्यास 3-4 मीटर पर्यन्त आहे. मोजक्या ठिकाणी विहिरींच्या तळाशी 20-30 मीटर खोल पर्यन्त इनवेल बोअर घेण्यात आलेले असून त्याचे प्रमाण अत्यल्प आहे. जलधारक खडकांची जलवहन क्षमता 1 ते 3.5 टक्के असून मान्सून पूर्व आणि मान्सूनोत्तर पाण्याच्या पातळीतील फरक 3 ते 6 मीटर एवढा आहे.

ब्रम्हपुरी तालुक्यातील वैनगंगा नदीच्या काठाजवळील भाग हा गाळाच्या प्रदेशाने व्यापलेला असून हा प्रस्तर वाळू, पेबल, आणि ग्रॅव्हल यांचे मिश्रण आहे. हयाची खोली साधारण 18 ते 30 मीटर पर्यन्त आढळते. हया भागातील विहिरींची खोली 7 ते 12 मी व व्यास 2 ते 3 मी असून हया जलधारक खडकांची धारण क्षमता 6 ते 10 टक्के एवढी आहे. वैनगंगा खोऱ्यातील जलसंपत्तिचे मूल्यांकन केले असता साधारणतः 32 टक्के पाणी वाहून जाते व 12 टक्के पाणी जमिनीत मुरते.

12.19 या उपखोऱ्यातील पिवळसर, तपकिरी, मध्यम काळी सुपीक जमीन भाताचे शेतीसाठी योग्य आहे. शेती वापराचे दृष्टिकोनातून महाराष्ट्रातील सर्वसाधारण जमिनीपेक्षा ही वेगळी वाटते, भातावर प्रक्रिया करणारे कारखाने याच उपखोऱ्यात विकसित करून या भागाचा विकास करण्याची गरज आहे.

12.20 या उप खोऱ्यात खापरखेडा व कोराडी येथे औष्णिक बीज केंद्र आहेत. त्यांची वीज निर्मिति क्षमता 1520 मेवॅ आहे. खोऱ्यात कोळश्याच्या खाणी असल्यामुळे व पाण्याच्या मुबलकतेमुळे औष्णिक बीज निर्मितिस आणखीही वाव आहे.

12.21 वन उत्पादनावर आधारित रासायनिक तसेच इतरही नवीन उद्योगधंद्याना जास्त चालना दिल्यास येथील पाणी गरज वाढेल व शिल्लक पाण्याचा वापर होईल.

12.22 या उप खोऱ्यात 3 लक्ष 54 हजार हेक्टर पडीक जमीन आहे. यापैकी अंदाजे 2 लक्ष हेक्टर क्षेत्राचे संशोधन करून पुनर्वसन करणे शक्य होईल.

12.23 वन 'जमिनीच्या प्रश्नामूळे या उपखोऱ्यातील अनेक सिंचन व जलविद्युत प्रकल्प अडलेले आहेत. हा प्रश्न सोडवून या प्रकल्पांना गती देणे गरजेचे आहे.

12.24 या उपखोऱ्यात मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध आहे. त्यामुळे बऱ्याच भागात झिंगा व मत्स्यशेती करण्यासाठी वाव आहे व त्यादृष्टीने विकास होऊ शकेल.

12.25 या उपखोऱ्यात नवेगाव, खिंडसी, नागझिरा अशी पर्यटनस्थळे विकसित झालेली आहेत. याच धर्तीवर इतर सिंचन प्रकल्पांचे सानिध्यात अशी पर्यटनस्थळे विकसित करण्यास वाव आहे.

12.26 या उपखोऱ्यात कोळसा, मॅगनिज व कच्च्या लोखंडाच्या खाणी बऱ्याच प्रमाणात आहेत. त्यामुळे खणिकर्म उद्योग मोठया प्रमाणावर आहेत. याला वाढविण्यासाठी उपखोऱ्यातच मोठे कारखाने काढण्यात यावेत.

12.27 या उपखोऱ्यातील कोळश्याच्या खाणीतून उपसलेले पाणी गुणवत्ता तपासून लहान लहान तलावांत साठवून त्याद्वारे सिंचन करणे शक्य होईल.

12.28 या उपखोऱ्यातील एकूण 21445 चौकिमी भौगोलिक क्षेत्रापैकी 7400 चौकिमी क्षेत्र वन जमिनीने व्यापलेले आहे. यात तेंदूपत्यांची झाडे मुबलक प्रमाणात आहेत. त्यामुळे तेंदूपत्ता तोडणे व बिडी तयार करणे हा येथील मुख्य कुटीरोद्योग आहे. वन उत्पादनांची उपलब्धता (जसे साग, बांबू, वनौषधी इ) लक्षात घेता त्यावर आधारित उद्योगांना चालना देण्याची आवश्यकता आहे. या उपखोऱ्यात रेशीम (कोसा) उत्पादन सध्याही होत असले तरी त्यातही वाढ होण्यास बराच वाव आहे.

12.29 या उपखोऱ्याच्या लगतचा पूर्वेकडील कोरची तालुक्यातील 290 चौकिमी क्षेत्र महानदी खोऱ्यात येते.

—000—

सारणी : 8.1

**उपखोऱ्याच्या भौगोलिक प्रदेशाचे एकत्रित**

**माहवार सरासरी पर्जन्यमान व बाष्पीभवन**

पर्जन्यमान, बाष्पीभवन-मिमी

| अक्र | महिना | पर्जन्यमान | | | बाष्पीभवन | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | नागपूर | गोंदिया | सरासरी | पेंच प्रकल्प | |
| 1 | जानेवारी | 10 | 14 | 12 | 100 | |
| 2 | फेब्रुवारी | 12 | 12 | 12 | 130 | |
| 3 | मार्च | 17 | 17 | 17 | 180 | |
| 4 | एप्रिल | 13 | 11 | 12 | 225 | |
| 5 | मे | 16 | 10 | 13 | 339 | * |
| 6 | जून | 172 | 172 | 172 | 241 | ** |
| 7 | जुलै | 304 | 424 | 364 | 107 | |
| 8 | ऑगष्ट | 292 | 428 | 360 | 101 | |
| 9 | सप्टेंबर | 194 | 215 | 205 | 116 | |
| 10 | ऑक्टोबर | 51 | 53 | 52 | 131 | |
| 11 | नोव्हेंबर | 12 | 8 | 10 | 113 | |
| 12 | डिसेंबर | 17 | 25 | 21 | 93 | |
| | एकूण | 1110 | 1389 | 1250 | 1876 | |

**हंगामनिहाय बाष्पीभवनाचा तपशील**

बाष्पीभवन - मिमी

| अक्र | हंगाम | बाष्पीभवन |
|---|---|---|
| 1 | खरीप | 389 |
| 2 | रब्बी | 502 |
| 3 | उन्हाळी | 985 |
| | एकूण | 1876 |

* प्रतिदिन सरासरी 8 मिमी बाष्पीभवन.

** प्रतिदिन सरासरी 11 मिमी बाष्पीभवन.

सारणी 8.2
**पर्जन्यमापन केंद्रांचा तपशील**

पर्जन्य - मिमी

| अक्र | केंद्राचे नाव | प्रकार | स्वामित्व | आधार सामुग्री उपलब्धीचा कालावधी | वार्षिक सरासरी पर्जन्य |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | देवरी - गोंदिया | सा.प./स्व.प. | पा.खा. | 1987 ते 94 | 974 |
| 2 | पिपरीया - सालेकसा | सा.प./स्व.प. | पा.खा. | 1982 ते 94 | 1441 |
| 3 | करधा - भंडारा | सा.प./स्व.प. | पा.खा. | 1988 ते 94 | 1020 |
| 4 | शिरपुर - देवरी | सा.प./स्व.प. | पा.खा. | 1987 ते 94 | 1616 |
| 5 | कोथुना - भंडारा | सा.प./स्व.प. | पा.खा. | 1986 ते 94 | 1113 |
| 6 | चिंचघाट - भंडारा | सा.प./स्व.प. | पा.खा. | 1986 ते 94 | 1132 |
| 7 | गोसीखुर्द - पवनी | सा.प./स्व.प. | पा.खा. | 1982 ते 94 | 1265 |
| 8 | लाखांदूर - लाखांदूर | सा.प./स्व.प. | पा.खा. | 1989 ते 94 | 1691 |
| 9 | सितेकसा - तुमसर | सा.प./स्व.प. | पा.खा. | 1981 ते 94 | 1236 |
| 10 | गटालगाव - तुमसर | सा.प. | पा.खा. | 1991 ते 94 | 894 |
| 11 | गोठणगाव - मो.अर्जुनी | सा.प./स्व.प. | पा.खा. | 1991 ते 94 | 577 |
| 12 | बोंडे - साकोली | सा.प./स्व.प. | पा.खा. | 1988 ते 93 | 1370 |
| 13 | बेवारटोला- सालेकसा | सा.प. | पा.खा. | 1982 ते 90 | 1424 |
| 14 | जाभळी - गोरेगाव | सा.प. | पा.खा. | 1982 ते 94 | 1549 |
| 15 | साकोली - साकोली | सा.प./स्व.प. | पा.खा. | 1989 ते 93 | 1218 |
| 16 | भंडारा - भंडारा | सा.प./स्व.प. | पा.खा. | 1982 ते 93 | 1156 |
| 17 | गुडरी - तुमसर | सा.प./स्व.प. | पा.खा. | 1982 ते 93 | 1156 |
| 18 | गोबरवाही - तुमसर | सा.प. | पा.खा. | 1982 ते 93 | 1417 |
| 19 | जोब - मोहाडी | सा.प. | पा.खा. | 1981 ते 93 | 1816 |
| 20 | माथनी - मोदा | सा.प./स्व.प. | पा.खा. | 1981 ते 94 | 1078 |
| 21 | गोठणगाव - भिवापूर | सा.प. | पा.खा. | 1990 ते 94 | 1019 |
| 22 | बिना - कामठी | सा.प. | पा.खा. | 1980 ते 94 | 740 |
| 23 | टेंभुरडोह - सावनेर | सा.प./स्व.प. | पा.खा. | 1986 ते 94 | 806 |
| 24 | बोरी - कुही | सा.प. | पा.खा. | 1990 ते 93 | 1037 |
| 25 | चांदा - उमरेड | सा.प. | पा.खा. | 1981 ते 94 | 1083 |
| 26 | कुही - कुही | सा.प. | पा.खा. | 1981 ते 92 | 1022 |

पर्जन्य - मिमी

| अक्र | केद्राचे नाव | प्रकार | स्वामित्व | आधार सामुग्री उपलब्धीचा कालावधी | वार्षिक सरासरी पर्जन्य |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 27 | उमरेड | सा.प. | पा.खा. | 1981 ते 91 | 112 |
| 28 | भिवापूर - भिवापूर | सा.प./स्व.प. | पा.खा. | 1985 ते 94 | 1035 |
| 29 | पाटनसावंगी - सावसेर | सा.प./स्व.प. | पा.खा. | 1981 ते 94 | 917 |
| 30 | अंबाझरी - पारसिवनी | सा.प. | पा.खा. | 1990 ते 94 | 903 |
| 31 | कळमेश्वर - कळमेश्वर | सा.प. | पा.खा. | 1985 ते 92 | 902 |
| 32 | सालई - सावनेर | सा.प. | पा.खा. | 1990 ते 93 | 1194 |
| 33 | पलसगड - कुरखेडा | सा.प./स्व.प. | पा.खा. | 1979 | 1290 |
| 34 | डोंगरगाव - कुरखेडा | सा.प./स्व.प. | पा.खा. | 1979 | 1446 |
| 35 | चरविंदड - कुरखेडा | सा.प. | पा.खा. | 1977 | 1199 |
| 36 | भटेगाव - कुरखेडा | सा.प. | पा.खा. | 1979 | 2045 |
| 37 | मालेवाडा - कुरखेडा | सा.प. | पा.खा. | 1975 | 1423 |
| 38 | खोब्रामेंढा - कुरखेडा | सा.प./स्व.प. | पा.खा. | 1980 | 911 |
| 39 | कुरखेडा - कुरखेडा | सा.प./स्व.प. | पा.खा. | 1976 | 1454 |
| 40 | देवखिडक - आरमोरी | सा.प. | पा.खा. | 1975 ते 93 | 1474 |
| 41 | वैरागड - आरमोरी | सा.प. | पा.खा. | 1976 | 1326 |
| 42 | आरमोरी - आरमोरी | सा.प./स्व.प. | पा.खा. | 1989 | 1617 |
| 43 | सिरसुडी - धानोरा | सा.प./स्व.प. | पा.खा. | 1980 | 1072 |
| 44 | कटेअरी - धानोरा | सा.प./स्व.प. | पा.खा. | 1980 ते 88 | 987 |
| 45 | पनोमारा - धानोरा | सा.प./स्व.प. | पा.खा. | 1977 | 1091 |

## सारणी : 8.3

## सरीतामापन केंद्रांचा तपशील

येवा - दलघमी

| अक्र | सरिता मापन केंद्राचे नाव | स्वामित्व | आधार सामुग्री उपलब्धता कालावधी | वार्षिक येवा |
|---|---|---|---|---|
| 1 | कार्मा | पा.खा. | 1981-90 | 6779 |
| 2 | गोसीखुर्द | पा.खा. | 1981-90 | 11032 |
| 3 | पिपरीया | पा.खा. | 1981-90 | 78 |
| 4 | सालेकसा | पा.खा. | 1981-90 | 243 |
| 5 | देवरी | पा.खा. | 1984-90 | 5030 |
| 6 | कोथूर्ना | पा.खा. | 1985-90 | 222 |
| 7 | चिचघाट | पा.खा. | 1987-90 | 1503 |
| 8 | शिरपूर | पा.खा. | 1987-90 | 113 |
| 9 | लाखांदूर | पा.खा. | 1987-90 | 1323 |
| 10 | बोंडे | पा.खा. | 1987-90 | 355 |
| 11 | माथनी | पा.खा. | 1981-90 | 2075 |
| 12 | टेंबुरडोह | पा.खा. | 1984-90 | 1490 |
| 13 | कुरखेडा | पा.खा. | 1981-90 | 197 |
| 14 | वाघोली बुटी | पा.खा. | 1981-90 | 12384 |
| 15 | वडसा | पा.खा. | 1981-90 | 11445 |
| 16 | माक्रोंडी | पा.खा. | 1985-90 | 335 |
| 17 | आरमोरी | पा.खा. | 1985-90 | 325 |
| 18 | शिवनी | पा.खा. | 1985-90 | 502 |

सारणी 8.4

**जलसंपत्तीची उपलब्धता**

ठिकाण : गोसीखुर्द प्रकल्प स्थळ — येवा - दलघमी

| अक्र | वर्ष | वार्षिक सरासरी येवा | संगत वर्ष | उतरत्या क्रमाने येवा | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | 1914 | 22970 | 1961 | 35752 | |
| 2 | 1915 | 17903 | 1933 | 29749 | |
| 3 | 1916 | 19092 | 1944 | 28176 | |
| 4 | 1917 | 21178 | 1942 | 27334 | |
| 5 | 1918 | 11147 | 1947 | 25413 | |
| 6 | 1919 | 22293 | 1970 | 24794 | |
| 7 | 1920 | 7264 | 1931 | 24772 | 10 |
| 8 | 1921 | 12665 | 1940 | 24747 | |
| 9 | 1922 | 11546 | 1938 | 23641 | |
| 10 | 1923 | 22800 | 1973 | 23094 | |
| 11 | 1924 | 14217 | 1955 | 22858 | |
| 12 | 1925 | 14589 | 1923 | 22800 | |
| 13 | 1926 | 21602 | 1914 | 22670 | 20 |
| 14 | 1927 | 1547 | 1937 | 21821 | |
| 15 | 1928 | 14901 | 1959 | 21743 | |
| 16 | 1929 | 25763 | 1919 | 21727 | |
| 17 | 1930 | 13286 | 1926 | 21602 | |
| 18 | 1931 | 24772 | 1947 | 21347 | |
| 19 | 1932 | 19950 | 1936 | 21288 | 30 |
| 20 | 1933 | 29749 | 1917 | 21178 | |
| 21 | 1934 | 19489 | 1945 | 21110 | |
| 22 | 1935 | 18083 | 1956 | 20469 | |
| 23 | 1936 | 21288 | 1977 | 20114 | |
| 24 | 1937 | 21821 | 1932 | 19950 | |
| 25 | 1938 | 23641 | 1934 | 19479 | |
| 26 | 1939 | 18433 | 1954 | 19239 | 40 |
| 27 | 1940 | 24747 | 1960 | 18645 | |
| 28 | 1941 | 8641 | 1939 | 18433 | |
| 29 | 1942 | 27334 | 1935 | 18083 | |
| 30 | 1943 | 15617 | 1958 | 18058 | |
| 31 | 1944 | 27176 | 1951 | 18828 | |
| 32 | 1945 | 21110 | 1963 | 17030 | 50 |
| 33 | 1946 | 15942 | 1964 | 16831 | |
| 34 | 1947 | 25413 | 1975 | 16757 | |
| 35 | 1948 | 14599 | 1969 | 16557 | |
| 36 | 1949 | 21347 | 1916 | 16261 | |

ठिकाण : गोसीखुर्द प्रकल्प स्थळ येवा - दलघमी

| अक्र | वर्ष | वार्षिक सरासरी येवा | संगत वर्ष | उतरत्या क्रमाने येवा | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 37 | 1950 | 13509 | 1968 | 16174 | |
| 38 | 1951 | 10828 | 1967 | 15995 | 60 |
| 39 | 1952 | 8046 | 1946 | 15942 | |
| 40 | 1953 | 14217 | 1929 | 15763 | |
| 41 | 1954 | 19239 | 1943 | 15617 | |
| 42 | 1955 | 22858 | 1927 | 15471 | |
| 43 | 1956 | 20469 | 1928 | 14901 | |
| 44 | 1957 | 12804 | 1976 | 14611 | |
| 45 | 1958 | 18058 | 1948 | 14599 | 70 |
| 46 | 1959 | 21743 | 1925 | 14589 | |
| 47 | 1960 | 18645 | 1924 | 14217 | 75 |
| 48 | 1961 | 35752 | 1953 | 14217 | |
| 49 | 1962 | 13990 | 1962 | 13990 | |
| 50 | 1963 | 17030 | 1971 | 13977 | |
| 51 | 1964 | 16831 | 1950 | 13509 | |
| 52 | 1965 | 3192 | 1930 | 13286 | |
| 53 | 1966 | 9466 | 1957 | 12804 | |
| 54 | 1967 | 15994 | 1921 | 12665 | |
| 55 | 1968 | 16174 | 1922 | 11546 | |
| 56 | 1969 | 16557 | 1918 | 11147 | |
| 57 | 1970 | 24794 | 1951 | 10828 | |
| 58 | 1971 | 1308 | 1974 | 9964 | |
| 59 | 1972 | 9342 | 1966 | 9466 | 90 |
| 60 | 1973 | 23094 | 1972 | 9342 | |
| 61 | 1974 | 9964 | 1941 | 8641 | |
| 62 | 1975 | 16757 | 1952 | 8046 | |
| 63 | 1976 | 14611 | 1920 | 7264 | |
| 64 | 1977 | 20114 | 1965 | 3192 | 100 |

$$\frac{\text{10 टक्के उपलब्धता}}{\text{90 टक्के उपलब्धता}} = 2.62$$

$$\frac{\text{50 टक्के उपलब्धता}}{\text{90 टक्के उपलब्धता}} = 1.8$$

$$\frac{\text{50 टक्के उपलब्धता}}{\text{75 टक्के उपलब्धता}} = 1.2$$

सारणी 8.5

**प्रकल्पांची सद्य:स्थिती**

चल पाणीसाठा - दलघमी

पाणीवापर - दलघमी सिंचनक्षेत्र - हेक्टर

| अक्र | प्रकल्पाचा संवर्ग | पूर्ण झालेले प्रकल्प | | | | प्रगतीपथावरील प्रकल्प | | | | भविष्यकालिन प्रकल्प | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| अ | मोठे | पेंच प्रकल्प | 1374 | 1050 | 104476 | बावनथडी | 217 | 176 | 27708 | सती | 105 | 193 | 22240 | | | | |
| | | बाघप्रकल्प | 269 | 215 | 33684 | गोसीखुर्द | 1025 | 1634 | 190000 | कन्हान | 32 | 710 | 39000 | | | | |
| | | इटियाडोह | 225 | 322 | 40080 | तुलतुली | 286 | 305 | 30590 | धापेवाडा | 20 | 690 | 67506 | | | | |
| | | | | | | धापेवाडा | | 41 | 5000 | | | | | | | | |
| | | 3 | 1868 | 1587 | 178240 | 4 | 1528 | 2156 | 253298 | 3 | 157 | 1593 | 128746 | 10 | 3554 | 5335 | 560284 |
| ब | मध्यम | चांदपूर | 29 | 29 | 4865 | निम्न चुलबंद | | 67 | 7052 | गराडी | 10 | 32 | 1800 | | | | |
| | | पांढराबोडी | 13 | 13 | 862 | कटंगी | 8 | 16 | 2271 | बुटीनाला | 6 | 64 | 11060 | | | | |
| | | मकरधोकडा | 20 | 19 | 3375 | पेंढरीनाला | 5 | 8 | 1836 | खोब्रागडी | 46 | 66 | 8775 | | | | |
| | | उमरी | 5 | 6 | 1185 | उमरझरी | 6 | 10 | 2030 | झाशीनगर | 25 | 25 | 2550 | | | | |
| | | कोरननाला | 4 | 4 | 7884 | करजखेडा | | 56 | 5000 | पूर्वबांध | 67 | 45 | 3869 | | | | |
| | | मोरधाम | 5 | 4 | 1315 | सोडयाटोळा | | 68 | 9025 | कुवाढास | 22 | 24 | 4000 | | | | |
| | | कोलार | 31 | 27 | 7544 | कालपाशरी | 7 | 11 | 1964 | लालपहाडी | 7 | 6 | 2400 | | | | |
| | | खेकरनाला | 24 | 23 | 3810 | ओवारा | 6 | 12 | 1367 | डोंगरगाव | 25 | 25 | 2500 | | | | |
| | | चंद्रभागा | 8 | 7 | 2604 | कालमातीटोला | 12 | 13 | 2796 | रजेगावकाठी | 16 | 16 | 3040 | | | | |
| | | बोंदलकसा | 16 | 20 | 4047 | वाघेलीटोला बुटी | | 34 | 4542 | निंबुघाट | 6 | 12 | 1750 | | | | |
| | | बघेडा | 5 | 6 | 1798 | | | | | सुखीवाडा | 50 | 50 | 5000 | | | | |
| | | बेटेकर बोशली | 4 | 3 | 1315 | | | | | | | | | | | | |
| | | चोरखमारा | 21 | 22 | 4047 | | | | | | | | | | | | |
| | | खैरबंधा | 16 | 16 | 3844 | | | | | | | | | | | | |
| | | मानागढ | 7 | 5 | 1700 | | | | | | | | | | | | |
| | | संग्रामपूर | 4 | 3 | 639 | | | | | | | | | | | | |
| | | सारेना | 6 | 6 | 933 | | | | | | | | | | | | |
| | | रेंगेपार | 4 | 6 | 1200 | | | | | | | | | | | | |
| | | चुलबंद | 21 | 20 | 4043 | | | | | | | | | | | | |
| | | सायकी | 7 | 35 | 2323 | | | | | | | | | | | | |
| | | 20 | 249 | 275 | 59333 | 10 | 44 | 295 | 37883 | 11 | 280 | 365 | 46744 | 41 | 574 | 934 | 143960 |

| अक्र | प्रकल्पाचा संवर्ग | पूर्ण झालेले प्रकल्प | | | | प्रगतीपथावरील प्रकल्प | | | | भविष्यकालिन प्रकल्प | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| क | मोठे लघु | पारडगांव | 4 | 3 | 838 | उंद्री | 4 | 5 | 835 | सापरा | 1 | 6 | 1100 | | | | |
| | | करांडला | 3 | 4 | 672 | सिरसी | 9 | 12 | 1578 | असोली | 5 | 6 | 1290 | | | | |
| | | रावणवाडी | 7 | 6 | 1052 | ठाणा | 9 | 9 | 1307 | नवाटोला | 2 | 4 | 800 | | | | |
| | | पांगडी | 2 | 5 | 728 | जवाळी | 4 | 5 | 984 | धानोड | 5 | 9 | 1337 | | | | |
| | | बदभदा | 3 | 8 | 695 | खुमारीनाला | 5 | 6 | 1353 | कारडाबोदी | 2 | 5 | 802 | | | | |
| | | रेंगेपारकोठा | 3 | 5 | 680 | पिंडकेपार | 7 | 14 | 1712 | कपासिका | 5 | 7 | 800 | | | | |
| | | रीसाला | 6 | 8 | 1640 | बेवारटोला | 5 | 5 | 1240 | सुंदरी | 4 | 5 | 950 | | | | |
| | | नवेगांवबांध | 30 | 47 | 4536 | निमगांव | 3 | 7 | 817 | चंदनपुर | 6 | 8 | 1070 | | | | |
| | | सिवनीबांध | 8 | 11 | 1851 | कलकसा | 3 | 7 | 931 | सातबहिणी | 11 | 15 | 1800 | | | | |
| | | सालेगांव | 3 | 6 | 769 | पुरदोली | 3 | 7 | 937 | खेडेपार | 4 | 5 | 700 | | | | |
| | | खैरी | 3 | 4 | 830 | डुरकानगड्डा | 3 | 4 | 970 | चिकणा | 3 | 4 | 936 | | | | |
| | | | | | | | | | | हत्तीडोह | 8 | 14 | 1750 | | | | |
| | | | | | | | | | | नाल्लीकडुंग | 8 | 10 | 1000 | | | | |
| | | | | | | | | | | डुलापल्ड | 9 | 10 | 1400 | | | | |
| | | | | | | | | | | कन्हारपायली | 5 | 6 | 1000 | | | | |
| | | | | | | | | | | चिंचटोला | 3 | 4 | 626 | | | | |
| | | | | | | | | | | मेंढीनाला | 6 | 13 | 1279 | | | | |
| | | | | | | | | | | कोसरी | 4 | 4 | 605 | | | | |
| | | 11 | 73 | 103 | 14291 | 11 | 56 | 83 | 12664 | 18 | 91 | 135 | 19245 | 40 | 220 | 321 | 46200 |
| ड | लघु (स.स्तर | 78 | 99 | 151 | 22982 | 24 | 24 | 57 | 6927 | | | | | 102 | 123 | 208 | 29909 |
| इ | वरील सिंचनक्षेत्र | 3 | 2 | 3 | 647 | 3 | 1 | 2 | 420 | 95 | 134 | 82 | 20767 | 101 | 137 | 86 | 21834 |
| ई | जु.मा.त | 64 | 47 | 53 | 11812 | | | | | | | | | 64 | 47 | 53 | 11812 |
| | एकूण सर्व | 179 | 2338.4 | 2171.6 | 287305 | 52 | 1653.37 | 2590.83 | 311192 | 127 | 662.94 | 2174.143 | 215502 | 358 | 4655 | 6937 | 813999 |

सारणी : 8.6

**जलसंपत्तीचा ताळेबंद**

जलसंपत्ती - दलघमी

| अक्र | उपलब्धता | | अक्र | वापर (सन2030) | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **भूपृष्ठावरील** | | 4 | **भूपृष्ठावरील** | |
| | अ) नैसर्गिक | | | अ) घरगुती वापरासाठी | |
| | 1) 75 टक्के विश्वासार्हतेने | 8328 | | 1) नागरी | 300 |
| | 2) 50 टक्के विश्वासार्हतेने | 9985 | | 2) ग्रामीण | 123 |
| | 3) सरासरीने | 10026 | | 3) पशुधन | 73 |
| | 4) नियोजनासाठी | 10167 | | एकूण | 496 |
| | ब) मानवप्रबंधित | | | ब) उद्योगधंदयासाठी | 173 |
| | 1) नागरी वापरातून पुनरुद्भव (80 %) | 240 | | एकूण सिंचनेतर वापर | **669** |
| | 2) उद्योग धंदयातील पुनरुद्भव (97.5%) | 169 | 5 | इतर उपखाऱ्यात स्थलांतरीत पाणी | 233 |
| | 3) इतर खोऱ्यातून संक्रमित झालेले पाणी | 0 | 6 | सिंचनासाठी उपलब्ध भूपृष्ठावरील पाणी =(10167+409-669-233+927) | 10601 |
| | **एकूण (1 ब)** | **409** | | | |
| 2 | मानवनिर्मित लाभक्षेत्रातील पुनर्भरण (10167-669-233) च्या10 % | 927 | | | |
| 3 | **एकूण उपलब्धता [10167+409+927]** | **11503** | 7 | एकूण वापर | **11503** |
| | 1) भूजल उपलब्धता (वार्षिक एकूण पुनर्भरण ) | 3037 | | अ) भूजलाचा सध्याचा सिंचनासाठी वापर | 236 |
| | 2) भूजल वापरास मुभा ( 3037 च्या 65 %) | 1974 | | | |

टीपा : 1) भूजल उपलब्धतमुळे उपखोऱ्याच्या एकूण उपलब्धतेत वाढ होणार नाही ; भूजलाचा जेवढा उपसा होईल तेवढा नदी प्रवाह घटत जाईल; म्हणून एकूण उपलब्धतेचा आकडा काढताना भूजल उपलब्धतेचा विचार घेतलेला नाही.

2) संकलीत अंदाजासाठी सर्व पाण्याचा उपयोग भूपृष्ठावरील पाण्यातून दाखविला आहे. पण एकूण वापरापैकी अधिकाधिक

1974+927= 2901 भूजल माध्यमातून शक्य आहे.

3) पाणीवापराचे नियोजन उपलब्ध येवा मालिकेवर आधारित आहे.

सारणी 8.7

**जुनी धरणे**

| अक्र | प्रकल्पाचा संवर्ग | प्रकल्पाचे नाव | प्रकल्प पूर्ण झाल्याचे वर्ष |
|---|---|---|---|
| 1 | मोठे | असोलामेंढा | 1918 |
| 2 | मोठे | खिंडसी | 1914 |
| 3 | मध्यम | चांदपूर | 1915 |
| 4 | मध्यम | खेरबंध | 1915 |
| 5 | मध्यम | खेरबंध | 1915 |
| 6 | मध्यम | बोदलकसा | 1917 |
| 7 | मध्यम | चोरखमारा | 1923 |
| 8 | लघु | कुंमली | 1907 |
| 9 | लघु | गुमडोह | 1913 |
| 10 | लघु | पांगडी | 1917 |
| 11 | मध्यम | वेना | 1966 |
| 12 | लघु | रावणवाडी | 1960 |
| 13 | लघु | आमगाव | 1961 |
| 14 | लघु | सालेगाव | 1964 |
| 15 | लघु | सतीघाट | 1966 |
| 16 | लघु | राजोली | 1966 |
| 17 | लघु | अडेगाव | 1967 |
| 18 | लघु | कुरी | 1967 |
| 19 | लघु | नवेगाव बांध | 1967 |
| 20 | लघु | रिसाळा | 1967 |
| 21 | लघु | सडेपार | 1967 |
| 22 | लघु | सुवरधरा | 1968 |
| 23 | लघु | शिवनीबांध | 1969 |

टिप उपखोऱ्यातील गोंडकालीन तलावाची संख्या 3372 असून या पासून 21513 हेक्टर सिंचन होत आहे.

सारणी : 8.8

**भविष्यकालिन जलविद्युत प्रकल्प**

क्षमता मेवॅ

| अक्र | योजनेचे नाव | क्षमता |
|---|---|---|
| 1 | पेंच कामठी खेरी (एल.बी.सी.) | 1.5 |
| 2 | पेंच कामठी खैरी (आर.बी.सी.) | 1.5 |
| 3 | गोसीखूर्द (एल.बी.सी.) | 0.5 |
| 4 | गोसीखूर्द (आर.बी.सी.) | 2.5 |
| 5 | बाघ कॉम्पलेक्स | 2.65 |
| 6 | बावनथडी | 0.35 |
| 7 | बावनथडी आर.बी.सी.किमी 19 | 0.35 |
| 8 | बावनथडी आर.बी.सी.किमी 21 | 0.6 |
| 9 | बावनथडी आर.बी.सी.किमी 22 | 0.35 |

सारणी : 8.9


**वाहतुकीची साधने**

| अक्र | ब्रॉडगेज | नॅरो गेज |
|---|---|---|
| 1 | मुंबई - नागपूर - कलकत्ता | ब्रॉडगेज |
| 2 | हैद्राबाद - नागपूर - दिल्ली | ब्रॉडगेज |
| 3 | नागपूर - छिंदवाडा | नॅरो गेज |
| 4 | धुळे - नागपूर - रायपूर | राष्ट्रीय महामार्ग क्र. 6 |
| 5 | वाराणशी - नागपूर - हैद्राबाद | राष्ट्रीय महामार्ग क्र. 7 |
| 6 | नागपूर - चंद्रपूर | राज्य महामार्ग क्र 9 |
| 7 | रामटेक - तुमसर - गोंदिया - दरेकसा | राज्य महामार्ग क्र.249 |
| 8 | रामटेक - भंडारा | राज्य महामार्ग क्र.252 |
| 9 | अंबाडी - आंभोरा | राज्य महामार्ग क्र.254 |
| 10 | सिंधपूरी - अर्जुनीलाखांदूर | राज्य महामार्ग क्र.270 |
| 11 | पवनी - भंडारा - तुमसर | राज्य महामार्ग क्र.271 |
| 12 | बाराशिवनी - साकोली - वडसा | राज्य महामार्ग क्र.272 |
| 13 | तिरोडा - बालाघाट | राज्य महामार्ग क्र.273 |
| 14 | बालाघाट - गोंदिया - कोहमारा -वडसा | राज्य महामार्ग क्र.275 |
| 15 | लांझी - आमगाव - देवरी - कुरखेडा | राज्य महामार्ग क्र.276 |
| 16 | अडयाळ - अर्जुनी | राज्य महामार्ग क्र.277 |
| 17 | राजुरा- गोवीदपूर - अदिलाबाद | राज्य महामार्ग क्र.265 |
| 18 | बल्लारपूर - गोंडपिंपरी | राज्य महामार्ग क्र.267 |
| 19 | चिमूर - सिंदेवाही - आरमोरीरोड | राज्य महामार्ग क्र.268 |
| 20 | ब्रम्हपूरी - आरमोरी - धानोरा रोड | राज्य महामार्ग क्र.269 |
| 21 | पारवा - केळापूर - वणी - कुरखेडा | राज्य महामार्ग क्र.233 |
| 22 | कुरखेडा - वैरागड | राज्य महामार्ग क्र.278 |
| 23 | धोट रेगडी - कसनसुर कोटी | राज्य महामार्ग क्र.281 |
| 24 | आरेवाडा - भामरागड - कंवडे | |
| 25 | एटापल्ली - सुरजगड - गोलगुडा | राज्य महामार्ग क्र.282 |

सारणी 8.10

वन जमिनीमुळे अडलेले प्रकल्प

| अक्र | प्रकल्पाचे नांव | प्रकार | जिल्हा |
|---|---|---|---|
| 1 | तुलतुली | मोठा | गडचिरोली |
| 2 | सती | मोठा | गडचिरोली |
| 3 | निम्न चूलबंद | मध्यम | भंडारा |
| 4 | सोंड्याटोला | मध्यम | भंडारा |
| 5 | झाशी नगर | मध्यम | भंडारा |
| 6 | करजखेडा | मध्यम | भंडारा |
| 7 | कालीमातीटोला | मध्यम | भंडारा |
| 8 | बुटीनाला | मध्यम | चंद्रपूर |
| 9 | गराडी | मध्यम | चंद्रपूर |
| 10 | निंबूघाट | मध्यम | चंद्रपूर |
| 11 | मेंढी | मध्यम | चंद्रपूर |
| 12 | गायमुख | मध्यम | चंद्रपूर |
| 13 | खोब्रागडी | मध्यम | गडचिरोली |
| 14 | बेवराटोला | लघु | भंडारा |
| 15 | मुरदोली | लघु | भंडारा |
| 16 | पिंडकेपार | लघु | भंडारा |
| 17 | सोनकुंड | लघु | भंडारा |
| 18 | पिंडकेपार 2 | लघु | भंडारा |
| 19 | भिमलकसा | लघु | भंडारा |
| 20 | सुंदरी | लघु | भंडारा |
| 21 | भुराटोला | लघु | भंडारा |
| 22 | सातबहिणी | लघु | भंडारा |
| 23 | निमगांव | लघु | भंडारा |
| 24 | उपासियानाला | लघु | भंडारा |
| 25 | बंदरचुहा | लघु | भंडारा |
| 26 | काकडागोंदी | लघु | भंडारा |
| 27 | घानोड | लघु | भंडारा |
| 28 | आसोली | लघु | भंडारा |
| 29 | नवाटोला | लघु | भंडारा |
| 30 | पालांदुर | लघु | भंडारा |
| 31 | पुराडा | लघु | भंडारा |
| 32 | भिवापूर | लघु | नागपूर |
| 33 | उरकानगुंड्रा | लघु | गडचिरोली |


नकाशा - 8.1
13 Km 0 13 26 Km
महाराष्ट्र राज्य
8 मध्य वैनगंगा उपखोरे
• संदर्भ सूची •
1. राज्य सरहद्द
2. जिल्हा सरहद्द
3. तालुका सरहद्द
4. उपखोरे सरहद्द
5. जिल्हा मुख्यालय
6. तालुका मुख्यालय
7. रेल्वे मार्ग
8. रस्ते
9. नद्या व नाले
10. समपर्जन्यमान रेषा (मिमी)
11. धरणाचे ठिकाण व बुडीत क्षेत्र
पूर्ण
बांधकामाधीन
भविष्यकालिन
12. औद्योगिक क्षेत्र
13. महानगरपालिका
14. नगर पालिका
महाराष्ट्र जल व सिंचन आयोग
मध्य वैनगंगा उपखोरे
जून 1999
उपखोऱ्याचे स्थान
उपखोरे क्र.
उपखोऱ्यांची नावे
7 वर्धा
9 निम्न वैनगंगा
मध्य प्रदेश
जबलपूर कडे
दिल्लीकडे
काटोलकडे
कलकत्त्या कडे
मुंबईकडे
चंद्रपूर कडे
वर्धा उपखोरे
निम्न वैनगंगा उपखोरे
पेंच जलविद्युत
बावनथडी
सोंडया टोला
धापेवाडा उसिंयो
खेकर नाला
पेंढारी नाला
पेंच
खापा
रामटेक
तुमसर
तिरोडा
गोंदिया
आमगाव
सालेकसा
मोहाडी
पारशिवणी
सावनेर
मोहपा
उमरी
कोलार
खुमारी
मोरधाम
कळमेश्वर
कामठी
नागपूर
मौदा
भंडारा
साकोली
सायकी
कुही
मकर धोकडा
उमरेड
भिवापूर
गोसी खुर्द
अर्जुनी मोरगांव
पवनी
लाखांदूर
वैनगंगा नदी
ब्रम्हपुरी
नागभीड
देसाईगंज
कुरखेडा
सती नदी
खोब्रागडी
तुलतुली
आरमोरी
गडचिरोली
इटियाडोह
सुंदरी
देवरी
पेंच नदी
सुर नदी
कन्हान नदी
सुरबुडी नदी
1200
1400
1600
900

# उपखोरे :9

# निम्न वैनगंगा

## 1.0 भौगोलिक तपशील

या उपखोऱ्यात वैनगंगा या मुख्यनदीचा राज्याच्या सीमेजवळचा प्रदेश येतो. वैनगंगा नदी गोपालगंज जि.शिवनी (म.प्र.) येथे उगम पावते व गडचिरोली जिल्ह्यातील चप्राळयाजवळ वर्धा नदीस मिळते. संगमानंतरच्या या नदीस प्राणहिता या नावाने ओळखले जाते. महाराष्ट्र प्रदेशात वैनगंगेचा दोन भागात विचार करता येतो. मध्यप्रदेश मधून वैनगंगेने महाराष्ट्रात प्रवेश केल्यानंतर वैनगंगेच्या उजव्या तीरावरील असोलामेंढा प्रकल्पापर्यन्तचा व डाव्या तिरावरील कठाणी नदी वैनगंगेस मिळण्यापूर्वीचा व त्याखालील वैनगंगा-प्राणहिता यांचा निम्न वैनगंगा उपखोऱ्यात समावेश करण्यात आला (नकाशा 9.1) आहे. या उपखोऱ्याचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ 14861 चौकिमी आहे.हे उपखोरे (अ) वैनगंगा- प्राणहिता (आ) इंचमपल्लीपरिसर व (इ) इंद्रावती अशा तीन घटकात संबोधित करण्यात आले आहे. त्यांचे क्षेत्रफळ अनुक्रमे 8830 चौकिमी, 314 चौकिमी व 5717 चौकिमी आहे. सर्वात मोठा व सिंचनाच्या दृष्टीने महत्त्वाचा असलेला जो वैनगंगा प्राणहिता हा घटक आहे त्यांत उजव्या तिरावरचे मूळ उपनदीचे स्त्रवण क्षेत्र व डाव्या तिरावरील दीना व तळणी या उपनद्यांची स्त्रवणक्षेत्रे येतात व त्यांच्या गरजा या इंचमपल्ली व इन्द्रावती या घटकांपेक्षा वेगळ्या आहेत. शेती आणि सिंचन या दृष्टीने वैनगंगा प्राणहिता हे विकसित क्षेत्र आहे व विकासाला सहजपणे अधिक अनुकूलही आहे. याच घटकक्षेत्रांत सिंदेवाहीचे कृषि संशोधन केंद्र आहे, व त्याला 83 वर्षांची परंपरा आहे. उपखोऱ्यात गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यातील खालील तालुक्यांच्या क्षेत्राचा समावेश आहे.

**गडचिरोली** : 1) गडचिरोली 2) धानोरा 3) इटापल्ली 4) सिरोंचा 5) अहेरी 6) चामोर्शी 7) मूलचेरा 8) भामरागड .

**चंद्रपूर** : 1) चंद्रपूर 2) भद्रावती 3) वरोरा 4) चिमूर 5) नागभीड 6) सिंदेवाही 7) मूल 8) सावली 9) गोंडपिंपरी .

मुख्यनदी, तिच्या उपनद्या इत्यादी बाबतची माहिती खालील प्रमाणे आहे.

लांबी–किमी, तलांक- मी

| अक्र | नदी | उपनदी | लांबी | उगमस्थान | | संगमस्थान | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ठिकाण | तलांक | ठिकाण | तलांक |
| 1 | वैनगंगा | | 108* | गोपालगंज जि.शिवणी (म.प्र) | 610 | चप्राळा ता.चामोर्शी | 105 |
| 2 | | पोहार (माव डोळीनदी) | 49 | | 350 | तळोदी व चामोर्शी | 193 |
| 3 | | इंद्रावती | 131 | कालाहांडी | 720 | सोमनूर ता.सिरोंचा गोदावरी नदीत | 82 |
| 4 | | निब्रा | 37 | नारायणपूर | 600 | भामरागड जवळ इंद्रावती नदीस | 252 |

* महाराष्ट्रातील उपखोऱ्याच्या मर्यादेत

लांबी-किमी, तलांक- मी

| अक्र | नदी | उपनदी | लांबी | उगमस्थान |  | संगमस्थान |  |
|---|---|---|---|---|---|---|---|
|  |  |  |  | ठिकाण | तलांक | ठिकाण | तलांक |
| 5 |  | कोटरी | 22 | डोंगरब | 628 | भामरागड जवळ इंद्रावती नदीस | 532 |
| 6 |  | बांदिया | 130 | कांद्री | 416 | बामनपल्ली जवळ इंद्रावती नदीस | 150 |

1.1 विस्तार : या उपखोऱ्याचा क्षेत्रीय विस्तार खालील प्रमाणे आहे.

अ) वैनगंगा-प्राणहिता : अक्षांश 18° 49' ते 20° 40' उत्तर व रेखांश 79° 16' ते 80° 38' पूर्व.

आ) इंचमपल्ली परिसर : अक्षांश 18° 42' ते 18° 52' उत्तर व रेखांश 79° 55' ते 80° 16' पूर्व.

इ) इंद्रावती : अक्षांश 18° 45' ते 20° 10' उत्तर व रेखांश 79° 55' ते 80° 16' पूर्व.

1.2 चतु:सीमा : या उपखोऱ्याच्या चतु:सीमा खालीलप्रमाणे आहेत.

| अक्र | दिशा | तपशील |  |  |
|---|---|---|---|---|
|  |  | अ) वैनगंगा-प्राणहिता | आ)इंचमपल्ली परिसर | इ) इंद्रावती |
| 1 | उत्तर | मध्य वैनगंगा उपखोरे क्र.8 | घटक क्र 9 अ व इ | घटक क्र 9 अ व मध्यप्रदेश |
| 2 | पूर्व | वर्धा उपखोरे क्र 7 व आंध्रप्रदेश | मध्यप्रदेश | मध्यप्रदेश |
| 3 | पश्चिम | इंद्रावती घटक क्र 9 इ | आंध्रप्रदेश | वैनगंगा-प्राणहिता घटक |
| 4 | दक्षिण | इंचमपल्लीपरिसर घटक व आंध्रप्रदेश | आंध्रप्रदेश | इंचमपल्ली परिसर घटक |

## 2.0 हवामान

2.1 या उपखोऱ्यातील क्षेत्र जास्त पावसाच्या प्रदेशात येते. येथील हवामान समशितोष्ण आहे.या क्षेत्रात साधारणत: 87 टक्के पाऊस नैऋत्य मोसमी वाऱ्यामूळे जून ते सप्टेंबर दरम्यान, 8 टक्के पाऊस ईशान्य मोसमी वाऱ्यामूळे सप्टेंबर ते डिसेंबर या कालावधीत पडतो तर उर्वरीत 5 टक्के पाऊस डिसेंबरनंतर पडतो. वार्षिक सरासरी पर्जन्यमान 1326 मिमी आहे. या उपखोऱ्यातील हवामान विषयक इतर बाबी व पर्जन्यमानातील दोलायमानता इत्यादी पुढील प्रमाणे आहे.

पर्जन्यमान-मिमी, तपमान-अंश से.

| अक्र | वैशिष्टये | परिमाण | वर्ष महिना | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| **अ)** | **वैनगंगा-प्राणहिता** | | | |
| 1 | सर्वात अधिक पाऊस | 1802 | 1988 | कारवाफा |
| 2 | सर्वात अधिक तपमान | 48 | मे 1912 | चंद्रपूर |
| 3 | सर्वात कमी तपमान | 3 | जानेवारी 1899 | चंद्रपूर |

कृषि हवामान वर्गीकरणानुसार घटक क्षेत्राचा तपशील खालील प्रमाणे आहे.

8-मध्यम ते साधारण जास्त पावसाचा विभाग (MR) व 9--जास्त पावसाचा, मिश्र खडकापासून बनलेल्या जमिनीचा विभाग (HRM).

पर्जन्यमानातील दोलायमानता गुणांक 28 (तक्ता 2.5.8) आहे.

| **आ ) इंचमपल्ली परिसर व इ) इंद्रावती** | | | | |
|---|---|---|---|---|
| 1 | सर्वात अधिक पाऊस | 1711 | | पेट्टा |
| 2 | सर्वात अधिक तपमान | 48 | मे 1913 | सिरोंचा |
| 3 | सर्वात कमी तपमान | 8 | जानेवारी 1951 | सिरोंचा |

कृषि हवामान वर्गीकरणानुसार घटक क्षेत्राचा तपशील खालील प्रमाणे आहे.
9-जास्त पावसाचा, मिश्र खडकापासून बनलेल्या जमिनीचा विभाग (HRM).
पर्जन्यमानातील दोलायमानता गुणांक इंचमपल्ली घटकासाठी 25 तर इंद्रावती घटकासाठी 28 (तक्ता 2.5.8) आहे. घटकातील पर्जन्यमानाचा माहवार तपशील सारणी 9.1 मध्ये व पर्जन्यमापन केंद्राचा तपशील सारणी 9.2 मध्ये दर्शविला आहे.

2.2 बाष्पीभवन : या उपखोऱ्यातील सर्वात अधिक बाष्पीभवन मे महिन्यात 269 मिमी होते तर सर्वात कमी बाष्पीभवन डिसेंबर महिन्यात 87 मिमी होते. बाष्पीभवनाचा केंद्रनिहाय तपशील सारणी 9.1 मध्ये दर्शविला आहे. एकंदरीने हे अतिशय कोरडे व उष्ण उपखोरे आहे.

## 3.0 जलसंपत्तिची उपलब्धता

3.1 भूपृष्ठीय जलसंपत्ति : उपखोऱ्याचा स्वतःचा असा एकूण सरासरी येवा 10316 दलघमी आहे. येवा मोजण्याची ठिकाणे पुढील प्रमाणे आहेत.

येवा-दलघमी

| अक्र | सरितामापन केंद्राचे नांव | स्वामित्व | आधार सामुग्री उपलब्धीचा कालावधी | वार्षिक सरासरी येवा |
|---|---|---|---|---|
| 1 | पाहमी जि.चंद्रपूर | भा.ह.खा. | 1976-96 | 269 |
| 2 | चवेला जि.गडचिरोली | पा.खा. | 1977-97 | 211 |
| 3 | दुधमारा जि.चंद्रपूर | पा.खा. | 1977-93 | 420 |
| 4 | भीमकुंड ता.चामोर्शी | पा.खा. | 1967-97 | 639 |
| 5 | खांडला जि.चंद्रपूर | पा.खा. | 1976-96 | 542 |
| 6 | वाघोलीबुटी जि.चंद्रपूर | पा.खा. | 1976-97 | 1592 |
| 7 | पेट्टा जि.गडचिरोली | भा.ह.खा. | 1965-96 | 1132 |

वेगवेगळ्या विश्वासार्हतेच्या येव्याची काही मर्यादित माहिती सारणी 9.3 मध्ये दिली आहे.वैनगंगेच्या प्रवाहासाठी जरी विचलता फार नसली (मध्य वैनगंगा उपखोऱ्याच्या विश्लेषणात दिल्या प्रमाणे) तरी वैनगंगा-प्राणहिता यांना मिळणाऱ्या उपनद्यांच्या स्रवणक्षेत्रामध्ये येव्याची विचलता बरीच आहे.

अनुक्रमे 1906-1980, 1973-94,1973-94 या कालावधीतील माहितीवर आधारभूत या घटकक्षेत्रातील जल उपलब्धता खालीलप्रमाणे आहे:

| | | | (सर्व दलघमी ) |
|---|---|---|---|
| विश्वासार्हता | 9 अ | 9 आ | 9 इ |
| 75 टक्के | 5033 | 221 | 3295 |
| 50 टक्के | 6055 | 243 | 3624 |

3.2 भूशैलीय रचना

भूपृष्ठीय स्थिति (भूरुप वर्णन): वैनगंगा प्राणहिता घटकातील भूभाग साधारण 26 टक्के अतिविच्छेदीत, 48 टक्के पठारी आणि 26 टक्के सपाट व नदीलगतचा आहे.यात भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा निर्देशित 56 पाणलोट क्षेत्रे आहेत.

इंचमपल्ली परिसर घटकातील भूभाग साधारण 35 टक्के पठारी व उर्वरीत 65 टक्के सपाट व नदीलगतच्या गाळाचा आहे.यात भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा निर्देशित 2 पाणलोट क्षेत्रे आहेत.

या उलट इंद्रावती घटकातील भूभाग साधारण 85 टक्के डोंगराळ व अतिविच्छेदीत आणि उर्वरीत 15 टक्के पठारी आहे.यात भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा निर्देशित 33 पाणलोट क्षेत्रे आहेत.

भूपृष्ठीय शैलस्थिति : वैनगंगा-प्राणहिता घटकात विविध प्रकारचे भूस्तर आढळतात. त्यात सर्वात खाली जुने आर्कीयन ग्रॅनाईट नाईस, क्वार्टझाईट इ., त्यावर विंध्यन समूहातील संघनीकृत गाळाचे खडक (लाईमस्टोन, सॅन्डस्टोन,शेल), त्यावर गोंडवन समुहातील अर्धसंघनीकृत गाळस्तराचे खडक (सॅन्डस्टोन, शेल) आणि सर्वात वर अंधारी, मूल नद्यांच्या काठचा गाळाचा प्रस्तर आहे.

इंचमपल्ली परिसर घटकात मुख्यतः गोंडवन महासमुहातील अर्धसंघनीकृत गाळस्तरांचे खडक (लाईमस्टोन, सॅन्डस्टोन,क्ले,कॉंग्लोमरेट इ.) व त्यावर गोदावरी, वैनगंगा नद्यांच्या काठी असलेले गाळाचे प्रस्तर आढळतात.

इंद्रावती घटकात मुख्यत्वे आर्कीयन परंपरेतील ग्रॅनाईट नाईस, ग्रॅनाईट, नाईसेस, त्याच प्रमाणे फिलाईट, अँडेसाईट,ऱ्हायोलाईट, क्वार्टझाईट, आदि खडक व त्यावर गोंडवन महा समूहातील अर्धसंघनीकृत गालस्तराचे खडक (सॅंडस्टोन, लाईमस्टोन, कॉंग्लोमरेट, क्वार्टझाईट) आढळतात.

3.3 भूजल संपत्ति : तीनही घटक प्रामुख्याने रुपांतरीत खडकांनी व्यापलेले असल्यामुळे भूजल उपलब्धी मुख्यत्वे भूस्तरातील विघटीत, संधी व भ्रंश (Faults) असलेल्या भागांपूरतीच मर्यादित आहेत. भूजल धारक प्रस्तर विभक्त स्वरूपात आहेत. गोंडवन महासमूहातील अर्धसंघनीकृत गाळस्तरांचे खडकात मात्र अपवादात्मक स्थितित मुबलक भूजल उपलब्ध आहे. त्याच बरोबर गाळाच्या प्रस्तरातही भूजल उपलब्धी चांगली आहे. तीनही घटकात भूपृष्ठावरील जलसंपत्तिची उपलब्धता चांगली आहे. त्याच प्रमाणे नद्या बारमाही असल्यामुळे

भूजलाचा वापर अत्यल्पच आहे. भूजलाचा वापर कमी असल्यामूळे मोठया प्रमाणात भूजल नदीपात्रातून प्रगट होऊन नद्यांवाटे वाहून जात आहे.

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या 1990 च्या भूजल अंदाजानूसार तीनही घटकात अनुक्रमे 1299,94,441 दलघमी एकूण पुनर्भरण (सिंचन क्षेत्रातील भरीसकट) असून सिंचनाखालील विहिरींची संख्या अनुक्रमे 5077,332,1040 आहे.तीनही घटकात भूजल विकासास भरपूर वाव असून विहिरींचा कार्यक्रम मोठया प्रमाणावर राबवून येथे सिंचन क्षेत्र वाढविता येईल. गडचिरोली जिल्ह्यात विहिरींच्या तळाशी 20 ते 30 मीटर खोल पर्यन्त इनवेल बोअर सुध्दा घेण्यात आलेले आहेत. सिंचनक्षेत्र वाढविण्यासाठी याचाही उपयोग करुन घेणे इष्ट राहील.

3.4 अवर्षणप्रवण क्षेत्र : या उपखोऱ्याचे क्षेत्र 17 तालुक्यात पसरले आहे. त्यापैकी 4 तालूके सुकथनकर समितीच्या अहवालानंतर शासनाने अवर्षणप्रवण घोषित केलेले आहेत. त्यांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

लोकसंख्या-हजारात,पर्जन्यमान–मिमी, क्षेत्र–चौकिमी

| जिल्हा | तालुका | सरासरी वार्षिक पर्जन्यमान | क्षेत्रफळ | लोकसंख्या |
|---|---|---|---|---|
| **अ वैनगंगा-प्राणहिता** | | | | |
| चंद्रपूर | गोंडपिंपरी | 1400 | 637 | 61 |
| गडचिरोली | अहेरी | 1461 | 1346 | 40 |
| | सिरोंचा | 1338 | 212 | 16 |
| | इटापल्ली | 1550 | 387 | 5 |
| **आ इंचमपल्ली परिसर** | | | | |
| गडचिरोली | सिरोंचा | 1388 | 315 | 24 |
| **इ इंद्रावती** | | | | |
| गडचिरोली | अहेरी | 1461 | 1293 | 39 |
| | इटापल्ली | 1550 | 3483 | 49 |

## 4.0 जमिनीचा तपशील

या उपखोऱ्यातील बहुतांश जमीन ही पिवळसर व तपकिरी रंगाची आहे. जमीनीचे वर्गीकरण पुढील प्रमाणे आहे.

| अक्र | जमिनीचा प्रकार | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | पिवळसर तपकिरी जमीन ( मिश्र डोंगर माथ्यावरील) | 25 |
| 2 | पिवळसर तपकिरी सपाटीवरील जमीन ( मिश्र प्रकार) | 16 |
| 3 | लालसर संमिश्र जमीन | 22 |
| 4 | मध्यम काळी जमीन | 12 |
| 5 | खोल काळी जमीन | 13 |
| 6 | गाळाची जमीन | 12 |

**5.0 जमिनीचा वापर**

लागवडीयोग्य क्षेत्र, वनखात्याच्या ताब्यातील क्षेत्र, पडीकक्षेत्र इत्यादी सारणी 9.4 मध्ये दर्शविले आहे.

**6.0 लोकसंख्या व पशुधन**

6.1 <u>लोकसंख्या</u> : सन 1991 च्या जनगणनेनुसार या उपखोऱ्यातील एकूण लोकसंख्या 10.89 लक्ष आहे तर सन 2030 उपखोऱ्यात होणारी लोकसंख्येतील वाढ, लोकसंख्या घनता खालील प्रमाणे अपेक्षित आहे.

लोकसंख्या–हजारात, घनता–प्रति चौकिमी

| अक्र | लोकसंख्या तपशील | 1991 | | | 2030 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अ | आ | इ | अ | आ | इ |
| 1 | नागरी | 67 | — | — | 162 | — | — |
| 2 | ग्रामीण | 721 | 16 | 285 | 1442 | 32 | 570 |
| 3 | एकूण | 788 | 16 | 285 | 1604 | 32 | 570 |
| 4 | लोकसंख्या घनता | 89 | 51 | 50 | 181 | 103 | 100 |
| 5 | ग्रामीण लोकसंख्या घनता | 82 | 51 | 50 | 164 | 32 | 100 |

6.2 <u>पशुधन</u> : या उपखोऱ्यात 1992 च्या मोजणीनुसार एकूण पशुधन 10.85 लक्ष आहे. पशूंची वर्गनिहाय संख्या खालील प्रमाणे आहे.

| घटक | म्हैस व रेडे | गाय व बैल | एकखुरी व उंट | डुकरे | शेळी व मेंढी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| 9 अ | 66180 | 433013 | 1320 | 4780 | 167751 | 673044 |
| 9 आ | 1707 | 12319 | 39 | 99 | 6092 | 30256 |
| 9 इ | 32624 | 235470 | 718 | 1808 | 110849 | 381469 |
| | | | | | एकूण | 1084769 |

6.3 <u>इतर तपशील</u> : या उपखोऱ्यात गडचिरोली व मुल येथे नगरपालिका आहेत. उपखोऱ्यातील एकूण शेत मजुरांची संख्या 1.6 लक्ष आहे. तर इतर मजुरांची संख्या 37900 आहे.

**7.0 पाणी वापर**

7.1 <u>सिंचनासाठी वापर</u> : उपखोऱ्यातील वर्गनिहाय प्रकल्प म्हणजे मोठे, मध्यम, बृहत लघु प्रकल्प, कोल्हापूर पध्दतीचे बंधारे यांची संख्या, पाणीसाठा, पाणीवापर, सिंचनक्षेत्र याची तसेच पूर्ण झालेले, प्रगतिपथावरील व भविष्यकालीन प्रकल्प याची तपशीलवार माहिती सारणी 9.5 मध्ये दिली आहे. पूर्ण झालेल्या प्रकल्पांची निर्मित सिंचनक्षमता 141111 हेक्टर असून त्यातील प्रस्तावित पाणीवापर 872 दलघमी आहे. सिंचनासाठी आणखी 294036 हेक्टर क्षेत्र उपलब्ध होऊ शकेल, पण त्यासाठी सध्याच्या पाणीवापर पध्दती प्रमाणे एकूण पाणीवापर 2124 दलघमी लागेल. पाण्याची उपलब्धता ही कांही अडचण या उपखोऱ्यात नाही. पुरेसे पाणी उपलब्ध आहे. त्याच्या विकासाची व उपयोगाची रास्त व्यवस्था निर्माण करणे ही गरज आहे.

7.2 सिंचनेतर पाण्याचा वापर : सिंचनेतर उपयोगासाठी या उपखोऱ्यातील पाण्याची सध्याची गरज 48 दलघमी आहे सन 2030 पर्यन्तची ती 80 दलघमी होईल. या गरजांचा घटकनिहाय तपशील पुढील प्रमाणे आहे.

पाण्याची गरज-दलघमी

| अक्र | तपशील | 1991 | | | | 2030 | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अ | आ | इ | एकूण | अ | आ | इ | एकूण |
| 1 | घरगुती वापरासाठी | 31 | 1 | 13 | 45 | 58 | 1 | 22 | 71 |
| 2 | उद्योगाचे पाणी | 3 | 0 | 0 | 3 | 9 | 0 | 0 | 9 |
| | एकूण : | 34 | 1 | 13 | 48 | 67 | 1 | 22 | 80 |

(चंद्रपूर परिसरांतील औष्णिक केंद्राची पाण्याची वाढती गरज पहाता या उपखोऱ्यातून ती कितपत भागवता येईल असा पर्यायी विचार वेळीच करणे इष्ट ठरणार आहे. परंतु चंद्रपूर या उपखोऱ्याच्या भौगोलिक सीमेत येत नसल्यामुळे ती गरज वरील तक्त्यांत धरलेली नाही).

वैनगंगा-प्राणहिता घटकातील घरगूती उपयोगासाठी लागणाऱ्या पाण्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

पाण्याची गरज - दलघमी

| अक्र | वर्ष | नागरी | ग्रामीण | पशुधन | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1991 | 2 | 14 | 15 | 31 |
| 2 | 2030 | 8 | 29 | 21 | 58 |

7.3 जलसंपत्तिचा ताळेबंद :एकूण (भूपृष्ठावरिल व भूपृष्ठाखालील), आणि घरगुती वापरासाठी व सिंचनासाठी पाणी वापर यातून होणारा पुनरुद्भव याचा ताळेबंद सारणी 9.6 मध्ये दिला आहे.

7.4 लाभक्षेत्र विकास : सद्यस्थिति खालील प्रमाणे आहे.

क्षेत्र -हजार हेक्टर

| भूविकास (शेतचाऱ्या इ) कामे | | | भूविकास (सपाटीकरण इ) कामे | | | प्रकल्पाच्या लाभक्षेत्रा |
|---|---|---|---|---|---|---|
| लाक्षेविप्रा कडील प्रकल्प | लाक्षेविप्रा बाहेरील प्रकल्प | एकूण | लाक्षेविप्रा कडील प्रकल्प | लाक्षेविप्रा बाहेरील प्रकल्प | एकूण | व्यतिरिक्त अन्य क्षेत्रात झालेले जमीन सपाटी करणाचे (भाग-2) क्षेत्र |
| -- | 8.48 | 8.48 | -- | 3.82 | 3.82 | 0.04 |

7.5 सन1970 पूर्वीची धरणे: या उपखोऱ्यातील वैनगंगा-प्राणहिता या घटकात 1970 पूर्वी आसोलामेंढा, घोडाझरी,नलेश्वर व दिना ही धरणे अनुक्रमे 1919,1923 1922 व 1970 या वर्षी पूर्ण केलेली आहेत.शिवाय येथे गोंडकालिन तलाव पाणीपूरवठयासाठी तयार केले आहेत. त्यांचीही मोठी संख्या आहे. अशा प्रकारे भूपृष्ठीय सिंचनाची प्रदीर्घ परंपरा या उपखोऱ्याला आहे. त्या अनुभवाच्या आधारे नवी आधुनिक व्यवस्था उपखोऱ्यांत विकसित करण्यांत अडचण येऊ नये. शिवाय याच उपखोऱ्यात वैनगंगा खोऱ्यामधे शोध परंपरेचे (इ.स.1911 पासून कार्यरत असलेले) कृषि संशोधन केंद्र सिंदेवाही येथे आहे. त्याचा विस्तार करून नव्या गरजांच्या संदर्भात नवी पिकरचना विकसित करण्यातही अडचण येऊ नये.

## 8.0 पीक रचना

उपखोऱ्यातील एकूण पेरणीखालचे क्षेत्र 3.29 लक्ष हेक्टर आहे.यांतील बऱ्याचशा क्षेत्राला सिंचनाची सोय उपलब्ध करून देता येणे शक्य आहे. उपखोऱ्यात प्रामुख्याने खरीप पीक क्षेत्र आहे. कांही प्रमुख पिकाची दर हेक्टरी सरासरी उत्पादकता पुढील प्रमाणे आहे.

उत्पादकता-क्विंटल प्रति हेक्टर

| घटक | प्रमुख पिके | उत्पादकता |
|---|---|---|
| 9अ) वैनगंगा - प्राणहिता | भात | 13.63 |
| | रब्बी ज्वारी | 4.57 |
| 9आ) इंचमपल्लीपरिसर | भात | 13.33 |
| 9इ) इंद्रावती | भात | 12.08 |
| | रब्बी ज्वारी | 3.75 |

हंगामनिहाय पिकांची टक्केवारी खालील प्रमाणे आहे.

| अक्र | तपशील | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | खरीप पिके | 43 |
| 2 | रब्बी पिके | 57 |

## 9.0 उद्योगधंदे

उपखोऱ्यात प्रमूख कृषि आधारीत उद्योग नाहीत, तथापि 103 भात गिरण्या आहेत.

## 10.0 जलविद्युत निर्मिती

भौगोलिक परिस्थिति व पाण्याची भरपूर उपलब्धता यामुळे उपखोऱ्यात जलविद्युत निर्मितीस भरपूर वाव आहे. तरीपण अद्याप पावेतो एकही जलविद्युत प्रकल्प पूर्ण झालेला नाही. भविष्यात 2586 मेवॅ क्षमतेचे प्रकल्प उभारण्यासाठी अन्वेषण चालू आहे. अन्वेषणाधिन प्रकल्पांचा तपशील खालील प्रमाणे आहे. खऱ्या अर्थाने या उपखोऱ्याच्या जलविद्युत क्षमतेचा अजून पूर्ण अंदाज आलेला नाही. सर्वकष सर्वेक्षणानंतर इंद्रावती घटकक्षेत्रात बरीच अधिक जलविद्युत क्षमता उपलब्ध होण्याची शक्यता आहे.

निर्मिति क्षमता - मेवॅ

| | जलविद्युत प्रकल्पाचे नाव | निर्मिती क्षमता | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | भोपालपट्टनम ता.अहेरी जि.गडचिरोली | 1000 | आंतरराज्य प्रकल्प (महाराष्ट्र व मध्य प्रदेश) महाराष्ट्राचा वाटा 450 |
| 2 | भिमकुड ता.चामोर्शी जि.गडचिरोली | 750 | –कित्ता– |
| 3 | डुनी ता.मूल जि.चंद्रपूर | 100 | |
| 4 | डोंगरगाव ता.चिमुर जि.चंद्रपूर | 75 | |
| 5 | इंचमपल्ली ता.मधानी जि.करीमनगर, आंध्रप्रदेश | 975 | आंतरराज्य प्रकल्प महाराष्ट्राचा वाटा 431 |

## 11.0 दळणवळणाची साधने

या उपखोऱ्याजवळच चंद्रपूर येथे हवाई पट्टी आहे, तर चंद्रपूर - नागपूर हा नॅरोगेज रेल्वे मार्ग या उपखोऱ्यातून जातो.

राज्यमहामार्ग - या उपखोऱ्यात खालील राज्य महामार्ग आहेत.

चंद्रपूर- दुर्ग राज्यमार्ग क्र 7, नागपूर-मुल क्र 9 ,वरोरा-नागभीड क्र 233, आरमोरी-धानोरा क्र 269, व्यंकटपूर-अहेरी-गडचिरोली क्र 275 अलापल्ली-धानोरा क्र 276 व इटापल्ली-गोलगुडा क्र 282.

## 12.0 भावी नियोजनाची दिशा

12.1 <u>पाण्याची उपलब्धता व वापर :</u> या उपखोऱ्यातील वार्षिक सरासरी उपलब्धता 10316 दलघमी आहे. पाणी वापराची मुभा गोदावरी लवादाच्या निर्णयानुसार खालील प्रमाणे आहे.

1) **प्राणहिता** — दलघमी

अ) गोसीखुर्द खालील 16 पैकी 9 विनिर्देशित प्रकल्प स्थळापर्यन्तचे पूर्ण पाणी — 1635

ब) उपरर्निदिष्ट 9 स्थळांच्या खालील भागात (16 स्थळांच्या खालील दिलेल्या) (41 अघफू) पैकी हिस्सा (एका स्थळी पाणी वापर 1.5 अघफू पेक्षा जास्त नको या अटीच्या अधीन) — 738

2) **निम्न गोदावरी**

या भागात पाणी वापरासाठी 28 दलघमी (1 अघफू) ची परवानगी लवादाने दिली आहे — 28

3) **इंद्रावती**

या उपखोऱ्यात लवादाने पाणी वापरासाठी खालील प्रमाणे परवानगी दिली आहे.

अ) भोपालपट्टणम प्रकल्प स्थळापर्यन्त 963 दलघमी(34 अघफू)

ब) भोपालपट्टणम प्रकल्पाचे खालील 198 दलघमी(7 अघफू) — 1161

अशा प्रकारे लवादानुसार पाणी उपलब्धी 3562 दलघमी येते. या उपखोऱ्याच्या ऊर्ध्व बाजूला असलेल्या मध्य वैनगंगा या उपखोऱ्यातील असोलामेंढा प्रकल्पाचा अंदाजे 233 दलघमी पाणी वापर या उपखोऱ्यात प्रस्तावित आहे. यामुळे वापरास निव्वळ उपलब्धता 3795 दलघमी येते.

निम्न वैनगंगा उपखोऱ्यातील पाणी वापराची स्थिति खालील प्रमाणे आहे. मध्यम 4, लघु 30,प्रकल्प या उपखोऱ्यात बांधलेले आहेत. गोंडकालीन तलाव, पाझर तलाव व कोल्हापुरी पध्दतीचे बंधारे याची संख्या अनुक्रमे 3447, 90 व 690 आहे. या उपखोऱ्यामध्ये 180 दलघमी पाणी साठा निर्माण झालेला आहे. भविष्यकालीन प्रकल्पामध्ये भोपालपट्टणम हा इंद्रावती घटकात व इंचमपल्ली हा निम्न गोदावरी उपखोऱ्यात आंतरराज्यीय प्रकल्प आहे. पैकी भोपालपट्टणम मध्ये राज्याचा 45 टक्के वाटा आहे. तर उर्वरीत वाटा मध्य प्रदेशाचा आहे. इंचमपल्ली या बहुद्येशिय प्रकल्पामध्ये महाराष्ट्राचा वाटा 35 टक्के आहे. तर आंध्रप्रदेशाचा वाटा 65 टक्के असेल. अद्याप यांना प्रशासकीय मान्यता मिळावयाची आहे.

1996 पर्यन्त 872 दलघमी पाणी वापर झालेला आहे. 2030 पर्यन्तचा एकूण उपयोग निश्चित झालेले पाणी 2996 दलघमी आहे.

या उपखोऱ्याचा चंद्रपूर जिल्ह्यातील भाग प्रामुख्याने विघटीत, स्फटिकीय, विकेंद्रीय आर्कियन भूस्तराने व्यापलेला असून हे सर्वात पुरातन असे रूपांतरीत खडक आहेत. स्फटिकीय शिस्ट

विभागणी करण्याजोगे नसलेले भूस्तराने व्यापलेले आहेत. हयावर धारवाड समुहाचे रूपांतरित जलजन्य खडक विसावले आहेत. ग्रॅनाईट सारख्या खडकांनी त्यांना आरपार छेदलेले आहे. त्यांच्यातील विघटीतपणा, जोडणता, आणि भेगा, तुटकता त्यामुळे हयांच्यात जलधारक क्षमता काही प्रमाणात निर्माण होते. आर्कियन भूस्तर प्रस्तरामध्ये जोड आणि भेगा असलेल्या विघटीत प्रस्तरात भूजलाची उपलब्धता आढळते. प्रस्तरामध्ये हया जोड भेगा एकमेकाशी आतून जोडलेल्या असल्यास भूजलाची उपलब्धता विपूल प्रमाणात आढळते.

चिमूर तालुक्यातील वैनगंगा खोऱ्यात मोडणाऱ्या पाणलोट क्षेत्रात मुख्यत्वे तालचीर शेल हा अत्यंत कमी धारण क्षमतेचा आणि कमी वाहन क्षमतेचा भूस्तर आढळतो. त्यामुळे मुळातच भूजल उपलब्धता अत्यल्प आढळते. हया प्रस्तरातील विहिरींची खोली 8 ते 12 मीटर असून व्यास 4 ते 5 मीटर आहे. हिवाळी क्षमता 36000 ते 45000 लिटर प्रतिदिन एवढी आहे. पाण्याच्या उशीरा वापस येण्यामुळे (Slow recuperation) भूजलाचा विकास फारसा नाही, हया जलधारक खडकाची धारण क्षमता 1 ते 2 टक्के किंवा त्याहूनही कमी आढळते.

भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, चंद्रपूर यांच्या पाचव्या भूजल मूल्यांकन अहवालानुसार एकूण 643.85 दलघमी पाणी दरवर्षी जमिनीत मुरते. त्यापैकी उपलब्ध 3933 विहिरीद्वारे 18.96 दलघमी पाण्याचा उपसा करण्यात आलेला आहे. 624.89 दलघमी भूजल शिल्लक असून त्याद्वारे 41660 नविन विहिरी घेण्यात येवू शकतात.

चंद्रपूर जिल्ह्यातील या उपखोऱ्यातील भूजलाचा विकास फक्त 3 टक्के इतकाच झालेला आहे. भूजलाचा विकास करण्याच्या दृष्टीने हे प्रमाण अल्प असून हया उपखोऱ्याच्या क्षेत्रात 41660 नवीन विहिरी शक्य आहेत. नुसत्या विहिरी खणून भूजलाचा योजनाबध्द विकास होणार नाही तर सुयोग्य जागी सुनियोजितरित्या विहिरीकरिता अर्थसहाय्य देऊन भूजलाचा विकास करता येणे शक्य आहे.

या उपखोऱ्यातील नागभीड, ब्रम्हपूरी, मूल, सावली व सिंदेवाही हया तालुक्यामध्ये डग-कम-बोअरवेल द्वारे भूजलाचा विकास करता येऊ शकेल. 10 ते 12 मी खोल विहिरी करून त्यांच्या तळाशी 20 ते 30 मी खोलीचे इनवेल बोअर घेवून भूजलाचा योजनाबध्द विकास केल्यास भूजलाद्वारे शेतीचा आणि पर्यायाने शेतकऱ्याचा विकास होऊ शकेल आणि सिंचना करिता अतिरिक्त 81320 हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येऊ शकेल.

पाण्याचा जास्तीत जास्त वापर करण्याच्या दृष्टीने प्रकल्पाच्या व्यावहारिक क्षमतेचा अंदाज बांधण्याची आवश्यकता आहे. त्यानुसार जलाशयातून उपसा, मार्गस्थ जलाशये व पुच्छ जलाशये पाण्याने भरणे या पर्यायांचा विचार करण्याची गरज आहे.

12.2 या उपखोऱ्यामध्ये पर्यटन स्थळाच्या विकासास पाण्याचा साठा व विपुल जंगल यामूळे भरपूर वाव आहे.

12.3 राज्याच्या सिमेवर आंध्रप्रदेशामध्ये गोदावरी नदीवर इंचमपल्ली येथे धरण प्रस्तावित आहे. इंचमपल्ली हा आंतरराज्यीय प्रकल्प आहे. त्याचे बुडित क्षेत्र बहुतांशी महाराष्ट्रात आहे. या प्रकल्पामुळे होणाऱ्या प्रकल्प बाधितांच्या पुनर्वसनाची जबाबदारी महाराष्ट्र राज्याने स्वीकारली आहे. हा प्रकल्प लवकर कार्यान्वित करण्यासाठी आंध्रप्रदेश इच्छुक आहे. यामुळे सिंचनाचा बराच लाभ आंध्रप्रदेशातील कमी पावसाच्या भागाला मिळणार आहे. यामुळे जलविद्युत निर्मितिचा मोठा लाभ मात्र महाराष्ट्राला मिळणार आहे.

इंचमल्ली प्रकल्पाच्या बुडित क्षेत्रामधून उपसा सिंचन पध्दतीने नदी काठच्या सुपीक जमिनीवर सिंचन करता येईल व याचा लाभ पुनर्वसित लोकांना देता येईल. इंचमपल्ली प्रकल्प लवकर कार्यान्वित होण्यासाठी महाराष्ट्र राज्याकडून कार्यवाही होणे आगत्याचे वाटते. या

उपखोऱ्यातील बराच भाग वनाखाली असल्यामुळे सिंचनावर वनाची सघन वाढ करता येणे शक्य आहे. या दृष्टीने पण विचार व्हायला हवा आहे.

12.4 इंद्रावती या नदीवर भोपाळपट्टणम जलविद्युत आंतरराज्यीय प्रकल्प प्रस्तावित आहे. हा प्रकल्प वन व पर्यावरणाच्या प्रश्नामुळे अडलेला आहे. या प्रकल्पातील पाण्याचा वापर हा आंध्रप्रदेश राज्यात होणार आहे. या प्रकल्पाचे बांधकाम हे मध्यप्रदेश व महाराष्ट्र या दोन्ही राज्यांना संयुक्तपणे करावे लागणार आहे. या प्रकल्पामध्ये राज्याचा विजेचा वाटा 450 मेगावॅट इतका आहे. या प्रकल्पासंबधी मध्यप्रदेशाशी देवाणघेवाणीच्या धर्तीवर विचार करण्यास वाव आहे.शिवाय खाली इंचमपल्ली प्रकल्प हाती घेण्यास आंध्रप्रदेश ही इच्छूक आहे. म्हणून भोपाळपटणम प्रकल्प हाती घेण्या बाबत या इच्छुकतेचा लाभ घेता येउ शकेल.

12.5 या उपखोऱ्यामध्ये भातावर भात पीक घेण्याची परंपरा आहे. आयोगाने आसोलामेंढा व दिना प्रकल्पाच्या लाभक्षेत्रास भेट दिली. उपलब्ध सर्व पाण्याचा वापर खरिपामध्ये भात या पिकासाठी करण्यात येतो. आयोगाने गोंडकालीन जुन्या तलावांची (माजी मालगुजारी) फेररचना व वैनगंगा खोऱ्यातील पाण्याचे नियोजन या विषयावर भंडारा येथे कार्यशाळा घेतली होती. या कार्यशाळेत वैनगंगा उपखोऱ्यातील पाण्याची उपलब्धता व पिकरचनेतील आवश्यक बदल या बाबत प्रदीर्घ चर्चा झाली. त्याप्रमाणे उपखोऱ्यात ज्या ठिकाणी सिंचनाची सोय आहे त्या ठिकाणी रब्बी व उन्हाळी हंगामातही भात घेतला जातो. त्याला इतर पिकांच्या तुलनेत पाणी जास्त लागते. भाता ऐवजी गहू, हरभरा, सुर्यफूल, मोहरी, ज्वारी, वाटाणा इत्यादी पिकांची लागवड केली तर जास्त क्षेत्र भिजेल व जास्त शेतकऱ्यांना लाभ घेता येईल. म्हणून पीक पध्दतीत अमूलाग्र बदल होणे आवश्यक आहे. पाण्याची विपुलता असल्यामुळे या उपखोऱ्यामध्ये उस या पिकास प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. ऊसावर आधारीत प्रक्रिया कारखाने काढून या भागाला समृध्दी आणणे शक्य आहे. त्यादृष्टीने नियोजनास दिशा मिळणे गरजेचे आहे. सिंदेवाहीचे ऊस संशोधन केंद्र त्यादृष्टीने परत कार्यान्वित करणे गरजेचे आहे. राज्यातील तुटीच्या खोऱ्यातील साखर कारखाने या खोऱ्यात स्थलांतरीत करणे राज्याच्या हिताचे राहील. भाता सारख्या पिकावर पण प्रक्रिया केंद्रांची (भात गिरण्या) वाढ करून त्याला बाजारपेठ मिळवून देण्याची गरज आहे.

12.6 या उपखोऱ्यात पण जवळ जवळ 3625 जुने गोंडकालीन (माजी मालगुजारी) तलाव आहेत. हे तलाव 300/400 वर्षापूर्वी गौंड राजांनी लोकांच्या सहभागातून बांधलेले आहेत. स्वातंत्र्यापूर्वी या तलावाचे पाणी व्यवस्थापन लोकसहभागातून होत होते. स्वातंत्र्यानंतर मात्र हे तलाव शासनाच्या नियंत्रणाखाली घेण्यात आले. देखभाल दुरुस्तीचा अभाव व लाभधारकांची उदासिनता यामुळे पाणी वितरणाची व्यवस्था मोडकळीस आलेली आहे. दुरुस्तीसाठी शासनाकडून निधी उपलब्ध होत नाही, लाभधारक पाणीपट्टी देत नाहीत अशा अडचणीत हे तलाव सापडलेले आहेत. या तलावांच्या पाणी व्यवस्थापनाचे संपूर्ण फेरनियोजन करण्याची गरज आहे. लोकसहभागातून सिंचन व्यवस्था पुनर्वसित करणे तांतडीने गरजेचे आहे.

12.7 भाजीपाला व फळफळावळ, ऊस, केळी सारख्या पिकांसाठी आधुनिक सिंचन पध्दतीचा वापर करण्यात येऊन या भागाच्या विकासाला नवी दिशा देणे गरजेचे आहे.

12.8 या उपखोऱ्यात जादा पाणी आहे. पाण्याच्या तुटीमुळे राज्यातील इतर खोऱ्यात रासायनिक उद्योग अडचणीत आलेले आहेत. तेंव्हा येथे रासायनिक क्षेत्रातील कारखाने उभारणीस वाव आहे.

12.9 उपखोऱ्यात भरपूर पाणी उपलब्ध असल्यामुळे पश्चिम बंगाल मध्ये ज्याप्रमाणे भात व मत्स्यशेती एकत्रित केली जाते त्या प्रमाणे येथे मत्स्यशेती करण्यासही वाव आहे त्यासाठीं शेतकऱ्यांना योग्य ते मार्गदर्शन करण्याची आवश्यकता आहे.

12.10 या भागात (सिरोंचा तालुका) मोठया प्रमाणावर उत्कृष्ट प्रतीचा तंबाखू (वर्जिनिया टोबॅको) होत होता. परंतु नक्षलवादी चळवळ व वाहतूक साधनाचा अभाव यामुळे हा उद्योग बंद पडण्याच्या मार्गावर आहे. या उद्योगाचे पुनरुज्जीवन होण्याचे दृष्टीने प्रयत्न होणे आवश्यक आहे.

12.11 या उपखोऱ्यामध्ये वन खात्याच्या ताब्यातील क्षेत्र फार मोठे (78 टक्के) आहे. पण वनाखालील खालील जमीन अतिशय सुपीक व सपाट आहे व ही जमीन लागवडीखाली आणण्यायोग्य आहे. समृध्दीसाठी या क्षेत्राचा उपयोग (वनासाठी वने असा विचार नको) करावयास पाहिजे. वनक्षेत्राचे संवर्धन व वनक्षेत्राचा विकास याचा निर्णय करावा लागणार आहे. यादृष्टीने जमिनीच्या पुनर्वापराचे नियोजन करणे आवश्यक वाटते. तसे करणे समृध्दीस पोषक ठरेल. वनौषधीच्या संशोधनासाठी एका विशेष संशोधन संस्थेची या उपखोऱ्यात स्थापना होणे तातडीने आवश्यक आहे.

12.12 या उपखोऱ्यात वन खात्याच्या ताब्यातील क्षेत्र जास्त असल्यामुळे अनेक सिंचन व जलविद्युत प्रकल्प वन खात्याच्या जमिनींच्या हस्तांतराच्या प्रश्नामुळे अडचणीत आले आहेत.स्थानिक विकासाच्याही सध्याचा वनकायदा आड येतो आहे. त्यामुळे या कायद्यातील तरतुदींचा व त्यासंबंधित कार्यवाहीच्या पध्दतीचा तात्काळ फेरविचार होणे एकंदरीत जनहिताचे राहणार आहे.

12.13 या उपखोऱ्यामध्ये 1.2 लक्ष हेक्टर पडिक व ओसाड जमीन उपलब्ध आहे. या जमिनीचा पिकाऊ जमीन म्हणून विकास करून अतिरिक्त पाण्यापैकी कांही प्रमाणात पाणी उपयोगात आणता येईल. किंवा नवे जलाशय बांधण्यासाठी जेव्हा वनखात्याची जमीन घ्यावी लागेल, तेथे ही पर्यायी जमीन वनखात्याला वनविकासासाठी उपलब्ध करून देता येईल.

12.14 आदिवासी ग्रामीण व अविकसित भाग असल्याने द्रारिद्रय मोठया प्रमाणात आहे. विरळ लोकसंख्येमुळे व शेती उद्योगाच्या उणीवांमुळे पाण्याचा वापर कमी आहे. नक्षलवादी चळवळीमुळे विकास कामांना अडथळा निर्माण होतो आहे.तसेच वन कायद्यामुळे विकासाची कामे थांबलेली आहेत. आदिवासी लोकांच्या सहभागातून जंगलांच्या व लाभक्षेत्राच्या विकासाच्या योजना राबविणे गरजेचे आहे.

—000—

सारणी : 9.1

**हवामानाचा तपशील**

पर्जन्यमान, बाष्पीभवन-मिमी

| महिना | पर्जन्यमान | | | बाष्पीभवन | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | चंद्रपूर | सिरोंचा | सरासरी | पोहार प्रकल्प | हुमन प्रकल्प | सरासरी |
| जानेवारी | 6 | 7 | 6 | 90 | 119 | 105 |
| फेब्रुवारी | 14 | 8 | 11 | 140 | 74 | 107 |
| मार्च | 24 | 16 | 20 | 210 | 198 | 204 |
| एप्रिल | 15 | 23 | 19 | 260. | 217 | 239 |
| मे | 13 | 20 | 17 | 270 | 268 | 269 |
| जून | 167 | 179 | 173 | 240 | 91 | 166 |
| जुलै | 348 | 427 | 387 | 140 | 115 | 128 |
| ऑगष्ट | 396 | 371 | 384 | 110 | 99 | 105 |
| सप्टेंबर | 218 | 214 | 216 | 100 | 111 | 106 |
| ऑक्टोबर | 59 | 92 | 75 | 110 | 63 | 87 |
| नोव्हेंबर | 10 | 10 | 10 | 100 | 114 | 107 |
| डिसेंबर | 6 | 10 | 8 | 70 | 103 | 87 |

हंगाम निहाय बाष्पीभवन

| अक्र | हंगाम | बाष्पीभवन |
|---|---|---|
| 1 | खरीप | 450 |
| 2 | रब्बी | 382 |
| 3 | उन्हाळी | 878 |
| | एकूण : | 1710 |

सारणा 9.2
**पर्जन्यमापन केंद्रांचा तपशील**

पर्जन्य-मिमी

| अक्र | केंद्राचे नाव | प्रकार | स्वामित्व | आधार सामुग्री उपलब्धतेचा कालावधी | वार्षिक सरासरी पर्जन्य |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| | **वैनगंगा प्राणहिता** | | | | |
| 1 | चवेला | सा.प. स्व.प. | भा.ह.खा. | 1976-96 | 1686 |
| 2 | करवाफा | सा.प. स्व.प. | भा.ह.खा. | 1975-88 | 1802 |
| 3 | पन्नेमारा | सा.प. स्व.प. | भा.ह.खा. | 1976-96 | 1307 |
| 4 | दूधमारा | सा.प. | भा.ह.खा. | 1976-96 | 1621 |
| 5 | पुसटोळा | सा.प. | भा.ह.खा. | 1979-86 | 1600 |
| 6 | आष्टी (चामोर्शी) | सा.प. | कें.ज.आ. | 1975-93 | 1233 |
| 7 | मकेपल्ली | सा.प. स्व.प. | भा.ह.खा. | 1975-93 | 1419 |
| 8 | आमगाव/महाल/भीमकुंड | सा.प. स्व.प. | भा.ह.खा. | 1977-94 | 1427 |
| 9 | चितेकन्हार | सा.प. | भा.ह.खा. | 1979-96 | 1191 |
| 10 | राजोली (गडचिरोली) | सा.प. | भा.ह.खा. | 1975-95 | 1339 |
| 11 | गडचिरोली | सा.प. | भा.ह.खा. | 1975-91 | 1304 |
| 12 | पहामी (चंद्रपूर) | सा.प. स्व.प. | भा.ह.खा. | 1976-90 | 1245 |
| 13 | देवरी (चिमूर, चंद्रपूर) | सा.प. स्व.प. | भा.ह.खा. | 1976-96 | 985 |
| 14 | नवतळा | सा.प. स्व.प. | भा.ह.खा. | 1976-94 | 1188 |
| 15 | भीसी | सा.प. स्व.प. | भा.ह.खा. | 1976-94 | 970 |
| 16 | काजळसरा | सा.प. स्व.प. | भा.ह.खा. | 1978-96 | 1235 |
| 17 | खतोडा(भद्रावती,चंद्रपूर) | सा.प. | भा.ह.खा. | 1975-94 | 1187 |
| 18 | ताडोबा | सा.प. | भा.ह.खा. | 1977-96 | 1406 |
| 19 | बोदेझरी | सा.प. | भा.ह.खा. | 1976-96 | 1343 |
| 20 | रत्नापूर (सिंदेवाही, चंद्रपूर) | सा.प. स्व.प. | भा.ह.खा. | 1976-96 | 1000 |
| 21 | पांगडी (सिंदेवाही, चंद्रपूर) | सा.प. | भा.ह.खा. | 1975-96 | 1113 |
| 22 | कन्हाळगाव | सा.प. | भा.ह.खा. | 1975-96 | 1261 |
| 23 | लाडबोरी | सा.प. | भा.ह.खा. | 1978-96 | 1018 |
| 24 | कोरंबी (नागभीड) | सा.प. | भा.ह.खा. | 1975-93 | 1237 |
| | **इंचमपल्ली परिसर** | निरंक | | | |
| | **इंद्रावती** | | | | |
| 1 | जोराबंडी,एटापल्ली,गडचिरोली | सा.प. | भा.ह.खा. | 1976-95 | 1576 |
| 2 | कोटमी | सा.प. | भा.ह.खा. | 1975-95 | 1041 |
| 3 | हल्लेवारा | सा.प. | भा.ह.खा. | 1975-95 | 1422 |
| 4 | पेट्टा | सा.प. | भा.ह.खा. | 1975-95 | 1711 |
| 5 | राजाराम (अहेरी/गडचिरोली) | सा.प. | भा.ह.खा. | 1975-94 | 1174 |

सारणी 9.3

जलसंपत्तीची उपलब्धता

येवा - दलघमी

| अक्र | वर्ष | वार्षिक सरासरी येवा | संगत वर्ष | उतरत्या क्रमाने मालिका | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | 1906 | 593 | 1959 | 1507 | |
| 2 | 1907 | 604 | 1970 | 1395 | |
| 3 | 1908 | 908 | 1936 | 1315 | |
| 4 | 1909 | 612 | 1961 | 1073 | |
| 5 | 1910 | 710 | 1967 | 995 | |
| 6 | 1911 | 688 | 1940 | 977 | |
| 7 | 1912 | 458 | 1949 | 932 | |
| 8 | 1913 | 650 | 1953 | 920 | 10 |
| 9 | 1914 | 878 | 1908 | 908 | |
| 10 | 1915 | 551 | 1955 | 908 | |
| 11 | 1916 | 820 | 1927 | 883 | |
| 12 | 1917 | 563 | 1914 | 878 | |
| 13 | 1918 | 148 | 1947 | 853 | |
| 14 | 1919 | 805 | 1934 | 850 | |
| 15 | 1920 | 200 | 1969 | 843 | |
| 16 | 1921 | 550 | 1938 | 842 | 20 |
| 17 | 1922 | 631 | 1960 | 832 | |
| 18 | 1923 | 457 | 1916 | 820 | |
| 19 | 1924 | 415 | 1963 | 820 | |
| 20 | 1925 | 423 | 1942 | 808 | |
| 21 | 1926 | 372 | 1919 | 805 | |
| 22 | 1927 | 883 | 1944 | 767 | 30 |
| 23 | 1928 | 397 | 1973 | 754 | |
| 24 | 1929 | 344 | 1933 | 752 | |
| 25 | 1930 | 407 | 1931 | 750 | |
| 26 | 1931 | 750 | 1964 | 745 | |
| 27 | 1932 | 574 | 1966 | 738 | |
| 28 | 1933 | 752 | 1962 | 718 | |
| 29 | 1934 | 850 | 1910 | 710 | |
| 30 | 1935 | 709 | 1935 | 709 | 40 |
| 31 | 1936 | 1315 | 1971 | 702 | |
| 32 | 1937 | 550 | 1911 | 688 | |
| 33 | 1938 | 842 | 1975 | 671 | |
| 34 | 1939 | 452 | 1945 | 654 | |
| 35 | 1940 | 977 | 1913 | 650 | |
| 36 | 1941 | 305 | 1951 | 647 | |
| 37 | 1942 | 808 | 1922 | 631 | |
| 38 | 1943 | 487 | 1909 | 612 | 50 |
| 39 | 1944 | 767 | 1907 | 604 | |
| 40 | 1945 | 654 | 1906 | 593 | |
| 41 | 1946 | 494 | 1932 | 574 | |

येवा - दलघमी

| अक्र | वर्ष | वार्षिक सरासरी येवा | संगत वर्ष | उतरत्या क्रमाने मालिका | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 42 | 1947 | 853 | 1917 | 563 | |
| 43 | 1948 | 443 | 1957 | 557 | |
| 44 | 1949 | 932 | 1915 | 551 | |
| 45 | 1950 | 362 | 1921 | 550 | |
| 46 | 1951 | 647 | 1937 | 550 | |
| 47 | 1952 | 422 | 1954 | 543 | |
| 48 | 1953 | 920 | 1956 | 514 | |
| 49 | 1954 | 543 | 1946 | 494 | |
| 50 | 1955 | 908 | 1943 | 487 | |
| 51 | 1956 | 514 | 1974 | 484 | |
| 52 | 1957 | 557 | 1912 | 458 | |
| 53 | 1958 | 320 | 1923 | 457 | |
| 54 | 1959 | 1507 | 1939 | 452 | |
| 55 | 1960 | 832 | 1948 | 443 | |
| 56 | 1961 | 1073 | 1925 | 423 | 75 |
| 57 | 1962 | 718 | 1952 | 422 | |
| 58 | 1963 | 820 | 1924 | 415 | |
| 59 | 1964 | 745 | 1930 | 407 | |
| 60 | 1965 | 370 | 1928 | 397 | 80 |
| 61 | 1966 | 738 | 1972 | 382 | |
| 62 | 1967 | 995 | 1980 | 374 | |
| 63 | 1969 | 843 | 1926 | 372 | |
| 64 | 1970 | 1395 | 1965 | 370 | |
| 65 | 1971 | 702 | 1978 | 364 | |
| 66 | 1972 | 382 | 1950 | 362 | |
| 67 | 1973 | 754 | 1929 | 344 | 90 |
| 68 | 1974 | 484 | 1976 | 322 | |
| 69 | 1975 | 671 | 1958 | 320 | |
| 70 | 1976 | 322 | 1941 | 305 | |
| 71 | 1977 | 195 | 1979 | 249 | |
| 72 | 1978 | 364 | 1920 | 200 | |
| 73 | 1979 | 249 | 1977 | 195 | |
| 74 | 1980 | 374 | 1918 | 148 | |

$$\frac{\text{10 टक्के उपलब्धता}}{\text{90 टक्के उपलब्धता}} = 2.67 \quad \frac{\text{50 टक्के उपलब्धता}}{\text{90 टक्के उपलब्धता}} = 1.78$$

$$\frac{\text{50 टक्के उपलब्धता}}{\text{75 टक्के उपलब्धता}} = 1.45$$

सारणी 9.4

## जमिनीचा वापर

क्षेत्र-हजार हेक्टर

| अक्र | तपशील | क्षेत्र | | | भौगोलीक क्षेत्राशी टक्केवारी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 9 अ | 9 आ | 9 इ | 9 अ | 9 आ | 9 इ |
| 1 | भौगोलिक क्षेत्र | 882 | 31 | 572 | | | |
| 2 | वनखात्याच्या ताब्यातील क्षेत्र | 473 | 23 | 430 | 53.6 | 74.2 | 75.1 |
| 3 | पेरणीसाठी उपलब्ध नसलेले क्षेत्र | | | | | | |
| | अ) ओसाड जमीन | 10 | 1 | 4 | 1.1 | 3.2 | 0.7 |
| | ब) बिगरशेती उपयोगाकरीता आणलेली जमीन | 46 | 1 | 13 | 5.2 | 3.2 | 2.3 |
| 4 | मशागतयोग्य पडीक जमीन | 17 | 0 | 8 | 1.9 | 0 | 1.4 |
| 5 | कायमची व चराऊ कुरणे | 47 | 2 | 30 | 5.3 | 6.4 | 5.2 |
| 6 | किरकोळ झाडेझुडपे यांच्या समुहाखालील क्षेत्र | 7 | 0 | 1 | 0.8 | 0 | 0 |
| 7 | चालू पडीक जमीन | 19 | 0 | 8 | 2.2 | 0 | 1.8 |
| 8 | इतर पडीक जमीन | 13 | 0 | 3 | 1.5 | 0 | 0.5 |
| 9 | पेरणीचे निव्वळ क्षेत्र | 250 | 4 | 75 | 28.4 | 13 | 13 |
| 10 | लागवडीयोग्य क्षेत्र (4+5+ 6+7+8+9) | 353 | 6 | 125 | 40 | 19 | 22 |
| 11 | दुसोटा क्षेत्र | 47 | 0 | 5 | — | — | — |
| 12 | पिकाखालील एकूण क्षेत्र (9+11) | 297 | 4 | 80 | — | — | — |
| 13 | पीक घनता टक्केवारी (12 /9 x 100) | 119 | 100 | 107 | — | — | — |

सारणी ९.५

प्रकल्पांची सद्यःस्थिती

चल पाणीसाठा - दलघमी

पाणीवापर - दलघमी

सिंचनक्षेत्र - हेक्टर

| अक्र | प्रकल्पाचा संवर्ग | पूर्ण झालेले प्रकल्प | | | | बांधकामाधीन प्रकल्प | | | | भविष्यकालीन प्रकल्प | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| अ) वैनगंगा प्राणहिता | | | | | | | | | | | | | | | | | |
| 1 | मोठे | | निरंक | | | हुमन | 313.73 | 396.1 | 59985 | गिमकुंड | 168 | 225 | 31226 | | 481.3 | 622 | 91211 |
| | | | | | | | | | | कठाणी | 227 | 294 | 24025 | | 227.14 | 294 | 24025 |
| | | | | | | 1 | 313.73 | 396.1 | 59985 | 2 | 395 | 520 | 55251 | 3 | 708.44 | 916 | 115236 |
| | मध्यम | घोडाझरी | 45.08 | 38 | 3846 | कारवाफा | 31.575 | 33 | 5250 | हरणघाट | | 42 | 4820 | | 76.655 | 113 | 13916 |
| | | असोलामेंढा | 67.02 | 56 | 9919 | चेन्ना | 13.99 | 15 | 2560 | पोहार | 56 | 62 | 10790 | | 136.589 | 133 | 23269 |
| | | दिना | 55.94 | 56 | 11356 | बाघोलीबुटी | | 21 | 4542 | कोथरी | 17 | 15 | 3375 | | 73.245 | 92 | 19273 |
| | | नलेश्वर | 8.88 | 8 | 1688 | | | | | पेन्टीपुड्डम | | 41 | 4210 | | 8.88 | 49 | 5898 |
| | | | | | | | | | | बोरघाट-1 | | 42 | 4675 | | 0 | 42 | 4675 |
| | | | | | | | | | | तपाळ | | 42 | 6600 | | 0 | 42 | 6600 |
| | | | | | | | | | | बोरघाट-2 | | 31 | 4900 | | 0 | 31 | 4900 |
| | | | | | | | | | | हळदा | | 26 | 4050 | | 0 | 26 | 4050 |
| | | | | | | | | | | महागांव | | 25 | 2600 | | 0 | 25 | 2600 |
| | | | | | | | | | | बोडधा | | 25 | 2500 | | 0 | 25 | 2500 |
| | | | | | | | | | | शांतीग्राम | | 25 | 2700 | | 0 | 25 | 2700 |
| | | | | | | | | | | कवठी | | 21 | 3032 | | 0 | 21 | 3032 |
| | | | | | | | | | | तळोदी मोकासा | | 37 | 3950 | | 0 | 37 | 3950 |
| | | | | | | | | | | टेकडा | | 19 | 2000 | | 0 | 19 | 2000 |
| | | | | | | | | | | सावलगांव | | 13 | 2098 | | | 13 | 2098 |
| | | | | | | | | | | हळदी-पुराणी | | 28 | 4127 | | 0 | 28 | 4127 |
| | | | | | | | | | | डोंगरगांव (ठाणेगाव) | | 25 | 2500 | | 0 | 25 | 2500 |
| | | | | | | | | | | देवलमारी | | 20 | 2100 | | 0 | 20 | 2100 |
| | | | | | | | | | | रेंगुटा | | 28 | 2000 | | 0 | 28 | 2000 |

सारणी 9.5

**प्रकल्पांची सद्य:स्थिती**

चल पाणीसाठा - दलघमी

पाणीवापर - दलघमी

सिंचनक्षेत्र - हेक्टर

| अक्र | प्रकल्पाचा संवर्ग | पूर्ण झालेले प्रकल्प | | | | बांधकामाधीन प्रकल्प | | | | भविष्यकालीन प्रकल्प | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| | | | | | | | | | | मांजली | | 20 | 3113 | | 0 | 20 | 3113 |
| | | | | | | | | | | जुनासुर्ला | | 35 | 5015 | | 0 | 35 | 5015 |
| | | 4 | 177 | 158 | 26809 | 3 | 45.565 | 69 | 12352 | 21 | 73 | 621 | 81155 | 28 | 295 | 848 | 120316 |
| 4 | लघुप्रकल्प राज्यस्तर | 36 | | 73 | 11822 | 20 | | 76 | | 64 | | 195 | 21631 | 120 | 0 | 344 | 33453 |
| 5 | मा.मा.तलाव | 66 | | 49 | 13354 | | | | | | | | | 66 | 0 | 49 | 13354 |
| 6 | उपसा सिंचन योजना | 21 | | 51 | 7578 | 6 | | 6.5 | | 70 | | 92 | 13847 | 97 | 0 | 149 | 21425 |
| 6 | अ) बंधारे | | | | | 3 | | 2.76 | | 4 | | 3 | 1174 | 7 | 0 | 6 | 1174 |
| | **राज्यस्तर एकूण** | 123 | 0 | 173 | 32754 | 29 | 0 | 85.26 | 29141 | 138 | 0 | 291 | 36652 | 290 | 0 | 548 | 98547 |
| 7 | स्था.स्तर ल.पाझर तलाव | 90 | | 37 | 5584 | 19 | 0 | 9.79 | 1469 | 52 | | 20 | 3048 | 161 | 0 | 67 | 10101 |
| 8 | माजी मालगुजारी स्था.स्तर | 3375 | | 355 | 53284 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 3375 | 0 | 355 | 53284 |
| 9 | उपसा सिंचन योजना | 6 | | 3 | 499 | 3 | 0 | 4.18 | 627 | 6 | 0 | 0 | 0 | 15 | 0 | 8 | 1126 |
| 10 | को.प.बंधारे | 690 | | 140 | 21062 | 175 | 0 | 41.23 | 6185 | 149 | | 5 | 799 | 1014 | 0 | 187 | 28046 |
| 11 | स्था.स्तर योजना | | | | | | | | | | | 17 | 2609 | 0 | 0 | 17 | 2609 |
| | सर्व एकूण | 4288 | 177 | 867 | [illegible]05 | 230 | 359 | 606 | 109759 | 434 | 468 | 1474 | 179514 | 5136 | 1004 | 2947 | 429265 |

सारणी : 9.6

**जलसंपत्तीचा ताळेबंद**

**वैनगंगा प्राणहिता**

जलसंपत्ती - दलघमी

| अक्र | उपलब्धता | | अक्र | वापर (सन2030) | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | भूपृष्ठावरील | | 4 | भूपृष्ठावरील | |
| | अ) नैसर्गिक | | | अ) घरगुती वापरासाठी | |
| | 1) 75 टक्के विश्वासार्हतेने | 5033 | | 1) नागरी | 8 |
| | 2) 50 टक्के विश्वासार्हतेने | 6065 | | 2) ग्रामीण | 29 |
| | 3) सरासरीने | 6311 | | 3) पशुधन | 21 |
| | 4) नियोजनासाठी | 2373 | | एकूण | 58 |
| | ब) मानवप्रबंधित | | | ब) उद्योगधंदयासाठी | 9 |
| | 1) नागरी वापरातून पुनरुद्भव (80 %) | 6 | | एकूण सिंचनेतर वापर | 67 |
| | 2) उद्योग धंदयातील पुनरुद्भव (97.5%) | | 5 | इतर उपखोऱ्यात स्थलांतरीत पाणी | 0 |
| | 3) इतर खोऱ्यातून संक्रमित झालेले पाणी उपखोरे क्र.8 मधून | 233 | 6 | सिंचनासाठी उपलब्ध भूपृष्ठावरील पाणी | 2800 |
| | एकूण (1 ब) | 239 | | (2373+247-67)+255 | |
| 2 | मानवनिर्मित | | | | |
| | लाभक्षेत्रातील पुनर्भरण (2373+247-67 ) च्या10 | 255 | | | |
| 3 | एकूण उपलब्धता (2373+247+255) | 2867 | 7 | एकूण वापर | 2867 |
| | 1) भूजल उपलब्धता (वार्षिक एकूण पुनर्भरण ) | 1299 | | अ) भूजलाचा सध्याचा सिंचनासाठी वापर | 236 |
| | 2) भूजल वापरास मुभा ( 1299 च्या 65 %) | 844 | | | |

टीपा 1) भूजल उपलब्धतेमुळे उपखोऱ्याच्या एकूण उपलब्धतेत वाढ होणार नाही ; भूजलाचा जेवढा उपसा होईल तेवढा नदी प्रवाह घटत जाईल म्हणून एकूण उपलब्धतेचा आकडा काढतांना भूजल उपलब्धतेचा विचार घेतलेला नाही.

2) संकलीत अंदाजासाठी सर्व पाण्याचा उपयोग भूपृष्ठावरील पाण्यातून दाखविला आहे. पण एकूण वापरापैकी अधिकाधिक 844+255= 1099 भूजल माध्यमातून शक्य आहे.

3) पाणीवापराचे नियोजन उपलब्ध येवा मालिकेवर आधारित आहे.

सारणी : 9.6 (चालू)

**जलसंपत्तीचा ताळेबंद**

**इंचमपल्ली परिसर**

जलसंपत्ती - दलघमी

| अक्र | उपलब्धता | | अक्र | वापर (सन2030) | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **भूपृष्ठावरील** | | 4 | **भूपृष्ठावरील** | |
| | अ) नैसर्गिक | | | अ) घरगूती वापरासाठी | |
| | 1) 75 टक्के विश्वासार्हतेने | 221 | | 1) नागरी | 0 |
| | 2) 50 टक्के विश्वासार्हतेने | 243 | | 2) ग्रामीण | 1 |
| | 3) सरासरीने | 252 | | 3) पशूधन | 1 |
| | 4) नियोजनासाठी | 28 | | एकूण | 2 |
| | ब) मानवप्रबंधित | | | ब) उद्योगधंदयासाठी | 0 |
| | 1) नागरी वापरातून पुनरुद्भव (80 %) | 0 | | एकूण सिंचनेतर वापर | 2 |
| | 2) उद्योग धंदयातील पुनरुद्भव (97.5%) | 0 | 5 | इतर उपखोऱ्यात स्थलांतरीत पाणी | 0 |
| | 3) इतर खोऱ्यातून संक्रमित झालेले पाणी | 0 | 6 | सिंचनासाठी उपलब्ध भूपृष्ठावरील पाणी (28-2)+3 | 29 |
| | **एकूण (1 ब)** | **0** | | | |
| 2 | मानवनिर्मित | | | | |
| | लाभक्षेत्रातील पुनर्भरण (28-2) च्या10 % | 3 | | | |
| 3 | **एकूण उपलब्धता [28+3]** | **31** | 7 | एकूण वापर | **31** |
| | 1) भूजल उपलब्धता (वार्षिक एकूण पुनर्भरण ) | 94 | | अ) भूजलाचा सध्याचा सिंचनासाठी वापर | 3 |
| | 2) भूजल वापरास मूभा ( 94 च्या 65 %) | 61 | | | |

टीपा 1) भूजल उपलब्धतेमूळे उपखोऱ्याच्या एकूण उपलब्धतेत वाढ होणार नाही ; भूजलाचा जेवढा उपसा होईल तेवढा नदी प्रवाह घटत जाईल म्हणून एकूण उपलब्धतेचा आकडा काढतांना भूजल उपलब्धतेचा विचार घेतलेला नाही.

2) संकलीत अंदाजासाठी सर्व पाण्याचा उपयोग भूपृष्ठावरील पाण्यातून दाखविला आहे. पण एकूण वापरापैकी अधिकाधिक 61+3= 64 भूजल माध्यमातून शक्य आहे.

3) पाणीवापराचे नियोजन उपलब्ध येवा मालिकेवर आधारित आहे.

सारणी : 9.6 (चालू)

**जलसंपत्तीचा ताळेबंद**

**इंद्रावती**

जलसंपत्ती - दलघमी

| अक्र | उपलब्धता | |
|---|---|---|
| 1 | भूपृष्ठावरील | |
| | अ) नैसर्गिक | |
| | 1) 75 टक्के विश्वासार्हतेने | 3295 |
| | 2) 50 टक्के विश्वासार्हतेने | 3624 |
| | 3) सरासरीने | 3753 |
| | 4) नियोजनासाठी | 1161 |
| | ब) मानवप्रबाधित | |
| | 1) नागरी वापरातून पुनरुद्भव (80 %) | 0 |
| | 2) उद्योग धंदयातील पुनरुद्भव (97.5%) | 0 |
| | 3) इतर खोऱ्यातून संक्रमित झालेले पाणी | 0 |
| | एकूण (1 ब) | 0 |
| 2 | मानवनिर्मित | |
| | लाभक्षेत्रातील पुनर्भरण (1161-22) च्या10 % | 114 |
| 3 | एकूण उपलब्धता [1161+114] | 1275 |

| अक्र | वापर (सन2030) | |
|---|---|---|
| 4 | भूपृष्ठावरील | |
| | अ) घरगुती वापरासाठी | |
| | 1) नागरी | 0 |
| | 2) ग्रामीण | 11 |
| | 3) पशुधन | 11 |
| | एकूण | 22 |
| | ब) उद्योगधंदयासाठी | 0 |
| | एकूण सिंचनेतर वापर | 22 |
| 5 | इतर उपखोऱ्यात स्थलांतरीत पाणी | 0 |
| 6 | सिंचनासाठी उपलब्ध भूपृष्ठावरील पाणी (1161-22)+114 | 1253 |
| 7 | एकूण वापर | 1275 |

1) भूजल उपलब्धता (वार्षिक एकूण पुनर्भरण) 441


2) भूजल वापरास मुभा (441 च्या 65 %) 287

अ) भूजलाचा सध्याचा सिंचनासाठी वापर 2

टीपा 1) भूजल उपलब्धतेमूळे उपखोऱ्याच्या एकूण उपलब्धतेत वाढ होणार नाही ; भूजलाचा जेवढा उपसा होईल तेवढा नदी प्रवाह घटत जाईल म्हणून एकूण उपलब्धतेचा आकडा काढतांना भूजल उपलब्धतेचा विचार घेतलेला नाही.

2) संकलीत अंदाजासाठी सर्व पाण्याचा उपयोग भूपृष्ठावरील पाण्यातून दाखविला आहे. पण एकूण वापरापैकी अधिकाधिक 287+114= 401 भूजल माध्यमातून शक्य आहे.

3) पाणीवापराचे नियोजन उपलब्ध येवा मालिकेवर आधारित आहे.



नकाशा - 9.1
13 Km 0 13 26 Km
महाराष्ट्र राज्य
9 निम्न वैनगंगा उपखोरे
• संदर्भ सूची •
1. राज्य सरहद्द
2. जिल्हा सरहद्द
3. तालुका सरहद्द
4. उपखोरे सरहद्द
5. घटक क्षेत्र हद्द
6. जिल्हा मुख्यालय
7. तालुका मुख्यालय
8. रेल्वे मार्ग
9. रस्ते
10. नद्या व नाले
11. समपर्जन्यमान रेषा (मिमी) 1400
12. धरणाचे ठिकाण व बुडीत क्षेत्र पूर्ण बांधकामाधीन भविष्यकालिन
13. औद्योगिक क्षेत्र
14. महानगरपालिका
15. नगर पालिका
महाराष्ट्र जल व सिंचन आयोग
निम्न वैनगंगा उपखोरे
अ) वैनगंगा – प्राणहिता घटक
आ) इंचमपल्लीपरिसर घटक
इ) इंद्रावती घटक
जून 1999
उपखोऱ्याचे स्थान
उपखोरे क्र.
उपखोऱ्यांची नावे
7 वर्धा
8 मध्य वैनगंगा
मध्य प्रदेश
आंध्र प्रदेश
भंडारा जिल्हा
नागपूर जिल्हा
नागपूर कडे
भंडाऱ्या कडे
मध्य वैनगंगा उपखोरे
नागभीड
घोडाझरी
चिमूर
भदगा
सिंदेवाही
हुमन
आसोला मेंढा
गडचिरोली
वाघोली बुटी
मूल
चामोर्शी
चंद्रपूर
चंद्रपूर कडे
गोंडपिंपरी
आष्टी
पोहार
भीमकुंड
कोथरी
दीना
चेन्ना
पेटी गुड्डम
घानोरा
कठाणी
मेंढा
कारवाफा
एटापल्ली
भामरागड
अहेरी
वर्धा उप खोरे
म ध्य प्रदेश
आं ध्र प्रदेश
भोपाळ पट्टणम (इंद्रासागर)
बस्तर कडे
सिरोंचा
गोदावरी नदी
इंचमपल्ली
1400
1600

# उपखोरे :10

# पूर्णा (तापी)

## 1.0 भौगोलिक तपशील

पूर्णा उपखोरे हे तापी हया मुख्य खोऱ्यातील एक प्रमुख उपखोरे असून एकूण तापी उपखोऱ्याच्या भौगोलिक क्षेत्राच्या 29 टक्के भाग पूर्णा उपखोऱ्याचा आहे. मध्यप्रदेशातील सातपुडा पर्वत रांगातील मुलताई जवळ पूर्णा नदीचा उगम आहे. पूर्णा नदीस चंद्रभागा, शहानुर, पेढी, उमा, काटेपूर्णा, वान, मन, मोरणा, ज्ञानगंगा, नळगंगा इत्यादी उपनद्या मिळतात. या उपखोऱ्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र 17575 चौकिमी आहे.

जळगाव, बुलढाणा, अकोला, अमरावती या जिल्ह्यातील खालील तालुक्यांच्या क्षेत्राचा समावेश या उपखोऱ्यात (नकाशा 10.1) आहे.

**जळगाव** : 1)मुक्ताईनगर 2) भुसावळ

**बुलढाणा** : 1)चिखली 2)बुलढाणा 3)नांदुरा 4)संग्रामपूर 5)खामगाव 6)मेहकर, 7)मलकापूर, 8) मोताळा, 9) जळगाव जामोद, 10) शेगाव

**अकोला** : 1)अकोला, 2)तेल्हारा, 3)कारंजा, 4)पातूर, 5)बाळापूर, 6)अकोट, 7)मुर्तीजापूर, 8)मालेगाव, 9)बार्शी टाकळी, 10)मंगरूळपीर

**अमरावती** : 1)चांदूरबाजार 2)अचलपूर 3)दर्यापूर, 4)अमरावती,5)नांदगाव खंडेश्वर, 6)भातकुली, 7)मोर्शी, 8)अंजनगाव, 9)चिखदलरा, 10)धारणी

मुख्यनदी, तिच्या उपनद्या इत्यादीचा तपशील खालील प्रमाणे आहे.

लांबी - किमी,तलांक-मी

| | | | | उगमस्थान | | संगमस्थान | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अक्र | नदी | उपनदी | लांबी | ठिकाण | तलांक | ठिकाण | तलांक |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1 | पूर्णा | | 271* | भैसदेहि जि.बैतूल (मप्र) | 900 | चांगदेव. ता.मुक्ताईनगर | 220 |
| 2 | | चंद्रभागा | 82 | कलांगणा | 1044 | रामतीर्थ | 270 |
| 3 | | शहानूर | 92 | खोगडा | 1103 | दहिहांडा | 260 |
| 4 | | पेढी | 70 | रिध्दपूर | 398 | शिरर्ला | 284 |
| 5 | | उमा | 42 | लोहारा | 540 | दूर्गवाडी | 280 |
| 6 | | काटेपूर्णा | 108 | जउळका | 500 | माटोरी | 275 |
| 7 | | वान | 38 | बिराटी | 500 | टाकळी | 240 |

* महाराष्ट्रातील उपखोऱ्याच्या मर्यादेत.

लांबी - किमी, तलांक-मी

| | | | | उगमस्थान | | संगमस्थान | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अक्र | नदी | उपनदी | लांबी | ठिकाण | तलांक | ठिकाण | तलांक |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 8 | | मन | 96 | बिस्वा | 589 | मनसगाव | 240 |
| 9 | | मोरणा | 99 | एकांबा | 552 | अंदुरा | 242 |
| 10 | | ज्ञानगंगा | 68 | नागझरी | 570 | येरली | 237 |
| 11 | | वैभव | 34 | मादोडा | 653 | हरसोडा | 235 |
| 12 | | नलगंगा | 63 | नलकुंडा | 662 | बोदवड | 230 |

1.1 विस्तार : या उपखोऱ्याचा क्षेत्रीय विस्तार अक्षांश 20° 32' ते 29° 46' उत्तर व रेखांश 76° 37' ते 78° 27' पूर्व या मध्ये आहे.

1.2 चतु:सीमा : या उपखोऱ्याचा आकार पंख्यासारखा आहे. उपखोऱ्याच्या चतु:सीमा खालील प्रमाणे आहेत.

| अक्र | दिशा | तपशील |
|---|---|---|
| 1 | उत्तर | सातपुडा पर्वत व तापी सातपुडा घटक |
| 2 | पूर्व | वर्धा उपखोरे क्र. 7 |
| 3 | पश्चिम | तापी दक्षिण घटक |
| 4 | दक्षिण | पैनगंगा उपखोरे क्र. 6 |

## 2.0 हवामान

या उपखोऱ्यातील क्षेत्र निश्चित पावसाच्या प्रदेशात येते. पाण्याच्या उपलब्धतेत दोलायमानताही फार नाही. या उपखोऱ्यात साधारणतः 88 टक्के पाऊस नैऋत्य मोसमी वाऱ्यामुळे जून ते सप्टेंबर दरम्यान , 8 टक्के पाऊस ईशान्य वाऱ्यामुळे सप्टेंबर ते डिसेंबर दरम्यान व 4 टक्के पाऊस जानेवारी ते मे या कालावधीत पडतो. सरासरी पर्जन्यमान 767 मिमी आहे. उपखोऱ्यातील हवामानविषयक इतर बाबी व पर्जन्यमानातील दोलायमानता इत्यादी माहिति खालील प्रमाणे आहे.

पर्जन्यमान-मिमी, तपमान -अंशसे

| अक्र | वैशिष्ट्ये | परिमाण | वर्ष | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1 | सर्वात अधिक पाऊस | 1430 | 1988 | भूगाव |
| 2 | सर्वात कमी पाऊस | 506 | | नांदूरधांडे जि. बुलढाणा |
| 3 | सर्वात अधिक तपमान | 45 | - | - |
| 4 | सर्वात कमी तपमान | 10 | - | - |

कृषि हवामान वर्गीकरणानूसार या उपखोऱ्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

7-निश्चित पावसाचा मुख्यतः खरीप पिकांचा विभाग (ARK) व 8-मध्यम ते साधारण जास्त पावसाचा विभाग (MR).

या उपखोऱ्यातील पर्जन्यमानातील दोलायमानता गुणांक 28 (तक्ता 2.5.8) आहे.सरासरी पर्जन्यमानाचा माहवार तपशील सारणी 10.1 मध्ये दर्शविला आहे.पर्जन्यमापन केंद्रांचा तपशील सारणी 10.2 मध्ये दिला आहे.

2.1 बाष्पीभवन : या उपखोऱ्यात सर्वाधिक सरासरी बाष्पीभवन मे महिन्यात 437 मिमी तर सर्वात कमी बाष्पीभवन ऑगस्ट महिन्यात 142 मिमी होते. बाष्पीभवनाचा तपशील सारणी 10.1 मध्ये दर्शविला आहे. महाराष्ट्रातील मे महिन्यामध्ये सर्वात अधिक बाष्पीभवन या उपखोऱ्यात आहे. त्यामुळे उन्हाळी पिकास या उपखोऱ्यात मर्यादा आहे व बारमाही पिकांनाही उन्हाळा सहज पेलवणे शक्य नाही.

## 3.0 जलसंपत्तिची उपलब्धता

3.1 भूपृष्ठीय जलसंपत्ति : भूपृष्ठीयजल हे मुख्यतः त्या उपखोऱ्यात पडणाऱ्या पावसाच्या परिमाणावर अवलंबून असते. या उपखोऱ्यातील सरासरी विश्वासार्हतेचा येवा 2536 दलघमी आहे. वर्ष 1959 ते 1982 या 24 वर्षातील माहितीवर आधारभूत या उपखोऱ्यातील जल उपलब्धता खालीलप्रमाणे आहे:

| | |
|---|---|
| 75 टक्के विश्वासार्हतेने | 2162 दलघमी |
| 50 टक्के विश्वासार्हतेने | 2910 दलघमी |

येवा मोजण्याची ठिकाणे खालील प्रमाणे आहेत:-

येवा -दलघमी

| अ.क्र | सरिता मापन केंद्राचे नाव | स्वामित्व | आधार सामुग्री उपलब्धतेचा कालावधी | वार्षिक सरासरी येवा |
|---|---|---|---|---|
| 1 | औरंगपूर | पाटबंधारे खाते | 1886 ते 1996 | 252 |
| 2 | देवगाव | पाटबंधारे खाते | 1876 ते 1996 | 51 |
| 3 | दर्यापूर | पाटबंधारे खाते | 1859 ते 1996 | 290 |
| 4 | अंजनगाव | पाटबंधारे खाते | 1976 ते 1994 | 50 |
| 5 | मनसगाव | पाटबंधारे खाते | 1985 ते 1995 | 1739 |
| 6 | वारखेड | पाटबंधारे खाते | 1965 ते 1996 | 101 |
| 7 | शिर्ला(नेमाने) | पाटबंधारे खाते | 1982 ते 1996 | 53 |
| 8 | देऊळगाव | पाटबंधारे खाते | 1976 ते 1996 | 60 |
| 9 | टाकळीखेत्री | पाटबंधारे खाते | 1976 ते 1996 | 172 |
| 10 | कवठा | पाटबंधारे खाते | 1985 ते 1996 | 596 |
| 11 | विश्रोळी | पाटबंधारे खाते | 1976 ते 1996 | 127 |

वार्षिक येवा व वेगवेगळ्या विश्वासार्हतेचा तपशील सारणी 10.3 मध्ये दिला आहे.

**3.2 भूस्तरीय रचना :**

भूपृष्ठीय स्थिति (भूरूप वर्णन) : उपखोऱ्यातील भूभाग साधारण 10 टक्के अतिविच्छेदीत व डोंगराळ, 43 टक्के पठारी, 17 टक्के सपाट व 30 टक्के नदीलगतच्या गाळाचा आहे. यात भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा निर्देशित 98 पाणलोट क्षेत्रे आहेत. नदीलगतच्या गाळाचा मोठा सलग विस्तीर्ण प्रदेश हे या उपखोऱ्याचे वैशिष्टय आहे. त्याची उत्पादकता वाढवण्यातील अडचणीकडे विशेष लक्ष द्यावे लागणार आहे. भूशास्त्रीय इतिहासाच्या दृष्टीने भूकवचावरील खोल भेगांमधे गाळ भरून पूर्णा उपखोरे तयार झाले आहे. त्यामुळे उपखोऱ्याच्या मधे गाळाचा विस्तीर्ण प्रदेश व उत्तर कडेला विच्छेदित सातपुडयाचे डोंगर हे या उपखोऱ्याचे वेगळेपण आहे.

भूपृष्ठीय शैलस्थिति : टेकडया या मुख्यत्वे लाव्हा थरांपासून तयार झालेल्या बहुस्तरीय दक्षिणी कातळ खडकाच्या (डेक्कन ट्रॅप प्रस्तराच्या) आहेत. भ्रंशाद्वारे तयार झालेल्या पूर्णा नदीच्या उपखोऱ्यात खोल गाळाचा थर आहे. त्याच बरोबर मन, मोरणा, काटेपूर्णा या नद्यांच्या काठावर सुध्दा उथळ गाळाचे थर आहेत. पूर्णा नदीच्या उपखोऱ्यातील गाळाची जाडी साधारण 10 ते 450 मीटर आहे. त्यात माती, रेव (Silt), वाळू, टोळ, कंकर इत्यादींचा समावेश आहे. गाळाच्या प्रदेशाचे क्षेत्रफळ 5200 चौकिमी (म्हणजे एकूण उपखोऱ्याच्या साधारण 30 टक्के )आहे. लाव्हाथरात अकुहरी बेसाल्टचे प्राबल्य आहे. भूस्तरीय रचनेमध्ये काठावरील वरच्या जमिनीत पिवळसर रेव असल्यामूळे व ती अपार्य असल्यामुळे जमिनीत पाणी मुरण्याचे प्रमाण कमी आहे. पण पूर्णा नदीतील वाळूच्या थरांमधून मात्र पाण्याचे मुरण्याचे प्रमाण चांगले आहे.

**3.3** भूजल संपत्ति : गाळाच्या थरांबरोबर विघटीत बेसाल्ट प्रस्तर भूजल उपलब्धतेच्या दृष्टीने महत्वाचे आहेत. बेसाल्ट प्रस्तरातील विघटीत भाग बरोबरच भूरुपस्थितिवरही भूजल उपलब्धी अवलंबून आहे. त्यामुळे अतिविच्छेदीत व डोंगराळ भागात भूजल कमी, पठारी भागात मध्यम व सपाट भागात जास्त असे प्रमाण आहे.

गाळाच्या प्रस्तरात मात्र प्राथमिक सच्छिद्रतेमुळे भूजल धारण क्षमता चांगली आहे. परिणामी भूजल उपलब्धी सुध्दा जास्त आहे; पण ती वाळू किंवा टोळ यांच्या पट्टयांपूरती मर्यादित आहे. गाळाच्या प्रस्तरातील मध्य भागात भूजल मुख्यत्वे खारे असून क्षाराचे प्रमाण खूप जास्त आहे. गोडया पाण्याचे कप्पे खूप मर्यादित व विभक्त स्वरुपात आहेत. सिंचनासाठी खारे पाणी अयोग्य असून काही भागात ते वापरल्यामुळे त्या भागातील जमिनी सुध्दा नापीक झालेल्या आहेत.

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमार्फत अकोला जिल्ह्यातील दापूरा, काटी या गावात राबविलेल्या निःक्षारीकरण प्रकल्पावरून नलिका कुपाद्वारे भूजलाचा सतत उपसा केल्यास क्षार कमी होत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. या व गोडे पाणी मिसळून क्षार कमी करण्याच्या तत्वांचा उपयोग करून अमरावती, अकोला व बुलढाणा जिल्ह्यातील 3500 चौकिमी क्षेत्रातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी निःक्षारीकरण प्रकल्प मोठया प्रमाणावर राबविण्यात येत आहे. यात अमरावती जिल्ह्यातील 5 तालुक्यातील 114 गावे, अकोला जिल्ह्यातील 4 तालुक्यातील 127 गावे व बुलढाणा जिल्ह्यातील 2 तालुक्यातील 101 गावांचा समावेश आहे.

गाळाच्या या भागातील भूजलधारक प्रस्तराची उपजावकता वाळूच्या थरांमुळे जास्त आहे. वाळूच्या थरांची जाडी ठिकठिकाणी वेगळी आहे. जास्त खोलीवरील भूजलधारक प्रस्तर अधिक क्षारयुक्त आहे. 60 ते 70 मिटर पर्यन्तच्या नलिकाकुपांची क्षमता चांगली आहे, तर 70 मीटर पेक्षा जास्त खोलीच्या नलिका कुपांची क्षमता कमी आहे. जास्त खोलीच्या भूस्तरात गाळाचे प्रमाण जास्त तर वाळूचे कमी आहे.

या उपखोऱ्यात एकुण 98 पाणलोट क्षेत्रे असून त्यांचे एकूण भौगोलिक क्षेत्र 17575 चौकिमी आहे. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या 1990 च्या भूजल अंदाजानुसार उपखोऱ्यातील पुनर्भरण 1768 दलघमी असून. विहिरींची संख्या 0.54 लक्ष आहे. त्याच प्रमाणे गाळाच्या प्रदेशात सिंचनासाठी व पिण्याच्या पाण्यासाठी नलिकाकूप सुध्दा मोठया संख्येत आहेत.. उपखोऱ्यातील दोन पाणलोटक्षेत्रे पुताविं-2 (पुर्णा-तापी-विभवा) पुतावा-1 (पुर्णा-तापी-वाघार) (तालुके-खामगाव, नांदूरा, भूसावळ) विकसित अवस्थेत आहेत.

3.4 अवर्षण प्रवण क्षेत्र : या उपखोऱ्याचे क्षेत्र 32 तालूक्यात पसरले आहे त्यापैकी 8 तालूके सुकथनकर समितीच्या अहवालानंतर शासनाने अवर्षणप्रवण घोषित केले आहेत. अशा तालूक्यांचा तपशील पूढील प्रमाणे आहे.

पर्जन्यमान - मिमी, लोकसंख्या- हजारात , क्षेत्र - चौकिमी

| अक्र | जिल्हा | तालुका | सरासरी वार्षिक पर्जन्यमान | क्षेत्र | लोकसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| 1 | बुलढाणा | मलकापूर | 714 | 476 | 132 |
| 2 | | जळगाव जामोद | 749 | 580 | 102 |
| 3 | अकोला | बाळापूर | 759 | 664 | 142 |
| 4 | | मूर्तीजापूर | 822 | 714 | 142 |
| 5 | | मालेगाव | 876 | 1054 | 95 |
| 6 | अमरावती | चांदूर बाजार | 809 | 633 | 147 |
| 7 | | अचलपूर | 831 | 643 | 211 |
| 8 | | दर्यापूर | 748 | 762 | 141 |

## 4.0 जमिनीचा तपशील

जमिनीचे प्रकार व त्याची टक्केवारी खालील प्रमाणे आहे.

| अक्र | जमिनीचा प्रकार | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | भरड उथळ जमीन | 18 |
| 2 | मध्यम काळी जमीन | 35 |
| 3 | खोल काळी जमीन | 2 |
| 4 | गाळाची जमीन | 45 |

## 5.0 जमिनीचा वापर

लागवडीयोग्य क्षेत्र, वनखात्याच्या ताब्यातील क्षेत्र, पडीक क्षेत्र इत्यादी तपशील पुढील प्रमाणे आहे.

क्षेत्र - हजार हेक्टर

| अक्र | वापर | क्षेत्र | भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | भौगोलिक क्षेत्र | 1758 | |
| 2 | वनखात्याच्या ताब्यातील क्षेत्र | 240 | 13.7 |
| 3 | पेरणीसाठी उपलब्ध नसलेले क्षेत्र | | |
| | अ) ओसाड जमीन | 42 | 2.4 |
| | ब) बिगर शेती उपयोगा करिता आणलेली जमीन | 76 | 4.3 |
| 4 | मशागत योग्य पडिक जमीन | 19 | 1 |
| 5 | कायमची कुरणे व चराऊ कुरणे | 72 | 4.1 |
| 6 | किरकोळ झाडे झुडपे यांच्या समुहाखालील क्षेत्र | 5 | 0.3 |
| 7 | चालू पडिक जमीन | 26 | 1.5 |
| 8 | इतर पडिक जमीन | 22 | 1.2 |
| 9 | पेरणीचे निव्वळ क्षेत्र | 1256 | 71.5 |
| 10 | लागवडीयोग्य क्षेत्र (4 +5 +6 +7 +8+9) | 1400 | 80 |
| 11 | दुसोटा क्षेत्र | 288 | - |
| 12 | पिकाखालील एकूण क्षेत्र (9 +11) | 1544 | - |
| 13 | पीक घनता (12÷9×100) | 123 | - |

## 6.0 लोकसंख्या व पशुधन

6.1 <u>लोकसंख्या</u> : सन 1991 च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या 39.3 लक्ष आहे. सन 2030 पर्यन्त होणारी लोकसंख्येतील वाढ, व लोकसंख्या घनता खालील प्रमाणे आहे.

लोकसंख्या - हजारात , घनता-प्रति चौकिमी

| अक्र | लोकसंख्या तपशील | 1991 | 2030 |
|---|---|---|---|
| 1 | नागरी | 1377 | 3829 |
| 2 | ग्रामीण | 2553 | 5106 |
| 3 | एकूण | 3930 | 8935 |
| 4 | लोकसंख्या घनता | 224 | 508 |
| 5 | ग्रामीण लोकसंख्या घनता | 145 | 291 |

6.2 <u>पशुधन</u> : सन 1992 च्या मोजणीनुसार एकूण पशुधन 17.96 लक्ष आहे.पशूंची वर्गनिहाय संख्या पूढील प्रमाणे आहे.

| म्हैस व रेडे | गाय व बैल | एकखुरी व उंट | शेळ्या व मेंढ्या | डुकरे | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| 233781 | 1004612 | 8580 | 534783 | 14964 | 1796720 |

6.3 इतर तपशील : या उपखोऱ्यात अमरावती ही एकमेव महानगरपालिका आहे. तसेच 1)अकोला, 2)शेगाव, 3)जळगाव जामोद, 4)वाशीम, 5)बाळापूर, 6)अकोट, 7)चांदूर बाजार, 8)मुर्तीजापूर, 9)अचलपूर, 10)दर्यापूर, 11)मालेगाव, 12)मलकापूर या नगरपालिका आहेत. शेत मजुरांची संख्या 348870 आहे. तर इतर मजुरांची संख्या 332200 आहे.

**7.0 पाणीवापर**

7.1 सिंचनासाठी वापर : उपखोऱ्यातील वर्गनिहाय प्रकल्प म्हणजे मोठे, मध्यम, लघु, व कोल्हापुर पध्दतीचे बंधारे, पाणीसाठा, पाणीवापर, सिंचनक्षेत्र याची तसेच पूर्ण झालेले, प्रगतिपथावरील व भविष्यकालीन प्रकल्प यांची माहिती सारणी 10.4 मध्ये दर्शविली आहे. पूर्ण झालेल्या प्रकल्पांची निर्मित सिंचन क्षमता 82968 हेक्टर असून त्याचा पाणी वापर 598 दलघमी आहे.सन 2030 पर्यंत आणखी 246909 हेक्टर क्षेत्र सिंचनासाठी उपलब्ध होईल व त्याचा पाणी वापर 1719 दलघमी राहील.

7.2 सिंचनेतर पाण्याचा वापर : सिंचनेतर उपयोगासाठी या उपखोऱ्यातील सध्याची गरज 157 दलघमी आहे. सन 2030 पर्यंतची गरज 1056 दलघमी होईल. यातील औद्योगिकरणासाठी लागणाऱ्या पाण्याचा वाटा 710 दलघमी आहे. या पाण्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

पाण्याची गरज - दलघमी

| तपशील | सन 1991 | | | | सन 2030 |
|---|---|---|---|---|---|
| | नागरी | ग्रामिण | पशुधन | एकूण | |
| घरगुती वापरासाठी | 63 | 51 | 38 | 152 | 346 |
| उद्योगासाठी | | | | 5 | 29 + 681 |
| एकूण | | | | 157 | 1056 |

7.3 जलसंपत्तिचा ताळेबंद : भूपृष्ठावरील व भूपृष्ठाखालील उपलब्ध जलसंपत्ति, घरगूती वापरासाठी व उद्योगासाठी व सिंचना साठी पाणीवापर, त्यातून होणारा पुनरुद्भव इत्यादीचा ताळेबंद सारणी 10.5 मध्ये दिलेला आहे.

7.4 लाभक्षेत्र विकास : सद्यस्थिति खालील प्रमाणे आहे.

क्षेत्र -हजार हेक्टर

| भूविकास भाग-1ची कामे | | | भूविकास भाग-2 ची कामे | | | प्रकल्पाच्या लाभक्षेत्रा |
|---|---|---|---|---|---|---|
| लाक्षेविप्रा कडील प्रकल्प | लाक्षेविप्रा बाहेरील प्रकल्प | एकूण | लाक्षेविप्रा कडील प्रकल्प | लाक्षेविप्रा बाहेरील प्रकल्प | एकूण | व्यतिरिक्त अन्य क्षेत्रात झालेले जमीन सपाटी करणाचे (भाग-2) क्षेत्र |
| - | 58.79 | 58.79 | - | 30.20 | 30.20 | 3.67 |

**7.5 <u>सन 1974 पूर्वीची ( 25 वर्षापूर्वीची )धरणे</u> :**

| अक्र | प्रकल्पाचे नाव | वर्ष |
|---|---|---|
| 1 | नळगंगा | 1966 |
| 2 | धानोरा (लघू) | 1970 |
| 3 | सावरपाणी | 1970 |
| 4 | गोड बाघोली | 1970 |
| 5 | कन्हाळा | 1971 |
| 6 | ज्ञानगंगा | 1973 |
| 7 | मोरणा (मध्यम) | 1973 |
| 8 | पिंपळगाव हाडे | 1973 |
| 9 | निंभी | 1973 |
| 10 | निमखेड | 1974 |
| 11 | पिंपळगाव चांभारे | 1974 |

**8.0 पीक रचना**

उपखोऱ्यात एकूण लागवडीयोग्य क्षेत्र 14 लक्ष हेक्टर आहे. त्यापैकी पिकाखाली 15.44 लक्ष हेक्टर आहे. यात प्रामुख्याने खरीप पीक क्षेत्र आहे. कांही प्रमूख पिकांची दर हेक्टरी उत्पादकता पुढीलप्रमाणे आहे.

उत्पादकता - क्विंटल/हेक्टर

| अक्र | प्रमुख पीक | उत्पादकता |
|---|---|---|
| 1 | खरीप ज्वारी | 18.00 |
| 2 | कापूस | 1.48 |

**9.0 उद्योगधंदे**

उपखोऱ्यातील प्रमुख कृषि आधारित उद्योगधंद्यांची संख्या खालील प्रमाणे आहे.

| अक्र | तपशील | संख्या |
|---|---|---|
| 1 | साखरकारखाने | 9 |
| 2 | सुतगिरण्या | 8 |

**10.0 जलविद्युत निर्मीती**

उपखोऱ्यात सध्या एकाही जल विद्युत प्रकल्पाचे बांधकाम झालेले नाही. शहानूर धरणा खालील जलविद्युत प्रकल्पांचे काम प्रगतिपथावर आहे. भविष्यकालीन प्रकल्पांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

क्षमता मेवॅ

| प्रकल्पाचे नाव | क्षमता |
|---|---|
| चिखलदरा उदंचन जविप्र | 0.4 |
| वाण धरण पायथा | 1.5 |
| चंद्रभागा धरण पायथा | 1.0 |
| शहानूर कालवा प्रपात | 0.35 |

**11.0 दळणवळणाची साधने**

या उपखोऱ्यातून मुंबई-नागपूर दुहेरी ब्रॉडगेज रेल्वे मार्ग जातो. तसेच पूर्णा-खांडवा मीटर गेज व अचलपूर-यवतमाळ नॅरोगेज मार्ग पण जातात.

धुळे-कलकत्ता हा राष्ट्रीय महामार्ग क्र 6 या उपखोऱ्यातुन जातो. या उपखोऱ्यातून जाणाऱ्या राज्य महामार्गांचा तपशील सारणी 10.6 मध्ये दिलेला आहे. उपखोऱ्याच्या मधोमध हे रेल्वे मार्ग व राष्ट्रीय महामार्ग असल्यामुळे वहातुकीची मोठीच सोय आहे.

**12.0 भावी नियोजनाची दिशा**

12.1 <u>पाण्याची उपलब्धता व वापर :</u> या उपखोऱ्यात पाण्याची वार्षिक सरासरी उपलब्धता 2536 दलघमी आहे. उकाई तांत्रिक समितीने (अय्यंगार समिती) तापी खोऱ्यातील 75 टक्के विश्वासार्हतेच्या उपलब्धीतील उकाईच्या वरील भागात 7401 दलघमी हिस्सा दिला आहे. मध्यप्रदेश व महाराष्ट्र यांच्यातील सहमतीने यापैकी 5415 दलघमी (191.25 अघफू) वाटा महाराष्ट्राला मिळाला आहे. तापी खोऱ्यांतर्गत आयोगाने प्रस्तावित केलेल्या उपखोऱ्यांमध्ये या वाटयाची विभागणी वार्षिक सरासरी उपलब्धीच्या प्रमाणात केली आहे. त्यानुसार या उपखोऱ्यात वापरासाठी उपलब्धी 1506 दलघमी येते. पैनगंगा उपखोऱ्यातून (उपखोरे क्र 6) 26 दलघमी पाणी (पैनटाकळी प्रकल्पातील) पूर्णा (तापी) उपखोऱ्यात वापरण्याचे नियोजन आहे. तसेच वर्धा (उपखोरे क्र 7) उपखोऱ्यातून अमरावती परिसरातील महाराष्ट्र आद्योगिक विकास महामंडळाला 681 दलघमी पाणी पुरवठा प्रस्तावित आहे. या दोन आंतरखोरे स्थलांतरामुळे पूर्णा (तापी) उपखोऱ्यातील वापरासाठीच्या उपलब्धीत 707 दलघमी ची भर पडून ती 2213 दलघमी होते.

या उपखोऱ्यातील पाणीवापराची सद्यस्थिति येणे प्रमाणे आहे. वर्ष 1996 पावेतो 2 मोठे, 7 मध्यम व 323 लघु प्रकल्प बांधले गेलेले आहेत. त्याद्वारे 598 दलघमी पाणीवापर झालेला आहे. वर्ष 2030 पर्यन्त अतिरिक्त 1719 दलघमी पाणीवापर नियोजित आहे. अशा प्रकारे वर्ष 2030 अखेर एकंदर 2317 दलघमी उपयोग निश्चित झालेले पाणी असणार आहे.

सन 1958 मध्ये नेमलेल्या श्री.एम.एस.तिरुमल अय्यंगार समितीने तापी खोऱ्यात एकूण 11323 दलघमी पाणी (75 टक्के विश्वासार्हतेचे) उपलब्ध असल्याचा अहवाल दिला होता. यानंतर पार-तापी नर्मदा शृंखला, या प्रकल्पासाठी राष्ट्रीय जल विकास प्राधिकरण नवी दिल्ली यांनी जून 1995 मध्ये केलेल्या अभ्यासात तापी खोऱ्यातील उकाई धरणस्थळी 14500 दलघमी इतके पाणी उपलब्ध असल्याचे नमूद केलेले आहे. थोडक्यात 3177 दलघमी येवढया अधिक पाण्याची (जवळ जवळ 28 % अधिक पाण्याची) शक्यता आहे. क्षेत्राच्या प्रमाणात पाणी वाटप केल्यास राज्यनिहाय पाणी उपलब्धता खालील प्रमाणे आहे.

क्षेत्र-चौकिमी, पाणी-दलघमी

| राज्य | स्रवण क्षेत्र | समितीने केलेले पाणी वाटप | क्षेत्राच्या प्रमाणात पाणी वाटप | क्षेत्राची टक्केवारी | सुधारीत पाण्याचे प्रमाणात वाटप | उपलब्ध क्षेत्राच्या | उपलब्ध अतिरिक्त पाणी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मध्यप्रदेश | 9634 | 1986 | 1675 | 14.79 | 2144 | | 158 |
| महाराष्ट्र | 51254 | 5415 | 8908 | 78.67 | 11408 | | 5993 |
| गुजरात | 4257 | 3922 | 740 | 6.54 | 948 | | (-)2974 |
| एकूण | 65147 | 11323 | 11323 | 100 | 14500 | | 3177 |

गुजरात राज्याचा पूर्वीचा वाटा 3922 दलघमी आहे.त्यांत क्षेत्राच्या प्रमाणापेक्षा 3182 दलघमी जास्त पाणी यापूर्वी दिलेले आहे. त्यामुळे आता त्या राज्यास 3177 दलघमी अतिरिक्त उपलब्ध पाण्यातून काहीच देण्याची आवश्यकता नाही. या 3177 दलघमी पाण्यातून मध्यप्रदेशा साठी 158 दलघमी इतके पाणी आरक्षित करून उर्वरीत 3019 दलघमी इतके पाणी महाराष्ट्राच्या वाटयाला येऊ शकेल. महाराष्ट्रास आता (5415+3019)= 8434 दलघमी इतके पाणी उपलब्ध होईल. या पाण्याच्या 10 टक्के पूनर्निर्माणीत प्रवाह उपलब्ध झाल्याचे विचारात घेता एकूण 9277 दलघमी पाण्याच्या दृष्टिने नियोजन करणे शक्य आहे.

महाराष्ट्राच्या हिश्श्याचे एकूण 9277 दलघमी इतके उपलब्ध पाणी क्षेत्रनिहाय तत्वा प्रमाणेच वाटप करून पूर्णा उपखोरे, मध्यतापी उपखोरे (गिरणा व पांझरा) यांच्यासाठी खालील प्रमाणे उपलब्ध होईल :-

| | |
|---|---|
| पूर्णा | 3178 दलघमी |
| मध्यतापी | 6092 दलघमी |

हे पाणी नैसर्गिक येव्याशीही मिळतेजुळते असल्यामुळे त्याप्रमाणेच नियोजन करणे इष्ट दिसते.

12.2 विदर्भातील अकोला, अमरावती व बुलढाणा जिल्ह्यात पूर्णा नदी काठावरील पूर्वेकडे 60 किमी व पश्चिमेकडे 10 किमी रुंदीचा व 90 ते 100 किमी लांब पट्टयातील जवळपास 546 खेडयातील 2.74 लाख हेक्टर जमीन कमी अधिक प्रमाणात क्षार आणि अल्क या समस्येने ग्रासलेली आहे. या उपखोऱ्यातील जमीन नदीचा गाळ साचून तयार झाल्यामुळे कितीही खोल खोदले तरी मुरुम व कातळ लागत नाही. नदीच्या पाण्याबरोबर वाहून आलेले क्षार आणि गाळ साचून ही जमीन तयार झालेली आहे. ही जमीन सुपीक असली तरी क्षारग्रस्त झाल्याने पिकांचे उत्पादन समाधानकारक होत नाही.

12.3 पूर्णेच्या उपखोऱ्यातील जमिनी अतिशय खोल (150 सेमी पेक्षा जास्त) असून त्या करडया तपकिरी रंगाच्या, चिकणमाती व चुनखडीयुक्त आणि पाण्याचा निचरा होण्याची क्षमता कमी असणाऱ्या आहेत. या जमिनीत वाळू, पोयटा व चिकणमाती यांचे प्रमाण अनुक्रमे 1 ते 12, 13 ते 40 व 50 ते 70 प्रतिशत इतके आढळून येते.'पूर्णेच्या उपखोऱ्यातील खारवट चोपण जमिनीची सुधारणा' या ॲडहॉक प्रकल्पांतर्गत झालेल्या संशोधनावरुन या जमिनीचा पि.एच. 8 ते 9, संपृक्त अर्काची विद्युतवाहकता 0.9 ते 6.04 डेसिसायमन प्रति मीटर व विनिमयीत सोडीयमची टक्केवारी 1.38 ते 27.10 च्या दरम्यान आढळून आली. क्षारता व विनिमेय सोडीयमची टक्केवारी खोलीनुसार वाढत जाते. या जमिनीतील स्मेक्टायटीक गटाच्या चिकण मृतिकेमुळे व कॅलशीयम कार्बोनेट मिश्रीत कठीण थरामुळे निचऱ्याची क्षमता अतिशय कमी आहे.

12.4 पूर्णा नदीकाठी असलेली क्षारयुक्त जमीन ही भारतामध्ये इतर ठिकाणी असलेल्या क्षारयुक्त जमिनीपेक्षा काही प्रमाणात भिन्न असून, तिची जडणघडण देखील वेगळी आहे. उदाहरणार्थ, पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश या राज्यामध्ये असलेली क्षारयुक्त जमिनी गंगा, सिंधू नद्यांच्या गाळाने तयार झालेल्या असून सिंचनामुळे या जमिनी क्षारयुक्त झालेल्या आहेत.

12.5 कोंकणामधील पश्चिम किनाऱ्यालगत जी क्षारयुक्त जमीन आहे, जिला 'खाजण' समजले जाते, ती समुद्र आणि खाडी यांच्या अतिक्रमणामुळे क्षारयुक्त बनलेली आहे. ही जमीन मुख्यत्वे करून सपाट असून वेळोवेळी समुद्र आणि खाडी या दोहोच्या पाण्याचा प्रादुर्भाव त्यावर होत राहतो. या जमिनीमध्ये सर्व साधारणतः अडीच ते सहा टक्क्यापर्यंत सोडीयम क्लोराईड या क्षाराचे प्रमाण आढळते. पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा या विभागामध्ये जी खार जमीन आढळते, ती मुख्यतः कोरडया हवामानामुळे जमिनीच्या खालील स्तरातून क्षार वर आल्याने खार बनलेली दिसते. या जमिनीमध्ये पाण्याचा निचरा होण्याची क्षमता अत्यंत कमी आहे.पूर्णा नदीच्या उपखोऱ्यातील जमिनी मात्र उत्तरेकडील सातपुडा व दक्षिणेकडील अजिंठा टेकडयामधील खोलगट जागी क्षार व गाळ साचून बनलेल्या आहेत. भूगर्भातील पाणी क्षारयुक्त असून काही ठिकणी भूपृष्ठावर क्षार जमा झालेले दिसतात. जमिनीच्या आतील थराची निचरा होण्याची क्षमता कमी असल्यामुळे जास्त पावसाच्या मोसमात जमिनी चिबडतात व पिकाचे उत्पादन घटते. कमी पावसाच्या मोसमात किंवा कोरडया हवामानात जमिनी कोरडया आणि टणक बनुन त्यांना खोल व रुंद भेगा पडतात. त्यामुळे जमिनीतील ओलावा निघून जातो, मुळे तुटतात व पीक पक्व होण्याआधीच सुकायला लागते. हया जमिनी सुपीक असून सुध्दा भुगर्भातील खोल आणि खारे पाणी आणि अपुरा निचरा हयामुळे बागायती पीके घेणे कठीण होवून बसते.

12.6 पुर्णेच्या उपखोऱ्यातील 70 ते 80 विहीरीच्या पाण्याचे नमुने वेगवेगळया हंगामात गोळा करून त्याचे रासायनिक पृथःकरण करण्यात आलेले आहे. तसेच या पट्टयातील मातीचे व प्रोफाईल खड्डयामधील मातीचे नमुने गोळा करून जमिनीच्या गुणधर्माबाबत सविस्तर अभ्यास सुध्दा करण्यात आलेला आहे.

12.7 या भागातील बहुतेक विहिरीचे पाणी खारे असून ते पाणी धरून ठेवणाऱ्या व कमी निचरा होणाऱ्या उपखोऱ्यातील जमिनीसाठी सध्याच्या परिस्थितिमध्ये तरी अयोग्य आढळून येते. सतत 3-4 वर्षे अशा पाण्याचा निचऱ्याच्या पध्दती व भूसुधारक द्रव्याशिवाय वापर केल्यास जमिनीच्या भौतिक व रासायनिक गुणधर्मात बिघाड होवून हया जमिनी अधिकच टणक बनतात. भूगर्भातील खारे पाणी,तसेच या भागातील व आसपासच्या भागात झालेल्या धरणाच्या पाण्याचा तसेच शेततळ्यात साठविलेल्या पावसाच्या पाण्याचा ओलीतासाठी जमिनीच्या भौतिक व रासायनिक गुणधर्मात बिघाड न होऊ देता कसा करता येईल यावर संशोधन होणे जरुरीचे आहे.

12.8 **खारपट्टा :** हया उपखोऱ्यातील साधारणतः 10 टक्के क्षेत्र खारपट्टयाचे आहे. पूर्णा उपखोऱ्यात पूर्णा नदीच्या दोन्ही काठास लागून असलेला भूप्रदेश क्षारयुक्त जमिनीचा असून तो (सलाईन ट्रॅक) क्षारयुक्त खारपट्टा म्हणून ओळखला जातो. अमरावती, अकोला, व बुलढाणा जिल्ह्यात खारपट्टयात पुढील तालुके येतात.

**अमरावतीः** दर्यापूर, भातकुली, अंजनगाव, अचलपूर (अंशतः), अमरावती (अंशतः) (एकूण क्षेत्र 1113 चौकिमी)

**अकोला :** अकोला, बाळापूर, मूर्तिजापूर, तेल्हारा, आकोट (एकूण क्षेत्र 2063.7 चौकिमी)

**बुलढाणा :** शेगाव, संग्रामपूर, जळगाव जामोद, नांदूरा, मलकापूर (एकूण क्षेत्र 643 चौकिमी)

खारपट्ट्यातील 140 गावे नलिकाकूपासाठी उपयोगी नाहीत. त्यापैकी 122 गावात नलिकाकूप बांधणे शक्य नाही. 18 गावामध्ये नलिकाकूपांना भरपूर जल उपलब्धी आहे. परंतू ते पाणी खारे आहे. या 140 गावांना प्रादेशिक नलिका पाणी पूरवठा योजनेद्वारे पाणी पूरवावे लागेल.

वरील समस्याग्रस्त गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टिने निःक्षारीकरण प्रकल्पांचा आढावा व तांत्रिक मार्गदर्शनासाठी शासनाने श्री.एच.बी.उलेमाले यांचे अध्यक्षतेखाली समितीची स्थापना केली आहे. (दुर्दैवाने त्यानंतर श्री.उलेमाले यांचा दिनांक 13.4.99 ला देहांत झाला आहे.)

हया क्षेत्रात काळ्या मातीचा भूस्तर साधारणपणे 10 ते 12 मिटर किंवा त्यापेक्षा जास्त असल्यामुळे पाटबंधारे योजनांना पायासाठी लागणारा कठीण खडक व्यवहार्य खोलीवर उपलब्ध होत नाही. सबब बांधकामाला लागणारी सामुग्री मुरूम, दगड, खडी इत्यादी जास्त अंतरावरून आणावी लागते. परिणामी पारंपारिक योजनांच्या किंमती फार येतात म्हणून पर्यायी रचनांचा विचार या पट्ट्यासाठी आवश्यक आहे.जमिनीतील क्षारांचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने पंजाबराव कृषि विद्यापीठ अकोला, विदर्भ वैधानिक विकास मंडळ आणि भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांच्या पुरस्काराने पूर्णा नदी खोरे विकास मित्र मंडळ नावाची स्वयंसेवी संस्था स्थापन झालेली असून त्यावर राष्ट्रीय चर्चासत्र फेब्रुवारी 96 मध्ये झाले होते त्यांनी काढलेल्या निष्कर्षाची आता अंमलबजावणी आवश्यक आहे.

12.9 **खाऱ्या पाण्याच्या पट्ट्याच्या विकासाबाबत :** पूर्णा नदीच्या उपखोऱ्यात भूजल खारे असण्याची मूळ कारणे भूस्तरीय असोत वा जलवैज्ञानिक असोत; क्षारतेची तिव्रता हळू हळू कमी करून संपू शकते. त्यातील क्षाराचे प्रमाण उपयोगालायक मर्यादेपर्यंत कमी करण्यासाठी पाण्याचा दीर्घ उपसा (पंपींग) व भूजल पुर्नभरण (ग्राऊंड वॉटर रिचार्ज) यांचा एकत्रित उपयोग केल्यास परिस्थिति सुधारणे शक्य आहे, असे दापूरा, काटी जिल्हा अकोला या गावात झालेल्या प्रयोगावरून निदर्शनास आले आहे. शिवाय क्षारयुक्त मातीतून सचैल स्थितित पाण्यावाटे क्षार निघून जातील व कालांतराने ती क्षार विरहीत होऊ शकते असेही प्रयोगामधे दिसून आले आहे.

पावसाचे क्षाररहीत पाणी जमिनीत जास्त झिरपवून त्याच प्रमाणात खाऱ्या पाण्याचा उपसा पावसाळ्यात करून नैसर्गिक नाल्यात सोडल्यास क्षाराचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होऊ शकेल.

या अनुषंगाने ज्या उपाययोजना प्रस्तावित आहेत त्या खालील प्रमाणे.

1. खाऱ्या भूजल प्रदेशात सर्वेक्षण करून खारे पाणी उपसण्यासाठी योग्य जागा निवडून त्या ठिकाणी कूपनलिका बांधणे. साधारणपणे जुलै ते ऑक्टोबर या काळात वरील कूपनलिकेव्दारे पाणी उपसून ते पूर्णा नदीला मिळणाऱ्या नैसर्गिक नाल्यांमध्ये सोडणे.
2. पूर्णा नदीवर योग्य जागा निवडून त्या ठिकाणी 4 ते 5 मीटर पाणी थोपवून धरू शकतील असे सव्दार बंधारे बांधून पावसाळ्यातील प्रवाह पावसाळ्याच्या उत्तरकाळात (सप्टेंबरमध्ये) अडवून धरणे व ते पाणी पंपाने वरील कूपनलिकेमध्ये सोडणे.
3. वरील 1 प्रमाणे उपसल्या जाणाऱ्या पाण्याचे नियमन करून पाण्याची प्रत तपासत रहाणे व जसजशी प्रत सुधारत जाईल त्या प्रमाणात त्याचा वापर जनतेसाठी खुला करणे.
4. अशारितीचा व्यापक भूक्षेत्रीय प्रकल्प अजून औपचारिकपणे तयार करण्यात आलेला नाही. पण आजवरच्या प्रयोगानंतर आता असा प्रकल्प तयार करणे इष्ट राहील. त्या बरोबरच त्या खाऱ्या

पट्टयाच्या विकासासाठी विविध प्रकारचे क्षार निःसारीकरणाचे संशोधन व इतर प्रयोगही चालू ठेवावे लागतील.

12.10 प्रत्येक खेडयात नैसर्गिक पाऊस अडविण्यासाठी एक किंवा अनेक तलाव बांधावे लागतील. हे पाणी मुख्यतः पिण्यासाठी वापरता येईल. तलावाच्या जवळ खालच्या बाजूला विहीर करून त्याचाच वापर व्हावा, तलावातून वापर होऊ नये, जेणेकरून पाण्याचे प्रदूषण होणार नाही. हया तळयांचे व्यवस्थापन गांवकऱ्याना करावे लागेल. अशी काही तळी ब्रिटीश व निझाम काळात बांधली गेली होती, तशा व्यवस्थेचा आता व्यापक प्रमाणात उपयोग करण्यासाठी एक स्वतंत्र भूक्षेत्रीय प्रकल्प पाणी-पुरवठयाच्या प्रयत्नांचा विशेष भाग म्हणून या उपखोऱ्यात हाती घेणे इष्ट राहील. पिण्याच्या पाण्यासाठी प्रादेशिक नळ योजने ऐवजी वैयक्तिक खेडे योजनाच सोईच्या होतील.

12.11 <u>या उपखोऱ्याचे एक वैशिष्टय म्हणजे शेतांना सध्या बांध नाहीत</u>, पण शेतकऱ्यांनी यापुढे गवती बांध बांधणे आवश्यक आहे. तरच जमिनीची धुप थांबेल व शेततळयांचा कार्यक्रम व्यवस्थितपणे राबवता येईल. शेततळयांचा विस्तृत कार्यक्रम या क्षार प्रदेशासाठी विशेष महत्वाचा आहे. कारण सिंचनाच्या अन्य पारंपारिक योजनांचा फारसा लाभ या क्षेत्राला मिळण्यासारखा नाही. जमिनीच्या हद्दीवर जैविक पट्टे सोडून देणे, त्याचे व्यवस्थापन करणे, व या पट्टयांवर गवत लावणे यालाही प्रोत्साहन द्यावे लागेल.

12.12 सद्यःस्थितितील पिकरचनेत कापूस व तूर (एकत्रित) चांगल्या रीतीने रूजलेली आहे व किफायतशिरही ठरली आहे. शिवाय कोरडवाहू बागायती उदा. आवळा,कवठ वगैरे झाडे ही आढळतात. याच निसर्गतः अनुकूल पिकांचा व वृक्षांचा या उपखोऱ्यात पाठपुरावा करावा लागेल. या भागात कापसाला मान्सुनोत्तर एखादे तुषार ओलीत दिल्यास हेक्टरी 30 क्विंटल कापूस सहज होईल त्यासाठीही शेततळयांचा विशेष उपयोग आहे.

12.13 हया उपखोऱ्याच्या उत्तरेला बराच डोंगराळ प्रदेश आहे. त्यामधून बरेचसे पाणी पूर्णेला येऊन मिळते. उत्तरेतील सातपुडा आणि पूर्णा यामध्ये सातपुडयाच्या पायथ्याशी तसेच पूर्णेच्या दक्षिण बाजूस साधारणतः 15 ते 25 किमी पट्टा खोल गाळाच्या जमिनीचा आहे. त्यामध्ये गोडे पाणी आढळते म्हणून सातपूडा पर्वताच्या पायथ्याशी जलसंधारण व जलभरण ही कामे विस्तृत प्रमाणात लाभदायक ठरतील. पाण्याच्या साठवणीमधून पाझर कालवे, काढून जलभरणाला गती देण्यास येथे पुष्कळ वाव आहे. या आधारावर विहिरींचे जाळे या पट्टयात उभारता येईल. अशा प्रकारे भूजल बळकटीसाठी उपाय योजना आवश्यक आहे. या उपखोऱ्याच्या सातपुडयाच्या पायथ्याचा भाग पुनर्भरणास फारच अनूकूल आहे.

12.14 हया उपखोऱ्यात परतवाडा, अचलपूर हयासारखी जुनी व्यापारी शहरे सातपुडयाच्या पायथ्याशी आहेत. त्यांच्याआधारे केळी, संत्रा, भाजीपाला व मिरची यावरील प्रक्रिया व मोठया संख्येत सुतगिरण्या या क्षेत्रात उभ्या करता येतील. तेथे मोठयां प्रमाणात लाकडाचे डेपो ही आहेत. पण हे सागवान बांधकाम व फर्निचरसाठी वापरले जाते. परंतु सागवानापासून विनियर बनविण्याचा कारखाना मात्र नाही. त्यामुळे स्थानिक उपज ही बाहेरील प्रदेशात (दिल्ली, मुंबई इत्यादी) पाठवावी लागते म्हणून या प्रदेशात सागवानावर प्रक्रिया करून कारखानदारीस वाव देता येईल. अंजनगांव व अकोट हया भागात एकेकाळी मोठया प्रमाणात नागवेलीची पाने व लेंडीपिंपळीचे उत्पादन होत होते. हा उद्योग मोठया प्रमाणात असल्याने त्यावर पुन्हा लक्ष केंद्रीत करण्याची गरज आहे. कारण सध्या ही उत्पादने कमी होत असून त्यामुळे परकीय चलनाची मिळकत कमी होत आहे.

12.15 उपखोऱ्यातील पर्जन्यमान वैशिष्टये व त्यानुसार नदी वाहण्याचा सध्याचा कालावधी, नदीतील प्रत्यक्ष प्रवाह व इतर माहिती खालील प्रमाणे आहे.

| अक्र | नदीचे नाव | नदी वाहण्याचा कालावधी (वर्षातील दिवस) |
|---|---|---|
| 1 | चंद्रभागा | 125 |
| 2 | पेढी | 200 |
| 3 | पूर्णा | 225 |
| 4 | मोरणा | 300 |
| 5 | मन | 130 |
| 6 | वाण | 100 |

12.16 काटेपूर्णा नदीवर 1975 साली धरण पूर्ण होऊन 1976 पासून सिंचन सुरू आहे. तेंव्हा पासून जास्तीत जास्त ओलीत रब्बी हंगामात झाले आहे. प्रकल्पाच्या नियोजनानुसार 68.98 दलघमी पाण्यापासून 8325 हेक्टर ओलीत प्रस्तावित आहे. प्रत्यक्षात 67.84 दलघमी (98.40 टक्के) पाणी वापरा पासून 4434 हेक्टर (52.36 टक्के) सिंचन झाले. त्यापैकी 2936 हेक्टर (66.20 टक्के) रब्बी हंगामात,1126 हेक्टर (25.40 टक्के) उन्हाळी आणि 372 हेक्टर (8.40 टक्के) खरीप हंगामातील आकडेवारी आहे. प्रकल्पीय पीक रचना खालील प्रमाणे प्रस्तावित आहे.

क्षेत्र- हेक्टर

| पीक | क्षेत्र | टक्केवारी |
|---|---|---|
| कापूस | 3247 | 39 |
| गहू | 2414 | 29 |
| भात | 1915 | 23 |
| मिरची | 583 | 7 |
| इतर पिके,बारमाही | 166 | 2 |

प्रत्यक्षात भात पिकाचा पेरा लाभक्षेत्रात होत नाही.

12.17 उपखोऱ्यातील खरीप हंगामातील पाण्याच्या बचतीमधून नव्या लहान योजनांचे नियोजन करता येईल. नलगंगा प्रकल्प जिल्हा बूलढाणा, काटेपूर्णा प्रकल्प जिल्हा अकोला या पूर्ण झालेल्या प्रकल्पांच्या लाभक्षेत्राचा अभ्यास आवश्यक आहे.

12.18 उपखोऱ्यात काळ्यामातीचे प्रमाण अधिक असल्याने हया मातीच्या वैशिष्टयामुळे उन्हाळ्यात मोठया भेगा पडतात. अशा भागात प्रवाही सिंचना ऐवजी उपसा सिंचनाद्वारे ठिबक व तूषार सिंचन अधिक लाभदायक ठरेल. त्यासाठी खाजगी उपसा सिंचन योजनांना प्राधान्य व अर्थिक सहाय्य द्यावे.

12.19 अमरावती जवळ नांदगाव पेठ येथे पंचतारांकीत औद्योगिक संकूल प्रस्तावित असून त्याचे काम प्रगतिपथावर आहे. या उपखोऱ्यात अकोला जिल्ह्यात पारस येथे औष्णीक विद्यूत केंद्र आहे त्याची क्षमता 250 मेवॅ आहे. त्याची पाण्याची गरज ही प्राथम्याने भागवावी लागते.

12.20 उपखोऱ्यात पूर्णा नदीच्या दोन्ही बाजूंना मोठया प्रमाणावर घळी निर्माण झाल्या आहेत व त्या वाढतच आहेत. या घळीच्या जमिनीच्या व्यवस्थापनाची व्यवस्था बसविण्याची गरज आहे.

मुख्यतः हे क्षेत्र फलोत्पादन कार्यक्रम व वनीकरण कार्यक्रमाखाली आणावे लागेल. ठिबक सिंचनावर फलोत्पादनाचा प्रकल्प यशस्वी झाला असून तो मोठ्या प्रमाणावर राबविण्याच्या दृष्टिने पाऊले टाकावी लागतील.

—000—

सारणी:10.1

**हवामानाचा तपशील**

पर्जन्य, बाष्पीभवन-मिमी

| अक्र | महिना | पर्जन्य | बाष्पीभवन | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | औरंगपूर | शिर्ला (नेमाने) | मनसगाव | सरासरी |
| 1 | जानेवारी | 8 | 174 | 162 | 108 | 148 |
| 2 | फेब्रूवारी | 7 | 143 | 206 | 140 | 163 |
| 3 | मार्च | 8 | 241 | 332 | 199 | 257 * |
| 4 | एप्रिल | 5 | 308 | 460 | 296 | 355 * |
| 5 | मे | 4 | 335 | 579 | 396 | 437 * |
| 6 | जून | 142 | 227 | 314 | 268 | 270 * |
| 7 | जुलै | 224 | 159 | 183 | 188 | 177 |
| 8 | ऑगस्ट | 214 | 153 | 149 | 125 | 142 |
| 9 | सप्टेंबर | 94 | 205 | 210 | 149 | 188 |
| 10 | ऑक्टोबर | 48 | 214 | 217 | 160 | 197 |
| 11 | नोव्हेंबर | 7 | 213 | 166 | 140 | 173 |
| 12 | डिसेंबर | 6 | 184 | 150 | 116 | 150 |
| | | 767 | | | | 2657 |

हंगाम निहाय बाष्पीभवन

| अक्र | हंगाम | बाष्पीभवन |
|---|---|---|
| 1 | खरीप | 605 |
| 2 | रब्बी | 733 |
| 3 | उन्हाळी | 1319 |
| | एकूण | 2657 |

* अत्यंतिक बाष्पीभवन

सारणी: 10.2

**पर्जन्यमापन केंद्रांचा तपशील**

पर्जन्यमान - मिमी

| अक्र | पर्जन्यमापन केंद्र | प्रकार | स्वामित्व | आधार सामुग्री उपलब्धतेचे प्रारंभिक वर्ष | वार्षिक सरासरी पर्जन्यमान |
|---|---|---|---|---|---|
| 1 | अमरावती | सा.प. | पा.खा. | 1976 | 982 |
| 2 | अंजनगाव | सा.प. | पा.खा. | 1985 | 672 |
| 3 | बोपापूर | सा.प. | पा.खा. | 1990 | 831 |
| 4 | दर्यापूर | सा.प. | पा.खा. | 1990 | 499 |
| 5 | देवगांव | सा.प. | पा.खा. | 1981 | 647 |
| 6 | औरंगपूर | स्व प | पा.खा. | 1990 | 632 |
| 7 | नांदुरा(धांडे) | सा.प. | पा.खा. | 1980 | 506 |
| 8 | भुगांव | सा.प. | पा.खा. | 1990 | 1430 |
| 9 | विश्रोळी | सा.प. | पा.खा. | 1981 | 837 |
| 10 | बामडोह | सा.प. | पा.खा. | 1990 | 530 |
| 11 | घाटलाडकी | सा.प. | पा.खा. | 1981 | 723 |
| 12 | अकोला | सा.प. | पा.खा. | 1989 | 779 |
| 13 | दोनद | सा.प. | पा.खा. | 1990 | 856 |
| 14 | गाडेगांव | सा.प. | पा.खा. | 1990 | 744 |
| 15 | गोपालखेड | सा.प. | पा.खा. | 1990 | 536 |
| 16 | लाखपूरी | सा.प. | पा.खा. | 1990 | 716 |
| 17 | पोपटखेड | सा.प. | पा.खा. | 1990 | 834 |
| 18 | टाकळीखेत्री | सा.प. | पा.खा. | 1984 | 556 |
| 19 | तुळजापूर | सा.प. | पा.खा. | 1990 | 830 |
| 20 | हिवरखेड | सा.प. | पा.खा. | 1990 | 703 |
| 21 | कवठा | सा.प. | पा.खा. | 1989 | 786 |
| 22 | अमडापूर | सा.प. | पा.खा. | 1980 | 670 |
| 23 | देऊळगांव (सा) | सा.प. | पा.खा. | 1990 | 770 |
| 24 | डिंडोला | सा.प. | पा.खा. | 1990 | 779 |
| 25 | लाखतवाडा | सा.प. | पा.खा. | 1979 | 727 |
| 26 | मनसगांव | स्व प | पा.खा. | 1985 | 741 |
| 27 | मोताळा | सा.प. | पा.खा. | 1990 | 684 |
| 28 | तांदुळवाडी | सा.प. | पा.खा. | 1990 | 632 |
| 29 | उमाळी | सा.प. | पा.खा. | 1985 | 707 |
| 30 | वसाळी | सा.प. | पा.खा. | 1985 | 816 |
| 31 | शिर्लानेमाने | स्व प | पा.खा. | 1983 | 733 |
| 32 | आकोट | सा.प. | पा.खा. | 1988 | 699 |
| 33 | सालवण | सा.प. | पा.खा. | 1988 | 934 |
| 34 | पलढग | सा.प. | पा.खा. | 1988 | 863 |
| 35 | वानरोड | सा.प. | पा.खा. | 1988 | 1089 |
| 36 | उमा मुर्तिजापूर | सा.प. | पा.खा. | 1988 | 1025 |

## सारणी: 10.3
## जलसंपत्तीची उपलब्धता

ठिकाण : विश्रोळी — येवा - दलघमी

| अक्र | वर्ष | वार्षिक येवा | उतरत्या क्रमाने वार्षिक येवा | संगत वर्ष | विश्वासाहेता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1976-77 | 199.89 | 440.82 | 1994-95 | |
| 2 | 1977-78 | 119.01 | 224.33 | 1984-85 | 10 |
| 3 | 1978-79 | 0.66 | 212.05 | 1979-80 | 20 |
| 4 | 1979-80 | 212.05 | 208.77 | 1990-91 | |
| 5 | 1980-81 | 47.58 | 199.89 | 1976-77 | |
| 6 | 1981-82 | 100.29 | 174.68 | 1988-89 | 30 |
| 7 | 1982-83 | 59.12 | 143.47 | 1991-92 | |
| 8 | 1983-84 | 19.4 | 119.01 | 1977-78 | |
| 9 | 1984-85 | 224.33 | 112.03 | 1995-96 | |
| 10 | 1985-86 | 99.17 | 109.65 | 1986-87 | 50 |
| 11 | 1986-87 | 109.65 | 100.29 | 1981-82 | |
| 12 | 1987-88 | 52.39 | 99.17 | 1985-86 | |
| 13 | 1988-89 | 174.68 | 94.39 | 1992-93 | |
| 14 | 1989-90 | 78.65 | 78.65 | 1989-90 | |
| 15 | 1990-91 | 208.77 | 59.12 | 1982-83 | 75 |
| 16 | 1991-92 | 143.47 | 52.39 | 1987-88 | |
| 17 | 1992-93 | 94.39 | 47.58 | 1980-81 | 90 |
| 19 | 1994-95 | 440.82 | 19.4 | 1983-84 | |
| 20 | 1995-96 | 112.03 | 0.66 | 1978-79 | |
| | सरासरी | 131.387 | | | |

$$\frac{10\ \%\ \text{उपलब्धता}}{90\ \%\ \text{उपलब्धता}} = 4.71$$

$$\frac{50\ \%\ \text{उपलब्धता}}{90\ \%\ \text{उपलब्धता}} = 2.30$$

$$\frac{50\ \%\ \text{उपलब्धता}}{75\ \%\ \text{उपलब्धता}} = 1.85$$

सारणी: 10.4

**प्रकल्पांची सद्यस्थिती**

चलपाणीसाठा - दलघमी

पाणीवापर - दलघमी

सिंचनक्षेत्र - हेक्टर

| अक्र | प्रकल्पाचा संवर्ग | पूर्ण झालेले प्रकल्प | | | | बांधकामाधीन प्रकल्प | | | | भविष्यकालीन प्रकल्प | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 1 | मोठे | नळगंगा | 69 | 69 | 8604 | वान | 84 | 84 | 19177 | जिगाव | 548 | 548 | 91800 | | 702 | 702 | 119581 |
| | | काटेपूर्णा | 96 | 96 | 8325 | | | | | | | | | | 96 | 96 | 8325 |
| | | 2 | 165 | 165 | 16929 | 1 | 84 | 84 | 19177 | 1 | 548 | 548 | 91800 | 4 | 798 | 798 | 127906 |
| 2 | मध्यम | ज्ञानगंगा | 44 | 44 | 4249 | चंद्रभागा | 84 | 84 | | सपन | 39 | 39 | 5720 | | 167 | 167 | 9969 |
| | | पलढग | 12 | 12 | 2415 | पूर्णा | 52 | 52 | 6732 | निम्नपूर्णा राजना क्र1 | 58 | 58 | 6846 | | 122 | 122 | 15993 |
| | | मस | 30 | 30 | 5874 | मन | 49 | 49 | 7530 | निम्नपूर्णा (शिगणापूर) | 52 | 52 | 6058 | | 131 | 131 | 19462 |
| | | निर्गुणा | 41 | 41 | 5836 | तोरना | 47 | 47 | 9287 | निम्नपूर्णा 2 (अम) | 264 | 264 | 30989 | | 352 | 352 | 46112 |
| | | मोर्णा | 53 | 53 | 5168 | उतावळी | 9 | 9 | 1428 | निम्न काटेपूर्णा | 54 | 54 | 6305 | | 116 | 116 | 12901 |
| | | उमा | 13 | 13 | 2241 | मोर्णा (टप्पा 2) | 29 | 29 | 5394 | कळमगंगा व उमा प्रकल्प | 58 | 58 | 6780 | | 99 | 99 | 14415 |
| | | शहानुर | 63 | 63 | 9330 | | | | | निम्न शहानूर | 35 | 35 | 4115 | | 98 | 98 | 13445 |
| | | | | | | | | | 1808 | पेढानदि प्रकल्प | 109 | 109 | 12770 | | 109 | 109 | 14578 |
| | | 7 | 255 | 255 | 35113 | 6 | 271 | 271 | 32179 | 8 | 668 | 668 | 79583 | 21 | 1194 | 1194 | 146875 |
| 3 | लघु (रा.स्तर) | 76 | 130 | 130 | 21412 | 22 | 58 | 58 | 10860 | 22 | 73 | 73 | 9160 | 120 | 261 | 261 | 41432 |
| 4 | लघु (स्था.स्तर) | 247 | 47 | 47 | 9514 | 60 | 9 | 9 | 2392 | 36 | 7 | 7 | 1758 | 343 | 64 | 64 | 13664 |
| | | 323 | 177 | 177 | 30926 | 82 | 67 | 67 | 13252 | 58 | 80 | 80 | 10918 | 463 | 324 | 324 | 55096 |
| | | 332 | 598 | 598 | 82968 | 89 | 422 | 422 | 64608 | 67 | 1297 | 1297 | 182301 | 488 | 2317 | 2317 | 329877 |

सारणी : 10.5

**जलसंपत्तीचा ताळेबंद**

जलसंपत्ती - दलघमी


| अक्र | उपलब्धता | | अक्र | वापर (सन2030) | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **भूपृष्ठावरील** | | 4 | **भूपृष्ठावरील** | |
| | अ) नैसर्गिक | | | अ) घरगुती वापरासाठी | |
| | 1) 75 टक्के विश्वासार्हतेने | 2162 | | 1) नागरी | 191 |
| | 2) 50 टक्के विश्वासार्हतेने | 2910 | | 2) ग्रामीण | 102 |
| | 3) सरासरीने | 2536 | | 3) पशूधन | 53 |
| | 4) नियोजनासाठी | 1506 | | एकूण | 346 |
| | ब) मानवप्रबंधित | | | ब) उद्योगधंदयासाठी | 710 |
| | 1) नागरी वापरातून पुनरुद्भव (80 %) | 153 | | एकूण सिंचनेतर वापर | 1056 |
| | 2) उद्योग धंदयातील पुनरुद्भव (97.5%) | 692 | 5 | इतर उपखोऱ्यात स्थलांतरीत पाणी | |
| | 3) इतर खोऱ्यातून संक्रमित झालेले पाणी | 707 | 6 | सिंचनासाठी उपलब्ध भूपृष्ठावरील पाणी | 2118 |
| | | | | (1506-1056+1552)+116) | |
| | एकूण (1 ब) | 1552 | | | |
| 2 | मानवनिर्मित | | | | |
| | लाभक्षेत्रातील पुनर्भरण (1506+707-1056) च्या10 % | 116 | | | |
| 3 | एकूण उपलब्धता (1506+1552+116) | 3174 | 7 | एकूण वापर (1056 + 2118) | 3174 |
| | 1) भूजल उपलब्धता (वार्षिक एकूण पुनर्भरण ) | 1768 | | अ) भूजलाचा सध्याचा सिंचनासाठी वापर | 382 |
| | 2) भूजल वापरास मुभा ( 1768 च्या 65 %) | 1149 | | | |


टीपा : 1) भूजल उपलब्धतेमूळे उपखोऱ्याच्या एकूण उपलब्धतेत वाढ होणार नाही ; भूजलाचा जेवढा उपसा होईल तेवढा नदी प्रवाह घटत जाईल म्हणून एकूण उपलब्धतेचा आकडा काढतांना भूजल उपलब्धतेचा विचार घेतलेला नाही.

2) संकलीत अंदाजासाठी सर्व पाण्याचा उपयोग भूपृष्ठावरील पाण्यातून दाखविला आहे. पण एकूण वापरापैकी अधिकाधिक 1149+116= 1265 भूजल माध्यमातून शक्य आहे.

3) पाणीवापराचे नियोजन उपलब्ध येवा मालिकेवर आधारित आहे.


नकाशा - 10.1




**• संदर्भ सूची •**

1. राज्य सरहद्द
2. जिल्हा सरहद्द
3. तालुका सरहद्द
4. उपखोरे सरहद्द
5. जिल्हा मुख्यालय
6. तालुका मुख्यालय
7. रेल्वे मार्ग
8. रस्ते
9. नद्या व नाले
10. समपर्जन्यमान रेषा (मिमी) 600
11. धरणाचे ठिकाण व बुडीत क्षेत्र — पूर्ण, बांधकामाधीन, भविष्यकालिन
12. औद्योगिक क्षेत्र
13. महानगरपालिका
14. नगर पालिका
15. आंतरखोरे पाणी स्थलांतराच्या योजना
    - कार्यरत
    - बांधकामाधीन

| उपखोऱ्याचे स्थान | उपखोरे क्र. | उपखोऱ्यांची नावे |
|---|---|---|
|  | 6 | पैन गंगा |
| | 7 | वर्धा |
| | 13 | मध्य तापी |



महाराष्ट्र जल व सिंचन आयोग

## पूर्णा (तापी) उपखोरे

जून 1999

# उपखोरे 11

# गिरणा

## 1.0 भौगोलिक तपशील

उपखोऱ्यात गिरणा ही मुख्य नदी असून ती नाशिक जिल्ह्यातील केमच्या डोंगरातून हतगड या गावाजवळ उगम पावते. दक्षिणेकडून तापीला मिळणारी ही सर्वात मोठी उपनदी 'मध्यतापी' (नकाशा 11.1) क्षेत्रात येते. गिरणा उपखोऱ्यामध्ये नाशिक,जळगांव व औरंगाबाद जिल्ह्यातील खालील तालूक्यांचे क्षेत्र येते.

**नाशिक** : 1)कळवण 2) बागलाण 3)मालेगाव 4)नांदगाव 5)चांदवड 6)सुरगाणा.

**जळगाव** : 1)जळगाव 2)चाळीसगाव 3)भडगाव 4)पाचोरा 5)एरंडोल 6)पारोळा 7)जामनेर.

**औरंगाबाद** : 1)कन्नड 2)सोयगांव 3)वैजापूर.

या उपखोऱ्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र 10195 चौकिमी आहे. या उपखोऱ्यात आराम, पुनंद, पांझण, मोसम, मन्याड, तितूर, अंजनी, हिवरा व बहुळा या उपनद्या आहेत. यातील आराम,पुनंद,मोसम या नद्यावर प्राचीन फडपध्दती आतापर्यन्त वेगवेगळया प्रकारांनी अजून आस्तित्वात आहे.शिवाय स्वातंत्र्यपूर्व काळातील जामदा धरणापासूनचे कालवे व स्वातंत्र्यानंतर दुसऱ्या पंचवार्षिक योजनेपासूनच हाती घेण्यात आलेला पांझण (गिरणा) हा मोठा सिंचन प्रकल्प याच उपखोऱ्यात असल्यामुळे या उपखोऱ्यातील उत्स्रोत क्षेत्रातील पाणीवापर नैसर्गिक क्षमतेपर्यन्त फार अगोदरच पोचलेला आहे. म्हणून गिरणा उपखोऱ्याच्या नियोजनाचा विचार तापीला दक्षिणेकडून मिळणाऱ्या इतर उपनद्यांच्या क्षेत्रापेक्षा वेगळा करणे आवश्यक आहे.

मुख्य नदी,तिच्या उपनद्या खालील प्रमाणे आहेत.

लांबी - किमी तलांक-मी

| अक्र | नदी | उपनदी | लांबी | उगमस्थान | | संगमस्थान | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ठिकाण | तलांक | ठिकाण | तलांक |
| 1 | गिरणा | | 265 | हातगड,ता.सुरगाणा | 900 | नांदेड ता.अमळनेर येथे तापीस | 142 |
| 2 | | आराम | 43.5 | साल्हेर किल्ल्याचा पायथा ता.सटाणा | 1100 | वसोळ ता.सटाणा गिरणेस | 500 |
| 3 | | पुनंद | 45.5 | उतमेमाळ | 980 | गिरणा नदीस जुनीवेज जवळ ता.सटाणा | 548 |
| 4 | | पांझण | 60 | राहूड ता.नांदगाव | 740 | गिरणा धरण | 380 |
| 5 | | मोसम | 84.5 | भीमकोट ता.नांदगाव | 800 | मालेगावचे खालचे बाजूस गिरणेस | 410 |
| 6 | | मन्याड | 68.5 | ता.नांदगाव | 485 | मनहुरणे ता.चाळीसगाव गिरणा नदीस | 340 |

लांबी - किमी तलाक-मी

| अक्र | नदी | उपनदी | लांबी | उगमस्थान | | संगमस्थान | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ठिकाण | तलाक | ठिकाण | तलाक |
| 7 | | तितूर | 59 | अजिंठा डोंगर | 760 | बागरूड ता.पाचोरा गिरणा नदीस | 255 |
| 8 | | अंजनी | 69 | ता.पारोळा | 280 | नांदेड ता.अंमळनेर गिरणेस | 170 |
| 9 | | हिवरा | 49 | अजिंठा डोंगरातून चिगट ता.पाचोरा | 800 | कमलापूरी ता.पाचोरा गिरणेस | 230 |
| 10 | | बहुळा | 45 | अजिंठाच्या . दारणा डोंगरातून नानेगाव ता.पाचोरा | 800 | हिवरा नदीस ता.पाचोरा | 235 |

1.1 विस्तार : या उपखोऱ्याचा क्षेत्रीय विस्तार अक्षांश 20° 9` ते 21° 11` उत्तर व रेखांश 73° 41` ते 75° 39` पूर्व यामध्ये आहे.

1.2 चतु:सीमा : उपखोऱ्याच्या चतु:सीमा बाबतची माहिती खालील प्रमाणे आहे.

| अक्र | दिशा | तपशील |
|---|---|---|
| 1 | उत्तर | तापी (दक्षिण) घटक क्र 13 आ व पांझरा उपखोरे क्र 12 |
| 2 | पूर्व | तापी दक्षिण घटक क्र 13 आ व पांझरा उपखोरे क्र 12 |
| 3 | पश्चिम | गुजरात |
| 4 | दक्षिण | ऊर्ध्व गोदावरी (मुळा व प्रवरा व्यतिरिक्त ) घटक क्षेत्र |

## 2.0 हवामान

साधारणत: 85 टक्के पाऊस नेऋत्य मोसमी वाऱ्यांमुळे जून ते सप्टेंबर या महिन्यात, 10 टक्के पाऊस ईशान्य मोसमी वाऱ्यापासून आक्टोबर ते डिसेंबर दरम्यान व 5 टक्के पाऊस डिसेंबर नंतर पडतो. उपखोऱ्याचे एकत्रित वार्षिक सरासरी पर्जन्यमान 673 मिमी आहे. या उपखोऱ्यातील हवामान विषयक इतर बाबी व पर्जन्यमानातील दोलायमानता इत्यादी खालील प्रमाणे आहे.

तपमान - अंश सें, पर्जन्यमान मिमी

| अक्र | वैशिष्ट्ये | परिमाण | महिना वर्ष | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1 | सर्वात अधिक पाऊस | 789 | सप्टेंबर 1989 | चाळीसगांव |
| 2 | सर्वात अधिक तपमान | 39 | मे 1995 | मालेगांव |
| 3 | सर्वात कमी तपमान | 9 | जानेवारी 1995 | मालेगांव |

कृषि हवामान वर्गीकरणानुसार या उपखोऱ्याचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

5-संक्रमण विभाग-2 करडया रंगाच्या जमिनीचा विभाग (TR-2), 6-अवर्षण (कमी पावसाचा) विभाग (SC) व 7- निश्चीत पावसाचा मुख्यत: खरीप पिकांचा विभाग (ARK).

पर्जन्यमानातील दोलायमानता गुणांक 30 ( तक्ता 2.5.8) आहे. अधिक दोलायमानाचे हे उपखोरे आहे,त्यामुळे त्यांतील पाण्याच्या उपयोगाचे नियोजन अतिशय कुशलतापूर्वक करावे लागणार आहे. पर्जन्यमानाचा माहवार तपशील सारणी 11.1 मध्ये दर्शविला आहे.जळगाव येथील 1901 ते 1989 पर्यंतच्या पर्जन्यमानाचा तपशील सारणी 11.2 मध्ये दिला आहे.

पर्जन्यमापन केंद्रांचा तपशील

पर्जन्य मिमी

| अक्र | केंद्राचे नाव | प्रकार | स्वामित्व | आधार सामुग्री उपलब्धीचा कालावधी | वार्षिक सरासरी पर्जन्य |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | चाळीसगाव | सा.प. | महसूल खाते | 1989 ते 1995 | 789 |
| 2 | पाचोरा | सा.प. | महसूल खाते | 1989 ते 1995 | 641 |
| 3 | भडगांव | सा.प. | महसूल खाते | 1989 ते 1995 | 571 |
| 4 | एरंडोल | सा.प. | महसूल खाते | 1989 ते 1995 | 738 |
| 5 | अंमळनेर | सा.प. | महसूल खाते | 1989 ते 1995 | 622 |
| 6 | कळवण | सा.प. | महसूल खाते | 1989 ते 1995 | 576 |
| 7 | बागलाण | सा.प. | महसूल खाते | 1989 ते 1995 | 820 |
| 8 | मालेगांव | सा.प. | महसूल खाते | 1989 ते 1995 | 624 |

2.1 बाष्पीभवन : या उपखोऱ्यातील सर्वाधिक बाष्पीभवन मे महिन्यात 400 मिमी तर सर्वात कमी बाष्पीभवन नोव्हेंबर व डिसेंबर या महिन्यात 110 मिमी होते. कोरडी हवा व जास्त तपमान यामुळे या उपखोऱ्यातील बाष्पीभवनाचे प्रमाण उर्वरीत महाराष्ट्राच्या मानाने फार जास्त आहे माहवार बाष्पीभवन सारणी 11.1 मध्ये दर्शविले आहे.

## 3.0 जलसंपत्तिची उपलब्धता

3.1 भूपृष्ठीय जलसंपत्ति : आधुनिक प्रणालीनुसार स्थायी स्वरुपाच्या सरितामापन केंद्रांचा विकास हा या उपखोऱ्यात तसा अलिकडचा आहे. अलिकडील काळातील या नव्या मोजणी प्रमाणे या उपखोऱ्यातील एकूण सरासरी येवा केवळ 1551 दलघमी आहे. वर्ष 1970-71 ते 1997-98 या अवधीतील गिरणा प्रकल्पस्थळीच्या विसर्गमापन आधारसामग्रीवर आधारभूत या उपखोऱ्यातील पाण्याची उपलब्धता खालीलप्रमाणे आहेः

| | |
|---|---|
| 75 टक्के विश्वासार्हतेने | 1097 दलघमी |
| 50 टक्के विश्वासार्हतेने | 1388 दलघमी. |

येवा मोजण्याची ठिकाणे व वेगवेगळ्या विश्वासार्हतेचा येवा याची काही मर्यादित माहितीच हाती आहे. या मोजणीत अवर्षणाची वर्षे आलेली नाहीत. त्यामुळे सरासरी उपलब्धी वास्तवात बरीच कमी रहाणार आहे. पांझण धरणाचे बांधकाम मात्र बऱ्याच वर्षापासून (स्वातंत्र्यानंतर लगेच) अन्वेषणाधीन होते. त्यानंतर पांझण धरणात येणाऱ्या येव्याची माहितीही (1970-71 ते 1997-98 या कालावधी करीता) उपलब्ध आहे. त्या सर्वाची नीट शास्त्रीय पध्दतीने छाननी होऊन उपखोऱ्याच्या वास्तव स्थितिचा नीट

हिशोब लावणे ताबडतोब आवश्यक आहे. गिरणा धरणस्थळी प्रत्यक्ष उपलब्ध जलनिष्पत्ती सारणी 11.3 मध्ये दर्शविली आहे.

3.2 भूशैलीय रचना

भुपृष्ठिय स्थिति (भूरूप वर्णन) :उपखोऱ्यातील भूभाग साधारण 19 टक्के अतिविच्छेदीत व डोंगराळ, 52 टक्के पठारी, 16 टक्के सपाट व 13 टक्के नदी लगतच्या गाळाचा आहे. यात भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेने निर्देशित केलेल्या 57 पाणलोट क्षेत्राचा समावेश आहे.

भुपष्ठीय शैलस्थिति : उपखोऱ्यात मुख्यत्वे लाव्हा थरांपासून तयार झालेला बहुस्तरीय दक्षिणी कातळाचा खडक (डेक्कन ट्रॅप प्रस्तर ) आढळतो. त्यावर अलिकडील काळात स्थानिक नद्यांच्या व त्यापूर्वीच्या काळात तापी नदीच्या काठावर भ्रंशामुळे तयार झालेला गाळाचा प्रदेश आढळतो. खोल गाळाचे पट्टे फक्त तापी नदीलगतच्याच पट्ट्यात असून त्याची जाडी 45 ते 350 मीटर आहे. तापी नदीच्या गाळात टोळ, वाळूचे प्रमाण जास्त असून त्याबरोबर माती व पोयटयाचा सुध्दा अंतर्भाव आहे.

बहुस्तरीय दक्षिणी कातळ खडकांत (डेक्कन ट्रॅप प्रस्तरात) भरीत-कुहरी बेसाल्टचे प्राबल्य आहे. भूजलांतील पाणी साठवणीसाठी हा प्रस्तर प्रकार फारसा अनुकूल नाही. त्याचप्रमाणे या प्रस्तरात शैलभित्ती (Dykes) सुध्दा आहेत.

3.3 भूजल संपत्ति : उपखोऱ्यात गाळाच्या पट्ट्यांबरोबर विघटीत झालेला बेसाल्ट प्रस्तर तेवढा भूजल उपलब्धतेच्या दृष्टीने महत्वाचा आहे. त्याच बरोबर भूरुपस्थितिवरही त्याचे प्रमाण अवलंबून आहे. त्यामुळे सर्वसाधारणपणे भूजल उपलब्धी अतिविच्छेदीत व डोंगराळ भागात कमी, पठारी भागात मध्यम आणि सपाट व गाळाच्या प्रदेशात अधिक असे प्रमाण आहे. गाळाच्या प्रदेशात भूजल उपलब्धीचे प्रमाण सर्वाधिक असून त्याचा वापर विहिरी व नलिकाकूप यांच्या मध्यमातून प्रामुख्याने नगदी पिकांसाठी (केळी) केला जात आहे. त्यामुळे उपसा मोठया प्रमाणावर होत असून पुनर्भरणाचे प्रमाण मर्यादीत असल्यामुळे भूजल पातळी दिवसेंदिवस खाली जात आहे. परिणामी विहिरींची जागा आता नलिकाकुपांनी घेतली असून त्यांची खोली देखील वाढतच जात आहे. त्यामुळे उपशाचा खर्च (विजेचा खर्च) सुध्दा वाढता आहे. गाळाचा प्रदेश भूजल पुनर्भरणासाठी सुध्दा खूप अनुकूल आहे. भूजलाची वाढती मागणी लक्षात घेता त्या भागात कृत्रिम पुनर्भरणाचे प्रकल्प (पाझर कालवे विहीर पुनर्भरण इ.) राबविणे गरजेचे आहे.

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या 1990 च्या भूजल अंदाजानुसार उपखोऱ्यात एकूण पुनर्भरण (सिंचन क्षेत्रातील भरीसकट) 1135 दलघमी असून सिंचना खालील विहिरींची संख्या 0.84 लक्ष आहे. या व्यतिरिक्त गाळाच्या प्रदेशातील नलिका कुपांची निश्चित संख्या मात्र कुठल्याही विभागाकडे उपलब्ध नाही. भूजलाच्या अतिउपशामुळे 8 लघुपाणलोट क्षेत्रे अतिविकसित (डार्क) व 5 पाणलोट क्षेत्र विकसित अवस्थेत आहेत. अतिविकसित तापू 35-1/4,2/4 तापू 51-2/3 तापू 60--अ3/3 तापू 37अ - 2/3 तापू 96-2/10-तापू 109-1/5,4/5 (तालुके चाळीसगाव, भडगाव, चांदवड, नांदगाव, मालेगाव).

विकसित तापू 28-अ, 59ब, 91, 108, 130, (तालुके:पाचोरा, चाळीसगाव, बागलाण, चांदवड, मालेगाव व कळवण). सद्यस्थितित गाळाच्या प्रदेशातील विहिरीद्वारे होणाऱ्या उपशावर नियंत्रण आणणे त्याच प्रमाणे भूजल व्यवस्थापनावर अधिक भर देणे गरजेचे आहे.

3.4 अवर्षणप्रवण क्षेत्र : या उपखोऱ्याचे क्षेत्र 16 तालूक्यात पसरलेले आहे त्यापैकी 9 तालूके सुकथनकर समितीच्या अहवालानंतर शासनाने अवर्षणप्रवण घोषित केले आहेत. त्यांचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

लोकसंख्या - हजारात,पर्जन्यमान-मिमी, क्षेत्रफळ-चौकिमी

| अक्र | जिल्हा | तालुका | वार्षिक सरासरी पर्जन्यमान | क्षेत्रफळ | लोकसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| 1 | नाशिक | कळवण | 576 | 1195 | 199 |
| 2 | | बागलाण | 920 | 1616 | 296 |
| 3 | | मालेगांव | 624 | 1938 | 672 |
| 4 | | नांदगांव | उ.ना. | 1092 | 203 |
| 5 | जळगांव | चाळीसगांव | 789 | 1257 | 229 |
| 6 | | भडगांव | 571 | 484 | 128 |
| 7 | | पाचोरा | 641 | 796 | 227 |
| 8 | | एरंडोल | 738 | 1004 | 269 |
| 9 | | अमळनेर | 622 | 829 | 262 |

## 4.0 जमिनीचा तपशील

या उपखोऱ्यातील जमिनीची उत्पादन क्षमता एकंदरीने चांगली आहे. जमिनीचे वर्गिकरण खालील प्रमाणे आहे.

| अक्र | तपशील | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | तांबूस तपकिरी डोंगर उतारावरील जमीन (बेसॉल्ट) | 5 |
| 2 | भरड उथळ जमीन | 40 |
| 3 | मध्यम काळी जमीन | 35 |
| 4 | खोल काळी जमीन | 20 |

## 5.0 जमिनीचा वापर

लागवडीयोग्य क्षेत्र, वनखात्याच्या ताब्यातील क्षेत्र, पडिक क्षेत्र इत्यादी पूढील प्रमाणे आहे.

क्षेत्र - हजार हेक्टर

| अक्र | तपशील | क्षेत्र | भौगोलीक क्षेत्राशी टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | भौगोलिक क्षेत्र | 1019 | |
| 2 | वनखात्याच्या ताब्यातील क्षेत्र | 180 | 17.6 |
| 3 | पेरणीसाठी उपलब्ध नसलेले क्षेत्र | | |
| | अ) ओसाड जमीन | 93 | 9.1 |
| | ब) बिगर शेती उपयोगाकरिता आणलेली जमीन | 15 | 1.5 |
| 4 | मशागत योग्य पडिक जमीन | 10 | 1.0 |
| 5 | कायमची कुरणे व चराऊ कुरणे | 27 | 2.6 |
| 6 | किरकोळ झाडे झुडपे यांच्या समुहाखालील क्षेत्र | 2 | 0.2 |
| 7 | चालू पडिक जमीन | 25 | 2.5 |
| 8 | इतर पडीक जमीन | 15 | 1.5 |
| 9 | पेरणीचे निव्वळ क्षेत्र | 652 | 64 |
| 10 | लागवडीयोग्य क्षेत्र (4+5+6+7+8+9) | 731 | 72 |
| 11 | दुसोटा क्षेत्र | 140 | – |
| 12 | पिकाखालील एकूण क्षेत्र (9+11) | 792 | – |
| 13 | पीक घनता (12÷9×100) | 121 | – |

**6.0 लोकसंख्या व पशुधन**

6.1 <u>लोकसंख्या</u> : सन 1991 च्या जनगणनेनूसार या उपखोऱ्यातील एकूण लोकसंख्या 26.78 लक्ष आहे. उपखोऱ्यात सन 2030 पर्यन्त होणारी लोकसंख्येतील वाढ ,लोकसंख्या घनता इत्यादी पुढील प्रमाणे अपेक्षित आहे.

लोकसंख्या-हजारात,घनता- प्रति चौकिमी

| अक्र | लोकसंख्या तपशील | वर्ष | |
|---|---|---|---|
| | | 1991 | 2030 |
| 1 | नागरी | 905 | 2440 |
| 2 | ग्रामीण | 1773 | 3546 |
| 3 | एकूण : | 2678 | 5986 |
| 4 | लोकसंख्या घनता | 262 | 587 |
| 5 | ग्रामीण लोकसंख्या घनता | 174 | 348 |

6.2 पशुधन : सन 1992 च्या मोजणीनूसार या उपखोऱ्यात एकूण पशुधन 14.73 लक्ष आहे, तपशील खालील प्रमाणे आहे.

| म्हैस व रेडे | एक खूरी व उंट | गाय व बैल | डूकरे | शेळी-मेंढी | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| 209436 | 4969 | 674724 | 16166 | 568070 | 1473365 |

6.3 इतर तपशील : या उपखोऱ्यात नाशिक जिल्ह्यातील 1)मालेगांव 2)नांदगाव 3)बागलाण 4)कळवण व जळगांव जिल्ह्यातील 1)जळगांव 2)चाळीसगांव 3)एरंडोल 4)पाचोरा अशा एकूण आठ नगरपालिका आहेत. या उपखोऱ्यातील शेत मजुरांची संख्या 9.21 लक्ष आहे तर इतर मजुरांची संख्या 6.50 लक्ष आहे.

## 7.0 पाणीवापर

7.1 सिंचनासाठी वापर : उपखोऱ्यातील वर्गनिहाय प्रकल्प म्हणजे मोठे ,मध्यम, बृहतलघु, लघु प्रकल्प, स्थानिकस्तर यांची संख्या, पाणीसाठा, पाणी वापर, सिंचन क्षेत्र यांची तसेच पूर्ण झालेले, प्रगतिप्रगतिपथावरील व भविष्यकालीन प्रकल्प यांची तपशीलवार माहिती सारणी 11.4 मध्ये दिली आहे. पूर्ण झालेल्या प्रकल्पांची सिंचन क्षमता 107054 हेक्टर असून त्यातील प्रस्तावित पाणी वापर 913 दलघमी आहे. सिंचनासाठी आणखी 46822 हेक्टर क्षेत्र उपलब्ध होऊ शकते पण त्यासाठी सध्याच्या पाणी वापर पध्दती प्रमाणे आणखी पाणी 267 दलघमी लागेल. ते मिळण्याचे स्रोत फार कमी उपलब्ध असल्यामुळे उपलब्ध मर्यादीत पाण्याचा अधिकाधिक उत्तम वापर करण्यावर या उपखोऱ्यांत मुख्य भर द्यावा लागेल.

7.2 सिंचनेतर पाण्याचा वापर : या उपखोऱ्यातील सिंचनेतर उपयोगासाठी सध्याची गरज 115 दलघमी आहे. सन 2030 पर्यन्तची ती 258 दलघमी होईल. यात उद्योगिकरणासाठी लागणाऱ्या 25 दलघमी पाण्याचा समावेश आहे. या पाण्याचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

पाणी-दलघमी

| अक्र | तपशील | वर्ष | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1991 | | | | 2030 |
| | | नागरी | ग्रामिण | पशुधन | एकूण | |
| 1 | घरगुती वापरासाठी | 43 | 36 | 28 | 107 | 233 |
| 2 | उद्योगासाठी | | | | 8 | 25 |
| | एकूण | | | | 115 | 258 |

7.3 जलसंपत्तिचा ताळेबंद : एकूण (भूपृष्ठावरील व भूपृष्ठाखालील), आणि घरगुती वापरासाठी व सिंचनासाठी पाणी वापर व त्यातून होणारा पुनरुद्भव याचा ताळेबंद सारणी11.5 मध्ये दिला आहे.

7.4 लाभक्षेत्र विकास : सद्यःस्थिति पुढील प्रमाणे आहे.

क्षेत्र -हजार हेक्टर

| भूविकास (शेतचाऱ्या इ) कामे | | | भूविकास(सपाटीकरण इ) कामे | | | प्रकल्पाच्या लाभक्षेत्रा |
|---|---|---|---|---|---|---|
| लाक्षेविप्रा कडील प्रकल्प | लाक्षेविप्रा बाहेरील प्रकल्प | एकूण | लाक्षेविप्रा कडील प्रकल्प | लाक्षेविप्रा बाहेरील प्रकल्प | एकूण | व्यतिरिक्त अन्य क्षेत्रात झालेले जमीन सपाटी करणाचे (भाग-2)* क्षेत्र |
| 98.83 | 28.98 | 127.81 | 85.69 | 19.79 | 107.48 | 10.98 |

7.5 <u>सन 1970 पूर्वीची धरणे</u> : सन 1970 पूर्वी पूर्ण झालेले दोन प्रमुख प्रकल्प या उपखोऱ्यात आहेत.

| अक्र | प्रकल्पाचे नांव | पूर्ण झाल्याचे वर्ष |
|---|---|---|
| 1 | गिरणा प्रकल्प | 1969 |
| 2 | चणकापूर प्रकल्प | 1947 पूर्वी |

या उपखोऱ्यात मोसम नदीवर नदीपात्रात बंधारे बांधून नदीकाठची जमीन फड पध्दतीने सिंचित करीत.अशा प्रकारचे फड बंधारे हे या उपखोऱ्याचे (पांझरा उपखोऱ्या प्रमाणेच) एक वेगळे वैशिष्ट्य आहे.

## 8.0 पीक रचना

उपखोऱ्यातील एकूण पेरणी खालचे क्षेत्र 6.52 लक्ष हेक्टर आहे.उपखोऱ्यातील जमीन व हवामान पूढील पिकास अनुकूल आहे. 1) बाजरी 2) खरीप ज्वारी 3) कापूस 4) गहू 5) हरभरा 6) कांदा 7) भाजीपाला 8) द्राक्षे 9) डाळींब 10) पेरू 11) मोसंबी 12) लिंबू 13) केळी. कांही प्रमुख पिकाची दरहेक्टरी सरासरी उत्पादकता खालील प्रमाणे आहे.

उत्पादकता-क्विंटल/हेक्टर

| अक्र | प्रमुख पिके | उत्पादकता |
|---|---|---|
| 1 | बाजरी. | 8.56 |
| 2 | खरीप ज्वारी | 19.30 |
| 3 | कापूस | 2.08 |

टीप : कापसाचे उत्पादन गाठीत दर्शविले आहे.

## 9.0 उद्योगधंदे

या उपखोऱ्यातील प्रमुख कृषि आधारित उद्योगधंद्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| साखर कारखाने | 4 |
| सूतगिरण्या | 3 |

## 10.0 जलविद्युत निर्मिति

या उपखोऱ्यामध्ये खालील प्रकल्पांवर जल उर्जा निर्मिति करण्याचा प्रस्ताव आहे.

क्षमता -मेवॅ

| अक्र | प्रकल्पाचे नांव | क्षमता |
|---|---|---|
| 1 | गिरणा प्रकल्प | 1 |
| 2 | पुनंद प्रकल्प | 0.4 |

**11.0 दळणवळणाची साधने**

या उपखोऱ्यातून मुंबई-दिल्ली व मुंबई–नागपूर, सुरत भुसावळ हे रेल्वेमार्ग आहेत. मुंबई-आग्रा हा राष्ट्रीय महामार्ग क्र 3 या उपखोऱ्यातून जातो. तसेच धुळे-कलकत्ता हा राष्ट्रीय महामार्ग क्र 6 या उपखोऱ्यातून जातो.

**12.0 भावी नियोजनाची दिशा**

12.1 पाण्याची उपलब्धता व वापर : गिरणा उपखोऱ्यामध्ये पाण्याची वार्षिक सरासरी उपलब्धी 1551 दलघमी आहे. अय्यंगार समितीच्या शिफारसीनुसार महाराष्ट्र व मध्यप्रदेश राज्यांना तापी खोऱ्यात मिळालेल्या हिश्श्यापैकी 921 दलघमी इतकी वापरास उपलब्धी या उपखोऱ्यासाठी निर्धारित केली आहे. कोणतेही आंतरखोरे स्थलांतर या उपखोऱ्याच्या बाबतीत प्रस्तावित नाही वा कार्यरत नाहीत.
पाणी वापराची सद्यःस्थिति :सन1996 पर्यन्त बांधून झालेले 2 मोठे, 5 मध्यम व 57 लघु प्रकल्प आहेत. या प्रकल्पांच्या माध्यमातून 585 दलघमी पाणीसाठा निर्माण झालेला आहे. पूर्ण झालेला पाणीवापर 913 दलघमी तर 2030 अखेर उपयोग निश्चित झालेले पाणी 1180 दलघमी असेल.

आयोगाने पश्चिमवाहिनी नद्यांचे पाणी पूर्ववाहिनी गोदावरीत व तापी खोऱ्यातील गिरणा उपखोऱ्यात वळविण्याच्या संभाव्य योजनांचा अभ्यास केला. नार या पार पश्चिम वाहिनी नदीच्या उपनदीतून उपसा सिंचनाद्वारे गिरणा उपखोऱ्यात चिराई (1.54 दलघमी), राशा (0.60 दलघमी) व आरासपाडा (1.41 दलघमी) या योजना आणि पार मधून हरणटेकडी (1.32 दलघमी) या योजनांचा आर्थिक व तांत्रिक अभ्यास होणे आवश्यक आहे.

12.2 या उपखोऱ्यातील येव्याच्या मोजणीची व्यवस्था अगदी अलीकडेच (1989 मध्ये) बसलेली दिसते. त्यामुळे 1989-95 या वर्षाचीच माहिती आयोगास प्राप्त झाली.

या उपखोऱ्यातील पावसाची सलग माहिती उपलब्ध आहे. त्यावरून येव्यामध्येही तीव्र दोलायमानता असणार आहे हे स्पष्ट झाले आहे. केवळ पावसाची दोलायमानता पाहता 90 % उपलब्धता व 10 % उपलब्धता यांचा गुणक 0.47 तर 75 % उपलब्धता व 50 % उपलब्धता यांचा गुणक 0.82 आहे. भूपृष्ठीय प्रवाहांचे हे दोलायमानता गुणक आणखी मोठे असणार आहेत म्हणून 50 % हूनही कमी उपलब्धतेच्या पाण्याच्या वापराचाही विचार अनुकूल पाण्याच्या वर्षासाठी या उपखोऱ्यात होणे आवश्यक राहील. या चांगल्या वर्षाच्या पाण्याच्या उपलब्धतेचे समृध्दीत रुपांतर करता यायला हवे, या दृष्टीने उपखोऱ्याच्या पाण्याचे संपूर्ण फेरनियोजन तात्काळ हाती घेतले जाणे आवश्यक आहे.

आर्थिक लाभव्ययाच्या प्रमाणाची मर्यादा जिथपर्यन्त परवानगी देईल, तिथपर्यन्त कमी विश्वासार्हतेचे (सरासरी पेक्षाही कमी) पाणी वापरणे (वापरावरील मर्यादेच्या अधीन राहून) हितावह रहाणार आहे. पाण्याच्या साठवणीचा या दृष्टीने फेरविचार व्हायला हवा. पूरक साठवणी वाढवून पावसाच्या चांगल्या वर्षातील पाणीवापर वाढवायची सोय निर्माण करणे इष्ट राहील. शिवाय पूरपातळीवर पाझर कालवे काढून भूजलाचे साठे वाढविणे, कालव्यावरील मोठया सी.डी.वर्क्सच्या ठिकाणी नाल्यावर (जलसेतु इ.) मार्गस्थ पाणीसाठे (enroute reservoirs) निर्माण करणे, नदीपात्रात

बंधारे बांधून ओळीने साठे निर्माण करणे इ.चा या संदर्भात तपशीलवार अभ्यास करण्याची गरज आहे.

सरासरीने केवळ 1551 दलघमी पाणी उपलब्ध असलेल्या या उपखोऱ्यातील तुटीची अंशतः भरपाई करण्यासाठी पार दमणगंगा नदी खोऱ्यांचा स्थानिक गरजांसाठी यथोचित उपयोग झाल्यानंतरच उरणारे अतिरिक्त पाणी गिरणा उपखोऱ्यात वळविण्याचा विचार आर्थिक निकषाद्वारे करावा.

बाजारपेठांची उपलब्धता आणि साखर कारखान्याच्या माध्यमातून प्रक्रिया केंद्राची व्यवस्था यामुळे ऊस या पिकांची या उपखोऱ्यात विस्तृत वाढ झालेली आहे. उपखोऱ्यातील पाण्याच्या तुटीचा विचार करून ऊस पिकास प्रोत्साहन देणे या पुढे या उपखोऱ्यात हितावह राहणार नाही. विद्यमान कारखान्यांची ऊसाची गरज भागविण्यासाठी व ऊस क्षेत्राची उत्पादकता वाढविण्यासाठी (क्षेत्र न वाढविता) ठिबक सारख्या सिंचन पध्दतीचा वापर या उपखोऱ्यात सर्वत्र अनिवार्य करणे आवश्यक आहे. तरच पाण्याची बचत होऊ शकेल.

12.3 या उपखोऱ्यातील गिरणा नदीच्या आराम, पुनंद, पांझण, मोसम, हिवरा, बहुळा या उपनद्यांची मर्यादित लांबी पण प्रवाह पात्राचा उतार मात्र 300 हून अधिक मीटर ही भूपृष्ठीय स्थिति जलविद्युत निर्मितिस आकर्षक आहे. त्या दृष्टीने या उपनद्यांच्या जलविद्युत क्षमतेचा विकास करण्याचा विचार होणे इष्ट राहील.

12.4 या उपखोऱ्यात गिरणा व तिच्या उपनद्याच्या पाण्यावर अवलंबून राहणाऱ्या जळगाव, चाळीसगाव, मालेगाव, कळवण, बागलाण, पाचोरा, नांदगाव इ.नगरपालिका आहेत. या नागरी भागांचे सांडपाणी प्रक्रियेविना नद्यामध्ये सोडले जाते आहे. त्यामुळे या नद्यांचे पाणी प्रदूषित होत आहे. या तुटीच्या उपखोऱ्यात हे सर्व पाणी शुध्द होऊन त्याचा स्थानिक उपयोगांसाठी पुनर्वापर करणे अतिशय निकडीचे आहे. म्हणून या दृष्टीने नियोजन प्रोत्साहनपर कारवाई येत्या दहा वर्षात पूर्ण होणे हितावह राहिल. खोऱ्याबाहेरचे पाणी आणावयाच्या खर्चापेक्षा पुनर्वापरातून पाण्याचा स्थानिक वापर वाढवणे बरेच कमी खर्चाचे राहिल.

12.5 या उपखोऱ्यातील 9 तालुके अवर्षणप्रवण आहेत, म्हणून त्यात रूढ असलेली भाजीपाला, फळे अशी सर्वच मूल्यदायी पिके पाण्याची यापुढे वाढती काटकसर करण्याच्या दृष्टीकोनातून दृतगतीने ठिबक, तुषार आणि पॉलीहाऊसेस या आधुनिक पध्दतीकडे घेवून जाणे आवश्यक आहे. त्यासाठी स्वतंत्र प्रोत्साहन कार्यक्रम हाती घेण्याची गरज आहे. ऊसापासूनही दूर जाऊन राष्ट्रीय व जागतिक बाजारपेठेशी अनुकूल अशी नवी पिकरचना पुढील 20 वर्षात विकसित करणे इष्ट राहिल.

12.6 उपखोऱ्यात मोसम नदीवर 300 ते 400 वर्षापूर्वीपासूनचे प्राचीन बंधारे बांधून गिरणा व मोसम या बारमाही वाहणाऱ्या नदीतील पाणी वळवून नदीकाठची जमीन फड पध्दतीने सिंचित करण्याची पाणी वाटपाची न्याय्य पध्दत या उपखोऱ्यात रूजलेली आहे. पण ही व्यवस्था आता मोडकळीस येऊ लागली आहे. लोकांच्या सहभागातून सिंचन व्यवस्था राबविण्याची मानसिकता परंपरेपासून या उपखोऱ्यात रूजलेली आहे. याचा फायदा आता पाणी वापर संस्थांचे जाळे निर्माण करून घनमापन पध्दतीने पाणी वापर करून शासन नियंत्रित सिंचन व्यवस्था लोकनियंत्रित करण्याची प्रक्रिया या उपखोऱ्यात लवकर पूर्णत्वास नेणे शक्य व्हावे त्या दृष्टीने गिरणा उपखोऱ्यातील ऊर्ध्व क्षेत्रातील बंधाऱ्यांवरील सिंचनाचे नियोजन नव्याने बसविले जाणे आवश्यक आहे.

---000---

सारणी : 11.1

**उपखोऱ्याच्या भौगोलिक प्रदेशाचा**
**एकत्रित हवामानाचा तपशील**

पर्जन्यमान, बाष्पीभवन-मिमी

| अक्र | महिना | पर्जन्यमान | बाष्पीभवन |
|---|---|---|---|
| 1 | जानेवारी | 2 | 140 |
| 2 | फेब्रूवारी | 0 | 190 |
| 3 | मार्च | 9 | 260 * |
| 4 | एप्रिल | 1 | 330 * |
| 5 | मे | 20 | 400 * |
| 6 | जून | 116 | 340 * |
| 7 | जुलै | 166 | 220 |
| 8 | ऑगस्ट | 154 | 180 |
| 9 | सप्टेंबर | 132 | 190 |
| 10 | ऑक्टोबर | 63 | 160 |
| 11 | नोव्हेंबर | 5 | 110 |
| 12 | डिसेंबर | 5 | 110 |
| | एकूण | 673 | 2630 |

हंगाम निहाय बाष्पीभवन

| अक्र | हंगाम | बाष्पीभवन |
|---|---|---|
| 1 | खरिप | 670 |
| 2 | रब्बी | 630 |
| 3 | उन्हाळी | 1330 |
| | एकूण | 2630 |

* आत्यंतिक बाष्पीभवन

सारणी: 11.2

**पर्जन्यमानातील दोलायमानता**

केंद्र: जळगाव

पर्जन्यमान-मिमी

| अक्र | वर्ष | पर्जन्यमान | पर्जन्य दिवस | उतरत्या क्रमाने पर्जन्यमान | संगत वर्ष | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | 1901 | 779 | 44 | 1352 | 1931 | |
| 2 | 1902 | 602 | 41 | 1254 | 1934 | |
| 3 | 1903 | 834 | 53 | 1174 | 1938 | |
| 4 | 1904 | 766 | 37 | 1139 | 1959 | |
| 5 | 1905 | 627 | 25 | 1131 | 1949 | |
| 6 | 1906 | 819 | 41 | 1075 | 1933 | |
| अक्र | घटक | नगरपालीकांची नावे |
|---|---|---|
| 1 | 13 अ(सातपूडा) | 1) तळोदा 2) शहादा 3) शिरपूर 4) चोपडा 5) यावल 6) फैजपूर 7) सावदा 8) रावेर |
| 2 | 13 आ (दक्षिण) | 1) नवापूर 2) नंदूरबार 3) दोंडाईचा 4) अमळनेर 5) पारोळा 6) भूसावळ 7)वरणगाव |

या उपखोऱ्यातील शेत मजूर व इतर मजूरांची संख्या खालील प्रमाणे आहे.

| अक्र | घटक | शेत मजूर | इतर मजूर |
|---|---|---|---|
| 1 | 13 अ (सातपूडा) | 639810 | 73540 |
| 2 | 13 आ (दक्षिण) | 637309 | 48886 |

## 7.0 पाणीवापर

7.1 सिंचनासाठी वापर : उपखोऱ्यातील वर्गनिहाय प्रकल्प म्हणजे मोठे, मध्यम, बृहतलघु, लघु, स्थानिक स्तर यांची संख्या, पाणीसाठा, पाणीवापर, सिंचनक्षेत्र यांची तसेच पूर्ण झालेले, प्रगतिपथावरील व भविष्यकालीन प्रकल्प यांचा तपशील सारणी 13.7 मध्ये दर्शविला आहे. पूर्ण झालेल्या प्रकल्पांची निर्मित सिंचनक्षमता 132973 हेक्टर असून त्यातील प्रस्तावित पाणीवापर 1050 दलघमी आहे. सिंचनासाठी आणखी 249765 हेक्टर क्षेत्र उपलब्ध होऊ शकते पण त्यासाठी सध्याच्या पाणीवापर पध्दती प्रमाणे पाणी 2289 दलघमी पाणी लागेल. पाण्याच्या तुटवड्यामुळे एवढे सर्व क्षेत्र परंपरागत पध्दतीच्या सिंचनतंत्रांनी विकसित करता येणार नाही. म्हणून भूजल विकास व पाणलोटक्षेत्र विकास या संकल्पनांच्या आधारे या उपखोऱ्यातील सिंचित क्षेत्र वाढविण्यावर भर द्यावा लागेल.

7.2 <u>सिंचनेतर पाण्याची गरज</u> : सिंचनेतर उपयोगासाठी या उपखोऱ्यातील सध्याची गरज 184 दलघमी आहे. सन 2030 पर्यन्तची ती 454 दलघमी होईल. या गरजांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

पाण्याची गरज -दलघमी

| अक्र | तपशील | 1991 | | 2030 | |
|---|---|---|---|---|---|
| | | 13अ | 13 आ | 13 अ | 13 आ |
| 1 | घरगुती वापरासाठी | 64 | 81 | 117 | 145 |
| 2 | उद्योगासाठी | 12 | 27 | 13 | 179 |
| | एकूण | 76 | 108 | 130 | 324 |

घरगुती वापरासाठीच्या पाण्याचा (1991) तपशील खालील प्रमाणे आहे.

| घटक | नागरी | ग्रामीण | पशूधन | एकूण |
|---|---|---|---|---|
| 13 अ उत्तर सातपुडा | 9 | 32 | 21 | 62 |
| 13 आ | 19 | .36 | 26 | 81 |

7.3 जलसंपत्तिचा ताळेबंद : एकूण (भूपृष्ठावरील व भूपृष्ठाखालील) आणि घरगूती वापरासाठी व सिंचनासाठी पाणीवापर, यातून होणारा पुनरुद्भव याचा ताळेबंद सारणी 13.8 मध्ये दिला आहे. तिन्ही घटकक्षेत्रांची पाण्याच्या उपलब्धतेची स्थिति खालीलप्रमाणे आहे.

येवा, भूजल उपलब्धी-दलघमी, दरडोई, दरहेक्टरी उपलब्धता-घमी

| घटक क्षेत्र | नैसर्गिक 50 टक्के येवा | भूजल उपलब्धी धरणानंतरच्या क्षेत्राची | एकूण | दरडोई उपलब्धता (1991) | दर हेक्टरी उपलब्धता |
|---|---|---|---|---|---|
| मध्यतापी (सातपुडा) | 3278 | 493 | 3771 | 1569 | 4091 |
| मध्यतापी (दक्षिण) | 1671 | 621 | 2292 | 740 | 2241 |

7.4 <u>लाभक्षेत्र विकास</u> : सद्यःस्थिति खालील प्रमाणे आहे.

क्षेत्र -हजार हेक्टर

| भूविकास भाग-1ची(शेतचाऱ्या इ) कामे | | | भूविकास भाग-2 ची(सपाटीकरण इ) कामे | | | प्रकल्पाच्या लाभक्षेत्रा व्यतिरिक्त अन्य क्षेत्रात-झालेले जमीन सपाटी -करणाचे (भाग 2) क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|
| लाक्षेविप्रा कडील प्रकल्प | लाक्षेविप्रा बाहेरील प्रकल्प | एकूण | लाक्षेविप्रा कडील प्रकल्प | लाक्षेविप्रा बाहेरील प्रकल्प | एकूण | |
| 13 अ उत्तर सातपुडा | | | | | | |
| 20.29 | 25.21 | 45.50 | 4.60 | 21.75 | 26.35 | 3.67 |
| 13 आ मध्यतापी दक्षिण | | | | | | |
| - | 16.28 | 16.28 | - | 12.63 | 12.63 | 6.13 |

7.5 <u>सन 1970 पूर्वीची धरणे</u> : उपखोऱ्यात सन 1970 पूर्वी पूर्ण झालेले प्रमूख प्रकल्प खालील प्रमाणे आहेत.

13 अ : खारी लघु प्रकल्प 1968

13 आ कनोली बृहत लघु प्रकल्प

वरील प्रकल्पांमध्ये फड सिंचन पध्दतीद्वारे सिंचन केले जात होते.

## 8.0 पीकरचना

उपखोऱ्यातील एकूण पेरणीखालचे क्षेत्र 12.97 लक्ष हेक्टर आहे. उपखोऱ्यातील जमीन व हवामान पुढील पिकांस अनुकूल आहे.

1) खरीप ज्वारी 2) बाजरी 3) कापूस 4) हरभरा 5) उन्हाळी भूईमुग 6) खरीप तीळ

घटक निहाय पिकाची सरासरी उत्पादकता खालील प्रमाणे आहे.

उत्पादकता - क्विं/हेक्टर

| घटक | प्रमुख पिके | उत्पादकता |
|---|---|---|
| 13 अ | खरीप ज्वारी | 16.80 |
| | कापूस | 1.71 |
| 13 आ | बाजरी | 9.42 |
| | खरीप ज्वारी | 17.86 |
| | कापूस | 1.06 |

## 9.0 उद्योगधंदे

या उपखोऱ्यात सध्या 10 कृषि आधारित उद्योग आहेत. त्यापैकी 13 अ मध्ये 6 उर्वरीत 4, 13 आ मध्ये आहेत.

## 10.0 जलविद्युत निर्मीती

उपखोऱ्यात सध्या जलविद्युत प्रकल्प नाहीत. उपखोऱ्यातील प्रस्तावित उर्जानिर्मिति बाबतची माहिती खालील प्रमाणे आहे.

क्षमता -मेवॅ

| अक्र | घटक | जलविद्युत केंद्राचे नांव | क्षमता |
|---|---|---|---|
| 1 | 13 अ | सुखी प्रकल्प | 0.1 |
| | | दादरा उदंचन ज.वि.प्र. | 400 |
| | | सिपना उदंचन ज.वि.प्र | 750 |
| | | गर्गा ज.वि.प्र. | 0.9 |
| 2 | 13 आ | वाघूर प्रकल्प (I.C.P.O.) | 1.0 |

**11.0 दळणवळणाची साधने**

या उपखोऱ्यातून मुंबई-कलकत्ता हा ब्रॉडगेज रेल्वेमार्ग जातो.मुंबई-आग्रा (राष्ट्रीय महामार्ग क्र 3) व धुळे कलकत्ता राष्ट्रीय महामार्ग क्र 6 या उपखोऱ्यातून जातो. दळणवळणाच्या साधना बाबतची माहिती सारणी 13.9 मध्ये दिली आहे.

**12.0 भावी नियोजनाची दिशा**

12.1 तापी नदीच्या नियोजनासंदर्भात सन 1958 मध्ये नेमलेल्या श्री.एम.एस.तिरुमला अय्यंगार समितीने महाराष्ट्र व मध्यप्रदेश या राज्यांसाठी 7401 दलघमी पाणी उपलब्ध असल्याचा अहवाल दिला आहे व त्यात या पाण्याचे वाटप खालीलप्रमाणे सुचविले आहे.

| | |
|---|---|
| मध्यप्रदेश | 1986 दलघमी |
| महाराष्ट्र | 5415 दलघमी. |

12.2 <u>पाण्याची उपलब्धता व वापर</u> : मध्यतापी उपखोऱ्यात निसर्गतः पाण्याची वार्षिक सरासरी उपलब्धता 4502 व वापरासाठी उपलब्ध पाणी 2674 दलघमी निर्धारित करण्यात आली आहे.

<u>पाणीवापराची सद्यःस्थिति:</u> सन 1996 पावेतो मध्यतापी उपखोऱ्यात 1 मोठा, 11 मध्यम व 106 लघु प्रकल्प बांधून पूर्ण आहेत. त्यातून प्रस्तावित पाणीवापर 1050 दलघमी आहे.तर 2030 अखेर उपयोग निश्चित झालेले पाणी 3339 दलघमी असेल.

12.3 या उपखोऱ्याच्या दक्षिण घटकातील येव्यामध्ये तीव्र दोलायमानता आहे. याचाच अर्थ 50 टक्के हूनही कमी उपलब्धतेच्या पाण्याच्या वापराचा विचार अनुकूल पाण्याच्या वर्षासाठी या उपखोऱ्यात होणे आवश्यक आहे.या दृष्टीने या उपखोऱ्याच्या पाण्याचे फेरनियोजन तात्काळ हाती घेतले जाणे आवश्यक आहे. तुटीच्या वर्षाचेही भान ठेवून तुटीच्या वर्षांमध्ये अर्थव्यवस्था विस्कळीत होणार नाही अशी व्यवस्था करायला हवी. उपखोऱ्याच्या हिस्स्याचा वापर अधिक परिणामकारकपणे होण्यासाठी पाण्याचे साठे सरासरी व त्याच्यापेक्षा कमी विश्वासार्हतेप्रमाणे नियोजित करण्याची गरज दिसते. यामुळे चांगल्या पावसाच्या वर्षातील पाणी अडविण्याची व्यवस्था करुन त्या वर्षीच्या जास्तीच्या पाण्याचे समृध्दीत व भूजलात रुपांतर करुन ठेवता येईल. अशा तऱ्हेने वापराचे नियोजन केले म्हणजे पूर्ण तापी खोऱ्यास मिळणारे पाणी अधिक परिणामकारकपणे वापरता येईल. पाण्याच्या साठवणूकींचा या दृष्टीने फेरविचार व्हायला हवा. भूजलाचे साठे वाढविणे, कालव्यावरील मोठ्या सी.डी.वर्क्सच्या ठिकाणी नाल्यावर (जलसेतु इ.) मार्गस्थ पाणीसाठे (enroute reservoirs) निर्माण करणे,नदीपात्रात बंधारे बांधून ओळीने साठे निर्माण करणे इत्यादींचा या संदर्भात तपशीलवार अभ्यास करण्याची व उपखोऱ्याचा एकत्रित विचार करुन पाणी व्यवस्थापनाचा एकात्मिक प्रकल्प करण्याची गरज आहे.

12.4 बाजारपेठांची उपलब्धता आणि साखर कारखान्याच्या माध्यमातून प्रक्रिया केंद्राची व्यवस्था यामुळे ऊस या पिकाची या उपखोऱ्यात विस्तृत वाढ झालेली आहे. उपखोऱ्यातील पाण्याच्या तूटीचा विचार करता ऊस पिकास प्रोत्साहन देणे या उपखोऱ्यात हितावह नाही. विद्यमान कारखान्याची ऊसाची गरज भागविण्यासाठी व ऊस क्षेत्राची उत्पादकता वाढविण्यासाठी (क्षेत्र न वाढविता) ठिबकसारख्या सिंचन पध्दतीचा वापर या उपखोऱ्यात सर्वत्र अनिवार्य करणे आवश्यक आहे.

12.5 हे उपखोरे भूजलाच्या पुनर्भरणास अनुकूल आहे. त्यामुळे या क्षेत्रात पाणलोटक्षेत्र विकासाचे कार्यक्रम हाती घेऊन पुनर्भरण वाढविणे शक्य आहे. उपखोऱ्यातील पळसखेडा भागात सरासरी 600-700 मिमी पाऊस पडतो, उष्ण हवामान व सिंचनाच्या कसल्याही सोयी

उपलब्ध नसलेल्या या भागांत लोकसहभागातून शासनाच्या मृद व जलसंधारणाच्या योजना राबवून या क्षेत्राचा कायापालट घडवून आणला गेला आहे. पावसाचे पडलेले पाणी पृष्ठभागाखाली व पृष्ठभागावर साठवून खरीप व रब्बी हंगामातून कमी पाण्यावर वाढणारी पिके घेऊन उपसा पध्दतीने ठिबक सिंचनाची जोड देऊन संरक्षित सिंचनाने शेती उत्पादनात आमुलाग्र बदल घडवून आणला आहे. सन 1984 ते 1996 पर्यंत या पाणलोट क्षेत्रात जलसंधारणाच्या योजना राबविल्यामुळे विहिरींची संख्या 50 वरुन 150 वर गेलेली आहे व जवळपास 350 हेक्टरवर बारमाही पिकांची (मोसंबी इ.) व 850 हेक्टर क्षेत्रावर हंगामी बागायतीची भर पडली आहे. पावसाचे पाणी साठवून त्याचे योग्य नियोजन केल्यास प्रतिकूल परिस्थितितही समृध्दीच्या दिशेने वाटचाल करता येते याचे पळसखेडा हे एक उत्तम उदाहरण या उपखोऱ्यात उपलब्ध आहे. त्या दिशेने इतर पाणलोटांचाही विकास घडवून आणता येईल.

12.6 उपखोऱ्यात तापी नदीवर (पूर्णा नदीच्या संगमाखाली) जळगाव जिल्ह्यातील हतनूर गावाजवळ धरण बांधून 255 दलघमी पाणीसाठा निर्माण करुन कालव्याद्वारे 53000 हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचे प्रस्तावित आहे. प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात जवळ जवळ 35% क्षेत्र घळीच्या व उंचवटीच्या जमिनीने व्यापलेले आहे. ही जमीन पडीक आहे. नेहमीचे प्रवाही कालवा सिंचन अशा ठिकाणी अशक्य आहे, म्हणून तुषार सिंचन / ठिबक सिंचन अशा आधुनिक सिंचन पध्दतीचा आधार घेऊन या नदीकाठच्या पडिक जमिनींच्या विकासाच्या योजना तयार कराव्या लागतील.

हतनूर प्रकल्पाच्या निर्मित 33000 हेक्टर सिंचन क्षेत्रापैकी प्रवाही सिंचनाद्वारे एकूण 15000 हेक्टर क्षेत्र भिजते. सुमारे 32000 हेक्टर क्षेत्रावर उपसा सिंचनासाठी मंजुरी देण्यात आली आहे. त्यापैकी 15600 हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणले आहे. उपसा सिंचन पध्दतीने (जलाशयातून, कालव्यातून, नदीतून व विहिरींद्वारे ) सिंचन करण्याकडे लोकांचा वाढता कल आहे. लाभक्षेत्रातील विहिरींची संख्या जवळ जवळ 2000 आहे. थोडक्यात सिंचन व्यवस्थापनाचे मोठ्या प्रमाणात खाजगीकरण आपोआपच होत आहे असे दिसते. हतनूर प्रकल्पाच्या प्रभावक्षेत्रात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसते. शेतकऱ्यांनी खाजगी संस्था निर्माण करुन उपसा सिंचन पध्दतीने दूरदूर अंतरापर्यंत पाईपलाईन टाकून खूप बारमाही (केळी,ऊस इ.) पिकाखालील क्षेत्र सिंचनाखाली आणले आहे. प्रकल्पातील पाणी वापराचा व त्याच्या प्रभावक्षेत्राचा संकलित हिशोब असणे व तो औपचारिक रीतीने प्रकाशित होणे इष्ट राहील.

हतनूर प्रकल्पाच्या कालव्यातून काही ठिकाणी (यावल नगरपालिका) पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येतो. नगरपालिकेने पाणी साठ्याची व्यवस्था न केल्यामुळे कालव्यात सतत पाणीसाठा ठेवण्यात येतो. परिणामी कालव्यात गाळ साचून पानगवत वाढते व त्यामुळे वहनक्षमता घटते. कालव्यामधून जे नागरी/ औद्योगिक पाणी द्यावयाचे आहे, त्यांच्या स्वतंत्र साठवण व्यवस्था असणे व त्यांना कालव्यातून नियतकालावधीने पाणी सोडून पुरवठा होणे इष्ट आहे. कालवा सतत वहाता ठेवणे/ भरुन ठेवणे हे अनेक दृष्टींनी घातक आहे.

12.7 केळीचे पीक हतनूर क्षेत्रात खूप आहे. पाण्याची मागणी नव्या नव्या क्षेत्रांसाठी वाढती रहाणार आहे. म्हणून केळीचे पिकास ठिबकसिंचन अनिवार्य करणे इष्ट राहील. शिवाय ठिबक सिंचनामुळे बिगर हंगामात देखील केळी बाजारात आणता येईल.

12.8 या परिसरात मेथी, धने, मोहरी, सरसू इत्यादीचे बी मोठया प्रमाणात तयार होते व याचा पुरवठा पूर्व महाराष्ट्रात होतो. ही रब्बी पिके असल्यामुळे यांस एखादे संरक्षीत पाणी किंवा ओलीत मिळाले तरी उत्पादनात दुपटीने वाढ होईल.त्यादृष्टीने सिंचन क्षेत्राच्या विस्ताराचा प्रकल्प तयार करणे उपयुक्त राहील.

12.9 तापी नदीचे दोन्ही काठ साधारणतः 2 ते 2.5 किमी च्या पट्टयात व 200 किमी लांबीत घळीच्या व उंचवटयाच्या प्रदेशाने व्यापलेले आहेत. या घळी गाळाच्या आहेत. यामध्ये वाळूचे थर (sand lenses) आहेत. उंचवटयाचा उतार जास्त असल्यामुळे जमिनीत पाणी धारण करुन ठेवण्याची क्षमता नगण्य आहे. अति चढउतारामुळे पिकाची लागवड वा प्रवाही सिंचन अशक्य आहे. चढउताराचा भाग थोडासा कमी करुन व आधुनिक सिंचनाच्या पध्दतीचा वापर करुन हा नापीक व पडीक भाग सिंचनाखाली आणता येईल काय याचा अभ्यास होणे गरजेचे आहे. तापी नदीच्या पात्रांत दरवाजे असलेल्या बंधाऱ्यांची मालिका उभी करुन काठावरील पडीक जमिनींना पाण्याचा कायम आधार निर्माण करुन देता येईल. यादृष्टीने लोकसहकार्यातून प्रकल्पांची रचना करण्यास तापीच्या दोन्ही तटांवर वाव आहे.

12.10 नंदुरबार भागात तापी नदीत पावसाळ्याच्या सुरुवातीच्या पूरात झिंगे (prawns) फार मोठया प्रमाणांत आढळतात. त्यामुळे या भागात झिंगे पकडणे व विक्री करणे हा मोठा व्यवसाय होऊ शकतो. शिवाय झिंगे उत्पादन वाढविण्यासाठी सुध्दा प्रकल्प हाती घेता येईल.

12.11 या उपखोऱ्यात तापी व तिच्या उपनद्यावर पाण्यासाठी अवलंबून असलेल्या जळगाव, धुळे, नंदूरबार, अमळनेर, पारोळा, भुसावळ इ. नागरी वसाहती व भुसावळ येथे औष्णिक वीजनिर्मिति केंद्र आहे. या नागरी वस्त्या व भुसावळ येथील औष्णिक वीज केंद्र यामुळे येथील नद्यांचे पाणी प्रदूषित होत आहे.या तुटीच्या उपखोऱ्यांत हे सर्व पाणी शुध्द होऊन त्याचा पुनर्वापर स्थानिक उपयोगासाठी करणे निकडीचे आहे. म्हणून या दृष्टीने नियोजन होणे व येत्या दहा वर्षात कारवाई होणे हितावह राहिल.

12.12 या उपखोऱ्यातील 12 तालुके अवर्षणप्रवण आहेत. म्हणून त्यात रुढ असलेली भाजीपाला, फळे अशी सर्वच मूल्यदायी पिके पाण्याची यापुढे वाढती काटकसर करण्याच्या दृष्टीने द्रूतगतीने ठिबक, तुषार, आणि पालीहाऊसेस या आधुनिक पध्दतींकडे घेवून जाणे आवश्यक आहे. त्यासाठी स्वतंत्र प्रोत्साहन कार्यक्रम हाती घेण्याची गरज आहे. बारमाही पिकांपासून क्रमाक्रमाने दूर जाऊन राष्ट्रीय व जागतिक बाजारपेठेशी अनुकुल अशी नवी पिकरचना पुढील वीस वर्षात या उपखोऱ्यात विकसित करणे इष्ट राहिल. उपखोऱ्यातील जळगाव, पाचोरा, भुसावळ, इत्यादी ठिकाणी ब्रॉडगेज रेल्वे उपलब्ध आहे. रेल्वेद्वारे मुंबई, सुरत, नागपूर, दिल्ली अशा मोठया बाजारपेठांशी हे उपखोरे जोडलेले आहे. राष्ट्रीय महामार्ग क्र 6 (धुळे-कलकत्ता) या उपखोऱ्यातून जातो. त्यामुळे या दळणवळणाच्या उपलब्धतेमुळे उपखोऱ्यात भाजीपाला, फळे इत्यादीच्या उत्पादनास व त्यावरील प्रक्रिया उद्योगास चालना देऊन मूल्यदायी पिकांचे उत्पादन वाढविण्यास वाव आहे.

12.13 या उपखोऱ्यात खारिया गुटीघाट हा बहुउद्देशीय आंतरराज्यीय (मध्यप्रदेश बरोबर) प्रकल्प प्रशासकीय मान्यताप्राप्त आहे. या प्रकल्पांतर्गत असलेले धरण 1788 दलघमी क्षमतेचा जलाशय निर्माण करणार असल्यामुळे राष्ट्रीयदृष्ट्या महत्वाच्या धरणात त्याचा समावेश होतो. मध्यतापी उपखोऱ्याच्या विकासाच्या दृष्टीने हा जलाशय अतिशय महत्वाचा रहाणार आहे. तेव्हा त्याची बांधणी जशी लवकर पूर्ण होणे आवश्यक आहे त्याचप्रमाणे नव्याने उपलब्ध होणारे पाणी अधिकाधिक विस्तारित क्षेत्राला सिंचनासाठी कसे मिळेल याचेही तपशिलवार नियोजन धरण निर्मितिच्या बरोबरीनेच होणे इष्ट राहील.

सारणी : 13.1

**हवामानाचा तपशील**

**अ) पर्जन्यमान** पर्जन्य-मिमी

| अक्र | महिना | उत्तर (सातपुडा) | उत्तर (मेळघाट) | (दक्षिण) |
|---|---|---|---|---|
| 1 | जानेवारी | 3 | 7 | 4 |
| 2 | फेब्रूवारी | 0 | 3 | 0 |
| 3 | मार्च | 9 | 8 | 4 |
| 4 | एप्रिल | 2 | 6 | 3 |
| 5 | मे | 13 | 10 | 9 |
| 6 | जून | 139 | 156 | 141 |
| 7 | जुलै | 27 | 408 | 219 |
| 8 | ऑगस्ट | 167 | 391 | 162 |
| 9 | सप्टेंबर | 118 | 194 | 99 |
| 10 | ऑक्टोबर | 40 | 87 | 51 |
| 11 | नोव्हेंबर | 2 | 26 | 5 |
| 12 | डिसेंबर | 5 | 6 | 7 |
| | एकूण | 525 | 1302 | 704 |

**ब) बाष्पीभवन**

केंद्रे : मध्य तापी (सातपुडा) व (दक्षिण) :
निम्न तापी प्रकल्प अमळनेर

केंद्रे : मध्य तापी (मेळघाट) :
खारीया बाष्पीभवन-मिमी

| अक्र | महिना | मध्य तापी (सातपुडा) व (दक्षिण) | मध्यतापी (मेळघाट) |
|---|---|---|---|
| 1 | जानेवारी | 136 | 125 |
| 2 | फेब्रूवारी | 188 | 136 |
| 3 | मार्च | 288 | 192 |
| 4 | एप्रिल | 399 | 227 |
| 5 | मे | 487 | 312 |
| 6 | जून | 327 | 230 |
| 7 | जुलै | 180 | 142 |
| 8 | ऑगस्ट | 143 | 80 |
| 9 | सप्टेंबर | 147 | 115 |
| 10 | ऑक्टोबर | 167 | 146 |
| 11 | नोव्हेंबर | 115 | 159 |
| 12 | डिसेंबर | 124 | 149 |
| | सरासरी | 2741 | 2013 |

**हंगाम निहाय बाष्पीभवन**

| अक्र | हंगाम | मध्य तापी (सातपुडा) व (दक्षिण) | मध्यतापी (मेळघाट) |
|---|---|---|---|
| 1 | खरीप | 553 | 410 |
| 2 | रब्बी | 687 | 642 |
| 3 | उन्हाळी | 1501 | 961 |

### सारणी 13.2
### पर्जन्यमापन केंद्राचा तपशील

पर्जन्य-मिमी

| अक्र | केंद्राचे नाव | प्रकार | स्वामित्व | आधार सामुग्री उपलब्धीचा कालावधी | वार्षिक सरासरी पर्जन्यमान |
|---|---|---|---|---|---|
| | **13 (अ) तापी (सातपुडा)** | | | | |
| 1 | रावेर | सा.प. | कृ.खा. | 1989-95 | 701 |
| 2 | यावल | सा.प. | कृ.खा. | 1989-95 | 777 |
| 3 | चोपडा | सा.प. | कृ.खा. | 1989-95 | 767 |
| 4 | शहादा | सा.प. | कृ.खा. | 1989-95 | 687 |
| 5 | शिरपूर | सा.प. | कृ.खा. | 1989-95 | 592 |
| | **उत्तर (मेळघाट)** | | | | |
| 1 | खारिया | स्व.प. | पा.खा. | 1982 | 1087 |
| 2 | दाबिदा | सा.प. | पा.खा. | 1991 | 716 |
| 3 | मालूर | सा.प. | पा.खा. | 1982 | 888 |
| 4 | चौराकुंड | स्व.प. | पा.खा. | 1984 | 1459 |
| 5 | चुनखडी | सा.प. | पा.खा. | 1977 | 867 |
| 6 | डोलार | सा.प. | पा.खा. | 1991 | 1079 |
| 7 | गिरगुटी | सा.प. | पा.खा. | 1990 | 1155 |
| 8 | हातरु | सा.प. | पा.खा. | 1984 | 1256 |
| 9 | कोलकास | सा.प. | पा.खा. | 1990 | 1074 |
| 10 | मोरगड | स्व.प. | पा.खा. | 1990 | 949 |
| 11 | राहू | सा.प. | पा.खा. | 1984 | 1056 |
| 12 | रायपूर | स्व.प. | पा.खा. | 1981 | 2212 |
| 13 | सेमाडोह | स्व.प. | पा.खा. | 1990 | 1516 |
| 14 | तारुबांधा | स्व.प. | पा.खा. | 1984 | 1507 |
| 15 | घटांग | सा.प. | पा.खा. | 1984 | 1433 |
| 16 | नागझरी | सा.प. | पा.खा. | 1991 | 628 |
| 17 | काटकूंभ | सा.प. | पा.खा. | 1990 | 1500 |
| 18 | धारणी | सा.प. | पा.खा. | 1988 | 1056 |
| | **मध्यतापी (दक्षिण),** | | | | |
| 1 | भसावळ | सा.प. | म.खा. | 1989-95 | 743 |
| 2 | जामनेर | सा.प. | म.खा. | 1989-95 | 846 |
| 3 | पारोळा | सा.प. | म.खा. | 1989-95 | 658 |
| 4 | अमळनेर | सा.प. | म.खा. | 1989-95 | 629 |
| 5 | सिंदखेडा | स्व.प. | म.खा. | 1989-95 | 511 |
| 6 | नंदूरबार | सा.प. | म.खा. | 1989-95 | 756 |

सारणी: 13.3

## सरिता मापन केंद्रे

येवा - दलघमी

| अक्र | केंद्राचे नांव | स्वामित्व | आधार सामुग्री कालावधी | वार्षिक सरासरी येवा |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| **13 (अ) तापी (सातपुडा)** | | | | |
| 1 | लोणखेडी | पा.खा. | 1960-88 | उ.ना. |
| 2 | सारंगखेडा | पा.खा. | उ.ना. | उ.ना. |
| 3 | सुकवद | कें.ज.आ. | उ.ना. | उ.ना. |
| 4 | सावखेडा | पा.खा. | उ.ना. | उ.ना. |
| 5 | भूसावळ | पा.खा. | उ.ना. | उ.ना. |
| 6 | वेळोदा | पा.खा. | 1955-76 | उ.ना. |
| 7 | खारीया | पा.खा. | उ.ना. | 3484 |
| **13 आ) मध्यतापी (दक्षिण)** | | | | |
| 1 | रेवाडी(बूराई) | पा.खा. | 1965 - 1967<br>1969 - 1980 | 127 |
| 2 | रायपूर (वाघुर) | पा.खा. | 1986 - 1988 | 118 |
| 3 | काग (जामनेर) | पा.खा. | 1986 - 1988 | 116 |
| 4 | मालखेडा (बोरी) | पा.खा. | 1979 -1997 | उ.ना. |

## सारणी: 13.4

## जलसंपत्तीची उपलब्धता

येवा -दलघमी

| अक्र | वर्ष | वार्षिक सरासरी येवा | उतरत्या क्रमाने येवा | संगत वर्ष | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 13 (अ) तापी (सातपुडा) (देहली उपखोरे) | | | | | |
| 1 | 1989 | 81 | 106 | 1994 | 10 |
| 2 | 1990 | 92 | 100 | 1993 | 30 |
| 3 | 1991 | 64 | 92 | 1990 | 40 |
| 4 | 1992 | 73 | 81 | 1989 | 50 |
| 5 | 1993 | 100 | 73 | 1992 | |
| 6 | 1994 | 106 | 67 | 1995 | 90 |
| 7 | 1995 | 67 | 64 | 1991 | |
| | सरासरी | 83 | | | |
| 13 आ)तापी (दक्षिण) (बुराई उपखोरे) | | | | | |
| 1 | 1989 | 165 | 226 | 1994 | 10 |
| 2 | 1990 | 159 | 165 | 1989 | 30 |
| 3 | 1991 | 138 | 163 | 1992 | 40 |
| 4 | 1992 | 163 | 159 | 1990 | 50 |
| 5 | 1993 | 115 | 138 | 1991 | |
| 6 | 1994 | 226 | 115 | 1993 | 90 |
| 7 | 1995 | 96 | 96 | 1995 | |
| | सरासरी | 152 | | | |

सारणी :13.5

**अवर्षणप्रवण तालुके**

पर्जन्यमान - मिमी, क्षेत्र - चौकिमी, लोकसंख्या - हजारात

| अक्र | जिल्हा | तालुका | वार्षिक सरासरी पर्जन्यमान | क्षेत्रफळ | लोकसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| 13 अ मध्य तापी (सातपुडा) | | | | | |
| 1 | धुळे | अक्कलकुवा | 1217 | 846 | 80 |
| 2 | | अक्राणी | 845 | 601 | 87 |
| 3 | | तळोदे | 807 | 355 | 98 |
| 13आ मध्यतापी (दक्षिण ) | | | | | |
| 1 | धुळे | धुळे | 632 | 662 | 205 |
| 2 | | सिंदखेडा | 568 | 1205 | 250 |
| 3 | | नंदुरबार | 700 | 1100 | 248 |
| 4 | | साक्री | 502 | 1829 | 203 |
| 5 | जळगाव | अंमळनेर | 665 | 687 | 202 |
| 6 | | पारोळा | 703 | 641 | 123 |
| 7 | | एरंडोल | 705 | 98 | 27 |
| 8 | | पाचोरा | 820 | 83 | 23 |
| 9 | नाशिक | मालेगाव | 534 | 502 | 175 |

सारणी : 13.6

## जमिनीचा वापर

क्षेत्र- हजार हेक्टर

| अक्र | बाब | 13 अ | | 13 आ | |
|---|---|---|---|---|---|
| | | क्षेत्र | भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी | क्षेत्र | भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी |
| 1 | भौगोलिक क्षेत्र | 1021 | | 1060 | |
| 2 | वनखात्याच्या ताब्यातील क्षेत्र | 273 | 26.7 | 278 | 26.2 |
| | पेरणीसाठी उपलब्ध नसलेले क्षेत्र | | | | |
| 3 | अ) ओसाड जमीन | 26 | 2.6 | 36 | 3.4 |
| | ब) बिगर शेती उपयोगाकरिता आणलेली जमीन | 21 | 2 | 17 | 1.6 |
| 4 | मशागत योग्य पडीक जमीन | 7 | 0.7 | 6 | 0.6 |
| 5 | कायमची व इतर चराऊ कुरणे | 39 | 3.8 | 39 | 3.7 |
| 6 | किरकोळ झाडेझुडपे यांच्या समुहाखालील क्षेत्र | 4 | 0.4 | 2 | 0.2 |
| 7 | चालु पडिक जमीन | 8 | 0.8 | 8 | 0.7 |
| 8 | इतर पडिक जमीन | 8 | 0.8 | 12 | 1.1 |
| 9 | पेरणीचे निव्वळ क्षेत्र | 635 | 62.2 | 662 | 62.5 |
| 10 | लागवडी योग्य क्षेत्र (4+5+6+7+8+9) | 701 | 67 | 729 | 69 |
| 11 | दुसोटा क्षेत्र | 139 | | 132 | |
| 12 | पिकाखालील एकूण क्षेत्र (9+11) | 774 | | 794 | |
| 13 | पीक घनता (12/9) x100) | 122 | | 120 | |

सारणी : 13.7

**प्रकल्पांची सद्यस्थिती**

**13 अ मध्यतापी उत्तर सातपूडा**

चलपाणीसाठा - दलघमी
पाणीवापर - दलघमी
सिंचनक्षेत्र - हेक्टर

| अक्र | प्रकल्पाचा संवर्ग | पूर्ण झालेले प्रकल्प | | | | प्रगतीपथावरील प्रकल्प | | | | भविष्यकालीन प्रकल्प | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 1 | मोठे | हतनूर | 608 | 608 | 50500 | | | | | उर्ध्व तापी टप्पा-2 | 393 | 393 | 59850 | | 1001 | 1001 | 110350 |
| | | 1 | 608 | 608 | 50500 | | 0 | 0 | 0 | 1 | 393 | 393 | 59850 | 2 | 1001 | 1001 | 110350 |
| 2 | मध्यम | सूकी | 35 | 35 | 5690 | गुळ | 16 | 16 | 2630 | गोमाई | 29 | 29 | 4484 | | 80 | 80 | 12804 |
| | | अंभोरा | 5 | 5 | 1394 | मोर | 8 | 8 | 2160 | | | | | | 13 | 13 | 3554 |
| | | करवंद | 37 | 37 | 4534 | मंगरुळ | 6 | 6 | 2446 | | | | | | 43 | 43 | 6980 |
| | | अनेर | 66 | 66 | 6320 | देहली | 25 | 25 | 3480 | | | | | | 91 | 91 | 9800 |
| | | | | | | दरा | 17 | 17 | 3450 | | | | | | 17 | 17 | 3450 |
| | | 4 | 143 | 143 | 17938 | 5 | 72 | 72 | 14166 | 1 | 29 | 29 | 4484 | 10 | 244 | 244 | 36588 |
| 3 | लघू | 0 | 0 | 0 | 0 | 6 | 18 | 18 | 2321 | 3 | 8 | 8 | 770 | 9 | 26 | 26 | 3091 |
| | जळगांव | 20 | 35 | 35 | 17052 | 16 | 30 | 30 | 5693 | 9 | 15 | 15 | 1213 | 45 | 80 | 80 | 23958 |
| | | | | | | | | | | 3 | 8 | 8 | 1046 | 3 | 8 | 8 | 1046 |
| | | | | | | | | | | 2 | 6 | 6 | 664 | 2 | 6 | 6 | 664 |
| | - | 20 | 35 | 35 | 17052 | 22 | 48 | 48 | 8014 | 17 | 37 | 37 | 3693 | 59 | 120 | 120 | 28759 |
| | सर्व एकूण | 25 | 786 | 786 | 85490 | 27 | 120 | 120 | 22180 | 19 | 459 | 459 | 68027 | 71 | 1365 | 1365 | 175697 |
| **13 अ अमरावती** | | | | | | | | | | | | | | | | | |
| 1 | मोठे | | | | | | | | | 1 | 57 | 57 | 4341 | 1 | 57 | 57 | 4341 |
| 2 | मध्यम | | | | | | | | | 1 | 100 | 100 | 5884 | 1 | 100 | 100 | 5884 |
| 3 | बृहतलघू | 13 | 23 | 23 | 3248 | 2 | 3 | 3 | 460 | 12 | 22 | 22 | 3046 | 27 | 47 | 47 | 6754 |
| 4 | स्था.स्तर | 18 | 10 | 10 | 1451 | 2 | 1 | 1 | 162 | 7 | 1 | 1 | | 27 | 12 | 12 | 1613 |
| 5 | को.प.बंधारे | 3 | 1 | 1 | 292 | 6 | 1 | 1 | 349 | 4 | 1 | 1 | 153 | 13 | 3 | 3 | 794 |
| 6 | इतर | 50 | 9 | 9 | 256 | 46 | 9 | 9 | 643 | 34 | 10 | 10 | 335 | 130 | 27 | 27 | 1234 |
| | | 84 | 43 | 43 | 5247 | 56 | 14 | 14 | 1614 | 59 | 190 | 190 | 13759 | 199 | 247 | 247 | 20620 |
| | सर्व एकूण | 109 | 829 | 829 | 90737 | 83 | 133 | 133 | 23794 | 78 | 650 | 650 | 81786 | 269 | 1612 | 1612 | 196317 |

| अक्र | प्रकल्पाचा संवर्ग | पूर्ण झालेले प्रकल्प | | | | प्रगतीपथावरील प्रकल्प | | | | भविष्यकालीन प्रकल्प | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 13 आ दक्षिण | | | | | | | | | | | | | | | | | |
| 1 | मोठे | 0 | 0 | 0 | 0 | वाघूर | 307 | 307 | 23580 | मध्यतापी टप्पा-2 | 421 | 421 | 31309 | | 728 | 728 | 54889 |
| 2 | मध्यम | कनोली | 13 | 13 | 810 | अमरावती | 26 | 26 | 3870 | सारंगखेडा बॅरेज | 79 | 79 | 8768 | | 118 | 118 | 13448 |
| | | रंगावली | 20 | 20 | 3134 | नागन | 27 | 27 | 3600 | शेवगाव बॅरेज | 131 | 131 | 8800 | | 178 | 178 | 15534 |
| | | बोरी | 28 | 28 | 5960 | कोर्डीनाला | 17 | 17 | 3660 | | | | | | 45 | 45 | 9620 |
| | | तोंडापूर | 3 | 3 | 1110 | शेवाडी | 35 | 35 | 7180 | | | | | | 38 | 38 | 8290 |
| | | भोकरबारी | 5 | 5 | 1579 | शिवन | 26 | 26 | 2670 | | | | | | 31 | 31 | 4249 |
| | | बुराई | 19 | 19 | 3310 | सूलवाडे बॅरेज | 75 | 75 | 7560 | | | | | | 94 | 94 | 10870 |
| | | पांझन डावा कालवा | | | 85 | प्रकाशा बॅरेज | 83 | 83 | 8860 | | | | | | 83 | 83 | 8945 |
| | | 7 | 88 | 88 | 15988 | 8 | 596 | 596 | 60980 | 3 | 631 | 631 | 48877 | 18 | 1315 | 1315 | 125845 |
| 3 | बृहतलघू | | | | | | | | | 1 | | 42 | 6556 | | 0 | 42 | 6556 |
| 4 | लघू | 80 | 133 | 133 | 26248 | 31 | 73 | 73 | 10977 | 61 | | 164 | 16795 | | 206 | 370 | 54020 |
| | सर्व एकूण | 87 | 221 | 221 | 42236 | 39 | 669 | 669 | 71957 | 65 | 631 | 837 | 72228 | 190 | 1521 | 1727 | 186421 |
| उपखोऱ्यासाठी एकूण : | | 196 | 1050 | 1050 | 132973 | 122 | 802 | 802 | 95751 | 143 | 1281 | 1487 | 154014 | 460 | 3133 | 3339 | 382738 |

सारणी : 13.8

## जलसंपत्तीचा ताळेबंद

## तापी (सातपूडा) घटकक्षेत्र

जलसंपत्ती - दलघमी

| अक्र | उपलब्धता | |
|---|---|---|
| 1 | **भूपृष्ठावरील** | |
| | अ) नैसर्गिक | |
| | 1) 75 टक्के विश्वासार्हतेने | 2072 |
| | 2) 50 टक्के विश्वासार्हतेने | 3278 |
| | 3) सरासरीने | 2868 |
| | 4) नियोजनासाठी | 1704 |
| | ब) मानवप्रबंधित | |
| | 1) नागरी वापरातून पुनरुद्भव (80 %) | 17 |
| | 2) उद्योग धंदयातील पुनरुद्भव (97.5%) | 13 |
| | 3) इतर खोऱ्यातून संक्रमित झालेले पाणी | |
| | **एकूण (1 ब)** | **29** |
| 2 | मानवनिर्मित | |
| | लाभक्षेत्रातील पुनर्भरण (1704+29-130) च्या10 % | 160 |
| 3 | **एकूण उपलब्धता (1704+29+160)** | **1893** |
| | 1) भूजल उपलब्धता (वार्षिक एकूण पुनर्भरण ) | 759 |
| | 2) भूजल वापरास मूभा ( 759 च्या 65 %) | 493 |

| अक्र | वापर (सन2030) | |
|---|---|---|
| 4 | **भूपृष्ठावरील** | |
| | अ) घरगूती वापरासाठी | |
| | 1) नागरी | 21 |
| | 2) ग्रामीण | 64 |
| | 3) पशूधन | 32 |
| | एकूण | 117 |
| | ब) उद्योगधंदयासाठी | 13 |
| | एकूण सिंचनेतर वापर | **130** |
| 5 | इतर उपखाऱ्यात स्थलांतरीत पाणी | |
| 6 | सिंचनासाठी उपलब्ध भूपृष्ठावरील पाणी (1704+29-130)+160 | 1763 |
| 7 | एकूण वापर | **1893** |
| | अ) भूजलाचा सध्याचा सिंचनासाठी वापर | 185 |

टीपा : 1) भूजल उपलब्धतेमूळे उपखोऱ्याच्या एकूण उपलब्धतेत वाढ होणार नाही ; भूजलाचा जेवढा उपसा होईल तेवढा नदी प्रवाह घटत जाईल म्हणून एकूण उपलब्धतेचा आकडा काढतांना भूजल उपलब्धतेचा विचार घेतलेला नाही.

2) संकलीत अंदाजासाठी सर्व पाण्याचा उपयोग भूपृष्ठावरील पाण्यातून दाखविला आहे. पण एकूण वापरापैकी अधिकाधिक 493+160= 653 भूजल माध्यमातून शक्य आहे.

3) पाणीवापराचे नियोजन उपलब्ध येवा मालिकेवर आधारित आहे.

**सारणी : 13.8 (चालू)**

**जलसंपत्तीचा ताळेबंद**

**तापी (दक्षिण) घटकक्षेत्र**

जलसंपत्ती - दलघमी

| अक्र | उपलब्धता | | अक्र | वापर (सन2030) | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | भूपृष्ठावरील | | 4 | भूपृष्ठावरील | |
| | अ) नैसर्गिक | | | अ) घरगुती वापरासाठी | |
| | 1) 75 टक्के विश्वासार्हतेने | 1241 | | 1) नागरी | 37 |
| | 2) 50 टक्के विश्वासार्हतेने | 1671 | | 2) ग्रामीण | 72 |
| | 3) सरासरीने | 1634 | | 3) पशुधन | 36 |
| | 4) नियोजनासाठी | 970 | | एकूण | 145 |
| | ब) मानवप्रबंधित | | | ब) उद्योगधंदयासाठी | 179 |
| | 1) नागरी वापरातून पुनरुद्भव (80 %) | 30 | | एकूण सिंचनेतर वापर | 324 |
| | 2) उद्योग धंदयातील पुनरुद्भव (97.5%) | 175 | 5 | इतर उपखाऱ्यात स्थलांतरीत पाणी | |
| | 3) इतर खोऱ्यातून संक्रमित झालेले पाणी | | 6 | सिंचनासाठी उपलब्ध भूपृष्ठावरील पाणी | 935 |
| | एकूण | 204 | | (970+204-324)+85 | |
| 2 | मानवनिर्मित | | | | |
| | लाभक्षेत्रातील पुनर्भरण (970+204-324) च्या10 % | 85 | | | |
| 3 | एकूण उपलब्धता [970+204+85] | 1259 | 7 | एकूण वापर | 1259 |

1) भूजल उपलब्धता (वार्षिक एकूण पुनर्भरण ) 955 — अ) भूजलाचा सध्याचा सिंचनासाठी वापर

2) भूजल वापरास मूभा ( 955 च्या 65 %) 621


टीपा : 1) भूजल उपलब्धतेमूळे उपखोऱ्याच्या एकूण उपलब्धतेत वाढ होणार नाही ; भूजलाचा जेवढा उपसा होईल तेवढा नदी प्रवाह घटत जाईल म्हणून एकूण उपलब्धतेचा आकडा काढतांना भूजल उपलब्धतेचा विचार घेतलेला नाही.


2) संकलीत अंदाजासाठी सर्व पाण्याचा उपयोग भूपृष्ठावरील पाण्यातून दाखविला आहे. पण एकूण वापरापैकी अधिकाधिक

85+621= 706 भूजल माध्यमातून शक्य आहे.

3) पाणीवापराचे नियोजन उपलब्ध येवा मालिकेवर आधारित आहे.

नकाशा - 13.1




## • संदर्भ सूची •

1. राज्य सरहद्द
2. जिल्हा सरहद्द
3. तालुका सरहद्द
4. उपखोरे सरहद्द
5. घटक क्षेत्र हद्द
6. जिल्हा मुख्यालय
7. तालुका मुख्यालय
8. रेल्वे मार्ग
9. रस्ते
10. नद्या व नाले
11. समपर्जन्यमान रेषा (मिमी) 1400
12. धरणाचे ठिकाण व बुडीत क्षेत्र — पूर्ण, बांधकामाधीन, भविष्यकालिन
13. औद्योगिक क्षेत्र
14. महानगरपालिका
15. नगर पालिका

| उपखोऱ्याचे स्थान | उपखोरे क्र. | उपखोऱ्यांची नावे |
|---|---|---|
|  | 3 | पूर्णा (दुधनासहीत) |
| | 10 | पूर्णा (तापी) |
| | 11 | गिरणा |
| | 12 | पांझरा |
| | 14 | नर्मदा उपखोरे समूह |

**महाराष्ट्र जल व सिंचन आयोग**

# मध्य तापी उपखोरे समूह

(अ) तापी (सातपुडा) घटक समूह
(आ) तापी (दक्षिण) घटक समूह

जून 1999

# उपखोरे : 14

# नर्मदा

## 1.0 भौगोलिक तपशील

महाराष्ट्राच्या उत्तर सीमेवरुन नर्मदा नदी वाहते, तिच्या दक्षिणेकडून मिळणाऱ्या देवगंगा, खाट व उदई या उपनद्यांची स्रवणक्षेत्रे (नकाशा 14.1) म्हणजे महाराष्ट्रातील नर्मदा खोऱ्याचा प्रदेश.नर्मदा नदी मध्यप्रदेश मध्ये उगम पावते व धुळे जिल्ह्यातील अक्कलकुआ व अक्राणी या तालुक्यांच्या उत्तर सीमांवरुन पुढे गुजरातेत जाते.नर्मदा उपखोऱ्याचे महाराष्ट्रातील क्षेत्र 1048 चौकिमी आहे. नर्मदा नदीची एकूण लांबी 1312 किमी आहे;त्यापैकी 77.5 किमी लांबी महाराष्ट्राच्या उत्तर सीमेवरुन वहाते.नर्मदेवरील सरदार सरोवर प्रकल्प महाराष्ट्र, मध्यप्रदेश, गुजरात व राजस्थान अशा चार राज्यांच्या संयुक्त प्रकल्पामुळे नियोजनाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा असा आंतरराज्यीय विकास व्यवस्थेशी निगडित झालेला हा भौगोलिक घटक आहे.

मुख्य नदी व तिच्या उपनद्यांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

लांबी-किमी,तलांक-मी

| अक्र | मुख्यनदी | उपनदी | लांबी | उगमस्थान | | संगमस्थान | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ठिकाण | तलांक | ठिकाण | तलांक |
| 1 | नर्मदा | | 77.50* | अमरकंटक (म.प्र.) | 780 | भरुच, गुजरात | 0 |
| 2 | | उदई | 90 | डाव | 875 | भूषा, नर्मदेस | 98.5 |
| 3 | | देवनाड | 35 | उमितामाळ | 800 | सोनखुर्द | 300 |
| 4 | | कात्री | 26.5 | बाजरीपत्ती | 800 | सोनखुर्द | 300 |
| 5 | | खाट | 22 | मोलगी ता.धडगाव | 610 | नर्मदेस | 97.5 |
| 6 | | देवगंगा | 36 | वालंबा | 600 | मणीबेली नर्मदेस | 50.2 |

1.2 विस्तार : उपखो-याचा क्षेत्रिय विस्तार अक्षांश 21°35′ ते 22°01′ उत्तर व रेखांश 73°46′ ते 74°42′ पूर्व हयामध्ये आहे.

1.3 चतु:सीमा : उपखोऱ्याच्या चतु:सीमा खालीलप्रमाणे आहेत.

| अक्र | दिशा | तपशील |
|---|---|---|
| 1. | उत्तर | नर्मदा नदी, गुजरात |
| 2. | पूर्व | मध्य प्रदेश |
| 3. | पश्चिम | गुजरात |
| 4. | दक्षिण | मध्य तापी उत्तर ( सातपुडा) घटक 13 अ |

* महाराष्ट्रातील उपखोऱ्याच्या मर्यादेत

## 2.0 हवामान

या उपखोऱ्यातील क्षेत्र मध्यम पावसाच्या प्रदेशात येते. येथील हवामान उष्ण व कोरडे आहे. या उपखोऱ्यात साधारणतः 93 टक्के पाऊस नैऋत्य मोसमी वाऱ्यामुळे जून ते सप्टेंबर या कालावधीत,3 टक्के पाऊस ईशान्य वाऱ्यामुळे सप्टेंबर ते डिसेंबर दरम्यान व उर्वरीत 4 टक्के पाऊस डिसेंबर नंतर पडतो. वार्षिक सरासरी पर्जन्यमान 1019 मिमी आहे. पर्जन्यमानातील दोलायमानता गुणांक 46 (तक्ता 2.5.8) आहे. हवामान विषयक व पर्जन्यमान केंद्राचा तपशील खालील प्रमाणे आहे.

पर्जन्यमान-मिमी, तपमान -अंश सें

| अक्र | वैशिष्टये | परिमाण | वर्ष | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1 | सर्वात अधिक पाऊस | 2024 | 1969 | अक्राणी |
| 2 | सर्वात अधिक तपमान | 43 | 1969 | अक्राणी |
| 3 | सर्वात कमी तपमान | 10 | 1969 | अक्राणी |

पर्जन्यमापन केंद्रांचा तपशील

पर्जन्य-मिमी

| अक्र | केंद्राचे नाव | प्रकार | स्वामित्व | आधार सामुग्री उपलब्धतेचा कालावधी | वार्षिक सरासरी पर्जन्य |
|---|---|---|---|---|---|
| 1 | धडगाव | सा.प. | म.खा. | 1960-98 | 800 |
| 2 | अमली | सा.प. | पा.खा. | 1984-98 | 724 |
| 3 | बिजरी | सा.प. | पा.खा. | 1984-98 | 800 |
| 4 | काकरपटी | सा.प. | पा.खा. | 1984-98 | 644 |

उपखोऱ्यातील माहवार पर्जन्यमानाची माहिती सारणी 14.1 मध्ये दिली आहे.

2.1 बाष्पीभवन : या उपखोऱ्यातील सर्वाधिक बाष्पीभवन मे महिन्यात सरासरी 240 मिमी तर सर्वात कमी बाष्पीभवन डिसेंबर महिन्यात 126 मिमी होते. केंद्रनिहाय व माहवार बाष्पीभवन याबाबतचा तपशील सारणी 14.1 मध्ये दिला आहे. तसेच या सारणीत हंगामनिहाय बाष्पीभवनही दर्शविलेले आहे.

## 3.0 जलसंपत्तिची उपलब्धता

3.1 भुपृष्ठीय जल संपत्तिः या उपखोऱ्यातील एकूण महाराष्ट्राच्या क्षेत्रावरील सरासरी उपलब्धता 580 दलघमी आहे. वर्ष 1960 ते 1996 या 37 वर्षांतील माहितीवर आधारभूत या उपखोरे समूहातील पाण्याची उपलब्धता खालील प्रमाणे आहेः

| | |
|---|---|
| 75 टक्के विश्वासार्हतेने | 315 दलघमी |
| 50 टक्के विश्वासार्हतेने | 482 दलघमी. |

या उपखोऱ्यात उदई नदीवर सरिता मापन केंद्र असून तेथील अंशतः कालावधीची माहिती उपलब्ध आहे. धडगाव केंद्राची पर्जन्याबाबतची माहिती सारणी 14.2 मध्ये दिली आहे.

3.2 भूशैलीय रचना :

भूपृष्ठीय स्थिति (भूरुप वर्णन) : उपखोऱ्यातील भूभाग 37 टक्के अतिविच्छेदित व डोंगराळ आणि उर्वरीत 63 टक्के पटारी आहे. यात भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेने निर्देशित केलेले 8 पाणलोट क्षेत्रे आहेत. वनक्षेत्राचे प्रमाण सर्वच पाणलोट क्षेत्रामध्ये चांगले आहे.

भूपृष्ठीय शैल स्थिति : या उपखोऱ्यातील संपूर्ण क्षेत्र लाव्हा थरांपासून तयार झालेल्या बहुस्तरीय दक्षिणी कातळाच्या खडकांनी (डेक्कन ट्रॅप प्रस्तराने) व्यापलेले आहे. त्यात मुख्यत्वे भरित-कुहरी बेसाल्टचा अंतर्भाव आहे.

अनेक शैल भित्तीनी (Dykes) हे लाव्हा थर भेदलेले आहेत. या सर्व भित्ती भूपृष्ठावर भेगाळलेल्या आहे.

3.3 भूजल संपत्ति : भूपृष्ठीय स्थिति व भूस्तर प्रतिकूल असल्यामुळे भूजल उपलब्धीस मर्यादा आहेत. विघटित प्रस्तरांची जाडी कमी असल्यामुळे भूजल धारणक्षमता साधारणच आहे. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या 1990 च्या भूजल अंदाजानुसार उपखोऱ्यात एकूण पुनर्भरण 54 दलघमी असून सिंचनाखालील विहिरींची संख्या फक्त 731 आहे. या उपखोऱ्यात भूजल विकासास वाव आहे.

3.4 अवर्षणप्रवण क्षेत्र : या उपखो-यात येणारे दोन्ही तालुके सुकथनकर समितीच्या अहवालानंतर शासनाने घोषीत केल्या प्रमाणे अवर्षणप्रवण क्षेत्रात येतात. त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

लोकसंख्या-हजारात,पर्जन्य- मिमी क्षेत्र-चौकिमी

| अक्र | जिल्हा | तालुका | सरासरी वार्षिक पर्जन्यमान | क्षेत्रफळ | लोकसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| 1 | धुळे | अक्कलकुआ | 1087 | 508 | 134 |
| 2 | धुळे | अक्राणी | 811 | 541 | 97 |

**4.0 मृदेचे (Soils) प्रकार**

या उपखोऱ्यातील मृदेचे वर्गीकरण खालील प्रमाणे आहे.

| अक्र | तपशील | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | भरड उथळ जमीन | 50 |
| 2 | गाळाची जमीन | 50 |

**5.0 जमिनीचा वापर**

लागवडीयोग्य क्षेत्र 64 हजार हेक्टर आहे. या क्षेत्राचा वापर, तसेच उपखोऱ्यातील वनखात्याच्या ताब्यातील क्षेत्र, पडीक क्षेत्र इत्यादी बाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

क्षेत्र - हजार हेक्टर

| अक्र | तपशील | क्षेत्र | भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | भौगोलिक क्षेत्र | 105 | |
| 2 | वनखात्याच्या ताब्यातील क्षेत्र | 38 | 36 |
| 3 | पेरणीसाठी उपलब्ध नसलेले क्षेत्र | | |
| | अ) ओसाड जमीन | 1 | 0.9 |
| | ब) बिगर शेती उपयोगाकरीता आणलेली जमीन | 2 | 2 |
| 4 | मशागतीयोग्य पडीक जमीन | 0 | 0 |
| 5 | कायमची कुरणे व चराऊ कुरणे | 4 | 3.8 |
| 6 | किरकोळ झाडे झुडपे यांच्या समुहाखालील क्षेत्र | 0 | 0 |
| 7 | चालू पडीक जमीन | 0 | 0 |
| 8 | इतर पडीक जमीन | 1 | 0.9 |
| 9 | पेरणीचे निव्वळ क्षेत्र | 59 | 56.2 |
| 10 | लागवडीयोग्य क्षेत्र (4+5+6+7+8+9) | 64 | 61 |
| 11 | दुसोटा क्षेत्र | 5 | |
| 12 | पिकाखालील एकूण क्षेत्र (9+11) | 64 | |
| 13 | पीक घनता (12 ÷9 X100) | 109 | |

**6.0 लोकसंख्या व पशुधन**

6.1 लोकसंख्या : सन 1991 च्या जनगणनेनुसार या उपखोऱ्यातील लोकसंख्या 1 लक्ष 61 हजार आहे. उपखोरेनिहाय लोकसंख्या सन 2030 ची संभाव्य लोकसंख्या व लोकसंख्येची घनता खालील प्रमाणे आहे. येथे लोकसंख्या वाढीचा दर इतरत्रपेक्षा कांहीसा जास्त लक्षात आलेला आहे.

लोकसंख्या-हजारात, घनता-प्रति चौकिमी

| अक्र | लोकसंख्या तपशील | 1991 | 2030 |
|---|---|---|---|
| 1 | नागरी | — | — |
| 2 | ग्रामीण | 161 | 322 |
| 3 | एकूण | 161 | 322 |
| 4 | लोकसंख्या घनता | 154 | 308 |

6.2 पशुधन : या उपखोऱ्यात 1992 च्या मोजणीनुसार एकूण पशुधन 129255 आहे. तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| म्हैस व रेडे | गायी व बैल | एकखुरी व उंट | डुकरे | शेळया व मेंढया | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| 12852 | 59883 | 410 | 1806 | 54304 | 129255 |

6.3 इतर तपशील : या उपखो-यात अजून एकही नगरपरिषद नाही. शेत मजुरांची संख्या 53520 तर इतर मजूर 849 आहेत. बहुसंख्य लोकवस्ती ही आदिवासी समाजाची आहे.

## 7.0 पाणीवापर

7.1 सिंचनासाठी वापर : उपखोऱ्यातील वर्गनिहाय म्हणजे मोठे,मध्यम व लघु प्रकल्प व कोल्हापूर पध्दतीचे बंधारे यांची संख्या, पाणीसाठा, पाणीवापर, सिंचन क्षेत्र याची तसेच पूर्ण झालेले, प्रगतिपथावरील व भविष्यकालीन प्रकल्प याचा तपशील सारणी 14.3 मध्ये दिला आहे. त्यांत सरदार सरोवर आंतरराज्यीय प्रकल्पावरही महाराष्ट्राची अंशतः मालकी असल्यामुळे त्याचा उल्लेख केला आहे. पूर्ण झालेल्या प्रकल्पापासून निर्मित सिंचन क्षमता 4474 हेक्टर असून त्यांतील पाणीवापर फक्त 22 दलघमी आहे. विहिरीवरील सिंचन क्षेत्राचाही विचार केला तर एकूण सिंचन क्षमता 7688 हेक्टर असून एकूण पाणीवापर 24 दलघमी आहे.सन 2030 पर्यन्त आणखी 276921 हेक्टर क्षेत्र नव्याने सिंचनाखाली येईल त्यानंतर एकूण सिंचन क्षमता भूपृष्ठावरील व भूजलाची मिळून 35380 हेक्टर होईल व त्याचा एकूण पाणी वापर 207 दलघमी होईल.

7.2 सिंचनेतर पाण्याचा वापर : सिंचनेतर उपयोगासाठी या उपखोऱ्यातील पाण्याची सध्याची गरज 5 दलघमी आहे. सन 2030 पर्यन्त ती10 दलघमी होईल. विविध प्रयोजनासाठी लागणाऱ्या पाण्याची गरज खालील प्रमाणे आहे.

पाणी-दलघमी

| अक्र | तपशील | सन 1991 | | | | सन 2030 |
|---|---|---|---|---|---|---|
| | | नागरी | ग्रामीण | पशुधन | एकूण | |
| 1 | पिण्याचे पाणी | – | 3 | 2 | 5 | 10 |
| 2 | उद्योगासाठी | – | – | – | – | – |

7.3 जलसंपत्तिचा ताळेबंद : भूपृष्ठावरील उपलब्ध जलसंपत्ति,भूजलाचे वार्षिक पुनर्भरण, पाण्याचा पुनरुद्भव, इतर उपखोऱ्यातील पाण्याचे संक्रमण व त्याचा वापर याचा ताळेबंद सारणी 14.4 मध्ये दिला आहे.

7.4 लाभक्षेत्र विकास : या उपखोऱ्यात लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाची कामे नाहीत. एकूण झालेले जमीन सपाटीकरण फक्त 400 हेक्टरवर आहे.

या उपखोऱ्यात जुने प्रकल्प नाहीत मध्यम प्रकल्पहि अजून व्हावयाचे आहेत. लघू प्रकल्पाची व स्थानिक प्रकल्पाची संख्या मोठी आहे.

## 8.0 पीकरचना

एकूण पिकाखालील क्षेत्र 64 हजार हेक्टर आहे. उपखोऱ्यातील बहुतांश खरीप क्षेत्र आहे. कांही प्रमुख पिकांची दरहेक्टरी उत्पादकता पुढील प्रमाणे आहे.

उत्पादकता - क्वि.प्रति हेक्टर

| अक्र | प्रमुख पिके | उत्पादकता |
|---|---|---|
| 1 | बाजरी | 9.17 |
| 2 | खरीप ज्वारी | 14.29 |
| 3 | खरीप भुईमूग | 6.67 |

**9.0 उद्योगधंदे**

या उपखोऱ्यात मोठे उद्योग नाहीत परंतु सॉ मिल, कापडमाग, शेती अवजारे या सारखे थोडे उद्योग आहेत.

**10.0 जलविद्युत निर्मिति**

सरदार सरोवर प्रकल्पातून 1450 मेवॅ वीजनिर्मिति होणार असून त्यापैकी 391.5 मेवॅ (27%) वीज महाराष्ट्राला मिळणार आहे. प्रकल्पांच्या वीजघरांची कामे प्रगतिपथावर आहेत. शिवाय उपखोऱ्याच्या क्षेत्रात उदई नदीवर रामशाळा येथे जलविद्युत केंद्र प्रस्तावित आहे.

**11.0 दळण वळणाची साधने**

या उपखोऱ्यात धडगाव(अक्राणी)- तळोदा व धडगाव - शहादा हे दोन राज्य मार्ग आहेत.

**12.0 भावी नियोजनाची दिशा**

12.1 नर्मदा खोरे तंटा लवाद मंडळाच्या अंतीम निवाडयानुसार (1979) महाराष्ट्राचा पाणीवापराचा हिस्सा 308.37 दलघमी (10.89 अघफू) आहे. 4 मध्यम व 25 लघुयोजनांद्वारे 101.76 दलघमी (3.59 अघफू) वापर प्रस्तावित आहे. या विपुल उपलब्धतेच्या तुलनेत या उपखोऱ्यातील सध्या पाण्याचा एकूण वापर (सिंचन व सिंचनेतर) 22 दलघमी आहे. जल उपलब्धतेच्या तुलनेत विकासाला अजून खूप वाव आहे.

12.2 महाराष्ट्रातील नर्मदा काठचा 14.15 चौकिमी चा प्रदेश सरदार सरोवर प्रकल्प पाण्याखाली बुडणार आहे. त्यापैकी पूर्ण संचय पातळीने बुडीत क्षेत्र 34867 हेक्टर आहे. यातील महाराष्ट्राचे क्षेत्र 9399 हेक्टर आहे. महाराष्ट्रातील नर्मदा खोऱ्याच्या भूक्षेत्राच्या संदर्भात हे क्षेत्रफळ केवळ 9 टक्के आहे. त्यात महाराष्ट्रातील विस्थापित होणाऱ्यांची संख्या 3113 आहे. त्यांना त्यांच्या इच्छेनुरुप गुजरातेतील सरदार सरोवर प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात किंवा स्थानिक प्रदेशातच (महाराष्ट्रात) पुनर्वसित व्हावयाचे आहे. महाराष्ट्रातील नर्मदा खोऱ्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणातील पुनर्वसित होणाऱ्यांची लोकसंख्या 1.93 टक्के आहे. या भागात सलग लागवडीचे क्षेत्र नाही ते तुटक तुटक आहे. शिवाय सारा प्रदेश वनजमीन मिश्रित आहे व उपखोऱ्याच्या एकूण क्षेत्रफळापैकी 380 चौकिमी वनखात्याच्या ताब्यातील क्षेत्र (36 टक्के) आहे.पण लागवडीयोग्य क्षेत्र 64 हजार हेक्टर आहे व एकूण भौगोलिक क्षेत्राच्या 61 टक्के आहे. त्याचा उत्तम उपयोग वनक्षेत्राच्या विकासा बरोबरच उत्पादकता वाढविण्यासाठी करावयास हवा आहे. उपनद्या व नाले यांचे उतार जास्त असल्यामुळे साठवणुकीचे तलावहि खर्चिक आहेत.

या संबंधी पाटबंधारे खात्याने वनविभागाशी संपर्क करुन पाण्याच्या वापरासाठी वनविकासाचे व कृषि सिंचनाचे संयुक्त प्रकल्प या प्रदेशात घेणे शक्य आहे. लाभक्षेत्र जरी तुटक तुटक असले

तरी नव्या आधुनिक तंत्रांनी (ठिबक,तुषार) असे क्षेत्र सिंचनाखाली आणणे शक्य आहे. त्यादृष्टीने प्रकल्पाची आखणी करावी लागेल. पाणलोट क्षेत्र विकासाच्या कामामध्येही अनेक लहान लहान साठवणीना प्राधान्य द्यावे लागेल. त्याच्या आधाराने आदिवासींच्या विकासासाठी एक स्वतंत्र आदिवासी विकास अधिकारी आहे. औषधी वृक्ष शेतीला प्रोत्साहन देता येईल व वन उत्पादनावर आधारित लघु उद्योगहि वाढवता येतील. आदिवासी विकास अधिकारी, कृषि अधिकारी, वन अधिकारी, पुनर्वसन अधिकारी व पाटबंधारे खात्याचे अधिकारी यांच्या समन्वयाने स्थानिक विकास करण्याचा एक सामाजिक आराखडा तयार होणे तातडीने गरजेचे आहे.

सरदार सरोवर प्रकल्पामधील तरतुदी प्रमाणे जलाशयात सरळ पाणी आणणाऱ्या स्रवण क्षेत्राच्या विकासासाठी स्वतंत्र तरतूद आहे. त्या तरतूदीचा विशेष उपयोग जलाशयाच्या दक्षिण काठावरील महाराष्ट्राच्या क्षेत्रासाठी करता येईल. त्या तरतुदीमध्ये मृदसंवर्धनाची व जलसंवर्धनाची कामे आणि तलावाच्या कांठावर करावयाच्या पर्यावरणीय वृक्ष लागवडीची तरतूद आहे. त्याच प्रमाणे तलावाच्या काठाजवळच्या वस्त्या,लागवडीची भूमि व वनक्षेत्र यांना पाणी पुरवठा करण्याच्या उपसा योजना जलाशयाच्या पाण्यातून राबविता येतील. जलाशयाच्या विशाल विस्तारामध्ये मत्स्यपालन हा एक मोठाच व्यवसाय उभा राहणार आहे. त्याला प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्रातील तटावर सुध्दा कोळयासाठी विशेष तरतूदी करणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील जलाशयाची किनारपट्टी दंतूर व सूमारे 160 किमी लांबीची रहाणार आहे. तिचा अनुकूल उपयोग मत्स्यसंवर्धनासाठी करुन घेता येईल. पर्यटनाच्या दृष्टीने तर सरदार सरोवरासारख्या जलाशयाचे महत्व अनन्यसाधारण रहाणार आहे. त्यादृष्टीने सरोवराच्या काठी आकर्षक स्थळे वेळीच विकसित करणे इष्ट राहील.

----000---

सारणी : 14.1

## माहवार पर्जन्यमानाचा तपशील

पर्जन्य, बाष्पीभवन-मिमी

| अक्र | महिना | पर्जन्य | बाष्पीभवन |
|---|---|---|---|
| 1 | जानेवारी | 2 | 137 |
| 2 | फेब्रूवारी | 0 | 163 |
| 3 | मार्च | 1 | 201 |
| 4 | एप्रिल | 1 | 224 |
| 5 | मे | 9 | 240 |
| 6 | जून | 118 | 166 |
| 7 | जुलै | 359 | 130 |
| 8 | ऑगस्ट | 272 | 127 |
| 9 | सप्टेंबर | 200 | 153 |
| 10 | ऑक्टोबर | 49 | 162 |
| 11 | नोव्हेंबर | 3 | 142 |
| 12 | डिसेंबर | 5 | 126 |
| | एकूण : | 1019 | 1971 |

हंगामनिहाय बाष्पीभवन

| | |
|---|---|
| खरीप | 491 |
| रब्बी | 649 |
| उन्हाळी | 831 |
| एकूण : | 1971 |

सारणी: 14.2

**पर्जन्यमानातील दोलायमानता**

केंद्र: धडगाव (अक्राणी) पर्जन्यमान-मिमी

| अक्र | वर्ष | पर्जन्यमान | उतरत्या क्रमाने पर्जन्यमान | संगत वर्ष | विश्वासाहता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 5 | 6 | 7 |
| 1 | 1951 | 350.9 | 676.5 | 1967 | |
| 2 | 1952 | 405.6 | 624.8 | 1961 | |
| 3 | 1953 | 373.7 | 563.9 | 1956 | 10 |
| 4 | 1954 | 393.5 | 550.9 | 1970 | |
| 5 | 1955 | 175.3 | 532.1 | 1958 | 20 |
| 6 | 1956 | 563.9 | 508.1 | 1959 | |
| 7 | 1957 | 348.6 | 433.8 | 1968 | |
| 8 | 1958 | 532.1 | 407.5 | 1969 | |
| 9 | 1959 | 508.1 | 405.6 | 1952 | |
| 10 | 1960 | 290.5 | 393.5 | 1954 | |
| 11 | 1961 | 624.8 | 388.3 | 1977 | |
| 12 | 1962 | 379.9 | 379.9 | 1962 | |
| 13 | 1963 | 336.6 | 373.7 | 1953 | |
| 14 | 1964 | 367.2 | 367.2 | 1964 | |
| 15 | 1965 | 291 | 364 | 1972 | |
| 16 | 1966 | 314.2 | 361.2 | 1975 | |
| 17 | 1967 | 676.5 | 350.9 | 1951 | |
| 18 | 1968 | 433.8 | 348.6 | 1957 | |
| 19 | 1969 | 407.5 | 348.5 | 1974 | |
| 20 | 1970 | 550.9 | 336.6 | 1963 | |
| 21 | 1971 | 18.2 | 314.2 | 1966 | |
| 22 | 1972 | 364 | 291 | 1965 | |
| 23 | 1973 | 71.7 | 290.5 | 1960 | |
| 24 | 1974 | 348.5 | 175.3 | 1955 | 90 |
| 25 | 1975 | 361.2 | 71.7 | 1973 | |
| 26 | 1977 | 388.3 | 18.2 | 1971 | |
| | सरासरी | 380 | 90टक्के विश्वासार्हतेचे पर्जन्यमान / 10टक्के विश्वासार्हतेचे पर्जन्यमान | | 0:31 |
| | प्रमाप विचलन | 145 | | | |
| | दोलायमानता गुणांक | 38 | | | |

## सारणी : 14.3

## प्रकल्पांची सद्यस्थिती

चलपाणीसाठा - दलघमी

पाणीवापर - दलघमी

सिंचनक्षेत्र - हेक्टर

| अक्र | प्रकल्पाचा संवर्ग | पूर्ण झालेले प्रकल्प | | | | प्रगतीपथावरील प्रकल्प | | | | भविष्यकालीन प्रकल्प | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 1 | मोठे | | | | | | | | | | | | | | 0 | 0 | 0 |
| 2 | मध्यम | | | | | | | | | 4 | 71.204 | 71.204 | 4796 | 4 | 71.204 | 71.204 | 4796 |
| 3 | ल.पा.तलाव | उमराणी | 0.93 | 0.93 | 105 | | | | | 25 | 30.56 | 30.56 | 2830 | 25 | 31.49 | 31.49 | 2935 |
| 4 | पाझर तलाव | 121 | 23.18 | 23.18 | 7583 | 4 | 1.12 | 1.12 | 251 | 268 | 75.04 | 75.04 | 18850 | 393 | 99.34 | 99.34 | 26684 |
| 5 | को.प.बंधारे | | | | | | | | | 22 | 4.73 | 4.73 | 965 | 22 | 4.73 | 4.73 | 965 |
| | एकूण | 122 | 24.11 | 24.11 | 7688 | 4 | 1.12 | 1.12 | 251 | 319 | 181.534 | 181.534 | 27441 | 445 | 206.764 | 206.764 | 35380 |

## सारणी : 14.4
## जलसंपत्तीचा ताळेबंद


जलसंपत्ती - दलघमी

| अक्र | उपलब्धता | | अक्र | वापर (सन2030) | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **भूपृष्ठावरील** | | 4 | **भूपृष्ठावरील** | |
| | अ) नैसर्गिक | | | अ) घरगुती वापरासाठी | |
| | 1) 75 टक्के विश्वासार्हतेने | 315 | | 1) नागरी | |
| | 2) 50 टक्के विश्वासार्हतेने | 482 | | 2) ग्रामीण | 6 |
| | 3) सरासरीने | 580 | | 3) पशूधन | 3 |
| | 4) नियोजनासाठी | 308 | | एकूण | 9 |
| | ब) मानवप्रबंधित | | | ब) उद्योगधंदयासाठी | |
| | 1) नागरी वापरातून पुनरुद्भव (80 %) | | | एकूण सिंचनेतर वापर | 9 |
| | 2) उद्योग धंदयातील पुनरुद्भव (97.5%) | | 5 | इतर उपखोऱ्यात स्थलांतरीत पाणी | |
| | 3) इतर खोऱ्यातून संक्रमित झालेले पाणी | | 6 | सिंचनासाठी उपलब्ध भूपृष्ठावरील पाणी | 329 |
| | **एकूण (1 ब)** | 0 | | (308-9)+30 | |
| 2 | मानवनिर्मित | | | | |
| | लाभक्षेत्रातील पुनर्भरण (308 -9) च्या10 % | 30 | | | |
| 3 | **एकूण उपलब्धता [308+ 30]** | **338** | 7 | एकूण वापर | **338** |
| | 1) भूजल उपलब्धता (वार्षिक एकूण पुनर्भरण ) | 54 | | अ) भूजलाचा सध्याचा सिंचनासाठी वापर | 3 |
| | 2) भूजल वापरास मूभा ( 54 च्या 65 %) | 35 | | | |

टीपा : 1) भूजल उपलब्धतेमूळे उपखोऱ्याच्या एकूण उपलब्धतेत वाढ होणार नाही ; भूजलाचा जेवढा उपसा होईल तेवढा नदी प्रवाह घटत जाईल म्हणून एकूण उपलब्धतेचा आकडा काढतांना भूजल उपलब्धतेचा विचार घेतलेला नाही.

2) संकलीत अंदाजासाठी सर्व पाण्याचा उपयोग भूपृष्ठावरील पाण्यातून दाखविला आहे. पण एकूण वापरापैकी अधिकाधिक 30+35= 65 भूजल माध्यमातून शक्य आहे.

3) पाणीवापराचे नियोजन उपलब्ध येवा मालिकेवर आधारित आहे.


नकाशा - 14.1
5 Km 0 5 10 Km
गुजरात
मध्य प्रदेश
नर्मदा नदी
खाट नदी
कात्री नदी
देवगंगा नदी
देवगंगा
देवनाड नदी
देवनाड
उदई नदी
उदई जलविद्युत प्रकल्प
अक्कलकुआ तालुका
धडगाव
तळोद्या कडे
शहाद्या कडे
मध्य तापी उपखोरे
नंदूरबार जिल्हा
1200
महाराष्ट्र राज्य
14 नर्मदा उपखोरे समूह
• संदर्भ सूची •
1. राज्य सरहद्द
2. जिल्हा सरहद्द
3. तालुका सरहद्द
4. उपखोरे सरहद्द
5. जिल्हा मुख्यालय
6. तालुका मुख्यालय
7. रेल्वे मार्ग
8. रस्ते
9. नद्या व नाले
10. समपर्जन्यमान रेषा (मिमी) 3200
11. धरणाचे ठिकाण व बुडीत क्षेत्र पूर्ण बांधकामाधीन भविष्यकालिन
12. औद्योगिक क्षेत्र
13. महानगरपालिका
14. नगर पालिका
15. जल - विद्युत प्रकल्प
उपखोऱ्याचे स्थान
उपखोरे क्र.
उपखोऱ्यांची नावे
गुजरात
मध्य प्रदेश
13
13
मध्य तापी
महाराष्ट्र जल व सिंचन आयोग
नर्मदा उपखोरे समूह
जून 1999

# उपखोरे :15

# ऊर्ध्व कृष्णा (पश्चिम)

## 1.0 भौगोलिक तपशील

1.1 पाणी नियोजनाच्या दृष्टीने या उपखोऱ्याचा ऊर्ध्व कृष्णा (पश्चिम-उत्तर) व ऊर्ध्व कृष्णा (पश्चिम-दक्षिण) (नकाशा 15.1) अशा दोन घटक क्षेत्रात विचार करणे उपयुक्त रहाणार आहे. म्हणजे त्यांच्या त्यांच्या स्थानिक वैशिष्ठ्यांप्रमाणे सुयोग्य तपशील निश्चित करणे सोपे जाईल. उपखोऱ्यात कृष्णा ही मुख्य नदी असून यात सातारा, सांगली, कोल्हापूर व सिंधुदुर्ग जिल्हयातील खाली दर्शविलेल्या तालुक्यांचे क्षेत्र येते. उपखोऱ्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र 15116 चौकिमी आहे.

**15 (अ) ऊर्ध्व कृष्णा (पश्चिम-उत्तर)**

**सातारा** : 1) सातारा 2) महाबळेश्वर 3) वाई 4) जावळी 5) कोरेगाव 6) कऱ्हाड 7) पाटण

**सांगली** : 1) शिराळा 2) वाळवा 3) मिरज 4) तासगाव 5) खानापूर

**कोल्हापूर** : 1) शाहूवाडी 2) पन्हाळा 3) हातकणंगले 4) शिरोळ 5) करवीर 6) कागल 7) राधानगरी 8) गगनबावडा 9) भूदरगड 10) गडहिंग्लज 11) आजरा

**15 (आ) ऊर्ध्व कृष्णा (पश्चिम-दक्षिण)**

**कोल्हापूर** : 1) चंदगड 2) गडहिंग्लज 3) आजरा.

मुख्य नदी, तिच्या उपनद्या इत्यादी बाबतची माहिती सारणी 15.1 मध्ये दिली आहे.

1.2 <u>विस्तार</u> : या उपखोऱ्याचा क्षेत्रीय विस्तार खालील प्रमाणे आहे.

15 अ :अक्षांश 16° 2` ते 18° 2` उत्तर व रेखांश 73° 32` ते 74° 40` पूर्व यामध्ये आहे.

15 आ :अक्षांश 15° 49` ते 16° 15` उत्तर व रेखांश 74° 0` ते 74° 30`पूर्व यामध्ये आहे.

1.3 <u>चतु:सीमा</u> : उपखोऱ्याच्या चतु:सीमा खालील प्रमाणे आहेत.

| अक्र | दिशा | तपशील | |
|---|---|---|---|
| | | 15 अ | 15 आ |
| 1 | उत्तर | उजनी (उर्वरीत भीमा )उपखोरे क्र 18 | ऊर्ध्व कृष्णा (पश्चिम-उत्तर)घटक15 अ |
| 2 | पूर्व | ऊर्ध्व कृष्णा (पूर्व) उपखोरे क्र 16,कर्नाटक | कर्नाटक |
| 3 | पश्चिम | सहयाद्री पर्वताच्या रांगा, कोकण प्रदेश | सहयाद्री पर्वताच्या रांगा, कोकण प्रदेश |
| 4 | दक्षिण | ऊर्ध्व कृष्णा (पश्चिम-दक्षिण) घटक15 आ | कर्नाटक |

## 2.0 हवामान

या उपखोऱ्यातील बव्हंश क्षेत्र जास्त 1200 मिमी हून अधिक पावसाच्या प्रदेशात येते. साधारणतः 85 टक्के पाऊस नैऋत्य मोसमी वाऱ्यांमुळे जून ते सप्टेंबर दरम्यान,10 टक्के

पाऊस ईशान्य मोसमी वाऱ्यामुळे सप्टेंबर ते डिसेंबर दरम्यान व 5 टक्के पाऊस डिसेंबर नंतर पडतो. वार्षिक सरासरी पर्जन्यमान 15 अ घटकामध्ये 1584 मिमी तर 15 आ घटकामध्ये 1907 मिमी आहे. या उपखोऱ्यातील पर्जन्यमानाचे प्रमाण पश्चिमेकडून पूर्वेकडे कमी होते. या उपखोऱ्यातील हवामान विषयक इतर बाबी व पर्जन्यमानातील दोलायमानता यांचा तपशील पूढील प्रमाणे आहे.

**15 अ ऊर्ध्व कृष्णा (पश्चिम-उत्तर) घटक**

तपमान - अंश सें, पर्जन्यमान मिमी

| अक्र | वैशिष्टये | परिमाण | वर्ष महिना | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1 | सर्वात अधिक पाऊस | 9480 | 1961 | वळवण ता.जावळी |
| 2 | सर्वात अधिक तपमान | 42 | मे1996 | गुढे ता.पाटण |
| 3 | सर्वात कमी तपमान | 6 | जानेवारी1996 | शिगाव ता.वाळवा |

कृषी हवामान वर्गीकरणानुसार या घटक क्षेत्राचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

3-घाट विभाग (GH),4-संक्रमण विभाग 1 : लाल ते लालसर तपकिरी रंगाच्या जमिनीचा विभाग (TR-1), 5-संक्रमण विभाग 2 : करडया रंगाच्या जमिनीचा विभाग (TR-2) व 6-अवर्षण (कमी पावसाचा) विभाग (SC).

पर्जन्यमानातील दोलायमानता गुणांक 26 (तक्ता 2.5.8) आहे.

**15 आ) ऊर्ध्व कृष्णा (पश्चिम दक्षिण)**

तपमान - अंश सें, पर्जन्यमान मिमी

| अक्र | वैशिष्टये | परिमाण | वर्ष महिना | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1 | सर्वात अधिक पाऊस | 3932 | 1994 | किटवडे ता.आजरा |
| 2 | सर्वात अधिक तपमान | 40 | 1996 | तारेवाडी ता.गडहिंग्लज |
| 3 | सर्वात कमी तपमान | 8 | 1996 | तारेवाडी ता.गडहिंग्लज |

कृषि हवामान वर्गीकरणानुसार या घटक क्षेत्राचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

3-घाट विभाग (GH) व 4-संक्रमण विभाग-1 लाल ते लालसर तपकिरी रंगाच्या जमिनीचा विभाग (TR-1).

पर्जन्यमानातील दोलायमानता गूणांक 23 (तक्ता 2.5.8) आहे.

पर्जन्यमानाचा माहवार तपशील (सरासरी)

| घटक क्षेत्र | जानेवारी | फेब्रुवारी | मार्च | एप्रिल | मे | जून | जुलै |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 15 अ | 2 | 1 | 5 | 25 | 47 | 245 | 550 |
| 15 आ | 1 | 1 | 9 | 36 | 62 | 358 | 727 |
| | ऑगस्ट | सप्टेंबर | ऑक्टोबर | नोव्हेंबर | डिसेंबर | एकूण | |
| 15 अ | 386 | 182 | 99 | 35 | 7 | 1584 | |
| 15 आ | 425 | 144 | 103 | 32 | 9 | 1907 | |

उपखोऱ्यातील पर्जन्यमापन केंद्रनिहाय तपशील सारणी 15.2 मध्ये दिला आहे.

2.1 बाष्पीभवन : या उपखोऱ्यातील सर्वाधिक बाष्पीभवन मे महिन्यात 220 मिमी तर सर्वात कमी बाष्पीभवन ऑगष्ट महिन्यात 80 मिमी आहे. केंद्रनिहाय व माहवार बाष्पीभवनाचा तपशील सारणी 15.3 मध्ये दिला आहे. महाराष्ट्रातील इतर उपखोऱ्यांच्या तुलनेने येथील बाष्पीभवन खूप कमी आहे. त्यामुळे जलाशयांच्या साठवणीतून बाष्पीभवनाने होणारा पाणीनाश येथे फारसा होत नाही. मोठाल्या जलाशयांच्या निर्मितीस ही एक मोठी अनुकूलता या क्षेत्रात आहे.

## 3.0 जलसंपत्तीची उपलब्धता

3.1 भूपृष्ठीय जलसंपत्ती : या उपखोऱ्यातील एकूण सरासरी येवा 21324 दलघमी आहे. वर्ष 1979-80 ते 1993-94 या अवधीतील सरितामापन केंद्राच्या आधारसामग्रीवर आधारभूत एकूण पाण्याची उपलब्धता खालीलप्रमाणे येते:

75 टक्के विश्वासार्हतेने 18819 दलघमी

50 टक्के विश्वासार्हतेने 22357 दलघमी.

ही मोजणी मर्यादित कालखंडाची आहे व तत्पूर्वीची अवर्षणाची वर्षे या मोजणीत आलेली नाहीत त्यामुळे सरासरी उपलब्धी वास्तवात बरीच कमी रहाणार आहे. येवा खाली दर्शविलेल्या सरितामापन केंद्रांद्वारे मोजला जातो.

येवा - दलघमी

| अक्र | सरितामापन केंद्राचे नाव | स्वामित्व | आधार सामुग्री उपलब्धीचा कालावधी | वार्षिक सरासरी येवा |
|---|---|---|---|---|
| | ऊर्ध्व कृष्णा (पश्चिम-उत्तर) | | | |
| 1 | वारुंजी | कें.ज.आ. | 1967-1994 | 2734 |
| 2 | कराड | कें.ज.आ. | 1967-1994 | 4368 |
| 3 | समडोळी | कें.ज.आ. | 1967-1994 | 3224 |
| 4 | अर्जूनवाड | कें.ज.आ. | 1967-1994 | 7559 |
| 5 | कुरुंदवाड | कें.ज.आ. | 1972-1994 | 11330 |
| 6 | तेरवाड | कें.ज.आ. | 1968-1994 | 4105 |
| 7 | वंदूर | कें.ज.आ. | 1979-1994 | 1062 |
| 8 | बस्तवाड | कें.ज.आ. | 1979-1994 | 1267 |
| | ऊर्ध्व कृष्णा (पश्चिम-दक्षिण) | | | |
| 1 | दड्डी (कर्नाटक) | कें.ज.आ. | 1979-1994 | 1873 |
| 2 | गोटूर | कें.ज.आ. | 1980-1994 | 1230 |

वेगवेगळया विश्वासार्हतेच्या येव्याची काही मर्यादित माहिती सारणी 15.4 मध्ये दर्शविली आहे.

3.2 <u>भूशैलीय रचना :</u>

<u>भूपृष्ठीय स्थिती (भूरुप वर्णन)</u> : उत्तर घटकातील साधारण 30 टक्के भूभाग अतिविच्छेदित व डोंगराळ, 49 टक्के पठारी व 21 टक्के सपाट व नदीलगतच्या गाळाचा आहे. यात भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा निर्देशित 62 पाणलोट क्षेत्रे आहेत.

या तुलनेत दक्षिण घटकातील साधारण 20 टक्के भूभाग अतिविच्छेदित व डोंगराळ आणि उर्वरीत 80 टक्के भूभाग पठारी आहे. यात भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा निर्देशित 12 पाणलोट क्षेत्रे आहेत. हा सलग पठारी भाग सघन शेतीसाठी व सिंचनासाठी अतिशय अनुकूल आहे.

<u>भूपृष्ठीय शैलस्थिती</u> : ऊर्ध्वकृष्णा (पश्चिम-उत्तर) घटक क्षेत्रात लाव्हा थरांपासून तयार झालेल्या दक्षिणी कातळ खडकाचे (डेक्कन ट्रॅपचे) प्रमाण मुख्यतः जास्त असून त्यात प्रामुख्याने अकुहरी बेसाल्ट आढळतो. दक्षिणी कातळ खडकाखाली कलादगी मालेतील क्वार्टझाईट व चुनखडीचे खडक दक्षिण-पश्चिम भागात आढळतात. पश्चिम घाटाकडील भागात दक्षिणी कातळ खडकावर जांभाखडक काही ठिकाणी आढळतो. उपखोऱ्यातील प्रमुख नद्यांच्या काठावर (कृष्णा, कोयना, पंचगंगा) दक्षिणी कातळ खडकाचेवर स्थानिक गाळ (जलोढ) आढळतो. त्याची जाडी साधारण 6 ते 20 मी असून त्यात माती (Clay), पोयटा (Silt) व वाळू आढळते.

आ) दक्षिण घटकक्षेत्रात लाव्हा थरांपासून तयार झालेल्या दक्षिणी कातळ खडकाचे (डेक्कन ट्रॅपचे) प्रमाण सर्वात जास्त (95 टक्के) असून त्यात अकुहरी बेसाल्टचे प्राबल्य जास्त आढळते. दक्षिणी कातळ खडकाखाली कलादगी मालेतील क्वार्टझाईट व चुनखडीचे खडक उत्तर-पश्चिम भागात आढळतात. पश्चिमेकडील भागात दक्षिणी कातळ खडकाचेवर जांभाखडक काही ठिकाणी आढळतो.

3.3 <u>भूजल संपत्ती</u>: दोन्ही घटकातील भूजल संपत्ती पर्जन्यमान, स्थलरूप आणि भूजलधारक प्रस्तरावर मोठया प्रमाणात अवलंबून आहे. पर्जन्यमान व भूजलधारक प्रस्तर सर्वसाधारणपणे सर्वदूर सारखे असल्यामुळे भूजल संपत्तीची स्थानीय उपलब्धता मुख्यतः भूरुपस्थितीवरच (Land forms) जास्त अवलंबून आहे. सर्वसाधारणपणे भूभाग खडबडीत असल्यामुळे भूजल संपत्ती मर्यादित असून त्या तुलनेत अपधाव फार जास्त आहे.

ऊर्ध्वकृष्णा (पश्चिम-उत्तर) घटकक्षेत्रातील अतिविच्छेदित व डोंगराळ भागात पाणी वाहून जाण्याचे प्रमाण अधिक व भूजल खूप कमी आहे. त्यामुळे या भागात विहिरीद्वारे सिंचन विकासास मर्यादा आहेत. पठारी भागात मात्र पुनर्भरण क्षेत्राचे प्रमाण सर्वात जास्त आहे. त्यामुळे भूजल उपलब्धी मध्यम स्वरुपाची असून पिकांसाठी विहिरीद्वारे सिंचन उपलब्ध होते.सपाट व नदीलगतच्या गाळाच्या प्रदेशात उतार कमी व वाळूचे प्रमाण चांगले असल्यामुळे त्यातील भूजलधारण क्षमता जास्त आहे. ही सर्व परिमाणे भूजल पुनर्भरणास उपयुक्त असल्यामुळे या भागात भूजल उपलब्धी चांगली आहे. विहिरीवरील सिंचनासाठी हा भाग अतिशय योग्य आहे.

सन 1990 च्या भूजल अंदाजानुसार एकूण पुनर्भरण (सिंचन क्षेत्रातील भरीसकट) 1555 दलघमी असून सिंचनाखालील विद्यमान विहिरींची संख्या 0.58 लक्ष आहे. भूजलाच्या अतिउपशामुळे कृ - 48 पाणलोट क्षेत्र (तालुके वाळवा,मिरज) विकसित (ग्रे) अवस्थेत आहे.

**ऊर्ध्व कृष्णा (पश्चिम दक्षिण)** घटकक्षेत्रातील अतिविच्छेदित व डोंगराळ भागात पाणी वाहून जाण्याचे प्रमाण जास्त असून भूजल संपत्ती खूपच कमी आहे. त्यामुळे या भागात विहिरीद्वारे सिंचन विकासास खूप मर्यादा आहेत.पठारी भाग सर्वात जास्त असून भूजल संपत्ती मध्यम

स्वरूपाची असून हंगामी पिकांसाठी विहिरीद्वारे सिंचन उपलब्ध होत आहे. काहीभागात भूपृष्ठावर निर्माण केलेल्या साठयामुळे भूजल पुनर्भरणास मदत होऊन तेथील भूजल उपलब्धी वाढलेली आहे. परिणाम स्वरूप विहिरींची संख्या वाढून भूजलाचा उपसाही वाढलेला आहे.

सन 1990 च्या भूजल अंदाजानुसार एकूण पुनर्भरण (सिंचन क्षेत्रातील भरीसकट) 214 दलघमी असून सिंचनाखालील विहिरींची संख्या 0.14 लक्ष आहे. अतिउपशामुळे कृ 84 1/2, 2/2 हे दोन लघुपाणलोट अतिविकसित (डार्क) (ता.चंदगड) व कृ-77 हा विकसित (ता.गडहिंगलज व आजरा) अवस्थेत आहेत.

3.4 अवर्षणप्रवण क्षेत्र : या उपखोऱ्याचे क्षेत्र 24 तालुक्यात पसरलेले आहे. त्यापैकी सातारा जिल्ह्यातील कोरेगाव तालुक्यातील 922 चौकिमी क्षेत्र सुकथनकर समितीच्या अहवालानंतर शासनाने अवर्षणप्रवण घोषीत केलेले आहे. या क्षेत्राचे वार्षिक सरासरी पर्जन्यमान 752 मिमी आहे तर एकूण लोकसंख्या 2.25 लक्ष आहे.

## 4.0 जमिनीचा तपशील

या उपखोऱ्यातील बरीचशी जमीन जांभ्या दगडापासून बनलेली आहे व डोंगरमाथ्यावर या जमिनीचा रंग तांबूस आहे तर नदीकिनारी काळा आहे.जमिनीचे वर्गीकरण पुढील प्रमाणे आहे.

| अक्र | तपशील | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | तांबूस तपकिरी डोंगर उतारावरील जमीन (बेसॉल्ट) | 28 |
| 2 | जांभ्या खडकाची जमीन | 19 |
| 3 | भरड उथळ जमीन | 5 |
| 4 | मध्यम काळी जमीन | 27 |
| 5 | खोल काळी जमीन | 16 |
| 6 | गाळाची जमीन | 5 |

## 5.0 जमिनीचा वापर

लागवडीयोग्य क्षेत्र, वन खात्याच्या अखत्यारीतील क्षेत्र, पडीतक्षेत्र इत्यादी तपशील खालील प्रमाणे आहे.

क्षेत्र - हजार हेक्टर

| अक्र | तपशील | (अ) पश्चिम-उत्तर | | (आ) पश्चिम -दक्षिण | |
|---|---|---|---|---|---|
| | | क्षेत्र | भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी | क्षेत्र | भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी |
| 1 | भौगोलिक क्षेत्र | 1337 | | 175 | |
| 2 | वन खात्याच्या अखत्यारीतील क्षेत्र | 193 | 14.5 | 33 | 18.8 |
| 3 | पेरणीसाठी उपलब्ध नसलेले क्षेत्र | | | | |
| | अ) ओसाड जमीन | 105 | 7.8 | 10 | 5.7 |

क्षेत्र - हजार हेक्टर

| अक्र | तपशील | (अ) पश्चिम-उत्तर | | (आ) पश्चिम -दक्षिण | |
|---|---|---|---|---|---|
| | | क्षेत्र | भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी | क्षेत्र | भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी |
| | आ) बिग़र शेती उपयोगाकरिता वापरात आणलेली जमीन | 51 | 3.8 | 8 | 4.6 |
| 4 | मशागत योग्य पडीक जमीन | 54 | 4.0 | 9 | 5.2 |
| 5 | कायमची कुरणे व चराऊ कुरणे | 78 | 5.9 | 9 | 5.2 |
| 6 | किरकोळ झाडे झुडपे यांच्या समुहाखालील क्षेत्र | 10 | 0.8 | 1 | 0.5 |
| 7 | चालू पडीक जमीन | 32 | 2.4 | 4 | 2.3 |
| 8 | इतर पडीक जमीन | 56 | 4.1 | 6 | 3.4 |
| 9 | पेरणीचे निव्वळ क्षेत्र | 758 | | 95 | |
| 10 | लागवडीयोग्य क्षेत्र (4+5+6+7+8+9) | 988 | 74 | 124 | 71 |
| 11 | दुसोटा क्षेत्र | 111 | | 13 | |
| 12 | पिकाखालील एकूण क्षेत्र (9+11) | 869 | | 108 | |
| 13 | पीक घनता (12 ÷9×100) | 115 | | 114 | |

या उपखोऱ्यातील पाण्याची उपलब्धता व सिंचनाची असलेली अनुकूलता पाहता विद्यमान दुसोटा क्षेत्र व पीक घनता फार कमी आहे व सिंचन क्षेत्राचा विस्तार करून ती वाढविण्यास उत्तम वाव आहे.

## 6.0 लोकसंख्या व पशुधन

6.1 <u>लोकसंख्या</u> : सन 1991 च्या जनगणनेनूसार या उपखोऱ्यातील एकूण लोकसंख्या 47.75 लक्ष आहे. त्यापैकी घटक 15 अ ची लोकसंख्या 42.53 लक्ष तर 15 आ मध्ये 5.22 लक्ष आहे. या उपखोऱ्यात सन 2030 पर्यन्त होणारी लोकसंख्येतील वाढ, अपेक्षित लोकसंख्या घनता पुढील प्रमाणे आहे.

लोकसंख्या-हजारात

| अक्र | लोकसंख्या तपशील | 1991 | | 2030 | |
|---|---|---|---|---|---|
| | | 15 अ | 15 आ | 15 अ | 15 आ |
| 1 | नागरी | 1057 | 22 | 2427 | 40 |
| 2 | ग्रामीण | 3196 | 500 | 6392 | 1000 |
| 3 | एकूण | 4253 | 522 | 8819 | 1040 |
| 4 | लोकसंख्या घनता | 316 | 340 | 656 | 681 |
| 5 | ग्रामीण लोकसंख्या घनता | 239 | 316 | 477 | 633 |

6.2 पशुधन : सन 1992 च्या मोजणीनूसार या उपखोऱ्यात एकूण पशुधन 2209931 आहे.पशुंची वर्गनिहाय संख्या खालील प्रमाणे आहे.

| घटक | म्हैस | गाय व बैल | एकखूरी व उंट | शेळी-मेंढी | डुकरे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| 15अ | 674222 | 508186 | 5430 | 753816 | 10128 | 1951782 |
| 13 आ | 125076 | 57864 | 412 | 73905 | 892 | 258149 |
| एकूण | 799298 | 566050 | 5842 | 827721 | 11020 | **2209931** |

6.3 इतर तपशील : घटक 15 अ मध्ये कोल्हापूर येथे महानगरपालिका आहे व पुढे दिलेल्या अन्य 16 ठिकाणी नगरपरिषदा आहेत. 1) महाबळेश्वर 2) सातारा 3) कराड 4) रहिमतपूर 5) वाई 6) पाचगणी 7) उरूण इस्लामपूर 8) आष्टा 9) जयसिंगपूर 10) पेठवडगाव 11) मलकापूर 12) कागल 13) पन्हाळा 14) इचलकरंजी 15) मुरमुड 16) कुरूंदवाड. घटक क्षेत्र 15 आ मध्ये गडहिंग्लज ही एक नगरपरिषद आहे. उपखोऱ्यातील शेत मजूरांची व इतर मजूरांची संख्या खालील प्रमाणे आहे.

संख्या-हजारात

| अक्र | घटक | शेत मजूर संख्या | इतर मजूर संख्या | एकूण |
|---|---|---|---|---|
| 1 | 15 अ | 374 | 767 | 1141 |
| 2 | 15 आ | 138 | 31 | 169 |

## 7.0 पाणीवापर

7.1 सिंचनासाठी वापर : उपखोऱ्यातील वर्गनिहाय प्रकल्प म्हणजे मोठे,मध्यम, बृहतलघु, लघु (स्थानिक स्तर), कोल्हापूर पध्दतीचे बंधारे यांची संख्या, पाणीसाठा, पाणीवापर, सिंचनक्षेत्र यांचा, तसेच पूर्ण झालेले, प्रगतीपथावरील व भविष्यकालीन प्रकल्प यांचा तपशील सारणी 15.5 मध्ये दर्शविला आहे. पूर्ण झालेल्या प्रकल्पांची निर्मित सिंचन क्षमता 52121 हेक्टर असून त्यातील प्रस्तावित पाणीवापर 2517 दलघमी आहे. सिंचनासाठी आणखी 472818 हेक्टर क्षेत्र उपलब्ध होऊ शकते पण त्यासाठी सध्याच्या पध्दतीप्रमाणे आणखी पाणीवापर 6303 दलघमी ने वाढवावा लागेल.

क्षेत्र-हेक्टर

| घटक | सिंचन क्षेत्र | | |
|---|---|---|---|
| | आतापर्यन्त झालेले | 2030 पर्यन्त होणारे | एकूण |
| 15 अ | 50675 | 433186 | 483861 |
| 15 आ | 1446 | 39632 | 41078 |
| एकूण | 52121 | 472818 | 524939 |

7.2 सिंचनेतर पाण्याचा वापर : सिंचनेतर उपयोगासाठी या उपखोऱ्यातील सध्याची गरज 192 दलघमी आहे. सन 2030 पर्यन्तची ती 431 दलघमी होईल.या गरजांचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

| अक्र | तपशील | वर्ष | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | 1991 | | 2030 | |
| | | 15अ | 15 आ | 15अ | 15 आ |
| 1 | घरगुती वापरासाठी | 150 | 17 | 299 | 30 |
| 2 | उद्योगासाठी | 23 | 2 | 93 | 9 |
| 3 | एकूण | 173 | 19 | 392 | 39 |

सध्याचा घरगुती वापराचा घटक निहाय तपशील खालील प्रमाणे आहे.

| घटक | नागरी | ग्रामीण | पशूधन | एकूण |
|---|---|---|---|---|
| 15 अ | 48 | 64 | 38 | 150 |
| 15 आ | 1 | 10 | 6 | 17 |

7.3 जलसंपत्तीचा ताळेबंद : एकूण (भूपृष्ठावरील व भूपृष्ठाखालील), आणि घरगूती वापरासाठी व सिंचनासाठी पाणीवापर व यातून होणारा पुनरुद्भव, इतर खोऱ्यातील पाण्याचे संक्रमण व त्याचा वापर याचा ताळेबंद सारणी 15.6 मध्ये दिलेला आहे.

7.4 <u>लाभक्षेत्र विकास</u> : सद्यःस्थिती खालील प्रमाणे आहे.

क्षेत्र-हजार हेक्टर

| घटक | भूविकास भाग-1चे (शेतचाऱ्या इ) झालेले काम | | भूविकास भाग-2चे(सपाटीकरण इ) झालेले काम | | प्रकल्पाच्या लाभक्षेत्रा-व्यतिरिक्त अन्य क्षेत्रात झालेले जमीन सपाटी करणाचे (भाग-2) क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|
| | ला.क्षे.वि.प्रा कडील प्रकल्प | ला.क्षे.वि.प्रा बाहेरील प्रकल्प | ला.क्षे.वि.प्रा कडील प्रकल्प | ला.क्षे.वि.प्रा बाहेरील प्रकल्प | |
| 15 अ | 61.18 | 1.17 | 31.54 | 0.13 | 3.09 |
| 15 आ | – | – | – | – | 0.18 |

7.5 <u>सन 1970 पूर्वीची धरणे</u> : सन 1970 पूर्वी खालील प्रमूख प्रकल्प पूर्ण झाले आहेत.

| अक्र | प्रकल्पाचे नांव | बांधकामाचे वर्ष |
|---|---|---|
| 1 | कोयना | 1962 |
| 2 | राधानगरी | 1874 |
| 3 | राजाराम तलाव | 1924 |
| 4 | रंकाळा तलाव | 1877 |

अक्र 2 व 3 या प्रकल्पामध्ये शेजपाळी पध्दतीने सिंचन होत असे.

## 8.0 पीकरचना

उपखोऱ्यातील पीक क्षेत्र 9.77 लक्ष हेक्टर आहे. यात रब्बी व बारमाही पिकांचे एकत्रित क्षेत्र खरीपक्षेत्रापेक्षा जास्त आहे. उपखोऱ्यातील जमीन व हवामानास अनुकूल भात, खरीप ज्वारी, रब्बी ज्वारी, बाजरी, उन्हाळी भूईमूग, मिरची, बटाटा, ऊस, पपई, पेरु, काजू व गहू ही पिके आहेत. काही प्रमुख पिकांची दरहेक्टरी सरासरी उत्पादकता खालील प्रमाणे आहे.

उत्पादकता-क्विंटल /हेक्टर

| अक्र | पीक | उत्पादकता | |
|---|---|---|---|
| | | 15 अ | 15 आ |
| 1 | ख.ज्वारी | 16.02 | |
| 2 | र.ज्वारी | 6.58 | |
| 3 | भात | 19.75 | 20.36 |
| 4 | ख.भुईमूग | 15.34 | 18.57 |
| 5 | ऊस | 872 | 856 |

उपखोऱ्यातील पिकांची हंगामनिहाय टक्केवारी खालील प्रमाणे आहे.

| अक्र | पीक | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | खरीप | 45 |
| 2 | रबी | 40 |
| 3 | दुहंगामी | – |
| 4 | उन्हाळी | – |
| 5 | बारमाही | 15 |

## 9.0 उद्योगधंदे

कृषी आधारित उद्योगधंद्याचा विकास विशेषतः ऊस उत्पन्नावर व कापूस उत्पन्नावर आधारित कारखान्यांची संख्या मोठी आहे. बारा साखर कारखान्यांचे काम पश्चिम उत्तर घटकात प्रगतिपथावर आहे.

| अक्र | तपशील | 15 अ | 15 आ |
|---|---|---|---|
| 1 | साखर कारखाने | 18 | 3 |
| 2 | सूत गिरण्या | 16 | 2 |

## 10.0 जलविद्युत निर्मिती

या उपखोऱ्यातील भौगोलिक परिस्थिती व पाण्याची उपलब्धता यामुळे जलविद्युत निर्मितीस खूपच वाव आहे. आतापर्यन्त या उपखोऱ्यात एकूण 8 जलविद्युत प्रकल्प पूर्ण झाले असून 931 मेवॅ जलविद्युत निर्मिती क्षमता निर्माण झाली आहे. यामध्ये कोयना प्रकल्पाचा समावेश आहे. या प्रकल्पाद्वारे एकूण 920 मेवॅ जलविद्युत निर्मितीक्षमता निर्माण झालेली आहे व नुकताच या प्रकल्पाचा टप्पा-4 कार्यान्वित झाला आहे. त्यातून 1000 मेवॅ अतिरिक्त स्थापित क्षमता हाती येणार आहे. तसेच 12 प्रकल्पांचे बांधकाम चालू आहे त्या बारा प्रकल्पांमुळे

आणखी 1064 मेवॅ क्षमता निर्माण होईल. तसेच अन्वेषणाधीन व भविष्यकालीन 21 प्रकल्प असून त्याची नियोजित क्षमता 834 मेवॅ होईल. विद्युत प्रकल्पाबाबतची तपशीलवार माहिती सारणी 15.7 मध्ये दिली आहे. अशा प्रकारे एकूण 2829 मेवॅ क्षमता या उपखोऱ्यातून मिळू शकणार आहे.

## 11.0 दळणवळणाची साधने

उपखोऱ्यात खालील प्रमाणे दळणवळणाची सोय उपलब्ध आहे.

ऊर्ध्वकृष्णा (पश्चिम-उत्तर)

| | | |
|---|---|---|
| 1 | हवाई वाहतूक | कोल्हापूर व कराड येथे विमानतळ आहेत. |
| 2 | रेल्वेमार्ग | कोल्हापूर-पुणे ब्रॉडगेज एकेरी |
| 3 | राष्ट्रीय महामार्ग | पुणे-बंगलोर रा.म.क्र 4 |
| 4 | राज्य महामार्ग | 1) नागपूर-रत्नागिरी 2) निपाणी राधानगरी 3) कोल्हापूर-गारगोटी 4) विटा - कोकरुड 5) सातारा-फलटण 6) कराड- कोयनानगर 7) कराड - फलटण |

ऊर्ध्वकृष्णा (पश्चिम दक्षिण)

पुणे-बंगलोर हा राष्ट्रीय महामार्ग या उपखोऱ्यातून जातो तसेच निपाणी-आजरा, कोल्हापूर-गारगोटी, संकेश्वर-मालवण, बेळगाव-वेंगूर्ले हे राज्य महामार्ग जातात.

## 12.0 भावी नियोजनाच्या दिशा

12.1 <u>पाण्याची उपलब्धता व वापर</u> : कृष्णा लवादाच्या निर्णयाच्या अनुपालनास्तव या उपखोऱ्यांतर्गत असलेल्या कोयना उपखोऱ्यामध्ये कोयना जलविद्युत प्रकल्पाद्वारे पश्चिमेकडे जे पाणी वळविले जाणार आहे त्याचे परिमाण 1911 दलघमी पेक्षा (1-6-94 च्या पुढे) अधिक असावयास नको. तसेच घटप्रभा उपखोऱ्यामध्ये कमाल पाणीवापर 198 दलघमी (7 अघफू) पेक्षा अधिक नको तर भीमा नदीवर 2690 दलघमी पेक्षा जास्त नको. पूर्ण कृष्णा उपखोऱ्यात लवादाने 16818 दलघमी (*594 अघफू) पाणी वापरास मुभा दिलेली आहे. लवादाने पाणीवापराची जी मार्गदर्शक तत्वे सांगितलेली आहेत त्यानुसार नागरी व औद्योगिक पाणीवापर प्रत्यक्ष झालेल्या वापराच्या अनुक्रमे 20 टक्के व 2.5 टक्के धरावयाचा आहे. अर्थात यासाठी आवश्यक ते नियम व कार्यवाही करणे अपेक्षित आहे या तत्वानुसार पूर्ण कृष्णा उपखोऱ्यातील पाण्याचे नियोजन क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी 20456 दलघमी (722.50 अघफू) इतक्या एकूण वापर क्षमतेचे प्रस्तावित केलेले आहे. एकंदर वापर प्रतिवर्षी 16818 घमी पेक्षा अधिक असणार नाही ही मर्यादा यात अभिप्रेत आहे.

ऊर्ध्व कृष्णा (पश्चिम) उपखोऱ्यातील पाण्याची निसर्गतः सरासरी उपलब्धता 21324 दलघमी आहे. परंतु महाराष्ट्राच्या कृष्णा खोरे क्षेत्रात एकूण मिळून जी 16818 दलघमी पर्यन्तच पाणी

---

* कृष्णा पाणी तंटा लवादाच्या निर्णयानुसार (1976) महाराष्ट्राला मिळणाऱ्या 16818दलघमी (594 अघफू) वाटपाची फोड

1) लवादाने निश्चित केलेला राज्याचा वाटा-15855 दलघमी (560 अघफू)

2) प्रतिवर्षी 3 अघफू पेक्षा अधिक वापर असलेल्या प्रकल्पातून होणारा पुनरुद्भव-708 दलघमी (25 अघफू)

3) पोलावरम प्रकल्पातून होणाऱ्या आंतरखोरे जलस्थलांतरा प्रित्यर्थ राज्याला मिळालेला हिस्सा (396 दलघमी) (14 अघफू)

4) चेन्नई शहराला पाणी पुरवठ्यासाठी करारानुसार महाराष्ट्राने द्यावयाचे पाणी = 141 दलघमी (5अघफू)

वापरायची अनुमती आहे त्यानुसार ऊर्ध्व कृष्णा (पश्चिम) या उपखोऱ्यातील पाण्याचा नियोजित पाणी वापर खालील प्रमाणे ठरविण्यात आलेला आहे.

| अक्र | उपखोरे | पाणीवापर |
|---|---|---|
| 1 | वेदगंगा | 125 |
| 2 | दूधगंगा | 630 |
| 3 | पंचगंगा | 622 |
| 4 | वारणा | 960 |
| 5 | कोयना | 2159 |
| 6 | कृष्णा खुद्द | 2937 |
| 7 | घटप्रभा | 245 |
| | **एकूण :** | 7678 |

त्यातून ऊर्ध्व कृष्णा (पूर्व), उर्वरीत भीमा व ऊर्ध्व कृष्णा (पूर्व) या घटकांसाठी आंतरखोरे स्थलांतराने पाणी देण्याचे योजण्यात आलेले आहे. त्यासाठी पुढील प्रमाणे योजना आहेत.

पाणी - दलघमी

| अक्र | योजनेचे नाव | स्थलांतरित पाणी | पाणी मिळणारे संबांधीत उपखोरे |
|---|---|---|---|
| 1 | धोम-बलकवडी बोगदा | 109 | उर्वरीत भीमा |
| 2 | जिहे काठापूर उपसा सिंचन योजना | 38 | ऊर्ध्व कृष्णा (पूर्व) |
| 3 | जिहे काठापूर उपसा सिंचन योजना | 22 | उर्वरीत भीमा |
| 4 | तारळी पाटबंधारे प्रकल्प | 48 | उर्वरीत भीमा |
| 5 | तारळी पाटबंधारे प्रकल्प | 48 | ऊर्ध्व कृष्णा (पूर्व) |
| 6 | उरमोडी पाटबंधारे प्रकल्प | 105 | उर्वरीत भीमा |
| 7 | उरमोडी पाटबंधारे प्रकल्प | 169 | ऊर्ध्व कृष्णा (पूर्व) |
| 8 | टेंभू उपसा सिंचन योजना | 341 | ऊर्ध्व कृष्णा (पूर्व) |
| 9 | टेंभू उपसा सिंचन योजना | 282 | उर्वरीत भीमा |
| 10 | कृष्णा कोयना उपसा सिंचन योजना (ताकारी) | 847 | ऊर्ध्व कृष्णा (पूर्व) |
| 11 | कृष्णा कोयना उपसा सिंचन योजना (म्हैसाळ) | 66 | ऊर्ध्व कृष्णा (पूर्व) |
| 12 | कृष्णा कोयना उपसा सिंचन योजना (म्हैसाळ) | 66 | उर्वरीत भीमा |
| 13 | कोयना जलविद्युत प्रकल्प टप्पा 1 ते 4 | 1911 | वाशिष्ठी (कोयना प्रकल्पाचे अवजल) |
| | **एकूण :** | 4052 | |

अशा प्रकारे एकूण स्थलातरित करावयाचे 4052 दलघमी पाणी वगळता कृष्णा ऊर्ध्व (पश्चिम-उत्तर) उपखोऱ्यातील निव्वळ वापरासाठी 3626 दलघमी पाणी उपलब्ध राहील.

12.2 पाणी वापराची सद्यःस्थिती :

या उपखोऱ्यात 1996 पावेतो 3 मोठे, 3 मध्यम आणि 41 लघु प्रकल्प झालेले आहेत. यातील को.प. बंधाऱ्याची संख्या 5 आहे. याद्वारे निर्माण झालेला पाणीसाठा 3085 दलघमी आहे.

ऊर्ध्व कृष्णा (पश्चिम) या उपखोऱ्यात कोयना हा जलविद्युत प्रकल्प आहे. त्या प्रकल्पांतर्गत असलेले कोयना हे धरण (उंची 103 मीटर तसेच जलधारण क्षमता 2795 दलघमी) राष्ट्रीयदृष्टया महत्वाच्या धरणात गणले जाते. या प्रकल्पाच्या पाणीवापराचे पुनर्नियोजन करणे आवश्यक आहे. त्यामुळे कोयना या ठिकाणचे सर्व पाणी वापरता येईल.

कृष्णा लवादाच्या निर्णयाप्रमाणे पाण्याचे साठे वाढविण्यावर वा धरणाची उंची वाढविण्यावर कसल्याही मर्यादा नाहीत. मर्यादा जी आहे ती एकूण वार्षिक पाणीवापरावर. म्हणून पाण्याची अनुकूल नैसर्गिक उपलब्धता पहाता व पाण्याच्या उपलब्धतेच्या दोलायमानतेवर मात करण्यासाठी पाण्याची साठवण क्षमता वापराच्या तुलनेत निदान 30 % जास्त असणे इष्ट आहे. शिवाय केवळ जलविद्युत निर्मितीसाठी स्वतंत्र साठवण वाढवण्याचा विचार त्या त्या धरणस्थळाची आर्थिक तांत्रिक अनुकूलता पाहून करता येण्यासारखा आहे. अशा जास्त साठवणीतून पाणी नदी प्रवाहात सोडून वीजनिर्मिती करता येईल यादृष्टीने धरणाच्या साठ्यांचा व उंचीचा फेरविचार होणे इष्ट राहील. अशा व्यवस्थेमुळे खालच्या राज्यांच्या प्रदेशांना नियंत्रित अतिरिक्त प्रवाह उपलब्ध होईल व तोहि त्यांना सोयीचा राहील. या सोयीची किमत म्हणून धरणाच्या वाढीव साठवणीत व उंचीत त्यांच्या इच्छेनुरूप ते आर्थिक सहभागही देऊ शकतील.

12.3 या उपखोऱ्यातील वेण्णा, उरमोडी, कडवी, धामणी, कासारी, धूमनी इ. उपनद्यांची मर्यादित लांबी (100 किमी पर्यन्तच) पण प्रवाहपात्राचा उतार मात्र 300 हून अधिक मीटर ही भूपृष्ठीय स्थिती जलविद्युत निर्मितीस विशेष आकर्षक आहे. त्यादृष्टीने या उपनद्यांच्या विद्यूत निर्मिती क्षमतेचा अभ्यास होणे इष्ट राहील. तसेच वारणा, दूधगंगा या धरणांच्या उंचीचाही वीजनिर्मितीच्या दृष्टीकोनातून विचार होणे इष्ट राहील.

12.4 पश्चिम घाटावर कोकणाकडे साधारणतः 500 ते 600 मीटर खोलीचा नैसर्गिक कडा मिळतो. त्याचाहि फायदा घेऊन व उदंचन साठवण तंत्राच्या उपयोगाने या उपखोऱ्यातील साठवणी वापरून ज्यादा मागणीच्या काळात वीजपुरवठा करणारे विद्युतनिर्मितीचे प्रकल्प करता येणे शक्य दिसते. एकंदरीनेच आंतरराज्यीय वीजजाळ्यात अशा प्रकारे दिवसातून अंशकालीन वीजपुरवठा करणाऱ्या केंद्राची गरज वाढती राहील असे दिसते. त्यासाठीची पुरवठा व्यवस्था या वीजजाळ्याचा लाभ घेणाऱ्यां राज्यांशी संवाद करून कार्यान्वित करता येईल असे वाटते.दिवसातील फार कमी काळात (साधारणतः 8 तास ) जास्त विजेची क्षमता लागते. उरलेल्या जास्तीच्या काळात ( During off Peak load period ) ही उदंचन केंद्रे पंप म्हणून चालवून पश्चिम वाहिनी मुबलक पाणी पूर्वेकडे वळवून या उपखोऱ्यातील जलाशयातून होणारा पाण्याचा बाष्पीभवन ऱ्हास पण भरुन काढता येईल. हा एक अधिकचा लाभ दृष्टीक्षेपात ठेवणे इष्ट राहील.

12.5 या उपखोऱ्यात पाण्याची अनुकूलता असल्यामूळे व चांगल्या निचऱ्याची नैसर्गिक अनुकूलता असलेल्या जमिनी असल्यामूळे हा पट्टा बारमाही पिकांना एकंदरीनेच अनुकूल आहे. त्या पिकांची पुष्कळशी गरज निसर्गतः पावसाच्या पाण्यावर काही महिने परस्पर निभावली जाते.

त्यामुळे अवर्षणप्रवण क्षेत्राइतका सिंचनाचा आधार येथील बारमाही पिकांना लागत नाही. ऊसासारख्या पिकाच्या क्षेत्रावर मर्यादा न घालता सघन सिंचन व्यवस्था या उपखोऱ्यात राबविण्यास अनुकूलता आहे. त्यामूळे ऊस पिकाची विस्तृत वाढ या उपखोऱ्यात झाली आहे. सध्या पश्चिम उत्तर घटक क्षेत्रांत 18 साखर कारखाने कार्यान्वित तर 12 बांधकामाधीन आहेत व पश्चिम दक्षिण घटक क्षेत्रात 3 साखर कारखाने कार्यान्वित आहेत.

12.6 या उपखोऱ्यामध्ये पाणी व जमीन दोहोंची अनुकूलता असल्यामुळे इतर उपखोऱ्यांच्या तुलनेने लोकसंख्येची घनता जास्त आहे व आता रस्ते बांधणी वाढल्यामुळे व इतर सोयीतही वाढ झाल्यामुळे लोकसंख्येत आणखी वाढ होईल असे दिसते.

12.7 या उपखोऱ्यामध्ये कोल्हापूर ही एकमेव महानगरपालिका, 17 नगरपालिका, 21 साखर कारखाने व 43 औद्योगिक वसाहती आहेत. महाबळेश्वर येथे उगम पावणाऱ्या कृष्णा नदीचे पाणी काठावरील वाई, कऱ्हाड, सातारा, सांगली, मिरज सारखी मोठी शहरे, मोठया औद्योगिक वसाहती आणि साखर कारखाने यांच्या सांडपाण्यामुळे वाढत्या प्रमाणात प्रदूषित होत आहे. विशेषतः या उपखोऱ्यात कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याची साखळी निर्माण झालेली असल्यामुळे अवतीभोवतीच्या परिसरातून प्रक्रिया न केलेले सांडपाणी सरळ नदीमध्ये आल्यानंतर या बंधाऱ्याच्या मागे प्रदूषित पाण्याचीही साखळी होते आहे. सातारा, सांगली इ. शहरांना पाणी पुरविणाऱ्या योजनेतील पाणी काळे निळे झाल्यामुळे या उपखोऱ्यातील नदी प्रवाहामधून व्हावयाचा पाणी पुरवठा बंदही ठेवावा लागत आहे. यावरुन त्याचे गांभीर्य लक्षात येते. या बाबीकडे सत्वर लक्ष देवून या उपखोऱ्यात तातडीच्या उपाय योजना करण्याची गरज आहे. कृष्णा नदीच्या प्रदूषणाच्या नियंत्रणासाठी केंद्र शासनाने योजना मंजूर केली आहे असे समजते. त्याचा लाभ या उपखोऱ्याला घेता येईल.

या उपखोऱ्यात 1877 साली कोल्हापूर येथील संस्थानिकांनी कोल्हापूर शहराला लागूनच शहराच्या पाणीपुरवठयासाठी व सिंचनासाठी रंकाळा नावाचा तलाव बांधला. पण कोल्हापूर शहराच्या आवती भोवतीच्या औद्योगिक वसाहतीच्या वाढीमुळे हा तलाव आता अतिशय प्रदूषित झाला आहे. या तलावातून सिंचनाचीहि सोय उपलब्ध आहे. या तलावाचे पुनरुज्जीवन होऊन पाण्याच्या गुणवत्तेचे संरक्षण होणारी व्यवस्था तलाव परिसरांत व स्रवणक्षेत्रात निर्माण होणे अत्यंत आवश्यक आहे.

12.8 या उपखोऱ्याचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे छत्रपती शाहू महाराजांनी विकसित केलेली पंचगंगा नदीतील सिंचनाच्या पाण्याची व्यवस्था. राधानगरी येथे दगडी धरणातून पाणी नदीत घेऊन नदीवरील बंधाऱ्या पासून मोटेद्वारे सामूहिक पध्दतीने नदीच्या दोन्ही तीरावरील जमिनी सिंचनाखाली आणल्या गेल्या. या प्रदेशातील सहकारी व्यवस्थेचा पाया त्या काळात रुजविलेल्या सहकारी सिंचन व्यवस्थेत स्पष्ट दिसतो. शेतकरी स्वतःच सामूहिक व्यवस्थापनाद्वारे उपसा सिंचन योजना राबवून दूर अंतरावर पाणी नेऊन मोठया प्रमाणात शेतीची वाढ करतो आहे. या सहकारी पध्दतीला अधिक व्यवस्थित रूप देऊन पाण्याचा काटकसरीने वापर वाढवण्यासाठी औपचारिक पाणीवापर संस्थांचे जाळे येथे लवकर बसवले जाणे इष्ट राहील. महाराष्ट्रात आज कोल्हापूर पध्दतीचे हजारो बंधारे बांधण्यात येत आहेत. त्या बंधाऱ्याचा उगम या उपखोऱ्यातील 19 व्या शतकाच्या सुरुवातीच्या सिंचन विकास प्रक्रियेत आहे.

ऊस पिकाच्या क्षेत्रावर व पाणीवापरावर नियंत्रण नसल्यामुळे या उपखोऱ्याला पाणथळ क्षारपड व नापीक जमिनीचा वाढता धोका झालेला आहे. पाणथळ, क्षारपड व नापीक झालेल्या या जमिनीच्या दुरुस्तीचे प्रश्न जटील आहेत. ऊसाचे दरहेक्टरी उत्पादनही घसरताना दिसत आहे. म्हणून सिंचनाच्या कार्यपध्दतीच्या तपशीलाचा या उपखोऱ्यात फेरविचार होऊन अधिक

स्थायी लाभ देणारी सिंचन व्यवस्थापनाची पध्दत आता नव्याने विकसित करण्याची वेळ आली आहे.

12.9 कृष्णा नदीच्या काठावरील मातीचा उपयोग मोठया प्रमाणावर विटा तयार करण्यासाठी होत आहे. त्यामुळे नदीचा प्रवाह बदलत आहे व सुपीक जमीन वाया जात आहे. त्या बाबत योग्य ते नियोजन व नियमन आवश्यक झाले आहे.

12.10 या उपखोऱ्यातील डोंगराळ जमीन व मुबलक पाणी यामुळे या भागामध्ये दुग्धव्यवसाय मोठया प्रमाणांत वाढलेला आहे. हा दुग्धव्यवसाय सहकारी सामूहिक पध्दतीतून विकास पावला आहे. अशा प्रकारे आर्थिक समृध्दीला आवश्यक असणाऱ्या विविध घटकांची जुळणी तयार झालेली आहे. त्याच्या विस्ताराची गरज दिसते.

12.11 या उपखोऱ्यातच कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठ आहे व उपखोऱ्यातील शहरांमध्ये अभियांत्रिकी महाविद्यालये आहेत. सामाजिक, आर्थिक व पर्यावरणीय दृष्टिकोनातून अभ्यास करणाऱ्या संस्थाही आहेत. सर्वांच्या माध्यमातून या उपखोऱ्याचा सर्वांगीण अभ्यास होऊन पाण्याच्या संबधीत निदान पुढील 30 वर्षांचा तपशीलवार विकास कार्यक्रम तयार होणे आता आवश्यक आहे. अशा समन्वयासाठी सध्या काही औपचारिक मंच उपखोऱ्यात उपलब्ध दिसत नाहीत. त्याची तातडीने निर्मिती होणे इष्ट राहील.

सारणी 15.1

**भौगोलिक तपशील**

लांबी - किमी; तलांक - मी

| अक्र | नदी | उपनदी | लांबी | उगमस्थान ठिकाण | उगमस्थान तलांक | संगमस्थान ठिकाण | संगमस्थान तलांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **अ-पश्चिम-उत्तर** | | | | | | | |
| 1 | कृष्णा | | 301* | क्षेत्र महाबळेश्वर | 1371 | महाराष्ट्र हद्द (राजापूर) | 519 |
| | | कुडाळी | 29 | भिलार | 1381 | उडतारे | 678 |
| | | वेण्णा | 56 | क्षेत्र महाबळेश्वर | 1416 | क्षेत्र माहुली | 605 |
| | | उरमोडी | 47 | केळघर (कास) | 1265 | कोपर्डे काशीळ | 600 |
| | | तारळी | 43 | कुशी | 1000 | उंब्रज | 584 |
| | | मांड | 19 | सडा वाघापूर | 1104 | उंब्रज | 584 |
| | | वसना | 71 | सोळशी | 1098 | तासगांव | 604 |
| | | वांगना | 24 | चिलेवाडी | 937 | कोरेगांव | 806 |
| 2 | कोयना | | 119 | क्षेत्र महाबळेश्वर | 1341 | कराड (प्रीतिसंगम) | 561 |
| | | सोळशी | 19 | देवसरे | 1370 | तापोळे | 621 |
| | | कांदती | 20 | उचांट | 1171 | निवली | 982 |
| | | केरा | 20 | कुशी | 1140 | पाटण | 577 |
| | | मोरणा (पाटण) | 26 | अतोली | 652 | सांगवड | 577 |
| | | वांग | 35 | वणोरी | 1104 | चचेगांव | 568 |
| 3 | वारणा | | 104 | पाथरपुंज | 900 | हरीपुर | 528 |
| | | कडवी | 26 | आंबा | 786 | सागांव | 547 |
| | | मोरणा(शिराळा) | 26 | कोंडाईवाडी | 764 | मांगले | 542 |
| 4 | पंचगंगा | | 83 | वरणगे | 532 | कुरुंदवाड | 520 |
| | | कासारी | 80 | गजापूर | 781 | वरगणे | 532 |
| | | कुंभी | 52 | जेटणे | 786 | कोगे | 536 |
| | | धामणी | 48 | धनगरवाडी | 1006 | तांदूळवाडी | 540 |
| | | तुळशी | 38 | दुर्गमानवाड | 1019 | कोगे | 546 |
| | | भोगावती | 99 | आशे | 806 | वरणगे | 532 |
| 5 | दुधगंगा | | 69 | ओगवी | 901 | येडूर | 534 |
| 6 | वेदगंगा | | 66 | भाटवाडी | 680 | कुनूर | 536 |
| **आ-पश्चिम-दक्षिण** | | | | | | | |
| 1 | घटप्रभा | | 59 | चौकूळ | 838 | मांगूर | 680 |
| | | हिरण्यकेशी | 69 | आंबोली | 860 | सूलतानपूर | 690 |
| | | ताम्रपर्णी | 51 | धांगरवाडी | 780 | दड्डी | 700 |
| | | मार्कंडेय | 8 | वाकनूर | 800 | गोकाक | 747 |

* महाराष्ट्रातील उपखोऱ्याच्या मर्यादेत

सारणी:15.2

पर्जन्यमापन केंद्रांचा तपशील

पजन्य-ममा

| अक्र | केंद्राचे नाव | प्रकार | स्वामित्व | आधार सामुग्री उपलब्धीचे प्रारंभिक वर्ष | वार्षिक सरासरी पर्जन्य |
|---|---|---|---|---|---|
| **अ-पश्चिम-उत्तर** | | | | | |
| 1 | महाबळेश्वर | स्व.प. | मा.ह.खा. | 1995 | 5953 |
| 2 | मेढा | स्व.प. | मा.ह.खा. | 1977 | 1688 |
| 3 | पाचगणी | स्व.प. | मा.ह.खा. | 1986 | 1982 |
| 4 | वाइ | स्व.प. | मा.ह.खा. | 1988 | 766 |
| 5 | सातारा | स्व.प. | मा.ह.खा. | 1984 | 1031 |
| 6 | कोरेगाव | स्व.प. | मा.ह.खा. | 1984 | 731 |
| 7 | पाटण | स्व.प. | मा.ह.खा. | 1986 | 1784 |
| 8 | कराड | स्व.प. | मा.ह.खा. | 1987 | 722 |
| 9 | जावळी | स्व.प. | मा.ह.खा. | 1902 | 1483 |
| 10 | शाहूवाडी | स्व.प. | मा.ह.खा. | 1929 | 1656 |
| 11 | शिराळा | स्व.प. | मा.ह.खा. | 1987 | 921 |
| 12 | इस्लामपूर | स्व.प. | मा.ह.खा. | 1985 | 658 |
| 13 | सांगली | स्व.प. | मा.ह.खा. | 1971 | 645 |
| 14 | मिरज | स्व.प. | मा.ह.खा. | 1939 | 619 |
| 15 | शिरोळ | स्व.प. | मा.ह.खा. | 1987 | 609 |
| 16 | कुरुंदवाड | स्व.प. | मा.ह.खा. | 1961 | 522 |
| 17 | हातकणंगले | स्व.प. | मा.ह.खा. | 1930 | 678 |
| 18 | कागल | स्व.प. | मा.ह.खा. | 1930 | 857 |
| 19 | कोल्हापूर | स्व.प. | मा.ह.खा. | 1972 | 1020 |
| 20 | पन्हाळा | स्व.प. | मा.ह.खा. | 1927 | 1591 |
| 21 | गगनबावडा | स्व.प. | मा.ह.खा. | 1986 | 5445 |
| 22 | राधानगरी | स्व.प. | मा.ह.खा. | 1953 | 3570 |
| 23 | भुदरगड | स्व.प. | मा.ह.खा. | 1901 | 1491 |
| **आ-पश्चिम-दक्षिण** | | | | | |
| 1 | चंदगड | स्व.प. | मा.ह.खा. | 1988 | 1988 |
| 2 | आजरा | स्व.प. | मा.ह.खा. | 1930 | 1930 |
| 3 | गडहिंग्लज | स्व.प. | मा.ह.खा. | 1988 | 1988 |

टीप : स्व.प. - स्वयंचलित पर्जन्यमापन केंद्र
मा.ह.खा. - भारतीय हवामान खाते

सारणी :15.3

**केंद्रनिहाय बाष्पीभवन**

बाष्पीभवन-मिमी

| अक्र | केंद्र | फेब्रुवारी | मार्च | एप्रिल | मे | जून | जुलै | ऑगस्ट | सप्टेंबर | ऑक्टोबर | नोव्हेंबर | डिसेंबर | जानेवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अ-पश्चिम-उत्तर** | | | | | | | | | | | | |
| 1 | शिगांव | 100 | 183 | 198 | 195 | 122 | 69 | 67 | 86 | 86 | 80 | 79 | 87 |
| 2 | सुरुड | 83 | 156 | 170 | 176 | 104 | 59 | 61 | 68 | 76 | 70 | 69 | 74 |
| 3 | गुढे | 104 | 201 | 220 | 209 | 116 | 68 | 58 | 79 | 95 | 82 | 81 | 87 |
| 4 | अंबळे | 132 | 253 | 266 | 276 | 192 | 138 | 132 | 141 | 122 | 113 | 105 | 107 |
| 5 | शिवडे | 138 | 212 | 245 | 237 | 145 | 91 | 69 | 88 | 103 | 97 | 104 | 113 |
| 6 | राजाराम टॅंक | 110 | 183 | 186 | 180 | 104 | 73 | 63 | 80 | 85 | 83 | 90 | 100 |
| 7 | परळी | 127 | 215 | 234 | 253 | 163 | 94 | 89 | 104 | 103 | 103 | 106 | 112 |
| 8 | निटवडे | 93 | 169 | 201 | 195 | 129 | 82 | 83 | 91 | 92 | 87 | 89 | 96 |
| 9 | मांडुकली | 106 | 184 | 204 | 196 | 137 | 80 | 88 | 95 | 100 | 84 | 73 | 84 |
| 10 | माळेवाडी | 129 | 216 | 218 | 230 | 131 | 68 | 57 | 79 | 92 | 100 | 111 | 126 |
| | **सरासरी** | **112** | **197** | **214** | **215** | **134** | **82** | **77** | **91** | **96** | **90** | **91** | **99** |
| | **आ-पश्चिम-दक्षिण** | | | | | | | | | | | | |
| 11 | तारेवाडी | 94 | 161 | 166 | 173 | 118 | 72 | 64 | 87 | 84 | 84 | 81 | 87 |
| 12 | आजरा | 143 | 249 | 277 | 265 | 169 | 94 | 83 | 90 | 106 | 102 | 101 | 119 |
| 13 | नडगडवाडी | 92 | 179 | 213 | 223 | 152 | 95 | 92 | 97 | 96 | 84 | 80 | 83 |
| | **सरासरी** | **110** | **196** | **219** | **220** | **147** | **87** | **80** | **91** | **95** | **90** | **87** | **96** |

**हंगामनिहाय बाष्पीभवन**

| अक्र | हंगाम | बाष्पीभवन | |
|---|---|---|---|
| | | अ | आ |
| 1 | खरीप | 760 | 782 |
| 2 | रब्बी | 298 | 306 |
| 3 | उन्हाळी | 185 | 186 |
| | एकूण | 1243 | 1274 |

सारणी 15.4

**जलसंपत्तीची उपलब्धता**

येवा - दलघमी

| अक्र | वर्ष | वार्षिक सरासरी येवा | उतरत्या क्रमाने विसर्ग मालिका | संगत वर्ष | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1979 -80 | 22220 | 26814 | 1980 -81 | 10 |
| 2 | 1980 -81 | 26814 | 26722 | 1991 -92 | |
| 3 | 1981 -82 | 23926 | 25706 | 1990 -91 | 20 |
| 4 | 1982 -83 | 20006 | 24779 | 1983 -84 | |
| 5 | 1983 -84 | 24779 | 23926 | 1981 -82 | |
| 6 | 1984 -85 | 18949 | 22492 | 1988 -89 | 40 |
| 7 | 1985 -86 | 18432 | 22220 | 1979 -80 | 50 |
| 8 | 1986 -87 | 16222 | 21158 | 1993 -94 | |
| 9 | 1987 -88 | 11566 | 20006 | 1982 -83 | |
| 10 | 1988 -89 | 22492 | 19318 | 1992 -93 | |
| 11 | 1989 -90 | 17548 | 18949 | 1984 -85 | 75 |
| 12 | 1990 -91 | 25706 | 18432 | 1985 -86 | |
| 13 | 1991 -92 | 26722 | 17548 | 1989 -90 | 90 |
| 14 | 1992 -93 | 19318 | 16222 | 1986 -87 | |
| 15 | 1993 -94 | 21158 | 11566 | 1987 -88 | |

टीप : ही जलसंपत्ती कुरुंदवाड (कृष्णा).वंदूर (दूधगंगा), बस्तवाड (वेदगंगा), गोटूर (हिरण्यकेशी) व दड्डी (घटप्रभा) या सरितामापन केंद्रांच्या विसर्गाची बेरीज आहे.

सारणी : 15.5

**उर्ध्व कृष्णा (पश्चिम - उत्तर) खोऱ्यातील प्रकल्पांची सद्य:स्थिती**

चलपाणीसाठा - दलघमी
पाणीवापर - दलघमी
सिंचनक्षेत्र - हेक्टर

| अक्र | प्रकल्पाचा संवर्ग | पुर्ण झालेले प्रकल्प | | | | प्रगतीपथावरील प्रकल्प | | | | भविष्यकालीन प्रकल्प | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नाव संख्या | चलपाणी साठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चलपाणी साठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चलपाणी साठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चलपाणी साठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| | | | | | | 1) कृष्णा प्रकल्प | | | 61721 | | | | | | | | 61721 |
| 1 | मोठे | खोडशी (कृष्णा कालवाविस्तारासह) | | 85 | 11720 | अ) कन्हेर | 270 | 390 | | | | | | | 270 | 475 | 11720 |
| | | कोयना जलविद्युत प्रकल्प | 2678 | 2051 | | ब) धोम | 331 | 394 | | | | | | | 3009 | 2445 | |
| | | राधानगरी | 220 | 226 | 17830 | क)धोम वलकवडी | | | | | | | | | 220 | 226 | 17830 |
| | | | | | | ड) कुडाळी | | | 1840 | | | | | | | | 1840 |
| | | | | | | 1 महू | | | | | | | | | | | |
| | | | | | | 2 हातनोर | | | | | | | | | | | |
| | | | | | | 2)को.कृ.उ.सि.यो | | | | | | | | | | | |
| | | | | | | अ) ताकारी म्हैसाळ | 285 | 285 | 35787 | | | | | | 285 | 285 | 35787 |
| | | | | | | ब) कृष्णा/कोयना वरील खाजगी उपसा सिंचन | | 257 | 110205 | | | | | | | 257 | 110205 |
| | | | | | | 3) वारणा | 779 | 3047 | 87000 | | | | | | 779 | 3047 | 87000 |
| | | | | | | 4) दुधगंगा | 664 | 679 | 39584 | | | | | | 664 | 679 | 39584 |
| | | | | | | 5) टेंभू | | | | | | | | | | | |
| | | | | | | 6) उरमोडी | 240 | 82 | 8300 | | | | | | 240 | 82 | 8300 |
| | | | | | | 7) वारळी | 167 | 91 | 5400 | | | | | | 167 | 91 | 5400 |
| | | | 2898 | 2362 | 29550 | 9 | 2736 | 5225 | 349837 | 1 | | | | 10 | 5634 | 7587 | 379387 |

| अक्र | प्रकल्पाचा संवर्ग | पुर्ण झालेले प्रकल्प | | | | प्रगतीपथावरील प्रकल्प | | | | भविष्यकालीन प्रकल्प | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नाव संख्या | चलपाणी साठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चलपाणी साठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चलपाणी साठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चलपाणी साठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 2 | मध्यम | तुळशी (लोढानाला वळविणेसह | 92 | 74 | 4720 | वेदगंगा | 112 | 110 | 15380 | करा | 54 | 54 | 4555 | | 258 | 238 | 24655 |
| | | ेवती म्हासोली | 7 | 9 | 1927 | कासारी | 76 | 89 | 9460 | | | | | | 83 | 98 | 11387 |
| | | मोरणा शिराळा | 15 | 32 | 1600 | कुंभी | 77 | 85 | 8710 | | | | | | 92 | 117 | 10310 |
| | | | | | | कडवी | 71 | 80 | 9220 | | | | | | 71 | 80 | 9220 |
| | | | | | | धामणी | 106 | 107 | 700 | | | | | | 106 | 107 | 700 |
| | | | | | | मोरणागुरेघर | 38 | 51 | 3806 | | | | | | 38 | 51 | 3806 |
| | | | | | | उत्तरमांड | 23 | 28 | 4800 | | | | | | 23 | 28 | 4800 |
| | | | | | | वांग | 77 | 85 | 6200 | | | | | | 77 | 85 | 6200 |
| | | | | | | चिकोत्रा | 43 | 53 | 5630 | | | | | | 43 | 53 | 5630 |
| | | | | | | नागेवाडी | 6 | 7 | 1560 | | | | | | 6 | 7 | 1560 |
| | | 3 | 114 | 115 | 8247 | 10 | 629 | 696 | 65466 | 1 | 54 | 54 | 4555 | 14 | 797 | 864 | 78268 |
| 3 | बृहत लघु | 3 | 11 | 7 | 3775 | 1 | 6 | 4 | 1325 | 2 | 11 | 7 | 2533 | | 28 | 18 | 7633 |
| 4 | लघु | 29 | 53 | 28 | 8255 | 9 | 26 | 12 | 6707 | 3 | 8 | 5 | 1117 | | 86 | 45 | 16079 |
| 5 | को.प.बंधारे | 3 | 0 | 0 | 848 | 3 | 3 | 2 | 1646 | | | | | | 3 | 2 | 2494 |
| | | 35 | 64 | 35 | 12878 | 13 | 34 | 18 | 9678 | 5 | 19 | 13 | 3650 | 53 | 117 | 65 | 26206 |
| सर्व एकूण : | | 38 | 3076 | 2512 | 50675 | 32 | 3399 | 5939 | 424981 | 7 | 73 | 67 | 8205 | 77 | 6548 | 8517 | 483861 |

सारणी 15.5 (चालू)

**उर्ध्व कृष्णा (पश्चिम - दक्षिण) खोऱ्यातील प्रकल्पांची सद्य:स्थिती**

चलपाणीसाठा - दलघमी

पाणीवापर - दलघमी

सिंचनक्षेत्र - हेक्टर

| अक्र | प्रकल्पाचा संवर्ग | पुर्ण झालेले प्रकल्प | | | | प्रगतीपथावरील प्रकल्प | | | | भविष्यकालीन प्रकल्प | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | चलपाणी साठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | संख्या | चलपाणी साठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | संख्या | चलपाणी साठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | संख्या | चलपाणी साठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 1 | मोठे | | | | | | | | | तारेवाडी | 922.2 | | | | 922 | 0 | 0 |
| | | | | | | | | | | रामतीर्थ | 777.38 | | | | 777 | 0 | 0 |
| | | | | | | | | | | 2 | 1699.58 | 0 | 0 | 0 | 1700 | 0 | 0 |
| 2 | मध्यम | | | | | चित्री | 52.39 | 64.39 | 5850 | कानुरखुर्द | 95.16 | | | | 183 | 100 | 5850 |
| | | | | | | घटप्रभा | 43.61 | 43.8 | 4370 | किटवडे | 39.86 | | | | 101 | 62 | 4370 |
| | | | | | | जंगमहट्टी | 33.13 | 32.65 | 4188 | नांगरतासवाडी | 56.64 | | | | 90 | 33 | 4188 |
| | | | | | | जांबरे | 23.22 | 27.04 | 3770 | उतुर | 33.48 | | | | 57 | 27 | 3770 |
| | | | | | | तारहोळ | 17.02 | 17.02 | 1797 | अंबेहोळ | 35.68 | 35.68 | 5455 | | 53 | 53 | 7252 |
| | | | | | | | | | | सरफनाला | 17.84 | 18.18 | 2295 | | 18 | 18 | 2295 |
| | | | | | | | | | | | | | | | 0 | 0 | 0 |
| | | | | | | 5 | 169.37 | 184.9 | 19975 | 6 | 225.14 | 53.86 | 7750 | 11 | 395 | 239 | 27725 |
| 3 | बृहत लघु | 4 | 6.31 | 3.96 | 1041 | 14 | 58.98 | 34.13 | 7130 | 6 | 35.16 | 21.63 | 4007 | | 100 | 60 | 12178 |
| 4 | लघु प्रकल्प | | | | | | | | | 3 | 4.45 | 2.78 | 556 | | 4 | 3 | 556 |
| 5 | को.प.बंधारे | 2 | 2.72 | 1.67 | 405 | 1 | 0.79 | 0.49 | 214 | | | | | | 4 | 2 | 619 |
| | | 6 | 9.03 | 5.63 | 1446 | 15 | 59.77 | 34.62 | 7344 | 9 | 39.61 | 24.41 | 4563 | 30 | 108 | 65 | 13353 |
| | सर्व एकूण | 6 | 9.03 | 5.63 | 1446 | 20 | 229.14 | 219.5 | 27319 | 16 | 1964.33 | 78.27 | 12313 | 42 | 2203 | 303 | 41078 |

सारणी : 15.6

## जलसंपत्तीचा ताळेबंद

### उर्ध्व कृष्णा (पश्चिम – उत्तर)

जलसंपत्ती - दलघमी

| अक्र | उपलब्धता | | अक्र | वापर (सन2030) | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | भूपृष्ठावराल | | 4 | भूपृष्ठावराल | |
| | अ) नैसर्गिक | | | अ) घरगुती वापरासाठी | |
| | 1) 75 टक्के विश्वासार्हतेने | 15877 | | 1) नागरी | 116 |
| | 2) 50 टक्के विश्वासार्हतेने | 18950 | | 2) ग्रामीण | 128 |
| | 3) सरासरी | 18097 | | 3) पशुधन | 52 |
| | 4) नियोजनासाठी | 7433 | | एकूण – | 296 |
| | ब) मानवप्रबाधित | | | ब) उद्योगधंदयासाठी | 93 |
| | 1) नागरी वापरातून पुनरुद्भव (80 %) | 93 | | एकूण सिंचनेतर वापर - | 389 |
| | 2) उद्योग धंदयातील पुनरुद्भव (97.5%) | 91 | 5 | इतर उपखाऱ्यात स्थलांतरीत पाणी | 4052 |
| | 3) इतर खोऱ्यातून संक्रमित झालेले पाणी | | 6 | सिंचनासाठी उपलब्ध भूपृष्ठावरील पाणी | 3494 |
| | | | | =(7433+184 -389-4052)+318 =(3176)+318 | |
| | एकूण (1 ब) | 184 | | | |
| 2 | मानवनिर्मित | | | | |
| | लाभक्षेत्रातील पुनर्भरण (=7433 +184-389-4052) च्या10 % | 318 | | | |
| 3 | एकूण उपलब्धता (7433+184+318) | 7935 | 7 | एकूण वापर | 7935 |
| | 1) भूजल उपलब्धता (वार्षिक एकूण पुनर्भरण ) | 1555 | | अ) भूजलाचा सध्याचा सिंचनासाठी वापर | 343 |
| | 2) भूजल वापरास मुभा ( 1555 च्या 65 %) | 1011 | | | |

टीपा : 1) भूजल उपलब्धतेमूळे उपखोऱ्याच्या एकूण उपलब्धतेत वाढ होणार नाही ; भूजलाचा जेवढा उपसा होईल तेवढा नदी प्रवाह घटत जाईल म्हणून एकूण उपलब्धतेचा आकडा काढतांना भूजल उपलब्धतेचा विचार घेतलेला नाही.

2) संकलीत अंदाजासाठी सर्व पाण्याचा उपयोग भूपृष्ठावरील पाण्यातून दाखविला आहे. पण एकूण वापरापैकी अधिकाधिक 1011+318= 1329 भूजल माध्यमातून शक्य आहे.

3) पाणी वापराचे नियोजन उपलब्ध येवा मालिकेवर आधारित आहे.

सारणी : 15.6 (चालू)

**जलसंपत्तीचा ताळेबंद**

**उर्ध्व कृष्णा (पश्चिम-दक्षिण)**

जलसंपत्ती - दलघमी

| अक्र | उपलब्धता | | अक्र | वापर (सन2030) | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **भूपृष्ठावरील** | | 4 | **भूपृष्ठावरील** | |
| | अ) नैसर्गिक | | | अ) घरगूती वापरासाठी | |
| | 1) 75 टक्के विश्वासार्हतेने | 2942 | | 1) नागरी | 1 |
| | 2) 50 टक्के विश्वासार्हतेने | 3407 | | 2) ग्रामीण | 20 |
| | 3) सरासरीने | 3227 | | 3) पशूधन | 8 |
| | 4) नियोजनासाठी | 245 | | एकूण -- | 29 |
| | ब) मानवप्रबंधित | | | ब) उद्योगधंदयासाठी | 9 |
| | 1) नागरी वापरातून पुनरूद्भव (80 %) | 1 | | एकूण सिंचनेतर वापर - | **38** |
| | 2) उद्योग धंदयातील पुनरूद्भव (97.5%) | 8 | 5 | इतर उपखाऱ्यात स्थलांतरीत पाणी | 0 |
| | 3) इतर खोऱ्यातून संक्रमित झालेले पाणी | | 6 | सिंचनासाठी उपलब्ध भूपृष्ठावरील पाणी (245+9-38)+22 | 238 |
| | **एकूण (1 ब)** | **9** | | | |
| 2 | मानवनिर्मित | | | | |
| | लाभक्षेत्रातील पुनर्भरण ( 245+9-38) च्या10 % | 22 | | | |
| 3 | **एकूण उपलब्धता [245+9+22]** | **276** | 7 | एकूण वापर | **276** |
| | 1) भूजल उपलब्धता (वार्षिक एकूण पुनर्भरण ) | 214 | | अ) भूजलाचा सध्याचा सिंचनासाठी वापर | 67 |
| | 2) भूजल वापरास मूभा ( 214 च्या 65 %) | 139 | | | |

टीपा : 1) भूजल उपलब्धतेमूळे उपखोऱ्याच्या एकूण उपलब्धतेत वाढ होणार नाही ; भूजलाचा जेवढा उपसा होईल तेवढा नदी प्रवाह घटत जाईल म्हणून एकूण उपलब्धतेचा आकडा काढतांना भूजल उपलब्धतेचा विचार घेतलेला नाही.

2) संकलीत अंदाजासाठी सर्व पाण्याचा उपयोग भूपृष्ठावरील पाण्यातून दाखविला आहे. पण एकूण वापरापैकी अधिकाधिक 139+22= 161 भूजल माध्यमातून शक्य आहे.


3) पाणी वापराचे नियोजन उपलब्ध येवा मालिकेवर आधारित आहे.

सारणी 15.7

**जलविद्युत प्रकल्प**

क्षमता -मेवॅ

| प्रकल्पाचे नाव | | क्षमता |
|---|---|---|
| **उर्ध्व कृष्णा (पश्चिम- उत्तर)** | | |
| **अ) पूर्ण /कार्यान्वित प्रकल्प** | | |
| 1) कृष्णा | 1) कण्हेर (धरण पायथा) | 4 |
| | 2) धोम (धरण पायथा) | 2 |
| | 3) येवतेश्वर (धरण पायथा) | 0.075 |
| 2) कोयना | 1) कोयना (धरण पायथा) | 40 |
| | 2) कोयनाटप्पा-1 | 260 |
| | 3) कोयनाटप्पा-2 | 300 |
| | 4) कोयनाटप्पा-3 | 320 |
| 4) पंचगंगा | 1) राधानगरी (धरण पायथा) | 4.8 |
| **ब) बांधकामाधीन प्रकल्प :** | | |
| 1) कृष्णा | 1) कण्हेर (डावा कालवा) | 1.2 |
| 2) कोयना | 1) कोयना-2 टप्पा-4 | 1000 |
| 3) वारणा | 1) वारणा (धरण पायथा) | 16 |
| | 2) कडवी (धरण पायथा) | 1.5 |
| 4) पंचगंगा | 1) कासारी (धरण पायथा) | 2.5 |
| 5) दुधगंगा | 1) दुधगंगा (धरण पायथा) | 24 |
| 6) वेदगंगा | 1) पाटगांव (धरण पायथा) | 2.5 |
| **क) अन्वेषणाधीन प्रकल्प** | | |
| 1) कृष्णा | 1) उरमोडी (धरण पायथा) | 3 |
| | 2) उत्तरमांड (धरण पायथा) | 0.5 |
| | 3) तारळी (धरण पायथा) | 1 |
| | 4) धोम बलकवडी (धरण पायथा) | 3 |
| | 5) कुडाळी (धरण पायथा) | 1.2 |
| | 6) कास (धरण पायथा) | 5 |
| 2) कोयना | 1) कोयना-2 (धरण पायथा) | 40 |
| | 2) मोरणा | 0.6 |
| | 3) वांग (धरण पायथा) | 3 |
| | 4) हुंबर्ली | 400 |
| 3) वारणा | 1) सोनवडे (कालवा) | 8 |
| | 2) करडी-मोगीव (स्वतंत्र) | 40 |
| | 3) मोरणा शिराळा (धरण पायथा) | 0.4 |
| 4) पंचगंगा | 1) कुंमी (धरण पायथा) | 2.5 |
| | 2) धामणी (धरण पायथा) | 2.5 |
| | 3) तुळशी (धरण पायथा) | 1.72 |
| | 4) राधानगरी | 10 |
| 5) दुधगंगा | 1) गैबी (कालवा प्रपात) | 7 |
| | 2) अंबाई (कालवा प्रपात) | 4 |
| 6) वेदगंगा | 1) चिकोत्रा | 2 |
| **ड) भविष्यकालीन प्रकल्प** | | |
| 1) कृष्णा | टोसेघर | 300 |
| **उर्ध्व कृष्णा (पश्चिम - दक्षिण)** | | |
| | 1 जांबरे (धरण पायथा) | 4 |
| | 2 चित्री (धरण पायथा) | 2 |
| | 3 जंगमहट्टी | 0.5 |
| | 4 घटप्रभा (फाटकवाडी) | 9 |
| | 5 तारहोळ | 0.5 |




| उपखोऱ्याचे स्थान | उपखोरे क्र. | उपखोऱ्यांची नावे | उपखोरे क्र. | उपखोऱ्यांची नावे |
|---|---|---|---|---|
| | 16 | ऊर्ध्व कृष्णा (पश्चिम) | 23 | वासिष्ठी |
| | 18 | उर्वरीत भीमा | 24 | दक्षिण कोकण |
| | 22 | मध्य कोकण | 25 | तेरेखोल तिल्लारी |

**महाराष्ट्र जल व सिंचन आयोग**

## ऊर्ध्व कृष्णा (पश्चिम) उपखोरे

अ) (पश्चिम-उत्तर) घटक
आ) (पश्चिम- दक्षिण) घटक

जून 1999

# उपखोरे :16

# ऊर्ध्व कृष्णा (पूर्व)

## 1.0 भौगोलिक तपशील

या उपखोऱ्याचा पाण्याच्या हिशोबांच्या व नियोजनाच्या सोयीसाठी येरळा व अग्रणी या दोन घटक क्षेत्रात विचार करणे सोईचे आहे. या उपखोऱ्यात कृष्णा नदीच्या पूर्वेकडील भाग (नकाशा 16.1) येतो. त्याचे भौगोलिक क्षेत्रफळ 5284 चौकिमी आहे व तो बराचसा अवर्षण प्रवण आहे. या उपखोऱ्यात सातारा व सांगली जिल्हयातील खालील तालुक्यांचे क्षेत्र येते.

**येरळा**

**सातारा** :1) कराड 2) खटाव

**सांगली** :1) खानापूर 2 )तासगाव व 3) मिरज

**अग्रणी**

**सांगली** :1) खानापूर 2) तासगाव 3) मिरज 4) जत व 5 ) कवठेमहांकाळ

मुख्यनद्यांची माहिती खालील प्रमाणे आहे.

तलांक -मी,लांबी-किमी

| अक्र | नदी | लांबी | उगमस्थान | | संगमस्थान | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | ठिकाण | तलांक | ठिकाण | तलांक |
| 1 | येरळा | 125 | मांजरेवाडी | 914 | ब्रह्मनाळ ता.मिरज | 551 |
| 2 | अग्रणी | 97 | वेणापूर ता.खानापूर | 885 | हुलगा बळी | 549 |

1.1 विस्तार : या उपखोऱ्याचा क्षेत्रीय विस्तार खालील प्रमाणे आहे.

येरळा : अक्षांश 16° 55` ते 17° 28` उत्तर व रेखांश 74° 20` ते 74° 40` पूर्व

अग्रणी : अक्षांश 16° 40` ते 17° 28` उत्तर व रेखांश 74° 20` ते 75° 15` पूर्व यामध्ये आहे.

1.2 चतु:सीमा : उपखोऱ्याच्या चतु:सीमा खालील प्रमाणे आहेत.

| अक्र | दिशा | तपशील | |
|---|---|---|---|
| | | येरळा | अग्रणी |
| 1 | उत्तर | उर्वरीत भीमा (उजनीखालील) उपखोरे क्र. 18 | उर्वरीत भीमा (उजनीखालील) उपखोरे क्र. 18 |
| 2 | पूर्व | उर्वरीत भीमा (उजनीखालील) उपखोरे क्र. 18 | उर्वरीत भीमा (उजनीखालील) उपखोरे क्र. 18 |
| 3 | पश्चिम | ऊर्ध्वकृष्णा (पश्चिम) 15 अ घटक | येरळा 16 अ घटक |
| 4 | दक्षिण | कर्नाटक | कर्नाटक |

## 2.0 हवामान

या उपखोऱ्यातील बव्हंश क्षेत्र कमी पावसाच्या (700 मिमी हून कमी) प्रदेशात येते. साधारणतः 52 टक्के पाऊस नैऋत्य मोसमी वाऱ्यामुळे जून ते सप्टेंबर दरम्यान,30 टक्के पाऊस ईशान्य वाऱ्यामुळे सप्टेंबर ते डिसेंबर दरम्यान व 18 टक्के पाऊस डिसेंबर नंतर पडतो. वार्षिक सरासरी पर्जन्यमान येरळा घटकामध्ये 559 मिमी तर अग्रणी घटकामध्ये 470 मिमी आहे. ईशान्य वाऱ्यापासून सप्टेंबरच्या नंतर बराच पाऊस मिळणे हे या उपखोऱ्याचे एक वेगळे वैशिष्ट्य आहे. त्याच प्रमाणे सरासरीने 600 तलांकाच्या वर असलेला आरोग्यदायी हवामानाचा पट्टा हेही या उपखोऱ्याचे वैशिष्टय आहे, पण नैऋत्य मोसमी वारे व ईशान्येचे वारे यांच्या सीमारेषेवरचा हा प्रदेश असल्यामुळे त्या महिन्यांच्या पावसात या उपखोऱ्यात अत्याधिक दोलायमानता आहे. नैसर्गिक पावसावर आधारीत विश्वासार्ह कृषी व्यवस्था उभी करण्यातील ती एक महत्वाची अडचण आहे. या घटकातील हवामान विषयक इतर बाबी व पर्जन्यमानातील दोलायमानता इत्यादी तपशील पुढील प्रमाणे आहे.

पर्जन्यमान-मिमी,तपमान - अंश सें.

### अ) येरळा

| अक्र | वैशिष्टये | परिमाण | वर्ष महिना | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1 | सर्वात अधिक पाऊस | 1206 | 1981 | वीटा |
| 2 | सर्वात अधिक तपमान | 42 | 1996 मे | आंबवडे ता.वडूज |
| 3 | सर्वात कमी तपमान | 7.5 | 1996 जानेवारी | आंबवडे ता.वडूज |

कृषी हवामान वर्गीकरणानुसार या घटकक्षेत्राचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

5-संक्रमण विभाग-2 करडया रंगाच्या जमिनीचा विभाग (TR-2)व 6-अवर्षण (कमी पावसाचा) विभाग (SC).

पर्जन्यमानातील दोलायमानता गुणांक 31 (तक्ता 2.5.8) आहे.

### आ) अग्रणी

| अक्र | वैशिष्टये | परिमाण | वर्ष महिना | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1 | सर्वात अधिक पाऊस | 1596 | 1994 | सिध्देवाडी |
| 2 | सर्वात अधिक तपमान | 42 | 1996 | धुळगांव ता.कवठेमहांकाळ |
| 3 | सर्वात कमी तपमान | 6 | 1996 | धुळगांव ता.कवठेमहांकाळ |

कृषी हवामान वर्गीकरणानुसार या घटक क्षेत्राचा तपशील खालील प्रमाणे आहे.

6-अवर्षण (कमी पावसाचा) विभाग (SC).

पर्जन्यमानातील दोलायमानता गुणांक 54 (तक्ता 2.5.8) आहे.पर्जन्यमानाचा माहवार तपशील सारणी 16.1 मध्ये दर्शविला आहे.

2.1 बाष्पीभवन : या उपखोऱ्यात सर्वाधिक बाष्पीभवन मे महिन्यात सरासरी 198 मिमी तर सर्वात कमी बाष्पीभवन डिसेंबर महिन्यात 102 मिमी होते. केंद्रनिहाय व माहवार बाष्पीभवनाचा तपशील सारणी 16.1 मध्ये दर्शविला आहे. पावसाची सरासरी जास्त नसली तरी वर्षातले एकंदर बाष्पीभवनही इतर कमी पावसाच्या प्रदेशांच्या तुलनेत फार नाही हेही या उपखोऱ्याचे

एक वैशिष्टय आहे. पण एकंदरीने कमी असलेला पाऊस हा 7 महिन्यांवर विभागलेला असणे यामुळे कोणत्याच महिन्यात नैसर्गिक बाष्पीभवनापेक्षा जास्त पाऊस न मिळणारा हा प्रदेश आहे.

## 3.0 जलसंपत्तीची उपलब्धता

3.1 भूपृष्ठीय जलसंपत्ती : या उपखोऱ्यातील एकूण सरासरी येवा 217 दलघमी आहे. वर्ष 1979-80 ते 1993-94 या अवधीतील सरितामापन केंद्राच्या आधारसामुग्रीवर आधारभूत एकूण पाण्याची उपलब्धता खालीलप्रमाणे येते:

75 टक्के विश्वासार्हतेने 25 दलघमी

50 टक्के विश्वासार्हतेने 63 दलघमी.

वेगवेगळ्या विश्वासार्हतेचा येवा याबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

येवा - दलघमी

| अक्र | वर्ष | वार्षिक सरासरी येवा | उतरत्या क्रमाने विसर्ग मालिका | संगत वर्ष | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1979-80 | 245.51 | 797.97 | 1988-89 | |
| 2 | 1980-81 | 18.69 | 772.48 | 1981-82 | |
| 3 | 1981-82 | 772.48 | 675.92 | 1991-92 | 20 |
| 4 | 1982-83 | 7.65 | 286.57 | 1987-88 | |
| 5 | 1983-84 | 43.04 | 245.51 | 1979-80 | |
| 6 | 1984-85 | 41.63 | 179.81 | 1989-90 | 40 |
| 7 | 1985-86 | 25.2 | 82.69 | 1993-94 | |
| 8 | 1986-87 | 40.49 | 43.04 | 1983-84 | 50 |
| 9 | 1987-88 | 286.57 | 41.63 | 1984-85 | 60 |
| 10 | 1988-89 | 797.97 | 40.49 | 1986-87 | |
| 11 | 1989-90 | 179.81 | 25.2 | 1990-91 | 75 |
| 12 | 1990-91 | 25.2 | 25.2 | 1985-86 | |
| 13 | 1991-92 | 675.92 | 18.69 | 1980-81 | 90 |
| 14 | 1992-93 | 8.78 | 8.78 | 1992-93 | |
| 15 | 1993-94 | 82.69 | 7.65 | 1982-83 | |

टीप :- येरळा घटक क्षेत्रासाठी अंदाजीकरण व अग्रणी घटक क्षेत्रासाठी पाडेगाव सरिता मापन केंद्र यांच्या बेरजेने ही मालिका बनविली आहे.

ही मोजणी दीर्घकालिन नसल्यामुळे त्यात अवर्षणाची महत्वाची वर्षे आलेली नाहीत. त्यामुळे सरासरी उपलब्धी वास्तवात बरीच कमी रहाणार आहे. तरी या मालिकेवरून उपलब्ध प्रवाहामधील आत्यंतिक विचलता स्पष्ट आहे. 90 % ते 10 % विश्वासार्ह प्रवाहांचा गुणक फार मोठा म्हणजे 30 हून अधिक आहे तर 75 % ते 50 % चा गुणक 2 च्या जवळ आहे.

3.2 भूशैलीय रचना

भूपृष्ठीय स्थिती (भूरूप वर्णन) : येरळा घटकातील साधारण 11 टक्के भूभाग अतिविच्छेदीत व डोंगराळ, 56 टक्के पठारी व 33 टक्के सपाट व नदीलगतच्या गाळाचा आहे. यात भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा निर्देशित 16 पाणलोट क्षेत्रे आहेत.

अग्रणी घटकातील निव्वळ 1 टक्का भूभाग अतिविच्छेदीत व डोंगराळ व उर्वरीत 99 टक्के पठारी आहे. यात भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा निर्देशित 6 पाणलोट क्षेत्र आहेत. अग्रणी घटक क्षेत्र हे मूलतः विस्तृत पठारी क्षेत्र आहे.त्यामुळे सिंचनासाठी व शेतीसाठी अतिशय अनुकूल आहे.

भूपृष्ठीय शैलस्थिती :येरळा व अग्रणी या दोन्ही घटकात मुख्यतः लाव्हा थरांपासून तयार झालेला बहुस्तरीय दक्षिणी कातळाचा खडक (डेक्कन ट्रॅप प्रस्तर) आढळतो. येरळा उपखोऱ्यात कृष्णा नदीच्या काठावर दक्षिणी कातळ खडकाच्यावर गाळाचा प्रस्तर (Alluvium) आढळतो. या खडकात प्रामुख्याने अकुहरी प्रकारचा बेसाल्ट आढळतो. त्यात आकुंचन संधिच्या भेगा व तडे विपूल प्रमाणात आढळतात. दोन लाव्हा थर गेरुने विभागलेले आहेत.

3.3 भूजल संपत्ती : दोन्ही घटकात पर्जन्यमान व भूजल धारक प्रस्तर सर्वदूर एकसारखे असल्यामुळे भूजल संपत्ती भूरूपस्थितीवरच (Land forms) जास्त अवलंबून आहे. अतिविच्छेदीत व डोंगराळ भागात भूजल संपत्ती खूप कमी असून पठारी भागात मध्यम आणि सपाट व गाळाच्या प्रदेशात अधिकतम आहे.

येरळा व अग्रणी घटकातील अकुहरी बेसाल्टमध्ये असलेल्या आकुंचन संधीच्या भेगा व तडयांबरोबरच विघटीत भागाचे प्रमाण चांगले आहे. त्याच बरोबर दोन्ही घटकात पठारी भाग (पुनर्भरण क्षेत्र) सर्वाधिक प्रमाणात असल्यामुळे त्यांची भूजल धारण क्षमता चांगली आहे. परिणामी उथळ भूजल धारक प्रस्तर उपजावू आहे. या सर्व परिमाणांमुळे भूजल उपलब्धीस अनुकूलता असल्यामुळे विहिरींची संख्या व पर्यायाने उपसा सुध्दा जास्त आहे. विहिरींची घनता अनुक्रमे 9 व 10 विहिरी / चौकिमी इतकी आहे. येरळा घटकातील दोन पाणलोट क्षेत्रे विकसित (ग्रे) अवस्थेत आहेत. कृ - 24,40 (तालुके - खानापूर, तासगाव, मिरज) अग्रणी घटकातील एक लघु पाणलोट क्षेत्र अतिविकसित (डार्क) व एक विकसित (ग्रे) अवस्थेत आहे. अतिविकसित कृ - 38, विकसित. कृ - 37.

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या 1990 च्या भूजल अंदाजानुसार एकूण पुनर्भरण (सिंचित क्षेत्रातील भरी सकट) अनुक्रमे 423 व 133 दलघमी असून सिंचना खालील विहिरींची संख्या 0.35 व 0.13 लक्ष आहे. सध्याची विहिरींची घनता, वाढीचा व उपशाचा दर विचारात घेता यावर नियंत्रण आणून व्यवस्थापनावर अधिक भर देणे गरजेचे आहे. त्याच बरोबर सिंचनासाठी अस्तित्वात असलेल्या विंधण विहिरी, पिण्याच्या पाण्यासाठी व औद्योगिक वापरासाठीच्या विहिरी आणि त्याद्वारे होणारा उपसा यांचा तपशील उपलब्ध होणे गरजेचे आहे, तदनंतरच खोऱ्यातील भूजल संपत्तीच्या वापराचा निश्चित अंदाज बांधता येईल. भूजलाचे भूपृष्ठावरील प्रवाहापेक्षा अधिक्य असणारे हे उपखोरे आहे. निसर्गातच भूजल साठवणीला अधिक अनुकूलता आहे. त्या अनुकूलतेचा पाण्याच्या नियोजनांत पूर्ण उपयोग करून घेणे हे येथील नियोजनाचे मुख्य सूत्र असावे लागेल.

3.4 अवर्षणप्रवण क्षेत्र : या उपखो-याचे क्षेत्र 10 तालुक्यात पसरले आहे. त्यापैकी सुकथनकर समितीच्या अहवालानंतर शासनाने 6 तालुके अवर्षणप्रवण घोषित केले आहेत. अशा तालुक्यांचा तपशील पुढे दिलेला आहे .

लोकसंख्या - हजारात, क्षेत्रफळ - चौकिमी पर्जन्यमान - मिमी

| जिल्हा | तालुका | सरासरी वार्षिक पर्जन्यमान | क्षेत्रफळ | लोकसंख्या |
|---|---|---|---|---|
| **अ) येरळा** | | | | |
| सातारा | खटाव | 462 | 1365 | 234 |
| सांगली | खानापूर | 543 | 638 | 136 |
| | तासगाव | 620 | 360 | 77 |
| | मिरज | 545 | 501 | 380 |
| **आ) अग्रणी** | | | | |
| सांगली | खानापूर | 543 | 77 | 38 |
| | तासगाव | 620 | 88 | 52 |
| | मिरज | 645 | 41 | 36 |
| | कवठेमहांकाळ | 610 | 509 | 71 |
| | जत | 529 | 430 | 36 |

## 4.0 जमिनीचा तपशील

या उपखोऱ्यातील जमिनीचे वर्गीकरण खालील प्रमाणे आहे.

| अक्र | जमिनीचा प्रकार | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | भरड उथळ ज़मीन | 25 |
| 2 | मध्यम काळी जमीन | 58 |
| 3 | खोल काळी जमीन | 17 |

## 5.0 जमिनीचा वापर

लागवडीयोग्य, वन खात्याच्या ताब्यातील क्षेत्र, पडीतक्षेत्र इत्यादी बाबतची माहिती खालील प्रमाणे आहे.

क्षेत्र-हजार हेक्टर

| अक्र | तपशील | अ) येरळा | | आ)अग्रणी | |
|---|---|---|---|---|---|
| | | क्षेत्र | भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी | क्षेत्र | भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी |
| 1 | भौगोलिक क्षेत्र | 398 | | 131 | |
| 2 | वन खात्याच्या ताब्यातील क्षेत्र | 32 | 8.5 | 7 | 6.1 |
| 3 | पेरणीसाठी उपलब्ध नसलेले क्षेत्र | | | | |

क्षेत्र-हजार हेक्टर

| अक्र | तपशील | अ) येरळा | | आ)अग्रणी | |
|---|---|---|---|---|---|
| | | क्षेत्र | भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी | क्षेत्र | भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी |
| | अ) ओसाड जमीन | 28 | 7.2 | 7 | 5.2 |
| | ब) बिगरशेती उपयोगाकरीता आणलेली जमीन | 18 | 4.5 | 7 | 5.2 |
| 4 | मशागतयोग्य पडीक जमीन | 7 | 1.7 | 1 | 0.7 |
| 5 | कायमची कुरणे व चराऊ कुरणे | 15 | 3.7 | 3 | 2.3 |
| 6 | किरकोळ झाडे झुडपे यांच्या समुहाखालील क्षेत्र | 5 | 1.2 | 2 | 1.5 |
| 7 | चालू पडीक जमीन | 17 | 4.2 | 7 | 5.2 |
| 8 | इतर पडीक जमीन | 21 | 5.2 | 7 | 5.2 |
| 9 | पेरणीचे निव्वळ क्षेत्र | 255 | 64 | 90 | 68.6 |
| 10 | लागवडीयोग्य क्षेत्र(4+5+6+7+8+9 ) | 320 | 80 | 110 | 84 |
| 11 | दुसोटा क्षेत्र | 30 | | 8 | – |
| 12 | पिकाखालील एकूण क्षेत्र(9+11) | 285 | | 98 | – |
| 13 | पीक घनता(12÷9×100) | 112 | | 109 | – |

**6.0 लोकसंख्या व पशुधन**

6.1 लोकसंख्या : सन 1991 च्या जनगणनेनूसार या उपखोऱ्यातील एकूण लोकसंख्या 15.18 लक्ष आहे. त्यापैकी येरळा घटकाची लोकसंख्या 10.59 लक्ष तर अग्रणी घटकाची लोकसंख्या 2.60 लक्ष आहे या उपखोऱ्यात सन 2030 साली होणारी अपेक्षित लोकसंख्या घनता इत्यादी तपशील खालील प्रमाणे आहे.

लोकसंख्या-हजारात,घनता-चौकिमी

| अक्र | तपशील | 1991 | | 2030 | |
|---|---|---|---|---|---|
| | | येरळा | अग्रणी | येरळा | अग्रणी |
| 1 | नागरी | 460 | – | 1074 | – |
| 2 | ग्रामीण | 798 | 260 | 1596 | 520 |
| 3 | एकूण | 1258 | 260 | 2670 | 520 |
| 4 | लोकसंख्या घनता | 316 | 199 | 671 | 398 |
| 5 | ग्रामीण लोकसंख्या घनता | 201 | 199 | 401 | 398 |

6.2 <u>पशुधन</u> : सन 1992 च्या मोजणीनुसार या उपखोऱ्यात एकूण पशुधन 7.60 लक्ष आहे, तपशील पुढीलप्रमाणे आहेत.

| घटक | म्हैस व रेडे | गाय व बैल | एकखुरी व उंट | डूकरे | शेळी-मेंढी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| येरळा | 159400 | 149826 | 1560 | 3704 | 258026 | 572516 |
| अग्रणी | 58186 | 45199 | 369 | 1205 | 82679 | 187638 |

6.3 <u>इतर तपशील</u> : येरळा घटकात सांगली-मिरज–कुपवाड ही एकमेव महानगरपालिका व विटा व तासगाव या दोन नगरपालिका आहेत.

अग्रणी घटकात नगरपालिका नाहीत. उपखोऱ्यातील एकूण शेत मजूर संख्या 7 लक्ष 60हजार आहे तर इतर मजुरांची संख्या 3 लक्ष 89 हजार आहे.

शेत मजुरांची व इतर मजुरांची घटक निहाय संख्या खालील प्रमाणे आहे.

| अक्र | घटक | शेत मजूर संख्या | इतर मजूर संख्या | एकूण |
|---|---|---|---|---|
| 1 | येरळा | 710351 | 331224 | 1041575 |
| 2 | अग्रणी | 49987 | 58044 | 108031 |

**7.0 पाणीवापर**

7.1 <u>सिंचनासाठी वापर</u>: खोऱ्यातील वर्गनिहाय प्रकल्प म्हणजे मोठे, मध्यम, बृहतलघु, लघु, लघु प्रकल्प (स्थानिक स्तर) कोल्हापूर पध्दतीचे बंधारे यांची संख्या, चलपाणीसाठा, पाणी वापर, सिंचन क्षेत्र तसेच पूर्ण झालेले,प्रगतीपथावरील व भविष्यकालीन प्रकल्प यांचा तपशील सारणी 16.2 मध्ये दिला आहे. सध्याची निर्मित सिंचन क्षमता 50231 हेक्टर असून त्यातील प्रस्तावित पाणी वापर 215 दलघमी आहे. सिंचनासाठी आणखी 173316 हेक्टर क्षेत्र उपलब्ध होऊ शकते पण त्यासाठी सध्याच्या पाणी वापर पध्दतीप्रमाणे एकूण पाणी वापर 1568 दलघमी लागेल व तेवढे पाणी उपखोऱ्यांत निसर्गतः उपलब्ध नसल्यामुळे ते बाहेरच्या उपखोऱ्यातून आणावे लागेल. वरील क्षेत्राची घटकनिहाय माहिती खालील प्रमाणे आहे.

क्षेत्र - हेक्टर

| घटक | आतापर्यन्त झालेले | 2030 पर्यन्त होणारे | एकूण |
|---|---|---|---|
| येरळा | 43011 | 193296 | 236307 |
| अग्रणी | 7220 | 30251 | 37471 |

7.2 <u>सिंचनेतर पाण्याचा वापर</u> : सिंचनेतर उपयोगासाठी या खोऱ्यातील सध्याची गरज 64 दलघमी आहे . सन 2030 पर्यन्त ती 178 दलघमी होईल. यात उद्योगिकरणासाठी लागणाऱ्या 64 दलघमी पाण्याचा अंतर्भाव आहे.या गरजांचा तपशील पुढील प्रमाणे असेल.

पाणी-दलघमी

| अक्र | तपशील | 1991 | | 2030 | |
|---|---|---|---|---|---|
| | | येरळा | अग्रणी | येरळा | अग्रणी |
| 1 | घरगुती वापरासाठी | 48 | 9 | 99 | 15 |
| 2 | उद्योगासाठी पाणी | 6 | 1 | 63 | 1 |
| | एकूण | 54 | 10 | 162 | 16 |

सरासरी मर्यादित वार्षिक येवा पहाता घरगुती व उद्योगाच्या पाण्यासाठी सुध्दा भूजलाच्या कुशल नियोजनातूनच विश्वासार्ह पाण्याची उपलब्धता या क्षेत्राला मिळू शकेल.

7.3 जलसंपत्तीचा ताळेबंद : एकूण (भूपृष्ठावरील व भूपृष्ठाखालील), आणि घरगुती वापरासाठी उद्योगासाठी व सिंचनासाठी पाणी वापर, यापासून होणारा पूनरुद्भव इत्यादीचा ताळेबंद सारणी 16.3 मध्ये दिलेला आहे.

7.4 लाभक्षेत्र विकास : सद्यःस्थिती खालील प्रमाणे आहे.

क्षेत्र-हजार हेक्टर

| घटक | भूविकास भाग-1चे (शेतचाऱ्या इ) झालेले काम | | भूविकास भाग-2चे (सपाटीकरण इ) झालेले काम | | प्रकल्पाच्या लाभक्षेत्रा-व्यतिरिक्त अन्य |
|---|---|---|---|---|---|
| | लाक्षेविप्रा कडील प्रकल्प | लाक्षेविप्रा बाहेरील प्रकल्प | लाक्षेविप्रा कडील प्रकल्प | लाक्षेविप्रा बाहेरील प्रकल्प | क्षेत्रात झालेले जमीन सपाटी करणाचे ( भाग-2) क्षेत्र |
| अ) येरळा | – | 4.46 | – | 0.61 | 2.05 |
| आ) अग्रणी | – | 1.25 | – | 0.47 | 0.86 |

सिंचित क्षेत्राच्या तुलनेने लाभक्षेत्र विकासाची प्राकृतिक व्यवस्था फार कमी क्षेत्रावर (येरळा 10 टक्के, अग्रणी 6 टक्के) पूर्ण झालेली दिसते.

7.5 सन 1970 पूर्वीची धरणे : उपखो-यातील नेरधरण 1970 पूर्वी बांधलेले आहे. व त्यातील भूपृष्ठिय सिंचनाचा अनुभव या उपखोऱ्याच्या पुढील विकासाचे नियोजन करण्यास चांगला उपयोगी पडणार आहे. त्या दृष्टीने त्या प्रकल्पाच्या आजवरच्या व्यवस्थापनाचे व योगदानाचे मूल्यांकन होणे आवश्यक आहे. तसेच अंजनी धरण 1970 मध्ये बांधून पूर्ण झाले आहे.

## 8.0 पीकरचना

उपखोऱ्यातील पेरणीखालचे क्षेत्र 3.45 लक्ष हेक्टर आहे. या उपखोऱ्यातील बहुतांश क्षेत्र खरीप क्षेत्र आहे. उपखोऱ्यातील जमीन व हवामानास अनुकूल 1) ख.ज्वारी 2) र.ज्वारी 3) बाजरी 4) मिरची 5) हळद 6) आले 7) द्राक्ष 8) डाळींब 9) बोर ही पिके आहेत. कांही प्रमूख पिकांची दर हेक्टरी सरासरी उत्पादकता खालील प्रमाणे आहे.

उत्पादकता क्विंटल/हेक्टर

| अक्र | घटक | पीक | उत्पादकता |
|---|---|---|---|
| | येरळा | | |
| 1 | | खरीप ज्वारी | 13.62 |
| 2 | | रब्बी ज्वारी | 5.41 |
| 3 | | बाजरी | 4.47 |
| | अग्रणी | | |
| 1 | | खरीप ज्वारी | 13.89 |
| 2 | | रब्बी ज्वारी | 4.76 |
| 3 | | बाजरी | 3.85 |

या उपखोऱ्यातील पिकांची हंगामनिहाय टक्केवारी खालील प्रमाणे आहे.

| अक्र | पीक | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | खरीप | 65 |
| 2 | रबी | 30 |
| 3 | दुहंगामी | – |
| 4 | उन्हाळी | – |
| 5 | बारमाही | 5 |

## 9.0 उद्योगधंदे

उपखोऱ्यातील प्रमुख कृषीआधारीत उद्योगधंद्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अक्र | तपशील | येरळा | अग्रणी |
|---|---|---|---|
| 1 | साखर कारखाने | 4 | 1 |
| 2 | सूतगिरण्या | 4 | – |

## 10.0 जलविद्युत निर्मिती

या उपखोऱ्यात कमी पर्जन्यमानामुळे व भौगोलिक परिस्थितीमुळे उर्जा निर्मितीस वाव नाही.

## 11.0 दळणवळणाची साधने

या उपखोऱ्यातून कोल्हापूर-पुणे ब्रॉडगेज व मिरज-पंढरपूर नॅरोगेज जाते. तसेच मिरज-सोलापूर राज्य महामार्ग जातो.

## 12.0 भावी नियोजनाची दिशा

12.1 <u>पाण्याची उपलब्धता व वापर:</u> या उपखोऱ्यात पाण्याची नैसर्गिक सरासरी उपलब्धता केवळ 217 दलघमी आहे. या उपखोऱ्यातील पाणी वापरास नीर्धारीत केलेला स्थानीय पाण्याचा उपयोग 80 दलघमीआहे.

निसर्गतः हे पाण्याच्या तुटीचे खोरे असल्यामुळे उपखोऱ्यामध्ये ऊर्ध्व कृष्णा (पश्चिम) या उपखोऱ्यातून आंतरखोरे स्थलांतराने 1509 दलघमी पाणी आणावयाची योजना पाटबंधारे खात्याची आहे व त्यांसाठी खालील प्रमाणे प्रकल्प हाती घेण्यात आलेले आहेत.

पाणी-दलघमी

| अक्र | योजनेचे नाव | स्थलांतरित पाणी | संबंधीत उपखोरे |
|---|---|---|---|
| 1. | जिहे काठापूर उपसा सिंचन योजना | 38 | ऊर्ध्व कृष्णा (पश्चिम) |
| 2. | उरमोडी पाटबंधारे योजना | 169 | ऊर्ध्व कृष्णा (पश्चिम) |
| 3. | टेंभू उपसा सिंचन योजना | 341 | ऊर्ध्व कृष्णा (पश्चिम) |
| 4. | कृष्णा-कोयना उपसा सिंचन योजना (ताकारी) | 847 | ऊर्ध्व कृष्णा (पश्चिम) |
| 5. | कृष्णा-कोयना उपसा सिंचन योजना (म्हैसाळ) | 66 | ऊर्ध्व कृष्णा (पश्चिम) |
| 6 | तारळी पाटबंधारे प्रकल्प | 48 | ऊर्ध्व कृष्णा (पश्चिम) |
| | एकूण | 1509 | ऊर्ध्व कृष्णा (पश्चिम) |

अशा प्रकारे या दोन्ही प्रकारांमधून पाण्याचा वापर 1589 दलघमी होऊ शकेल.

पाणी वापराची सद्य:स्थिती:

या उपखोऱ्यात 1996 पावेतो 4 मध्यम,42 लघु प्रकल्प व 577 पाझर तलाव 11 को.प.बंधारे यांचेव्दारे 217 दलघमी पाणी साठा निर्माण करण्यात आलेला आहे.

12.2 या उपखोऱ्यातील येरळा व अग्रणी या दोन्ही नद्या अवर्षणप्रवण प्रदेशातुन उगम पावतात व अवर्षणप्रवण प्रदेशातून वाहतात. येव्यांमध्ये तीव्र दोलायमानता आहे हे परिच्छेद 3.1 वरुन सहजपणे दिसून येते. 90 टक्के उपलब्धता व 10 टक्के उपलब्धता (म्हणजे एकांतिक अति पावसाची व अति अवर्षणाची वर्षे सोडून आलेली उपलब्धता) यातील गुणक जवळ जवळ 40 आहे पण 75 टक्के व 50 टक्के उपलब्धता यातील गुणक मात्र 1.7 आहे. याचाच अर्थ 50 टक्के हूनही कमी उपलब्धतेच्या पाण्याच्या वापराचा विचार अनुकूल पाण्याच्या वर्षासाठी या उपखोऱ्यांत होणे आवश्यक आहे. विशेषत: 1981-82,1988-89,व 1991-92 या चांगल्या वर्षांच्या पाण्याच्या उपलब्धतेचे समृध्दीत रुपांतर करता यायला हवे. 1987-88,1991-92, 1993-94 या दुष्काळा पाठोपाठ येणाऱ्या अनुकूल वर्षांच्या उत्पादनातील घट भरून काढण्यासाठी अधिकाधिक उपयोग करता यायला हवा. या दृष्टीने या उपखोऱ्यातील उपलब्ध नैसर्गिक पाण्याच्या वापराचे फेरनियोजन आर्थिक लाभव्ययाच्या प्रमाणाची मर्यादा जिथपर्यंत परवानगी देइल तिथपर्यंत कमी विश्वासार्हतेचे (सरासरी पेक्षा खाली) पाणी वापरणे हितावह राहणार आहे. पाण्याच्या साठवणींचा या दृष्टीने फेरविचार व्हायला हवा.

12.3 या उपखोऱ्यांत पाण्याची चणचण आहे. म्हणून उपसा सिंचन योजनाव्दारे पाणी स्थलांतरीत करण्याचे प्रस्तावीत केले आहे. या उपसा सिंचन योजनांचा भांडवली व आवर्ती खर्च मोठा राहणार आहे. यासाठी लावलेला आर्थिक निकष, पाण्याचा आवर्तीखर्च,त्याला अनुसरुन लावावयाची पाणीपट्टी,त्यासाठीची अनुकूल पिकरचना, व लाभधारकांची हा भार सोसण्याची तयारी या सर्व घटकांचा खोलात जाऊन अभ्यास,प्रबोधन व व्यवस्था निर्मिती यांची तातडीची गरज आहे. वार्षिक विजेच्या खर्चाचा भार व उपसा सिंचन योजनांचा घसारा बराच येणार आहे. विशेषत: जेव्हा बाजारातून कर्जरोखे काढून अशा योजनांसाठी भांडवल उभारले जात आहे, तेव्हा त्या सर्व व्यवहारांची सर्वंकष मांडणी तपशीलात स्पष्ट असणे इष्ट राहील. सिंचनाच्या पध्दती,शेतकऱ्याचा सहभाग,पाणी वितरण संस्थांची निर्मिती, व अधिक मूल्याच्या पाण्याच्या वापराचे व्यवस्थापन हे सर्व नीट बसविले जाणे गरजेचे आहे. त्यासाठीच्या अर्थव्यवहारांचे आर्थिक निकषही नीट तपासून त्या दृष्टीने सर्व तपशीलांची आखणी आवश्यक आहे. ज्या लाभार्थींसाठी हा सारा खटाटोप आहे त्यांना या तपशीलांची नीट माहिती असणेही आवश्यक आहे. म्हणजे त्या दृष्टीने सुयोग्य पीक रचना,वितरण पध्दती,सामाजिकसंस्था बांधणी व आर्थिक ताळेबंद यांचा नीट आगाऊ विचार होऊ शकेल. सर्वसाधारणपणे पाणी उपशांची उंची 60 मीटर पर्यंत व लांबी 4 किमी पर्यंत असणाऱ्या योजना जेमतेम आर्थिकदृष्टया लाभदायक ठरू शकतील. असे सध्याच्या तपासणीवरून दिसून येते. यापेक्षा अधिक उंचीच्या लांबीच्या योजनांचा लाभव्ययांचे तपशील अर्थतज्ज्ञांकडून अधिक काटेकोरपणे तपासून त्यादृष्टीने त्यावरील परताव्यांची रचना सुसंबध्द पध्दतीने होणे अत्यंत आवश्यक आहे.

12.4 या उपखोऱ्यातील मोठा भाग पाण्याचे पुनर्भरणास अनुकूल असल्यामुळे या उपखोऱ्याचा भूशास्त्रीय अभ्यासास विशेष प्रोत्साहन देणे उपयुक्त राहील. यासाठी स्थानिक महाविद्यालयांमध्ये भूगर्भशास्त्राचा प्राधान्याने समावेश व्हायला हवा.

आयोगाने मे 1997 मध्ये या उपखोऱ्यास भेट दिली. येरळा नदीवर येरळा व अग्रणी नदीवर सिध्देवाडी या प्रकल्पांच्या लाभक्षेत्रात खूप मोठया प्रमाणात विंधण विहिरी वाढल्या आहेत. विहिरीवर बागायत वाढवून प्रामुख्याने द्राक्ष पिके घेत असल्याचे दिसले. जलाशयातील पाणी

नदीत सोडून नदी बारमाही वाहती करावी व त्यातून पाणी उचलून द्राक्ष पिके वाढविण्याकडे शेतकऱ्याचा कल दिसला. पाण्याच्या पुनर्भरणाच्या अभावी व अमर्यादित उपसा यामुळे अलिकडे द्राक्षाचे पीक अडचणीत येत असल्याचे समजते. यावर मात करण्यासाठी मोठया प्रमाणावर पुनर्भरण वाढीकडे त्याबरोबरच पाणी उपसा नियमनाकडे लक्ष देण्याची गरज आहे.

द्राक्ष हे पीक या भागात वाढविण्यास आणखी एक प्रमुख कारण म्हणजे त्याच्या उत्पादन व विक्रीला मिळणारे प्रोत्साहन. द्राक्ष बागायतदार सहकारी संघटनेचे या द्राक्ष बागायतदार महासंघाव्दारे द्राक्ष उत्पादन वाढीसाठी शेतकऱ्यांच्या प्रशिक्षणाचेही कार्यक्रम राबविण्यांत येतात. एकटया येरळा या घटक क्षेत्रामधे 13 हजार हेक्टरवर द्राक्षाचे पीक उभे असल्याचे समजले. द्राक्षाबरोबरच बेदाणा तयार करण्याचा कार्यक्रम देखील या भागात राबविण्यांत येत असल्याचे दिसले. अशा या सामुहिक कार्यपध्दतीस प्रोत्साहित करण्याची व वाढविण्याची गरज आहे.

12.5 या उपखोऱ्यातील दुसरे वैशिष्टय म्हणजे भिलवडीचा दुग्ध विकास प्रकल्प. निसर्गतः पाण्याच्या दृष्टीने तुटीच्या असलेल्या खोऱ्यामध्ये उत्तम दर्जाच्या गाई म्हशीची वाढ करून शेतकऱ्याना पूरक व्यवसाय उपलब्ध करून देऊन त्याच्या उत्पन्नात भर घालण्यांस असे प्रकल्प कारणीभूत ठरतात हे त्यातून सिध्द झाले आहे. दुग्ध व्यवसाय हा तुटीच्या खोऱ्यामधील शेतकऱ्यांना समृध्दीकडे घेवून जाण्यासाठी एक चांगला पर्याय आहे असे दिसून येते. या उपखोऱ्याच्या विकासाचा तपशीलवार आराखडा करतांना त्या त्या खोऱ्यातील निसर्ग स्थितीस अधिक अनुकूल ठरणाऱ्या घटकांना प्राथमिकता देणे आवश्यक आहे.

12.6 गेल्या 25-30 वर्षांपासून कृष्णा नदीतून सहकारी उपसा सिंचन योजनेव्दारे कृष्णा व येरळा या नद्यांच्या संगमाजवळभारी,काळया मातीच्या कमी निचरा असणाऱ्या जमिनीवर सातत्याने ऊसावर ऊस हे पीक घेतल्यामुळे हजारो हेक्टर जमीनी खराब झालेल्या आहेत असे आयोगाने दिलेल्या क्षेत्रिय भेटीत दिसून आले. जमिनीला उतार कमी,पाण्याचा निचरापण कमी व यामुळे जमिनीवर क्षार आलेला आहे. व जमिनी नापीक होत आहे. ऊसाचे उत्पादन घसरले आहे. शासकीय व्यवस्थेखाली हे सिंचन क्षेत्र येत नसल्यामुळे अशा पाणथळ,क्षारपड जमिनीची दुरुस्ती पाटबंधारे खात्याच्या व्यवस्थेतून हाती घेतली जात नाही.

लोकसहभागातून व स्थानिक साखर कारखान्यांच्या माध्यमातून दुरुस्तीच्या काही योजना राबविल्या आहेत पण प्रश्न सुटलेला नाही असे दिसले. असे प्रश्न सोडविण्यासाठी व त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी वैज्ञानिक निकषावर आधारलेली व्यवस्था याठिकाणी बसविणे आयोगास आवश्यक वाटते. अशा क्षेत्रावर यापुढे ऊस पिकाऐवजी मातीचे परिक्षण करून त्यानुसार रासायनिक व अभियांत्रिकी उपाययोजना राबविणे,इतर पिकांवर भर देणे व पाण्याचा वापर कमी करणे व त्यासाठी ठिबक व तुषार पध्दतीचा अवलंब करणे याची स्पष्ट गरज दिसते.

12.7 एकंदरीनेच या उपखोऱ्यात पाण्याची उपलब्धता कमी असल्यामुळे उपखोऱ्याच्या आर्थिक समृध्दीसाठी केवळ कृषी उत्पन्नावर भरदेण्यापेक्षा पाण्याचा वापर कमी असणाऱ्या इतर औद्योगिक उत्पादनांकडे वळणे इष्ट राहील असे दिसते. पाण्याची चणचण असणाऱ्या अशा भागात ऊस या पिकास प्रोत्साहन देणे हितावह राहणार नाही.

12.8 या उपखोऱ्यातील मोठे क्षेत्र अवर्षणप्रवण आहे. म्हणून सर्वच मूल्यदायी पिकपध्दती वाढती काटकसर करण्याच्या दृष्टिकोनातून ठिबक ,तुषार या सारख्या आधुनिक पध्दतींकडे घेऊन जाणे आवश्यक आहे.उपखोऱ्यातील हवामान फळबागांसाठीउपयुक्त असल्यामुळे बोर,चिंच,डाळींब यांच्या फळबागांना चांगला प्रतिसाद आहे. सामुहिक व्यवस्थेतून शितगृहेही उभी रहात आहेत. अशा उपक्रमांना प्रोत्साहन देण्याची गरज आहे. म्हणजे अर्थव्यवस्था क्रमशः अशा कमी पाण्याच्या उत्पादनांवर आधारीत प्रक्रिया उद्योगांकडे वळेल व जास्त पाण्याच्या पिकावर अवलंबून रहावे लागणार नाही.

12.9 सध्या अस्तित्वात असलेल्या कारखान्यांनी त्यांच्या सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते शुध्द करून सोडलेले नसल्यामुळे कारखान्यांच्या आजुबाजूस साधारण 4-5 किलो मीटर परिसरातील पाणी दुषीत झाल्याचे दिसते. यामुळे कारखान्याच्या अवजलावर प्रक्रिया करूनच नदीमध्ये सोडण्याचे व्यवस्था बसविण्याची गरज आहे. घरगुती वापरासाठी व औद्योगिकरणासाठी अनुक्रमे 20 टक्के व 2.5 टक्के धरण्याची तरतूद लवादाच्या निर्णयात आहे. यातून घरगुती वापरातील 80 टक्के पाणी आणि उद्योगातील 97.5 टक्के पाणी सिंचनास वा इतर उपयोगासाठी उपलब्ध होते असे अभिप्रेत आहे. या सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्या पाण्याचा पुनर्वापर चक्रीय पध्दतीने करणे हे राज्याच्या दृष्टीने हिताचे आहे. असा पुनर्वापर वाढविण्याची गरज आहे. हे परत येणारे पाणी कोठे व कसे मोजले जाणार, कोठे परत मिळणार याची व्यवस्था बसविण्याची गरज आहे.

सारणी : 16.1

**हवामानाचा तपशील**

पर्जन्य,बाष्पीभवन - मिमी

| अक्र | महिना | पर्जन्य | | बाष्पीभवन | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | येरळा | अग्रणी | येरळा | अग्रणी | सरासरी |
| 1 | जानेवारी | 0 | 7 | 115 | 91 | 103 |
| 2 | फेब्रुवारी | 0 | 0 | 120 | 92 | 106 |
| 3 | मार्च | 0 | 0 | 219 | 153 | 186 |
| 4 | एप्रिल | 1 | 1 | 236 | 156 | 196 |
| 5 | मे | 118 | 72 | 234 | 162 | 198 |
| 6 | जून | 92 | 101 | 108 | 144 | 126 |
| 7 | जुलै | 70 | 38 | 163 | 129 | 146 |
| 8 | ऑगस्ट | 104 | 84 | 142 | 131 | 136 |
| 9 | सप्टेंबर | 27 | 27 | 134 | 124 | 129 |
| 10 | ऑक्टोबर | 118 | 115 | 126 | 122 | 124 |
| 11 | नोव्हेंबर | 29 | 25 | 114 | 94 | 104 |
| 12 | डिसेंबर | 0 | 0 | 122 | 83 | 102 |
| | एकूण | 559 | 470 | 1833 | 1481 | |

**हंगाम निहाय बाष्पीभवन**

| हंगाम | येरळा | अग्रणी |
|---|---|---|
| खरीप | 534 | 445 |
| रब्बी | 502 | 421 |
| उन्हाळी | 797 | 615 |
| एकूण | 1833 | 1481 |

टीप : 1) वार्षिक बाष्पीभवन वार्षिक पर्जन्यमानाच्या तिप्पट आहे.

2) कोणत्याही महिन्यांत नैसर्गिक पर्जन्यमानापेक्षा बाष्पीभवन अधिक आहे. पावसाळ्याच्या चारही महिन्यांत अशी स्थिती आहे. विशेषत:सप्टेंबर महिना तर यादृष्टीने फारच तुटीचा आहे. ही तूट जुलै/ऑगस्ट मधील ओहोळ अनेक ठिकाणी छोटया छोटया साठवणीत आडवून व शेतीक्षेत्रावरचे बाष्पीरोधक आच्छादन वाढवून अंशत: भरुन काढावी लागेल.

## सारणी 16.2
## प्रकल्पांची सद्य:स्थिती
## येरळा घटक क्षेत्र

चलपाणीसाठा - दलघमी
पाणीवापर - दलघमी
सिंचनक्षेत्र - हेक्टर

| अक्र | प्रकल्पाचा संवर्ग | पूर्ण झालेले प्रकल्प | | | | प्रगतीपथावरील प्रकल्प | | | | भविष्यकालीन प्रकल्प | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नाव संख्या | चलपाणी साठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चलपाणी साठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चलपाणी साठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चलपाणी साठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 1 | मोठे | | निरंक | | | कृष्णा | | 86.4 | 26409 | | निरंक | | | | 0 | 86,4 | 26409 |
| | | | निरंक | | | सु.तारळी | | 71.34 | 4438 | | निरंक | | | | 0 | 71.34 | 4438 |
| | | | निरंक | | | उरमोडी | | 105.1 | 9725 | | निरंक | | | | 0 | 105.1 | 9725 |
| | | | निरंक | | | टेंभू | | 267.9 | 27443 | | निरंक | | | | 0 | 267.9 | 27443 |
| | | | निरंक | | | कृष्णा-कोयना | | 428.5 | 56500 | | निरंक | | | | 0 | 428.5 | 56500 |
| | | | निरंक | | | जिहे-कठापूर | | 93.34 | 11700 | | निरंक | | | | 0 | 93.34 | 11700 |
| | | | | | | | | 1052.58 | 136215 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1052.58 | 136215 |
| 2 | मध्यम | नेर | 11.89 | 13.59 | 4320 | | | | | औंध | | 36.8 | 7700 | | 11.89 | 50.39 | 12020 |
| 3 | | येरळवाडी | 17.84 | 10.72 | 3140 | | | | | | | | | | 17.84 | 10.72 | 3140 |
| 4 | बृहत लघु | 29 | 51.76 | 51.76 | 8172 | 5 | | 19.57 | 2241 | 3 | 4.38 | 4.38 | 608 | | 56.14 | 75.71 | 11021 |
| 5 | पाझर तलाव | 409 | 89.49 | 89.49 | 10088 | 32 | | | 1004 | 28 | | | 878 | | 89.49 | 89.49 | 11970 |
| | को.प.बंधारे | 10 | | | 17291 | 1 | | | 1639 | | | | | | 0 | 0 | 18930 |
| | एकूण | 450 | 170.98 | 165.56 | 43011 | 44 | 0 | 1072.15 | 141099 | 32 | 4.38 | 41.18 | 9186 | 526 | 175.36 | 1278.89 | 193296 |

टीप : हे सर्व प्रकल्प उपखोरे क्र 15 मध्ये असून त्यातील पाणी या उपखोऱ्यात वळवलेले आहे.

सारणी : 16.2 (चालू)

**प्रकल्पांची सद्य:स्थिती**

**आ) अग्रणी घटक क्षेत्र**

चलपाणीसाठा - दलघमी
पाणीवापर - दलघमी
सिंचनक्षेत्र - हेक्टर

| अक्र | प्रकल्पाचा संवर्ग | पुर्ण झालेले प्रकल्प | | | | प्रगतीपथावरील प्रकल्प | | | | भविष्यकालीन प्रकल्प | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नाव संख्या | चलपाणी साठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चलपाणी साठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चलपाणी साठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चलपाणी साठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 1 | मोठे | | | | | कृष्णा कोयना | | 129.9 | 11463 | | | | | | 0 | 129.9 | 11463 |
| | | | | | | टेंभू | | 105 | 10755 | | | | | 2 | 0 | 105 | 10755 |
| 2 | मध्यम | सिध्देवाडी | 3.96 | 6.51 | 730 | | | | | | | | | | 3.96 | 6.51 | 730 |
| | | बसप्पावाडी | 5.66 | 5.65 | 860 | | | | | | | | | 2 | 5.66 | 5.65 | 860 |
| 3 | बृहत व ल.पा.तलाव | 13 | 21.23 | 21.23 | 3343 | 2 | 4.05 | 4.05 | 515 | | | | | 15 | 25.28 | 25.28 | 3858 |
| 4 | पाझर तलाव | 168 | 15.62 | 15.62 | 2280 | 11 | 0.85 | 0.85 | 265 | 3 | | 0.08 | 33 | 182 | 16.47 | 16.55 | 2578 |
| 5 | को.प.बंधारे | 1 | | | 7 | | | | | | | | | 1 | 0 | 0 | 7 |
| | **एकूण** | 184 | 46.47 | 49.01 | 7220 | 15 | 4.9 | 239.8 | 22998 | 3 | 0 | 0.08 | 33 | 202 | 51.37 | 288.89 | 30251 |

## सारणी : 16.3
## जलसंपत्तीचा ताळेबंद
## घटक क्षेत्र – येरळा

जलसंपत्ती • दलघमी

| अक्र | उपलब्धता | | अक्र | वापर (सन2030) | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | भूपृष्ठावरील | | 4 | भूपृष्ठावरील | |
| | अ) नैसर्गिक | | | अ) घरगुती वापरासाठी | |
| | 1) 75 टक्के विश्वासार्हतेने | 20 | | 1) नागरी | 53 |
| | 2) 50 टक्के विश्वासार्हतेने | 50 | | 2) ग्रामीण | 32 |
| | 3) सरासरीने | 130 | | 3) पशुधन | 14 |
| | 4) नियोजनासाठी | 65 | | एकूण – | 99 |
| | ब) मानवप्रबोधित | | | ब) उद्योगधंदयासाठी | 63 |
| | 1) नागरी वापरातून पुनरुद्भव (80 %) | 42 | | एकूण सिंचनतर वापर • | 162 |
| | 2) उद्योग धंदयातील पुनरुद्भव (97.5%) | 61 | 5 | इतर उपखोऱ्यात स्थलांतरात पाणी | 0 |
| | 3) इतर खोऱ्यातून संक्रमित झालेले पाणी | 1253 | 6 | सिंचनासाठी उपलब्ध भूपृष्ठावरील पाणी (65+1356-162)+126 | 1385 |
| | एकूण (1 ब) | 1356 | | | |
| 2 | मानवनिर्मित | | | | |
| | लाभक्षेत्रातील पुनर्भरण (65+1356-162)च्या10 % | 126 | | | |
| 3 | एकूण उपलब्धता (65+1356-162+126) | 1547 | 7 | एकूण वापर | 1547 |
| | 1) भूजल उपलब्धता (वार्षिक एकूण पुनर्भरण ) | 423 | | अ) भूजलाचा सध्याचा सिंचनासाठी वापर | 67 |
| | 2) भूजल वापरास मुभा ( 423 च्या 65 %) | 275 | | | |

टीपा : 1) भूजल उपलब्धतेमूळे उपखोऱ्याच्या एकूण उपलब्धतेत वाढ होणार नाही ; भूजलाचा जेवढा उपसा होईल तेवढा नदी प्रवाह घटत जाईल म्हणून एकूण उपलब्धतेचा आकडा काढतांना भूजल उपलब्धतेचा विचार घेतलेला नाही.

2) संकलीत अंदाजासाठी सर्व पाण्याचा उपयोग भूपृष्ठावरील पाण्यातून दाखविला आहे. पण एकूण वापरापैकी अधिकाधिक 275+126= 401 भूजल माध्यमातून शक्य आहे.

3) पाणी वापराचे नियोजन उपलब्ध येवा मालिकेवर आधारित आहे

सारणी : 16.3 (चालू)

**जलसंपत्तीचा ताळेबंद**

**घटक क्षेत्र – अग्रणी**


जलसंपत्ती - दलघमी

| अक्र | उपलब्धता | | अक्र | वापर (सन2030) | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **भूपृष्ठावरील** | | 4 | **भूपृष्ठावरील** | |
| | अ) नैसर्गिक | | | अ) घरगूती वापरासाठी | |
| | 1) 75 टक्के विश्वासार्हतेने | 5 | | 1) नागरी | |
| | 2) 50 टक्के विश्वासार्हतेने | 13 | | 2) ग्रामीण | 10 |
| | 3) सरासरीने | 87 | | 3) पशूधन | 5 |
| | 4) नियोजनासाठी | 15 | | एकूण – | 15 |
| | ब) मानवप्रबंधित | | | ब) उद्योगधंदयासाठी | 1 |
| | 1) नागरी वापरातून पुनरुद्भव (80 %) | | | एकूण सिंचनेतर वापर - | 16 |
| | 2) उद्योग धंदयातील पुनरुद्भव (97.5%) | | 5 | इतर उपखोऱ्यात स्थलांतरीत पाणी | 0 |
| | 3) इतर खोऱ्यातून संक्रमित झालेले पाणी | 256 | 6 | सिंचनासाठी उपलब्ध भूपृष्ठावरील पाणी (15+256-16)+25 | 280 |
| | **एकूण (1 ब)** | **256** | | | |
| 2 | मानवनिर्मित | | | | |
| | लाभक्षेत्रातील पुनर्भरण (15+256-16) च्या10 % | 25 | | | |
| 3 | **एकूण उपलब्धता (15+256+25)** | **296** | 7 | एकूण वापर | **296** |
| | 1) भूजल उपलब्धता (वार्षिक एकूण पुनर्भरण ) | 133 | | अ) भूजलाचा सध्याचा सिंचनासाठी वापर | |
| | 2) भूजल वापरास मूभा ( 133 च्या 65 %) | 86 | | | |

टीपा : 1) भूजल उपलब्धतेमूळे उपखोऱ्याच्या एकूण उपलब्धतेत वाढ होणार नाही ; भूजलाचा जेवढा उपसा होईल तेवढा नदी प्रवाह घटत जाईल म्हणून एकूण उपलब्धतेचा आकडा काढतांना भूजल उपलब्धतेचा विचार घेतलेला नाही.

2) संकलीत अंदाजासाठी सर्व पाण्याचा उपयोग भूपृष्ठावरील पाण्यातून दाखविला आहे. पण एकूण वापरापैकी अधिकाधिक 86+25= 111 भूजल माध्यमातून शक्य आहे.

3) पाणी वापराचे नियोजन उपलब्ध येवा मालिकेवर आधारित आहे



नकाशा - 16.1
8 Km 0 8 16 Km
महाराष्ट्र राज्य
16 ऊर्ध्व कृष्णा (पूर्व)
• संदर्भ सूची •
1. राज्य सरहद्द
2. जिल्हा सरहद्द
3. तालुका सरहद्द
4. उपखोरे सरहद्द
5. घटक क्षेत्र हद्द
6. जिल्हा मुख्यालय
7. तालुका मुख्यालय
8. रेल्वे मार्ग
9. रस्ते
10. नद्या व नाले
11. समपर्जन्यमान रेषा (मिमी) 1400
12. धरणाचे ठिकाण व बुडीत क्षेत्र पूर्ण बांधकामाधीन भविष्यकालीन
13. औद्योगिक क्षेत्र
14. महानगरपालिका
15. नगर पालिका
16. आंतरखोरे पाणी स्थलांतराच्या योजना
– कार्यरत
– बांधकामाधीन
महाराष्ट्र जल व सिंचन आयोग
ऊर्ध्व कृष्णा (पूर्व) उपखोरे
अ) येरळा घटक
आ) अग्रणी घटक
जून 1999
सा तारा जि ल्हा
सां ग ली जि ल्हा
उ त्त र भी मा
उ प खो रे
ऊर्ध्व कृष्णा (पश्चिम) उपखोरे
क र्ना ट क
600
500
नेर प्रकल्प
उरमोडी पाटबंधारे प्रकल्प
जिहे काठापूर उपसा सिंचन योजना
तारळी पाटबंधारे प्रकल्प
वडूज (खटाव)
येरळवाडी
येरळा नदी
नांदणी नदी
कराड कडे
विटा (खानापूर)
टेंभू उपसा सिंचन योजना
सिध्देवाडी
अग्रणी नदी
बसप्पावाडी
16अ
16आ
कवठेमहांकाळ
तासगाव
कापूर नदी
पुणे कडे
कृष्णा-कोयना उपसा सिंचन योजना (ताकारी)
कृष्णा नदी
इस्लामपूर कडे
सांगली
मिरज
कोल्हापूर कडे
बंगलोर कडे
सोलापूर कडे
कुर्डुवाडी कडे
कृष्णा-कोयना उपसा सिंचन योजना (म्हैसाळ)
उपखोऱ्याचे स्थान
उपखोरे क्र.
उपखोऱ्यांची नावे
15 ऊर्ध्व कृष्णा (पश्चिम)
18 उर्वरीत भीमा
कर्नाटक

# उपखोरे : 17

# ऊर्ध्व भीमा (उजनीपर्यन्त)

## 1.0 भौगोलिक तपशील

ऊर्ध्व भीमा (उजनीपर्यन्त) उपखोऱ्याची भीमा ही मुख्यनदी आहे. उपखोऱ्याचे भौगोलिक क्षेत्र 14712 चौकिमी आहे. त्यात पुणे, सोलापूर, अहमदनगर जिल्हयांतील खालील तालूक्यांच्या क्षेत्राचा (नकाशा 17.1) समावेश होतो.

**पुणे** :- 1) आंबेगाव 2) जुन्नर 3) खेड 4) हवेली 5) मावळ 6) दौंड 7) बारामती 8) वेल्हे 9) शिरुर 10) मुळशी 11) इंदापूर

**सोलापूर** :- 1) करमाळा

**अहमदनगर** :- 1) श्रीगोंदा 2) कर्जत 3) पारनेर

मुख्य नदी, तिच्या उपनद्या इत्यादी बाबतची माहिती खालील प्रमाणे आहे.

तलांक - मी, लांबी - किमी

| अक्र | नदी | उपनदी | लांबी | उगमस्थान | | संगमस्थान | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ठिकाण | तलांक | ठिकाण | तलांक |
| 1 | भीमा | | 275* | भीमाशंकर | 700 | कृष्णा जिल्हयात (आ.प्र.) कृष्णेस | 343 |
| 2 | | भामा | 53 | - | - | - | - |
| 3 | | इंद्रायणी | 83 | आपटी | 900 | पारगाव जवळ मुळा नदीस | |
| 4 | | वेळ | 60 | - | - | - | - |
| 5 | | पवना | 55 | मुळा | 900 | दापोडी जवळ मुठेस | 439 |
| 6 | | मुळा | 50 | माझगाव | - | पारगाव, भीमेस | 522 |
| 7 | | मुठा | 63.5 | डावझर | 900 | खडकी मुळा नदीस | 564 |
| 8 | | घोड | 170 | गावडेवाडी | 1000 | दौडजवळ भीमेस | 498 |
| 9 | | मीना | 53 | अंबोली | | घोड नदीस | - |
| 10 | | कुकडी | 85 | घाटघर | - | शिरुर जवळ घोड नदीस | 562 |
| 11 | | पुष्पावती | 35 | खिरेश्वर | - | कुकडीस | - |

1.1 <u>विस्तार</u> : या उपखोऱ्याचा क्षेत्रीय विस्तार अक्षांश 18° 3` ते 19° 24` उत्तर व रेखांश 73° 20` ते 75° 18` पूर्व या मध्ये आहे.

[1] *महाराष्ट्रातील उपखोऱ्यांच्या मर्यादेत.

1.2 चतु:सीमा : उपखोऱ्याच्या चतु:सीमा खालील प्रमाणे आहेत.

| अक्र | दिशा | तपशील |
|---|---|---|
| 1 | उत्तर | ऊर्ध्व गोदावरी (प्रवरा) उपखोरे क्र 1 आ |
| 2 | पूर्व | सीना (बोरी-बेनीतुरा) उपखोरे क्र 19 अ |
| 3 | पश्चिम | सहयाद्रीच्या रांगा, कोकण प्रदेश |
| 4 | दक्षिण | उर्वरीत भीमा (नीरा) उपखोरे क्र 18 अ |

## 2.0 हवामान

2.1 उपखोऱ्यातील पश्चिमेचे एकचतुर्थांश क्षेत्र चांगल्या पावसाचे आहे पण उर्वरीत 3/4 क्षेत्र तुटीचे (700 मिमी पेक्षा कमी पाऊस असलेले आहे. त्यातही 600 मिमी पेक्षाही कमी पाऊस मिळणारे पारनेर/शिरुर पट्ट्याचे क्षेत्रही बरेच मोठे आहे. साधारणत: 85 टक्के पाऊस नैऋत्य मोसमी वाऱ्यांमुळे जून ते सप्टेंबर दरम्यान,11 टक्के पाऊस ईशान्य मोसमी वाऱ्यांमुळे सप्टेंबर ते डिसेंबर दरम्यान पडतो तर 4 टक्के पाऊस डिसेंबरनंतर पडतो. सर्व उपखोऱ्याचा एकत्रित हिशोब केला तर वार्षिक सरासरी पर्जन्यमान 1086 मिमी पडते.त्यामुळे जलाशय साठवणीच्या दृष्टीने हे अनुकूल उपखोरे आहे. या उपखोऱ्यात भारतीय हवामान खात्याची सुप्रसिध्द वेधशाळा पुणे येथे इ.स 1928 पासून आहे. या उपखोऱ्यातील हवामान विषयक इतर बाबी व पर्जन्यमानातील दोलायमानता या बाबतचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

पर्जन्यमान-मिमी, तपमान - अंश.से

| अक्र | | परीमाण | वर्ष महिना | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1 | सर्वात अधिक पाऊस | 6599 | 1990 | भीमाशंकर |
| 2 | सर्वात अधिक तपमान | 45 | मे-1994 | आसखेडा |
| 3 | सर्वात कमी तपमान | 3 | जानेवारी-94 | आसखेडा |

कृषि हवामान वर्गीकरणानुसार या उपखोऱ्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

4-संक्रमण विभाग 1 लाल ते लालसर तपकिरी रंगाच्या जमिनीचा विभाग (TR-1),5-संक्रमण विभाग 2 करडया रंगाच्या जमिनीचा विभाग (TR-2) व 6-अवर्षण (कमी पावसाचा) विभाग (SC).

या उपखोऱ्यातील पर्जन्यमानातील दोलायमानता गुणांक 32 (तक्ता 2.5.8) आहे. सरासरी पर्जन्यमानाचा माहवार तपशील सारणी 17.1 मध्ये दिला आहे. पुणे येथील 1901 ते 1989 च्या पर्जन्यमानाचा तपशील हा यात दिला आहे.उपखोऱ्यातील पर्जन्यमापन केंद्राचा तपशील सारणी 17.2 मध्ये दिला आहे.

2.2 बाष्पीभवन : उपखोऱ्यात सर्वाधिक बाष्पीभवन मे महिन्यात 344 मिमी (केंद्र काष्टी)तर सर्वात कमी बाष्पीभवन ऑगस्ट महिन्यात 59 मिमी (केंद्र चासकमान) होते.केंद्रनिहाय व माहवार बाष्पीभवनाचा तपशील सारणी 17.3 मध्ये दिला आहे. हवामानाच्या दृष्टीने हे उपखोरे तीन भिन्न गटांमधे स्पष्टपणे जाणवते 1) सहयाद्रीचा पर्वतीय प्रदेश 2) अवर्षणप्रवण प्रदेश 3) इतर.

क्षेत्रीय दृष्टीने आत्यंतिक विषमतेचे हे उपखोरे आहे. खंडाळा येथे वार्षिक सरासरी पर्जन्यमान 4200 मिमी तर दौंडजवळ 500 मिमी पेक्षाही कमी पाऊस आहे.

## 3.0 जलसंपत्तीची उपलब्धता

**3.1** भूपृष्ठीय जलसंपत्ती : या उपखोऱ्यातील एकूण सरासरी येवा 7594 दलघमी आहे.वर्ष 1979-80 ते 1993-94 या अवधीतील सरितामापन केंद्रांच्या आधार सामग्रीवर आधारभूत एकूण पाण्याची उपलब्धता खालीलप्रमाणे येते:

75 टक्के विश्वासार्हतेने 6293 दलघमी

50 टक्के विश्वासार्हतेने 7416 दलघमी.

येवा मोजण्याच्या ठिकाणांबाबतची माहिती खालील प्रमाणे आहे.

येवा - दलघमी

| अक्र | सरिता मापन केंद्राचे नाव | स्वामित्व | आधार सामुग्री उपलब्धतेचा कालावधी | वार्षिक सरासरी येवा |
|---|---|---|---|---|
| 1 | आसखेडा | पा.खा. | 1983-97 | 148 |
| 2 | चासकमान | पा.खा. | 1977-97 | 374 |
| 3 | खेड | पा.खा. | 1977-[illegible] | 398 |
| 4 | पारगाव | पा.खा. | 1982-97 | 3658 |
| 5 | राक्षेवाडी | पा.खा. | 1984-97 | 1530 |
| 6 | दौंड | कें.ज.आ. | 1977-86 | 5867 |
| 7 | दत्तवाडी | पा.खा. | 1982-97 | 755 |
| 8 | बंडगार्डन | पा.खा. | 1980-84 | 2878 |
| 9 | खामगाव | पा.खा. | 1984-97 | 2031 |
| 10 | वेगरे | पा.खा. | 1994-97 | 214 |
| 11 | पौड | पा.खा. | 1984-97 | 313 |
| 12 | ताकवे (सांगवी) | पा.खा. | 1977-97 | 668 |

टीप : या उपखोऱ्याचा सरासरी येवा हा ऊजनी धरणाची एकूण आवक जलसंपत्ति उस्रोत भागातील पाणी वापर यांचे मालिकेद्वारे ठरविलेला आहे.

वेगवेगळया विश्वासार्हतेचा येवा सारणी 17.4 मध्ये दर्शविला आहे.

3.2 भूशैलीय रचना :

भूपृष्ठीय स्थिती (भूरूप वर्णन) : उपखोऱ्यात साधारण 25 टक्के भूभाग अतिविच्छेदीत व डोंगराळ, 55 टक्के पठारी आणि 20 टक्के सपाट व नदीलगतचा गाळाचा आहे. यात भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा निर्देशित 68 पाणलोट क्षेत्रे आहेत.

भूपृष्ठिय शैलस्थिती : उपखोऱ्यात मुख्यत्वे लाव्हा थरांपासून तयार झालेला बहुस्तरीय दक्षिणी कातळ खडक (डेक्कन ट्रॅप प्रस्तर) आढळतो. त्यावर आलिकडील काळात तयार झालेला गाळाचा प्रस्तर मुख्यत्वे भीमा, घोड, मुळा व मुठा नद्यांच्या काठावर आढळतो

बहुस्तरीय दक्षिणी कातळ खडकात (डेक्कन ट्रॅप प्रस्तरात) प्रामुख्याने भरीत-कुहरी बेसाल्टचे प्राबल्य असून त्यातील रंध्रे झिओलाईटस, ॲमेथिस्ट या खनिजांनी भरलेली आहेत. या प्रस्तरात डोलेराईटच्या शैलभित्ती (Dykes) सुध्दा आहेत.गाळाच्या प्रस्तराची व्याप्ती फारच कमी असून तो माती व वाळूने बनलेला आहे. त्याची जाडी 6 ते 10 मीटर पर्यंत आहे.

3.3 भूजल संपत्ती : भौगोलिक व पर्जन्याच्या विपरीत स्थितीमुळे सर्वसाधारणपणे उपखोऱ्यातील भूजल संपत्ती मर्यादित स्वरूपाची आहे. पश्चिम भागात पर्जन्यमान चांगले असूनही फक्त भूस्तर अनुकूल नसल्यामुळे भूजल उपलब्धी कमी आहे. उत्तर पूर्व भागात सर्व परिमाणे भूजल उपलब्धीस अनुकूल असून पर्जन्यमान मात्र खूपच कमी आहे, पर्यायाने याही भागात भूजल उपलब्धी मर्यादित आहे.

सपाट व नदीलगतच्या भागात मातीचा जाड थर, कमी नाले, कमी उतार व जाड विघटीत प्रस्तर यामुळे पुनर्भरण व साठवण क्षमता अधिक असून भूजल उपलब्धी चांगली आहे. त्याच प्रमाणे भूपृष्टीय साठे व कालव्यांच्या लाभक्षेत्रात येणारा भाग असल्यामुळे अतिरिक्त पुनर्भरणांची सोय उपलब्ध झाल्यामुळे भूजलउपलब्धी वाढलेली आहे.पुरंदर, हवेली, शिरूर, मावळ, मुळशी, आंबेगाव, जुन्नर, तालुक्यातील बराच भाग पठारी क्षेत्रात येतो. यातील भूजल उपलब्धता मर्यादित स्वरूपाची आहे.उपखोऱ्यातील पश्चिमेकडील भाग अतिविच्छेदित व डोंगराळ असून (भोर,वेल्हे,मुळशी,मावळ,आंबेगाव इत्यादी तालुक्यातील भाग ) त्यातील अपधाव जास्त असल्यामुळे भूजल उपलब्धी खूपच कमी आहे. उपखोऱ्यात भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा निर्देशित 68 पाणलोट क्षेत्रे आहेत.

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या 1990 च्या भूजल अंदाजानुसार (सिंचित क्षेत्रातील भरीसकट)1409 दलघमी एकूण पुनर्भरण असून जवळजवळ 1 लक्ष सिंचनासाठीच्या विहिरी आहेत. चार लघुपाणलोट क्षेत्रे भी 7 - 4/8, 6/8 भी 12 - 7/8, 8/8 तालुके: जुन्नर, अंबेगाव अतिविकसित (डार्क) व तीन पाणलोट क्षेत्रे भी 30, भी20, भी4 तालुके: श्रीगोंदा, खेड, शिरूर व जुन्नर विकसित (ग्रे) आहेत.

पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमासाठी बरेचसे क्षेत्र उपयुक्त असून भूजल पुनर्भरणात निश्चितपणे वाढ होवून सिंचन क्षेत्र वाढण्यास मदत होईल.

3.4 अवर्षणप्रवण क्षेत्र : या उपखोऱ्याचे क्षेत्र 15 तालुक्यात पसरले आहे त्यापैकी 14 तालुके सुकथनकर समितीच्या अहवालानंतर शासनाने अवर्षणप्रवण घोषित केलेले आहेत. या तालुक्यांचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

पर्जन्यमान-मिमी,क्षेत्रफळ–चौकिमी,लोकसंख्या-हजारात

| अक्र | जिल्हा | तालुका | सरासरी वार्षिक पर्जन्यमान | क्षेत्रफळ | लोकसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| 1 | पुणे | हवेली | 692 | 1337 | 473 |
| 2 | | दौंड | 471 | 1290 | 240 |
| 3 | | इंदापूर | 519 | 893 | 191 |
| 4 | | शिरुर | 499 | 1557 | 24 |

पर्जन्यमान-मिमी, क्षेत्रफळ–चौकिमी, लोकसंख्या-हजारात

| अक्र | जिल्हा | तालुका | सरासरी वार्षिक पर्जन्यमान | क्षेत्रफळ | लोकसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| 5 | | जून्नर | 626 | 416 | 91 |
| 6 | | बारामती | 483 | 110 | 25 |
| 7 | | खेड | 681 | 1400 | 283 |
| 8 | | मावळ | 4240 | 1131 | 242 |
| 9 | | मुळशी | 1576 | 1039 | 123 |
| 10 | | आंबेगाव | 1197 | 1043 | 187 |
| 11 | अहमदनगर | श्रीगोंदा | 527 | 1428 | 22 |
| 12 | | कर्जत | 464 | 633 | 102 |
| 13 | | पारनेर | 526 | 934 | 10 |
| 14 | सोलापूर | करमाळा | 612 | 942 | 115 |

## 4.0 जमिनीचा तपशील

या उपखोऱ्यातील जमिनीचे वर्गीकरण खालील प्रमाणे आहे.

| अक्र | जमीन | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | तांबूस तपकिरी डोंगर उतारावरील जमीन (बेसॉल्ट) | 38 |
| 2 | भरड उथळ जमीन | 12 |
| 3 | मध्यम काळी जमीन | 26 |
| 4 | खोल काळी जमीन | 24 |

## 5.0 जमिनीचा वापर

एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी लागवडीयोग्य क्षेत्र, वनखात्याच्या ताब्यातील क्षेत्र, पडीक क्षेत्र इ. बाबतची माहिती पुढील प्रमाणे आहे.

क्षेत्र - हजार हेक्टर

| अक्र | तपशील | क्षेत्र | भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | भौगोलिक क्षेत्र | 1471 | |
| 2 | वनखात्याच्या ताब्यातील क्षेत्र | 149 | 10.1 |
| 3 | पेरणीसाठी उपलब्ध नसलेले क्षेत्र | | |
| | अ) ओसाड जमीन | 132 | 9 |

क्षेत्र - हजार हेक्टर

| अक्र | तपशील | क्षेत्र | भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी |
|---|---|---|---|
| | आ) बिगर शेती उपयोगाकरिता आणलेली जमीन | 68 | 4.6 |
| 4 | मशागतयोग्य पडिक जमीन | 31 | 2.1 |
| 5 | कायमची कुरणे व चराऊ कुरणे | 63 | 4.3 |
| 6 | किरकोळ झाडे झुडपे यांच्या समुहाखालील क्षेत्र | 2 | 0.1 |
| 7 | चालू पडिक जमीन | 34 | 2.3 |
| 8 | इतर पडिक जमीन | 39 | 2.7 |
| 9 | पेरणीचे निव्वळ क्षेत्र | 953 | 64.8 |
| 10 | लागवडीयोग्य क्षेत्र(4+5+6+7+8+9) | 1122 | 76 |
| 11 | दुसोटा क्षेत्र | 164 | - |
| 12 | पिकाखालील एकूण क्षेत्र(9 +11) | 1117 | - |
| 13 | पीक घनता(12 ÷9 ×100) | 117 | - |

**6.0 लोकसंख्या व पशुधन**

6.1 <u>लोकसंख्या</u> : सन 1991 च्या जनगणनेनूसार या उपखोऱ्यातील एकूण लोकसंख्या 52.63 लक्ष आहे. सन 2030 पर्यंत होणारी लोकसंख्येतील वाढ व लोकसंख्या घनता इत्यादी तपशील खालील प्रमाणे अपेक्षित आहे.

लोकसंख्या-हजार,घनता-प्रतिचौकिमी

| अक्र | लोकसंख्या तपशील | 1991 | 2030 |
|---|---|---|---|
| 1 | नागरी | 2742 | 10687 |
| 2 | ग्रामीण | 2521 | 5042 |
| 3 | एकूण | 5263 | 15729 |
| 4 | लोकसंख्या घनता | 358 | 1069 |
| 5 | ग्रामीण लोकसंख्या घनता | 171 | 342 |

6.2 <u>पशुधन</u> : सन 1992 च्या मोजणीनूसार या उपखोऱ्यात एकूण पशुधन 1923157 आहे. पशूंची वर्गनिहाय संख्या खालील प्रमाणे आहे.

| म्हैस व रेडे | गाय व बैल | एकखूरी व उंट | शेळी व मेंढी | डुकरे | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| 217426 | 794833 | 5016 | 886703 | 19179 | 1923157 |

6.3 <u>इतर तपशील</u> : या उपखोऱ्यात पुणे व पिंपरी-चिंचवड या दोन महानगरपालिका आहेत व 1) घोडेगाव 2) जुन्नर 3) खेड 4) पौड 5) वडगाव 6) वेल्हे 7) दौंड 8) शिरुर (घोडनदी)

9) श्रीगोंदा 10) कर्जत 11) करमाळा 12) इंदापूर 13) बारामती या नगरपालिका आहेत. शेत मजूरांची संख्या 2.6 लक्ष तर इतर मजुरांची संख्या 3.2 लक्ष आहे.

## 7.0 पाणीवापर

7.1 सिंचनासाठी वापर:उपखोऱ्यातील वर्गनिहाय प्रकल्प म्हणजे मोठे, मध्यम, बृहतलघु, लघु, लघु (स्थानिकस्तर), कोल्हापूर पध्दतीचे बंधारे यांची संख्या, पाणीसाठा, पाणीवापर, सिंचनक्षेत्र याचा तसेच पूर्ण झालेले, प्रगतीपथावरील व भविष्यकालीन प्रकल्प याचा तपशील सारणी 17.5 मध्ये दिला आहे. पूर्ण झालेल्या प्रकल्पांची निर्मित सिंचन क्षमता 87636 हेक्टर असून त्यातील प्रस्तावित पाणी वापर 2103 दलघमी आहे. म्हणजे सध्याच तो उपखोऱ्याच्या सरासरी येव्याच्या तुलनेत 27.7 % आहे सिंचनासाठी आणखी 382175 हेक्टर क्षेत्र उपलब्ध होऊ शकते पण त्यासाठी सध्याच्या पाणीवापर पध्दतीप्रमाणे 3128 दलघमी पाणी लागेल.

7.2 सिंचनेतर पाण्याचा वापर : सिंचनेतर उपयोगासाठी या उपखोऱ्यात सध्याची गरज 298 दलघमी आहे. सन 2030 पर्यन्तची ती 844 दलघमी होईल. म्हणजे सरासरी येव्याच्या जवळजवळ 12 % होईल. या गरजांचा तपशील खालील प्रमाणे असेल.

पाण्याची गरज - दलघमी

| अक्र | तपशील | पाण्याची गरज | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1991 | | | | 2030 |
| | | नागरी | ग्रामीण | पशुधन | एकूण | |
| 1 | घरगुती वापरासाठी | 137 | 51 | 33 | 221 | 690 |
| 2 | उद्योगासाठी | | | | 77 | 154 |
| | | एकूण : | | | 298 | 844 |

7.2 जलसंपत्तीचा ताळेबंद : भूपृष्ठावरील व भूपृष्ठाखालील उपलब्ध जलसंपत्ती, घरगुती वापरासाठी उद्योगासाठी व सिंचनासाठी पाणीवापर याचा होणारा पुनरुद्भव याचा ताळेबंद सारणी 17.6 मध्ये दिला आहे.

7.3 लाभक्षेत्र विकास : सद्यस्थिती खालील प्रमाणे आहे.

क्षेत्र -हजार हेक्टर

| भूविकास (शेतचाऱ्या इ.)कामे | | | भूविकास (सपाटीकरण इ) कामे | | | प्रकल्पाच्या लाभक्षेत्रा व्यतिरिक्त अन्य क्षेत्रात |
|---|---|---|---|---|---|---|
| लाक्षेविप्रा कडील प्रकल्प | लाक्षेविप्रा बाहेरील प्रकल्प | एकूण | लाक्षेविप्रा कडील प्रकल्प | लाक्षेविप्रा बाहेरील प्रकल्प | एकूण | झालेले जमीन सपाटीकरणाचे (भाग - 2) क्षेत्र |
| 123.71 | 0.80 | 124.50 | 30.19 | 0.67 | 30.86 | 15.20 |

7.4 सिंचनाचा संक्षिप्त इतिहास : या उपखोऱ्यात 1970 पूर्वी बांधलेली 1) खडकवासला 2) मुळशी 3) पानशेत 4) पवना ही धरणे आहेत. यापैकी मुळशीधरण हे जलविद्युत निर्मितीसाठी बांधले आहे. तर खडकवासला, पानशेत ही पूरक धरणे आहेत. पानशेत हे साठवण धरण

असून यातील 50 टक्के पाणीसाठयाची पुणे शहराच्या पाणीपुरवठयासाठी तरतूद करण्यात आली आहे. या उपखोऱ्यात मुख्यत्वे शेजपाळी पध्दतीने सिंचन होते. खडकवासला धरणाला शंभर वर्षाहून अधिक इतिहास आहे. वाढत्या सामाजिक ,आर्थिक गरजाप्रमाणे मुळचे खोरे विकासाच्या विविध टप्प्यातून गेलेले आहे. याच खोऱ्यात धरणावरील स्वयंचलित दरवाजाचा प्रथम यशस्वी वापर भारतरत्न विश्वेश्वरय्यांनी केला होता.

## 8.0 पीकरचना

उपखोऱ्यातील पेरणीखालचे क्षेत्र 9.53 लक्ष हेक्टर आहे. या उपखोऱ्यातील बहुतांश क्षेत्र रब्बी क्षेत्र आहे. उपखोऱ्यातील जमीन व हवामानास अनुकूल 1) बाजरी 2) रब्बी ज्वारी 3) कांदा 4) भाजीपाला 5) द्राक्षे 6) डाळींब 7) पेरू 8) लिंबू 9) अंजिर 10) चिकू 11) चिंच 12) सिताफळ ही पिके आहेत. पिकांची दरहेक्टरी सरासरी उत्पादकता पुढीलप्रमाणे आहे.

उत्पादकता - क्विं/हे

| प्रमुख पिके | उत्पादकता |
|---|---|
| रब्बी ज्वारी | 4.75 |
| बाजरी | 6.72 |
| ऊस | 906 |

हंगामनिहाय पिकांची टक्केवारी

| अक्र | पीक | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | खरीप | 35 |
| 2 | रब्बी | 60 |
| 3 | बारमाही | 5 |

## 9.0 उद्योगधंदे

उपखोऱ्यात 7 साखर कारखाने आहेत. पुणे, पिंपरी-चिंचवड, हडपसर या परिसरांतील सघन औद्योगिक विकास व भोवतीची सघन लोकसंख्या व त्यांच्या पाण्याच्या गरजा आणि तदनुषंगिक प्रदूषण प्रतिबंधक उपाययोजना ही या उपखोऱ्यांतील पाणी नियोजनाची महत्वाची गरज रहाणार आहे.

## 10.0 जलविद्युत निर्मिती

या उपखोऱ्यात आतापर्यन्त पानशेत, वरसगाव, पवना व टाटाचे तीन (मुळशी, वळवण, खोपोली) असे एकूण सहा जलविद्युत प्रकल्प पूर्ण झाले असून त्यांची निर्मिती क्षमता 318 मेवॅ इतकी आहे.

उजनी (पी.एस.एस.) (12), डिंभे (5), माणिकडोह (6) अशा एकूण 23 मेवॅ क्षमतेच्या जलविद्युत प्रकल्पांची बांधकामे चालू आहे.

प्रस्तावित जलविद्यूत प्रकल्प व त्यांची क्षमता पुढील प्रमाणे आहेत.

क्षमता - मेवॅ

| अक्र | प्रकल्पाचे नाव | क्षमता |
|---|---|---|
| 1 | चासकमान | 3.0 |
| 2 | भीमा | 2.0 |
| 3 | टेमघर | 4.0 |
| 4 | डिंभे डावा कालवा | 5.0 |
| 5 | थुगाव | 1.5 |
| 6 | उजनी डावा कालवा | 4.0 |
| | एकूण | 19.5 |

अशा प्रकारे प्रस्तावित प्रकल्प पुर्ण झाल्यावर उपखोऱ्यातील एकूण उर्जा निर्मिती क्षमता 360.50 मेवॅ होईल. यापैकी 292 मेवॅ जलविद्युत क्षमता या उपखोऱ्यातील पाणी पश्चिमेकडे वळवून त्यावर आधारीत कोंकण खोऱ्यामधे आहे

## 11.0 दळणवळणाची साधने

या उपखोऱ्यात पुणे येथे (लोहगावजवळ) विमानतळ तसेच मालाच्या आंतरराष्ट्रीय वहातूकीची व्यवस्था आहे. मुंबई सोलापूर दुहेरी ब्रॉडगेज व दौंड मनमाड हा एकेरी ब्रॉडगेज रेल्वेमार्ग या उपखोऱ्यात आहे. या उपखोऱ्यातून मुंबई-बंगलोर राष्ट्रीय महामार्ग क्र.4 पुणे-हैद्राबाद राष्ट्रीय मार्ग क्र 9 व पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्ग क्र 50 जातात. पुणे-नगर राज्य मार्ग क्र 27 हा या उपखोऱ्यातून जातो.

## 12.0 भावी नियोजनाची दिशा

12.1 <u>पाण्याची उपलब्धता व वापर :</u> ऊर्ध्व भीमा (उजनीपर्यन्त) या उपखोऱ्यात पाण्याची वार्षिक सरासरी उपलब्धी 7594 दलघमी आहे.कृष्णा लवादाच्या निर्णयानुसार 31 मे 2000 पर्यन्त भीमा (मुख्य) नदीवर कमाल वापर 1 जून 1995 पासून पुढे 2690 दलघमी (95 अघफू) एवढा मर्यादीत आहे. तथापि भीमा (मुख्य) नदीचे जलक्षेत्राचा काही भाग उर्वरीत भीमा उपखोरे क्र 18 मध्ये पण येतो. दोघांच्या एकत्रित क्षेत्राला मिळून ही मर्यादा आहे. या व्यतिरिक्त टाटा जलविद्युत प्रकल्पांतून 1.6.74 पासून पुढे कोणत्याही सलग 5 वर्षात पाणीवापर 6000 दलघमी (212 अघफू) एवढा मर्यादित असावा. एका वर्षात तो सरासरी 1201 दलघमी (42.4 अघफू) येतो. तथापि तो कोणत्याही वर्षात 1543 दलघमी (54.5 अघफू) पेक्षा अधिक होता कामा नये.

ऊर्ध्व भीमा (उजनी पर्यन्त) या उपखोऱ्यातून अन्य उपखोऱ्यांत आंतरखोरे स्थलांतराने पुढील योजनांद्वारे पाणी वळविले आहे.

पाणी - दलघमी

| अक्र | योजनेचे नाव | स्थलांतरित पाणी | संबंधीत उपखोरे |
|---|---|---|---|
| 1) | पुरंदर उपसा सिंचन योजना | 103 | उर्वरीत भीमा |
| 2) | जनाई शिरसाई उपसा सिंचन योजना | 105 | उर्वरीत भीमा |
| 3) | सणसर जोड कालवा | 110 | उर्वरीत भीमा |
| 4) | कर्जत शाखा कालवा (कुकडी) ते चौंडी को.प.बंधारा | 29 | सीना-बोरी- बेनेतुरा |
| 5) | कर्जत शाखा कालवा (कुकडी) ते मांगी तलाव | 28 | सीना-बोरी- बेनेतुरा |
| 6) | कुकडी - सीना - मेहकरी जोड कालवा | 34 | सीना-बोरी- बेनेतुरा |
| 7) | टाटा जलविद्युत प्रकल्प (लोणावळा, शिरवटा,वळवण, आंधा) | 521 | उत्तर कोकण |
| 8) | टाटा जलविद्युत प्रकल्प (मुळशी) | 680 | मध्य कोकण |
| | एकूण | 1610 | |

उपरिनिर्दीष्ट आंतरखोरे स्थलांतरामुळे या उपखोऱ्यातील अंतर्गत पाणीवापराची उपलब्धी 1610 दलघमीने कमी झाली आहे. या उपखोऱ्याच्या व अधःस्त्रोत भागातील उर्वरीत भीमा या उपखोऱ्यांच्या सीमेवरच भीमा प्रकल्पांतर्गत उजनी जलाशय बांधलेला असल्यामुळे त्यांचे पूर्ण लाभक्षेत्र उर्वरीत भीमा या उपखोऱ्यात विस्तारलेले आहे. सबब उजनीतील पाणी वापराएवढी (जलाशयावरील उपशासाठी अनुज्ञेय आरक्षण वगळून) 1760 दलघमी उपलब्धी ऊर्ध्व भीमा (उजनी पर्यन्त) या उपखोऱ्यातून उर्वरीत भीमा या उपखोऱ्यात वर्ग करणे युक्त ठरेल. उपरोक्त दोन्ही परिणामामुळे या खोऱ्याची पाणीवापराची निव्वळ उपलब्धी 4224 दलघमी एवढी सीमित झालेली आहे.

12.2 पाणी वापराची सद्यःस्थिती:

सन 1996 पावेतो या उपखोऱ्यात निर्माण झालेला पाणीसाठा (उजनी जलाशय वगळता) 1827 दलघमी आहे. त्यासाठी या उपखोऱ्यात 3 मोठे, 1 मध्यम, व 120 लघु प्रकल्प बांधावे लागलेले आहेत. उजनी (भीमा) प्रकल्पांतर्गत असलेले उजनी धरण हे राष्ट्रीय दृष्टया महत्वाच्या धरणांपैकी असलेले धरण (जलधारक क्षमता 3.042 अघमी) या उपखोऱ्यातच येते.

घोडकुकडी खोऱ्यामधील अवर्षणाचा विस्तृत प्रदेश पहाता, तेथे पावसाच्या उपलब्धतेच्या चांगल्या वर्षातील अधिक पाणी वापरून विस्तृत प्रदेशावर पाणी पोचवणे शक्य आहे. सध्याच्या साठवणीचे नियोजन मर्यादित उद्दिष्टांसाठी झाले आहे. त्याचा फेरविचार होऊन पाण्याच्या सरासरी उपलब्धतेच्या संदर्भात पाणीवापराची व्यवस्था बसवणे इष्ट राहील. लाभक्षेत्रांच्या विस्तारांसाठी अनुकूल असणारा प्रदेश या उपखोऱ्यात आहे.

12.3 या उपखोऱ्यात पाटबंधारे प्रकल्पांच्या लाभक्षेत्राच्या बाहेर बरेचसे भूजल केवळ हंगामी आहे. भूजलाच्या वापराचे व्यवस्थापन नीट बसविण्यासाठी हंगामी भूजलाचे क्षेत्र (4 माही किंवा 8 माही) व बारमाही भूजल उपलब्धतेच्या क्षेत्रांचे निर्धारण होऊन त्या दृष्टीने पीकरचनांचा फेरविचार व्हायला हवा आहे. सर्व भूजलाचा पूरेपूर वापर सर्व वर्षामधे करण्याच्या दृष्टीने उपखोऱ्याचे नियोजन व्हायला हवे आहे. भूजलाच्या वापरावर लवादाच्या कांहीहि मर्यादा नाहीत. त्यामूळे निसर्गाची क्षमता पुरेपूर वापरण्याच्या दृष्टीने नियोजन करावे लागेल. या

उपखोऱ्यामध्ये भूजलाचा वापर पूरेपूर वाढविणे व त्यासाठी सघन पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे.

12.4 एखाद्याच शहराभोवतीचे केंद्रीभूत औद्योगिकरण थांबवून औद्योगिकरणास पर्यायी दिशा देण्याच्या दृष्टीने या उपखोऱ्यामध्ये रांजणगाव, चाकण, भिगवण, इत्यादी ठिकाणी औद्योगिक वसाहती नापिक व पडीक जमिनीवर शहरापासून दूर विकसित होत आहेत. ही इष्ट दिशा आहे. ग्रामीण भागात रोजगार पसरण्यासाठी अशा औद्योगिकरणामुळे फार मोठी मदत होणार आहे. या खोऱ्यातील पाण्याची दोलायमानता लक्षात घेता या खोऱ्याच्या आर्थिक समृध्दीचा आधार कृषी उत्पादनाकडून लाभक्षेत्राजवळील औद्योगिक उत्पादनाकडे वळणे इष्ट राहणार आहे.

12.5 या उपखोऱ्यात पुणे येथे पुणे विद्यापीठ, भारती विद्यापीठ, गोखले इन्स्टीटयुट इत्यादीसारख्या महत्वाच्या शैक्षणिक उच्च संस्था कार्यरत आहेत. अनेक अभियांत्रिकी महाविद्यालये कार्यरत आहेत. पाटबंधारे विभागाची पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, केंद्र शासनाची केंद्रीय जल व उर्जा संशोधन संस्था (CWPRS) आहे. सामाजिक, आर्थिक व पर्यावरणीय दृष्टीकोनातून या संस्थांच्या माध्यमातून उपखोऱ्याचा सर्वांगिण अभ्यास करून घेणे व पुढील 30 वर्षाचा तपशीलवार पाण्याच्या संबंधातील विकास कार्यक्रम तयार करणे अवघड नाही. बदलत्या स्थितीचा वेळोवेळी वेध घेवून नवी कारवाई करण्याच्या सूचना सुध्दा या संस्थांच्या सामुहिक विचार विनिमयातून देता येतील. त्यासाठी सध्या काही औपचारिक मंच या उपखोऱ्यात उपलब्ध नाही. त्याची तातडीने निर्मिती होणे इष्ट राहील.

12.6 या उपखोऱ्यात पिंपरी-चिंचवड व पुणे ही दोन मोठी बाजारपेठेची शहरे असून येथे केंद्र शासनाचा दारुगोळा बनविण्याचा कारखाना, पेनिसीलीनचा कारखाना व अनेक मोठाले औद्योगिक परिसर आहेत. या सर्वांचा परिणाम उजनी जलाशयाच्या पाण्याच्या गुणवत्तेवर व्हावयाचा आहे. म्हणून या उपखोऱ्यामध्ये रासायनिक उद्योगावर बंदी घालणे इष्ट राहील. पुणे परिसर नागरी पाण्याच्या उपयोगाने व रासायनिक उद्योगामुळे प्रदूषित होत असून पुणे शहरापासून खाली 10–12 किमी पर्यंत मुळा–मूठा नदीच्या पात्रात त्याचा संसर्ग वाढत आहे. त्या बाबत वेळीच प्रतिबंधात्मक उपाय योजले जाणे आवश्यक आहे.

12.7 घरगूती वापरासाठी व औद्योगिकरणांसाठी पाणीवापर अनूक्रमे केवळ 20 टक्के व 2.5 टक्के हिशोबांत धरण्याची तरतूद लवादाच्या निर्णयात आहे. यातून घरगूती वापरातील 80 टक्के पाणी आणि औद्योगिक वापरातील 97.5 टक्के पाणी सिंचनास वा इतर उपयोगासाठी पुन्हा उपलब्ध होते असे अभिप्रेत आहे. या सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्या पाण्याचा पूनर्वापर चक्रिय पध्दतीने करणे हे राज्याच्या दृष्टीने हिताचे आहे. असा पूनर्वापर वाढवून या परत मिळणाऱ्या पाण्याची व्यवस्था बसविण्याची गरज आहे.

पुणे शहराच्या सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्या पाण्याचा पुनर्वापर सिंचनासाठी करण्याची व्यवस्था 1916 साली (सी.सी.इंग्लीस यांनी) हडपसर या भागात बसविलेली आहे. आजसुध्दा ती व्यवस्था कार्यान्वित (जरी मोडकळीस आली असली तरी) आहे. पुणे शहराच्या वाढीबरोबर या व्यवस्थेची वाढ करून त्याचा विस्तार करण्यात आला नाही म्हणून या शहराचे व आजूबाजूच्या औद्योगीकरणाचे सांडपाणी नदीमध्ये सोडून दिल्यामुळे नद्या व आजूबाजूचे भूजल प्रदूषित झाल्याचे दिसते.

अलिकडेच पिंपरीचिंचवड या महानगरपालिकेसाठी सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याची व्यवस्था बसविण्यात आली आहे. त्या पाण्याचाही पुनर्वापर त्याच भागात सिंचनासाठी करण्यात येत आहे. या व्यवस्थेस आयोगाने मे 1998 मध्ये भेट दिली आहे.

या दोन्ही व्यवस्थांचा पाण्याचा वापर वाढविण्याच्या दृष्टीने आणि प्रदूषण कमी करण्याच्या दृष्टीने विस्तार करणे आवश्यक आहे.

भीमा उपखोऱ्यात पुणे व पिंपरी-चिंचवड या दोन महानगरपालिका, 8 नगरपालिका, 85 औद्योगिक विकास केंद्रे आणि 7 साखर कारखाने व अनेक लघु रासायनिक उद्योगधंदे आहेत यातून होणाऱ्या प्रक्रिया न केलेल्या सांडपाण्यामुळे उजनी तलावाचे रुपांतर एका दूषित साठवणीमध्ये होण्याचा फार मोठा धोका निर्माण झाला आहे. या धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील नदी-नाल्याच्या पाण्याच्या गुणवत्तेच्या प्राथमिक अभ्यासावरून हे पाणी पिण्यासाठीच नाही तर सिंचनासाठी सुध्दा उपयोगाचे रहाणार नाही असा निष्कर्ष आयोग पुरस्कृत 'जलाशयाच्या गुणवत्तेचे व्यवस्थापन' या विषयावरील दिनांक 3 ऑक्टोबर 98 रोजी वाल्मी औरंगाबाद येथे संपन्न झालेल्या कार्यशाळेत निघाला. नदीतून, नाल्यातून वाहणाऱ्या पाण्यात पिकावर विपरीत परिणाम करणारे घटक आहेत असे दिसून येते. सांडपाण्याव्दारे साबणातील सोडीयम कार्बोनेट हा अपायकारक घटक नदीच्या पाण्यामध्ये मोठया प्रमाणामध्ये आढळून येतो व याची पर्यायाने उजनी धरणाच्या जलाशयामध्ये साठवणूक होत आहे जलाशयाची गुणवत्ता टिकवण्यासाठी वेळीच योग्य ते प्रतिबंधक उपाय योजणे आवश्यक आहे या उपखोऱ्यात भाजीपाला व फुलांच्या वाढीस अनुकूल वातावरण आहे. देशांतर्गत व देशाच्या बाहेर फुलांच्या मागणीची गरज पाहता व पुणे, येथून विमान सेवेव्दारे भाजीपाला, फुले, फळे यांची निर्यातीची सोय पाहता या भागात फुलांच्या वाढीस प्रोत्साहन देणारे विशेष प्रकल्प हाती घेणे शक्य आहे.

12.8 या उपखोऱ्यामध्ये कुकडी नदीवरील 5 मोठी धरणे, घोड धरण, भीमा नदीवरील चासकमान, ऊजनी, मुळा-मूठा नदीवरील पवना, पानशेत, वरसगाव, खडकवासला इत्यादी व या पुढे होणाऱ्या लहान मोठया धरणांच्या पूराचा प्रश्न गांभीर्याने हाताळण्यासाठी आधुनिक इलेक्ट्रॉनिक उपकरणाची व्यवस्था बसविण्याची गरज आहे. भीमा नदी व हिच्या उपनद्या जास्त पावसाच्या प्रदेशातून उगम पावतात व कमी पावसाच्या प्रदेशातून वाटचाल करतात. पावसाळयाच्या शेवटी (सप्टेंबर) जलाशय भरल्यानंतर आलेला पूर उजनी धरणात सामावून घेणे व उजनी धरणाच्या खालील शहराला, प्रामुख्याने पंढरपूर, धोका निर्माण न होईल अशा पध्दतीने जलाशयात येणारा पुराचा लोंढा व्यवस्थित हाताळणे हे एक भविष्यामध्ये फार मोठे जोखमीचे काम राहणार आहे. असाच धोका पानशेत, वरसगाव, खडकवासला या मूठा नदीवरील जलाशयांमुळे पुणे शहराला आहे. या दृष्टीने उपखोऱ्यातील पूर हाताळण्यास अतिशय सतर्क व आधुनिक दूरसंदेशाचा वापर करणारी यंत्रणा असण्याची गरज आहे. या दृष्टीने पाणलोट क्षेत्रामध्ये पर्जन्यमान मोजण्याची आधुनिक उपकरणे, दूरसंदेश यंत्रणेव्दारे पाऊस व पुराची माहिती मिळविण्याची व्यवस्था ज्याव्दारे पुढचा धोका टाळण्यासाठी उजनी या जलाशयाच्या पाणी पातळीमध्ये करावयाच्या बदलाचा अभ्यास याचे व्यवस्थितपणे शास्त्रीय अभ्यासावर आधारीत असे ठोकताळे तयार करणे गरजेचे आहे. यासाठी प्रशिक्षित असा अधिकारी व कर्मचारी वर्ग कायम या ठिकाणी निर्माण करणे गरजेचे आहे.

12.9 या उपखोऱ्यामध्ये सुपीक व सिंचनाच्या सोयी उपलब्ध असलेल्या क्षेत्रावर नागरीकरण व औद्योगिकरण होत आहे. यावर मर्यादा घालण्याची तातडीची गरज आहे. सिंचनाच्या सोयी उपलब्ध असलेल्या सुपीक क्षेत्रावर होणारे अतिक्रमण थांबून नापीक व डोंगराळ भागाकडे ते स्थलांतरीत होणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने भविष्यातील जमिनीच्या वापराच्या नियोजनाला दिशा देणे आवश्यक वाटते. उजनी जलाशयावरुन बाष्पीभवनाने होणारा ऱ्हास थांबविण्यामध्ये अधिक संशोधनाची व अभ्यासाची गरज आहे. उजनी सारख्या मोठया जलाशयातील प्रचंड बाष्पीभवनामुळे होणाऱ्या ऱ्हासावर अंशतः जरी नियंत्रण मिळविता आले तरी त्या उपखोऱ्यातील पाण्याची उपलब्धता वाढविण्यासारखेच आहे. म्हणून या दृष्टीने या

उपखोऱ्यातील विज्ञान संस्थांनी या प्रकारच्या संशोधनाचे काम हाती घेवून त्यात यशस्वी होणे ही काळाची गरज आहे.

12.10 उजनी धरणामुळे विस्थापित झालेल्या लोकांसाठी मोठया प्रमाणात जलाशयातून उपसा सिंचन योजनांव्दारे सिंचनास पाणी उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. त्यामुळे पुनर्वसित गावांना समृध्दीचा मोठाच आधार लाभला आहे असे जुलै 1998 रोजी आयोगाने दिलेल्या भेटीतून दिसून आले.उजनी जलाशयावरील सहकारी उपसा सिंचन संस्थांमध्ये प्रकल्पग्रस्त मोठया संख्येत आहेत. प्रकल्पग्रस्तांना पाण्याचा वापर करायला मिळाल्यामुळे त्यांच्या आर्थिक स्थितीत प्रकल्पपूर्व स्थिती पेक्षा चांगला सुस्थीरपणा आलेला आहे. जलाशयाकाठी होणाऱ्या या विस्तृत पाणी वापराचे अधिक जागरुक नियोजन यापुढे आवश्यक राहील असे दिसते.

12.11 या उपखोऱ्यात सहयाद्रीच्या पट्टीत अनेक जलाशय आहेत. त्यांच्या स्रवणक्षेत्रांचा विकास व तदनुषंगिक पर्यटनाचा विकास हाती घ्यायला खूप वाव आहे.

000

## सारणी : 17.1

## पर्जन्यमानाचा माहवार तपशील

पर्जन्य - मिमी

| अक्र | महिना | पर्जन्य |
|---|---|---|
| 1 | जानेवारी | 1 |
| 2 | फेब्रुवारी | 1 |
| 3 | मार्च | 2 |
| 4 | एप्रिल | 9 |
| 5 | मे | 26 |
| 6 | जून | 172 |
| 7 | जुलै | 342 |
| 8 | ऑगस्ट | 250 |
| 9 | सप्टेंबर | 189 |
| 10 | ऑक्टोबर | 69 |
| 11 | नोव्हेंबर | 30 |
| 12 | डिसेंबर | 5 |
| | एकूण | 1086 |

सारणी : 17.1 चालू
पर्जन्यमानाचा तपशील

केंद्र : पुणे

पर्जन्यमान-मिमी

| अक्र | वर्ष | वार्षिक सरासरी पर्जन्यमान | उतरत्या क्रमाने पर्जन्यमान | संगत वर्ष | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1901 | 720 | 1184 | 1956 | |
| 2 | 1902 | 604 | 1070 | 1907 | |
| 3 | 1903 | 533 | 1004 | 1933 | |
| 4 | 1904 | 336 | 992 | 1976 | |
| 5 | 1905 | 638 | 965 | 1915 | |
| 6 | 1906 | 564 | 946 | 1988 | |
| 7 | 1907 | 1070 | 945 | 1979 | |
| 8 | 1908 | 533 | 928 | 1938 | |
| 9 | 1909 | 634 | 908 | 1959 | 10 |
| 10 | 1910 | 867 | 898 | 1943 | |
| 11 | 1911 | 402 | 871 | 1984 | |
| 12 | 1912 | 612 | 867 | 1910 | |
| 13 | 1913 | 706 | 860 | 1916 | |
| 14 | 1914 | 783 | 851 | 1932 | |
| 15 | 1915 | 965 | 842 | 1958 | |
| 16 | 1916 | 860 | 811 | 1967 | |
| 17 | 1917 | 730 | 809 | 1961 | |
| 18 | 1918 | 262 | 805 | 1955 | 20 |
| 19 | 1919 | 774 | 803 | 1975 | |
| 20 | 1920 | 633 | 794 | 1948 | |
| 21 | 1921 | 524 | 787 | 1981 | |
| 22 | 1922 | 696 | 784 | 1980 | |
| 23 | 1923 | 464 | 783 | 1974 | |
| 24 | 1924 | 629 | 783 | 1914 | |
| 25 | 1925 | 494 | 776 | 1973 | |
| 26 | 1926 | 620 | 774 | 1919 | |
| 27 | 1927 | 656 | 771 | 1969 | 30 |
| 28 | 1928 | 488 | 768 | 1946 | |

पर्जन्यमान-मिमी

| अक्र | वर्ष | वार्षिक सरासरी पर्जन्यमान | उतरत्या क्रमाने पर्जन्यमान | संगत वर्ष | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 29 | 1929 | 549 | 762 | 1937 | |
| 30 | 1930 | 719 | 760 | 1983 | |
| 31 | 1931 | 681 | 745 | 1942 | |
| 32 | 1932 | 851 | 744 | 1977 | |
| 7 | 1982 83 | 1685 | 3461 | 1990 91 | 40 |
| 8 | 1983 84 | 3430 | 3430 | 1983 84 | |
| 9 | 1984 85 | 2966 | 3017 | 1989 90 | 50 |
| 10 | 1985 86 | 2402 | 2967 | 1977 78 | |
| 11 | 1986 87 | 2192 | 2966 | 1984 85 | |
| 12 | 1987 88 | 1724 | 2857 | 1993 94 | |
| 13 | 1988 89 | 4728 | 2402 | 1985 86 | 75 |
| 14 | 1989 90 | 3017 | 2192 | 1986 87 | |
| 15 | 1990 91 | 3461 | 2098 | 1992 93 | |
| 16 | 1991 92 | 3556 | 1724 | 1987 88 | |
| 17 | 1992 93 | 2098 | 1685 | 1982 83 | |
| 18 | 1993 94 | 2857 | 1390 | 1980 81 | |

सारणीः 18.3

**अवर्षण प्रवण तालुक्यांचा तपशील**

पर्जन्यमान - मिमी

क्षेत्रफळ - चौकिमी, लोकसंख्या - हजारात

| अक्र | जिल्हा | तालुका | सरासरी वार्षिक पर्जन्यमान | क्षेत्रफळ | लोकसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| | **अ) नीरा घटक -** | | | | |
| 1 | सातारा | खंडाळा | 576 | 526 | 101 |
| | | फलटण | 478 | 1180 | 273 |
| 2 | पुणे | इंदापूर | 518 | 605 | 121 |
| | | बारामती | 483 | 1271 | 285 |
| | | पुरंदर | 478 | 1104 | 193 |
| | | भोर | 984 | 892 | 155 |
| 3 | सोलापूर | माळशिरस | 572 | 1065 | 245 |
| | **आ) उजनी खालील माण घटक** | | | | |
| | सातारा | माण | 519 | 1440 | 184 |
| | सांगली | आटपाडी | 551 | 872 | 112 |
| | | जत | 552 | 1798 | 193 |
| | सोलापूर | सांगोला | 591 | 1550 | 230 |
| | | पंढरपूर | 638 | 1303 | 317 |
| | | माढा | 535 | 803 | 130 |
| | | मोहोळ | 586 | 535 | 77 |
| | | माळशिरस | 512 | 457 | 105 |
| | | द.सोलापूर | 609 | 129 | 49 |

सारणी : 18.4

**प्रकल्पांची सद्य:स्थिती**

चलपाणीसाठा - दलघमी
पाणीवापर - दलघमी
सिंचनक्षेत्र - हेक्टर

| अक्र | प्रकल्पाचा संवर्ग | पुर्ण झालेले प्रकल्प | | | | प्रगतीपथावरील प्रकल्प | | | | भविष्यकालीन प्रकल्प | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नाव संख्या | चलपाणी साठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चलपाणी साठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चलपाणी साठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चलपाणी साठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 1 | मोठे | | | | | भीमा | 1517.2 | 2353.1 | 202709 | | | | | | 1517.2 | 2353.1 | 202709 |
| | | | | | | 6 | | 551 | 76963 | | | | | | 0 | 551 | 76963 |
| | एकूण मोठे : | | | | | 1 | 1517.2 | 2904.1 | 279672 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1517.2 | 2904.1 | 279672 |
| 2 | मध्यम | म्हसवड | 46.16 | 46.16 | 4980 | आंधळी | 6.23 | 7.93 | 1500 | | | | | | 52.39 | 54.09 | 6480 |
| | | रानंद | 6.51 | 6.23 | 1090 | भिवर्गी | 9.91 | 10.47 | 1695 | | | | | | 16.42 | 16.7 | 2785 |
| | | बुधीयाळा | 11.89 | 11.89 | 4250 | संख | 15 | 22.37 | 3100 | | | | | | 26.89 | 34.26 | 7350 |
| | | दोड्डानाला | 4.81 | 4.81 | 1110 | | | | | | | | | | 4.81 | 4.81 | 1110 |
| | | पडवळकरवाडी | 2.83 | 2.83 | 1080 | | | | | | | | | | 2.83 | 2.83 | 1080 |
| | | 5 | 72.2 | 71.92 | 12510 | 3 | 31.14 | 40.77 | 6295 | | 0 | 0 | 0 | 8 | 103.34 | 112.69 | 18805 |
| 3 | बृहत लघु | 6 | 34.4 | 8.58 | 6569 | | | | | | | | | 6 | 34.4 | 8.58 | 6569 |
| 4 | लघु प्रकल्प | 38 | 97.94 | 23.3 | 21900 | 8 | 7.86 | 26.1 | 2394 | 2 | 4.41 | 2.38 | 840 | 48 | 110.21 | 51.78 | 25134 |
| 5 | को.प.बंधारे | 18 | 45.56 | 10.18 | 9908 | 21 | 20.58 | 68.4 | 6283 | 32 | 27.93 | 95.99 | 8192 | 71 | 94.07 | 174.57 | 24383 |
| | | 62 | 177.9 | 42.06 | 38377 | 29 | 28.44 | 94.5 | 8677 | 34 | 32.34 | 98.37 | 9032 | 125 | 238.68 | 234.93 | 56086 |
| | | 67 | 250.1 | 113.98 | 50887 | 33 | 1576.78 | 3039.37 | 294644 | 34 | 32.34 | 98.37 | 9032 | 134 | 1859.22 | 3251.72 | 354563 |

## सारणी : 18.4 (चालू)

## प्रकल्पांची सद्य:स्थिती

चलपाणीसाठा - दलघमी

पाणीवापर - दलघमी

सिंचनक्षेत्र - हेक्टर

| अक्र | प्रकल्पाचा संवर्ग | पूर्ण झालेले प्रकल्प | | | | प्रगतीपथावरील प्रकल्प | | | | भविष्यकालीन प्रकल्प | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नाव संख्या | चलपाणी साठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चलपाणी साठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चलपाणी साठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चलपाणी साठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 1 | मोठे | भाटघर | 685.06 | | | नीरा देवघर | 261.11 | 367.51 | 41400 | | | | | | 946.17 | 367.51 | 41400 |
| | | नीरा | 257.42 | 1319 | 107305 | गुंजवणी (वेल्हे) | 104.5 | 118.94 | 15000 | | | | | | 361.92 | 1437.9 | 122305 |
| | | | | | | | | | | | | | | | 0 | 0 | 0 |
| | | 2 | 942.48 | 1319 | 107305 | 2 | 365.61 | 486.45 | 56400 | 0 | 0 | 0 | 0 | 4 | 1308.09 | 1805.5 | 163705 |
| 2 | मध्यम | नाझरे | 16.7 | 16 | 2700 | धोम बलकवडी | | 77 | 18100 | गुंजवणी | 71.65 | 62.3 | 6860 | | 88.35 | 155.3 | 27660 |
| | | | | | | इतर खोऱ्यातून | | | | रांझे | 13.02 | 20.67 | 1900 | | 13.02 | 20.67 | 1900 |
| | | | | | | | | | | | | | | | 0 | 0 | 0 |
| | एकूण मध्यम | 1 | 16.7 | 16 | 2700 | 1 | 0 | 77 | 18100 | 3 | 84.67 | 82.97 | 8760 | 5 | 101.37 | 175.97 | 29560 |
| 3 | बृहत लघु | 6 | 30.01 | 7 | 4077 | | | | | | | | | 6 | 30.01 | 7 | 4077 |
| 4 | लघु प्रकल्प | 32 | 76.05 | 18.3 | 15885 | 5 | 4.89 | 16.29 | 1496 | 2 | 2.33 | 1.34 | 754 | 39 | 83.27 | 35.93 | 18135 |
| 5 | को.प.बंधारे | 31 | 66.55 | 14.97 | 13518 | 24 | 23.52 | 78.21 | 7181 | 30 | 30.00 | 97.03 | 8278 | 85 | 120.07 | 190.21 | 28977 |
| | सर्व एकूण | 72 | 1131.79 | 1375 | 143485 | 31 | 394.02 | 657.95 | 83177 | 34 | 117 | 181.34 | 17792 | 137 | 1642.81 | 2214.6 | 244454 |

सारणी :18.5

**जलसंपत्तीचा ताळेबंद**

**नीरा घटक क्षेत्र**

जलसंपत्ती - दलघमी

| अक्र | उपलब्धता | | अक्र | वापर (सन2030) | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **भूपृष्ठावरील** | | 4 | **भूपृष्ठावरील** | |
| | अ) नैसर्गिक | | | अ) घरगूती वापरासाठी | |
| | 1) 75 टक्के विश्वासार्हतेने | 2241 | | 1) नागरी | 14 |
| | 2) 50 टक्के विश्वासार्हतेने | 2640 | | 2) ग्रामीण | 50 |
| | 3) सरासरी विश्वासार्हतेने | 2812 | | 3) पशूधन | 22 |
| | 4) वापर मर्यादा सरासरीने | 1774 | | एकूण -- (4 अ) | 86 |
| | ब) मानवप्रबंधित | | | ब) उद्योगधंदयासाठी | 48 |
| | 1) नागरी वापरातून पुनरुद्भव (80 %) | 11 | | एकूण सिंचनेतर वापर - (4अ + 4 ब) | **134** |
| | 2) उद्योग धंदयातील पुनरुद्भव (97.5%) | 47 | 5 | इतर उपखाऱ्यात स्थलांतरीत पाणी | |
| | 3) इतर खोऱ्यातून संक्रमित झालेले पाणी | 197 | 6 | सिंचनासाठी उपलब्ध भूपृष्ठावरील पाणी (3- | 2079 |
| | **एकूण (1 ब)** | **255** | | | |
| 2 | मानवनिर्मित<br>लाभक्षेत्रातील पुनर्भरण (1अ 4 +1ब 3-4-5) च्या10 % | 184 | | | |
| 3 | **एकूण उपलब्धता [1अ (4)+ 1ब + 2]** | **2213** | 7 | एकूण वापर (4 + 5 + 6) | **2213** |

1) भूजल उपलब्धता (वार्षिक एकूण पुनर्भरण ) 954    अ) भूजलाचा सध्याचा सिंचनासाठी वापर 459

2) भूजल वापरास मूभा ( 954 च्या 65 %) 620

टीपा 1) भूजल उपलब्धतेमूळे उपखोऱ्याच्या एकूण उपलब्धतेत वाढ होणार नाही ; भूजलाचा जेवढा उपसा होईल तेवढा नदी प्रवाह घटत जाईल म्हणून एकूण उपलब्धतेचा आकडा काढतांना भूजल उपलब्धतेचा विचार घेतलेला नाही.

2) संकलीत अंदाजासाठी सर्व पाण्याचा उपयोग भूपृष्ठावरील पाण्यातून दाखविला आहे. पण एकूण वापरापैकी अधिकाधिक 804 भूजल माध्यमातून शक्य आहे.

3) पाणी वापराचे नियोजन उपलब्ध येवा मालिकेवर आधारीत आहे.

सारणी : 18.5(चालू)

**जलसंपत्तीचा ताळेबंद**

**उजनीखाली भाग घटकक्षेत्र**

जलसंपत्ती - दलघमी

| अक्र | उपलब्धता | | अक्र | वापर (सन2030) | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | भूपृष्ठावरील | | 4 | भूपृष्ठावरील | |
| | अ) नैसर्गिक | | | अ) घरगुती वापरासाठी | |
| | 1) 75 टक्के विश्वासार्हतेने | 319 | | 1) नागरी | 12 |
| | 2) 50 टक्के विश्वासार्हतेने | 889 | | 2) ग्रामीण | 73 |
| | 3) सरासरी विश्वासार्हतेने | 469 | | 3) पशुधन | 31 |
| | 4) वापर मर्यादा सरासरीने | 186 | | एकूण – (4 अ) | 116 |
| | ब) मानवप्रबंधित | | | ब) उद्योगधंदयासाठी | 18 |
| | 1) नागरी वापरातून पुनरुद्भव (80 %) | 10 | | एकूण सिंचनेतर वापर - (4अ + 4 ब) | 134 |
| | 2) उद्योग धंदयातील पुनरुद्भव (97.5%) | 17 | 5 | इतर उपखोऱ्यात स्थलांतरीत पाणी | |
| | 3) इतर खोऱ्यातून संक्रमित झालेले पाणी | 2081 | 6 | सिंचनासाठी उपलब्ध भूपृष्ठावरील पाणी (3-4-5) | 2373 |
| | | | | =(2705-466+276+214) =(2139+276+214) | |
| | एकूण (1 ब) | 2108 | | | |
| 2 | मानवनिर्मित<br>लाभक्षेत्रातील पुनर्भरण (1अ 4 +1ब 3-4-5) च्या10 % | 213 | | | |
| 3 | एकूण उपलब्धता [1अ (4)+ 1ब + 2] | 2507 | 7 | एकूण वापर (4 + 5 + 6) | 2507 |


1) भूजल उपलब्धता (वार्षिक एकूण पुनर्भरण) 1157    अ) भूजलाचा सध्याचा सिंचनासाठी वापर

2) भूजल वापरास मुभा ( 1157 च्या 65 %) 752

टीपा : 1) भूजल उपलब्धतेमुळे उपखोऱ्याच्या एकूण उपलब्धतेत वाढ होणार नाही ; भूजलाचा जेवढा उपसा होईल तेवढा नदी प्रवाह घटत जाईल म्हणून एकूण उपलब्धतेचा आकडा काढतांना भूजल उपलब्धतेचा विचार घेतलेला नाही.

2) संकलीत अंदाजासाठी सर्व पाण्याचा उपयोग भूपृष्ठावरील पाण्यातून दाखविला आहे. पण एकूण वापरापैकी अधिकाधिक 965 भूजल माध्यमातून शक्य आहे.

3) पाणी वापराचे नियोजन उपलब्ध येवा मालिकेवर आधारीत आहे.


नकाशा - 18.1
15 Km 0 15 30 Km
महाराष्ट्र राज्य
18 ऊर्वरीत भीमा उपखोरे
• संदर्भ सूची •
1. राज्य सरहद्द
2. जिल्हा सरहद्द
3. तालुका सरहद्द
4. उपखोरे सरहद्द
5. घटक क्षेत्र हद्द
6. जिल्हा मुख्यालय
7. तालुका मुख्यालय
8. रेल्वे मार्ग
9. रस्ते
10. नद्या व नाले
11. समपर्जन्यमान रेषा (मिमी)
12. धरणाचे ठिकाण व बुडीत क्षेत्र पूर्ण बांधकामाधीन भविष्यकालिन
13. औद्योगिक क्षेत्र
14. महानगरपालिका
15. नगर पालिका
16. आंतरखोरे पाणी स्थलांतराच्या योजना
- कार्यरत
- बांधकामाधीन
महाराष्ट्र जल व सिंचन आयोग
ऊर्वरीत भीमा उपखोरे
अ) नीरा घटक
आ) उजनीखाली - माणसहीत घटक
जून 1999
रायगड जिल्हा
मध्य कोकण खोरे समूह
ऊर्ध्व कृष्णा (पश्चिम) उपखोरे
ऊर्ध्व भीमा (उजनी पर्यंत) उपखोरे
सोलापूर जिल्हा
सीना - बोरी - बेनेतुरा उपखोरे समूह
कर्नाटक
गुंजवणी (वेल्हे)
गुंजवणी (चिरमोडी)
भाटघर
निरा देवघर
वीर
नाझरे
भोर
खंडाळा
सासवड
जेजुरी
नीरा
बारामती
लोणंद
फलटण
माळशिरस
आंधळी
राणंद
माण
म्हसवड
आटपाडी
सांगोला
मंगळवेढा
पंढरपूर
बुधीयाळ
दोड्डानाला
संख
भुवरणी
जत
18अ
18आ
पुरंदर उपसा सिंचन योजना
जनाई - शिरसाई उपसा सिंचन योजना
धोम बलकवडी कालवा
उरमोडी उपसा सिंचन योजना
जिहे काठापूर उपसा सिंचन प्रकल्प
तारळी पाटबंधारे प्रकल्प
कृष्णा कोयना उपसा सिंचन योजना (म्हैसाळ)
नीरा उजवा कालवा
फलटण
इंदापूर कडे
बार्शी कडे
सोलापूर कडे
सातारा कडे
कोरेगाव कडे
सांगली कडे
विजापूर कडे
दौंड कडे
पुणे कडे
उपखोऱ्याचे स्थान
उपखोरे क्र.
उपखोऱ्यांची नावे
17 ऊर्ध्व भीमा (उजनी पर्यंत)
15 ऊर्ध्व कृष्णा (पश्चिम)
16 ऊर्ध्व कृष्णा (पूर्व)
19 सीना - बोरी - बेनेतुरा
22 मध्य कोकण

# उपखोरे 19

# सीना-बोरी-बेनेतुरा

## 1.0. भौगोलिक तपशील

भीमा खोऱ्याच्या पूर्वेकडील कृष्णा खोऱ्यांतर्गत सर्व क्षेत्राचा एकत्रित विचार या उपखोऱ्यात संकल्पित आहे. हे उपखोरे सीना स्रवणक्षेत्र व बोरी-बेनेतुरा यांची स्रवणक्षेत्रे (नकाशा 19.1) अशा दोन घटकात निसर्गतः विभागलेले आहे. बरेचसे उत्तर दक्षिण पसरलेले हे चिंचोळे उपखोरे आहे व संपूर्णतः अवर्षणप्रवण आहे. पुरेशा विश्वासार्ह पावसाचा लवमात्र भाग नसलेले हे उपखोरे आहे. यात अहमदनगर, बीड, उस्मानाबाद व सोलापूर या जिल्हयांतील खालील तालुक्यांच्या क्षेत्राचा समावेश होतो.

**सीना घटक**

**अहमदनगर** : 1)पारनेर 2) श्रीगोंदा 3) अहमदनगर 4) कर्जत 5) जामखेड 6) पाथर्डी

**बीड** : 1)आष्टी 2) पाटोदा

**उस्मानाबाद** : 1)उस्मानाबाद 2) तुळजापूर 3) परांडा 4) भूम 5) कळंब

**सोलापूर** : 1)उत्तर सोलापूर 2)बार्शी 3)अक्कलकोट 4) दक्षिण सोलापूर 5)मोहोळ 6)करमाळा 7) माढा.

**बोरी-बेनेतुरा घटक**

**सोलापूर** : 1)अक्कलकोट 2) दक्षिण सोलापूर.

**उस्मानाबाद** : 1)उमरगा 2) तुळजापूर.

मुख्यनदी व तिच्या उपनद्यांची,उगमस्थान, लांबी इ.बाबतची माहिती खालील प्रमाणे आहे.

लांबी - किमी, तलांक -मी.

| अक्र | नदी | लांबी | उगमस्थान | | संगमस्थान | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | ठिकाण | तलांक | ठिकाण | तलांक |
| 1 | सीना | 300 | जेऊर अहमदनगर | 748 | कुडाळ सोलापूर | 413 |
| 2 | बोरी | 122 | तुळजापूर | 640 | भीमा नदीस अलगडी (कर्नाटक) | 424 |
| 3 | बेनेतुरा | 48* | मालेगाव | 661 | मालखेड (कर्नाटक) | 394 |

1.1 विस्तार : या उपखोऱ्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र 16481 चौकिमी असून सीना या घटकाचे क्षेत्र 12742 चौकिमी आहे. तसेच बोरी-बेनेतुरा घटकाचे क्षेत्र 3739 चौकिमी आहे.या उपखोऱ्याचा क्षेत्रीय विस्तार खालील प्रमाणे आहे.

सीना : अक्षांश 17° 18′ ते 19° 15′ उत्तर व रेखांश 74° 30′ ते 76° 15′

बोरी बेनेतुरा : अक्षांश 17° 20′ ते 18° 10′ उत्तर व रेखांश 75° 45′ ते 76° 05′ पूर्व या मध्ये आहे.

1.2 चतु:सीमा : उपखोऱ्याच्या चतु:सीमा खालील प्रमाणे आहेत.

| अक्र | दिशा | तपशील | |
|---|---|---|---|
| | | सीना | बोरी बेनेतूरा |
| 1 | उत्तर | ऊर्ध्व गोदावरी (पैठण पर्यंत) उपखोरे क्र 1 | मांजरा उपखोरे क्र 4 |
| 2 | पूर्व | मांजरा उपखोरे क्र. 4 | आंध्रप्रदेश |
| 3 | पश्चिम | ऊर्ध्व भीमा उपखोरे क्र. 17 व उर्वरीत भीमा उपखोरे क्र. 18 | सीना घटक क्र 19 अ |
| 4 | दक्षिण | कर्नाटक | कर्नाटक |

## 2.0 हवामान

या उपखोऱ्यातील सरासरी पाऊस 557 मिमी आहे. हे उपखोरे पाण्याच्या तुटीच्या प्रदेशात मोडते.या उपखोऱ्यात साधारणत: 88 टक्के पाऊस नैऋत्य मोसमी वाऱ्यामुळे जून ते सप्टेंबर दरम्यान तर 8 टक्के पाऊस ईशान्य वाऱ्यामुळे सप्टेंबर नंतर पडतो व 4 टक्के पाऊस जानेवारी ते मे या कालावधीत पडतो. हवामानविषयक इतर बाबी व पर्जन्यमानातील दोलायमानता इत्यादी माहिती खालील प्रमाणे आहे.

पर्जन्यमान मिमी,तपमान - अंश.से

| अक्र | | परीमाण | महिना वर्ष | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1 | सर्वात अधिक पाऊस | 1375 | 1990 | सावरगाव जि.उस्मानाबाद |
| 2 | सर्वात अधिक तपमान | 45 | मे 1991 | बंदलगी जि. सोलापूर |
| 3 | सर्वात कमी तपमान | 6 | जानेवारी 91 | रोसा जि. सोलापूर |

कृषिहवामान वर्गीकरणानुसार या उपखोऱ्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

6-अवर्षण (कमी पावसाचा) विभाग (SC) व 7-निश्चित पावसाचा मुख्यत: खरीप पिकांचा विभाग (ARK).

पर्जन्यमानातील दोलायमानता गुणांक 32 (तक्ता 2.5.8) आहे. उपखोऱ्यातील माहवार पर्जन्यमानाचा तपशील सारणी 19.1 मध्ये दर्शविला आहे. उपखोऱ्यातील पर्जन्यमानाचा केंद्रनिहाय तपशील सारणी 19.2 मध्ये दर्शविला आहे.

2.2 बाष्पीभवन : या उपखोऱ्यात सर्वाधीक बाष्पीभवन एप्रिल महिन्यात 263 मिमी. तर सर्वात कमी बाष्पीभवन डिसेंबर महिन्यात 76 मिमी होते उपखोऱ्यातील केंद्रनिहाय माहवार तपशील सारणी 19.1 मध्ये दर्शविला आहे.

## 3.0 जलसंपत्तिची उपलब्धता

3.1 भूपृष्ठीय जलसंपत्ति : या उपखोऱ्यातील एकूण सरासरी येवा 1616 दलघमी आहे. वर्ष 1979-80 ते 1993-94 या अवधीतील सरितामापन केंद्रांच्या आधारसामग्रीवर आधारभूत एकूण पाण्याची उपलब्धता खालीलप्रमाणे येते

| | |
|---|---|
| 75 टक्के विश्वासार्हतेने | 674 दलघमी |
| 50 टक्के विश्वासार्हतेने | 1139 दलघमी. |

हा येवा पुढे दर्शविलेल्या सरिता मापन केंद्रांद्वारे मोजला जातो.

येवा -दलघमी

| अक्र | सरिता मापन केंद्र | स्वामित्व | आधार सामुग्री कालावधी | वार्षिक सरासरी येवा |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| **अ** | **सीना** | | | |
| | वडकबाळ | के.ज.आ. | 1967-94 | 1074 |
| **आ** | **बोरी-बेनेतुरा** | | | |
| 1 | बोरी ता.उमरगा | के.ज.आ. | 80 -94 | 242 |
| 2 | चिंचोली | के.ज.आ. | 80 -94 | 67 |

वेगवेगळया विश्वासार्हतेचा येवा सारणी 19.3 मध्ये दर्शविला आहे.

3.2 भूशैलीय रचना :

भूपृष्ठीय स्थिति (भूरुप वर्णन) : सीना घटकातील भूभाग साधारणतः 16 टक्के अतिविच्छेदीत व डोंगराळ, 61 टक्के पठारी व 23 टक्के सपाट व नदी लगतच्या गाळाचा आहे. यात भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा निर्देशित 59 पाणलोट क्षेत्रे आहेत .

बोरी-बेनेतुरा घटकातील भूभाग 3 टक्के अतिविच्छेदीत व डोंगराळ आणि उर्वरीत 97 टक्के पठारी आहे.यात भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा प्रणित 22 पाणलोट क्षेत्रे आहेत .

भूपृष्ठीय शैलस्थिति : या दोन्ही घटकात मुख्यत्वे लाव्हा थरांपासून तयार झालेला बहुस्तरीय दक्षिणी कातळ खडक (डेक्कन ट्रॅप प्रस्तर) आढळतो. त्यावर अलिकडील काळात सीना नदीच्या काठी तयार झालेला गाळाचा प्रस्तर आढळतो. त्याच प्रमाणे उस्मानाबाद जिल्ह्यातील भूम गावाच्या दक्षिणेला सुध्दा गाळाचा एक मोठा प्रस्तर आहे. त्याची जाडी10 ते 15 मीटर आहे.

डेक्कन ट्रॅप प्रस्तरात प्रामुख्याने अकुहरी बेसाल्टचे प्राबल्य आहे. त्यात आकुंचन संधीच्या भेगा व तडे सुध्दा आहेत. विशेषतः बोरी बेनेतुरा घटकात अति खोलीवरील अकुहरी बेसाल्टात उभ्या सांधी व तडे मोठया प्रमाणात आहेत.विघटीत प्रस्तराचे प्रमाण सुध्दा दोन्ही घटकात चांगले आहे.

3.3 भूजल संपत्ति : भौगोलिक व पर्जन्यमानाच्या प्रतिकूल परिस्थितिमुळे भूजल उपलब्धतेस मर्यादा आहेत. सीना घटकात भूजल संपत्ति विघटीत प्रस्तरापुरती मर्यादीत आहे. अतिविच्छेदीत व डोंगराळ भागात कमी, पठारी भागात मध्यम आणि सपाट व गाळाच्या भागात अधिक असा क्रम लागतो. या घटकात कृत्रिम भूजल पुनर्भरणास चांगला वाव आहे.

बोरी-बेनेतुरा घटकात विघटीत प्रस्तराबरोबर खोलीवरील भूस्तर सुध्दा भूजल उपलब्धीस अनुकूल आहे. हे त्या भागात असलेल्या उच्च क्षमतेच्या खोल विंधण विहिरींच्या क्षमतेवरुन दिसून येते. उपसा अधिक प्रमाणात होत असल्यामुळे सीना घटकातील एक लघुपाणलोटक्षेत्रे सी 29 3/4 (तालुका - मोहोळ) अतिविकसित व 6 पाणलोट क्षेत्रे सी 1,2,30,36,38,41 (तालुके : अहमदनगर, पारनेर, माढा, मोहोळ, उत्तर व दक्षिण सोलापूर) विकसित अवस्थेत आहेत. बोरी बेनेतुरा घटकात दोन पाणलोट क्षेत्रे भी. 131,132 (तालुके : अक्कलकोट, दक्षिण सोलापूर) विकसित अवस्थेत आहेत. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या 1990

च्या भूजल अंदाजानुसार सीना घटक क्षेत्रात (सिंचित क्षेत्रातील भरीसकट) 1133 दलघमी एकूण पूनर्भरण असून विहिरींची संख्या 0.95 लक्ष आहे. प्रवाही पाण्याच्या मोजणीच्या तुलनेत व पावसाचे तुटीचे स्वरुप पहाता उपलब्ध भूजलाचा हिशोब काळजीपूर्वक तपासला जाणे आवश्यक दिसते. त्याच प्रमाणे बोरी-बेनेतुरा घटकात 376 दलघमी एकूण पुनर्भरण असून विहिरींची संख्या 0.25 लक्ष आहे.

3.4 <u>अवर्षणप्रवण क्षेत्र</u> : या उपखोऱ्याचे क्षेत्र 21 तालूक्यात पसरले आहे. त्यापैकी सुकथनकर समितीच्या अहवालानंतर शासनाने घोषित केलेले 16 तालूके अवर्षण प्रवण आहेंत, अशा तालूक्यांचा तपशील सारणी 19.4 मध्ये दिला आहे.

## 4.0 जमीन

तपशील खालील प्रमाणे आहे.

| अक्र | तपशील | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | भरड उथळ जमीन | 24 |
| 2 | मध्यम काळी जमीन | 55 |
| 3 | खोल काळी जमीन | 15 |
| 4 | गाळाची जमीन | 06 |

<u>एकंदरीने पावसाचा तुटीचा प्रदेश असला तरी उपखोऱ्यातील 70 टक्के चांगली उपजाऊ जमीन ही मोठी नैसर्गिक देणगी आहे.</u> त्यामुळे या उपखोऱ्यातील पाण्याच्या वापराचे नियोजन इतर खोऱ्यापेक्षा वेगळया पध्दतीने होणे आवश्यक आहे.

## 5.0 जमिनीचा वापर

या उपखोऱ्यातील एकूण भौगोलिक क्षेत्र 16481 चौकिमी असून सीना घटकाचे क्षेत्र 12742 चौकिमी आहे. तसेच बोरी-बेनेतुरा घटकाचे क्षेत्र 3739 चौकिमी आहे. लागवडीयोग्य क्षेत्र, वनखात्याच्या ताब्यातील क्षेत्र, पडीक क्षेत्र इत्यादी बाबतची माहिति पुढील प्रमाणे आहे.

क्षेत्र-हजार हेक्टर

| अक्र | तपशील | क्षेत्र | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | (अ) सीना | | (आ) बोरी-बेनेतुरा | |
| | | क्षेत्र | भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी | क्षेत्र | भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी |
| 1 | भौगोलिक क्षेत्र | 1274 | | 374 | |
| 2 | वनखात्याच्या ताब्यातील क्षेत्र त्याच्या वापराचा तपशील (सघनवृक्ष लागवड, विरळ लागवड, गवताळ, वैराण) संकलित करावयाचा आहे. | 48 | 3.8 | 5 | 1.3 |
| 3 | पेरणीसाठी उपलब्ध नसलेले क्षेत्र<br>अ) ओसाड जमीन<br>ब) बिगर शेती उपयोगाकरीता आणलेली | 52 | 4.1 | 9 | 2.4 |

क्षेत्र-हजार हेक्टर

| अक्र | तपशील | क्षेत्र | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | (अ) सीना | | (आ) बोरी-बेनेतुरा | |
| | | क्षेत्र | भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी | क्षेत्र | भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी |
| | जमीन. | 15 | 1.2 | 3 | 0.8 |
| 4 | मशागतयोग्य पडिक जमीन | 37 | 2.9 | 16 | 4.3 |
| 5 | कायमची कुरणे व चराऊ कुरणे | 44 | 3.4 | 12 | 3.3 |
| 6 | किरकोळ झाडेझुडपे यांच्या समूहाखालील क्षेत्र | 3 | 0.2 | 1 | 0.2 |
| 7 | चालू पडिक जमीन | 75 | 5.9 | 27 | 7.2 |
| 8 | इतर पडिक जमीन | 86 | 6.7 | 33 | 8.8 |
| 9 | पेरणीचे निव्वळ क्षेत्र | 915 | 71.8 | 268 | 71.7 |
| 10 | लागवडीयोग्य क्षेत्र (4+5+6+7+8+9) | 1160 | 91 | 357 | 95 |
| 11 | दुसोटा क्षेत्र | 124 | | 48 | |
| 12 | पिकाखालील एकूण क्षेत्र (9 +11) | 1039 | | 316 | |
| 13 | पीक घनता (12 ÷9 X 100) | 114 | | 118 | |

## 6.0 लोकसंख्या व पशुधन

6.1 <u>लोकसंख्या</u> : सन 1991 च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या 37.34 लक्ष आहे. उपखोरे निहाय लोकसंख्या, सन 2030 पर्यन्त होणारी लोकसंख्येतील वाढ व लोकसंख्या घनता याबाबतचा तपशील खालील प्रमाणे अपेक्षित आहे.

लोकसंख्या - हजारात, घनता-प्रति चौकिमी

| अक्र | लोकसंख्या तपशील | लोकसंख्या | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | 1991 | | 2030 | |
| | | सीना | बोरी | सीना | बोरी |
| 1 | नागरी | 1088 | 136 | 3098 | 328 |
| 2 | ग्रामीण | 1957 | 553 | 3914 | 1106 |
| 3 | एकूण | 3045 | 689 | 7012 | 1434 |
| 4 | लोकसंख्या घनता | 239 | 184 | 550 | 384 |
| 5 | ग्रामीण लोकसंख्या घनता | 154 | 148 | 307 | 296 |

6.2 <u>पशुधन</u> : सन 1992 च्या मोजणीनुसार एकूण पशूधन 22.45 लक्ष आहे. घटकनिहाय तपशील खालील प्रमाणे आहे.

| घटक | म्हैस व रेडे | एकखुरी व उंट | गाय व बैल | डुकरे | शेळी/मेंढी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| सीना | 188859 | 5013 | 696247 | 17212 | 828862 | 1736193 |
| बोरी | 62374 | 1828 | 222001 | 5019 | 217432 | 508654 |

6.3 <u>इतर तपशील</u> : सीना घटकात सोलापूर ही एकमेव महानगरपालिका आहे. तसेच 1)अहमदनगर 2) परांडा 3)भूम 4) बार्शी 5) करमाळा 6) कुर्डुवाडी या नगरपालिका आहेत.

बोरी बेनेतुरा घटकात 1)अक्कलकोट 2) उमरगा 3)मैंदरगी 4) तुळजापूर 5)मुरुम 6)नळदुर्ग 7)दुधणी या नगर पालिका आहेत एकंदरीनेच नागरी लोकसंख्येचे प्रमाण 32 टक्के हून अधिक आहे व 40 टक्के होईल असे दिसते. उपखोऱ्यातील मजूर संख्या खालील प्रमाणे आहे.

संख्या - हजारात

| अक्र | घटक | शेत मजूर | इतर मजूर |
|---|---|---|---|
| 1 | सीना | 799 | 347 |
| 2 | बोरी | 159 | 367 |

7.0 **पाण्याचा वापर**

7.1 <u>सिंचनासाठी वापर</u> : उपखो-यातील वर्गनिहाय प्रकल्प म्हणजे मोठे,मध्यम,लघु, कोल्हापूर पध्दतीचे बंधारे, पूर्ण झालेले, प्रगतिपथावरील व भविष्यकालिन प्रकल्प यांचा तपशील सारणी 19.5 मध्ये दिलाआहे.पूर्ण झालेल्या प्रकल्पांची निर्मित सिंचन क्षमता 108289 हेक्टर असून त्यातील प्रस्तावित पाणी वापर 556 दलघमी आहे. सिंचनासाठी आणखी 172282 हेक्टर क्षेत्र सिंचना खाली आणता येऊ शकते पण त्यासाठी सध्याचा पाणीवापर पध्दतीप्रमाणे आणखी वापर 922 दलघमी पाणी लागेल.

7.2 <u>सिंचनेतर पाण्याची गरज</u> : सिंचनेतर उपयोगासाठी या उपखो-यातील सध्याची गरज 153 दलघमी आहे. सन 2030 पर्यन्तची ती 359 दलघमी होईल. म्हणजे सरासरी येव्याच्या जवळजवळ 22 टक्के होईल. या गरजांचा तपशील पुढील प्रमाणे असेल.

पाणी-दलघमी

| अक्र | तपशील | सीना घटक | | बोरी-बेनेतुरा घटक | |
|---|---|---|---|---|---|
| | | 1991 | 2030 | 1991 | 2030 |
| 1 | घरगुती वापरासाठी | 120 | 275 | 24 | 49 |
| 2 | उद्योगासाठी | 9 | 32 | - | 3 |
| | एकूण | 129 | 307 | 24 | 52 |

घरगूती वापरासाठीच्या पाण्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| घटक | 1991 | | | | 2030 |
|---|---|---|---|---|---|
| | नागरी | ग्रामीण | पशुधन | एकूण | |
| सीना | 52 | 39 | 29 | 120 | 275 |
| बोरी-बेनेतुरा | 4 | 11 | 9 | 24 | 49 |

7.3 जलसंपत्तिचा ताळेबंद : भूपृष्ठावरील व भूपृष्ठाखालील उपलब्ध जलसंपत्ति घरगूती वापरासाठी, उद्योगासाठी व सिंचनासाठी पाणीवापर यातून होणारा पुनरुद्भव याचा ताळेबंद सारणी 19.6 मध्ये दिला आहे.

7.4 लाभक्षेत्र विकास : सद्यस्थिति खालील प्रमाणे आहे.

क्षेत्र-हजार हेक्टर

| भूविकास (शेतचाऱ्या इ.)झालेले काम | | भूविकास (सपाटीकरण इ.)झालेले काम | | प्रकल्पांच्या लाभक्षेत्रा व्यतिरिक्त क्षेत्रात |
|---|---|---|---|---|
| लाक्षेविप्रा कडील प्रकल्प | लाक्षेविप्रा बाहेरील प्रकल्प | लाक्षेविप्रा कडील प्रकल्प | लाक्षेविप्रा बाहेरील प्रकल्प | झालेले जमीन सपाटी करणाचे (भाग-2) क्षेत्र |
| **(अ) सीना घटक** | | | | |
| -- | 39.05 | -- | 26.18 | 27.98 |
| **(आ) बोरी-बेनेतुरा घटक** | | | | |
| -- | 14.65 | -- | 13.84 | 8.95 |

7.5 सन 1970 पूर्वीची धरणे : उपखोऱ्यातील 1970 पूर्वी पूर्ण झालेले प्रमुख प्रकल्प खालील प्रमाणे आहेत.

| अक्र | घटक क्षेत्र | प्रकल्पाचे नाव | वर्ष |
|---|---|---|---|
| 1 | सीना | एकरुख | 1880 |
| | | चांदणी | 1956 |
| 2 | बोरी-बेनेतुरा | कुरनूर | 1970 |
| | | हरणी | 1960 |

पाण्याच्या उपलब्धतेतील दोलायमानता व पीकरचनेतील स्थानिक मर्यादा यांचा अंदाज या प्रकल्पांच्या प्रदीर्घ कालखंडाच्या अभ्यासावरुन येऊ शकतो.

## 8.0 पीकरचना

एकूण पेरणीखालचे क्षेत्र 11.83 लक्ष हेक्टर आहे. यापैकी बहुतांश क्षेत्र रब्बी आहे. उपखोऱ्यातील जमीन व हवामान खालील पिकांस अनुकूल आहे.

1) बाजरी 2) रब्बी ज्वारी 3) खरीप ज्वारी 4) हळद 5) सूर्यफूल 6) डाळींब 7) पेरु 8) आंबा 9) सीताफळ 10) बोर. काही प्रमुख पिकांची दर हेक्टरी सरासरी उत्पादकता पुढील प्रमाणे आहे

उत्पादकता-क्विंटल/हेक्टर

| अक्र | प्रमूख पिके | उत्पादकता |
|---|---|---|
| | **(अ) सीना** | |
| 1 | रब्बी ज्वारी | 4.89 |
| 2 | बाजरी | 6.63 |
| | **(आ) बोरी-बेनेतुरा** | |
| 1 | रब्बी ज्वारी | 5.50 |
| 2 | सूर्यफूल | 5.00 |

या उपखोऱ्यातील परंपरागत पिकांची उत्पादकता फारच कमी आहे. त्यामुळे आर्थिक विकासाच्या दृष्टीने या उपखोऱ्याचा नव्याने वेगळा विचार होणे आवश्यक आहे.

## 9.0 उद्योगधंदे

उपखोऱ्यातील प्रमुख कृषि आधारीत उद्योगधंद्यांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अक्र | तपशील | संख्या | |
|---|---|---|---|
| | | सीना | बोरी-बेनेतुरा |
| 1 | साखर कारखाने | 10 | 2 |
| 2 | सूत गिरण्या | 21 | 4 |

## 10.0 जलविद्युत निर्मिती

या उपखोऱ्याच्या भौगोलिक परिस्थितिमुळे व अपुऱ्या पावसामुळे जलविद्युत निर्मितीस वाव नाही.

## 11.0 दळणवळणाची साधने

### (अ) सीना घटक

**लोहमार्ग :** पुणे-सिंकदराबाद दुहेरी ब्रॉडगेज, दौंड-मनमाड एकेरी ब्रॉडगेज, पंढरपूर-कुर्डुवाडी, बार्शी-लातूर नॅरोगेज. **राष्ट्रीय महामार्ग** पुणे-हैद्राबाद रा.म.क्र. 9, सोलापूर-विजापूर रा.म.क्र 13. **राज्य मार्ग** राज्य मार्ग क्र 2,29, 32,33,59,60 व 65

### (आ) बोरी-बेनेतुरा घटक

**लोहमार्ग** पुणे- सिंकदराबाद दुहेरी ब्रॉडगेज. **राष्ट्रीय महामार्ग** पुणे-हैद्राबाद रा.म.क्र.9. **राज्य मार्ग** राज्य मार्ग क्र 33.

## 12.0 भावी नियोजनाची दिशा

**12.1** <u>पाण्याची उपलब्धता व वापर</u> : या उपखोऱ्यात पाण्याची नैसर्गिक वार्षिक सरासरी उपलब्धता 1616 दलघमी आहे. या खोऱ्यातील वापरासाठी 1103 दलघमी वापराचे नियोजन करण्यात आले आहे. घटक खोरेनिहाय त्याची फोड खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| 1) सीना | 910 दलघमी |
| 2) बोरी | 91 दलघमी |
| 3) बेनेतुरा (कागना खोऱ्यात) | 102 दलघमी. |

ऊर्ध्व भीमा (उजनीपर्यंत) व उर्वरीत भीमा या दोन उपखोऱ्यांतून आंतरखोरे पाणी स्थलांतर करुन 523 दलघमी पाणी वापरास अधिक उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव आहे. त्या संबंधीत योजनांचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

पाणी-दलघमी

| | अक्र | योजनेचे नाव | स्थलांतरित पाणी | संबंधीत खोरे |
|---|---|---|---|---|
| * | 1) | शिरापूर उपसा सिंचन योजना | 49 | उर्वरीत भीमा |
| * | 2) | बार्शी उपसा सिंचन योजना | 73 | उर्वरीत भीमा |
| * | 3) | दहीगाव उपसा सिंचन योजना | 51 | उर्वरीत भीमा |
| | 4) | आष्टी उपसा सिंचन योजना | 44 | उर्वरीत भीमा |
| * | 5) | भीमा-सीना जोड कालवा | 109 | उर्वरीत भीमा |
| * | 6) | सीना-माढा उपसा सिंचन योजना | 106 | उर्वरीत भीमा |
| | 7) | कर्जत शाखा कालवा (कुकडी) ते चौंडी को.प.बंधारा | 29 | ऊर्ध्वभीमा (उजनीपर्यंत) |
| | 8) | कर्जत शाखा कालवा (कुकडी) ते मांगी तलाव | 28 | ऊर्ध्वभीमा (उजनीपर्यंत) |
| | 9) | कुकडी - सीना - मेहेकरी जोड कालवा | 34 | ऊर्ध्वभीमा (उजनीपर्यंत) |
| | | एकूण | 523 | |

(टीप : * या चिन्हाने दर्शविलेल्या योजनांचे स्रोत वस्तुतः ऊर्ध्व भीमा (उजनी पर्यंत) या उपखोऱ्यातच आहेत )

एकंदरीत या उपखोऱ्यात पाणी वापरासाठी 1626 दलघमीची उपलब्धी झाली आहे. अशा प्रकारे बाहेरुन पाणी स्थलांतरित केल्यानंतरही हे उपखोरे दरडोई पाण्याची उपलब्धता व दरहेक्टरी उपलब्धता या दोन्ही संदर्भात तुटीचेच रहाणार आहे. त्यामुळे पाणी वापरासाठी कमी पाणी लागणाऱ्या पिकांचा व उद्योग व्यवहारांचाच येथे मोठया प्रमाणात विस्तार करणे योग्य राहील.

<u>पाणी वापराची सद्यःस्थिति</u> : या उपखोऱ्यात 1996 अखेर 152 प्रकल्प बांधून 523 दलघमी एवढी पाणीसाठवण क्षमता निर्माण झाली आहे. सीना कोळेगाव हा मोठा प्रकल्प या उपखोऱ्यात बांधकामाधीन आहे. पूर्ण झालेल्या प्रकल्पांचा पाणी वापर 556 दलघमी व बांधकामाधीन आणि भवीष्यकालीन प्रकल्पांमधील नियोजित पाणी वापर 922 दलघमी आहे.

12.2 या उपखोऱ्यात शेजारच्याच भीमा उपखोऱ्यातून जवळ जवळ 523 दलघमी पाणी स्थलांतरित करण्यात येत आहे. यापैकी 323 दलघमी पाणी उपसा सिंचनाद्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

पाणी- दलघमी

| अक्र | योजनेचे नाव | उंची | स्थलांतरित पाणी |
|---|---|---|---|
| 1 | शिरापूर | 74 | 49 |
| 2 | बार्शी | 83 | 73 |
| 3 | दहीगाव | 91 | 51 |
| 4 | आष्टी | 41 | 44 |
| 5 | सीना-माढा | – | 106 |

या उपसा सिंचन योजनांचा भांडवली व आवर्ती खर्च मोठा आहे. त्यामुळे किमान आवर्ती खर्च पाणीपट्टी द्वारे भरुन निघेल अशी पाणीपट्टीची आकारणी आवश्यक रहाणार आहे. पण अशा व्यावहारिक वाढीव पाणीपट्टीवर केवळ परंपरागत पिके घेणे व्यवहार्य होणार नाही. त्यामुळे पाणीपट्टीच्या दरास अनुकूल अशीच नवी मूल्यदायी पिकरचना या भागात रुजविणे आवश्यक राहील. मूल्यदायी उत्पादन रचना व प्राथमिक उत्पादनांवर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांची साखळी उभारुन दुय्यम तिय्यम पदार्थांत रुपांतर करण्याची व्यवस्था बसविणे यावरच या प्रदेशातील सिंचन योजनांची यशस्वीता अवलंबून रहाणार आहे.

अशा योजनांद्वारे आणलेल्या पाण्याची किमत जास्त असणार आहे. या पाण्याचा उपयोग आर्थिकदृष्ट्या परवडणारा होणे आवश्यक आहे. याला ठिबक, तुषार सारख्या आधुनिक पध्दतीची जोड देणे गरजेचे राहणार आहे. त्याला अनुकुल अशी पिकरचना पण बसवावी लागेल. पाणीवापर संस्थाचे जाळे द्रुतगतीने विणून अशी खर्चिक पाण्याची व्यवस्था शेतकरी सांभाळू शकतील अशी बसवणे आवश्यक आहे व त्याबरोबर अधिकाधिक संख्येतील शेतकऱ्यांना या उत्पादन व प्रक्रिया साखळीत समाविष्ट करुन घेता येईल या दृष्टीने पीकरचना व उत्पादन व्यवस्था बसवावी लागेल.

12.3 या उपखोऱ्यामधील येव्यामध्ये तीव्र दोलायमानता आहे. हे सारणी 19.3 वरुन सहजपणे दिसून येते. 90 टक्के उपलब्धता व 10 टक्के उपलब्धता (म्हणजे एकांतिक अतिपावसाची व अति अवर्षणाची वर्षे सोडून असलेली उपलब्धता) यातील गुणांक जवळ जवळ 11 आहे. पण 75 टक्के व 50 टक्के उपलब्धता यातील गुणांक 1.82 आहे. याचाच अर्थ 50 टक्क्याहूनही कमी उपलब्धतेच्या पाण्याच्या वापराचा अनुकूल वर्षांमध्ये विचार करणे इष्ट रहाणार आहे. चांगल्या पावसाच्या वर्षातील अतिरिक्त पाणी अडविण्याची व्यवस्था करुन आर्थिक लाभव्ययाच्या प्रमाणाची मर्यादा जिथपर्यन्त परवानगी देईल तिथपर्यन्त कमी विश्वासार्हतेचे पाणी वापरणे हितावह राहणार आहे. पाण्याच्या साठवणीचा या दृष्टीने फेर विचार होणे इष्ट राहील. धरणांची उंची वाढविणे, पूरपातळीवर पाझर कालवे काढून भूजलाचे साठे वाढविणे, कालव्यावरील मोठया सी.डी.वर्क्सच्या ठिकाणी नाल्यावर मार्गस्थ साठे निर्माण करणे, नदीपात्रात बंधारे बांधून ओळीने साठे निर्माण करणे इत्यादीचा या संदर्भात तपशीलवार अभ्यास करण्याची व उपखोऱ्याचा एकत्रित विचार करुन पाणी व्यवस्थापनाचा एकात्मिक प्रकल्प करण्याची गरज आहे.

12.4 वार्षिक पर्जन्यमान कमी आहे. 75 टक्के पेक्षा कमी पाऊस चौदापैकी आठ वर्षात पडतो. अकरा किंवा अधिक आठवडे तुटीचे असतात. पावसाची दोलायमानता विलक्षण आहे. परंडा

तालुक्यात 1983 साली 920 मिमी तर 1991 साली 262 मिमी पाऊस झाला. भूम तालुक्यात तर 1983 साली 1009.1 मिमी आणि 1985 साली फक्त 280 मिमी झाला. या तालुक्यातील हवामानाचे दुसरे महत्वाचे वैशिष्ठ्य म्हणजे पर्जन्यातील खंड सर्वसाधारणपणे जुलैच्या शेवटच्या आठवडयात व ऑगस्ट मध्ये पडतो. पावसाचा खंड पिकाच्या अपयशास कारणीभूत ठरत आहे. खरिप पिकाचे नुकसान होते अशा स्थितित या भागातील शेतकऱ्यांस खरीप पीक घेणे अतिशय कठीण ठरते. आणि म्हणून खरीप हंगाम हा नेहमी दुष्काळी परिस्थितिला तोंड देतो. पावसाची उपलब्धता साधारणतः सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात होत असल्यामुळे रब्बीचे क्षेत्र जास्त (70 टक्के) आहे आणि कोरडवाहू क्षेत्रात प्रामुख्याने (85 ते 90 टक्के) रब्बी ज्वारी हे पीक घेण्यात येते.

या दोन तालुक्यांतील जवळ-जवळ सर्वच नद्यावर मोठे, मध्यम व लघु प्रकल्प तसेच पाझर तलाव उभारण्यात आले आहे. त्यामुळे गाळाच्या मृदेत वरचेवर भर पडत चालली आहे.

या तालुक्यातील काही भाग वगळता शेतीयोग्य जमीनीचे प्रमाण कमी आहे. प्राकृतिक रचना व प्रतिकूल हवामान इ. घटक शेतीवर परिणाम करतात. त्यामुळे शेतीयोग्य क्षेत्र कमी आहे. प्राकृतिक रचना व प्रतिकूल हवामान या घटकावर मात करुन शेतीयोग्य क्षेत्र म्हणजेच लागवडीखालील क्षेत्र वाढवण्यात यश आले नाही. एकूण भौगौलिक क्षेत्रफळाच्या जवळ जवळ 60 ते 75 टक्के क्षेत्र लागवडीयोग्य बनवले आहे.

पाटाने पाणी देण्याच्या पारंपारिक पध्दतीपेक्षा ठिबक सिंचन, तुषार सिंचन इ. आधुनिक पध्दतीचा वापर करुन सिंचनक्षेत्र वाढविता येईल.

दूध उत्पादन, संकलन, दुधावरील प्रक्रिया, दूध वितरण यापासून तालुक्यातील 10000 लोकांना रोजगार मिळालेला आहे. दूधापासून खवा तयार करणे, पेढे तयार करणे, पेढयांची विक्री करणे यापासूनही जवळ जवळ 5000 लोकांना रोजगार पुरवठा झालेला आहे. शेतीनंतर तालुक्यात सर्वात जास्त रोजगार पुरवठा करणारा हा एक प्रमुख व्यवसाय होय.

या दोन तालुक्यात 4523 विहीरी आहेत. तालुक्यात सध्या 667 विंधण विहीरी आहेत. साध्या विहीरी व विंधन विहीरी यामुळे एकूण 7054 हेक्टर जमीन हंगामी ओलिताखाली आलेली आहे.

या तालुक्यातील एकूण जमिनीपैकी 60810 हेक्टर जमीन लागवडी योग्य आहे. यापैकी मध्यम प्रकल्पाद्वारे 6267 हेक्टर, लघु पाटबंधारे 3736 हेक्टर व कोल्हापूरी बंधाऱ्याद्वारे 2775 हेक्टर म्हणजे एकूण 12778 हेक्टर जमीन ओलिताखाली आलेली आहे.

12.5 हा भाग अवर्षणप्रवण क्षेत्रात मोडतो. वार्षिक सरासरी पाऊस 750 मिमी पेक्षा कमी आहे. सीना घटकातील सरासरी पर्जन्यमान केवळ 557 मिमी आहे. पावसाच्या दुष्टीने घटकाचे दोन भाग पडतात. दक्षिण भागात जून-जुलै मध्ये पावसाचे प्रमाण कमी तर ऑगष्ट मध्ये खंडता आणि सप्टेंबर मध्ये कमी पाऊस पडतो या विभागात खरिप पिकाचे क्षेत्र कमी आहे.

उपखोऱ्यातील क्षेत्रात खरीप हंगामात पडणारा पाऊस अनिश्चित स्वरुपाचा असल्यामुळे खरीप पिकांना धोका असतो. परंतू सप्टेंबर महिन्यात हमखास आणि खात्रीचा भरपूर पाऊस असल्यामुळे या उपखोऱ्यात रब्बी पिकाखाली जास्त क्षेत्र असते.

हवामानाच्या अनुकूलतेमुळे द्राक्षाचे पीक आता मोठया प्रमाणावर घेण्यात येत आहे. द्राक्षाची निर्यात पण होत आहे. या उत्पादनावर प्रक्रिया करुन त्याचे मुल्यदायी दुय्यम, तिय्यम पदार्थात तेथेच रुपांतर करण्याची गरज आहे.

12.6 या उपखोऱ्यामध्ये कोल्हापूर पध्दतीचे बंधारे मोठया प्रमाणात बांधण्यात आलेले आहेत. या बंधाऱ्याची गेट बसविण्याची व्यवस्था नीटशी न बसविल्यामुळे बंधाऱ्यात पाण्याचे साठे होत नाहीत. परिणामी सिंचनासाठी पाणी शेतकऱ्यांना मिळत नाही असे समजते. अशा तुटीच्या उपखोऱ्यामध्ये पाण्याचा काटकसरीने वापर करुन कमीत कमी पाण्यात जास्त लाभ होण्याच्या दृष्टीने सर्व मोठे, मध्यम व लघु प्रकल्पांचे सिंचन व्यवस्थापन पाणीवापर संस्थांच्या हातात जाणे हे अतिशय आवश्यक आहे. आणि त्या दृष्टीने तातडीचे प्रयत्न करणे गरजेचे आहे. याच्याच जोडीला ठिबक व तुषार या सारख्या आधुनिक सिंचन पध्दतीचा वापर वाढवून सिंचनाखालील क्षेत्र वाढविण्याची गरज आहे.

12.7 या उपखोऱ्याचा बराचसा भाग डोंगराळ आणि कुरणास अनुकूल आहे आणि म्हणून ही अनुकूलता दुग्धव्यवसायास पूरक आहे.त्या दृष्टीने या उपखोऱ्यात दुग्धव्यवसाय वाढीस लागत आहे. दुग्ध उत्पादनात या उपखोऱ्यातील भूम हा तालुका अग्रेसर आहे. भूम येथील शासकीय दूध योजनेची स्थापना 15 ऑगष्ट 1978 रोजी झाली. सुरवातीला 20,000 लिटर क्षमता असणारी यंत्रसामुग्री बसविण्यात आली. परंतु दूध उत्पादन सतत वाढू लागल्यामुळे सन 1983 मध्ये 50,000 लिटर क्षमता असणारी यंत्रसामुग्री बसविण्यात आली. लवकरच ती अपुरी पडू लागली म्हणून 1,00,000 लिटर क्षमता असणारी यंत्रसामुग्री सन 1993 मध्ये बसविली. तालुका पातळीवर दुग्ध उत्पादन करण्याच्या बाबतीत भूम हा तालुका महाराष्ट्रात अग्रेसर आहे. एकटया भूम तालुक्यात दुग्ध उत्पादन,संकलन, दूध प्रक्रिया, दूध वितरण या पासून जवळ जवळ 10 हजार लोकांना रोजगार मिळत आहे असे समजते. दुधापासून खवा आणि खव्यापासून पेढा तयार करणे, पेढयाच्या व्यवसायापासून जवळ जवळ 5 हजार लोकांना रोजगार उपलब्ध झालेला आहे.या भागातील कुंथलगिरी येथील पेढा महाराष्ट्रामध्ये प्रसिध्द आहे. या उपखोऱ्यात जास्त रोजगार पुरवठा करणाऱ्या दुग्ध व्यवसायास प्रोत्साहन देणे, त्याची वाढ करणे, शेळी मेंढी पालन, कुक्कुट पालन, ससे पालन, वराह पालन, मत्स्य शेती, रेशीम उद्योग या सारख्या व्यवसायाकडे लक्ष पुरविणे. हे उपखोऱ्याच्या विकासाच्या दृष्टीने अतिशय गरजेचे आहे. या पशुधनासाठी लागणारी पाण्याची व्यवस्था हा उपखोऱ्यातील पाणी नियोजनाचा एक महत्वाचा व प्राथम्याचा घटक यापुढे असावा लागेल. दरहेक्टरी पाण्याची उपलब्धता अतिशय कमी असल्यामुळे परंपरागत सिंचन पिकांपेक्षा पशुपालनासारख्या व्यवसायांवर लक्ष केंद्रित करावे लागेल. त्यानुसार पीक पध्दतीत बदल आवश्यक वाटतो.

12.8 या उपखोऱ्यात विहिरीव्दारे विशेषतः सिंचन विहिरीव्दारे हंगामी ओलित करण्याचे प्रयत्न झालेले आहेत. पाण्याच्या अतिउपशामुळे भूजलाची पातळी दिवसेंदिवस खोल जात आहे. काही विंधण विहिरी 400-500 फुट खोलीपर्यंत खोल जाऊन पाणी उपसत आहेत. अशा खोल सिंचन विहिरीमुळे आजुबाजूच्या कमी खोलीच्या विहिरी कोरडया पडत आहेत आणि मोठया प्रमाणात अशा विहिरी निरुपयोगी ठरत आहेत. सीना घटकात विहिरींची संख्या वाढल्यामुळे नदी, नाले कोरडे पडले आहेत. यावर बंधन असणे आवश्यक आहे. भूजल विकासाच्या वैज्ञानिक तपशीलांचीही अधिक चिकित्सक छाननी इष्ट राहील.

12.9 खरीप हंगामात मध्यम ते हलक्या प्रकारच्या जमिनीवर बाजरी, तूर, मटकी, उडीद, चवळी, भुईमूग आणि खोल व भारी जमिनीवर ज्वारी,सूर्यफुल, मका, सोयाबीन इत्यादी पिके घेतली जातात. रब्बी हंगामात ज्वारी, गहू, हरभरा, सूर्यफुल इत्यादी पिके घेतली जातात. येथील अवर्षणप्रवण स्थितित एरंडाची लागवड देखील यशस्वी होऊ शकते.या उपखोऱ्यात रब्बी ज्वारीचे पीक जास्त क्षेत्रात घेतले जाते. परंतु या ज्वारीची उत्पादकता (प्रती हेक्टरी) कमी आहे. त्यामुळे ज्वारीची उत्पादकता वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतील.

12.10 या अवर्षणप्रवण उपखोऱ्यात पशुंची संख्या 20 लाखापेक्षा जास्त आहे. त्यांना चारा कमी पडतो. सिंचनाखालील जमिनीवर चाऱ्याच्या पिकांची लागवड करुन दुग्ध व्यवसाय वाढीस वाव आहे. पशुधनास पिण्यासाठी व व्यवस्थापनासाठी लागणाऱ्या पाण्याची मागणी मोठी आहे तेंव्हा त्याचे नियोजन करणे व प्राथम्याने आरक्षण होणे आवश्यक आहे.

12.11 वाहतुकीची बऱ्यापैकी सोय असलेल्या या उपखोऱ्यात फुलशेती, औषधी आणि सुगंधी वनस्पतींचे उत्पादन घेणे हा सुध्दा चांगला व्यवसाय होऊ शकतो.

12.12 तुटीच्या या उपखोऱ्यात ऊसासारख्या जास्त पाणी लागणाऱ्या पिकांना पूर्णतः बंधन असणे इष्ट राहील. त्याशिवाय उपलब्ध थोडया पाण्याचा अधिक शेतकऱ्याना लाभ करुन देता येणार नाही. या उपखोऱ्यात बरड माळरान बरेच आहे. हवामान कोरडे असल्यामुळे फळबागांसाठी ते उपयुक्त आहे. पारंपारिक शेतीसोबतच फळशेतीही बोर, आंबा, चिंच, डाळींब आदी फळांची लागवड शक्य आहे. यास आधुनिक सिंचन तंत्राची जोड देवून उत्पन्न वाढविणे शक्य होईल.

12.13 पाण्याच्या दोलायमानतेमुळे बारमाही पिकांऐवजी हंगामी भाजीपाला व फुलशेतीवर सिंचन केंद्रित करणे उपयुक्त राहील त्यासाठी आधुनिक सिंचन पध्दतींचा वापर सहज शक्य आहे. पारनेर सारखे पारंपारिक फुलशेती असणारे क्षेत्र उपखोऱ्यातच आहे.या शिवाय आयुर्वेदिक व सुगंधी वनस्पतींच्या लागवडीसही प्रोत्साहन देणे इष्ट आहे.

12.14 सीना घटक क्षेत्रांतील फार मोठया संख्येतील लोकांचा पूर्वी सैनिकी पेशा होता. आता हे प्रमाण फार घटले आहे. त्यामुळे शेतीवर अवलंबून असणाऱ्यांची संख्या वाढली आहे म्हणून त्यांचेसाठी पर्यायी रोजगाराची निर्मिती आवश्यक आहे.पाण्याचे नियोजन करतांना रोजगार निर्मिती हा महत्वाचा घटक या उपखोऱ्यात लक्षात ठेवावा लागेल.

12.15 या उपखोऱ्यातील सोलापूर ही महानगरपालिका नागरी पुरवठयासाठी भीमा नदीच्या पाण्यावर अवलंबून आहे. घरगुती वापरासाठी व औद्योगिकरणासाठी अनुक्रमे पाणीवापर 20 टक्के व 2.5 टक्के धरण्याची तरतूद लवादाच्या निर्णयात आहे. यातून घरगूती वापरातील 80 टक्के पाणी आणि औद्योगिकरणातील 97.5 टक्के पाणी सिंचनास वा इतर उपयोगासाठी उपलब्ध होते असे अभिप्रेत आहे. या सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्या पाण्याचा पुनर्वापर चक्रीय पध्दतीने करणे आवश्यक आहे. असा पुनर्वापर वाढविण्याची गरज आहे.हे परत येणारे पाणी कोठे व कसे मोजले जाणार, कोठे परत मिळणार याची व्यवस्था बसविण्याची गरज आहे.

12.16 या उपखोऱ्यात रब्बी ज्वारीचे पीक फार मोठया प्रमाणात होते. त्यामुळे ज्वारी पासून स्टार्च साखर तयार करण्याच्या प्रक्रिया केंद्राचा विचार पुढे करता येण्यासारखा आहे. ऊसा पासून साखरे ऐवजी क्रमाक्रमाने ज्वारी पासून साखर निर्मितीस प्रोत्साहन लाभदायी ठरेल. या दृष्टीने संशोधनाची व प्रयोगांची गरज दिसते.

12.17 हे उपखोरे उष्ण व कोरडया हवामानाचे आहे. उन्हाळयामध्ये बाष्पीभवनाचा वेग जवळ जवळ 12 ते 15 मिमी प्रति दिवस इतका असतो. जलाशयातून आणि प्रवाही सिंचनाच्या पध्दतीने शेतीला दिलेल्या पाण्याचा बाष्पीभवनामुळे मोठया प्रमाणांत ऱ्हास होतो. हा बाष्पीभवनाचा ऱ्हास कमी करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्याची गरज आहे. पाण्याचा कार्यक्षमपणे वापर होणे तितकेच गरजेचे आहे. शेतीवर पाणी जेंव्हा पसरले जाते त्यावेळेस तीव्र अशा बाष्पीभवनाच्या वेगामुळे पाण्याचा मोठा भाग उडून जातो. हे थांबविण्यासाठी शेतीवर मल्चींग करणे, ठिबक/तुषार सारख्या पाण्याची काटकसर करणाऱ्या सिंचनाच्या पध्दतीला प्रोत्साहन देण्याची गरज आहे. अशा परिणामकारी सिंचनाच्या पध्दतीद्वारे पाण्याचा ऱ्हास कमी करणे याचाच अर्थ पाण्याचा वापर वाढविणे. त्यादृष्टीने प्रयत्न करण्याची गरज आहे.

12.18 या उपखोऱ्यातील हवामानाचे दुसरे महत्वाचे वैशिष्टय म्हणजे पर्जन्यातील खंड. सर्वसाधारणपणे जुलैच्या शेवटच्या आठवडयात व ऑगस्टमध्ये पर्जन्यात खंड पडतो. पावसाचा खंड पिकाच्या अपयशास कारणीभूत ठरतो. खरीप पिकाचे नुकसान होते. अशा स्थितित या भागातील शेतकऱ्यास खरीप पीक घेणे अतिशय कठीण ठरत असून नशिबावर हवाला ठेवून शेतकरी खरीप पिकाची पेरणी करतो.

सारणी : 19.1

**हवामानाचा तपशील**

पर्जन्य-मिमी, बाष्पीभवन-मिमी

| अक्र | महिना | पर्जन्य | | बाष्पीभवन | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | सीना | बोरी-बेनेतूरा | रोसा ता.करमाळा | निमगाव ता.करमाळा | सरासरी |
| 1 | जानेवारी | 4 | 2 | 88 | 76 | 82 |
| 2 | फेब्रूवारी | 1 | 0 | 107 | 105 | 106 |
| 3 | मार्च | 3 | 1 | 235 | 217 | 226 |
| 4 | एप्रिल | 6 | 4 | 269 | 257 | 263 |
| 5 | मे | 17 | 14 | 268 | 250 | 259 |
| 6 | जून | 99 | 90 | 180 | 166 | 173 |
| 7 | जुलै | 90 | 105 | 91 | 79 | 85 |
| 8 | ऑगष्ट | 85 | 130 | 91 | 73 | 82 |
| 9 | सप्टेंबर | 141 | 128 | 105 | 85 | 95 |
| 10 | ऑक्टोबर | 76 | 58 | 107 | 81 | 94 |
| 11 | नोव्हेंबर | 27 | 17 | 88 | 72 | 80 |
| 12 | डिसेंबर | 8 | 4 | 86 | 66 | 76 |
| | एकूण | 557 | 553 | 1715 | 1527 | 1621 |

हंगाम निहाय बाष्पीभवन

| हंगाम | बाष्पीभवन |
|---|---|
| खरीप | 309 |
| रब्बी | 391 |
| उन्हाळी | 921 |
| एकूण | 1621 |

टीप : सीना घटकक्षेत्रांत पावसाळयांच्या महिन्यांतही सरासरी पावसापेक्षा प्रत्येक महिन्यांतील बाष्पीभवन सप्टेंबर वगळता जास्त आहे. त्यामुळे पाण्याचा टिकाऊ ओलावा पिकांना सप्टेंबरमधेच मिळू शकतो. तुलनेने बोरीबेनेतुरांत खरीपाच्या सर्व महिन्यांत पाऊस बाष्पीभवनापेक्षा जास्त आहे व पिकांना अनुकूलता आहे.

सारणी : 19.1 (चालू)
पर्जन्यमानाचा तपशील

केंद्र : अहमदनगर

पर्जन्यमान-मिमी

| अक्र | वर्ष | वार्षिक सरासरी पर्जन्यमान | उतरत्या क्रमाने पर्जन्यमान | संगत वर्ष | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1901 | 380 | 1119 | 1956 | |
| 2 | 1902 | 722 | 1016 | 1938 | |
| 3 | 1903 | 860 | 985 | 1933 | |
| 4 | 1904 | 360 | 966 | 1915 | |
| 5 | 1905 | 340 | 961 | 1910 | |
| 6 | 1906 | 578 | 903 | 1928 | |
| 7 | 1907 | 490 | 875 | 1931 | |
| 8 | 1908 | 432 | 869 | 1943 | |
| 9 | 1909 | 574 | 860 | 1903 | 10 |
| 10 | 1910 | 961 | 848 | 1934 | |
| 11 | 1911 | 473 | 831 | 1974 | |
| 12 | 1912 | 287 | 830 | 1948 | |
| 13 | 1913 | 588 | 830 | 1947 | |
| 14 | 1914 | 497 | 827 | 1916 | |
| 15 | 1915 | 966 | 792 | 1946 | |
| 16 | 1916 | 827 | 787 | 1983 | |
| 17 | 1917 | 690 | 782 | 1957 | |
| 18 | 1918 | 311 | 768 | 1955 | 20 |
| 19 | 1919 | 599 | 767 | 1975 | |
| 20 | 1920 | 263 | 762 | 1932 | |
| 21 | 1921 | 438 | 760 | 1989 | |
| 22 | 1922 | 573 | 733 | 1962 | |
| 23 | 1923 | 461 | 722 | 1902 | |
| 24 | 1924 | 535 | 702 | 1930 | |
| 25 | 1925 | 589 | 701 | 1970 | |
| 26 | 1926 | 479 | 695 | 1969 | |
| 27 | 1927 | 607 | 690 | 1917 | 30 |
| 28 | 1928 | 903 | 673 | 1979 | |
| 29 | 1929 | 474 | 659 | 1958 | |
| 30 | 1930 | 702 | 651 | 1937 | |
| 31 | 1931 | 875 | 645 | 1959 | |
| 32 | 1932 | 762 | 640 | 1942 | |
| 33 | 1933 | 985 | 638 | 1981 | |

| अक्र | वर्ष | वार्षिक सरासरी पर्जन्यमान | उतरत्या क्रमाने पर्जन्यमान | संगत वर्ष | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 34 | 1934 | 848 | 628 | 1954 | |
| 35 | 1935 | 621 | 621 | 1935 | |
| 36 | 1936 | 315 | 609 | 1967 | |
| 37 | 1937 | 651 | 607 | 1927 | |
| 38 | 1938 | 1016 | 603 | 1960 | |
| 39 | 1939 | 367 | 599 | 1919 | |
| 40 | 1940 | 581 | 589 | 1925 | |
| 41 | 1941 | 406 | 588 | 1913 | |
| 42 | 1942 | 640 | 581 | 1940 | |
| 43 | 1943 | 869 | 578 | 1906 | |
| 44 | 1944 | 570 | 574 | 1909 | |
| 45 | 1945 | 403 | 573 | 1922 | 50 |
| 46 | 1946 | 792 | 571 | 1950 | |
| 47 | 1947 | 830 | 570 | 1944 | |
| 48 | 1948 | 830 | 556 | 1988 | |
| 49 | 1949 | 535 | 551 | 1968 | |
| 50 | 1950 | 571 | 537 | 1951 | |
| 51 | 1951 | 537 | 535 | 1949 | |
| 52 | 1952 | 343 | 535 | 1924 | |
| 53 | 1953 | 486 | 534 | 1982 | |
| 54 | 1954 | 628 | 529 | 1964 | |
| 55 | 1955 | 768 | 525 | 1961 | |
| 56 | 1956 | 1119 | 514 | 1965 | |
| 57 | 1957 | 782 | 500 | 1971 | |
| 58 | 1958 | 659 | 498 | 1984 | |
| 59 | 1959 | 645 | 497 | 1914 | |
| 60 | 1960 | 603 | 490 | 1907 | |
| 61 | 1961 | 525 | 486 | 1953 | |
| 62 | 1962 | 733 | 479 | 1926 | |
| 63 | 1963 | 407 | 477 | 1973 | |
| 64 | 1964 | 529 | 474 | 1929 | |
| 65 | 1965 | 514 | 473 | 1911 | |
| 66 | 1966 | 378 | 461 | 1923 | |
| 67 | 1967 | 609 | 457 | 1980 | |
| 68 | 1968 | 551 | 442 | 1976 | |
| 69 | 1969 | 695 | 438 | 1921 | |
| 70 | 1970 | 701 | 432 | 1908 | |

| अक्र | वर्ष | वार्षिक सरासरी पर्जन्यमान | उतरत्या क्रमाने पर्जन्यमान | संगत वर्ष | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 71 | 1971 | 500 | 419 | 1985 | |
| 72 | 1972 | 205 | 407 | 1978 | |
| 73 | 1973 | 477 | 407 | 1963 | |
| 74 | 1974 | 831 | 406 | 1941 | |
| 75 | 1975 | 767 | 403 | 1945 | |
| 76 | 1976 | 442 | 380 | 1901 | |
| 77 | 1977 | 318 | 378 | 1966 | |
| 78 | 1978 | 407 | 367 | 1939 | |
| 79 | 1979 | 673 | 360 | 1904 | |
| 80 | 1980 | 457 | 356 | 1986 | |
| 81 | 1981 | 638 | 343 | 1952 | 90 |
| 82 | 1982 | 534 | 340 | 1905 | |
| 83 | 1983 | 787 | 318 | 1977 | |
| 84 | 1984 | 498 | 315 | 1936 | |
| 85 | 1985 | 419 | 311 | 1918 | |
| 86 | 1986 | 356 | 287 | 1912 | |
| 87 | 1987 | 36 | 263 | 1920 | |
| 88 | 1988 | 556 | 205 | 1972 | |
| 89 | 1989 | 760 | 36 | 1987 | |

| | |
|---|---|
| सरासरी | 588 |
| प्रमाप विचलन | 199 |
| दोलायमानता गुणांक | 34 |

सारणी : 19.1 (चालू)
पर्जन्यमानाचा तपशील

केंद्र : सोलापूर

पर्जन्यमान-मिमी

| अक्र | वर्ष | वार्षिक सरासरी पर्जन्यमान | उतरत्या क्रमाने पर्जन्यमान | संगत वर्ष | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1901 | 608 | 1240 | 1916 | |
| 2 | 1902 | 773 | 1202 | 1956 | |
| 3 | 1903 | 1075 | 1075 | 1903 | |
| 4 | 1904 | 578 | 1060 | 1975 | |
| 5 | 1905 | 371 | 1057 | 1938 | |
| 6 | 1906 | 474 | 1033 | 1948 | |
| 7 | 1907 | 656 | 959 | 1981 | |
| 8 | 1908 | 645 | 951 | 1988 | |
| 9 | 1909 | 942 | 942 | 1909 | 10 |
| 10 | 1910 | 745 | 939 | 1964 | |
| 11 | 1911 | 504 | 921 | 1949 | |
| 12 | 1912 | 399 | 908 | 1966 | |
| 13 | 1913 | 386 | 904 | 1962 | |
| 14 | 1914 | 715 | 903 | 1973 | |
| 15 | 1915 | 702 | 903 | 1958 | |
| 16 | 1916 | 1240 | 888 | 1953 | |
| 17 | 1917 | 763 | 883 | 1983 | |
| 18 | 1918 | 388 | 873 | 1957 | 20 |
| 19 | 1919 | 769 | 834 | 1955 | |
| 20 | 1920 | 359 | 827 | 1987 | |
| 21 | 1921 | 703 | 825 | 1932 | |
| 22 | 1922 | 467 | 819 | 1978 | |
| 23 | 1923 | 531 | 818 | 1959 | |
| 24 | 1924 | 662 | 817 | 1989 | |
| 25 | 1925 | 676 | 806 | 1974 | |
| 26 | 1926 | 610 | 802 | 1963 | |
| 27 | 1927 | 645 | 785 | 1970 | 30 |
| 28 | 1928 | 782 | 782 | 1928 | |
| 29 | 1929 | 544 | 780 | 1954 | |
| 30 | 1930 | 548 | 773 | 1940 | |
| 31 | 1931 | 646 | 773 | 1902 | |
| 32 | 1932 | 825 | 769 | 1919 | |
| 33 | 1933 | 691 | 764 | 1943 | |

| अक्र | वर्ष | वार्षिक सरासरी पर्जन्यमान | उतरत्या क्रमाने पर्जन्यमान | संगत वर्ष | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 34 | 1934 | 760 | 763 | 1917 | |
| 35 | 1935 | 745 | 760 | 1934 | |
| 36 | 1936 | 524 | 748 | 1979 | |
| 37 | 1937 | 648 | 745 | 1910 | |
| 38 | 1938 | 1057 | 745 | 1935 | |
| 39 | 1939 | 344 | 743 | 1947 | |
| 40 | 1940 | 773 | 739 | 1961 | |
| 41 | 1941 | 579 | 736 | 1967 | |
| 42 | 1942 | 444 | 722 | 1946 | |
| 43 | 1943 | 764 | 715 | 1914 | |
| 44 | 1944 | 541 | 703 | 1921 | |
| 45 | 1945 | 406 | 702 | 1915 | 50 |
| 46 | 1946 | 722 | 691 | 1933 | |
| 47 | 1947 | 743 | 676 | 1925 | |
| 48 | 1948 | 1033 | 663 | 1951 | |
| 49 | 1949 | 921 | 662 | 1924 | |
| 50 | 1950 | 626 | 656 | 1907 | |
| 51 | 1951 | 663 | 648 | 1937 | |
| 52 | 1952 | 478 | 646 | 1931 | |
| 53 | 1953 | 888 | 645 | 1927 | |
| 54 | 1954 | 780 | 645 | 1908 | |
| 55 | 1955 | 834 | 644 | 1969 | |
| 56 | 1956 | 1202 | 640 | 1982 | |
| 57 | 1957 | 873 | 636 | 1984 | |
| 58 | 1958 | 903 | 629 | 1971 | |
| 59 | 1959 | 818 | 626 | 1950 | |
| 60 | 1960 | 596 | 610 | 1926 | |
| 61 | 1961 | 739 | 608 | 1901 | |
| 62 | 1962 | 904 | 596 | 1960 | |
| 63 | 1963 | 802 | 582 | 1986 | |
| 64 | 1964 | 939 | 579 | 1941 | |
| 65 | 1965 | 478 | 578 | 1904 | |
| 66 | 1966 | 908 | 548 | 1930 | |
| 67 | 1967 | 736 | 544 | 1929 | |
| 68 | 1968 | 518 | 541 | 1944 | |
| 69 | 1969 | 644 | 531 | 1923 | |
| 70 | 1970 | 785 | 524 | 1936 | |

| अक्र | वर्ष | वार्षिक सरासरी पर्जन्यमान | उतरत्या क्रमाने पर्जन्यमान | संगत वर्ष | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 71 | 1971 | 629 | 520 | 1980 | |
| 72 | 1972 | 307 | 518 | 1968 | |
| 73 | 1973 | 903 | 504 | 1911 | |
| 74 | 1974 | 806 | 478 | 1952 | |
| 75 | 1975 | 1060 | 478 | 1965 | |
| 76 | 1976 | 469 | 474 | 1906 | |
| 77 | 1977 | 423 | 469 | 1976 | |
| 78 | 1978 | 819 | 467 | 1922 | |
| 79 | 1979 | 748 | 444 | 1942 | |
| 80 | 1980 | 520 | 443 | 1985 | |
| 81 | 1981 | 959 | 423 | 1977 | 90 |
| 82 | 1982 | 640 | 406 | 1945 | |
| 83 | 1983 | 883 | 399 | 1912 | |
| 84 | 1984 | 636 | 388 | 1918 | |
| 85 | 1985 | 443 | 386 | 1913 | |
| 86 | 1986 | 582 | 371 | 1905 | |
| 87 | 1987 | 827 | 359 | 1920 | |
| 88 | 1988 | 951 | 344 | 1939 | |
| 89 | 1989 | 817 | 307 | 1972 | |

| | |
|---|---|
| सरासरी | 696 |
| प्रमाप विचलन | 198 |
| दोलायमानता गुणांक | 28 |

### सारणी : 19.2
### उपखोऱ्यातील पर्जन्यमापनाचा केंद्रनिहाय तपशील
### (अ) सीना खोरे

पर्जन्य - मिमी

| अ.क्र. | केंद्राचे नाव | प्रकार | स्वामित्व | आधार सामुग्री उपलब्धीचा कालावधी | वार्षिक सरासरी पर्जन्य |
|---|---|---|---|---|---|
| 1 | बार्शी | सा.प. | कृ.खा. | 1976 ते 95 | 589 |
| 2 | कोरेगाव | सा.प. | पा.खा. | 1976 ते 95 | 434 |
| 3 | पाथरी | सा.प. | पा.खा. | 1976 ते 95 | 452 |
| 4 | तडावळे | सा.प. | पा.खा. | 1976 ते 83 | 649 |
| 5 | करमाळा | सा.प. | कृ.खा. | 1976 ते 95 | 612 |
| 6 | कोंडज | स्व.प. | पा.खा. | 1987 ते 95 | 394 |
| 7 | रोसा | स्व.प. | पा.खा. | 1988 ते 95 | 653 |
| 8 | कोळगाव | स्व.प. | पा.खा. | 1976 ते 95 | 585 |
| 9 | कोरेगाव टँक | सा.प. | पा.खा. | 1976 ते 95 | 434 |
| 10 | मांगी टँक | सा.प. | पा.खा. | 1976 ते 95 | 549 |
| 11 | पारेवाडी | सा.प. | पा.खा. | 1976 ते 95 | 418 |
| 12 | माढा | स्व.प. | पा.खा. | 1985 ते 95 | 682 |
| 13 | मोहोळ | सा.प. | कृ.खा. | 1976 ते 95 | 581 |
| 14 | डिकसळ | स्व.प. | पा.खा. | 1985 ते 95 | 561 |
| 15 | अकोला | सा.प. | पा.खा. | 1976 ते 95 | 581 |
| 16 | बंदलगी | स्व.प. | पा.खा. | 1979 ते 95 | 647 |
| 17 | हनमगाव | सा.प. | पा.खा. | 1979 ते 95 | 412 |
| 18 | होटगी | सा.प. | पा.खा. | 1976 ते 94 | 692 |
| 19 | होनसाळ | सा.प. | पा.खा. | 1976 ते 88 | 564 |
| 20 | हिप्परगा | सा.प. | पा.खा. | 1976 ते 94 | 611 |
| 21 | सोलापूर | सा.प. | पा.खा. | 1976 ते 95 | 606 |
| 22 | अहमदनगर | सा.प. | कृ.खा. | 1978 ते 95 | 589 |
| 23 | चिचोंडी पाटील | स्व.प. | पा.खा. | 1976 ते 95 | 348 |
| 24 | सारोळा कासार | सा.प. | पा.खा. | 1976 ते 95 | 556 |
| 25 | मिरजगांव | सा.प. | कृ.खा. | 1984 ते 95 | 293 |
| 26 | बालवड | सा.प. | पा.खा. | 1985 ते 95 | 426 |
| 27 | हातवळण | सा.प. | पा.खा. | 1976 ते 95 | 464 |
| 28 | निमगाव गांगुर्डे | स्व.प. | पा.खा. | 1976 ते 95 | 556 |
| 29 | सीतापूर | सा.प. | पा.खा. | 1976 ते 95 | 565 |
| 30 | जामखेड | सा.प. | पा.खा. | 1984 ते 95 | 671 |
| 31 | खर्डा | सा.प. | पा.खा. | 1987 ते 95 | 478 |
| 32 | नान्नज | सा.प. | पा.खा. | 1985 ते 95 | 520 |
| 33 | मांडवगांव | स्व.प. | पा.खा. | 1984 ते 95 | 546 |
| 34 | कोळगाव | सा.प. | पा.खा. | 1976 ते 95 | 456 |
| 35 | आष्टी | सा.प. | पा.खा. | 1986 ते 95 | 470 |
| 36 | रुटी | सा.प. | कृ.खा. | 1976 ते 95 | 533 |
| 37 | परांडा | सा.प. | कृ.खा. | 1976 ते 95 | 652 |
| 38 | कुक्कडगांव | सा.प. | पा.खा. | 1976 ते 95 | 610 |
| 39 | चांदणी | सा.प. | पा.खा. | 1976 ते 95 | 573 |
| 40 | तुळजापूर | सा.प. | कृ.खा. | 1976 ते 95 | 810 |
| 41 | सुरतगांव | सा.प. | पा.खा. | 1976 ते 95 | 739 |
| 42 | सावरगांव | सा.प. | पा.खा. | 1976 ते 95 | 749 |
| 43 | येरमाळा | सा.प. | पा.खा. | 1976 ते 95 | 604 |
| | **(आ) बोरी-बेनेतुरा खोरे** | | | | |
| 1 | अक्कलकोट | सा.प. | कृ.खा. | 1978 ते 95 | 746 |
| 2 | दुधनी | सा.प. | पा.खा. | 1986 ते 94 | 452 |
| 3 | कासेगाव | सा.प. | पा.खा. | 1985 ते 95 | 609 |
| 4 | वडगाव लाख | सा.प. | पा.खा. | 1976 ते 75 | 405 |

सारणी : 19.3

**जलसंपत्तीची उपलब्धता**

येवा-दलघमी

| अक्र | वर्ष | वार्षिक सरासरी येवा | उतरत्या क्रमाने येवा | संगत वर्ष | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1979- 80 | 2011 | 4150 | 1988- 89 | 10 |
| 2 | 1980- 81 | 1453 | 4068 | 1983- 84 | |
| 3 | 1981- 82 | 1385 | 3387 | 1989- 90 | 20 |
| 4 | 1982- 83 | 421 | 3026 | 1990- 91 | 30 |
| 5 | 1983- 84 | 4068 | 2011 | 1979- 80 | |
| 6 | 1984- 85 | 841 | 1453 | 1980- 81 | |
| 7 | 1985- 86 | 392 | 1385 | 1981- 82 | 50 |
| 8 | 1986- 87 | 382 | 905 | 1987- 88 | |
| 9 | 1987- 88 | 905 | 882 | 1993- 94 | |
| 10 | 1988- 89 | 4150 | 841 | 1984- 85 | |
| 11 | 1989- 90 | 3387 | 759 | 1991- 92 | 75 |
| 12 | 1990- 91 | 3026 | 421 | 1982- 83 | |
| 13 | 1991- 92 | 759 | 392 | 1985- 86 | 90 |
| 14 | 1992- 93 | 183 | 382 | 1986- 87 | |
| 15 | 1993- 94 | 882 | 183 | 1992- 93 | |
| | सरासरी | 1616 | | | |

$$\frac{\text{10 टक्के उपलब्धता}}{\text{90 टक्के उपलब्धता}} = 10.59 \qquad \frac{\text{50 टक्के उपलब्धता}}{\text{90 टक्के उपलब्धता}} = 3.53$$

$$\frac{\text{50 टक्के उपलब्धता}}{\text{75 टक्के उपलब्धता}} = 1.82$$

नदी प्रवाहाची अत्यंतिक दोलायमानता हे या उपखोऱ्याचे काळजी निर्माण करणारे वैशिष्ट्य आहे. यांत 1956, 1972-73-74 अशी तुटीची वर्षे आलेली नाहीत. त्यांचा हिशोब केला तर ही दोलायमानता अधिकच चिंताजनक आहे.

सारणी 19.4

**अवर्षण प्रवण तालूक्यांचा तपशील**

पर्जन्य-मिमी, क्षेत्रफळ-चौकिमी, लोकसंख्या-हजारात

| अक्र | जिल्हा | तालुका | सरासरी वार्षिक पर्जन्यमान | अवर्षण प्रवण भागाचे क्षेत्रफळ | अवर्षण प्रवण भागाची लोकसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| **सीमा घटक क्षेत्र** | | | | | |
| 1 | अहमदनगर | अहमदनगर | 498 | 1280 | 415 |
| 2 | | पारनेर | 491 | 36 | 11 |
| 3 | | जामखेड | 556 | 790 | 101 |
| 4 | बीड | आष्टी | 501 | 1471 | 184 |
| 5 | | पाटोदा | 651 | 142 | 14 |
| 6 | उस्मानाबाद | उस्मानाबाद | 734 | 275 | 48 |
| 7 | | परांडा | 612 | 1055 | 140 |
| 8 | | भूम | 415 | 455 | 83 |
| 9 | | तुळजापूर | 766 | 554 | 72 |
| 10 | सोलापूर | उ.सोलापूर | 593 | 683 | 784 |
| 11 | | द.सोलापूर | 640 | 637 | 168 |
| 12 | | बार्शी | 531 | 1428 | 302 |
| 13 | | करमाळा | 521 | 690 | 80 |
| 14 | | माढा | 688 | 722 | 142 |
| 15 | | मोहोळ | 518 | 802 | 122 |
| 16 | | अक्कलकोट | 747 | 81 | 13 |
| **बोरी बेनेतूरा घटक क्षेत्र** | | | | | |
| 17 | उस्मानाबाद | तुळजापूर | 766 | 970 | 147 |
| 18 | सोलापूर | द.सोलापूर | 609 | 293 | 49 |
| 19 | | अक्कलकोट | 599 | 1320 | 250 |

टिप:संपूर्ण उपखोरेच सलगपणे अवर्षणप्रवण व पाण्याच्या तूटीचे आहे. म्हणून त्याचे नियोजन अगदी वेगळ्या पध्दतीने व्हायला हवे आहे.

सारणी : 19.5

**प्रकल्पांची सद्य:स्थिती**

चलपाणीसाठा - दलघमी
पाणीवापर - दलघमी
सिंचनक्षेत्र - हेक्टर

| अक्र | प्रकल्पाचा संवर्ग | पुर्ण झालेले प्रकल्प | | | | प्रगतीपथावरील प्रकल्प | | | | भविष्यकालीन प्रकल्प | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नाव संख्या | चलपाणी साठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | संख्या | चलपाणी साठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | संख्या | चलपाणी साठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | संख्या | चलपाणी साठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 1 | मोठे प्रकल्प (अ) सीना खोरे | | | | | संक्रमित पाणी | | 300 | 74700 | | | | | | 0 | 300 | 74700 |
| | आ) बोरी - बेनेतुरा खोरे | | | | | | | | | | | | | 0 | 0 | 0 | 0 |
| 2 | मध्यम प्रकल्प | हिंगणी पानगांव | 32 | 45.31 | 5625 | सीना कोळेगांव | 66.83 | 105.05 | 10200 | खैरी | 10 | | | | 109 | 150 | 15825 |
| | अ) सीना खोरे | सीना निमगाव | 37.38 | 67.96 | 6270 | हिंगणी हातिज | 24.07 | 34.55 | 4450 | | | | | | 61 | 103 | 10720 |
| | | मांगी | 32.85 | 32.56 | 3120 | बाभुळगाव | 5.66 | 8.49 | 1280 | | | | | | 39 | 41 | 4400 |
| | | एकरूख | 36.25 | 36.25 | 6860 | पिंपळगाव | 9.91 | 14.72 | 2400 | | | | | | 46 | 51 | 9260 |
| | | कडा | 8.49 | 3.96 | 1215 | खैरी | 10.48 | 15.29 | 2318 | | | | | | 19 | 19 | 3533 |
| | | कडी | 6.51 | 6.51 | 1280 | साकत | 13.03 | 15.01 | 3270 | | | | | | 20 | 22 | 4550 |
| | | कांबळी | 3.11 | 3.11 | 970 | | | | | | | | | | 3 | 3 | 970 |
| | | मेहेकरी | 13.03 | 9.06 | 4050 | | | | | | | | | | 13 | 9 | 4050 |
| | | रुटी | 6.51 | 5.95 | 1660 | | | | | | | | | | 7 | 6 | 1660 |
| | | तलवार | 3.11 | 3.4 | 790 | | | | | | | | | | 3 | 3 | 790 |
| | | वाणगंगा | 5.1 | 5.1 | 650 | | | | | | | | | | 5 | 5 | 650 |
| | | रामगंगा | 5.1 | 5.1 | 770 | | | | | | | | | | 5 | 5 | 770 |
| | | खासापूर | 8.49 | 8.49 | 2145 | | | | | | | | | | 8 | 8 | 2145 |
| | | चांदणी | 15.29 | 15.29 | 2020 | | | | | | | | | | 15 | 15 | 2020 |
| | | खांडेश्वर | 7.65 | 7.65 | 1280 | | | | | | | | | | 8 | 8 | 1280 |
| | एकूण मध्यम (अ) | 15 | 220.87 | 255.7 | 38705 | 6 | 129.98 | 493.11 | 98618 | 0 | 10 | 0 | 0 | 21 | 361 | 749 | 137323 |
| | आ) बोरी - बेनेतुरा खोरे | कुरनूर | 32.65 | 39.93 | 3640 | धुबधुबी | 7.36 | 7.36 | 1650 | | | | | | 40 | 47 | 5290 |
| | | खंडाळा | 5.38 | 4.81 | 830 | बेणीतुरा | 14.72 | 14.72 | 2510 | | | | | | 20 | 20 | 3340 |
| | | हरणी | 11.33 | 5.1 | 1660 | | | | | | | | | | 11 | 5 | 1660 |

चलपाणी साठा - दलघमी
पाणी वापर - दलघमी
सिंचनक्षेत्र - हेक्टर

| अक्र | प्रकल्पाचा संवर्ग | पुर्ण झालेले प्रकल्प | | | | प्रगतीपथावरील प्रकल्प | | | | भविष्यकालीन प्रकल्प | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नाव संख्या | चलपाणी साठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | संख्या | चलपाणी साठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | संख्या | चलपाणी साठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | संख्या | चलपाणी साठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| | | जाकापूर | 8.21 | 5.95 | 1570 | | | | | | | | | | 8 | 6 | 1570 |
| | | तुरोरी | 4.81 | 6.51 | 890 | | | | | | | | | | 5 | 7 | 890 |
| | एकूण मध्यम (आ) | 5 | 62.38 | 62.3 | 8590 | 2 | 22.08 | 22.08 | 4160 | 0 | 0 | 0 | 0 | 7 | 84 | 84 | 12750 |
| 3 | बृहत लघु(अ) सीना खोरे | 66 | 119.64 | 118.93 | 30497 | 23 | 54.64 | 53.46 | 12880 | 4 | 9 | 8 | 1092 | 93 | 183 | 180 | 44469 |
| | आ) बोरी - बेनेतुरा खोरे | 10 | 18.13 | 18.02 | 4620 | 24 | 57.01 | 55.8 | 13440 | 14 | 31 | 27 | 3819 | 48 | 106 | 101 | 21879 |
| | | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 3 | 2 | 2 | 533 | 3 | 2 | 2 | 533 |
| 4 | लघु प्रकल्प (अ) सीना खोरे | 0 | 0 | 0 | 0 | 5 | 4.46 | 4.46 | 818 | 5 | 3 | 5 | 475 | 10 | 8 | 9 | 1293 |
| | आ) बोरी - बेनेतुरा खोरे | 0 | 0 | 0 | 0 | 5 | 4.46 | 4.46 | 818 | 140 | 90 | 136 | 13310 | 145 | 94 | 140 | 14128 |
| 5 | को.प.बंधारे (अ) सीना खोरे | 44 | 79.76 | 78.28 | 20331 | 20 | 40.1 | 39.31 | 9219 | 10 | 14 | 15 | 1839 | 74 | 134 | 133 | 31389 |
| | आ) बोरी - बेनेतुरा खोरे | 12 | 21.75 | 21.63 | 5546 | 20 | 40.1 | 39.31 | 9219 | 14 | 15 | 18 | 2042 | 46 | 77 | 78 | 16807 |
| | | 132 | 239.28 | 237.86 | 60994 | 97 | 200.77 | 196.8 | 46394 | 190 | 165 | 210 | 23110 | 419 | 605 | 645 | 130498 |
| | एकूण | 152 | 522.53 | 555.86 | 108289 | 105 | 352.83 | 711.99 | 149172 | 190 | 176 | 210 | 23110 | 447 | 1051 | 1478 | 260571 |

सारणी :19.6

**जलसंपत्तीचा ताळेबंद**

**घटक क्षेत्र सीना**

जलसंपत्ती - दलघमी

| अक्र | उपलब्धता | | अक्र | वापर (सन2030) | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **भूपृष्ठावरील** | | 4 | **भूपृष्ठावरील** | |
| | अ) नैसर्गिक | | | अ) घरगूती वापरासाठी | |
| | 1) 75 टक्के विश्वासार्हतेने | 478 | | 1) नागरी | 159 |
| | 2) 50 टक्के विश्वासार्हतेने | 722 | | 2) ग्रामीण | 79 |
| | 3) सरासरी | 1110 | | 3) पशूधन | 38 |
| | 4) नियोजनासाठी | 910 | | एकूण | 276 |
| | ब) मानवप्रबंधित | | | ब) उद्योगधदयासाठी | 4 |
| | 1) नागरी वापरातून पुनरुद्भव (80 %) | 127 | | एकूण सिंचनेतर वापर | **280** |
| | 2) उद्योग धंदयातील पुनरुद्भव (97.5%) | 25 | 5 | इतर उपखोऱ्यात स्थलांतरीत पाणी 5 आ इतर उपखोऱ्यातून स्थलांतरीत पाणी | 91 |
| | 3) इतर खोऱ्यातून संक्रमित झालेले पाणी | 523 | 6 | सिंचनासाठी उपलब्ध भूपृष्ठावरील पाणी (910+675-280-91)+121<br>1214+104 | 1335 |
| | **एकूण (1 ब)** | **675** | | | |
| 2 | मानवनिर्मित<br>लाभक्षेत्रातील पुनर्भरण 910+675-280-91 च्या10 % | 121 | | | |
| 3 | **एकूण उपलब्धता 910+675+121** | **1706** | 7 | एकूण वापर | **1706** |
| | 1) भूजल उपलब्धता (वार्षिक एकूण पुनर्भरण ) | 1133 | | अ) भूजलाचा सध्याचा सिंचनासाठी वापर | |
| | 2) भूजल वापरास मुभा ( 1133 च्या 65 %) | 736 | | | |

टीपा : 1) भूजल उपलब्धतेमूळे उपखोऱ्याच्या एकूण उपलब्धतेत वाढ होणार नाही ; भूजलाचा जेवढा उपसा होईल तेवढा नदी प्रवाह घटत जाईल म्हणून एकूण उपलब्धतेचा आकडा काढतांना भूजल उपलब्धतेचा विचार घेतलेला नाही.

2) संकलीत अंदाजासाठी सर्व पाण्याचा उपयोग भूपृष्ठावरील पाण्यातून दाखविला आहे. पण एकूण वापरापैकी अधिकाधिक 121+736= 857 भूजल माध्यमातून शक्य आहे.

3) पाणी वापराचे नियोजन उपलब्ध येवा मालिकेवर आधारित आहे.

## सारणी :19.6 (चालू)
## जलसंपत्तीचा ताळेबंद
## बोरी बेनेतूरा घटक क्षेत्र


जलसंपत्ती - दलघमी

| अक्र | उपलब्धता | | अक्र | वापर (सन2030) | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | भूपृष्ठावरील | | 4 | भूपृष्ठावरील | |
| | अ) नैसर्गिक | | | अ) घरगुती वापरासाठी | |
| | 1) 75 टक्के विश्वासार्हतेने | 196 | | 1) नागरी | 11 |
| | 2) 50 टक्के विश्वासार्हतेने | 417 | | 2) ग्रामीण | 22 |
| | 3) सरासरीने | 506 | | 3) पशूधन | 11 |
| | 4) नियोजनासाठी | 193 | | एकूण – | 44 |
| | ब) मानवप्रबंधित | | | ब) उद्योगधंदयासाठी | 4 |
| | 1) नागरी वापरातून पुनरुद्भव (80 %) | 9 | | एकूण सिंचनतर वापर - | 48 |
| | 2) उद्योग धंदयातील पुनरुद्भव (97.5%) | 4 | 5 | इतर उपखोऱ्यातून स्थलांतरीत पाणी | |
| | 3) इतर खोऱ्यातून संक्रमित झालेले पाणी | 91 | 6 | सिंचनासाठी उपलब्ध भूपृष्ठावरील पाणी | |
| | एकूण (1 ब) | 104 | | (193+104-48)+25 | 274 |
| 2 | मानवनिर्मित | | | | |
| | लाभक्षेत्रातील पुनर्भरण (193+104-48) च्या10 % | 25 | | | |
| 3 | एकूण उपलब्धता (193+104+25) | 322 | 7 | एकूण वापर | 322 |
| | 1) भूजल उपलब्धता (वार्षिक एकूण पुनर्भरण ) | 376 | | अ) भूजलाचा सध्याचा सिंचनासाठी वापर | |
| | 2) भूजल वापरास मुभा ( 376 च्या 65 %) | 244 | | | |

टीपा : 1) भूजल उपलब्धतेमूळे उपखोऱ्याच्या एकूण उपलब्धतेत वाढ होणार नाही ; भूजलाचा जेवढा उपसा होईल तेवढा नदी प्रवाह घटत जाईल म्हणून एकूण उपलब्धतेचा आकडा काढतांना भूजल उपलब्धतेचा विचार घेतलेला नाही.

2) संकलीत अंदाजासाठी सर्व पाण्याचा उपयोग भूपृष्ठावरील पाण्यातून दाखविला आहे. पण एकूण वापरापैकी अधिकाधिक 25+244= 269 भूजल माध्यमातून शक्य आहे.

3) पाणी वापराचे नियोजन उपलब्ध येवा मालिकेवर आधारित आहे.


नकाशा - 19.1
15 Km 0 15 30 Km
महाराष्ट्र राज्य
19 सीना-बोरी-बेनेतुरा
• संदर्भ सूची •
1. राज्य सरहद्द
2. जिल्हा सरहद्द
3. तालुका सरहद्द
4. उपखोरे सरहद्द
5. घटक क्षेत्र हद्द
6. जिल्हा मुख्यालय
7. तालुका मुख्यालय
8. रेल्वे मार्ग
9. रस्ते
10. नद्या व नाले
11. समपर्जन्यमान रेषा (मिमी) 1400
12. धरणाचे ठिकाण व बुडीत क्षेत्र
पूर्ण
बांधकामाधीन
भविष्यकालिन
13. औद्योगिक क्षेत्र
14. महानगरपालिका
15. नगर पालिका
16. आंतरखोरे पाणी स्थलांतराच्या योजना
- कार्यरत
- बांधकामाधीन
महाराष्ट्र जल व सिंचन आयोग
सीना-बोरी-बेनेतुरा उपखोरे समूह
अ) सीना घटक
आ) बोरी - बेनेतुरा घटक
जून 1999
उपखोऱ्याचे स्थान
उपखोरे क्र.
उपखोऱ्यांची नावे
1 ऊर्ध्व गोदावरी (पैठण धरणा पर्यंत)
2 गोदावरी निम्नस्रोत (पैठण धरणाखाली)
4 मांजरा
17 ऊर्ध्व भीमा (उजनी पर्यंत)
18 उर्वरीत भीमा
कर्नाटक
ऊर्ध्व गोदावरी (पैठण धरणा पर्यंत) उपखोरे
गोदावरी निम्न स्रोत उपखोरे
अहमदनगर जिल्हा
मांजरा उपखोरे
भीमा (उजनीपर्यंत) उपखोरे
उर्वरीत भीमा उपखोरे
कर्नाटक
कुकडी - सीना शृंखला
कुकडी - सीना - मेहकरी जोड कालवा
सीना - माढा उपसा सिंचन योजना
भीमा - सीना जोड कालवा
आष्टी उपसा सिंचन योजना
सीना माढा उपसा
वार्शी उपसा सिंचन योजना
शिरापूर उपसा सिंचन योजना
एकरूख उपसा सिंचन योजना (हरणी)
मनमाड कडे
बीड कडे
पुण्या कडे
दौंड कडे
जेजूर कडे
अहमदनगर कडे
पंढरपूर कडे
लातूर कडे
हैद्राबाद कडे
गुलबर्गा कडे
अहमदनगर
आष्टी
जामखेड
कर्जत
करमाळा
परंडा
बार्शी
भूम
कुर्डुवाडी
माढा
मोहोळ
सोलापूर
उस्मानाबाद
तुळजापूर
नळदुर्ग
उमरगा
अक्कलकोट
मैंदर्गी
दुधनी
सीना निमगांव
सीनाकोळेगांव
हिंगणी पानगाव
हिंगणी हातीज
खासापूर
पिंपळगाव
बाभुळगाव
रामगंगा
चिंचोली
एकरूख
हरणी
कुरनूर
खंडाळा
बोरी
धुबधुबी
जकापूर
तुरोरी
बेनेतुरा
मुरूम
तलवार
कांबळी
कडा
कडी
19 अ
19 आ
सीना नदी
बोरी नदी
भीमा नदी
600
700
800
1400

# उपखोरे :20

# दमणगंगा – पार

## 1.0 भौगोलिक तपशील

1.1 महाराष्ट्राच्या उत्तरेस सहयाद्रीतून पश्चिमेकडे वहाणाऱ्या दमणगंगा व तिच्या उपनद्यांचा हा पट्टा एक स्वतंत्र नियोजनाचा घटक आहे. कारण दमणगंगा ही महाराष्ट्र/गुजरातच्या सीमेवरील नदी असल्यामुळे या क्षेत्राच्या नियोजनाशी नद्यांच्या आंतरराज्यीय पाणी वापराचे पैलू निर्गमित आहेत. या उपखोऱ्याची दमणगंगा ही मुख्य नदी आहे.ही नदी नाशिक जिल्हयातील पेठ तालुक्यातील मागूनपाडा येथून उगम पावते व दमण गावानजिक अरबी समुद्रास मिळते. तसेच नार, पार या नद्यांचा देखील दमणगंगेच्या उपखोऱ्यात (नकाशा 20.1) समावेश आहे, पण त्या दमणगंगेला महाराष्ट्राच्या क्षेत्रात न मिळता महाराष्ट्रातून बाहेर पडल्यावर मिळतात. या उपखोऱ्याचे महाराष्ट्रातील एकूण क्षेत्रफळ 2508 चौकिमी आहे. यापैकी नाशिक जिल्हयाचे क्षेत्र 1944 चौकिमी आहे तर उर्वरित 564 चौकिमी क्षेत्र ठाणे जिल्हयातील आहे. हे सर्व क्षेत्र आदिवासी असल्यामुळे त्या संदर्भातही त्याचे नियोजन वेगळ्या निकषांवर व्हायला हवे आहे. सध्या हे पूर्णतः ग्रामीण उपखोरे आहे. यांत एकही शहर नाही. या उपखोऱ्यात ठाणे व नाशिक जिल्हयातील खालील तालुक्यांचे क्षेत्र येते.

**ठाणे :** 1) जव्हार 2) मोखाडा 3) तलासरी 4) डहाणू

**नाशिक :** 1) पेठ 2) सुरगाणा 3) दिंडोरी 4) नाशिक

मुख्य नदी, तिच्या उपनद्या इत्यादी बाबतची माहिती खालील प्रमाणे आहे.

लांबी-किमी,तलांक - मी

| अक्र | नदी | उपनदी | लांबी | उगमस्थान | | संगमस्थान | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ठिकाण | तलांक | ठिकाण | तलांक |
| 1 | दमणगंगा | | 90 | मागूनपाडा | 962 | म्हाळुंगी | 29 |
| 2 | | श्रीमंत | 8 | महाजे | 941 | बोरवट | 911 |
| 3 | | मदिदेघी | 20 | डोंगरपाडा | 1099 | खारशेत | 554 |
| 4 | | रोशनी | 22 | बांलर | 1251 | खारशेत | 554 |
| 5 | | रायते | 12.5 | टन्ने | 804 | थोरली धानोरी | 532 |
| 6 | | वाल | 58 | उटवाडा | 133 | म्हाळुंगी | 29 |
| 7 | | वाघ | 35 | सातूर्ली | 143 | वांगणी | 115 |
| 8 | | लेंडी | 21 | मेंडा | 474 | वांगणी | 115 |
| 9 | | धामणी | 20 | उंमरडा | 444 | चास | 143 |
| 10 | | डोमीहीरा | 12.5 | वनवासी पाडा | 172 | वंगण | 125 |
| 11 | | पार | 49 | केमडोंगर | 420 | बेहेडपाडा | 89 |
| 12 | | नार | 42.5 | केमडोंगर | 420 | धामणी | 112 |

1.1 विस्तार : या उपखोऱ्याचा क्षेत्रीय विस्तार अक्षांश 19°52' ते 20°42' उत्तर व रेखांश 72° 53' ते 73° 46' पूर्व यामध्ये आहे.

1.2 चतु:सीमा : उपखोऱ्याच्या चतु:सीमा पुढील प्रमाणे आहेत.

| अक्र | दिशा | तपशील |
|---|---|---|
| 1 | उत्तर | गुजरात |
| २ | पूर्व | सहयाद्रीच्या रांगा, ऊर्ध्व गोदावरी उपखोरे क्र 1 |
| 3 | पश्चिम | अरबी समुद्र |
| 4 | दक्षिण | उत्तर कोकण उपखोरे |

## 2.0 हवामान

या उपखोऱ्यातील क्षेत्र जास्त पावसाच्या प्रदेशात येते. येथील हवामान दमट आहे. या क्षेत्रात साधारणतः 97 टक्के पाऊस नैऋत्य मोसमी वाऱ्यामुळे जून ते सप्टेंबर दरम्यान तर 3 टक्के पाऊस ईशान्य वाऱ्यामुळे सप्टेंबर नंतर पडतो.उपखोऱ्याचे एकत्रिक वार्षिक सरासरी पर्जन्यमान 2198 मिमी आहे. या उपखोऱ्यातील हवामान विषयक इतर माहिती व पर्जन्यमानातील दोलायमानता इत्यादी खालील प्रमाणे आहे.

पर्जन्यमान-मिमी,तपमान - अंश सें

| अक्र | वैशिष्टये | परिमाण | वर्ष महिना | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1 | सर्वात अधिक पाऊस | 5213 | 1994 | जामसर |
| 2 | सर्वात अधिक तपमान | 44 | एप्रिल 1993 | सुकसाळे |
| 3 | सर्वात कमी तपमान | 7 | जानेवारी 1994 | सुकसाळे |

टीप : उपखोऱ्याच्या जवळच्याच सुकसाळे केंद्राची माहिती वर दिली आहे.

कृषी हवामान वर्गीकरणानुसार या खोरे समूहाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

2-अतिपावसाचा जांभ्या खडकाचा जमिनी नसलेला विभाग (VRN), 3-घाट विभाग (GH) ,4-संक्रमण विभाग-1लाल ते लालसर तपकिरी रंगाच्या जमिनीचा विभाग (TR.-1)5संक्रमण विभाग-2 करडया रंगाच्या जमिनीचा विभाग (TR-2).

पर्जन्यमानातील दोलायमानता गुणांक 30 (तक्ता 2.5.8) आहे.पर्जन्यमानाचा माहवार तपशील सारणी 20.1 मध्ये दिला आहे.पर्जन्यमापन केंद्रांचा तपशील सारणी 20.2 मध्ये दिला आहे.

2.1 बाष्पीभवन : या उपखोऱ्यातील सर्वाधिक बाष्पीभवन मे महिन्यात सरासरी 259 मिमी तर सर्वात कमी बाष्पीभवन जुलै महिन्यात 48 मिमी होते. केंद्रनिहाय व माहवार बाष्पीभवन सारणी 20.1 मध्ये दर्शविले आहे.

## 3.0 जलसंपत्तीची उपलब्धता

3.1 भूपृष्ठीय जलसंपत्ती : या उपखोऱ्यातील सरासरी येवा 4426 दलघमी आहे. 1966 ते 1995 या 30 वर्षांच्या माहितीवर आधारभूत या खोऱ्यातील पाण्याची उपलब्धता पुढीलप्रमाणे आहे:

75 टक्के विश्वासार्हतेने 3786 दलघमी

50 टक्के विश्वासार्हतेने 4424 दलघमी.

येवा मोजण्याची व्यवस्था या उपखोऱ्यात नव्यानेच वसली आहे. त्यामुळे फार मोठया सलग वर्षांची माहिती उपलब्ध नाही. सध्याची ठिकाणे खालील प्रमाणे आहेत. या मोजणीत अवर्षणाची वर्षे आलेली नाहीत त्यामुळे सरासरी उपलब्धी वास्तवात बरीच कमी राहणार आहे.

येवा - दलघमी

| अक्र | सरिता मापन केंद्राचे नाव | स्वामित्व | आधार सामुग्री कालावधी | वार्षिक सरासरी येवा |
|---|---|---|---|---|
| 1. | खडखड | पाटबंधारे खाते | 1987 ते 1994 | 36 |
| 2. | खडाडी | पाटबंधारे खाते | 1987 ते 1994 | 88 |
| 3. | चिचुतारा | पाटबंधारे खाते | 1987 ते 1994 | 517 |
| 4. | गोंदे खुर्द | पाटबंधारे खाते | 1987 ते 1994 | 88 |
| 5. | शिंद्याचा पाडा | पाटबंधारे खाते | 1987 ते 1994 | 150 |
| 6. | उस्थाळे | पाटबंधारे खाते | 1987 ते 1990 | |
| | | | 1992 ते 1993 | 191 |
| | | | 1996 ते 1997 | |
| 7. | डिकसाळ | पाटबंधारे खाते | 1992 ते 1993 | 225 |

वेगवेगळया विश्वासार्हतेच्या येव्या बाबतची काही मर्यादित माहिती सारणी 20.3 मध्ये दिली आहे.

3.2 भूशैलीय रचना :

<u>भूपृष्ठीय स्थिती (भरूप वर्णन)</u> : उपखोऱ्यातील सर्वाधिक भूभाग 93 टक्के अतिविच्छेदीत व डोंगराळ आणि उर्वरीत केवळ 7 टक्के पठारी स्वरुपाचा आहे. यात भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा निर्देशित 11 पाणलोट क्षेत्रांचा अंतर्भाव आहे. त्याप्रमाणे मूलतः या प्रदेशाचा विचार वृक्षवाढीसाठीच करावयाचा आहे.

<u>भूपृष्ठीय शैल स्थिती :</u> उपखोऱ्यात मुख्यत्वे लाव्हा थरांपासून तयार झालेला बहुस्तरीय दक्षिणी कातळाचा खडक (डेक्कन ट्रॅप प्रस्तर) आढळतो. त्यात भरित-कुहरी बेसाल्टचे प्रमाण अधिक आहे. या प्रस्तरात शैलभित्तीचे (Dykes) प्रमाण सुध्दा खूप जास्त आहे. त्यांची सर्वसाधारण दिशा उत्तर-दक्षिण आहे.

3.3 <u>भूजल संपत्ती :</u> जास्त पर्जन्यमान असूनही भूपृष्ठीय स्थिती व भूस्तर अनुकूल नसल्यामुळे भूजल संपत्ती खूपच मर्यादित आहे. अतिविच्छेदीत व डोंगराळ भागात त्याच प्रमाणे पठारी भागातही विघटीत प्रस्तराची जोडी कमी आहे. त्याच बरोबर उतार जास्त असल्यामुळे त्यात साठलेले पाणी झऱ्यावाटे निघून जाते. परिणामी भूजलधारक प्रस्तर जलद रिकामा होवून पाण्याची टंचाई कायम जाणवते. यामुळे भूजलावरील सिंचन विकासास मर्यादा आहेत.

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या 1990 च्या भूजल अंदाजानुसार 115 दलघमी एकूण पुनर्भरण असून सिंचनासाठीच्या फक्त 554 विहिरी आहेत.उपखोऱ्यात झरे मोठया प्रमाणावर असून त्याद्वारे उपलब्ध होणाऱ्या पाण्याचा पिण्यासाठी उपयोग करणे शक्य आहे.

3.4 <u>अवर्षणप्रवण क्षेत्र</u> : या खोऱ्याचे क्षेत्र 8 तालूक्यात पसरले आहे त्यापैकी 4 तालुके सुकथनकर समितीच्या अहवालानंतर शासनाने अवर्षणप्रवण घोषित केलेले आहेत. या तालुक्यांचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

पर्जन्यमान - मिमी, लोकसंख्या-हजारात, क्षेत्रफळ - चौकिमी

| अक्र | जिल्हा | तालुका | क्षेत्रफळ | लोकसंख्या | सरासरी वार्षिक पर्जन्यमान |
|---|---|---|---|---|---|
| 1 | नाशिक | नाशिक | | 23 | 593 |
| 2 | | पेठ | | 128 | 2293 |
| 3 | | सुरगाणा | | 93 | 1896 |
| 4 | | दिंडोरी | | 20 | 797 |

**4.0 जमिनीचा तपशील**

या उपखोऱ्यातील जमीन जाम्या दगडापासून बनलेली आहे. जमिनीचे वर्गीकरण खालील प्रमाणे आहे.

| अक्र | तपशील | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | तांबूस तपकिरी डोंगर उतारावरील जमीन | 29 |
| 2 | भरड उथळ जमीन | 71 |

**5.0 जमिनीचा वापर**

लागवडीयोग्य क्षेत्र, वन खात्याच्या ताब्यातील क्षेत्र, पडीतक्षेत्र इत्यादी खालील प्रमाणे आहे.

क्षेत्र - हजार हेक्टर

| अक्र | तपशील | क्षेत्र | भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | भौगोलिक क्षेत्र | 251 | |
| 2 | वन खात्याच्या ताब्यातील क्षेत्र | 64 | 25.5 |
| 3 | पेरणीसाठी उपलब्ध नसलेले क्षेत्र | | |
| | अ) ओसाड जमीन | 27 | |
| | ब) बिगरशेती उपयोगाकरीता आणलेली जमीन | 8 | |
| 4 | मशागतयोग्य पडीक जमीन | 5 | 2 |
| 5 | कायमची व चराऊ कुरणे | 7 | 2.8 |
| 6 | किरकोळ झाडेझुडपे यांच्या समुहाखालील क्षेत्र | 0 | |
| 7 | चालू पडीक जमीन | 8 | 3.2 |
| 8 | इतर पडीक जमीन | 5 | 2 |
| 9 | पेरणीचे निव्वळ क्षेत्र | 127 | 50.6 |

क्षेत्र - हजार हेक्टर

| अक्र | तपशील | क्षेत्र | भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी |
|---|---|---|---|
| 10 | लागवडीयोग्य क्षेत्र(4+5+6+7+8+9 ) | 152 | 61 |
| 11 | दुसोटा क्षेत्र | 11 | |
| 12 | पिकाखालील एकूण क्षेत्र(9+11) | 138 | |
| 13 | पीक घनता टक्केवारी(12÷9X100) | 109 | |

**6.0 लोकसंख्या व पशुधन**

6.1 लोकसंख्या : सन 1991 च्या जनगणनेनूसार या उपखोऱ्यातील एकूण लोकसंख्या 4 लक्ष 14 हजार आहे. उपखोऱ्यात सन 2030 पर्यंत होणारी लोकसंख्येतील वाढ व लोकसंख्या घनता पुढील प्रमाणे अपेक्षित आहे.

लोकसंख्या-हजारात,घनता-प्रति चौकिमी

| अक्र | लोकसंख्या तपशील | 1991 | 2030 |
|---|---|---|---|
| 1 | शहरी | - | - |
| 2 | ग्रामीण | 414 | 828 |
| 3 | एकूण | 414 | 828 |
| 4 | लोकसंख्या घनता | 165 | 330 |

6.2 पशुधन : सन 1992 च्या मोजणीनुसार या उपखोऱ्यात एकूण पशुधन 345028 आहे,वर्गनिहाय पशुंची संख्या खालील प्रमाणे आहे.

| म्हैस व रेडे | गाय व बैल | एकखूरी व उंट | शेळी व मेंढी | डुकरे | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| 40034 | 168386 | 780 | 132241 | 3587 | 345028 |

6.3 इतर तपशील : या उपखोऱ्यात नागरी वसाहती नाहीत. या क्षेत्रातील कृषी मजूरांची संख्या 90129 तर इतर मजूर 81012 आहेत.

**7.0 पाणीवापर**

7.1 सिंचनासाठी पाणीवापर: उपखोऱ्यातील वर्गनिहाय प्रकल्प म्हणजे मोठे, मध्यम, बृहतलघु, लघु, स्थानिक स्थर यांची संख्या, चलपाणीसाठा, पाणीवापर, सिंचन क्षेत्र यांची तसेच पूर्ण झालेले, प्रगतीपथावरील व भविष्यकालीन प्रकल्प यांचा तपशील सारणी 20.4 मध्ये दर्शविला आहे.पूर्ण झालेल्या प्रकल्पांची सिंचनक्षमता 3186 हेक्टर असून त्यातील प्रस्तावित पाणीवापर 42 दलघमी आहे. सिंचनासाठी आणखी 25627 हेक्टर क्षेत्र उपलब्ध होऊ शकते; पण सध्याच्या पाणीवापर पध्दतीप्रमाणे त्यासाठी आणखी 1388 दलघमी पाणी लागेल.

7.2 सिंचनेतर पाण्याचा वापर: सिंचनेतर विविध प्रयोजनासाठी या उपखोऱ्यातील सध्याची गरज 15 दलघमी आहे. सन 2030 पर्यन्त ती 26 दलघमी होईल. या गरजांचा तपशील पुढील प्रमाणे असेल.

पाणी-दलघमी

| तपशील | 1991 | | | | 2030 |
|---|---|---|---|---|---|
| | नागरी | ग्रामीण | पशुधन | एकूण | |
| घरगुती वापरासाठी | | 8 | 7 | 15 | 26 |
| उद्योगासाठी | | | | -- | -- |
| एकूण : | | | | 15 | 26 |

7.3 <u>जलसंपत्तीचा ताळेबंद</u> :भूपृष्ठावरील व भूपृष्ठाखालील,आणि घरगुती,उद्योगासाठी व सिंचनासाठी वापर व त्यातून होणारा पूनरूद्‌भव याचा ताळेबंद सारणी 20.5 मध्ये दिलेला आहे.

7.4 <u>लाभक्षेत्र विकास</u> : उपखोऱ्यात लाभक्षेत्र विकासाची व्यवस्था झालेली दिसत नाही. जमीन सपाटीकरणाचे काम फक्त 2590 हेक्टर क्षेत्रावरच झाले आहे.

7.5 <u>सन 1970 पूर्वीची धरणे</u> : सन 1970 पूर्वी एकही प्रकल्प बांधण्यात आला नाही.

**8.0 पीक रचना**

उपखोऱ्यातील पेरणीखालचे क्षेत्र 127 हजार हेक्टर आहे यात प्रामुख्याने खरीप पीक क्षेत्र आहे. उपखोऱ्यातील हवामान व जमीन नारळ,चिकू,भात, आंबा,केळी,भाजीपाला,सुपारी या पिकांना अनुकूल आहे. पिकाची दरहेक्टरी सरासरी उत्पादकता खालील प्रमाणे आहे व ती अत्यंत कमी आहे. या उपखोऱ्यातील ग्रामीण दारिद्र्याचे ते एक प्रमुख कारण आहे.

उत्पादकता-क्विंटल/हेक्टर

| पीक | उत्पादकता |
|---|---|
| भात | 8 |
| बाजरी | 7.73 |

**9.0 उद्योगधंदे**

या उपखोऱ्यात कोणत्याही प्रकारचे उद्योगधंदे नाहीत. परंतू महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या नियोजनानुसार भविष्यात उद्योगधंदे उभारण्याचे प्रस्तावित आहे.

**10.0 जलविद्युत निर्मिती**

या उपखोऱ्यात जलविद्युत प्रकल्प नाहीत.

**11.0 दळणवळणाची साधने**

या उपखोऱ्यातून मुंबई-अहमदाबाद हा रेल्वेमार्ग जातो.मुंबई-अहमदाबाद (राष्ट्रीय महामार्ग क्र 8) तसेच राज्य महामार्ग क्र 12 नाशिक-पेठ व राज्यमहामार्ग क्र 37 मोखाडा- म्हसा हे मार्ग जातात.

**12.0 भावी नियोजनाची दिशा**

12.1 या उपखोऱ्यात सरासरी विश्वासार्हतेची जलसंपत्ती 4426 दलघमी आहे. उपखोऱ्यात अद्याप एकही मोठा वा मध्यम प्रकल्प पूर्ण झालेला नाही, पण 9 लघु प्रकल्प व 40 स्थानिक स्तर

लघु सिंचन प्रकल्पांच्या माध्यमातून 41.84 दलघमी चलपाणीसाठा करण्याची क्षमता करण्यात आली आहे.

राष्ट्रीय जलविकास अभिकरण (NWDA), नवी दिल्ली यांनी तयार केलेल्या राष्ट्रीय परिप्रेक्ष्य योजनेच्या अंतर्गत द्वीपकल्पीय घटकामध्ये दमणगंगा-पिंजाळ-शृंखला अभ्यासण्यात आली आहे. पूर्वी ''दमणगंगा- तानसा'' या शृंखलेचा अभ्यास करण्यात आला होता. तथापि तिच्यात सुधारणा करावी लागली. दमणगंगा नदीवर गुजरातने बांधलेल्या मधुबन जलाशयाच्या बाबतीत निर्माण होऊ शकणाऱ्या काही परिचालनविषयक समस्येमुळे गुजरात शासनाने या जलाशयाचा उन्नयी जलाशय म्हणून वापर करण्याचे टाळावे असे सुचविले. या प्रस्तावित शृंखलेमध्ये तानसा नदीमधून अधिक पाणी मिळणे शक्य व्हावे म्हणून 'दमणगंगा-पिंजाळ' अशी सुधरित शृंखला आता विचारात घेण्यात आली आहे. राष्ट्रीय जलविकास अभिकरणाने हिचा शक्याशक्यता अहवाल (feasibility report) तयार केला आहे. या प्रस्तावात एकूण 1570 दलघमी पाणी वापर प्रस्तावित आहे. त्याची फोड खालील प्रमाणे आहे.

पाणी वापर -दलघमी

| स्रोत | प्रस्तावित वापर क्षेत्र | | | |
|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | गुजरात, दमण दीव | एकूण | प्रयोजन |
| महाराष्ट्र | 1016+421* | -- | 1437 | मुंबई पाणीपुरवठा +सिंचन |
| गुजरात | 67 | 66 | 133 | मुंबई पाणी पुरवठा+सिंचन (1504+ 66) |

दमणगंगा-पिंजाळ योजनेमुळे मुंबई परिसरातील औद्योगिकीकरणाला पाणीपुरवठा होणे प्रस्तावित असल्यामुळे या योजनेचा विचार व अवलंब लवकर हाती घेतल्यास कोकण प्रदेशातील इतर उपखोऱ्यांवर याप्रीत्यर्थ पडणारा ताण सुसहय होण्यास सहाय्यभूत ठरेल. राष्ट्रीय जल विकास अभिकरणाकडे या योजनेचा पाठपुरावा करणे या दृष्टीकोनातून आवश्यक ठरावे.

2) पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी पूर्वेकडे वळविण्याच्या योजनांचा अभ्यास दमणगंगा व पार या उपखोऱ्यांतील पाण्याची गोदावरी व गिरणा (तापी) उपखोऱ्यांत स्थानांतराची शक्यता दर्शवितो.

पाणी-दलघमी

| अक्र | योजनेचे नाव | लाभान्वित खोरे | स्थलांतरण | पाणी वापर |
|---|---|---|---|---|
| **अ)** | **दमणगंगा खोऱ्यातून** | | | |
| 1 | कळमुस्ते | गोदावरी (गोदावरी) | प्रवाही | 11 |
| 2 | अंबोली | गोदावरी (गोदावरी) | प्रवाही | 4 |
| 3 | दमणगंगा (एकदरे) | गोदावरी (गोदावरी) | उपसा | 255 |
| 4 | वालनदी(आडगाव) | गोदावरी (गोदावरी) | उपसा | 207 |

* हे पाणी दमणगंगा खोऱ्यातील भूगड व खारगीहिल धरणांच्या वरच्या भागात महाराष्ट्राच्या क्षेत्रात वळविणे आहे.

पाणी-दलघमी

| अक्र | योजनेचे नाव | लाभान्वित खोरे | स्थलांतरण | पाणी वापर |
|---|---|---|---|---|
| **आ)** | **पार खोऱ्यातून** | | | |
| 1 | पायरपाडा | गोदावरी (कादवा) | प्रवाही | 1 |
| 2 | पळसविहीर | गोदावरी (कादवा) | प्रवाही | 2 |
| 3 | धोंदलवाडा | गोदावरी (कादवा) | प्रवाही | 2 |
| 4 | ननाशी | गोदावरी (कादवा) | प्रवाही | 1 |
| 5 | चिल्लरपाडा | गोदावरी (कादवा) | प्रवाही | 1 |
| 6 | चिमणपाडा | गोदावरी (कादवा) | प्रवाही | 2 |
| 7 | महाजे | गोदावरी (कादवा) | प्रवाही | 2 |
| 8 | अंबा पार | गोदावरी (कादवा) | उपसा | 261 |
| 9 | ममदानी | गोदावरी (कादवा) | उपसा | 93 |
| 10 | हरणटेकडी | तापी (गिरणा) | प्रवाही | 1 |
| **इ)** | **नार उपखोऱ्यातून** | | | |
| 1 | नार (मिलन) | गोदावरी (कादवा) | उपसा | 166 |
| 2 | चिराई | तापी (गिरणा) | प्रवाही | 2 |
| 3 | राशा | तापी (गिरणा) | प्रवाही | 1 |
| 4 | आरासपाडा | तापी (गिरणा) | प्रवाही | 1 |

अशा प्रकारे प्रवाही योजनांमधून केवळ 31 दलघमी पाणी पूर्वेकडे नेता येईल असे दिसते. पण उपसा पध्दतीने मात्र एकूण 982 दलघमी पाणी स्थलांतरित करता येऊ शकेल.

12.3 पार-तापी-नर्मदा शृंखला : राष्ट्रीय परिप्रेक्ष्य योजने अंतर्गत पार-तापी-नर्मदा शृंखला राष्ट्रीय जलविकास अभिकरणाने प्रस्तावित केली आहे. यामध्ये पार व तापी खोऱ्यांमध्ये अनुक्रमे 1350 व 1554 दलघमी पाणी (एकूण 2904 दलघमी) आधिक म्हणून दाखविले आहे. त्या पाण्याचा वापर नर्मदा खोऱ्यातील सरदार सरोवर प्रकल्पाच्या उत्तरेकडील लाभक्षेत्राच्या विस्तारासाठी प्रस्तावित आहे. त्यातून सौराष्ट्र व कच्छ प्रदेशाला सिंचनाचा लाभ होणार आहे या योजनेचा शक्याशक्यता अहवाल राष्ट्रीय जलविकास अभिकरणाने तयार केला आहे. या योजनेमध्ये पार खोऱ्यातील पार, औरंगा,अंबिका, पूर्णा या उपखोऱ्यांमधून अतिरिक्त पाणी तापीमार्गे नर्मदेवरील सरदार सरोवर प्रकल्पाच्या कालव्यात पोचवायचे आहे. मार्गस्थ सिंचन देखील यामध्ये प्रस्तावित आहे.

या योजनेमध्ये झेरी, महाळवचाळी, पैखेड, चासमांडवा,चिक्कार,दाबदर व केळवण ही धरणे, पैखेड, चासमांडवा व चिक्कार असे 3 वळवणीचे बंधारे, 5 किमी लांबीचा बोगदा, 177 किमी लांबीचा मुख्य कालवा व 27 किमी लांबीचा भरण (feeder) कालवा आणि 6 विद्युत गृहे प्रस्तावित आहेत.

12.4 दमणगंगा या घटकखोऱ्यात दमणगंगा नदीवर एक आंतरराज्यीय प्रकल्प आहे. त्या जलाशयाला `मधुबन' जलाशय म्हणतात. या प्रकल्पाची ठळक वैशिष्ठ्ये खाली दिली आहेत.

राज्यनिहाय लाभ व दायित्व

क्षेत्र - हेक्टर, पाणी-दलघमी, जलविद्युत-मेवॅ, खर्चाचा हिस्सा रु.लक्ष

| राज्य | सिंचन क्षेत्र | पाणी वापर | जलविद्युत निर्मिती क्षमता | बुडीत क्षेत्र | खर्चाचा हिस्सा |
|---|---|---|---|---|---|
| गुजरात,दमण,दादरा, नगर हवेली | 51700 | 594 | 2 | 4557 | 24804 |
| महाराष्ट्र | 550 | 6 | - | 43 | 439 |
| एकूण | 52250 | 600 | 2 | 4600 | 25243 |

पूर्वेकडे पाणी वळविण्याच्या कोणत्याही योजनांचा विचार त्या उपखोऱ्यातील सिंचनाची व सिंचनेतर पाण्याची गरज प्रथमतः भागवून मगच करावा लागेल. स्थानिक योजना कार्यान्वित करण्यासाठी प्राथम्य द्यावे लागेल. त्यादृष्टीने या उपखोऱ्याच्या बृहतविकासाचा सर्वकष संयुक्त आराखडा तयार होऊन स्थानिक गरज भागवून अतिरिक्त पाणी कसे वापरता येईल याचा स्पष्ट खुलासा करणारी पुस्तिका प्रकाशित होणे इष्ट राहील.

या बृहद्योजनेत गुजरातमधील निम्नस्त्रोत क्षेत्राचा विचारही दृष्टिआड करणे शक्य नसल्यामुळे राज्याच्या सीमेपर्यंत नेमके किती पाणी उपलब्ध होते याची नीट माहिती होण्यासाठी सिमेवर सरिता मापन केंद्राची उभारणी करणे आवश्यक आहे.

12.5 उपखोऱ्यातील माती झिरपणारी व चढउताराची आहे. त्यामुळे भूपृष्ठावरील कालवे व वितरिकांचे जाळे नीट टिकवणे खर्चिक रहाणार आहे. म्हणून बंद पाईपव्दारे ठिबक/तुषार व्यवस्थांच्या आधाराने आधुनिक पध्दतीने बरेचसे क्षेत्र सिंचनाखाली आणावे लागेल व त्यांतही फलोद्यानासारख्या रचनांना प्राधान्य देणे सुकर राहील.

12.6 सध्याचे उपखोऱ्यातील मुख्य पीक खरिपांतील भात आहे. त्यानंतर सिंचनाखालील क्षेत्रात भाता ऐवजी कडधान्य घेण्यास वाव आहे. शिवाय पाण्याच्या मुबलकतेमुळे उसा सारखें पीक या उपखोऱ्यात घेण्यास प्रोत्साहन देणे शक्य व्हावे. जमिनीतून पाण्याचा निचरा चांगला असल्यामुळे बारमाही पीक पध्दतीच्या विकासाला अनुकूलता राहील. यामुळे पाणलोटक्षेत्र विकासाच्या योजना राबविणे येथे अनुकूल राहील. त्यास प्राथमिक प्रोत्साहन द्यावे लागेल.

--000--

सारणी : 20.1

## माहवार सरासरी पर्जन्यमान व बाष्पीभवन

पर्जन्यमान, बाष्पीभावन-मिमी

| अक्र | महिना | पर्जन्यमान | बाष्पीभवन |
|---|---|---|---|
| 1 | जानेवारी | 0 | 120 |
| 2 | फेब्रूवारी | 0 | 151 |
| 3 | मार्च | 0 | 232 |
| 4 | एप्रिल | 0 | 249 |
| 5 | मे | 3 | 259 |
| 6 | जून | 294 | 141 |
| 7 | जुलै | 937 | 48 |
| 8 | ऑगस्ट | 600 | 54 |
| 9 | सप्टेंबर | 293 | 70 |
| 10 | ऑक्टोबर | 70 | 113 |
| 11 | नोव्हेंबर | 1 | 115 |
| 12 | डिसेंबर | 0 | 109 |
| | एकूण | 2198 | 1661 |

हंगाम निहाय बाष्पीभवन

| अक | हंगाम | बाष्पीभवन |
|---|---|---|
| 1 | खरीप | 228 |
| 2 | रब्बी | 552 |
| 3 | उन्हाळी | 881 |
| | एकूण | 1661 |

सारणी : 20.1 (चालू)

**पर्जन्यमानाचा तपशील**

केंद्र : पेठ

पर्जन्यमान-मिमी

| अक्र | वर्ष | वार्षिक सरासरी पर्जन्यमान | उतरत्या क्रमाने पर्जन्यमान | संगत वर्ष | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1901 | 1666 | 4673 | 1931 | |
| 2 | 1902 | 1956 | 3724 | 1930 | |
| 3 | 1903 | 2223 | 3634 | 1932 | |
| 4 | 1904 | 1645 | 3356 | 1959 | |
| 5 | 1905 | 1498 | 3216 | 1976 | |
| 6 | 1906 | 1730 | 3145 | 1944 | |
| 7 | 1907 | 2670 | 3041 | 1933 | |
| 8 | 1908 | 2137 | 2943 | 1914 | 10 |
| 9 | 1909 | 2044 | 2890 | 1946 | |
| 10 | 1910 | 1692 | 2874 | 1919 | |
| 11 | 1911 | 1538 | 2872 | 1956 | |
| 12 | 1912 | 2500 | 2799 | 1938 | |
| 13 | 1913 | 2433 | 2777 | 1973 | |
| 14 | 1914 | 2943 | 2766 | 1945 | |
| 15 | 1915 | 1603 | 2744 | 1950 | |
| 16 | 1916 | 2128 | 2732 | 1966 | 20 |
| 17 | 1917 | 2682 | 2682 | 1917 | |
| 18 | 1918 | 1362 | 2670 | 1907 | |
| 19 | 1919 | 2874 | 2638 | 1954 | |
| 20 | 1920 | 1458 | 2632 | 1981 | |
| 21 | 1921 | 1871 | 2629 | 1958 | |
| 22 | 1922 | 2555 | 2611 | 1927 | |
| 23 | 1923 | 2439 | 2599 | 1942 | |
| 24 | 1924 | 1883 | 2588 | 1941 | |
| 25 | 1925 | 1634 | 2555 | 1922 | 30 |
| 26 | 1926 | 2348 | 2523 | 1943 | |
| 27 | 1927 | 2611 | 2500 | 1912 | |
| 28 | 1928 | 1978 | 2488 | 1940 | |
| 29 | 1929 | 1539 | 2452 | 1969 | |

पर्जन्यमान-मिमी

| अक्र | वर्ष | वार्षिक सरासरी पर्जन्यमान | उतरत्या क्रमाने पर्जन्यमान | संगत वर्ष | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 30 | 1930 | 3724 | 2443 | 1937 | |
| 31 | 1931 | 4673 | 2439 | 1923 | |
| 32 | 1932 | 3634 | 2433 | 1913 | |
| 33 | 1933 | 3041 | 2384 | 1970 | |
| 34 | 1934 | 2252 | 2348 | 1936 | |
| 35 | 1935 | 2023 | 2348 | 1926 | |
| 36 | 1936 | 2348 | 2332 | 1948 | |
| 37 | 1937 | 2443 | 2313 | 1977 | |
| 38 | 1938 | 2799 | 2309 | 1983 | |
| 39 | 1939 | 2177 | 2277 | 1955 | |
| 40 | 1940 | 2488 | 2252 | 1934 | |
| 41 | 1941 | 2588 | 2223 | 1903 | 50 |
| 42 | 1942 | 2599 | 2218 | 1963 | |
| 43 | 1943 | 2523 | 2217 | 1953 | |
| 44 | 1944 | 3145 | 2200 | 1980 | |
| 45 | 1945 | 2766 | 2177 | 1939 | |
| 46 | 1946 | 2890 | 2158 | 1975 | |
| 47 | 1947 | 2091 | 2137 | 1908 | |
| 48 | 1948 | 2332 | 2128 | 1916 | |
| 49 | 1949 | 2019 | 2105 | 1971 | |
| 50 | 1950 | 2744 | 2091 | 1947 | |
| 51 | 1951 | 1853 | 2044 | 1909 | |
| 52 | 1952 | 2014 | 2023 | 1935 | |
| 53 | 1953 | 2217 | 2019 | 1949 | |
| 54 | 1954 | 2638 | 2014 | 1952 | |
| 55 | 1955 | 2277 | 1978 | 1928 | |
| 56 | 1956 | 2872 | 1959 | 1964 | |
| 57 | 1957 | 1757 | 1956 | 1902 | |
| 58 | 1958 | 2629 | 1921 | 1972 | |
| 59 | 1959 | 3356 | 1916 | 1978 | |
| 60 | 1960 | 1478 | 1883 | 1924 | |
| 61 | 1961 | 1362 | 1871 | 1921 | |

पर्जन्यमान-मिमी

| अक्र | वर्ष | वार्षिक सरासरी पर्जन्यमान | उतरत्या क्रमाने पर्जन्यमान | संगत वर्ष | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 62 | 1962 | 1635 | 1853 | 1951 | |
| 63 | 1963 | 2218 | 1853 | 1984 | |
| 64 | 1964 | 1959 | 1757 | 1957 | |
| 65 | 1966 | 2732 | 1730 | 1906 | |
| 66 | 1969 | 2452 | 1692 | 1910 | |
| 67 | 1970 | 2384 | 1666 | 1901 | |
| 68 | 1971 | 2105 | 1645 | 1904 | |
| 69 | 1972 | 1921 | 1635 | 1962 | |
| 70 | 1973 | 2777 | 1634 | 1925 | |
| 71 | 1974 | 1031 | 1603 | 1915 | |
| 72 | 1975 | 2158 | 1600 | 1985 | 90 |
| 73 | 1976 | 3216 | 1539 | 1929 | |
| 74 | 1977 | 2313 | 1538 | 1911 | |
| 75 | 1978 | 1916 | 1498 | 1905 | |
| 76 | 1980 | 2200 | 1478 | 1960 | |
| 77 | 1981 | 2632 | 1458 | 1920 | |
| 78 | 1982 | 451 | 1424 | 1986 | |
| 79 | 1983 | 2309 | 1362 | 1918 | |
| 80 | 1984 | 1853 | 1362 | 1961 | |
| 81 | 1985 | 1600 | 1031 | 1974 | |
| 82 | 1986 | 1424 | 451 | 1982 | |

| | |
|---|---|
| सरासरी | 2252 |
| प्रमाप विचलन | 629 |
| दोलायमानता गुणांक | 28 |

पर्जन्यमान-मिमी

केंद्र : मोखाडा

पर्जन्यमान-मिमी

| अक्र | वर्ष | वार्षिक सरासरी पर्जन्यमान | उतरत्या क्रमाने पर्जन्यमान | संगत वर्ष | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1901 | 1792 | 3515 | 1956 | |
| 2 | 1902 | 2288 | 3444 | 1976 | |
| 3 | 1903 | 2450 | 3401 | 1959 | |
| 4 | 1904 | 1782 | 3297 | 1914 | |
| 5 | 1905 | 1720 | 3267 | 1958 | |
| 6 | 1906 | 1912 | 3218 | 1981 | |
| 7 | 1907 | 2325 | 3184 | 1913 | |
| 8 | 1908 | 2298 | 3171 | 1961 | 10 |
| 9 | 1909 | 2638 | 3096 | 1933 | |
| 10 | 1910 | 2100 | 3042 | 1931 | |
| 11 | 1911 | 2329 | 3017 | 1944 | |
| 12 | 1912 | 2918 | 3015 | 1940 | |
| 13 | 1913 | 3184 | 2958 | 1938 | |
| 14 | 1914 | 3297 | 2945 | 1942 | |
| 15 | 1915 | 2684 | 2929 | 1955 | |
| 16 | 1916 | 2604 | 2928 | 1954 | 20 |
| 17 | 1917 | 2812 | 2918 | 1912 | |
| 18 | 1918 | 1495 | 2913 | 1919 | |
| 19 | 1919 | 2913 | 2889 | 1973 | |
| 20 | 1920 | 1630 | 2871 | 1930 | |
| 21 | 1921 | 2465 | 2856 | 1946 | |
| 22 | 1922 | 2425 | 2829 | 1937 | |
| 23 | 1923 | 2028 | 2812 | 1917 | |
| 24 | 1924 | 2007 | 2802 | 1945 | |
| 25 | 1925 | 1964 | 2773 | 1932 | 30 |
| 26 | 1926 | 2316 | 2763 | 1950 | |
| 27 | 1927 | 2634 | 2710 | 1969 | |
| 28 | 1928 | 2397 | 2705 | 1970 | |
| 29 | 1929 | 1898 | 2693 | 1964 | |
| 30 | 1930 | 2871 | 2684 | 1915 | |
| 31 | 1931 | 3042 | 2651 | 1947 | |

पर्जन्यमान-मिमी

| अक्र | वर्ष | वार्षिक सरासरी पर्जन्यमान | उतरत्या क्रमाने पर्जन्यमान | संगत वर्ष | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 32 | 1932 | 2773 | 2649 | 1943 | |
| 33 | 1933 | 3096 | 2638 | 1909 | |
| 34 | 1934 | 2403 | 2634 | 1927 | |
| 35 | 1935 | 2206 | 2604 | 1916 | |
| 36 | 1936 | 2352 | 2590 | 1975 | |
| 37 | 1937 | 2829 | 2547 | 1983 | |
| 38 | 1938 | 2958 | 2465 | 1921 | |
| 39 | 1939 | 2134 | 2452 | 1953 | |
| 40 | 1940 | 3015 | 2450 | 1903 | |
| 41 | 1941 | 2394 | 2425 | 1922 | 50 |
| 42 | 1942 | 2945 | 2403 | 1934 | |
| 43 | 1943 | 2649 | 2397 | 1928 | |
| 44 | 1944 | 3017 | 2394 | 1941 | |
| 45 | 1945 | 2802 | 2358 | 1977 | |
| 46 | 1946 | 2856 | 2352 | 1936 | |
| 47 | 1947 | 2651 | 2351 | 1985 | |
| 48 | 1948 | 2165 | 2344 | 1980 | |
| 49 | 1949 | 2334 | 2334 | 1949 | |
| 50 | 1950 | 2763 | 2329 | 1911 | |
| 51 | 1951 | 1786 | 2325 | 1907 | |
| 52 | 1952 | 2149 | 2316 | 1926 | |
| 53 | 1953 | 2452 | 2298 | 1908 | |
| 54 | 1954 | 2928 | 2288 | 1902 | |
| 55 | 1955 | 2929 | 2255 | 1984 | |
| 56 | 1956 | 3515 | 2223 | 1979 | |
| 57 | 1957 | 1744 | 2206 | 1935 | |
| 58 | 1958 | 3267 | 2199 | 1971 | |
| 59 | 1959 | 3401 | 2165 | 1948 | |
| 60 | 1960 | 1523 | 2149 | 1952 | |
| 61 | 1961 | 3171 | 2134 | 1939 | |
| 62 | 1962 | 2115 | 2115 | 1962 | |
| 63 | 1963 | 1115 | 2100 | 1910 | |

पर्जन्यमान-मिमी

| अ.क्र | वर्ष | वार्षिक सरासरी पर्जन्यमान | उतरत्या क्रमाने पर्जन्यमान | संगत वर्ष | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 64 | 1964 | 2693 | 2095 | 1968 | |
| 65 | 1966 | 1533 | 2028 | 1923 | |
| 66 | 1968 | 2095 | 2007 | 1924 | |
| 67 | 1969 | 2710 | 1964 | 1925 | |
| 68 | 1970 | 2705 | 1942 | 1982 | |
| 69 | 1971 | 2199 | 1912 | 1906 | |
| 70 | 1972 | 1473 | 1898 | 1929 | |
| 71 | 1973 | 2889 | 1792 | 1901 | |
| 72 | 1974 | 1543 | 1786 | 1951 | 90 |
| 73 | 1975 | 2590 | 1782 | 1904 | |
| 74 | 1976 | 3444 | 1744 | 1957 | |
| 75 | 1977 | 2358 | 1720 | 1905 | |
| 76 | 1979 | 2223 | 1630 | 1920 | |
| 77 | 1980 | 2344 | 1606 | 1986 | |
| 78 | 1981 | 3218 | 1543 | 1974 | |
| 79 | 1982 | 1942 | 1533 | 1966 | |
| 80 | 1983 | 2547 | 1523 | 1960 | |
| 81 | 1984 | 2255 | 1495 | 1918 | |
| 82 | 1985 | 2351 | 1473 | 1972 | |
| 83 | 1986 | 1606 | 1115 | 1963 | |

| | |
|---|---|
| सरासरी | 2438 |
| प्रमाप विचलन | 524 |
| दोलायमानता गुणांक | 21 |

सारणी : 20.2

**पर्जन्यमापन केंद्रांचा तपशील**

पर्जन्य - मिमी

| अक्र | केंद्र | प्रकार | स्वामित्व | आधार सामुग्री उपलब्धीचे प्रारंभिक वर्ष | वार्षिक सरासरी पर्जन्य |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | गोंदेखुर्द | स्व.प. | पाटबंधारे खाते | 1987 | 1807 |
| 2 | शिंद्याचा पाडा | स्व.प. | पाटबंधारे खाते | 1987 | 2116 |
| 3 | पांगरी (चिकनपाडा) | सा.प. | पाटबंधारे खाते | 1987 | 2121 |
| 4 | गोंदे (बु) पवारपाडा | सा.प. | पाटबंधारे खाते | 1987 | 2025 |
| 5 | चास | सा.प. | पाटबंधारे खाते | 1987 | 2098 |
| 6 | चिंचुतारा | सा.प. | पाटबंधारे खाते | 1987 | 2230 |
| 7 | ओसर विरा (बेरीस्ते) | सा.प. | पाटबंधारे खाते | 1987 | 2239 |
| 8 | खंडाळी | स्व.प. | पाटबंधारे खाते | 1987 | 2145 |
| 9 | खडखड | स्व.प. | पाटबंधारे खाते | 1987 | 2436 |
| 10 | सरसून | सा.प. | पाटबंधारे खाते | 1987 | 2382 |
| 11 | जामसर | सा.प. | पाटबंधारे खाते | 1987 | 2772 |
| 12 | धोपटपाडा | सा.प. | पाटबंधारे खाते | 1987 | 2610 |
| 13 | हत्तेरी (मालघर) | सा.प. | पाटबंधारे खाते | 1987 | 2428 |
| 14 | पिंपूर्णा | सा.प. | पाटबंधारे खाते | 1987 | 2593 |
| 15 | नंदनमाळ | सा.प. | पाटबंधारे खाते | 1987 | 2494 |
| 16 | मोखाडा | स्व.प. | महसूल खाते | 1901 | 2266 |
| 17 | पेठ | सा.प. | महसूल खाते | 1901 | 2293 |
| 18 | बोरवट | सा.प. | पाटबंधारे खाते | 1992 | 1886 |
| 19 | कळमगाव | सा.प. | पाटबंधारे खाते | 1992 | 2901 |
| 20 | महाजे | सा.प. | पाटबंधारे खाते | 1992 | 2326 |
| 21 | शिंदे | सा.प. | पाटबंधारे खाते | 1992 | 1629 |
| 22 | उस्थळे | सा.प. | पाटबंधारे खाते | 1992 | 2091 |
| 23 | हरसूल | सा.प. | महसूल विभाग | 1978 | 1597 |
| 24 | हेमाड पाडा | सा.प. | पाटबंधारे खाते | 1992 | 2017 |
| 25 | डिकसळ | सा.प. | पाटबंधारे खाते | 1992 | 2116 |
| 26 | टूमी पाडा | सा.प. | पाटबंधारे खाते | 1992 | 1886 |
| 27 | सुरगाणा | सा.प. | महसूल खाते | 1976 | 1896 |

सारणी : 20.3

**जलसंपत्तीची उपलब्धता**

दमणगंगा खोरे

येवा -दलघमी

| अक्र | वर्ष | वार्षिक सरासरी येवा | उतरत्या क्रमाने विसर्ग मालिका | संगत वर्ष | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1966 | 3921 | 6111 | 1978 | |
| 2 | 1967 | 5075 | 5692 | 1976 | |
| 3 | 1968 | 4508 | 5584 | 1994 | 10 |
| 4 | 1969 | 5149 | 5270 | 1981 | |
| 5 | 1970 | 4894 | 5149 | 1969 | |
| 6 | 1971 | 4539 | 5075 | 1967 | 20 |
| 7 | 1972 | 3667 | 4906 | 1977 | |
| 8 | 1973 | 4864 | 4894 | 1970 | |
| 9 | 1974 | 3747 | 4867 | 1983 | 30 |
| 10 | 1975 | 4748 | 4864 | 1973 | |
| 11 | 1976 | 5692 | 4748 | 1975 | |
| 12 | 1977 | 4906 | 4539 | 1971 | 40 |
| 13 | 1978 | 6111 | 4531 | 1993 | |
| 14 | 1979 | 4424 | 4508 | 1968 | |
| 15 | 1980 | 4420 | 4424 | 1979 | 50 |
| 16 | 1981 | 5270 | 4420 | 1980 | |
| 17 | 1982 | 4200 | 4357 | 1990 | |
| 18 | 1983 | 4867 | 4200 | 1982 | 60 |
| 19 | 1984 | 4120 | 4120 | 1984 | |
| 20 | 1985 | 4047 | 4047 | 1985 | |
| 21 | 1986 | 3749 | 3921 | 1966 | 70 |
| 22 | 1987 | 3573 | 3821 | 1992 | |
| 23 | 1988 | 3786 | 3786 | 1988 | 75 |
| 24 | 1989 | 3684 | 3749 | 1986 | 80 |
| 25 | 1990 | 4357 | 3747 | 1974 | |
| 26 | 1991 | 3694 | 3694 | 1991 | |
| 27 | 1992 | 3821 | 3684 | 1989 | 90 |
| 28 | 1993 | 4531 | 3667 | 1972 | |
| 29 | 1994 | 5584 | 3573 | 1987 | |
| 30 | 1995 | 2818 | 2818 | 1995 | |

$$\frac{\text{10 टक्के उपलब्धता}}{\text{90 टक्के उपलब्धता}} = 1.5 \qquad \frac{\text{50 टक्के उपलब्धता}}{\text{90 टक्के उपलब्धता}} = 1.2$$

$$\frac{\text{50 टक्के उपलब्धता}}{\text{75 टक्के उपलब्धता}} = 1.17$$

सारणी : 20.4

**प्रकल्पांची सद्य:स्थिती**

चलपाणीसाठा दलघमी
पाणीवापर दलघमी
सिंचनक्षेत्र - हेक्टर

| अक्र | प्रकल्पाचा संवर्ग | पूर्ण झालेले प्रकल्प | | | | प्रगतीपथावरील प्रकल्प | | | | भविष्यकालीन प्रकल्प | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 1 | मोठे | | | | | | | | | बेहडपाडा | 550 | 550 | | | 550 | 550 | 0 |
| | | | | | | | | | | भूगड | 400 | 400 | | | 400 | 400 | 0 |
| | | | | | | | | | | 2 | 950 | 950 | 0 | 2 | 950 | 950 | 0 |
| 2 | मध्यम | | | | | | | | | आमटी | 36.4 | 8.3 | 751 | | 36.4 | 8.3 | 751 |
| | | | | | | | | | | दमणकुंड | 35.2 | 8.4 | 756 | | 35.2 | 8.4 | 756 |
| | | | | | | | | | | टेटपाडा | 17.0 | 1.5 | 133 | | 17.0 | 1.5 | 133 |
| | | | | | | | | | | देवनदी | 26.5 | 7.2 | 651 | | 26.5 | 7.2 | 651 |
| | | | | | | | | | | मिलनपाडा | 16.8 | 15.4 | 900 | | 16.8 | 15.4 | 900 |
| | | | | | | | | | | पार | 44.0 | 20.4 | 2060 | | 44.0 | 20.4 | 2060 |
| | | | | | | | | | | श्रीमंत | 15.4 | 10.4 | 1500 | | 15.4 | 10.4 | 1500 |
| | | | | | | | | | | रोशनी | 34.8 | 34.8 | 850 | | 34.8 | 34.8 | 850 |
| | | | | | | | | | | नाल | 49.3 | 49.3 | 2150 | | 49.3 | 49.3 | 2150 |
| | | | | | | | | | | 9 | 275.4 | 155.7 | 9751 | 9 | 275.4 | 155.7 | 9751 |
| 3 | बृहतलघु | | | | | वाघ | 10 | 10 | 510 | हरण टेकडी | 1.6 | | | | 11.6 | 10.0 | 510 |
| | | | | | | | | | | मांजरपाडा | 11.1 | | | | 11.1 | 0.0 | 0 |
| | | | | | | | | | | बोरीचापाडा | 41.9 | 41.9 | 2775 | | 41.9 | 41.9 | 2775 |
| | | | | | | | | | | निमोणीपाडा | 81.3 | 7.5 | 737 | | 81.3 | 7.5 | 737 |
| | | | | | | | | | | पाट्रे | 25.8 | 5.2 | 480 | | 25.8 | 5.2 | 480 |
| | | | | | | | | | | धनशेत | 34.9 | 34.9 | 450 | | 34.9 | 34.9 | 450 |
| | | | | | | | | | | धामणी | 47.5 | 47.5 | 657 | | 47.5 | 47.5 | 657 |
| | | | | | | | | | | लेंडी | 13.7 | 13.7 | 958 | | 13.7 | 13.7 | 958 |
| | | | | | | | | | | दमण का.प्र | 8.1 | 8.1 | 600 | | 8.1 | 8.1 | 600 |
| | | | | | | | | | | डोमेहीरा | 10.2 | 10.2 | 685 | | 10.2 | 10.2 | 685 |
| | | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 10 | 10 | 510 | 10 | 275.9 | 168.9 | 7342 | 11 | 285.9 | 178.9 | 7852 |
| 4 | लघु | 9 | 17.4 | 17.4 | 1392 | 5 | 14.5 | 14.5 | 1373 | 13 | 24.0 | 25.9 | 2590 | 27 | 55.9 | 57.8 | 5355 |
| 5 | स्था.स्तर | 40 | 24.5 | 24.5 | 1794 | 60 | 38.6 | 38.6 | 2484 | 2 | 7.2 | 7.2 | 763 | 102 | 70.3 | 70.3 | 5041 |
| | | | | | | | | | | 22 | 17.6 | 17.6 | 814 | 22 | 17.6 | 17.6 | 814 |
| एकूण लघू (3+4+5) | | 49 | 41.8 | 41.8 | 3186 | 66 | 63.2 | 63.2 | 4367 | 47 | 324.7 | 219.5 | 11509 | 162 | 429.7 | 324.6 | 19062 |
| | सर्व एकूण, | 49 | 41.8 | 41.8 | 3186 | 66 | 63.2 | 63.2 | 4367 | 58 | 1550.1 | 1325.3 | 21260 | 173 | 1655.1 | 1430.3 | 28813 |

सारणी : 20.5

**जलसंपत्तीचा ताळेबंद**

**दमणगंगा-पार**

जलसंपत्ती • दलघमी


| अक्र | उपलब्धता | | अक्र | वापर (सन2030) | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **भूपृष्ठावरील** | | 4 | **भूपृष्ठावरील** | |
| | अ) नैसर्गिक | | | अ) घरगुती वापरासाठी | |
| | 1) 75 टक्के विश्वासार्हतेने | 3786 | | 1) नागरी | 0 |
| | 2) 50 टक्के विश्वासार्हतेने | 4424 | | 2) ग्रामीण | 17 |
| | 3) सरासरीने | 4426 | | 3) पशूधन | 9 |
| | 4) नियोजनासाठी | 4426 | | एकूण | 26 |
| | ब) मानवप्रबंधित | | | ब) उद्योगधंदयासाठी | 0 |
| | 1) नागरी वापरातून पुनरुद्भव (80 %) | 0 | | एकूण सिंचनेतर वापर | 26 |
| | 2) उद्योग धंदयातील पुनरुद्भव (97.5%) | 0 | 5 | जलविद्युत निर्मितीसाठी | 0 |
| | 3) इतर खोऱ्यातून संक्रमित झालेले पाणी | 0 | 6 | सिंचनासाठी उपलब्ध भूपृष्ठावरील पाणी (4426-26)+440 | 4840 |
| | एकूण (1 ब) | 0 | | | |
| 2 | मानवनिर्मित<br>लाभक्षेत्रातील पुनर्भरण (4426-26) च्या10 % | 440 | | | |
| 3 | एकूण उपलब्धता (4426+440) | 4866 | 8 | एकूण | 4866 |
| | 1) भूजल उपलब्धता (वार्षिक एकूण पुनर्भरण) | 115 | | अ) भूजलाचा सध्याचा सिंचनासाठी वापर | 2 |
| | 2) भूजल वापरास मुभा ( 115 च्या 65 %) | 75 | | | |


टीपा : 1) भूजल उपलब्धतेमुळे उपखोऱ्याच्या एकूण उपलब्धतेत वाढ होणार नाही ; भूजलाचा जेवढा उपसा होईल तेवढा नदी प्रवाह घटत जाईल म्हणून एकूण उपलब्धतेचा आकडा काढतांना भूजल उपलब्धतेचा विचार घेतलेला नाही.

2) संकलीत अंदाजासाठी सर्व पाण्याचा उपयोग भूपृष्ठावरील पाण्यातून दाखविला आहे. पण एकूण वापरापैकी अधिकाधिक 75+440= 515 भूजल माध्यमातून शक्य आहे.

3) पाणीवापराचे नियोजन उपलब्ध येवा मालिकेवर आधारित आहे.


नकाशा - 20.1




• संदर्भ सूची •

1. राज्य सरहद
2. जिल्हा सरहद
3. तालुका सरहद
4. उपखोरे सरहद
5. जिल्हा मुख्यालय
6. तालुका मुख्यालय
7. रेल्वे मार्ग
8. रस्ते
9. नदी व नाले
10. समपर्जन्यमान रेषा (मिमी) 2000
11. धरणाचे ठिकाण व बुडीत क्षेत्र — पूर्ण / बांधकामाधीन / भविष्यकालिन
12. औद्योगिक क्षेत्र
13. महानगरपालिका
14. नगरपालिका

| उपखोऱ्याचे स्थान | उपखोरे क्र. | उपखोऱ्यांची नावे |
|---|---|---|
|  गुजरात, 11, 1, 21 | 1 | ऊर्ध्व गोदावरी (पैठण धरणापर्यंत) |
| | 11 | गिरणा |
| | 21 | उत्तर कोकण |

महाराष्ट्र जल व सिंचन आयोग

## दमणगंगा-पार उपखोरे समूह

जून 1999

# उपखोरे : 21

# उत्तर कोकण

## 1.0 भौगोलिक तपशील

1.1 उत्तर कोकण खोरेसमूहामध्ये ठाणे जिल्हयातील वैतरणा, उल्हास या मुख्य नद्या व रायगड जिल्हयातील पाताळगंगा या मुख्य नदीचा (नकाशा 21.1) समावेश आहे. मुंबई जलमित्तीय क्षेत्रही या खोरेसमूहात येते. या खोरेसमूहात मुंबई शहर व उपनगरे, ठाणे,रायगड व नाशिक जिल्हयांतील खालील तालुक्यांचे क्षेत्र येते.

**ठाणे** : 1) जव्हार 2) मोखाडा 3) डहाणू 4) शहापूर 5) वाडा 6) भिवंडी 7) वसई 8) तलासरी, 9) उल्हासनगर 10) कल्याण 11) मुरबाड,

**रायगड** : 1)कर्जत 2) पनवेल 3) पेण 4) उरण 5) खालापूर 6) सुधागड

**नाशिक** : 1) इगतपुरी

खोरे समुहाचे एकूण क्षेत्रफळ 12063 चौकिमी असून मुंबई शहर व उपनगरांचे क्षेत्रफळ 603 चौकिमी, ठाणे जिल्हयातील क्षेत्र 8948 चौकिमी, पुणे जिल्हयातील क्षेत्र 111 चौकिमी, रायगड जिल्हयातील क्षेत्र 2219 चौकिमी व नाशिक जिल्हयातील क्षेत्र 182 चौकिमी आहे.

मुख्य नदी, तिच्या उपनद्या इत्यादी बाबतची माहिती सारणी 21.1 मध्ये दर्शविली आहे.

1.2 विस्तार : उपखोऱ्याचा क्षेत्रीय विस्तार अक्षांश 18°41` ते 19°24` उत्तर व रेखांश 72°40` ते 73°52` पूर्व यामध्ये आहे.

1.3 चतु:सीमा : उपखोऱ्याच्या चतु:सीमा खालीलप्रमाणे आहेत.

| अक्र | दिशा | तपशील |
|---|---|---|
| 1 | उत्तर | दमणगंगा उपखोरे क्र 20 |
| 2 | पूर्व | गोदावरी उपखोरे(पैठण धरणापर्यंत) क्र 1, सह्याद्रीच्या पर्वत रांगा |
| 3 | पश्चिम | अरबी समुद्र |
| 4 | दक्षिण | रायगड जिल्हा, मध्य कोकण खोरेसमूह क्र 22 |

## 2.0 हवामान

2.1 या खोरेसमुहातील क्षेत्र जास्त पावसाचा प्रदेशात येते. येथील हवामान दमट आहे. साधारणतः 97 टक्के पाऊस नैऋत्य वा-यांमुळे जून ते सप्टेंबर या कालावधीत तर 3 टक्के पाऊस ईशान्य मोसमी वाऱ्यांमुळे, सप्टेंबर नंतर पडतो. वार्षिक सरासरी पर्जन्यमान 2766 मिमी आहे.या खोरेसमुहातील हवामान विषयक इतर बाबी व पर्जन्यमानातील दोलायमानता इत्यादी पुढीलप्रमाणे आहे.

पर्जन्यमान-मिमी, तपमान -अंश सें

| अक्र | वैशिष्ठ्ये | परिमाण | महिना/वर्ष | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1 | सर्वात अधिक पाऊस | 11204 | 1921 | माथेरान |
| 2 | सर्वात अधिक तपमान | 45 | एप्रिल1997 | खापरी |
| 3 | सर्वात कमी तपमान | 5.4 | जानेवारी 1991 | कासा (बु) |

कृषि- हवामान वर्गीकरणानुसार या खोरेसमूहाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

2- अतिपावसाचा जांभ्या खडकाचा जमिनी नसलेला विभाग (VRN), 3- घाट विभाग (GH)

या खोरेसमूहातील पर्जन्यमानातील दोलायमानता गुणांक 28 (तक्ता 2.5.8) आहे. पर्जन्यमानाचा माहवार तपशील सारणी 21.2 मध्ये व पर्जन्यमापन केंद्रांचा तपशील सारणी 21.3 मध्ये दिला आहे.

2.2 बाष्पीभवन : या खोरेसमूहातील सर्वाधिक बाष्पीभवन मे महिन्यात सरासरी 247 मिमी तर सर्वात कमी बाष्पीभवन जुलै महिन्यात 54 मिमी होते. केंद्रनिहाय माहवार व हंगामनिहाय बाष्पीभवन याबाबतचा तपशील सारणी 21.2 मध्ये दिला आहे.

## 3.0 जलसंपत्तीची उपलब्धता

जलसंपत्ती मुख्यतः भूपृष्ठीयजल व भूजल या दोन स्वरुपातून उपलब्ध होते. या दोन्ही स्वरुपांचा मूळ स्रोत त्या क्षेत्रात पडणारा पाऊस हाच आहे.

3.1 भूपृष्ठीय जल संपत्ती : या खोरेसमूहातील एकूण सरासरी उपलब्धता 21367 दलघमी आहे.1966 ते 1995 या 30 वर्षांच्या माहितीवर आधारभूत या खोऱ्यातील पाण्याची उपलब्धता खालीलप्रमाणे आहे:

75 टक्के विश्वासार्हतेने 17607 दलघमी

50 टक्के विश्वासार्हतेने 21085 दलघमी.

येवा मोजण्याची ठिकाणे व वेगवेगळ्या विश्वासार्हतेच्या येव्यांची माहिती अनुक्रमे सारणी 21.4 व सारणी 21.5 मध्ये दिलेली आहे.

3.2. भूशैलीय रचना :

भूपृष्ठीय स्थिती (भूरुप वर्णन) : खोरेसमूहातील भूभाग 30 टक्के अतिविच्छेदित व डोंगराळ, 60 टक्के पठारी आणि 10 टक्के सपाट व नदी आणि समुद्रालगतच्या गाळाचा आहे. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेने निर्देशित केलेल्या 41 पाणलोट क्षेत्रांचा यात अंतर्भाव आहे.

भूपृष्ठीय शैलस्थिती : खोरेसमूहात मुख्यत्वे लाव्हा थरांपासून तयार झालेला बहुस्तरीय दक्षिणी कातळ खडक (डेक्कन ट्रॅप प्रस्तर) आढळतो. त्यात भरित-कुहरी बेसाल्टचे प्रमाण अधिक आहे.समुद्रकिनाऱ्यालगत वैतरणा नदीच्या काठावर रायोलाईट, ट्रॅकाईटचे खडक आढळतात. काही भागात लाव्हा थरांच्यावर जांभा खडक तयार झालेला दिसतो.

समुद्र किनाऱ्यालगतचा 6 ते 15 किमी रूंदीचा व जवळजवळ 90 ते 100 किमी लांबीचा पट्टा गाळाने व्यापलेला आहे. त्याची खोली साधारण 10 ते 30 मीटर आहे.

डेक्कन ट्रॅप प्रस्तरात शैलभित्तींचे (dykes) प्रमाण अधिक असून त्या उत्तर-दक्षिण दिशेत आहेत.

3.3 भूजल संपत्ती : पर्जन्यमान जास्त असूनही भूपृष्ठिय स्थिती व भूस्तर अनुकूल नसल्यामुळे भूजल संपत्ती मर्यादीत आहे.अतिविच्छेदीत व डोंगराळ आणि पटारी भागाचे प्रमाण जास्त

असून स्तराची जाडी मर्यादीत आहे. परिणामी भूजलधारक प्रस्तरातील पाणी झऱ्यावाटे मोठया प्रमाणात निघून जाते. सपाट, नदी व समुद्र किनाऱ्यालगतच्या गाळाच्या प्रदेशात मात्र भूजल उपलब्धी चांगली आहे. याचा परिणाम डहाणू, वसई व पालघर तालुक्यातील विहिरीव्दारे गोडया पाण्याचा जास्त उपसा केल्यामुळे खारे पाणी गोडया पाण्यात मिसळून ते सुध्दा खारे झालेले आहे. त्याच बरोबर मीठागरांच्या जवळ असलेल्या विहिरींवर देखील परिणाम होऊन त्यातील पाणी खारवट झालेले आहे.

ठाणे शहरात बांधकामासाठी व भाजीपाला घेण्यासाठी मोठया प्रमाणावर खोदण्यात आलेल्या विंधण विहिरी / नलिका कूप याव्दारे होणाऱ्या भूजल उपशामुळे सुध्दा खारे पाणी गोडया पाण्यात मिसळून बऱ्याच भागात प्रदुषित होत असल्याची माहिती आहे.

ठाणे जिल्ह्यातील किनारपट्टीच्या गाळाच्या जलधारक स्तरांच्या भागातील विहिरींचा वापर निक्षारीकरणासाठी करण्याबाबतच्या अभ्यासासाठी नेमलेल्या घुगरे समितीच्या (1975) शिफारशी प्रमाणे अशा भागात व यासारख्या भूजल गुणवत्तेची अवनती झालेल्या भागात, कमी अश्वशक्तीचे पंप वापरून भूजल उपशावर नियंत्रण आणणे, लोकजागृती करणे आणि मीठागरांना सिमेंट ग्राऊटींग करणे याची आवश्यकता आहे.

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या 1990 च्या भूजल अंदाजानुसार 533 दलघमी एकूण पुनर्भरण असून सिंचनाखालील विहिरींची संख्या 0.14 लक्ष आहे.तलासरी,डहाणू व पालघर या तालुक्यात झालेल्या भूजलाच्या अतिउपशामुळे दोन पाणलोट क्षेत्रे पवा-12,19 (पश्चिम वाहिनी) विकसित अवस्थेत आहेत.

3.4 <u>अवर्षणप्रवण क्षेत्र</u> : या खोरे समूहातील नाशिक जिल्हयातील इगतपुरी हा तालुका सुकथनकर समितीच्या अहवालानंतर शासनाने अवर्षणप्रवण घोषित केला आहे. या अवर्षणप्रवण भागाचे क्षेत्र 837 हेक्टर आहे.

## 4.0 जमिनीचा तपशील

या खोरे समूहातील जमीन बसाल्ट दगडा पासून बनलेली आहे व जमिनीची उत्पादन क्षमता एकंदरीने चांगली आहे. जमिनीचे सविस्तर वर्गीकरण पुढीलप्रमाणे आहे.

| अक्र | जमिनीचे वर्गीकरण | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | तांबुस तपकिरी डोंगर उतारावरील जमीन (बेसाल्ट) | 15 |
| 2 | भरड उथळ जमीन | 35 |
| 3 | मध्यम काळी जमीन | 13 |
| 4 | गाळाची जमीन | 31 |
| 5 | समुद्रकिनाऱ्यावरील खारवट जमीन | 6 |

## 5.0 जमिनीचा वापर

लागवडीयोग्य क्षेत्र, वन खात्याच्या ताब्यातील क्षेत्र, पडीक क्षेत्र, इत्यादी पुढीलप्रमाणे आहे.

क्षेत्र -हजार हेक्टर

| अक्र | बाब | क्षेत्र | भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | भौगोलिक क्षेत्र | 1206 | |
| 2 | वन खात्याच्या ताब्यातील क्षेत्र | 388 | 32.2 |
| 3 | पेरणीसाठी उपलब्ध नसलेले क्षेत्र | | |
| | अ) ओसाड जमीन | 113 | 9.4 |
| | ब) बिगरशेती उपयोगाकरीता आणलेली जमीन | 121 | 10 |
| 4 | मशागतयोग्य पडीत जमीन | 53 | 4.4 |
| 5 | कायमची कुरणे व चराऊ कुरणे | 75 | 6.2 |
| 6 | किरकोळ झाडेझुडपे यांच्या समुहाखालील क्षेत्र | 13 | 1.1 |
| 7 | चालू पडीक जमीन | 15 | 1.2 |
| 8 | इतर पडीक जमीन | 26 | 2.2 |
| 9 | पेरणीचे निव्वळ क्षेत्र | 349 | 28.9 |
| 10 | लागवडीयोग्य क्षेत्र(4+5+6+7+8+9 ) | 528 | 44 |
| 11 | दुसोटा क्षेत्र | 26 | |
| 12 | पिकाखालील एकूण क्षेत्र(9+11) | 375 | |
| 13 | पीक घनता (12÷9X100) | 107 | |

## 6.0 लोकसंख्या व पशुधन

6.1 लोकसंख्या : सन 1991 च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या 1 कोटी 58 लक्ष आहे. सन 2030 पर्यंत होणारी लोकसंख्येतील वाढ, लोकसंख्या घनता हा तपशील पुढीलप्रमाणे अपेक्षित आहे. यात आजवरच्या केवळ सर्वसाधारण लोकसंख्या वाढीचाच विचार न करता कारखानदारी व इतर व्यवसायामुळे जी स्थलांतरातून अतिरिक्त वाढ होण्याची शक्यता आहे त्याचाहि विचार धरलेला आहे.

लोकसंख्या-हजारात,घनता-प्रति चौकिमी

| अक्र | लोकसंख्या तपशील | 1991 | 2030 |
|---|---|---|---|
| 1 | नागरी | 13589 | 33164 |
| 2 | ग्रामीण | 2230 | 4460 |
| 3 | एकूण | 15819 | 37624 |
| 4 | लोकसंख्या घनता | 1311 | 3119 |
| 5 | ग्रामीण लोकसंख्या घनता | 185 | 370 |

6.2 पशुधन : सन1992 च्या पशुगणनेनुसार एकूण पशुधन 1277349 आहे. पशुंची वर्गनिहाय संख्या खालील तक्त्यात दर्शविली आहे.

| म्हैस व रेडे | गाय व बैल | एकखुरी व उंट | शेळ्या मेंढया | डुकरे | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| 320482 | 684225 | 1358 | 257533 | 13751 | 1277349 |

6.3 इतर तपशील : या खोरेसमूहात ठाणे, बृहन्मुंबई, नवी मुंबई, कल्याण-डोंबीवली व उल्हासनगर या पाच महापालिका आहेत, औद्योगिकरणहि मोठया प्रमाणात झालेले आहे, 1) जव्हार 2) डहाणू 3) विरार 4) मिरा भाईंदर 5) नाला सोपारा 6) नवघर माणिकपूर 7) वसई 8) भिवंडी 9) अंबरनाथ 10) कुळगाव बदलापूर 11) माथेरान 12) पनवेल 13) खोपोली 14) उरण 15) पेण या नगरपरिषदा आहेत. औद्योगिक मजूरांची संख्या 14 लक्ष 66 हजार आहे. कृषि मजूर संख्या मात्र 5 लक्ष 91 हजार आहे.

## 7.0 पाणी वापर

7.1 सिंचनासाठी वापरः खोरे समूहातील वर्गनिहाय प्रकल्प म्हणजे मोठे , मध्यम , बृहत लघु, लघु प्रकल्प व कोल्हापूर पध्दतीचे बंधारे यांची संख्या, चलपाणीसाठा, पाणीवापर, सिंचनक्षेत्र याची,तसेच पूर्ण झालेले, प्रगतीपथावरील व भविष्यकालीन प्रकल्प याचा तपशील सारणी 21.6 मध्ये दिला आहे.पूर्ण झालेल्या प्रकल्पांची सिंचन क्षमता 18524 हेक्टर आहे सिंचनासाठी आणखी 136991 हेक्टर क्षेत्र उपलब्ध होऊ शकते पण त्यासाठी सध्याच्या पाणीवापर पध्दती प्रमाणे एकूण पाणी वापर 5568 दलघमी लागेल.

7.2 सिंचनेतर पाण्याचा वापर : सिंचनेतर उपयोगासाठी या उपखो-यातील सध्याची गरज 1561 दलघमी आहे. सन 2030 पर्यन्त ती 2945 दलघमी होईल. म्हणजे सरासरी येव्याच्या जवळ जवळ 24 टक्के होईल. या गरजांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

पाण्याची गरज -दलघमी

| अक्र | तपशील | 1991 | 2030 |
|---|---|---|---|
| 1 | घरगुती वापरासाठी | 764 | 1826 |
| 2 | उद्योगासाठी | 797 | 1119 |
| | एकूण | 1561 | 2945 |

पाण्याची गरज - दलघमी

| अक्र | वर्ष | पाण्याची गरज | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | नागरी | ग्रामिण | पशूधन | एकूण |
| 1 | 1991 | 688 | 45 | 31 | 764 |
| 2 | 2030 | 1693 | 90 | 43 | 1826 |

7.3 लाभक्षेत्र विकास : सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे.

क्षेत्र -हजार हेक्टर

| भाग-1ची(शेतचाऱ्या इ )कामे | | | भाग-2 ची (सपाटीकरण इ) कामे | | | प्रकल्पाच्या |
|---|---|---|---|---|---|---|
| लाक्षेविप्रा कडील प्रकल्प | लाक्षेविप्रा बाहेरील प्रकल्प | एकूण | लाक्षेविप्रा कडील प्रकल्प | लाक्षेविप्रा बाहेरील प्रकल्प | एकूण | लाभक्षेत्रा व्यतिरिक्त अन्य क्षेत्रात झालेले जमीन सपाटी-करणाचे क्षेत्र |
| 1.16 | 1.12 | 2.28 | - | 0.97 | 0.97 | 0.39 |

सिंचन क्षेत्राच्या तूलनेने लाभक्षेत्र विकासाची प्राकृतिक व्यवस्था फारच कमी क्षेत्रावर पूर्ण झालेली दिसते. या क्षेत्रात लाभक्षेत्र विकास कामाची अमूलाग्र पुनर्रचना होणे अगत्याचे आहे.

7.4 जलसंपत्तीचा ताळेबंद : भूपृष्ठावरील उपलब्ध जलसंपत्ती, भूजलाचे वार्षिक पूनर्भरण, पुनरूद्‌भव, इतर खोऱ्यातील पाण्याचे संक्रमण, व त्याचा वापर याचा ताळेबंद सारणी 21.7 मध्ये दर्शविला आहे.

7.5 सन 1970 पूर्वीची धरणे : या खोरेसमुहात शंभर वर्षापूर्वीची चार जलाशये, तर सत्तर वर्षापूर्वीची तीन जलाशये आहेत. स्वातंत्र्यानंतर या खोऱ्यात चार प्रकल्प झालेले आहेत. तपशील खालीलप्रमाणे आहे.

| योजनेचे नाव | उपखोरे | पूर्ण झाल्याचे वर्ष |
|---|---|---|
| 1) तानसा योजना | | |
| टप्पा-1 | वैतरणा उपखोरे | 1892 |
| टप्पा-2 | वैतरणा उपखोरे | 1915 |
| टप्पा-3 | वैतरणा उपखोरे | 1925 |
| टप्पा-4 | वैतरणा उपखोरे | 1948 |
| 2) वैतरणा व तानसा योजना | | |
| व्ही.सी.टी. योजना | वैतरणा उपखोरे | 1957 |
| 3) उल्हास नदी | उल्हास | 1967 |
| 4) अप्पर वैतरणा | वैतरणा | 1973 |

8.0 पीक रचना

खोरेसमुहात पेरणीखालचे 3 लक्ष 49 हजार हेक्टर आहे. त्यात खरीपाचा वाटा मोठा आहे. भात हे प्रमुख पीक आहे. धान्यपिकाची दरहेक्टरी सरासरी उत्पादकता पुढीलप्रमाणे आहे.

उत्पादकता- क्वि/हे

| अक्र | पीक | उत्पादकता |
|---|---|---|
| 1 | भात | 23.76 |
| 2 | नागली | 8.41 |
| 3 | कडधान्यें | 6.71 |
| 4 | गळीतधान्ये | 6.60 |

## 9.0 उद्योगधंदे

या खोरेसमुहात शेती व्यवसायाच्या तुलनेत सघन औद्योगिकीकरण जास्त झालेले आहे. मात्र त्यात स्थानिक कृषी उत्पन्नाच्या आधारावरचे उद्योगधंदे नसून दुरवरुन येणाऱ्या मालावर आधारीत उद्योगव्यवस्था आहे. यात कापड गिरण्यांचा फार मोठा वाटा आहे. प्रमुख कृषी आधारीत उद्योगधंद्यांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| तपशील | संख्या |
|---|---|
| साखर कारखाने | — |
| सूत गिरण्या | 2 |
| कापड गिरण्या | 481 |

## 10.0 जलविद्युत निर्मिती

अनुकूल भौगोलिक रचनेमुळे या खोरेसमुहात जलविद्युत निर्मितीस भरपूर वाव आहे. आतापर्यन्त वैतरणा, भिवपूरी (टाटा), भातसा, खोपोली (टाटा) या चार जलविद्युत प्रकल्पांचे काम पूर्ण झालेले असून त्या अन्वये 220.50 मेगावॅट क्षमता निर्माण झाली आहे. या पैकी टाटा कंपनीच्या मालकीचे दोन प्रकल्प आहेत. भविष्यात एकूण 31 जलविद्युत प्रकल्प प्रस्तावित केलेले आहेत, व खोऱ्यात तारापुर येथे अणूवीज प्रकल्प असुन त्याची क्षमता 320 मेवॅ आहे. त्यातील महाराष्ट्राचा वाटा 190 मेवॅ आहे. प्रस्तावित प्रकल्पांचा तपशील सारणी 21.8 मध्ये दिलेला आहे.

## 11.0 दळणवळणाची साधने

खोरेसमुहातील रेल्वेमार्गाची एकूण लांबी 400 किमी आहे. रस्त्यांची एकूण लांबी 1616 किमी आहे, यात राष्ट्रीय महामार्गाची लांबी 266 किमी आहे तर राज्यमहामार्गाची लांबी 1350 किमी आहे. दळणवळणाच्या साधनांची माहिती सारणी 21.9 मध्ये दिली आहे.

## 12.0 भावी नियोजनाची दिशा

12.1 या खोरेसमूहात वार्षिक सरासरी जलसंपत्ती 21369 दलघमी आहे. याच खोरेसमूहात टाटा जलविद्युत प्रकल्पात वीज निर्माण झाल्यानंतर पूर्ववाहिनी 521 दलघमी पाणी पश्चिम वाहिनी करण्यात आले आहे. अशा रीतीने एकूण पाणी पुढील प्रमाणे आहे.

पाणी- दलघमी

| | | |
|---|---|---|
| 1) सरासरी उपलब्धता | | 21369 |
| 2) टाटा प्रकल्प अवजल | | |
| i) | शिरवटा, वळवण, लोणावळा (खोपोली)(पाताळगंगा) | 521 |
| ii) | आंध्रा (भिवपुरी) (उल्हास) | |
| | एकूण | 21890 |

12.2 या खोरेसमूहात वैतरणा, उल्हास व पाताळगंगा या नद्या व त्यांच्या उपनद्यांवर 4 मोठे, 55 लघु व 79 को.प.बंधारे यांच्या माध्यमातून 1178 दलघमी एवढा चलपाणीसाठा निर्माण केला आहे.विसाव्या शतकाच्या सुरूवातीला टाटा जलविद्युत कंपनीने भीमा खोऱ्यात देशावर मुळशी,शिरवटा,वळवण,ठोकरवाडी (आंध्रा) व लोणावळा येथे जलाशय बांधले. जलविद्युत निर्मिती नंतर हे पाणी पश्चिमेला पाताळगंगा खोऱ्यात 179.4 दलघमी व उल्हास खोऱ्यात 341.2 दलघमी इतके येते. यामुळे या खोऱ्यात मिळणाऱ्या बारमाही पाण्याची उपलब्धता वाढली आहे. अंबा, सावित्री व कुंडलिका या खोरेसमूहात (मध्य कोकण) 680 दलघमी इतके पाणी टाटा जलाशयातून वळविण्यात येते. उत्तर कोकण व मध्य कोकणात मिळून टाटा जलविद्युत प्रकल्पातून पश्चिमेकडे वळविल्या जाणाऱ्या पाण्याचे कमाल परिमाण (कृष्णा लवादाच्या निर्णयाप्रमाणे) कोणत्याही सलग पाच वर्षात 6002 दलघमी (212 अघफू)पेक्षा अधिक असावयास नको.

उत्तर कोकणातील सर्वाधिक लांबीचे वैतरणा नदीचे उपखोरे आहे.वैतरणा नदीच्या उगमाजवळच ऊर्ध्व वैतरणा या नावाने बांधलेल्या प्रकल्पाच्या धरणामुळे निर्माण झालेल्या जलाशयातून विद्युत निर्मिती नंतर बाहेर पडणारे 224 दलघमी पाणी प्रतिदिन मुंबईला पिण्यासाठी पुरविण्यात येते.

वैतरणा व अळवंडी अशी दोन धरणे जवळ जवळ बांधलेली असून त्यातून एक संयुक्त जलाशय निर्माण झालेला आहे. धरणाच्या एका बाजूला कटक येथे मातीचे धरण बांधून पूर्वेकडे (गोदावरी खोऱ्यात) जलाशयाचे पाणी वाहण्यापासून सध्या अडवण्यात आलेले आहे.पश्चिमवाहिनी नद्यांचे पाणी तुटीच्या पूर्वेकडील खोऱ्यात स्थलांतरीत करण्यासाठी आवश्यक ती नैसर्गिक अनुकूलता या स्थळी सहज लाभलेली आहे. अशा प्रकारची इतकी सहज ठिकाणे अजून अन्यत्र पाहणीत आलेली नाहीत.

गोदावरीच्या ऊर्ध्व भागात पाण्याची चणचण असल्यामुळे पश्चिमवाहिनी पाणी शक्य तेथे पूर्वेकडे वळवणे आवश्यक आहे. तथापि वैतरणा जलविद्युत प्रकल्पाची सध्याची गरज भागवून सुध्दा केवळ चांगल्या पर्जन्यमानाच्या वर्षात सुध्दा ( 100 वर्षात 40 वर्षे ) म्हणजे 40 टक्के विश्वासार्हतेनुसार अतिरिक्त पाणी गोदावरी-दारणा खोऱ्यांमध्ये सहजपणे उपलब्ध होऊ शकते. वैतरणा प्रकल्पाच्या जलोत्सारिणी वरून पश्चिमेकडे वाहून जाणारे पाणी कटक बंधाऱ्याच्या पूर्ण संचयपातळीस ( 603.47 मी) पूर्वेकडे सांडवा काढून मुकणे जलाशयात येऊ शकते.

शिवाय वैतरणा जलाशयाच्या पूर्णसंचय पातळीपर्यंत साठविलेले पाणीही पूर्ववाहिनी करून गोदावरी खोऱ्यात वापरासाठी आणणे यापुढे आवश्यक राहणार आहे.

मुंबई महानगरपालिकेने वैतरणा प्रकल्पाचा 40 टक्के खर्चाचा वाटा उचललेला असल्यामुळे त्यांना प्रतिदिन 121 दलघमी पाणी अन्य स्रोतातून पुरवण्याची व्यवस्था मात्र करावी लागेल व तशी व्यवस्था उत्तर कोकणातील एकूण उपलब्ध पाण्याचा विचार करता सहजपणे शक्य आहे. मुंबईमहानगर परिसराच्या विकासासाठी पाण्याचे नियोजन करण्याचे जे अभ्यास झाले आहेत त्यात एवढया पाण्याची व्यवस्था करण्यात काही अडचण दिसत नाही शिवाय 60 मेवॅ क्षमतेच्या वैतरणा वीजगृहाचे रूपांतर उदंचन वीजगृहात करणे किंवा सहयाद्रिच्या कडयाच्या आधाराने जे अनेक उदंचन प्रकल्प (6210 मेवॅ एकूण स्थापित क्षमता देऊ शकणारे) शक्य आहेत त्यातील काही प्राथमिकतेने पूर्ण करुन सध्या वैतरणेतून मिळणाऱ्या 60 मेवॅ ची गरज भागविणे काहीच अवघड नाही.

वैतरणा जलविद्युत केंद्र 1976 मध्ये कार्यान्वित झालेले आहे. विद्युत जनित्रे साधारणतः 25 वर्षानंतर बदलावी लागतात. त्यामुळे या बदलाचीही आता वेळ आलेली आहे. यावेळी या जलविद्युत केंद्राचे रूपांतर उदंचन जलविद्युत निर्मिती केंद्रात करणे युक्त राहील.

आयोगाने 13 मार्च 1997 रोजी उत्तर कोकणातील शहापूर (जिल्हा ठाणे ) जवळील जांभे या लघु पाटबंधारे प्रकल्पास भेट दिली होती. सर्व कोकणातच जमिनीचा उतार जास्त व पावसाचे प्रमाण जास्त असल्यामुळे पाटबंधारे प्रकल्पांचे कालवे व चाऱ्या यावर आधारित परंपरागत वितरण व्यवस्था नीट टिकून राहात नाही असा अनुभव आहे.यावर उपाय म्हणून निवडक प्रकल्पांवर बंद पाईपची वितरण व्यवस्था राबविण्यात आली आहे.जांभे हा त्यातील एक प्रकल्प होय. या प्रकल्पावर धरणापासूनच बंद पाईपची वितरण व्यवस्था कार्यान्वित करण्यात आलेली आहे. त्यामुळे जांभे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात रब्बी हंगामात लाभधारकांना मोजून पाणी मिळण्याची शाश्वती निर्माण झाली आहे. त्यामुळे रब्बी सिंचन वाढलेले आहे. पीकपध्दतीत मात्र अजून विविधता आलेली नाही.सुमारे 80 ते 90 टक्के क्षेत्रावर भातच- तोही भातावर भात घेतला जातो. भाजीपाला व फळबागा काही ठिकाणी आहेत, पण पीक पध्दतीत वैविध्य आणणे या प्रमुख हेतुने जी बंद पाईपची वितरण व्यवस्था राबविण्यात आली तिचा पूर्ण लाभ अजून स्थानिक कृषि व्यवस्थेने घेतलेला नाही. नळांमधून पाणी वितरण करण्याच्या व्यवस्थेचा खर्च परंपरागत कालवे-चाऱ्या पध्दतीच्या दुप्पटीने असतो. त्यामुळे तो खर्च पेलू शकणारी अधिक मूल्यदायी पीकरचना बसविल्याशिवाय या नव्या वितरण व्यवस्थेला स्थैर्य येणार नाही व तिचा कोकणात इतरत्र अवलंब होणार नाही. त्यादृष्टिने पिकरचने बाबत सघन संशोधन येत्या 10 वर्षांत या परिसरात होणे तातडीने गरजेचे आहे.

12.3 भातसा व सूर्या हे दोन मोठे बहुउद्देशिय प्रकल्प या खोऱ्यात आहेत. त्यात सिंचन सुविधा मोठया सिंचन प्रकल्पांप्रमाणे निर्माण होऊन बराचसा कालावधी झाला असला तरी नियोजीत सिंचनाचा वापर होत नाही. शिवाय या भागातील सिंचनाची वाढ ही नागरी प्रदेशाच्या प्रभावाखाली असल्यामुळे सिंचनासाठी मजुरांची उपलब्धता हा एक अडचणीचा भाग ठरत आहे. या पार्श्वभूमीवर नागरी प्रभावाखालील सिंचनावर पीकरचनेचा विकास हा वेगळ्या पध्दतीने करण्याची गरज आहे. सिंचन प्रकल्पांच्या परिसरातील उजाड/विरळ वृक्षांच्या जमिनींचा वापर करून सिंचित वने उभारण्याचाही विचार करता येण्यासारखा आहे.

12.4 या खोऱ्यात ठाणे जिल्हयात घाटमाथ्यावर पश्चिम उतारावर 3.6 दलघमी जलधारण क्षमतेचा घाटघर निम्न जलाशय बांधून या प्रकल्पांतर्गत भुयारामध्ये 250 मेवॅ जलविद्युत निर्मिती क्षमता असलेली उदंचन योजना बांधकामाधिन आहे. या योजनेतील ऊर्ध्व जलाशय मात्र पूर्व वाहिनी उतारावर आहे. या योजनेच्या तत्वावर अतिरिक्त पश्चिमवाहीनी पाणी उचलून पूर्वेकडील नद्यांसाठी कितपत उपलब्ध करून देता येऊ शकेल याचाही तपशीलवार अभ्यास यापुढे होणे आवश्यक आहे.

पश्चिमघाटावर पाऊस मुबलक पडतो. पण पाणी वापरास मात्र मर्यादा आहेत. पूर्व घाटावर पाण्याची उपलब्धता कमी आहे. पाण्याची गरज मात्र आधिक आहे. ही दरी भरून काढण्यासाठी पश्चिमघाटावरील आधिकचे पाणी पूर्वे कडे वळविले जाणे आवश्यक आहे. वैतरणा-मुकणे सारखी जलाशयातूनच सरळपणे आंतरखोरे पाणी स्थलांतर करण्यासाठी अन्यत्र जागा दिसत नाहीत. म्हणून या पुढील संभाव्य जलविद्युत निर्मितिच्या उदंचन योजनांचा यासाठी कसा वापर करून घेता येईल याचा अधिक तपशिलात लवकर विचार व्हायला हवा आहे.

12.5 पाताळगंगा व उल्हास खोऱ्यात पाण्याच्या नैसर्गिक उपलब्धतेत टाटा जलविद्युत प्रकल्पातून वळविलेले 521 दलघमी पाणी प्रतिवर्षी अतिरिक्त येत असल्यामुळे पाण्याची गरज अधिक असलेल्या उद्योगधंदयांच्या (रासायनिक वगैरे) वाढीला पोषक परिस्थिति आहे. त्या दृष्टीने अस्तित्वात आलेल्या कारखान्यांमुळे प्रदूषण समस्येची तीव्रता या खोऱ्यात वाढलेली आहे. त्यावर परिणामकारक उपाय तातडीने आवश्यक आहेत.

12.6 **मुंबई व मुंबई महानगर परिसरातील नागरी व आद्योगिक पाणी पुरवठा**

मुंबई व मुंबई परिसराची लोकसंख्याघनता व उद्योगाची गर्दी कोकणातीलच इतर क्षेत्राच्या तुलनेत फारच जास्त असल्यामुळे त्या परिसराला लागणाऱ्या पाण्याचा विचार स्वतंत्रपणे वेळोवेळी झालेला आहे. महाराष्ट्रातील सुमारे दीड कोटी लोकसंख्या या परिसरात असून सर्वाधिक लोकसंख्येची घनता असलेला हा भाग आहे. देशभरातून नोकरी निमित्त या भागात मोठया प्रमाणात होणारे लोकसंख्येचे स्थलांतर आगामी तीस वर्षांत तरी प्रभावीपणे रोखण्याची अन्य काही योजना सध्या अस्तित्वात नसल्याने या भागातील लोकसंख्या काही प्रमाणात यापुढेही 20–25 वर्षांत तरी वाढतीच राहील असे गृहित धरून उत्तर कोकण खोऱ्यातील पाण्याचे नियोजन करणे इष्ट राहील. त्यादृष्टीने नागरी व उद्योगांना लागणारे पाणी अगोदर बाजूस काढून नंतरच्या उर्वरीत पाण्यावर सिंचन / सिंचित वने यांचा विचार करावा लागेल.

**मुंबई महानगर**

डॉ. माधवरावजी चितळे यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई शहराच्या पाण्याच्या गरजेचा विचार करण्यासाठी एक 'तज्ज्ञ समिती' नेमली होती. समितीचा अहवाल डिसेंबर 1994 मध्ये शासनास सादर करण्यात आला. शासनाने समितीच्या शिफारशी जून-1996 मध्ये मान्य केल्या आहेत.

आजवर केवळ मागणी प्रमाणे पाण्याचे प्रश्न हाताळण्यात आले होते, परंतु आता यापुढील पाण्याचे स्त्रोत फार खर्चिक राहणार असल्यामुळे पाण्याच्या मागणीचेही नियोजन करणे आवश्यक झाले आहे; असे त्या समितीने सुचवले आहे. शिवाय आजवर पुरवठयात वाढ करणाऱ्या योजनांना प्राधान्यक्रम देण्यात आला होता, परंतु त्या बरोबर जादा उपलब्ध पाण्याच्या विल्हेवाटीच्या योजना न घेतल्यामुळे सांडपाण्याची, तदनुषंगिक पर्यावरणाची व मानवी आरोग्याच्या धोक्यांची समस्या वाढलेली आहे. शिवाय मुंबई पाणीपुरवठयाच्या योजना फक्त मुंबई शहराचाच विचार करुन तयार करण्यात आल्या होत्या. या पुढील योजना मुंबई महानगराशेजारच्या प्रदेशांची गरज एकत्रितपणे लक्षात घेऊन व्यापक क्षेत्रीय योजना म्हणून आखण्यात याव्यात असेही त्या समितीने सुचविले आहे. उत्तर कोकण खोरेसमूहाच्या पुरवठा नियोजनात पाणी नियोजनाची ही दिशा यापुढे फार महत्वाची राहणार आहे.

**भविष्यातील आराखडा – भूपृष्ठावरील पाणी**

मुंबईला होणाऱ्या पाणीपुरवठया पैकी बराचसा पुरवठा महानगर क्षेत्राच्याही बाहेरुन करावा लागतो. दूरवरच्या स्रोतांतून पाणी आणण्याच्या खर्चात होणारी या पुढील वाढ व

अस्तित्वातील व्यवस्थांची दुरुस्ती व नूतनीकरण यावरील यापुढे लागणारा संभाव्य खर्च लक्षात घेता मुंबई शहर व मुंबई महानगर परिसर यातील लोकसंख्या व पाणीवापर करणारे उद्योग यांची वाढ यावर उत्तर कोकण खोरेसमूहाच्या व्यापक विकासाचे नियोजन करणे क्रमप्राप्त झाले आहे. उल्हास व वैतरणा या खोऱ्यातील सिंचनाची गरज भागवून औद्योगिक वापराकरिता व नागरी वापराकरिता मुंबई महानगर प्रदेशात 7097 दलघमी पाणी उपलब्ध होऊ शकेल असे दिसते. पण त्याचा यापुढील उपयोग लोकसंख्येच्या व उद्योगांच्या विकेंद्रीकरणासाठी होणे आवश्यक आहे. पाण्याचा वाढत्या गरजा भागविण्यासाठी (पिण्यासाठी व औद्योगिक वापराकरीता) खालील प्रकल्पांची शिफारस वरील समितीने तीच्या अहवालात केलेली आहे.

| खोरे | प्रकल्प | पाणीपुरवठा दलली/प्रतिदिन |
|---|---|---|
| वैतरणा | मध्य वैतरणा | 470 |
| | गारगई | 455 |
| | पिंजाळ | 865 |
| उल्हास | काळू | 590 |
| | शाई | 1067 |
| | एकूण | 3447 |

पाण्याचे हे सर्व स्रोत सध्याच्या सघन लोकसंख्येच्या क्षेत्रापासून 50 किमी लांब आहेत. तेव्हा स्रोतांच्या जवळच्या परिसरात अधिक सवलती उपलब्ध करुन देऊन विकेंद्रीकरणास चालना देता येईल.

**मुंबई महानगर प्रदेश**

या प्रदेशात 22 शहरे व 102 खेडी आहेत. सन 1991 ची लोकसंख्या 38 लक्ष असून संकल्पित 2025 ची लोकसंख्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या 1991 च्या अंदाजाप्रमाणे 85.17 लक्ष होईल व त्याची सन 2025 मधील पाण्याची गरज 906 दललि प्रतिदिन राहील. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अंदाजानुसार 2030 साली उद्योगाकरिता 394 दललि/प्रतिदिन पाण्याची गरज असणार आहे. सध्या पिण्याच्या पाण्याकरिता मुख्यतः मुंबई महानगरपालिकेने विकसित केलेल्या स्रोतांवर व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने बांधलेल्या बारवी, रामसई धरणांवर अवलंबून रहावे लागत आहे. सिंचन विभागाने सूर्या,हेटवणे हे दोन मोठे प्रकल्प पूर्ण केले आहेत. तसेच मोरबे प्रकल्पाचे काम चालू आहे. पोशीर प्रकल्प हाती घ्यावयाचा आहे.

या परिसराची वाढ औद्योगिक वसाहतीमुळे झपाटयाने होत आहे. म्हणून मुंबई महानगरपालिकेच्या पाण्याच्या गरजेप्रमाणेच या परिसरातील नागरी व औद्योगिक केंद्राच्या पाण्याच्या गरजेची नीट व्यवस्था बसवली जाणे आवश्यक झालेले आहे. त्यासाठी शासनाने नुकतीच डॉ. माधवरावजी चितळे यांचें अध्यक्षतेखाली एक स्वतंत्र समिती नेमली आहे. त्यासमितीचा स्वतंत्र अहवाल लवकरचं अपेक्षित आहे. आयोगाचे सदस्य डॉ. कद्रेकर यांनाही त्या समितीच्या कामात समाविष्ट करून घेण्यात आलेले आहे. एकंदरीनेच या परिसराच्या पाण्याचे नियोजन व व्यवस्थापन यांत 'सिंचन' हा प्रधान घटक न रहाता औद्योगिक व महानगरीय गरजा हा प्रधान घटक रहाणार आहे. पाण्याच्या समान स्रोतांवर अवलंबून असलेल्या उत्तर कोकण खोरेसमूहातील विविध गरजा पहाता मुंबई महानगर प्रदेशाच्या पाणीवापराचा एकत्रित विचार करणारी व नियोजन आणि नियमन करणारी संस्थात्मक

व्यवस्था तात्काळ कारवाईत आणणे अत्यंत आवश्यक आहे. 1974 मध्ये मुंबई महानगर प्रदेशासाठी पद्मभूषण एन्.जी.के.मूर्ती यांच्या अध्यक्षतेखाली जलसंपदा व्यवस्थापन मंडळ स्थापन करण्यात आले होते. ते चालू राहिले असते, तर गेल्या 25 वर्षात वाढलेल्या गुंतागुंती वाढल्या नसत्या. आता तरी निदान पुन्हा नव्याने उत्तर कोकण खोरे समूहाच्या पाणी नियोजन व नियमन यासाठी तातडीने उच्चस्तरीय मंडळ नेमले जाणे आवश्यक आहे. यापुढे क्रमशः सर्वच उपखोऱ्यांसाठी अशाप्रकारच्या उपखोरे नियोजन-नियमन समित्या सुचविण्यात आल्या आहेत. पण त्यापेक्षा या उपखोऱ्याचे स्वरूप वेगळे असल्यामुळे तेथे नागरी व औद्योगिक पाण्याची उपयोग व्यवस्था केंद्रीत असल्यामुळे व त्या पाण्याच्या निचऱ्याच्या समस्या, पर्यावरण व प्रदूषणाच्या समस्या वाढत्या असल्यामुळे या उपखोऱ्यासाठी मुख्य अभियंता स्तराच्या दर्जाची स्वतंत्र उपखोरे नियोजन व नियमन समिती आवश्यक राहील. अन्यत्र ही समिती अधीक्षक अभियंत्याच्या स्तरावर सुचवली आहे.

12.7 या खोरेसमुहातील भौगोलिक क्षेत्राच्या 39 टक्के इतके क्षेत्र लागवडी योग्य क्षेत्र आहे. या खोऱ्यात पाण्याची विपूल उपलब्धता आहे. तेंव्हा या खोऱ्यात जास्त पाणी लागणारे व नागरी पूरवठयाला उपयोगी येणारे कृषी उत्पादन वाढवणाऱ्या अनूकूलता आहे. त्यादृष्टीने येथील सिंचन पिकांची व तज्जन्य व्यापार व प्रक्रिया व्यवहारांची बांधणी होणे आवश्यक आहे. सिंचन क्षेत्रात भाजीपाला उत्पादनास विशेष वाव देणे आवश्यक आहे.

उत्तर कोकणात खार जमिनीचे शेती क्षेत्रही बरेच–म्हणजे 30,399 हेक्टर आहे, त्याची सुधारणा व त्यावरील पिकरचना यांचा वेगळा विचार वाढत्या नागरीकरणाच्या गरजांच्या संदर्भात करावा लागेल.

000

सारणी : 21.1

**भौगोलिक तपशील**

तलांक-मी, लांबी-किमी

| अक्र | नदी | उपनदी | लांबी | उगमस्थान | | संगमस्थान | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ठिकाण | तलांक | ठिकाण | तलांक |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1 | वैतरणा | | 171 | त्र्यंबकेश्वर | 1300 | अर्नाळा खाडी | 0 |
| | | सूर्या | 70 | जव्हारजवळ | 460 | खडकोली | 11 |
| | | देहरजी | 48 | चाव्याचा पाडा | 460 | हमरापूर | 40 |
| | | पिंजाळ | 61 | देवगाव | 707 | पिंगापाडा | 30 |
| | | तानसा | 68 | दहीगाव | 445 | दहीसर | 9 |
| 2 | उल्हास | | 145 | ठाकूरवाडी | 827 | वसई खाडी | 0 |
| | | भातसा | 75 | तळेगाव | 620 | नंदहूर | 12 |
| | | काळू | 90 | हरिश्चंद्र गड | 1424 | मोहनेजवळ | 8 |
| | | कानवी | 26 | रणविहार | 390 | शेलवली | 50 |
| | | शाई | 35 | रतनगड | 1297 | खापरी | 95 |
| | | बारवी | 40 | सिदघर | 1152 | आपटी | 25 |
| | | पोशीर | 30 | भीमाशंकर | 1005 | निकोंप | 33 |
| | | शिलार | 26 | डूक्कर पाडा | 902 | जीते | 41 |
| | | पेज | 22 | धांगरवाडी | 971 | नसरापूर | 45 |
| 3 | पाताळगंगा | | 54 | दस्तूरी | 822 | धरमतर खाडी | 0 |
| | | कासाडी | 15 | हाजीमलंग | 778 | पनवेल खाडी | 0 |
| | | गाढी | 28 | माथेरान | 766 | पनवेल खाडी | 0 |
| | | बाळगंगा | 32 | सावरोली | 300 | रावे | 8 |
| | | भोगेश्वरी | 40 | गांडव | 314 | धरमतर खाडी | 0 |

## सारणी : 21.2

## हवामानाचा तपशील

पर्जन्यमान, बाष्पीभवन-मिमी

| अक्र | महिना | पर्जन्यमान | बाष्पीभवन | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | कासा | सुकसाळे | खापरी | चौक | सरासरी |
| 1 | जानेवारी | 0 | 102 | 119 | 144 | 168 | 133 |
| 2 | फेब्रूवारी | 0 | 123 | 151 | 168 | 178 | 155 |
| 3 | मार्च | 0 | 164 | 232 | 240 | 212 | 212 |
| 4 | एप्रिल | 1 | 186 | 249 | 272 | 232 | 235 |
| 5 | मे | 5 | 190 | 259 | 300 | 238 | 247 |
| 6 | जून | 460 | 83 | 141 | 154 | 130 | 127 |
| 7 | जुलै | 1074 | 60 | 48 | 68 | 40 | 54 |
| 8 | ऑगस्ट | 798 | 51 | 54 | 69 | 57 | 58 |
| 9 | सप्टेंबर | 339 | 58 | 70 | 70 | 76 | 69 |
| 10 | ऑक्टोबर | 79 | 103 | 113 | 97 | 147 | 115 |
| 11 | नोव्हेंबर | 10 | 102 | 115 | 129 | 154 | 125 |
| 12 | डिसेंबर | 2 | 88 | 109 | 133 | 155 | 121 |
| | एकूण | 2768 | 1310 | 1660 | 1844 | 1787 | 1651 |

हंगाम निहाय बाष्पीभवन

| अक्र | हंगाम | बाष्पीभवन |
|---|---|---|
| 1 | खरीप | 238 |
| 2 | रब्बी | 592 |
| 3 | उन्हाळी | 821 |
| | एकूण | 1651 |

सारणी : 21.2 (चालू)

पर्जन्यमानाचा तपशील

पर्जन्यमान-मिमी

| अक्र | वर्ष | वार्षिक सरासरी पर्जन्यमान | उतरत्या क्रमाने पर्जन्यमान | संगत वर्ष | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| केंद्र : कल्याण | | | | | |
| 1 | 1901 | 2304 | 4231 | 1958 | |
| 2 | 1902 | 2154 | 3664 | 1954 | |
| 3 | 1903 | 2758 | 3585 | 1961 | |
| 4 | 1904 | 1901 | 3493 | 1956 | |
| 5 | 1905 | 1162 | 3348 | 1971 | |
| 6 | 1906 | 2255 | 3338 | 1931 | |
| 7 | 1907 | 2572 | 3213 | 1976 | |
| 8 | 1908 | 2110 | 3198 | 1946 | 10 |
| 9 | 1909 | 2565 | 3194 | 1975 | |
| 10 | 1910 | 2092 | 3140 | 1943 | |
| 11 | 1911 | 1826 | 3124 | 1926 | |
| 12 | 1912 | 2299 | 3118 | 1917 | |
| 13 | 1913 | 2591 | 3116 | 1945 | |
| 14 | 1914 | 3070 | 3070 | 1914 | |
| 15 | 1915 | 1953 | 3062 | 1944 | |
| 16 | 1916 | 2115 | 3049 | 1970 | 20 |
| 17 | 1917 | 3118 | 3049 | 1959 | |
| 18 | 1918 | 1278 | 3034 | 1937 | |
| 19 | 1919 | 2382 | 3012 | 1938 | |
| 20 | 1920 | 1540 | 2988 | 1983 | |
| 21 | 1921 | 2577 | 2969 | 1942 | |
| 22 | 1922 | 2279 | 2960 | 1955 | |
| 23 | 1923 | 2016 | 2852 | 1977 | |
| 24 | 1924 | 2126 | 2848 | 1933 | 30 |
| 25 | 1925 | 1646 | 2787 | 1957 | |
| 26 | 1926 | 3124 | 2764 | 1984 | |
| 27 | 1927 | 2187 | 2758 | 1903 | |
| 28 | 1928 | 2152 | 2682 | 1953 | |
| 29 | 1929 | 1282 | 2648 | 1934 | |
| 30 | 1930 | 2308 | 2616 | 1940 | |
| 31 | 1931 | 3338 | 2591 | 1913 | |

पर्जन्यमान-मिमी

| अक्र | वर्ष | वार्षिक सरासरी पर्जन्यमान | उतरत्या क्रमाने पर्जन्यमान | संगत वर्ष | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 32 | 1932 | 1803 | 2579 | 1949 | |
| 33 | 1933 | 2848 | 2577 | 1921 | |
| 34 | 1934 | 2648 | 2572 | 1907 | |
| 35 | 1935 | 2183 | 2565 | 1909 | |
| 36 | 1936 | 2182 | 2548 | 1973 | |
| 37 | 1937 | 3034 | 2486 | 1947 | |
| 38 | 1938 | 3012 | 2466 | 1964 | |
| 39 | 1939 | 1984 | 2403 | 1960 | |
| 40 | 1940 | 2616 | 2382 | 1919 | 50 |
| 41 | 1941 | 1619 | 2308 | 1930 | |
| 42 | 1942 | 2969 | 2304 | 1901 | |
| 43 | 1943 | 3140 | 2299 | 1912 | |
| 44 | 1944 | 3062 | 2279 | 1922 | |
| 45 | 1945 | 3116 | 2274 | 1948 | |
| 46 | 1946 | 3198 | 2272 | 1980 | |
| 47 | 1947 | 2486 | 2255 | 1906 | |
| 48 | 1948 | 2274 | 2187 | 1927 | |
| 49 | 1949 | 2579 | 2183 | 1935 | |
| 50 | 1950 | 1640 | 2182 | 1936 | |
| 51 | 1951 | 2108 | 2175 | 1979 | |
| 52 | 1952 | 2149 | 2159 | 1981 | |
| 53 | 1953 | 2682 | 2154 | 1902 | |
| 54 | 1954 | 3664 | 2152 | 1928 | |
| 55 | 1955 | 2960 | 2149 | 1952 | |
| 56 | 1956 | 3493 | 2126 | 1924 | |
| 57 | 1957 | 2787 | 2115 | 1916 | |
| 58 | 1958 | 4231 | 2110 | 1908 | |
| 59 | 1959 | 3049 | 2108 | 1951 | |
| 60 | 1960 | 2403 | 2092 | 1910 | |
| 61 | 1961 | 3585 | 2079 | 1986 | |
| 62 | 1964 | 2466 | 2052 | 1974 | |
| 63 | 1968 | 1906 | 2016 | 1923 | |
| 64 | 1970 | 3049 | 1984 | 1939 | |
| 65 | 1971 | 3348 | 1971 | 1978 | |

पर्जन्यमान-मिमी

| अक्र | वर्ष | वार्षिक सरासरी पर्जन्यमान | उतरत्या क्रमाने पर्जन्यमान | संगत वर्ष | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 66 | 1972 | 1579 | 1953 | 1915 | |
| 67 | 1973 | 2548 | 1906 | 1968 | |
| 68 | 1974 | 2052 | 1901 | 1904 | |
| 69 | 1975 | 3194 | 1891 | 1982 | |
| 70 | 1976 | 3213 | 1882 | 1985 | |
| 71 | 1977 | 2852 | 1826 | 1911 | |
| 72 | 1978 | 1971 | 1803 | 1932 | 90 |
| 73 | 1979 | 2175 | 1649 | 1950 | |
| 74 | 1980 | 2272 | 1646 | 1925 | |
| 75 | 1981 | 2159 | 1619 | 1941 | |
| 76 | 1982 | 1891 | 1579 | 1972 | |
| 77 | 1983 | 2988 | 1540 | 1920 | |
| 78 | 1984 | 2764 | 1282 | 1929 | |
| 79 | 1985 | 1882 | 1278 | 1918 | |
| 80 | 1986 | 2079 | 1162 | 1905 | |

| | |
|---|---|
| सरासरी | 2462 |
| प्रमाप विचलन | 597 |
| दोलायमानता गुणांक | 24 |

पर्जन्यमान-मिमी

| अक्र | वर्ष | वार्षिक सरासरी पर्जन्यमान | उतरत्या क्रमाने पर्जन्यमान | संगत वर्ष | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| केंद्र : कुलाबा-मुंबई | | | | | |
| 1 | 1901 | 1964 | 3474 | 1954 | |
| 2 | 1902 | 1828 | 3414 | 1983 | |
| 3 | 1903 | 2142 | 3318 | 1958 | |
| 4 | 1904 | 847 | 3227 | 1958 | |
| 5 | 1905 | 853 | 2822 | 1956 | |
| 6 | 1906 | 1427 | 2792 | 1975 | |
| 7 | 1907 | 2554 | 2757 | 1949 | |
| 8 | 1908 | 1326 | 2689 | 1959 | |
| 9 | 1909 | 1809 | 2625 | 1970 | 10 |
| 10 | 1910 | 1724 | 2584 | 1988 | |
| 11 | 1911 | 1180 | 2573 | 1956 | |
| 12 | 1912 | 1373 | 2554 | 1907 | |
| 13 | 1913 | 1803 | 2525 | 1963 | |
| 14 | 1914 | 2072 | 2494 | 1917 | |
| 15 | 1915 | 1947 | 2489 | 1931 | |
| 16 | 1916 | 2183 | 2473 | 1974 | |
| 17 | 1917 | 2494 | 2444 | 1940 | |
| 18 | 1918 | 866 | 2443 | 1971 | |
| 19 | 1919 | 1733 | 2424 | 1985 | 20 |
| 20 | 1920 | 1010 | 2394 | 1959 | |
| 21 | 1921 | 2185 | 2377 | 1953 | |
| 22 | 1922 | 1751 | 2373 | 1967 | |
| 23 | 1923 | 1963 | 2359 | 1955 | |
| 24 | 1924 | 1324 | 2338 | 1938 | |
| 25 | 1925 | 1293 | 2315 | 1977 | |
| 26 | 1926 | 1769 | 2298 | 1960 | |
| 27 | 1927 | 1887 | 2286 | 1930 | |
| 28 | 1928 | 2177 | 2275 | 1945 | 30 |
| 29 | 1929 | 1503 | 2251 | 1955 | |
| 30 | 1930 | 2286 | 2220 | 1984 | |
| 31 | 1931 | 2489 | 2187 | 1961 | |
| 32 | 1932 | 1872 | 2185 | 1921 | |

पर्जन्यमान-मिमी

| अक्र | वर्ष | वार्षिक सरासरी पर्जन्यमान | उतरत्या क्रमाने पर्जन्यमान | संगत वर्ष | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 33 | 1933 | 1585 | 2183 | 1916 | |
| 34 | 1934 | 1860 | 2177 | 1928 | |
| 35 | 1935 | 2074 | 2142 | 1903 | |
| 36 | 1936 | 1483 | 2119 | 1960 | |
| 37 | 1937 | 1734 | 2076 | 1942 | |
| 38 | 1938 | 2338 | 2074 | 1935 | |
| 39 | 1939 | 1381 | 2072 | 1914 | |
| 40 | 1940 | 2444 | 2060 | 1943 | |
| 41 | 1941 | 908 | 2024 | 1962 | |
| 42 | 1942 | 2076 | 2023 | 1965 | |
| 43 | 1943 | 2060 | 2011 | 1946 | |
| 44 | 1944 | 1880 | 1964 | 1964 | |
| 45 | 1945 | 2275 | 1964 | 1901 | |
| 46 | 1946 | 2011 | 1963 | 1923 | |
| 47 | 1947 | 1958 | 1958 | 1947 | 50 |
| 48 | 1948 | 1814 | 1947 | 1981 | |
| 49 | 1949 | 2757 | 1947 | 1915 | |
| 50 | 1950 | 1563 | 1938 | 1987 | |
| 51 | 1951 | 1785 | 1922 | 1980 | |
| 52 | 1952 | 1609 | 1903 | 1976 | |
| 53 | 1953 | 2377 | 1893 | 1989 | |
| 54 | 1954 | 3474 | 1887 | 1927 | |
| 55 | 1955 | 2251 | 1880 | 1944 | |
| 56 | 1956 | 2573 | 1874 | 1957 | |
| 57 | 1957 | 1775 | 1872 | 1932 | |
| 58 | 1958 | 3318 | 1860 | 1934 | |
| 59 | 1959 | 2394 | 1850 | 1973 | |
| 60 | 1960 | 2119 | 1842 | 1982 | |
| 61 | 1961 | 2187 | 1840 | 1978 | |
| 62 | 1962 | 2024 | 1828 | 1902 | |
| 63 | 1963 | 2525 | 1827 | 1979 | |
| 64 | 1964 | 1964 | 1814 | 1948 | |
| 65 | 1965 | 2023 | 1809 | 1909 | |
| 66 | 1966 | 1561 | 1803 | 1913 | |

पर्जन्यमान-मिमी

| अक्र | वर्ष | वार्षिक सरासरी पर्जन्यमान | उतरत्या क्रमाने पर्जन्यमान | संगत वर्ष | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 67 | 1967 | 2373 | 1785 | 1951 | |
| 68 | 1968 | 958 | 1775 | 1957 | |
| 69 | 1969 | 1553 | 1769 | 1926 | |
| 70 | 1970 | 2625 | 1751 | 1922 | |
| 71 | 1971 | 2443 | 1734 | 1937 | |
| 72 | 1972 | 1510 | 1733 | 1919 | |
| 73 | 1973 | 1850 | 1724 | 1910 | |
| 74 | 1974 | 2473 | 1609 | 1952 | |
| 75 | 1975 | 2792 | 1585 | 1933 | |
| 76 | 1976 | 1903 | 1563 | 1950 | |
| 77 | 1977 | 2315 | 1561 | 1966 | |
| 78 | 1978 | 1840 | 1553 | 1969 | |
| 79 | 1979 | 1827 | 1510 | 1972 | |
| 80 | 1980 | 1922 | 1503 | 1929 | |
| 81 | 1981 | 1947 | 1483 | 1936 | |
| 82 | 1982 | 1842 | 1427 | 1906 | |
| 83 | 1983 | 3414 | 1381 | 1939 | |
| 84 | 1984 | 2220 | 1373 | 1912 | |
| 85 | 1985 | 2424 | 1326 | 1908 | 90 |
| 86 | 1986 | 1287 | 1324 | 1924 | |
| 87 | 1987 | 1938 | 1293 | 1925 | |
| 88 | 1988 | 2584 | 1287 | 1986 | |
| 89 | 1989 | 1893 | 1180 | 1911 | |
| 90 | 1955 | 2359 | 1010 | 1920 | |
| 91 | 1956 | 2822 | 958 | 1968 | |
| 92 | 1957 | 1874 | 908 | 1941 | |
| 93 | 1958 | 3227 | 866 | 1918 | |
| 94 | 1959 | 2689 | 853 | 1905 | |
| 95 | 1960 | 2298 | 847 | 1904 | |

| | |
|---|---|
| सरासरी | 1989 |
| प्रमाण विचलन | 537 |
| दोलायमानता गुणांक | 27 |

सारणी : 21.3

**पर्जन्यमापन केंद्रनिहाय तपशील**

पर्जन्य-मिमी

| अक्र | केंद्र | प्रकार | स्वामित्व | आधार सामुग्री उपलब्धीचा कालावधी | वार्षिक सरासरी पर्जन्य |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| **अ)** | **वैतरणा खोरे** | | | | |
| 1 | आक्रे | स्व.प. | पा.खा. | 1973 ते 95 | 2617 |
| 2 | अलमन | स्व.प. | पा.खा. | 1989 ते 95 | 2089 |
| 3 | अंधारी | स्व.प. | पा.खा. | 1980 ते 95 | 2536 |
| 4 | बोरांडे | स्व.प. | पा.खा. | 1982 ते 95 | 2243 |
| 5 | चिखलीपाडा | स्व.प. | पा.खा. | 1976 ते 95 | 2577 |
| 6 | चिंचारा | स्व.प. | पा.खा. | 1989 ते 95 | 3346 |
| 7 | चिंचघर | सा.प. | पा.खा. | 1982 ते 95 | 2405 |
| 8 | चौक | सा.प. | पा.खा. | 1980 ते 95 | 2723 |
| 9 | धनिवरी | स्व.प. | पा.खा. | 1989 ते 95 | 2417 |
| 10 | धोंडबारी | स्व.प. | पा.खा. | 1976 ते 95 | 2551 |
| 11 | डोगस्ते | सा.प. | पा.खा. | 1982 ते 95 | 2690 |
| 12 | गांजे | स्व.प. | पा.खा. | 1981 | ते 95 |
| 13 | हमरापूर | स्व.प. | पा.खा. | 1989 ते 95 | 2380 |
| 14 | जव्हार | स्व.प. | पा.खा. | 1973 ते 95 | 2673 |
| 15 | जुगलवाडी | स्व.प. | पा.खा. | 1977 ते 95 | 2572 |
| 16 | जुनी जव्हार | स्व.प. | पा.खा. | 1980 ते 95 | 2840 |
| 17 | कळंब भोर | स्व.प. | पा.खा. | 1989 ते 95 | 2393 |
| 18 | कासा (बु) | स्व.प. | पा.खा. | 1973 ते 95 | 2593 |
| 19 | केगवा | स्व.प. | पा.खा. | 1980 ते 95 | 2470 |
| 20 | खामलोली | स्व.प. | पा.खा. | 1982 ते 95 | 2495 |
| 21 | खांड | सा.प. | पा.खा. | 1982 ते 95 | 2164 |
| 22 | खिडसे | स्व.प. | पा.खा. | 1989 ते 95 | 2354 |
| 23 | खोडाळे | सा.प. | पा.खा. | 1968 ते 95 | 2727 |
| 24 | खुदेड | स्व.प. | पा.खा. | 1989 ते 95 | 2508 |
| 25 | खटल | स्व.प. | पा.खा. | 1982 ते 95 | 2394 |
| 26 | माण | स्व.प. | पा.खा. | 1983 ते 95 | 2175 |
| 27 | मोहोखुर्द | सा.प. | पा.खा. | 1989 ते 95 | 2020 |
| 28 | नद्यांचा पाडा | स्व.प. | पा.खा. | 1976 ते 95 | 2372 |

पर्जन्य-मिमी

| अक्र | केंद्र | प्रकार | स्वामित्व | आधार सामुग्री उपलब्धीचा कालावधी | वार्षिक सरासरी पर्जन्य |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 29 | नांदगाव | स्व.प. | पा.खा. | 1990 ते 95 | 2571 |
| 30 | निहा | स्व.प. | पा.खा. | 1977 ते 95 | 2066 |
| 31 | ओगदे | सा.प. | पा.खा. | 1977 ते 95 | 2962 |
| 32 | ओझर | स्व.प. | पा.खा. | 1973 ते 95 | 2842 |
| 33 | पालघर | स्व.प. | पा.खा. | 1990 ते 95 | 2187 |
| 34 | पाथर्डी | सा.प. | पा.खा. | 1990 ते 95 | 3484 |
| 35 | पाथरपाडा | सा.प. | पा.खा. | 1980 ते 95 | 2531 |
| 36 | पिंपळास | स्व.प. | पा.खा. | 1982 ते 95 | 2089 |
| 37 | रानकोळ | सा.प. | पा.खा. | 1982 ते 95 | 2305 |
| 38 | सावरखांडा | सा.प. | पा.खा. | 1982 ते 95 | 2391 |
| 39 | शेंडसरी | स्व.प. | पा.खा. | 1976 ते 95 | 2660 |
| 40 | सोमटा | स्व.प. | पा.खा. | 1982 ते 95 | 2597 |
| 41 | सुकसाळे | स्व.प. | पा.खा. | 1982 ते 95 | 2399 |
| 42 | सुर्यमाळ | स्व.प. | पा.खा. | 1977 ते 95 | 2874 |
| 43 | सुर्यानगर | स्व.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 2544 |
| 44 | उसगाव | सा.प. | पा.खा. | 1982 ते 95 | 2825 |
| 45 | विक्रमगड | सा.प. | पा.खा. | 1970 ते 95 | 2763 |
| 46 | वडपाडा | सा.प. | पा.खा. | 1990 ते 95 | 2574 |
| 47 | वाघिवली | सा.प. | पा.खा. | 1978 ते 95 | 2259 |
| 48 | दहिसर | सा.प. | पा.खा. | 1993 ते 95 | 2765 |
| 49 | तलासरी | सा.प. | म.खा. | 1972 ते 95 | 2667 |
| 50 | माहिमपालघर | सा.प. | म.खा. | 1901 ते 95 | 1970 |
| 51 | जव्हार | सा.प. | म.खा. | 1901 ते 95 | 3215 |
| 52 | डहाणू | स्व.प. | म.खा. | 1901 ते 95 | 1871 |
| 53 | अस्वली हर्ष | सा.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 2584 |
| 54 | चंद्राची मेट | सा.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 2806 |
| 55 | देवगाव | सा.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 2666 |
| 56 | निरगुडपाडा | सा.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 3101 |
| 57 | पहिणे | सा.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 2999 |
| 58 | सॅडलडॅम | सा.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 1808 |
| 60 | साखरपाडा | सा.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 2851 |

पर्जन्य-मिमी

| अक्र | केंद्र | प्रकार | स्वामित्व | आधार सामुग्री उपलब्धीचा कालावधी | वार्षिक सरासरी पर्जन्य |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 61 | श्रीघाट | सा.प. | पा.खा. | 1982 ते 95 | 2591 |
| 62 | वैतरणा | स्व.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 2285 |
| 63 | वांजोडे | सा.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 1741 |
| 64 | झारवाडा | सा.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 1950 |
| 65 | वाडा | सा.प. | म.खा. | 1901 ते 95 | 2654 |
| 66 | उंबरपाडा | सा.प. | पा.खा. | 1979 ते 95 | 2521 |
| 67 | हत्तीपाडा | सा.प. | पा.खा. | 1992 ते 95 | 2886 |
| 68 | खोच | सा.प. | पा.खा. | 1991 ते 95 | 2651 |
| 69 | वाळवंडे | स्व.प. | पा.खा. | 1976 ते 95 | 2836 |
| 70 | परळी | स्व.प. | पा.खा. | 1993 ते 95 | 2476 |
| 71 | कोचाळे | स्व.प. | पा.खा. | 1989 ते 95 | 2641 |
| **ब)** | **उल्हास खोरे** | | | | |
| 1 | अवसरे धरण | सा.प. | पा.खा. | 1991 ते 95 | 2394 |
| 2 | धामणी | स्व.प. | पा.खा. | 1983 ते 95 | 2297 |
| 3 | कळंब | स्व.प. | पा.खा. | 1976 ते 95 | 2818 |
| 4 | खांडस | स्व.प. | पा.खा. | 1977 ते 95 | 3043 |
| 5 | कोंडाणे | स्व.प. | पा.खा. | 1983 ते 95 | 3132 |
| 6 | कुरूंग | स्व.प. | पा.खा. | 1980 ते 95 | 2745 |
| 7 | नालधे | स्व.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 2814 |
| 8 | नांदगाव | स्व.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 2780 |
| 9 | नरसापुर | सा.प. | पा.खा. | 1988 ते 95 | 3538 |
| 10 | ओलमन | स्व.प. | पा.खा. | 1976 ते 95 | 2871 |
| 11 | पाषाणे | सा.प. | पा.खा. | 1991 ते 95 | 4087 |
| 12 | पाथरज | स्व.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 2082 |
| 13 | साळोख | सा.प. | पा.खा. | 1991 ते 95 | 2090 |
| 14 | तळवाडी | सा.प. | पा.खा. | 1988 ते 95 | 3249 |
| 15 | तुंगवाडी | स्व.प. | पा.खा. | 1991 ते 95 | 2817 |
| 16 | आडिवली | सा.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 2495 |
| 17 | आंबापाडा | सा.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 2471 |
| 18 | औरे | स्व.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 2343 |
| 19 | बांधिवली | स्व.प. | पा.खा. | 1989 ते 95 | 2607 |

पर्जन्य-मिमी

| अक्र | केंद्र | प्रकार | स्वामित्व | आधार सामुग्री उपलब्धीचा कालावधी | वार्षिक सरासरी पर्जन्य |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 20 | बावघर | स्व.प. | पा.खा. | 1989 ते 95 | 2467 |
| 21 | बेलपाडा | सा.प. | पा.खा. | 1990 ते 95 | 3118 |
| 22 | बेडशील | सा.प. | पा.खा. | 1991 ते 95 | 2340 |
| 23 | भागदळ | स्व.प. | पा.खा. | 1977 ते 95 | 2370 |
| 24 | भातसानगर | स्व.प. | पा.खा. | 1968 ते 95 | 2554 |
| 25 | भोज | सा.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 2367 |
| 26 | मूईशेत | स्व.प. | पा.खा. | 1976 ते 95 | 2648 |
| 27 | नेणे | सा.प. | पा.खा. | 1979 ते 95 | 2516 |
| 28 | दादामियाँ | स्व.प. | पा.खा. | 1991 ते 95 | 2946 |
| 29 | दांड | स्व.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 2698 |
| 30 | देवखिंडपाडा | सा.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 2541 |
| 31 | धामणे | स्व.प. | पा.खा. | 1980 ते 95 | 2406 |
| 32 | धसई | स्व.प. | पा.खा. | 1977 ते 95 | 2206 |
| 33 | धसई धरण | सा.प. | पा.खा. | 1991 ते 95 | 2290 |
| 34 | डोळखांब | सा.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 2781 |
| 35 | दूधनोली | स्व.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 2418 |
| 36 | गोंदयाचा पाडा | सा.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 2455 |
| 37 | गोरेगाव | सा.प. | पा.खा. | 1990 ते 95 | 3136 |
| 38 | हाजीमलंग | स्व.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 3885 |
| 39 | हिरेवाडी | स्व.प. | पा.खा. | 1980 ते 95 | 2638 |
| 40 | जांभे | सा.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 2515 |
| 41 | कळंबाड | स्व.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 2285 |
| 42 | कळंबोली | स्व.प. | पा.खा. | 1985 ते 95 | 2684 |
| 43 | कसारा | स्व.प. | पा.खा. | 1967 ते 95 | 2568 |
| 44 | खडावली | सा.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 2696 |
| 45 | खांडपे | सा.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 2250 |
| 46 | खापरी | स्व.प. | पा.खा. | 1970 ते 95 | 2434 |
| 47 | खराडे | सा.प. | पा.खा. | 1986 ते 95 | 2947 |
| 48 | खर्डी | स्व.प. | पा.खा. | 1967 ते 95 | 2459 |
| 49 | खोडवापाडा | स्व.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 2591 |
| 50 | किन्हवली | सा.प. | पा.खा. | 1977 ते 95 | 2382 |

पर्जन्य-मिमी

| अक्र | केंद्र | प्रकार | स्वामित्व | आधार सामुग्री उपलब्धीचा कालावधी | वार्षिक सरासरी पर्जन्य |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 51 | कोथळा | स्व.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 2726 |
| 52 | दुगाड | सा.प. | पा.खा. | 1980 ते 95 | 3040 |
| 53 | कुंदाची वाडी | स्व.प. | पा.खा. | 1980 ते 95 | 2892 |
| 54 | कुशिवली | सा.प. | पा.खा. | 1980 ते 95 | 2932 |
| 55 | लाखेचीवाडी | सा.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 2877 |
| 56 | लोहारवाडी | स्व.प. | पा.खा. | 1980 ते 95 | 2304 |
| 57 | मानिवली | सा.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 2326 |
| 58 | मोरोची | स्व.प. | पा.खा. | 1971 ते 95 | 2659 |
| 59 | मुसई | सा.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 2262 |
| 60 | नडगांव | सा.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 2363 |
| 61 | नालेपाडा | सा.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 2413 |
| 62 | नामपाडा | स्व.प. | पा.खा. | 1977 ते 95 | 2434 |
| 63 | पाटोळ | स्व.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 2356 |
| 64 | फांगलोशी | स्व.प. | पा.खा. | 1976 ते 95 | 2850 |
| 65 | पिंपळास | सा.प. | पा.खा. | 1980 ते 95 | 2639 |
| 66 | पुंडास | सा.प. | पा.खा. | 1980 ते 95 | 2800 |
| 67 | रघुवाडी | सा.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 2522 |
| 68 | साजिवली | स्व.प. | पा.खा. | 1967 ते 95 | 2484 |
| 69 | साखरोली | स्व.प. | पा.खा. | 1980 ते 95 | 2424 |
| 70 | साकुर्ली | स्व.प. | पा.खा. | 1976 ते 95 | 2992 |
| 71 | सारंगपुरी | स्व.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 2617 |
| 72 | शहापुर | स्व.प. | पा.खा. | 1967 ते 95 | 2447 |
| 73 | शेलवली | स्व.प. | पा.खा. | 1989 ते 95 | 2271 |
| 74 | शेंदुण | सा.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 2579 |
| 75 | शिरोळ | सा.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 2400 |
| 76 | साकडबाव | स्व.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 2694 |
| 77 | तळवाडे | स्व.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 3029 |
| 78 | टेभूर्ली | स्व.प. | पा.खा. | 1976 ते 95 | 2747 |
| 79 | टेंमगांव | स्व.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 2402 |
| 80 | ठाकुरवाडी | सा.प. | पा.खा. | 1992 ते 95 | 2431 |
| 81 | ठुणे | सा.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 2451 |

पर्जन्य-मिमी

| अक्र | केंद्र | प्रकार | स्वामित्व | आधार सामुग्री उपलब्धीचा कालावधी | वार्षिक सरासरी पर्जन्य |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 82 | टिटवाळा | स्व.प. | पा.खा. | 1995 ते 95 | |
| 83 | तुळई | सा.प. | पा.खा. | 1979 ते 95 | 2572 |
| 84 | उंबरपाडा | सा.प. | पा.खा. | 1970 ते 95 | 2521 |
| 85 | सरळगांव | स्व.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 2220 |
| 86 | वेल्होळी | सा.प. | पा.खा. | 1990 ते 95 | 2823 |
| 87 | वेल्होळी खुर्द | सा.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 2319 |
| 88 | वडवली | सा.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 2426 |
| 89 | वालिवरे | स्व.प. | पा.खा. | 1989 ते 95 | 2599 |
| 90 | वेळूक | स्व.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 2583 |
| 91 | वाशाळा | स्व.प. | पा.खा. | 1967 ते 95 | 2706 |
| 92 | वाशिंद | सा.प. | पा.खा. | 1981 ते 95 | 2479 |
| 93 | येऊर | स्व.प. | पा.खा. | 1980 ते 95 | 2765 |
| 94 | कर्जत | सा.प. | म.खा. | 1901 ते 95 | 3369 |
| 95 | भिवंडी | सा.प. | म.खा. | 1901 ते 95 | 2513 |
| 96 | कल्याण | सा.प. | म.खा. | 1901 ते 95 | 2428 |
| 97 | मूरबाड | सा.प. | म.खा. | 1901 ते 95 | 2468 |
| 98 | शहापुर | सा.प. | म.खा. | 1901 ते 95 | 2573 |
| 99 | ठाणे | सा.प. | म.खा. | 1901 ते 95 | 2487 |
| 100 | उल्हासनगर | सा.प. | म.खा. | 1901 ते 95 | 2392 |
| 101 | वसई | सा.प. | म.खा. | 1901 ते 95 | 2061 |
| **क)** | **पाताळगंगा खोरे** | | | | |
| 1 | चौक | स्व.प. | पा.खा. | | 3021 |
| 2 | बोरगांव | स्व.प. | पा.खा. | 1988 ते 95 | 3276 |
| 3 | साजगांव | सा.प. | पा.खा. | 1988 ते 95 | 3155 |
| 4 | खानाव | सा.प. | पा.खा. | 1988 ते 95 | 3047 |
| 5 | रानसई | सा.प. | पा.खा. | 1988 ते 95 | 2577 |
| 6 | शेडूंग | सा.प. | पा.खा. | 1988 ते 95 | 3153 |
| 7 | पोयंजे | सा.प. | पा.खा. | 1988 ते 95 | 3264 |
| 8 | आपटा | स्व.प. | पा.खा. | 1991 ते 95 | 2950 |
| 9 | बडगांव | स्व.प. | पा.खा. | 1990 ते 95 | 2835 |
| 10 | शिरवली | सा.प. | पा.खा. | 1990 ते 95 | 3381 |

पर्जन्य-मिमी

| अक्र | केंद्र | प्रकार | स्वामित्व | आधार सामुग्री उपलब्धीचा कालावधी | वार्षिक सरासरी पर्जन्य |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 11 | हातींड | सा.प. | पा.खा. | 1991 ते 95 | 3252 |
| 12 | नाडेवाडी | सा.प. | पा.खा. | 1991 ते 95 | 3110 |
| 13 | खांबेवाडी | सा.प. | पा.खा. | 1991 ते 95 | 3103 |
| 14 | नरसई | सा.प. | पा.खा. | 1991 ते 95 | 3031 |
| 15 | कामार्ली | सा.प. | पा.खा. | 1993 ते 95 | 2882 |
| 16 | कानपोली | सा.प. | पा.खा. | 1992 ते 95 | 3017 |
| 17 | मानघर | सा.प. | पा.खा. | 1993 ते 95 | 1781 |
| 18 | पुनाडे | सा.प. | पा.खा. | 1993 ते 95 | 2350 |
| 19 | मोरबे | सा.प. | पा.खा. | 1991 ते 95 | 3093 |
| 20 | खोपोली | सा.प. | पा.खा. | 1976 ते 95 | 3534 |
| 21 | भिलवले | सा.प. | पा.खा. | 1992 ते 95 | 3341 |
| 22 | कलोते -मोकाशी | सा.प. | पा.खा. | 1991 ते 95 | 3116 |
| 23 | बामणोली | सा.प. | पा.खा. | 1993 ते 85 | 3046 |
| 24 | माथेरान | सा.प. | रेल्वे | 1901 ते 95 | 5161 |
| 25 | एच.डब्ल्यु.ई ऑफिस | सा.प. | टाटा कंपनी | 1991 ते 95 | 4212 |
| 26 | खालापुर | सा.प. | म.खा. | 1991 ते 95 | 3320 |
| 27 | पनवेल | सा.प. | म.खा. | 1991 ते 95 | 2864 |
| 28 | पेण | सा.प. | म.खा. | 1991 ते 95 | 2916 |
| 29 | अंबेकर | सा.प. | पा.खा. | 1993 ते 95 | 3316 |
| 30 | भोगेश्वरी | सा.प. | पा.खा. | 1987 ते 95 | 2991 |
| 31 | डोणवत | सा.प. | पा.खा. | 1993 ते 95 | 3260 |
| 32 | मोहिली | सा.प. | पा.खा. | 1991 ते 95 | 3156 |
| 33 | वाडी | सा.प. | पा.खा. | 1991 ते 95 | 3941 |
| 34 | उरण | सा.प. | म.खा. | 1901 ते 95 | 2157 |
| 35 | खोपोली (म.औ.वि.म.) | सा.प. | पा.खा. | 1994 ते 95 | 2641 |
| 36 | उरण | स्व.प. | पा.खा. | 1992 ते 95 | 1990 |

सारणी : 21.4

**सरितामापन केंद्रांचा तपशील**

येवा-दलघमी

| अक्र | सरितामापन केंद्राचे नाव | स्वामित्व | आधारसामुग्री उपलब्धता कालावधी | वार्षिक सरासरी येवा |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| **अ)** | **वैतरणा** | | | |
| 1 | अलमन | पा.खा. | 1994 ते 1995 | 1079.87 |
| 2 | अंधारी | पा.खा. | 1978 ते 1995 | 777.64 |
| 3) | चिंचारा | पा.खा. | 1994 ते 1995 | 1355.11 |
| 4) | करळगाव(हमरापूर) | पा.खा. | 1978 ते 1995 | 1193.96 |
| 5) | कासा(बु) | पा.खा. | 1978 ते 1995 | 315.2 |
| 6) | मुरमी पाडा | पा.खा. | 1978 ते 1995 | 217.26 |
| 7) | परळी | पा.खा. | 1993 ते 1995 | 200.27 |
| 8) | वाघिवली | पा.खा. | 1978 ते 1995 | 38.66 |
| **ब)** | **उल्हास** | | | |
| 9) | देवखिंड पाडा | पा.खा. | 1981 ते 1995 | 94.36 |
| 10) | धामणे | पा.खा. | 1978 ते 1995 | 140.09 |
| 11) | खापरी | पा.खा. | 1978 ते 1995 | 567.77 |
| 12) | नामपाडा | पा.खा. | 1978 ते 1995 | 539.79 |
| 13) | शेलवली | पा.खा. | 1992 ते 1995 | 225.17 |
| 14) | दूणे | पा.खा. | 1992 ते 1995 | 128.98 |
| 15) | टिटवाळा | पा.खा. | 1994 ते 1995 | 362.51 |
| 16) | कळंब | पा.खा. | 1978 ते 1995 | 538.8 |
| 17) | नालथे | पा.खा. | 1994 ते 1995 | 182.64 |
| **क)** | **पाताळगंगा** | | | |
| 18) | चौक | पा.खा. | 1978 ते 1995 | 237.38 |
| 19) | कामार्ली | पा.खा. | 1982 ते 1995 | 226.4 |
| 20) | कानपोली | पा.खा. | 1994 ते 1995 | 97.89 |
| 21) | मानघर | पा.खा. | 1994 ते 1995 | 182.64 |
| 22) | रानसई | पा.खा. | 1994 ते 1995 | 32.99 |
| 23) | साजगाव | पा.खा. | 1994 ते 1995 | 95.86 |
| 24) | वाडी | पा.खा. | 1993 ते 1995 | 157.81 |

सारणी : 21.5

**जलसंपत्तीची उपलब्धता**

पर्जन्य- मिमी. येवा-दलघमी

| अक्र | वर्ष | वार्षिक सरासरी पर्जन्य | वार्षिक सरासरी येवा | उतरत्या क्रमाने विसर्ग | संगत वर्ष | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ) वैतरणा खोरे** | | | | | | |
| 1 | 1966 | 2640 | 8611 | 11920 | 1976 | |
| 2 | 1967 | 3220 | 10661 | 10739 | 1970 | |
| 3 | 1968 | 2515 | 8167 | 10661 | 1967 | 10 |
| 4 | 1969 | 3179 | 10514 | 10154 | 1969 | |
| 5 | 1970 | 3242 | 10739 | 10236 | 1994 | |
| 6 | 1971 | 2644 | 8622 | 10110 | 1975 | 20 |
| 7 | 1972 | 2061 | 6563 | 9696 | 1983 | |
| 8 | 1973 | 2853 | 9363 | 9591 | 1988 | |
| 9 | 1974 | 2253 | 7241 | 9575 | 1981 | 30 |
| 10 | 1975 | 3064 | 10110 | 9363 | 1973 | |
| 11 | 1976 | 3576 | 11920 | 9139 | 1990 | |
| 12 | 1977 | 2594 | 8447 | 8639 | 1993 | 40 |
| 13 | 1978 | 2182 | 6989 | 8622 | 1971 | |
| 14 | 1979 | 2256 | 7252 | 8611 | 1966 | |
| 15 | 1980 | 2463 | 7984 | 8447 | 1977 | 50 |
| 16 | 1981 | 2913 | 9575 | 8191 | 1984 | |
| 17 | 1982 | 2092 | 6672 | 8167 | 1968 | |
| 18 | 1983 | 2947 | 9696 | 7984 | 1980 | 60 |
| 19 | 1984 | 2522 | 8191 | 7374 | 1992 | |
| 20 | 1985 | 2149 | 6871 | 7368 | 1991 | |
| 21 | 1986 | 1958 | 6197 | 7252 | 1979 | 70 |
| 22 | 1987 | 1853 | 5825 | 7241 | 1974 | |
| 23 | 1988 | 2917 | 9591 | 6989 | 1978 | 75 |
| 24 | 1989 | 1850 | 5814 | 6871 | 1985 | 80 |
| 25 | 1990 | 2790 | 9139 | 6672 | 1982 | |
| 26 | 1991 | 2289 | 7368 | 6563 | 1972 | |
| 27 | 1992 | 2291 | 7374 | 6197 | 1986 | 90 |
| 28 | 1993 | 2648 | 8639 | 5825 | 1987 | |
| 29 | 1994 | 3100 | 10236 | 5814 | 1989 | |
| 30 | 1995 | 1756 | 5481 | 5481 | 1995 | |

$\frac{\text{10 टक्के उपलब्धता}}{\text{90 टक्के उपलब्धता}} = 1.72$

$\frac{\text{50 टक्के उपलब्धता}}{\text{90 टक्के उपलब्धता}} = 1.36$

$\frac{\text{50 टक्के उपलब्धता}}{\text{75 टक्के उपलब्धता}} = 1.21$

पर्जन्य- मिमी. येवा-दलघमी

| अक्र | वर्ष | वार्षिक सरासरी पर्जन्य | वार्षिक सरासरी येवा | उतरत्या क्रमाने विसर्ग | संगत वर्ष | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| **आ) थेट समुद्रास मिळणाऱ्या नद्यांचे प्रवाह** | | | | | | |
| 1 | 1966 | 1477 | 1480 | 3186 | 1983 | |
| 2 | 1967 | 2255 | 2388 | 3000 | 1976 | |
| 3 | 1968 | 1541 | 1555 | 2769 | 1970 | 10 |
| 4 | 1969 | 2156 | 2272 | 2691 | 1981 | |
| 5 | 1970 | 2582 | 2769 | 2538 | 1994 | |
| 6 | 1971 | 1942 | 2023 | 2489 | 1988 | 20 |
| 7 | 1972 | 1262 | 1230 | 2388 | 1967 | |
| 8 | 1973 | 2206 | 2330 | 2330 | 1973 | |
| 9 | 1974 | 1682 | 1719 | 2302 | 1980 | 30 |
| 10 | 1975 | 2149 | 2264 | 2272 | 1969 | |
| 11 | 1976 | 2781 | 3000 | 2270 | 1993 | |
| 12 | 1977 | 1913 | 1988 | 2264 | 1975 | 40 |
| 13 | 1978 | 1363 | 1348 | 2164 | 1979 | |
| 14 | 1979 | 2063 | 2164 | 2023 | 1971 | |
| 15 | 1980 | 2182 | 2302 | 19988 | 1977 | 50 |
| 16 | 1981 | 2116 | 2691 | 1949 | 1990 | |
| 17 | 1982 | 1702 | 1743 | 1872 | 1992 | |
| 18 | 1983 | 2940 | 3186 | 1828 | 1991 | 60 |
| 19 | 1984 | 1496 | 1503 | 1743 | 1982 | |
| 20 | 1985 | 1668 | 1704 | 1719 | 1974 | |
| 21 | 1986 | 1335 | 1315 | 1704 | 1985 | 70 |
| 22 | 1987 | 1551 | 1567 | 1567 | 1987 | |
| 23 | 1988 | 2342 | 2489 | 1559 | 1989 | 75 |
| 24 | 1989 | 1544 | 1559 | 1555 | 1968 | 80 |
| 25 | 1990 | 1879 | 1949 | 1521 | 1995 | |
| 26 | 1991 | 1775 | 1828 | 1503 | 1984 | |
| 27 | 1992 | 1813 | 1872 | 1480 | 1966 | 90 |
| 28 | 1993 | 2154 | 2270 | 1348 | 1978 | |
| 29 | 1994 | 2384 | 2538 | 1315 | 1986 | |
| 30 | 1995 | 1511 | 1521 | 1230 | 1972 | |
| **इ) उल्हास खोरे** | | | | | | |
| 1 | 1966 | 2336 | 6998 | 10534 | 1976 | |
| 2 | 1967 | 2690 | 8219 | 10168 | 1990 | |
| 3 | 1968 | 2243 | 6679 | 9794..63 | 1983 | 10 |
| 4 | 1969 | 2727 | 8348 | 9496 | 1975 | |
| 5 | 1970 | 2838 | 8728 | 9473 | 1994 | |

पर्जन्य- मिमी. येवा-दलघमी

| अक्र | वर्ष | वार्षिक सरासरी पर्जन्य | वार्षिक सरासरी येवा | उतरत्या क्रमाने विसर्ग | संगत वर्ष | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| 6 | 1971 | 2765 | 8476 | 9233 | 1988 | 20 |
| 7 | 1972 | 1907 | 5520 | 9092 | 1993 | |
| 8 | 1973 | 2665 | 8206 | 8728 | 1970 | |
| 9 | 1974 | 2319 | 6942 | 8476 | 1971 | 30 |
| 10 | 1975 | 3061 | 9496 | 8460 | 1977 | |
| 11 | 1976 | 3362 | 10534 | 8348 | 1969 | |
| 12 | 1977 | 2760 | 8460 | 8219 | 1967 | 40 |
| 13 | 1978 | 2247 | 6693 | 8206 | 1973 | |
| 14 | 1979 | 2392 | 7191 | 8146 | 1981 | |
| 15 | 1980 | 2563 | 7780 | 7869 | 1984 | 50 |
| 16 | 1981 | 2669 | 8186 | 7841 | 1991 | |
| 17 | 1982 | 2199 | 6528 | 7780 | 1980 | |
| 18 | 1983 | 3147 | 9795 | 7191 | 1979 | 60 |
| 19 | 1984 | 2558 | 7869 | 7023 | 1989 | |
| 20 | 1985 | 2152 | 6365 | 6998 | 1966 | |
| 21 | 1986 | 2111 | 6225 | 6942 | 1974 | 70 |
| 22 | 1987 | 1841 | 529 | 6728 | 1992 | |
| 23 | 1988 | 2984 | 9233 | 6693 | 1978 | 75 |
| 24 | 1989 | 2343 | 7023 | 6679 | 1968 | 80 |
| 25 | 1990 | 3256 | 10168 | 6528 | 1982 | |
| 26 | 1991 | 2580 | 7841 | 6365 | 1985 | |
| 27 | 1992 | 2257 | 6728 | 6225 | 1986 | 90 |
| 28 | 1993 | 2943 | 9092 | 5520 | 1972 | |
| 29 | 1994 | 3054 | 9473 | 5294 | 1987 | |
| 30 | 1995 | 1820 | 5221 | 5221 | 1995 | |
| **ई) पाताळगंगा खोरे** | | | | | | |
| 1 | 1966 | 2768 | 2999 | 3722 | 1976 | |
| 2 | 1967 | 2869 | 3121 | 3593 | 1990 | |
| 3 | 1968 | 2259 | 2379 | 3461 | 1983 | 10 |
| 4 | 1969 | 2972 | 3247 | 3355 | 1975 | |
| 5 | 1970 | 3406 | 3776 | 3347 | 1994 | |
| 6 | 1971 | 3098 | 3401 | 3262 | 1988 | 20 |
| 7 | 1972 | 2087 | 2170 | 3212 | 1993 | |
| 8 | 1973 | 2982 | 3260 | 3084 | 1970 | |
| 9 | 1974 | 2839 | 3085 | 2995 | 1971 | 30 |
| 10 | 1975 | 3341 | 3697 | 2989 | 1977 | |
| 11 | 1976 | 3113 | 3419 | 2950 | 1969 | |
| 12 | 1977 | 3152 | 3466 | 2904 | 1967 | 40 |

पर्जन्य- मिमी. येवा-दलघमी

| अक्र | वर्ष | वार्षिक सरासरी पर्जन्य | वार्षिक सरासरी येवा | उतरत्या क्रमाने विसर्ग | संगत वर्ष | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| 13 | 1978 | 2965 | 3239 | 2899 | 1973 | |
| 14 | 1979 | 2739 | 2964 | 2878 | 1981 | |
| 15 | 1980 | 3002 | 3284 | 2780 | 1984 | 50 |
| 16 | 1981 | 2921 | 3185 | 2771 | 1991 | |
| 17 | 1982 | 2503 | 2677 | 2749 | 1980 | |
| 18 | 1983 | 3844 | 4309 | 2541 | 1979 | 60 |
| 19 | 1984 | 2978 | 3255 | 2481 | 1989 | |
| 20 | 1985 | 2862 | 3113 | 2473 | 1966 | |
| 21 | 1986 | 2422 | 2577 | 2453 | 1974 | 70 |
| 22 | 1987 | 2373 | 2518 | 2377 | 1992 | |
| 23 | 1988 | 3380 | 3744 | 2365 | 1978 | 75 |
| 24 | 1989 | 2683 | 2896 | 2360 | 1968 | 80 |
| 25 | 1990 | 4210 | 4755 | 2306 | 1982 | |
| 26 | 1991 | 3136 | 3447 | 2249 | 1985 | |
| 27 | 1992 | 2783 | 3017 | 2199 | 1986 | 90 |
| 28 | 1993 | 3621 | 4038 | 1950 | 1972 | |
| 29 | 1994 | 3382 | 3747 | 1871 | 1987 | |
| 30 | 1995 | 2431 | 2589 | 1845 | 1995 | |

सारणी : 21.6

**प्रकल्पांची सद्य:स्थिती**

चलपाणीसाठा - दलघमी

पाणीवापर - दलघमी सिंचनक्षेत्र - हेक्टर

| अक्र | प्रकल्पाचा संवर्ग | पुर्ण झालेले प्रकल्प | | | | प्रगतीपथावरील प्रकल्प | | | | भविष्यकालीन व अन्वेषणाधीन प्रकल्प | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| **अ)** | **वैतरणा खोरे** | | | | | | | | | | | | | | | | |
| 1 | मोठे | अप्पर वैतरणा | 331.31 | 331.3 | | सुर्या | 276.35 | 276.35 | 14696 | मध्य वैतरणा | 210 | 210 | | | 1219.21 | 1219.21 | 14696 |
| | | लोअर वैतरणा | 152.48 | 152.5 | | | | | | गारगाई | 193.53 | 193.53 | | | 346.01 | 346.01 | 0 |
| | | तानसा | 160.68 | 160.7 | | | | | | पिंजाळा | 401.55 | 401.55 | 2852 | | 562.23 | 562.23 | 2852 |
| मोठे एकूण | | 3 | 644.47 | 644.5 | 0 | 1 | 276.35 | 276.35 | 14696 | 3 | 805.08 | 805.08 | 2852 | 7 | 1725.9 | 1725.9 | 17548 |
| 2 | मध्यम | | | | | वांद्रि | 35.94 | 35.94 | 2044 | गिरवली नाला | 117 | 117 | 6540 | | 152.94 | 152.94 | 8584 |
| | | | | | | | | | | देहरजी | 93.24 | 93.24 | 5950 | | 93.24 | 93.24 | 5950 |
| | | 0 | | | | | | | | चिंचघर | 62 | 62 | 3500 | | 62 | 62 | 3500 |
| | | 0 | | | | | | | | सूसरी | 99 | 99 | 2830 | | 99 | 99 | 2830 |
| मध्यम एकूण | | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 35.94 | 35.94 | 2044 | 3 | 371.24 | 371.24 | 18820 | 4 | 407.18 | 407.18 | 20864 |
| 3 | बृहतलघु | | | | | | | | | हातनूर नाला | 19 | 19 | 1296 | | 19 | 19 | 1296 |
| 4 | लघु प्रकल्प | 13 | 34.2 | 34.2 | 2211 | 12 | 28.82 | 28.82 | 2242 | लोहापेनाला | 26 | 26 | 830 | | 89.02 | 89.02 | 5283 |
| 5 | को.प.बंधारे | 71 | 13.53 | 13.53 | 2091 | 13 | 4.13 | 4.13 | 490 | वाषीवली | 19.65 | 19.65 | 1136 | | 37.31 | 37.31 | 3717 |
| | | | | | | | | | | खोलसापाडा | 3.48 | 3.48 | 276 | | 3.48 | 3.48 | 276 |
| | | | | | | | | | | 14 | 38.63 | 38.63 | 1920 | | 38.63 | 38.63 | 1920 |
| | | | | | | | | | | 19 | 51.31 | 51.31 | 4094 | | 51.31 | 51.31 | 4094 |
| | | 84 | 47.73 | 47.73 | 4302 | 25 | 32.95 | 32.95 | 2732 | 38 | 158.07 | 158.07 | 9552 | 147 | 238.75 | 238.75 | 16586 |
| | **एकूण(अ)** | 87 | 692.2 | 692.2 | 4302 | 27 | 345.24 | 345.24 | 19472 | 44 | 1334.39 | 1334.39 | 31224 | 158 | 2371.83 | 2371.83 | 54998 |
| **ब)** | **थेट समूद्रास** | | | | | | | | | | | | | | | | |
| 1 | मोठे | | | | | | | | | | | | | | 0 | 0 | 0 |
| 2 | मध्यम | | | | | | | | | सूत्रकार | 17.42 | 17.42 | 934 | | 17.42 | 17.42 | 934 |
| 3 | बृहतलघु | | | | | | | | | सासर्वड | 25.13 | 25.13 | 1410 | | 25.13 | 25.13 | 1410 |
| 4 | लघुप्रकल्प | 3 | 8.37 | 8.37 | 512 | 5 | 11.74 | 11.74 | 970 | 1 | 6.26 | 6.26 | 484 | | 26.37 | 26.37 | 1966 |
| 5 | को.प.बंधारे | 8 | 0.48 | 0.48 | 133 | | | | | 2 | 8.87 | 8.87 | 600 | | 9.35 | 9.35 | 733 |
| | **एकूण(ब)** | 11 | 8.85 | 8.85 | 645 | 5 | 11.74 | 11.74 | 970 | 5 | 57.68 | 57.68 | 3428 | 21 | 78.27 | 78.27 | 5043 |

जलपाणीसाठा - दलघमी
पाणीवापर - दलघमी सिंचनक्षेत्र - हेक्टर

| अक्र | प्रकल्पाचा संवर्ग | पुर्ण झालेले प्रकल्प | | | | प्रगतीपथावरील प्रकल्प | | | | भविष्यकालीन व अन्वेषणाधीन प्रकल्प | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नाव संख्या | जल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | जल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | जल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | जल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| क) | उल्हास खोरे | | | | | | | | | | | | | | | | |
| 1 | मोठे | बारवी | 124.92 | 124.9 | | भातसा | 942.1 | 942.1 | 23000 | काळू | 383.87 | 383.87 | 15100 | | 1450.89 | 1450.89 | 38100 |
| मोठे एकूण | | 1 | 124.92 | 124.9 | 0 | 1 | 942.1 | 942.1 | 23000 | 1 | 383.87 | 383.87 | 15100 | 3 | 1450.89 | 1450.89 | 38100 |
| 2 | मध्यम | | | | | | | | | शाई | 362.05 | 362.05 | 5300 | | 362.05 | 362.05 | 5300 |
| | | | | | | | | | | शिलार | 256.29 | 256.29 | 1943 | | 256.29 | 256.29 | 1943 |
| | | | | | | | | | | कोंडाणे | 130.8 | 130.8 | 979 | | 130.8 | 130.8 | 979 |
| | | | | | | | | | | पोशीर | 266.1 | 266.1 | | | 266.1 | 266.1 | 0 |
| | | | | | | | | | | कुशीवली | 9.64 | 9.64 | 770 | | 9.64 | 9.64 | 770 |
| | | | | | | | | | | मुमरी | 67.38 | 67.38 | | | 67.38 | 67.38 | 0 |
| | | | | | | | | | | ओरे | 47.3 | 47.3 | | | 47.3 | 47.3 | 0 |
| | | | | | | | | | | साखरोली | 20.38 | 20.38 | | | 20.38 | 20.38 | 0 |
| | | | | | | | | | | भामखोरी | 102.8 | 102.8 | 5760 | | 102.8 | 102.8 | 5760 |
| | | | | | | | | | | डोईफोडी | 53.67 | 53.67 | 3000 | | 53.67 | 53.67 | 3000 |
| | | | | | | | | | | ब्राम्हणपाडा | 12.03 | 12.03 | 670 | | 12.03 | 12.03 | 670 |
| | | | | | | | | | | खानवी | 29.17 | 29.17 | 1000 | | 29.17 | 29.17 | 1000 |
| मध्यम एकूण | | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 12 | 1357.61 | 1357.61 | 19422 | 12 | 1357.61 | 1357.61 | 19422 |
| 3 | बृहतलघु | | | | | पालीभुतावली | 12.75 | 12.75 | 950 | कनकवीरा | 17.04 | 17.04 | 220 | | 29.79 | 29.79 | 1170 |
| | | | | | | | | | | लेनाडी | 18.94 | 18.94 | 955 | | 18.94 | 18.94 | 955 |
| | | | | | | | | | | बारणनाला | 19.81 | 19.81 | 292 | | 19.81 | 19.81 | 292 |
| | | | | | | | | | | कामन | 19.22 | 19.22 | | | 19.22 | 19.22 | 0 |
| | | | | | | | | | | उल्हास नदी | 4.67 | 4.67 | | | 4.67 | 4.67 | 0 |
| | | | | | | | | | | वरील बंधारे | 0 | 0 | 0 | | 0 | 0 | 0 |
| | | | | | | | | | | 1 | 8.77 | 8.77 | 814 | | 8.77 | 8.77 | 814 |
| बृहतलघु एकूण | | | 0 | 0 | 0 | 1 | 12.75 | 12.75 | 950 | 7 | 88.45 | 88.45 | 2281 | 8 | 101.2 | 101.2 | 3231 |
| 4) | लघू | 23 | 81.26 | 81.26 | 5947 | 6 | 11.77 | 11.77 | 932 | 21 | 50.52 | 50.52 | 3822 | 50 | 143.55 | 1063.78 | 9790 |
| | | | | | | | | | | 4 | 10.04 | 10.04 | 820 | 4 | 10.04 | 10 04 | 820 |
| | | | | | | | | | | 14 | 39.92 | 39.92 | 1713 | 14 | 39.92 | 39 92 | 1713 |
| लघू एकूण | | 23 | 81.26 | 81.26 | 5947 | 6 | 11.77 | 11.77 | 932 | 39 | 100.48 | 100.48 | 6355 | 68 | 193.51 | 193.51 | 13234 |

चलपाणीसाठा - दलघमी

पाणीवापर - दलघमी सिंचनक्षेत्र - हेक्टर

| अक्र | प्रकल्पाचा संवर्ग | पुर्ण झालेले प्रकल्प | | | | प्रगतीपथावरील प्रकल्प | | | | भविष्यकालीन व अन्वेषणाधीन प्रकल्प | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 5 | स्थानिक स्थर | 147 | 24.2 | 24.2 | 4368 | 24 | 2.69 | 2.69 | 1103 | 9 | 1.71 | 1.71 | 199 | 180 | 28.6 | 28.6 | 5670 |
| | **स्थानिक स्थर एकूण** | 147 | 24.2 | 24.2 | 4368 | 24 | 2.69 | 2.69 | 1103 | 9 | 1.71 | 1.71 | 199 | 180 | 28.6 | 28.6 | 5670 |
| | **एकूण (क)** | 171 | 230.38 | 230.4 | 10315 | 32 | 969.31 | 969.31 | 25985 | 68 | 1932.12 | 1932.12 | 43357 | 271 | 3131.81 | 3131.81 | 79657 |
| **ड)** | **पाताळगंगा खोरे** | | | | | | | | | | | | | | | | |
| | मोठे | | | | | | | | | गाढी | 396.25 | 396.25 | | | 396.25 | 396.25 | 0 |
| | | | | | | | | | | कासाडी | 114.99 | 114.99 | | | 114.99 | 114.99 | 0 |
| | | | | | | | | | | उलवे | 60.11 | 60.11 | | | 60.11 | 60.11 | 0 |
| | मोठे एकूण | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 3 | 571.35 | 571.35 | 0 | 3 | 571.35 | 571.35 | 0 |
| | मध्यम | मोरबा | 160 | 160 | 0 | हेटवणे | 144.99 | 144.99 | 6668 | सुगडेवाडी | 32.66 | 32.66 | 2158 | | 337.65 | 337.65 | 8826 |
| | मध्यम एकूण | 1 | 160 | 160 | 0 | 1 | 144.99 | 144.99 | 6668 | 1 | 32.66 | 32.66 | 2158 | 3 | 337.65 | 337.65 | 8826 |
| | बृहतलघु | रानसई | 7 | 7 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | बाळगंगा | 120.67 | 120.67 | 0 | | 127.67 | 127.67 | 0 |
| | बृहतलघु एकूण | 1 | 7 | 7 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 120.67 | 120.67 | 0 | 2 | 127.67 | 127.67 | 0 |
| | लघू | 16 | 73.73 | 73.73 | 2456 | 2 | 5.27 | 5.27 | 468 | 4 | 10.6 | 10.6 | 570 | 22 | 89.60 | 89.6 | 3494 |
| | | | | | | | | | | 1 | 3.66 | 3.66 | 231 | 1 | 3.66 | 3.66 | 231 |
| | | | | | | | | | | 17 | 26.41 | 26.41 | 2213 | 17 | 26.41 | 26.41 | 2213 |
| | लघू एकूण | 16 | 73.73 | 73.73 | 2456 | 2 | 5.27 | 5.27 | 468 | 22 | 40.67 | 40.67 | 3014 | 40 | 119.67 | 119.67 | 5938 |
| | स्थानिक स्तर | 20 | 5.55 | 5.55 | 806 | 3 | 0.33 | 0.33 | 48 | 5 | 1.52 | 1.52 | 199 | 28 | 7.4 | 7.4 | 1053 |
| | स्थानिक स्तर एकूण | 20 | 5.55 | 5.55 | 806 | 3 | 0.33 | 0.33 | 48 | 5 | 1.52 | 1.52 | 199 | 28 | 7.4 | 7.4 | 1053 |
| | **एकूण ड** | 38 | 246.28 | 246.3 | 3262 | 6 | 150.59 | 150.59 | 7184 | 32 | 766.87 | 766.87 | 5371 | 76 | 1163.74 | 1163.74 | 15817 |
| | **एकूण (अ+ब+क+ड)** | 307 | 1177.7 | 1178 | 18524 | 70 | 1476.9 | 1476.88 | 53611 | 149 | 4091.06 | 4091.06 | 83380 | 526 | 6745.65 | 6745.65 | 155515 |

## सारणी : 21.7

## जलसंपत्तीचा ताळेबंद

जलसंपत्ती - दलघमी

| अक्र | उपलब्धता | | अक्र | वापर (सन2030) | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | भूपृष्ठावरील | | 4 | भूपृष्ठावरील | |
| | अ) नैसर्गिक | | | अ) घरगुती वापरासाठी | |
| | 1) 75 टक्के विश्वासार्हतेने | 17607 | | 1) नागरी | 1693 |
| | 2) 50 टक्के विश्वासार्हतेने | 21085 | | 2) ग्रामीण | 90 |
| | 3) सरासरीने | 21369 | | 3) पशुधन | 43 |
| | 4) नियोजनासाठी | 6745 | | एकूण | 1826 |
| | ब) मानवप्रबंधित | | | ब) उद्योगधंदयासाठी | 1119 |
| | 1) नागरी वापरातून पुनरुद्भव (80 %) | | | एकूण सिंचनेतर वापर | 2945 |
| | 2) उद्योग धंदयातील पुनरुद्भव (97.5%) | 1091 | 5 | जलविद्युत निर्मितीसाठी | |
| | 3) इतर खोऱ्यातून संक्रमित झालेले पाणी | 521 | 6 | सिंचनासाठी उपलब्ध भूपृष्ठावरील पाणी | 5792 |
| | एकूण (1 ब) | 1612 | | (6745+1612-2945)+380 | |
| 2 | मानवनिर्मित | | | | |
| | लाभक्षेत्रातील पुनर्भरण (6745-2945)च्या10 % | 380 | | | |
| 3 | एकूण उपलब्धता (6745+1612+380) | 8737 | 9 | एकूण | 8737 |

1) भूजल उपलब्धता (वार्षिक एकूण पुनर्भरण) 1641 — अ) भूजलाचा सध्याचा सिंचनासाठी वापर 28

2) भूजल वापरास मुभा ( 1641 च्या 65 %) 1067

टीपा : 1) भूजल उपलब्धतेमूळे उपखोऱ्याच्या एकूण उपलब्धतेत वाढ होणार नाही ; भूजलाचा जेवढा उपसा होईल तेवढा नदी प्रवाह घटत जाईल म्हणून एकूण उपलब्धतेचा आकडा काढतांना भूजल उपलब्धतेचा विचार घेतलेला नाही.

2) संकलीत अंदाजासाठी सर्व पाण्याचा उपयोग भूपृष्ठावरील पाण्यातून दाखविला आहे. पण एकूण वापरापैकी अधिकाधिक 1067+380= 1447 भूजल माध्यमातून शक्य आहे.

3) घरगूती वापरासाठी वापरलेल्या पाण्याचा पूनर्वापर घेतलेला नाही. कारण वापरलेले सर्व पाणी समुद्रास मिळते.

सारणी 21.8

**जलविद्यूत निर्मिती प्रकल्प**

क्षमता-मेवॅ


| पूर्ण झालेले प्रकल्प | | भविष्यकालीन प्रकल्प | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | उदंचन प्रकल्प | | इतर संभाव्य प्रकल्प | |
| नाव | क्षमता | नाव | क्षमता | नाव | क्षमता |
| वैतरणा | 60 | पिंजाळ | 30 | सूर्या | 6 |
| भिवपूरी (टाटा) | 72 | वैतरणा उन्नैयी | 360 | सूर्या उजवा कालवा प्रपात | 0.75 |
| भातसा | 15 | जालोंद | 1000 | अक्षर | उ.ना. |
| खोपोली (टाटा) | 72 | उल्हास, | 600 | अमूल | 9 |
| | | सिंधगड | 350 | वीज पाडा | 10 |
| | | केगाडी | 160 | कोशिमशेत | उ.ना. |
| | | काळू | 1150 | कावलेली | 10 |
| | | कोलमपाडा | 250 | किनवली | उ.ना. |
| | | चोरनई | 480 | साखरपाडा | 9 |
| | | वळवंडी | 1200 | देहरजी | 0.5 |
| | | ठाकरवाडी | 660 | वाघिवली | उ.ना. |
| | | | | अजनूप | 9 |
| | | | | काष्टी पाडा | 20 |
| | | | | कोथळा | 18 |
| | | | | वळवंड | 1200 |
| | | | | कापेवाडी | 6 |
| | | | | भांबूरडा | 3 |
| | | | | हेटवणे | 1.5 |


सारणी : 21.9

**दळणवळणाची साधने**

| तपशील | साधनाचे नाव | प्रकार |
|---|---|---|
| अ) मुख्य रेल्वे मार्ग | 1. पश्चिम रेल्वे | : ब्रॉड गेज |
| | 2. मध्य रेल्वे | : ब्रॉड गेज |
| | 3. दिवा जंक्शन ते वसई रोड | : एकेरी ब्रॉड गेज |
| | 4. कुर्ला ते खांदेश्वर | : हार्बर ब्रॉड गेज |
| | 5. पनवेल - उरण | : एकेरी ब्रॉड गेज |
| या खो-यातील सर्व रेल्वे मार्गाची लांबी जवळपास 400 कि.मी. आहे. | | |
| ब) राष्ट्रीय महामार्ग | 1. मुंबई - आग्रा | : राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 2 |
| | 2. मुंबई - बेंगलोर | : राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 4 |
| | 3. मुंबई - अहमदाबाद | : राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 8 |
| | 4. मुंबई - गोवा | : राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 17 |
| | 5. पनवेल -उरण | : राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 4ब |
| या खो-यातील राष्ट्रीय महामार्गाची एकूण लांबी 266 कि.मी. आहे. | | |
| क) राज्य महामार्ग | 1. मुंबई - जगदालपूर | : राज्य महामार्ग क्रमांक 2 |
| | 2. बोर्डी - ठाणे सातर्डे | : राज्य महामार्ग क्रमांक 4 |
| | 3. सायवन - तलासरी हरसूल | : राज्य महामार्ग क्रमांक 28 |
| | 4. विक्रमगड - अंबरगाव | : राज्य महामार्ग क्रमांक 29 |
| | 5. डहाणू - तामसा निर्मल | : राज्य महामार्ग क्रमांक 30 |
| | 6. चिंचणी - कोदाद | : राज्य महामार्ग क्रमांक 31 |
| | 7. मनोर - विक्रमगड | : राज्य महामार्ग क्रमांक 33 |
| | 8. पालघर - देवगांव | : राज्य महामार्ग क्रमांक 34 |
| | 9. जव्हार -खोपोली | : राज्य महामार्ग क्रमांक 35 |
| | 10. खर्डी - जव्हार ते राज्यसीमा | : राज्य महामार्ग क्रमांक 36 |
| | 11. मोखाडा - म्हसा | : राज्य महामार्ग क्रमांक 37 |
| | 12. वाडा - कर्जत - चौक | : राज्य महामार्ग क्रमांक 38 |
| | 13. अर्नाळा - पडघा - शिळमोंहपे | : राज्य महामार्ग क्रमांक 40 |
| | 14. वसई - बापने | : राज्य महामार्ग क्रमांक 41 |
| | 15. गोराई - ठाणे - पनवेल | : राज्य महामार्ग क्रमांक 42 |
| | 16. शहापूर ठाणे - धर्मादायरोड | : राज्य महामार्ग क्रमांक 44 |
| | 17. उरण - पनवेल - शिरुर | : राज्य महामार्ग क्रमांक 54 |
| | 18. बेलापूर- सावरोली | : राज्य महामार्ग क्रमांक 81 |

नकाशा - 21.1





**• संदर्भ सूची •**

1. राज्य सरहद्द
2. जिल्हा सरहद्द
3. तालुका सरहद्द
4. उपखोरे सरहद्द
5. जिल्हा मुख्यालय
6. तालुका मुख्यालय
7. रेल्वे मार्ग
8. रस्ते
9. नद्या व नाले
10. समपर्जन्यमान रेषा (मिमी) 900
11. धरणाचे ठिकाण व बुडीत क्षेत्र — पूर्ण, बांधकामाधीन, भविष्यकालिन
12. औद्योगिक क्षेत्र
13. महानगरपालिका
14. नगर पालिका
15. आंतरखोरे पाणी स्थलांतराच्या योजना
 - कार्यरत
 - बांधकामाधीन

**महाराष्ट्र जल व सिंचन आयोग**

## उत्तर कोकण खोरे समूह

जून 1999

| उपखोऱ्याचे स्थान | उपखोरे क्र. | उपखोऱ्यांची नावे |
|---|---|---|
|  | 1 | ऊर्ध्व गोदावरी (पैठण धरणा पर्यंत) |
| | 17 | ऊर्ध्व भीमा ( उजनी पर्यंत) |
| | 22 | मध्य कोकण |
| | 20 | दमण गंगा – पार |

# उपखोरे : 22

# मध्य कोकण

## 1.0 भौगोलिक तपशील

मध्य कोकण खोरेसमूहामध्ये रायगड जिल्हयातील,अंबा,कुंडलिका,म्हसाळा,सावित्री या चार मुख्य नद्यांचे खोरे व रत्नागिरी जिल्हयातील भारजा नदीचे खोरे यांचा समावेश (नकाशा 22.1) होतो. या खोरेसमूहाचे एकूण क्षेत्रफळ 5929 चौकिमी आहे. यामध्ये पुणे,रायगड व रत्नागिरी जिल्हयातील खालील तालूक्यांचे क्षेत्र येते.

**पुणे** : **1)** वेल्हे 2)मुळशी

**रायगड** : **1)** अलिबाग 2) खालापूर 3) पेण 4) सुधागड 5) रोहा 6) माणगाव 7) महाड 8) पोलादपूर 9) म्हसळा 10) श्रीवर्धन 11)मुरूड

**रत्नागिरी** : **1)** दापोली 2) मंडणगड

मुख्य नदी, तिच्या उपनद्या, इत्यादी बाबतची माहिती खालील प्रमाणे आहे.

लांबी -किमी,तलांक - मी

| अक्र | नदी | उपनदी | लांबी | उमगस्थान | | संगमस्थान | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ठिकाण | तलांक | ठिकाण | तलांक |
| 1 | अंबा | उत्तरा | 8 | देवघर | 695 | वसोडे | 200 |
| 2 | | अंबा | 72 | राजमाची | 822 | धरमतर खाडी | 0 |
| 3 | कुंडलिका | | | हिरडेवाडी | 820 | रेवदंडा | 0 |
| 4 | म्हसाळा | कुंड | 11 | बर्पा | 280 | हाल | 10 |
| 5 | | चांद | 15 | घोडवडी | 264 | कुडा | 10 |
| 6 | | जनसी | 13 | वांगणी | 400 | वरवटणे | 10 |
| 7 | सावित्री | | 70 | महाबळेश्वर | 1371 | बाणकोटखाडी | 0 |
| 8 | | काळ | 55 | कापसा | 750 | दासगाव | 90 |
| 9 | | गांधारी | 23 | पुनाडे | 660 | महाड | 95 |
| 10 | | काळनाला | 34 | चोल | 1030 | पडवी | 145 |
| 11 | | खरक | 20 | साळुगाव | 1170 | पडवी | 145 |
| 12 | | चोलाई | 17 | कुंठे | 1053 | पोलादपूर | 446 |
| 13 | | नागेश्वरी | 25 | ताम्हाणे | 536 | दासगांव | 90 |
| 14 | भारजा | | 45 | देवडोंगर | 536 | केळशी येथे समुद्रास मिळते | 0 |
| 15 | | जोग | 45 | देवडोंगर | 536 | अंजर्लेखाडी | 0 |
| 16 | | लाईन | 17 | भोमडी | 317 | अडे येथे समुद्रास मिळते | 0 |

1.2 विस्तार : या खोरेसमुहाचा क्षेत्रीय विस्तार अक्षांश 17° 42′ ते 18°49′ उत्तर व रेखांश 72°52′ ते 73°40′ पूर्व यामध्ये आहे.

1.3 चतु:सीमा : खोरेसमुहाच्या चतु:सीमा खालील प्रमाणे आहेत.

| अक्र | दिशा | तपशील |
|---|---|---|
| 1 | उत्तर | रायगड जिल्हा, उत्तर कोकण उपखोरे क्र. 21 |
| 2 | पूर्व | पुणे व अहमदनगर जिल्हे,सहयाद्रिच्या रांगा, उर्ध्व भीमा उपखोरे(उजनी पर्यन्त) क्र.17, उर्वरीत भीमा उपखोरे क्र.18 (नीरा घटक क्षेत्र ) |
| 3 | पश्चिम | अरबी समुद्र |
| 4 | दक्षिण | वाशिष्ठी उपखोरे क्र.23, रत्नागिरी जिल्हा |

## 2.0 हवामान

खोरेसमूहातील क्षेत्र जास्त पावसाच्या प्रदेशात येते. या क्षेत्रातील हवामान दमट आहे. या क्षेत्रात साधारणतः 97 टक्के पाऊस नैऋत्य मौसमी वा-यामुळे जून ते सप्टेंबर या महिन्यात तर उर्वरीत 3 टक्के पाऊस ईशान्य मोसमी वा-यामुळे सप्टेंबर नंतर पडतो. खोरेसमूहाचे एकत्रित वार्षिक सरासरी पर्जन्यमान 3750 मिमी आहे. खोरेसमूहातील हवामान विषयक इतर बाबी, पर्जन्यमानातील दोलायमानता इत्यादी खालील प्रमाणे आहे.

पर्जन्य-मिमी,तपमान-अंश सें

| अक्र | वैशिष्ठये | परिमाण | महिना/वर्ष | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1 | सर्वात अधिक पाऊस | 7638 | 1984 | रायगड किल्ला |
| 2 | सर्वात अधिक तपमान | 44.70 | मार्च 1997 | पाली जि. रायगड |
| 3 | सर्वात कमी तपमान | 6.70 | जानेवारी 1997 | पाली जि. रायगड |

कृषि-हवामान वर्गीकरणानुसार या खोरेसमूहाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

1-अतिपावसाचा जांभ्या खडकाच्या जमिनीचा विभाग (VRL),2-अतिपावसाचा जांभ्या खडकाच्या जमिनी नसलेला विभाग (VRN),3-घाट विभाग (GH)

या खोरेसमूहातील पर्जन्यमानातील दोलायमानता गुणांक 25 (तक्ता 2.5.8) आहे. पर्जन्यमानाचा केंद्रनिहाय तपशील सारणी 22.1 मध्ये दिला आहे. माहवार पर्जन्यमान सारणी 22.2 मध्ये दर्शविले आहे.

2.1 बाष्पीभवनः या खारेसमूहात सर्वाधिक बाष्पीभवन मे महिन्यात सरासरी 272 मिमी तर सर्वात कमी बाष्पीभवन जुलै महिन्यात 87 मिमी होते. बाष्पीभवनाचा केंद्रनिहाय तपशील सारणी 22.2 मध्ये दिला आहे.

## 3.0 जलसंपत्तीची उपलब्धता

3.1 भूपृष्ठीय जलसंपत्ती : या खोऱ्यात गेल्या 30 वर्षात वेगवेगळ्या पध्दतींनी प्रकल्पाच्या संदर्भात नदी प्रवाहाची मोजणी केली आहे. आधुनिक प्रणालीनुसार स्थायी स्वरुपाचा सरितामापन केंद्राचा विकास हा अलीकडचा आहे. या नव्या मोजणी प्रमाणे एकूण सरासरी येवा 15116 दलघमी आहे. 1966 ते 1995 या 30 वर्षांच्या माहितीवर आधारभूत या खोऱ्यातील पाण्याची उपलब्धता खालीलप्रमाणे आहेः

75 टक्के विश्वासार्हतेने 13293 दलघमी

50 टक्के विश्वासार्हतेने 15127 दलघमी.

येवा मोजण्याची ठिकाणे खालील प्रमाणे आहेत.

येवा-दलघमी

| अक्र | सरितामापन केंद्र | स्वामित्व | आधारसामुग्री उपलब्धता कालावधी | वार्षिक सरासरी येवा |
|---|---|---|---|---|
| 1. | बुरमाळी | पा.खा. | 1994 ते 1995 | 204 |
| 2. | पाली | पा.खा. | 1978 ते 1995 | 926 |
| 3. | तुकसई | पा.खा. | 1992 ते 1995 | 140 |
| 4 | भावे | पा.खा. | 1993 ते 1995 | 259 |
| 5 | बिरवाडी | पा.खा. | 1992 ते 1995 | 1443 |
| 6 | कणगुले | पा.खा. | 1993 ते 1995 | 793 |
| 7 | कोथेरी | पा.खा. | 1993 ते 1995 | 50 |
| 8 | कोथुर्डे | पा.खा. | 1993 ते 1995 | 264 |
| 9 | लाटवण | पा.खा. | 1992 ते 1996 | 195 |

वेगवेगळ्या विश्वासार्हतेच्या येव्यांची कांही मर्यादित माहिती सारणी 22.3 मध्ये दिली आहे.

3.2 भूशैलीय रचना :

भूपृष्ठीय स्थिती (भूरुप वर्णन) : खोरेसमुहातील भूभाग 16 टक्के अतिविच्छेदीत व डोंगराळ, 80 टक्के पठारी आणि 4 टक्के सपाट व नदीलगतच्या गाळाचा आहे. यात भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेद्वारा निर्देशित 16 पाणलोट क्षेत्रांचा समावेश आहे.

भूपृष्ठीय शैल स्थिती खोरेसमुहात मुख्यत्वे लाव्हाथरांपासून तयार झालेला बहुस्तरीय दक्षिणी कातळ खडक (डेक्कन ट्रॅप प्रस्तर) आढळतो. त्यात भरित-कुहरी बेसाल्टचे प्रमाण अधिक आहे. सावित्री नदीच्या काठावरील दक्षिणी कातळ खडकाच्या (डेक्कन ट्रॅप प्रस्तराचा) वरचा भाग जांभ्या खडकात रुपांतरीत झालेला आहे.

कुंडलिका, सावित्री व काळ नद्यांच्या तीरावर गाळाचे पट्टे डेक्कन ट्रॅपचे वर तयार झालेले आहेत..

3.3 भूजल संपत्ती : पर्जन्यमान जास्त असूनही भूपृष्ठीय स्थिती व भूस्तर अनुकूल नसल्यामुळे भूजल संपत्ती मर्यादीत आहे. त्याच प्रमाणे भूपृष्ठ जलसंपत्ती मुबलक प्रमाणात उपलब्ध असल्यामुळे भूजलाचा सिंचनासाठी वापरही अत्यल्पच आहे. अतिविच्छेदीत व डोंगराळ आणि पठारी भागाचे प्रमाण जास्त असून विघटीत भूस्तराची जाडी मर्यादीत आहे. भूजल धारक प्रस्तरातील भूजल उताराकडे वहात जावून झऱ्यांवाटे मोठया प्रमाणात नदीत येते. परिणामी भूजल धारक प्रस्तर लवकर रिकामा होवून पाणी टंचाई नेहमीच भासते.

जांभा खडकाची जलग्रहण क्षमता चांगली असून त्यातील छिद्रे एकमेकांना जोडलेली असल्यामुळे मुरलेले पाणी तळातून वाहून जाते व झऱ्यांवाटे बाहेर पडते.

गाळ्याच्या पट्ट्यात मात्र वाळुचे प्रमाण जास्त असल्यामुळे भूजल मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे त्यात विहिरीद्वारे सिंचन विकासास वाव आहे.

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या 1990 च्या भूजल अंदाजानुसार 204 दलघमी एकूण पुनर्भरण असून सिंचनाखाली विहिरींची संख्या 4466 आहे.

जलसंधारणाची कामे उदाः गोकुळ बंधारे करुन पाणी अडवून व मूरवून स्थानिकरित्या विहिरीद्वारे अथवा झऱ्यांच्याखाली कुंड करुन त्याचा सिंचनासाठी वापर करण्याचे प्रयोग यशस्वीरित्या राबविण्यात आलेले आहेत.

3.4 अवर्षण प्रवण क्षेत्रः या खोरेसमुहात अवर्षण प्रवण क्षेत्र नाही.

## 4.0 जमिनीचा तपशील

या खोरेसमुहातील जमीन जांभ्या दगडापासून बनलेली आहे. या जमिनीची उत्पादन क्षमता एकंदरीने चांगली आहे.जमिनीचे सविस्तर वर्गीकरण खालील प्रमाणे आहे.

| अक्र | तपशील | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | जांभ्या खडकाची जमीन | 20 |
| 2 | भरड उथळ जमीन | 27 |
| 3 | गाळाची जमीन | 40 |
| 4 | समुद्र किनाऱ्यावरील खारवट जमीन | 13 |

## 5.0 जमिनीचा वापर

लागवडीयोग्य क्षेत्र,वनखात्याच्या ताब्यातील क्षेत्र,पडीक क्षेत्र इत्यादी बाबतचा तपशील खालील प्रमाणे आहे.

क्षेत्र - हजार हेक्टर

| अक्र | तपशील | क्षेत्र | भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | भौगोलिक क्षेत्र | 593 | |
| 2 | वनखात्याच्या ताब्यातील क्षेत्र | 112 | 18.9 |
| 3 | पेरणीसाठी उपलब्ध नसलेले क्षेत्र | | |
| | अ) ओसाड जमीन | 114 | 19.2 |
| | ब) बिगर शेती उपयोगाकरिता आणलेली जमीन | 36 | 6.1 |
| 4 | मशागत योग्य पडिक जमीन | 40 | 6.7 |
| 5 | कायमची कुरणे व चराऊ कुरणे | 30 | 5.1 |
| 6 | किरकोळ झाडे झुडपे यांच्या समुहाखालील क्षेत्र | 17 | 2.9 |
| 7 | चालू पडिक जमीन | 13 | 2.2 |

क्षेत्र - हजार हेक्टर

| अक्र | तपशील | क्षेत्र | भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी |
|---|---|---|---|
| 8 | इतर पडीक जमीन | 46 | 7.8 |
| 9 | पेरणीचे निव्वळ क्षेत्र | 164 | 27.7 |
| 10 | लागवडी योग्य क्षेत्र(3+4+5+6+7+8) | 310 | 52 |
| 11 | दुसोटा क्षेत्र | 23 | |
| 12 | पिकाखालील एकूण क्षेत्र (9+11) | 187 | |
| 13 | पीक घनता (12÷9×100) | 114 | |

**6.0 लोकसंख्या व पशुधन**

6.1 लोकसंख्या: सन 1991 च्या जनगणनेनुसार या खोरेसमुहातील एकूण लोकसंख्या 12 लक्ष 80 हजार आहे. खो-यात सन 2030 पर्यन्त होणारी लोकसंख्या,लोकसंख्या घनता इत्यादी खालील प्रमाणे अपेक्षित आहे.

लोकसंख्या-हजारात,घनता-प्रति चौकिमी

| अक्र | लोकसंख्या तपशील | वर्ष 1991 | 2030 |
|---|---|---|---|
| 1 | नागरी | 77 | 184 |
| 2 | ग्रामिण | 1203 | 2406 |
| 3 | एकूण : | 1280 | 2590 |
| 4 | लोकसंख्या घनता | 216 | 437 |
| 5 | ग्रामीण लोकसंख्या घनता | 203 | 406 |

6.2 पशुधन : सन 1992 च्या मोजणीनुसार या खो-यात एकूण पशुधन 65.23 लक्ष आहे. तपशील खालील प्रमाणे आहे.

| म्हैस व रेडे | गाय व बैल | एकखूरी व उंट | डूकरे | शेळी मेंढी | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| 131408 | 397831 | 1505 | 1612 | 119987 | 652343 |

6.3 इतर तपशील या खो-यात अलीबाग,रोहा,महाड,श्रीवर्धन,मुरुड या नगरपालिका आहेत. इतर मजूर 2.48 लक्ष आहेत,तर शेत मजूर 3.28 लक्ष आहेत.

**7.0 पाणी वापर**

7.1 सिंचनासाठी वापर : या खो-यातील वर्गनिहाय प्रकल्प, म्हणजे मोठे, मध्यम, बृहत लघु, लघु प्रकल्प यांची संख्या, पाणीसाठा, पाणी वापर, सिंचन क्षेत्र यांची तसेच पूर्ण झालेले

प्रगतीपथावरील व भविष्यकालीन प्रकल्प याची माहिती सारणी 22.4 मध्ये दिली आहे. पूर्ण झालेल्या प्रकल्पांची सिंचन क्षमता 14034 हेक्टर असुन त्यातील प्रस्तावित पाणीवापर 260 दलघमी आहे. सिंचनासाठी आणखी 31071 हेक्टर उपलब्ध होऊ शकते त्यासाठी सध्याच्या पाणी वापर पध्दती प्रमाणे आणखी 523 दलघमी पाणी लागेल.

7.2 सिंचनेतर पाण्याची गरज :सिंचनेतर विविध प्रयोजनासाठी या खो-यातील सध्याची गरज 110 दलघमी आहे. सन 2030 पर्यन्तची ती 270 दलघमी होईल. गरजेचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

पाणी - दलघमी

| अक्र | तपशिल | 1996 | | | | 2030 |
|---|---|---|---|---|---|---|
| | | नागरी | ग्रामीण | पशूधन | एकूण | |
| 1 | घरगुती वापरासाठी | 2 | 24 | 16 | 42 | 77 |
| 2 | औद्योगीक गरज | | | | 68 | 193 |
| | एकूण | | | | 114 | 270 |

7.3 जलसंपत्तीचा ताळेबंद : भूपृष्ठावरील व भूपृष्ठाखालील उपलब्ध जलसंपत्ती, घरगुती वापरासाठी, उद्योगासाठी व सिंचनासाठी वापर व त्यात होणारा पुनरूद्भव याचा ताळेबंद सारणी 22.5 मध्ये दिला आहे.

7.4 लाभक्षेत्र विकास : या प्रदेशातील लाभक्षेत्र विकास कामाच्या सद्यस्थितीबाबत माहिती पुढील प्रमाणे आहे.

क्षेत्र -हजार हेक्टर

| भूविकास भाग-1(शेतचाऱ्या इ)ची कामे | | | भूविकास भाग-2 (सपाटीकरण इ)ची कामे | | | प्रकल्पाच्या लाभक्षेत्रा व्यतिरिक्त अन्य क्षेत्रात झालेले जमीन सपाटीकरणाचे (भाग - 2) क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|
| लाक्षेविप्रा कडील प्रकल्प | लाक्षेविप्रा बाहेरील प्रकल्प | एकूण | लाक्षेविप्रा कडील प्रकल्प | लाक्षेविप्रा बाहेरील प्रकल्प | एकूण | |
| - | 7.28 | 7.28 | - | 0.42 | 0.42 | 0.08 |

7.5 सन 1970 पूर्वीची धरणे : या खो-यात पर्जन्यमानाचे प्रमाण अधिक असल्यामुळे सिंचनासाठी 1970 पूर्वी प्रकल्प बांधलेले नाहीत.

## 8.0 पीकरचना

या खोरेसमुहात पेरणीखालचे क्षेत्र 1.64 लक्ष हेक्टर आहे. यात खरीपाचा वाटा मोठा आहे. भात हे प्रमुख पीक आहे. भात पिकाची दर हेक्टरी उत्पादकता खालील प्रमाणे आहे.

उत्पादकता-क्विंटल/हेक्टर

| प्रमुख पीक | उत्पादकता |
|---|---|
| भात | 22.15 |

## 9.0 उद्योगधंदे

या खोरेसमुहाची नैसर्गीक रचना,उपलब्ध असलेल्या दळणवळण व्यवस्था यामुळे शेती व्यवसायापेक्षा औद्योगिकीकरण जास्त होत आहे. कार्यान्वित असलेल्या औद्योगिक वसाहती,रोहा, महाड, नागोठणे, पेण, खोपोलीरस्ता, उसर या ठिकाणी आहेत. खोरेसमुहातील उद्योगधंदयांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अक्र | तपशील | संख्या |
|---|---|---|
| 1 | कृषी आधारीत उद्योग | |
| | अ) साखर कारखाने | निरंक |
| | ब) सूत गिरण्या | निरंक |
| 2 | रासायनिक उद्योग | 270 |
| 3 | इतर | 299 |
| 4 | लघु | 329 |

## 10.0 जलविद्युत निर्मिती

भौगोलिक परिस्थितीमुळे या खोरेसमुहात उर्जा निर्मितीस भरपूर वाव आहे. आतापर्यन्त भिरा (टाटा) व भिरा अवजल या दोन जलविद्युत योजना पूर्ण झाल्या असून त्यांची उर्जा निर्मिती क्षमता 230 मेगावॅट आहे. भविष्यात एकूण 13 योजना पूर्ण करण्याचे योजीले असून या सर्व जलविद्युत केंद्रांची क्षमता 1573 मेगावॅट राहिल. प्रकल्पांची नावे खालील प्रमाणे आहेत.

| अक्र | योजनेचे नाव | अक्र | योजनेचे नाव |
|---|---|---|---|
| 1 | पांडी | 2 | डोलवाह |
| 3 | घोळ | 4 | काळ |
| 5 | गांजवणे | 6 | गुजलशी |
| 7 | खाणू | 8 | घोळ (घारगेवाडी) |
| 9 | गौली वाडी | 10 | अनरेज |
| 11 | कुंभे | 12 | अंबा |
| 13 | सावित्री | | |

## 11.0 दळणवळणाची साधने

या खोरेसमुहातून मुंबई - मंगलोर ही कोकण रेल्वे जाते. शिवाय मुंबई-मंगलोर राष्ट्रीय महामार्गाची लांबी 170 किमी आहे. या खोरेसमुहात धरमतर,मांडवा,रेवस,करंजा व मीरा ही बंदरे आहेत. या बंदरातून मुंबईस जलमार्गाने जाता येते. राज्य महामार्गांचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

| अक्र | महामार्गाचे नाव | क्रमांक | अक्र | महामार्गाचे नाव | क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मुरूड - पुणे - औरंगाबाद | 60 | 12 | साळाव - तळेखार | 91 |
| 2 | बाणकोट - महाड - पंढरपूर | 70 | 13 | खालापूर - आगरदांडा | 92 |
| 3 | पोलादपूर - वाई - दहीवडी | 72 | 14 | पाली - पाटनूस | 93 |
| 4 | कोन - तुरडे | 82 | 15 | म्हसळा - मांदाड | 95 |
| 5 | दांड - खारपाडा | 83 | 16 | मनमाड - दापोली | 96 |
| 6 | उरण - साई | 85 | 17 | दिघी - पाटनूस | 97 |
| 7 | रेवस - नागोठाणे | 86 | 18 | श्रीवर्धन - लोणेरे | 98 |
| 8 | अलिबाग - खोपोली | 87 | 19 | जसवली - वीर | 99 |
| 9 | थळवायशेत - कार्ले | 88 | 20 | कुरार - खेड | 100 |
| 10 | पोयनाड - उसर | 89 | 21 | महाड - पावाड | 101 |
| 11 | अलिबाग - वावे | 90 | 22 | मंडणगड - खेड | 102 |

यावरुन या खोरेसमुहात वाहतूकीच्या सोई चांगल्या उपलब्ध झालेल्या आहेत असे दिसते.

## 12.0 भावी नियोजनाची दिशा

12.1 या खोरेससमूहाची एकूण सरासरी जलसंपत्ती निसर्गतः 15116 दलघमी आहे. त्यात टाटा जलविद्युत प्रकल्पात वीज निर्माण झाल्यानंतर पूर्ववाहिनी 680 दलघमी पाणी बारमाही येऊन मिळाले आहे. अशारितीने एकूण उपलब्ध पाणी खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| अ) | खोऱ्यातील सरासरी उपलब्धता | 15116 दलघमी |
| आ) | टाटा प्रकल्पअवजल मुळशी (भिरा) | 680 दलघमी |
| | (सावित्री-97,कुंडलिका-449,अंबा-134 दलघमी) | |
| | एकूण : | 15796 दलघमी |

या खोरेसमुहात अंबा, कुंडलिका या नद्यांवर 15 लघु प्रकल्पांच्या माध्यमातून 23.05 दलघमी चलपाणीसाठे निर्माण करण्यात आले आहेत. शिवाय स्थानिक लघु प्रकल्पांची संख्या 18 आहे व त्याचा चलपाणीसाठा 3.35 दलघमी आहे. या खोरेसमूहातील येव्यामध्ये मध्यम तीव्रतेची दोलायमानता आहे. तथापि पाण्याची मुबलकता असल्यामुळे या दोलायमानतेचा परिणाम जाणवत नाही.

12.2 या प्रदेशातील मुख्य पीक भात आहे. सिंचन क्षेत्रातील भात हेच उन्हाळी पीक आहे. उत्तम विकसित भातशेती हे या क्षेत्राचे वैशिष्टय आहे. वस्तुतः शेतकऱ्यांना दुबारपीक म्हणून भाताऐवजी भाजीपाला व इतर नगदी पिके घेण्यास वाव आहे. मुंबई परिसराचे विस्तृत नागरी क्षेत्र जवळ असल्यामुळे भाजीपाला पिकास मोठीच बाजारपेठ उपलब्ध आहे. पण या संधीच्या प्रमाणात उत्पादन व्यवस्था, साठवणक्षमता, प्रक्रिया व वहातूक व्यवस्था नीट बसलेली नाही.

12.3 रायगड जिल्हयातील काळ प्रकल्पाच्या गोरेगाव शाखेवरील लाभक्षेत्रास आयोगाने मे 1998 मध्ये भेट दिली. या प्रकल्पातून रोहा तालुक्यातील कुंडलिका नदीवर दगडी बंधारा बांधून टाटा जलविद्युत केंद्र (भिरा) येथून बाहेर पडणारे पाणी वळवून सिंचनासाठी वापरले जाते.

सिंचनास सुरवात होऊन 25 वर्षे लोटली आहेत व त्याचा आर्थिक परिणाम या भूक्षेत्रावर जाणवतो. लाभक्षेत्रातील भाताचे प्रति हेक्टरी उत्पादन 2.5 ते 3 टन आहे. रब्बीतील उत्पादनापेक्षा खरिपातील उत्पादन जास्त आहे.

12.4 या प्रकल्पातील कालवे अस्तरविरहित आहेत. पावसाची तीव्रता व मातीचे भराव यामुळे कालव्यामध्ये गाळ साठून कालव्याचा आकार बदलून वहनक्षमता कमी झालेली आहे. कालव्यातून पाण्याचा पाझर होत असल्यामुळे पाण्याचा नाशही होत असतो. हे थांबविण्यासाठी सिंचन प्रणालीचे नूतनीकरण करणे आवश्यक आहे; पण ते अत्यंत खर्चिक होणार आहे व त्या प्रमाणात उत्पादन वाढीचा निश्चित कार्यक्रम सध्या दृष्टीपथात नाही. लाभक्षेत्रात अजूनही एका खाचरातून दुसऱ्या खाचरात मोकाट पध्दतीने पाणी देण्यात येते. त्यामुळे पाण्याचा अपव्यय तर होतोच पण पिकाच्या निवडीला वाव राहिलेला नाही. भाजीपाला, कडधान्ये व इतर पिके घ्यावयाची म्हणजे सिंचनाची पध्दत बदलावी लागेल.

12.5 या खोरेसमूहात जादा पाणी लागणारी पिके (ऊस,केळी इ.) यांच्या वाढीस प्रोत्साहन देणे गरजेचे आहे,म्हणजे त्यांच्यावर प्रक्रिया करणारे उद्योग जसे, साखर कारखाने, अल्कोहोल निर्मिती इत्यादी वाढीस लागू शकतील.

12.6 या प्रदेशात खार जमिनीचे क्षेत्र 21532 हेक्टर आहे. खारभूमीत शेतीसाठी या खोरेसमूहात गोडे पाणी पुरवठा करणे शक्य दिसते. खारे पाणी अडविणे व गोडे पाणी पुरविणे अशा संयुक्त योजना राबवून या कसदार जमिनींच्या उत्पादन क्षमतेचा पूर्ण उपयोग करुन घ्यावा लागेल.या खोऱ्यामध्ये पाणी मुबलक उपलब्ध असल्यामुळे मुंबई परिसरातील उद्योगांचे विकेंद्रीकरणास व त्यांना या भागात सामावून घेण्यास वाव आहे. कोकण रेल्वेच्या उपलब्धतेमुळे या भागात वाहतुकीची सोय झाली आहे.

12.7 खार जमिनीच्या पुनर्प्रापणासाठी घालण्यात येणारे बांध राखणे व त्यांचे संरक्षण करणे ही खरी समस्या आहे. समुद्रप्राणी या बांधांना उपद्रव पोहचवू शकतात. हे संरक्षणाचे काम स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पातळीवर पार पाडणे युक्त राहील.

12.8 या खोरेसमूहाच्या क्षेत्रात लोणेरे ता. माणगाव येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ आहे. सामाजिक, आर्थिक व पर्यावरणीय दृष्टीकोनातून या विद्यापीठाच्या माध्यमातून या खोऱ्याचा सर्वांगीण अभ्यास करुन घेणे व पाण्याच्या संबंधातील पुढील 30 वर्षांचा तपशिलवार विकास कार्यक्रम तयार करता येणे शक्य व्हावे.

12.9 कोकणातील सर्व नद्या समुद्रात मिळत असल्याने त्यांचे पाणी मुखाजवळ खारे होते हे टाळण्यासाठी या नद्यांच्या निदान उपनद्यांची मुखबंदी केल्यास बऱ्याच क्षेत्रास गोडे पाणी मिळेल.

000

## सारणी 22.1
## पर्जन्यमापन केंद्रांचा तपशील

पर्जन्य-मिमी

| अक्र | केंद्र | प्रकार | स्वामित्व | आधार सामुग्री उपलब्धीचे प्रारंभिक वर्ष | वार्षिक सरासरी पर्जन्य |
|---|---|---|---|---|---|
| 1 | ठोकशेत | सा.प. | पा.खा. | 1993 | 3142 |
| 2 | घोटवडे | सा.प. | पा.खा. | 1994 | 3242 |
| 3 | कवेळे, | सा.प. | पा.खा. | 1993 | 3593 |
| 4 | खाडपोली | सा.प. | पा.खा. | 1988 | 3861 |
| 5 | कोंडगाव | सा.प. | पा.खा. | 1991 | 3117 |
| 6 | पाली | स्व.प. | पा.खा. | 1980 | 3444 |
| 7 | पायऱ्याची वाडी | सा.प. | पा.खा. | 1988 | 4061 |
| 8 | श्रीगांव | सा.प. | पा.खा. | 1991 | 2668 |
| 9 | तुकसई | सा.प. | पा.खा. | 1988 | 3864 |
| 10 | उन्हेरे | सा.प. | पा.खा. | 1993 | 3620 |
| 11 | उसरण | सा.प. | पा.खा. | 1991 | 3149 |
| 12 | सुधागड | सा.प. | म.खा. | 1955 | 3834 |
| 13 | सुडकोली | स्व.प. | पा.खा. | 1981 | 3212 |
| 14 | कोलाड कॉलनी | सा.प. | पा.खा. | 1981 | 3620 |
| 15 | खरसांबळे | सा.प. | पा.खा. | 1981 | 4229 |
| 16 | भिरा स्टेशन | स्व.प. | पा.खा. | 1981 | 4642 |
| 17 | फणसाड | सा.प. | पा.खा. | 1993 | 2406 |
| 18 | सुतारवाडी | सा.प. | पा.खा. | 1993 | 2957 |
| 19 | महान | स्व.प. | पा.खा. | 1994 | 1746 |
| 20 | भिरा | सा.प. | टा.कं. | 1976 | 4512 |
| 21 | रोहा | सा.प. | म.खा. | 1901 | 3202 |
| 22 | अलिबाग | स्व.प. | भा.ह.खा. | 1901 | 2179 |
| 23 | उंडरगाव | स्व.प. | पा.खा. | 1981 | 2842 |
| 24 | मुरूड | सा.प. | म.खा. | 1937 | 2737 |
| 25 | श्रीवर्धन | सा.प. | म.खा. | 1955 | 2634 |
| 26 | म्हसळा | सा.प. | म.खा. | 1951 | 3556 |
| 27 | पाभरे | सा.प. | पा.खा. | 1993 | 2233 |
| 28 | रानिवली | सा.प. | पा.खा. | 1993 | 1936 |
| 29 | कार्ले | सा.प. | पा.खा. | 1993 | 2650 |
| 30 | कुकडी | सा.प. | पा.खा. | 1993 | 2797 |

पर्जन्य-मिमी

| अक्र | केंद्र | प्रकार | स्वामित्व | आधार सामुग्री उपलब्धीचे प्रारंभिक वर्ष | वार्षिक सरासरी पर्जन्य |
|---|---|---|---|---|---|
| 31 | भावे | सा.प. | पा.खा. | 1983 | 3549 |
| 32 | कोथेरी | सा.प. | पा.खा. | 1983 | 3505 |
| 33 | कुडपन | स्व.प. | पा.खा. | 1983 | 4970 |
| 34 | कुंभे | सा.प. | पा.खा. | 1981 | 5629 |
| 35 | सावरट | सा.प. | पा.खा. | 1983 | 5549 |
| 36 | वरंडोली | स्व.प. | पा.खा. | 1981 | 3971 |
| 37 | रायगड किल्ला | स्व.प. | पा.खा. | 1980 | 5071 |
| 38 | वारंगी | स्व.प. | पा.खा. | 1981 | 4407 |
| 39 | महाड | सा.प. | म.खा. | 1901 | 3360 |
| 40 | माणगाव | सा.प. | म.खा. | 1901 | 3243 |
| 41 | पोलादपूर | सा.प. | म.खा. | 1952 | 3723 |
| 42 | खैरे | स्व.प. | पा.खा. | 1993 | 3646 |
| 43 | वावा | स्व.प. | पा.खा. | 1993 | 3670 |
| 44 | वरंध | सा.प. | पा.खा. | 1993 | 4121 |
| 45 | कोथर्डे | सा.प. | पा.खा. | 1993 | 3788 |
| 46 | खिडवाडी | सा.प. | पा.खा. | 1993 | 4171 |
| 47 | संदेरी | सा.प. | पा.खा. | 1993 | 3810 |
| 48 | वाकीखुर्द | स्व.प. | पा.खा. | 1988 | 4198 |
| 49 | कणगुले | स्व.प. | पा.खा. | 1988 | 3564 |
| 50 | बिरवाडी | स्व.प. | पा.खा. | 1988 | 3601 |
| 51 | आंबिवली | स्व.प. | पा.खा. | 1988 | 3290 |
| 52 | वळवंड | सा.प. | पा.खा. | 1989 | 4157 |
| 53 | लाटवण | सा.प. | पा.खा. | 1984 | 3822 |
| 54 | भिगलोली | सा.प. | पा.खा. | 1984 | 3881 |
| 55 | चिंचोली | सा.प. | पा.खा. | 1984 | 3551 |
| 56 | पणदेरी | सा.प. | पा.खा. | 1984 | 3860 |
| 57 | हर्णे | सा.प. | भा.ह.खा. | 1943 | 2387 |

सारणी : 22.2

**हवामानाचा तपशील**

पर्जन्य - मिमी, बाष्पीभवन - मिमी

| अक्र | महिना | पर्जन्य | बाष्पीभवन व केंद्राचे नाव | | | सरासरी | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पाली | बिरवाडी | कणगुले | | |
| 1 | जानेवारी | 0 | 160 | 169 | 168 | 166 | |
| 2 | फेब्रुवारी | 0 | 171 | 189 | 198 | 186 | |
| 3 | मार्च | 0 | 234 | 231 | 266 | 244 | * |
| 4 | एप्रिल | 2 | 255 | 246 | 276 | 259 | * |
| 5 | मे | 11 | 282 | 263 | 272 | 272 | * |
| 6 | जून | 791 | 132 | 150 | 159 | 147 | |
| 7 | जुलै | 1476 | 89 | 86 | 87 | 87 | |
| 8 | ऑगस्ट | 992 | 80 | 90 | 106 | 92 | |
| 9 | सप्टेंबर | 368 | 85 | 122 | 87 | 98 | |
| 10 | ऑक्टोबर | 104 | 108 | 150 | 119 | 126 | |
| 11 | नोव्हेंबर | 5 | 117 | 147 | 127 | 130 | |
| 12 | डिसेंबर | 1 | 146 | 159 | 142 | 149 | |
| | | | | | | 1956 | |

* आत्यंतीक बाष्पीभवनामूळे उन्हाळी पिकास अनुकूलता नाही.

**हंगामनिहाय बाष्पीभवन**

| अक्र | हंगाम | बाष्पीभवन |
|---|---|---|
| 1 | खरीप | 342 |
| 2 | रब्बी | 691 |
| 3 | उन्हाळी | 923 |
| | एकूण | 1956 |

सारणी : 22.3

**जलसंपत्तीची उपलब्धता**

अंबा खोरे | येवा-दलघमी

| अक्र | वर्ष | वार्षिक सरासरी येवा | उतरत्या क्रमाने विसर्ग | संगत वर्ष | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1966 | 1655 | 3420 | 1990 | |
| 2 | 1967 | 2107 | 3406 | 1983 | |
| 3 | 1968 | 1950 | 2852 | 1993 | 10 |
| 4 | 1969 | 2119 | 2795 | 1994 | |
| 5 | 1970 | 2664 | 2664 | 1970 | |
| 6 | 1971 | 2094 | 2618 | 1988 | 20 |
| 7 | 1972 | 1401 | 2427 | 1991 | |
| 8 | 1973 | 2055 | 2376 | 1989 | |
| 9 | 1974 | 2124 | 2322 | 1975 | 30 |
| 10 | 1975 | 2322 | 2290 | 1981 | |
| 11 | 1976 | 2151 | 2245 | 1977 | |
| 12 | 1977 | 2245 | 2245 | 1984 | 40 |
| 13 | 1978 | 2067 | 2204 | 1985 | |
| 14 | 1979 | 1964 | 2151 | 1976 | |
| 15 | 1980 | 2068 | 2147 | 1987 | 50 |
| 16 | 1981 | 2290 | 2124 | 1974 | |
| 17 | 1982 | 1971 | 2119 | 1969 | |
| 18 | 1983 | 3406 | 2107 | 1967 | 60 |
| 19 | 1984 | 2245 | 2094 | 1971 | |
| 20 | 1985 | 2204 | 2068 | 1980 | |
| 21 | 1986 | 1690 | 2067 | 1978 | 70 |
| 22 | 1987 | 2147 | 2055 | 1973 | |
| 23 | 1988 | 2618 | 1971 | 1982 | 75 |
| 24 | 1989 | 2376 | 1964 | 1979 | 80 |
| 25 | 1990 | 3420 | 1950 | 1968 | |
| 26 | 1991 | 2427 | 1938 | 1992 | |
| 27 | 1992 | 1938 | 1732 | 1995 | 90 |
| 28 | 1993 | 2852 | 1690 | 1986 | |
| 29 | 1994 | 2795 | 1655 | 1966 | |
| 30 | 1995 | 1732 | 1401 | 1972 | |

$\frac{\text{10 टक्के उपलब्धता}}{\text{90 टक्के उपलब्धता}}$ 1.65

$\frac{\text{50 टक्के उपलब्धता}}{\text{75 टक्के उपलब्धता}}$ 1.09

$\frac{\text{50 टक्के उपलब्धता}}{\text{90 टक्के उपलब्धता}}$ 1.24

सारणी : 22.4

**प्रकल्पांची सद्यःस्थिती**

| अक्र | प्रकल्पाचा संवर्ग | पूर्ण झालेले प्रकल्प | | | | बांधकामाधीन प्रकल्प | | | | भविष्यकालिन प्रकल्प | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| अ | अंबा खोरे | | | | | | | | | | | | | | 0 | 0 | 0 |
| 1 | मोठे | | | | | | | | | | | | | | 0 | 0 | 0 |
| 2 | मध्यम | | | | | अंबाखोरे | 70.9 | 70.9 | 367 | चिंबोडा | 67.96 | 67.96 | 3840 | | 138.86 | 138.86 | 4207 |
| 3 | बृहतलघु | | | | | | | | | सिध्देश्वर | 14.91 | 14.91 | 603 | | 14.91 | 14.91 | 603 |
| | | | | | | | | | | वरप | 18.29 | 18.29 | 1271 | | 18.29 | 18.29 | 1271 |
| 3 | लघु | 7 | 18.52 | 18.52 | 1181 | | | | | 16 | 27.59 | 27.59 | 2159 | 23 | 46.11 | 46.11 | 3340 |
| 5 | स्था.स्तर | 9 | 1.37 | 1.37 | 413 | 14 | 1.85 | 1.85 | 512 | 6 | 0.68 | 0.68 | 69 | 29 | 3.9 | 3.9 | 994 |
| एकूण अ | | 16 | 19.89 | 19.89 | 1594 | 15 | 72.75 | 72.75 | 879 | 25 | 129.43 | 129.43 | 7942 | 910 | 222.07 | 222.07 | 10415 |
| ब) | कुंडलिका खोरे | | | | | | | | | | | | | 0 | 0 | 0 | 0 |
| 1 | मोठे | काळ | 196.73 | 196.73 | 7965 | | | | | | | | | | 196.73 | 196.73 | 7965 |
| 2 | मध्यम | | | | | | | | | सावरकुंडा | 46.35 | 46.35 | 2350 | | 46.35 | 46.35 | 2350 |
| 3 | बृहत लघु | | | | | | | | | चणेरा | 31.92 | 31.92 | 1655 | | 31.92 | 31.92 | 1655 |
| 4 | लघु | 8 | 4.53 | 4.53 | 1097 | | | | | 8 | 12.13 | 12.13 | 948 | 16 | 16.66 | 16.66 | 2045 |
| 5 | स्था.स्तर | 9 | 1.98 | 1.98 | 385 | 3 | 1.4 | 1.4 | 80 | 2 | 0.41 | 0.41 | 28 | 14 | 3.79 | 3.79 | 493 |
| | | | | | | | | | | | | | | 0 | 0 | 0 | 0 |
| एकूण ब | | 18 | 203.24 | 203.24 | 9447 | 3 | 1.4 | 1.4 | 80 | 12 | 90.81 | 90.81 | 4981 | 33 | 295.45 | 295.45 | 14508 |
| क) | म्हसळा खाडी खोरे | | | | | | | | | | | | | | | | |
| 1 | मोठे | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 2 | मध्यम | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 3 | बृहत लघु | 0 | 0 | 0 | 0 | अबोली | 9.5 | 9.5 | 616 | वांद्रे | 11.95 | 11.95 | 618 | 2 | 21:45 | 21.45 | 1234 |
| 4 | लघु | 5 | 11.47 | 11.47 | 891 | 2 | 3.09 | 3.09 | 256 | 3 | 6.82 | 6.82 | 578 | 10 | 21.38 | 21.38 | 1725 |
| | | | | | | | | | | 1 | 1.89 | 1.89 | 200 | 1 | 1.89 | 1.89 | 200 |
| | | | | | | | | | | | | | | 0 | 0 | 0 | 0 |
| | | | | | | | | | | 21 | 16.78 | 16.78 | 1388 | 21 | 16.78 | 16.78 | 1388 |
| 5 | स्था.स्तर | 3 | 1.54 | 1.54 | 136 | 2 | 0.5 | 0.5 | 18 | 9 | 1.4 | 1.4 | 202 | 14 | 3.44 | 3.44 | 356 |
| एकूण क | | 8 | 13.01 | 13.01 | 1027 | 5 | 13.09 | 13.09 | 890 | 34 | 38.84 | 38.84 | 2986 | 47 | 64.94 | 64.94 | 4903 |

चलपाणीसाठा - दलघमी
पाणीवापर - दलघमी
सिंचनक्षेत्र - हेक्टर

| अक्र | प्रकल्पाचा संवर्ग | पूर्ण झालेले प्रकल्प | | | | बांधकामाधीन प्रकल्प | | | | भविष्यकालिन प्रकल्प | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | नाव संख्या | चल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| ड) | **सावित्री खोरे** | | | | | | | | | | | | | 0 | 0 | 0 | 0 |
| | 1 मोठे | | | | | | | | | | | | | 0 | 0 | 0 | 0 |
| | 2 मध्यम | | | | | गांधारी | 36.6 | 36.6 | 2642 | भावे | 34.86 | 34.86 | 1842 | 2 | 71.46 | 71.46 | 4484 |
| | 3 बृहत | | | | | नागेश्वरी | 16.27 | 16.27 | 810 | माक्टी | 2.14 | 2.14 | 604 | 2 | 18.41 | 18.41 | 1414 |
| | | | | | | | | | | पोथरी | 8.22 | 8.22 | 570 | 1 | 8.22 | 8.22 | 570 |
| | 4 लघु | 9 | 16.98 | 16.98 | 1454 | 4 | 8.95 | 8.95 | 760 | 18 | 11.08 | 11.08 | 764 | 31 | 37.01 | 37.01 | 2978 |
| | | | | | | 8 | 18.66 | 18.66 | 1527 | | | | | 8 | 18.66 | 18.66 | 1527 |
| | 5 स्था.स्तर | 9 | 2.65 | 2.65 | 311 | 2 | 0.11 | 0.11 | 53 | 20 | 1.98 | 1.98 | 388 | 31 | 4.74 | 4.74 | 752 |
| एकूण ड | | 18 | 19.63 | 19.63 | 1765 | 16 | 80.59 | 80.59 | 5792 | 41 | 58.28 | 58.28 | 4168 | 75 | 158.5 | 158.5 | 11725 |
| इ) | **भारजा** | | | | | | | | | | | | | 0 | 0 | 0 | 0 |
| | 1 मोठे | | | | | | | | | | | | | 0 | 0 | 0 | 0 |
| | 2 मध्यम | | | | | | | | | | | | | 0 | 0 | 0 | 0 |
| | 3 बृहत | | | | | | | | | | | | | 0 | 0 | 0 | 0 |
| | 4 लघु | 1 | 2.41 | 2.41 | 81 | 5 | 18.83 | 18.83 | 1455 | 2 | 4.51 | 4.51 | 632 | 8 | 25.75 | 25.75 | 2168 |
| | | | | | | 4 | 9.12 | 9.12 | 824 | 1 | 1.65 | 1.65 | 134 | 5 | 10.77 | 10.77 | 958 |
| | 5 स्था.स्तर | 6 | 1.71 | 1.71 | 150 | 1 | 0.34 | 0.34 | 30 | 19 | 3.17 | 3.17 | 278 | 26 | 5.22 | 5.22 | 458 |
| एकूण इ | | 7 | 4.12 | 4.12 | 231 | 10 | 28.29 | 28.29 | 2309 | 22 | 9.33 | 9.33 | 1044 | 39 | 41.74 | 41.74 | 3584 |
| **सर्व एकूण** | | 67 | 259.89 | 259.89 | 14064 | 35 | 196.12 | 196.12 | 9950 | 149 | 326.69 | 326.69 | 21121 | 251 | 782.7 | 782.7 | 45135 |

सारणी 22.5

## जलसंपत्तीचा ताळेबंद

जलसंपत्ती - दलघमी

| अक्र | उपलब्धता | | अक्र | वापर (सन2030) | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **भूपृष्ठावरील** | | 4 | **भूपृष्ठावरील** | |
| | अ) नैसर्गिक | | | अ) घरगुती वापरासाठी | |
| | 1) 75 टक्के विश्वासार्हतेने | 13293 | | 1) नागरी | 7 |
| | 2) 50 टक्के विश्वासार्हतेने | 15127 | | 2) ग्रामीण | 48 |
| | 3) सरासरीने | 15116 | | 3) पशूधन | 22 |
| | 4) नियोजनासाठी | 790 | | एकूण | 77 |
| | ब) मानवप्रबंधित | | | ब) उद्योगधंदयासाठी | 193 |
| | 1) नागरी वापरातून पुनरुद्भव (80 %) | 6 | | एकूण सिंचनेतर वापर | 270 |
| | 2) उद्योग धंदयातील पुनरुद्भव (97.5%) | 188 | 5 | जलविद्युत निर्मितीसाठी | |
| | 3) इतर खोऱ्यातून संक्रामित झालेले पाणी | 680 | 6 | सिंचनासाठी उपलब्ध भूपृष्ठावरील पाणी | |
| | एकूण (1 ब) | 874 | | (790+874-270)+52= | 1446 |
| 2 | मानवनिर्मित | | 7 | शिल्लक पाणी 16042-270-1446 | 14326 |
| | लाभक्षेत्रातील पुनर्भरण (1394-874)च्या 10 % | 52 | | | |
| 3 | एकूण उपलब्धता 15116+874+52 | 16042 | 8 | एकूण | 16042 |
| | 1) भूजल उपलब्धता (वार्षिक एकूण पुनर्भरण ) | 204 | | अ) भूजलाचा सध्याचा सिंचनासाठी वापर | 8 |
| | 2) भूजल वापरास मुभा ( 204 च्या 65 %) | 133 | | | |

टीपा : 1) भूजल उपलब्धतेमुळे उपखोऱ्याच्या एकूण उपलब्धतेत वाढ होणार नाही ; भूजलाचा जेवढा उपसा होईल तेवढा नदी प्रवाह घटत जाईल म्हणून एकूण उपलब्धतेचा आकडा काढतांना भूजल उपलब्धतेचा विचार घेतलेला नाही.

2) संकलीत अंदाजासाठी सर्व पाण्याचा उपयोग भूपृष्ठावरील पाण्यातून दाखविला आहे. पण एकूण वापरापैकी अधिकाधिक 133+52= 185 भूजल माध्यमातून शक्य आहे.

3) पाणी वापराचे नियोजन उपलब्ध येवा मालिकेवर आधारित आहे.

नकाशा - 22.1







## • संदर्भ सूची •

1. राज्य सरहद्द
2. जिल्हा सरहद्द
3. तालुका सरहद्द
4. उपखोरे सरहद्द
5. जिल्हा मुख्यालय
6. तालुका मुख्यालय
7. रेल्वे मार्ग
8. रस्ते
9. नद्या व नाले
10. समपर्जन्यमान रेषा (मिमी) 3200
11. धरणाचे ठिकाण व बुडीत क्षेत्र — पूर्ण, बांधकामाधीन, भविष्यकालिन
12. औद्योगिक क्षेत्र
13. महानगरपालिका
14. नगर पालिका
15. आंतरखोरे पाणी स्थलांतराच्या योजना
   - कार्यरत
   - बांधकामाधीन
16. जलविद्युत प्रकल्प

**महाराष्ट्र जल व सिंचन आयोग**

# मध्य कोकण खोरे समूह

जून 1999

| उपखोऱ्याचे स्थान | उपखोरे क्र. | उपखोऱ्यांची नावे |
|---|---|---|
| 21, 17, 18, 23 (अरबी समुद्र) | 17 | ऊर्ध्व भीमा (उजनी पर्यंत) |
| | 18 | उर्वरीत भीमा |
| | 23 | वासिष्ठी |
| | 21 | उत्तर कोकण |

# उपखोरे : 23

# वाशिष्टी

## 1.0 भौगोलिक तपशील

वाशिष्ठी उपखोऱ्यात रत्नागिरी जिल्हयातील वाशिष्ठी ,या नदीचे मुख्य खोरे (नकाशा 23.1) आहे. या उपखोऱ्याचे भौगोलिक क्षेत्रफळ 2233 चौकिमी आहे. या नदीच्या उगमाजवळ कोयना प्रकल्पाचे वीजनिर्मिती नंतरचे बारमाही पाणी गेली 35 वर्ष सोडलेले असल्यामुळे या नदीच्या जलवैज्ञानिक अवस्थेत मूलभूत बदल झालेले आहेत व त्यामुळे या खोऱ्याचा कोकणातील इतर खोऱ्यापेक्षा वेगळा विचार करणे आवश्यक आहे. या उपखोऱ्यात रत्नागिरी जिल्हयातील खालील तालुक्यांचे क्षेत्र येते.

**रत्नागिरी : 1)** गुहागर 2) दापोली 3) खेड 4) चिपळूण.

मुख्य नद्यांची माहिती खालील प्रमाणे आहे.

लांबी-किमी, तलांक-मी

| अक्र | नदी | लांबी | उगमस्थान | | संगमस्थान | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | ठिकाण | तलांक | ठिकाण | तलांक |
| 1 | वाशिष्ठी | 48 | तिवरे | 720 | दाभोळ | 3 |
| 2 | जगबुडी | 30 | स्थानिक नाला | 690 | गोवळकोट | 12 |

1.1 विस्तार : या खोऱ्याचा क्षेत्रीय विस्तार अक्षांश 18° 22′ ते 18° 45′ उत्तर व रेखांश 73° 04′ ते 73° 43′ पूर्व यामध्ये आहे.

1.2 चतु:सीमा : खोऱ्याच्या चतु:सीमा खालील प्रमाणे आहेत.

| अक्र | दिशा | तपशील |
|---|---|---|
| 1 | उत्तर | मध्य कोकण उपखोरे क्र.22 |
| 2 | पूर्व | ऊर्ध्व कृष्णा (पश्चिम-उत्तर) घटक क्र.15 अ |
| 3 | पश्चिम | अरबी समुद्र |
| 4 | दक्षिण | दक्षिण कोकण क्र 24 अ घटकक्षेत्र |

## 2.0 हवामान

या खोऱ्यातील हवामान दमट आहे. साधारणतः 97 % पाऊस नैऋत्य वाऱ्यांमुळे जून ते सप्टेंबर दरम्यान तर 3 % पाऊस ईशान्य वाऱ्यांमुळे सप्टेंबर नंतर पडतो. वार्षिक सरासरी पर्जन्यमान 3946 मिमी आहे.या खोऱ्यातील सर्वच क्षेत्र जास्त पावसाच्या प्रदेशात येते. या खोऱ्यातील हवामानविषयक इतर बाबी व पर्जन्यमानातील दोलायमानता इत्यादी माहिती खालील प्रमाणे आहे.

पर्जन्य-मिमी, तपमान-अंश सें

| अक्र | वैशिष्ठये | परिमाण | वर्ष | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1 | सर्वात अधिक पाऊस | 4634 | 1983 | पोयनार |
| 2 | सर्वात अधिक तपमान | 38 | 1986 | पोयनार |
| 3 | सर्वात कमी तपमान | 13 | 1996 | पोयनार |

केंद्रनिहाय सरासरी पर्जन्यमानाचा तपशील सारणी 23.2 मध्ये दर्शविलेला आहे.

कृषि- हवामान वर्गीकरणानुसार या उपखोऱ्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

1-अतिपावसाचा जांभ्या खडकाच्या जमिनीचा विभाग (VRL) व 2-घाट विभाग (GH)

उपखोऱ्यातील पर्जन्यमानातील दोलायमानता गुणाक 19 (तक्ता 2.5.8) आहे.

2.1 बाष्पीभवन : या उपखोऱ्यातील सर्वाधिक बाष्पीभवन मे महिन्यात 196 मिमी तर सर्वात कमी बाष्पीभवन जुलै महिन्यात 41 मिमी होते.केंद्रनिहाय व माहवार बाष्पीभवन याबाबतची माहिती सारणी 23.1 मध्ये दिली आहे.

## 3.0 जलसंपत्तीची उपलब्धता

3.1 भूपृष्ठीय जलसंपत्ती :या उपखोऱ्यात गेल्या 32 वर्षांपासून वेगवेगळ्या पध्दतीने प्रकल्पांचे संदर्भात नदयांच्या प्रवाहाची मोजणी केली जात आहे. सरिता मापन केंद्रांचा विकास हा अलीकडचा आहे. या नव्या मोजणी प्रमाणे या उपखोऱ्यातील एकूण सरासरी येवा 5496 दलघमी आहे. 1964 ते 1993 या 30 वर्षांच्या माहितीवर आधारभूत या खोऱ्यातील पाण्याची उपलब्धता खालीलप्रमाणे आहे:

75 टक्के विश्वासार्हतेने 4522 दलघमी
50 टक्के विश्वासार्हतेने 5479 दलघमी.

येवा मोजण्याची ठिकाणे खालील प्रमाणे आहेत

येवा-दलघमी

| अक्र | सरितामापन केंद्राचे नाव | स्वामित्व | आधार सामुग्री उपलब्धता कालावधी | वार्षिक सरासरी येवा |
|---|---|---|---|---|
| 1 | पोयनार ता.खेड | पा.खा. | 1983-96 | 5496 |
| 2 | चाटव ता.खेड | पा.खा. | 1983-96 | 5496 |

वेगवेगळ्या विश्वासार्हतेचा येव्यांची काही मर्यादित माहिती सारणी 23.3 मध्ये दिली आहे.

3.2 भूशैलीय रचना :

भूपृष्ठीय स्थिती (भूरुप वर्णन) : उपखोऱ्यातील भूभाग 55 टक्के अतिविच्छेदीत व डोंगराळ व उर्वरित 45 टक्के जांभा पठाराचा आहे. यात भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा निर्देशित 7 पाणलोट क्षेत्राचा समावेश आहे. शेतीला व सिंचनाला उपयोगी सलग भूक्षेत्र फार थोडया प्रमाणात आहे. पण कोयनेचे अवजल बारमाही सहजपणे उपलब्ध आहे. त्यामुळे जास्त पाणी लागणाऱ्या उद्योगांना/उद्योग प्रक्रियांना हे अत्यंत अनुकूल खोरे आहे. त्यादृष्टीने सघन औद्योगिकीकरणाचा विचार या खोऱ्यात करता येण्यासारखा आहे. या खोऱ्यांत वनखात्याच्या

ताब्यात तुलनेने फार थोडे क्षेत्र आहे. त्यामुळे औद्योगिक वसाहतींच्या विकासांचे नियोजन विविध ठिकाणी सहजपणे करता येणे शक्य आहे.

भूपृष्ठीय शैलस्थिती : उपखोऱ्यातील संपूर्ण क्षेत्र मूलतः लाव्हा थरांपासून तयार झालेल्या बहुस्तरीय दक्षिणी कातळ खडकांनी (डेक्कन ट्रॅप प्रस्तर) व्यापलेले आहे. त्यात भरित- कुहरी बेसाल्टचे प्रमाण अधिक आहे. समुद्र किनाऱ्याकडील जवळ जवळ 50 टक्के भागातील दक्षिण कातळ खडकाच्या (डेक्कन ट्रॅप) वरचा स्तर जांभा खडकात रुपांतरीत झालेला आहे.

3.3 भूजल संपत्ती : पर्जन्यमान जास्त असूनही भूपृष्ठीय स्थिती व भूस्तर अनुकूल नसल्यामुळे भूजल संपत्ती मर्यादीत आहे. त्याच प्रमाणे भूपृष्ठीय जल संपत्ती मुबलक प्रमाणात उपलब्ध असल्यामुळे भूजलाचा सिंचनासाठी वापरही अल्पच आहे.अतिविच्छदित व डोंगराळ आणि पठारी भागाचे प्रमाण जास्त असून विघटीत भूस्तराची जाडी मर्यादित आहे. उतार जास्त असल्यामुळे भूजल धारक प्रस्तरातील भूजल उताराकडे वहात जाऊन झऱ्यावाटे मोठया प्रमाणात नदीत येते. परिणामी भूजल धारक प्रस्तर लवकर रिकामा होवून पिण्यासाठी नेहमीच टंचाई जाणवते.जांभ्या खडकाची जलग्रहण क्षमता चांगली असली तरी त्यातील छिद्रे एकमेकांना जोडलेली असल्यामुळे मुरलेले पाणी तळातून वाहून जाऊन झऱ्यांवाटे बाहेर पडते.भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या 1990 च्या भूजल मूल्यांकनानुसार 87 दलघमी एकूण पुनर्भरण असून सिंचनाखालील विहिरींची संख्या फक्त 1060 आहे. जांभा खडकांत छोटे छोटे बंधारे करुन पाणी अडवून व मुरवून स्थानिक रित्या विहिरीद्वारे अथवा झऱ्यांखाली कुंड करुन त्या द्वारे सिंचनासाठी (विशेषतः फळबागा लागवडीसाठी) वापर करण्याचे प्रयोग यशस्वीरित्या राबविण्यात आलेले आहेत.

## 4.0 जमिनीचा तपशील

या उपखोऱ्यातील जमीन जांभ्या दगडापासून बनलेली आहे. जमिनीचे सविस्तर वर्गिकरण खालील प्रमाणे आहे.

| अक्र | तपशील | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | तांबूस तपकिरी डोंगर उतारावरील जमीन (बसॉल्ट) | 7 |
| 2 | जांभ्या खडकाची जमीन | 50 |
| 3 | गाळाची जमीन | 29 |
| 4 | समुद्र किनाऱ्यावरील खारवट जमीन | 14 |

## 5.0 जमिनीचा वापर

खो-यातील लागवडीयोग्य क्षेत्र, वन खात्याच्या ताब्यातील क्षेत्र,पडीक क्षेत्र इत्यादी पुढील प्रमाणे आहे.

क्षेत्र - हजार हेक्टर

| अक्र | तपशील | क्षेत्र | भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | भौगोलिक क्षेत्र | 223 | |
| 2 | वन खात्याच्या ताब्यातील क्षेत्र | 2 | 0.9 |
| 3 | पेरणीसाठी उपलब्ध नसलेले क्षेत्र | | |
| | अ) ओसाड जमीन | 63 | 28.3 |
| | ब) बिगर शेती उपयोगाकरिता आणलेली जमीन | 4 | 1.8 |
| 4 | मशागतयोग्य पडिक जमीन | 37 | 16.6 |
| 5 | कायमची कुरणे व चराऊ कुरणे | 4 | 1.8 |
| 6 | किरकोळ झाडे झुडपे यांच्या समुहाखालील क्षेत्र | 2 | 0.9 |
| 7 | चालू पडिक जमीन | 7 | 3.1 |
| 8 | इतर पडीक जमीन | 37 | 1.6 |
| 9 | पेरणीचे निव्वळ क्षेत्र | 67 | 30 |
| 10 | लागवडीयोग्य क्षेत्र (4+5+6+7+8+9 ) | 154 | 69 |
| 11 | दुसोटा क्षेत्र | 3 | |
| 12 | पिकाखालील एकूण क्षेत्र(9+11) | 70 | |
| 13 | पीक घनता(12÷9×100) | 104 | |

## 6.0 लोकसंख्या व पशुधन

6.1 <u>लोकसंख्या</u> : सन 1991 च्या जनगणनेनुसार या खोऱ्यातील एकूण लोकसंख्या 4 लक्ष 28 हजार आहे. या खोऱ्यात सन 2030 पर्यन्त होणारी लोकसंख्येतील वाढ, लोकसंख्या घनता इ. पुढील प्रमाणे अपेक्षित आहे.

लोकसंख्या-हजारात,घनता-प्रति चौकिमी

| अक्र | तपशील | 1991 | 2030 |
|---|---|---|---|
| 1 | नागरी | 46 | 103 |
| 2 | ग्रामीण | 382 | 764 |
| 3 | एकूण : | 428 | 867 |
| 4 | लोकसंख्या घनता | 192 | 388 |
| 5 | ग्रामीण लोकसंख्या घनता | 171 | 342 |

6.2 पशुधन : सन 1992 च्या मोजणीनुसार या उपखो-यात एकूण पशुधन 195755 आहे. पशुची वर्गनिहाय संख्या खालील प्रमाणे आहे.

| म्हैस व रेडे | गाय व बैल | एकखुरी व उंट | डुकरे | शेळी मेंढी | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| 24496 | 153340 | 100 | 63 | 17756 | 195755 |

6.3 इतर तपशील : या उपखोऱ्यात 1) खेड 2) चिपळूण 3) दापोली या नगरपालिका आहेत. उपखोऱ्यातील शेत मजुरांची संख्या 1 लक्ष 36 हजार आहे तर इतर मजूर 47 हजार आहेत.

**7.0 पाणीवापर**

7.1 सिंचनासाठी वापर : उपखोऱ्यातील वर्गनिहाय प्रकल्प म्हणजे मध्यम,बृहत् लघु, लघु, स्थानिक स्तर यांची संख्या पाणीसाठा, पाणीवापर, सिंचन क्षेत्र याची तसेच पूर्ण झालेले, प्रगति पथावरील व भविष्यकालिन प्रकल्प याची तपशीलवार माहिती सारणी 23.4 मध्ये दिली आहे. पूर्ण झालेल्या प्रकल्पांची निर्मित सिंचन क्षमता फक्त 2127 हेक्टर असून त्यातील प्रस्तावित पाणीवापर 30 दलघमी आहे.सिंचनासाठी आणखी 11901 हेक्टर क्षेत्र उपलब्ध होऊ शकते पण त्यासाठी सध्याच्या पाणी वापर पध्दतीने आणखी 189 दलघमी पाणी लागेल.

7.2 सिंचनेतर पाण्याचा वापर : या उपखोऱ्यातील सध्याची गरज 20 दलघमी आहे. सन 2030 पर्यंत ची ती 71 दलघमी होईल. या गरजाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

पाणी-दलघमी

| अक्र | तपशील | 1991 | | | | 2030 |
|---|---|---|---|---|---|---|
| | | नागरी | ग्रामीण | पशुधन | एकूण | |
| 1 | घरगूती वापरासाठी | 2 | 8 | 5 | 15 | 26 |
| 2 | उद्योगासाठी | | | | 5 | 45 |
| | | | | एकूण | 20 | 71 |

7.3 जलसंपत्तीचा ताळेबंद :भूपृष्ठावरील व भूपृष्ठाखालील उपलब्ध जलसंपत्ति,घरगुती वापरासाठी, उद्योगासाठी व सिंचनासाठी वापर व त्यातून होणारा पुनरुद्भव याचा ताळेबंद सारणी 23.5 मध्ये दिला आहे.

7.4 सन 1970 पूर्वीची धरणे : या उपखोऱ्यात 1970 पूर्वी धरणे बांधलेली नाहीत किंवा सिंचन प्रकल्पही केलेले नाहीत. त्यामुळे सिंचनाचा अनुभव तसा या उपखोऱ्याला नवाच आहे. परंतु दापोलीचे कृषि विद्यापीठ या उपखोऱ्यातच असल्यामुळे सिंचनाखालील नवी पीकरचना उभी करण्यासाठी सघन स्थानिक प्रयत्न या उपखोऱ्यांत सहजपणे शक्य होणार आहेत.

**8.0 पीकरचना**

उपखोऱ्यात पेरणी खालचे क्षेत्र 67 हजार हेक्टर आहे. यात प्रामुख्याने खरीप पीक क्षेत्र आहे. भात हे मुख्य पीक आहे. उपखोऱ्यातील हवामान व जमीन आंबा, काजू,कोकम,भात केळी, ऊस, उन्हाळी भुईमूग इ. पिकास अनुकूल आहे. भात पिकाची दरहेक्टरी उत्पादकता 22.73 आहे.

## 9.0 उद्योगधंदे

सध्या या खोऱ्यात कृषी आधारीत उद्योग नाहीत.

## 10.0 जलविद्युत निर्मिति

अनुकूल भौगोलिक परिस्थितीमुळे या खोऱ्यात आणखी जलविद्युत निर्मितीस भरपूर वाव आहे. भविष्यात एकूण 11 जलविद्युत केंद्रे अन्वेषणाधीन आहेत. यापैकी बृहत् आराखडयाअंतर्गत 7 व जपानच्या सहभागीने केलेल्या बृहत् आराखडयाअंतर्गत 4 केंद्रे असून त्यांची क्षमता अनुक्रमे 74 मेवॅ व 1710 मेवॅ आहे. वीजकेंद्राची नावे व क्षमता खालील प्रमाणे आहे.

क्षमता-मेवॅ

| अक्र | योजनेचे नाव | क्षमता |
|---|---|---|
| अ) जलविद्युत बृहत् आराखडा | | |
| 1 | नागायगे ता.चिपळूण | 20 |
| 2 | वडगाव ता.चिपळूण | 22 |
| 3 | जगबुडी ता.खेड | 17 |
| 4 | जोग ता.दापोली | 7 |
| 5 | करकुंदवाडी ता.चिपळूण | 7 |
| 6 | वाकी ता.खेड | 0.2 |
| 7 | न्यू मांडवे ता.खेड | 0.5 |
| आ)जपानच्या सहभागाने बनवलेला उदंचन निर्मिती केंद्रांचा बृहत् आराखडा | | |
| 1 | कुडन बुद्रुक ता.खेड | 450 |
| 2 | कोजेशी ता.खेड | 400 |
| 3 | मधलीवाडी ता.खेड | 500 |
| 4 | वैतरणी ता.खेड | 360 |

## 11.0 दळणवळणाची साधने

या उपखोऱ्यातून मुंबई - मंगलोर हा कोकण रेल्वे मार्ग जातो,शिवाय राष्ट्रीय महामार्ग क्र. 17 मुंबई - गोवा तसेच राज्यमहामार्ग गुहागर - कराड जातो.

## 12.0 भावी नियोजनाची दिशा

12.1 या उपखोऱ्यात वार्षिक सरासरी जलसंपत्ती 5496 दलघमी आहे. याच उपखोऱ्यात कोयना प्रकल्पात वीज निर्माण झाल्यानंतर 1911दलघमी (67.5 अघफू) पाणी वाशिष्टी नदीत सोडण्यात आलेले आहे. त्याचाही लाभ या उपखोऱ्याला करून घेता येण्यासारखा आहे. अशा रीतीने पाण्याची एकूण उपलब्धता पुढील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| अ) खोऱ्यातील सरासरी उपलब्धता | | 5496 दलघमी |
| आ) कोयना अवजल | | 1911 दलघमी |
| | एकूण : | 7407 दलघमी. |

या खोऱ्यात वाशिष्ठी व जगबुडी या उपनद्यावर 8 लघु प्रकल्पांच्या माध्यमातून 16.32 दलघमी चलपाणी साठे निर्माण करण्यात आले आहेत व त्याद्वारे 14.51 दलघमी पाणीवापर होत आहे व स्थानिक लघु वळण बंधारे व पाझर तलाव याची संख्या 80 इतकी आहे व त्यांच्याद्वारे 15.28 दलघमी एवढा पाणीवापर होत आहे अशा रीतीने या उपखोऱ्यात 29.79 दलघमी एवढा पाणीवापर करता येईल. या उपखोऱ्यात पाण्याची मुबलकता असल्यामुळे येव्याच्या दोलायमानतेचा परिणाम जाणवत नाही.

12.2 कोयना जलाशयातून विद्युतनिर्मिती नंतर जे पाणी (1911 दलघमी) वाशिष्ठीत बारमाही वाहत येते व पुढे समुद्राला मिळते, त्या अवजलाचा उपयोग करुन दाभोळ बंदराचा विकास करता येणे शक्य आहे. या बंदराचा विकास येत्या 25-30 वर्षांत कोयनेच्या अवजलाशी निगडीत राहील. वाहतुकीवरील व मुंबई बंदरावरील भार कमी करण्यासाठी या बंदराचा उपयोग करुन घेता येणे शक्य व्हावे. रस्ते, रेल्वे व बंदर यांचा समन्वयक विचार या खोऱ्याच्या विकासासाठी उपयुक्त ठरेल. शिवाय कोयनेच्या अवजलाचा उपयोग नदीकाठच्या 20 किमी पट्ट्यात औद्योगिक विकासासाठी करणेही शक्य आहे. या सगळया सोयींचा एकत्रित विचार होऊन पाणी वापरावर आधारित औद्योगिकीकरणाचा विचार या खोऱ्यासाठी होऊ शकेल. खोऱ्याचे विकास केंद्र म्हणून चिपळूणचा परिसर नागरी व औद्योगिक संदर्भात पुढे येत आहे. त्याचे प्रादेशिक संदर्भात नीट नियोजन होणे गरजेचे दिसते.

12.3 कोयना टप्पा-4 पूर्ण झाल्यानंतर वाशिष्ठी नदीत सोडले जाणारे कोयनेचे पाणी कमी वेळात अधिक परिमाणात उपलब्ध होणार आहे (थोडावेळ एकदम खूप प्रवाह व नंतर तो घटता राहणार असा) या मुळे नदीत (surging effect )दररोज होणार आहे. त्याचा समन्वय करण्याचे नियोजन नदीपात्रात बंधाऱ्यांची /दरवाजांची शृंखला उभारुन करणे आवश्यक आहे याचा मात्र वेळीच विचार करावा लागेल. कोयनेचे अवजल उदंचन वीज निर्मितीस अनुकूल करुन घेता येईल काय याचाही वेळीच विचार होणे गरजेचे आहे.

12.4 या खोऱ्यात दाभोळ येथे एन्रॉन उर्जा प्रकल्प व हिंदुस्थान ओमेन तेल शुध्दीकरण यासारख्या महाकाय प्रकल्पांची कामे चालू आहेत .

12.5 खोऱ्याच्या पश्चिमेस सागर असल्यामुळे वेलदूर व दाभोळ बंदराचा विकास करण्यास वाव आहे.

12.6 कोयना अवजलाचे पाणी उपलब्ध आहे. त्यामुळे जादा पाणी लागणारे उद्योग चिपळूण परिसरात निर्माण करण्यास वाव आहे.

12.7 या खोऱ्यात 1569 हेक्टर खार जमिनी आहेत. त्या सुधारण्याची गरज आहे.

12.8 कोयनेच्या अवजलाचा वापर को.प.बंधाऱ्यांद्वारे करुन या उपखोऱ्यामध्ये शेतीचे उत्पन्न वाढविता येईल. पूर्वी जिल्हा परिषदेने या भागात उपसा सिंचन योजना उभ्या केल्या होत्या व ऊसाची लागवड करुन साखर कारखाना उभारायची योजना होती ती मागे पडली आहे. तरी निदान यावर भाजीपाल्या सारखी पिके घेऊन शेतकऱ्यांना स्वावलंबी करता येईल. पशुसंवर्धनासाठी चाऱ्याची पिकेही घेता यतील.

12.9 उपखोऱ्यात दापोली येथे कोकण कृषि विद्यापीठ आहे. या विद्यापिठाद्वारे कोकणातील पीक पध्दती, पाण्याची उपलब्धता व प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर झालेले आर्थिक, सामाजिक बदल इ. चा अभ्यास करावा.

12.10 वाशिष्ठीनदीवर चिपळूण वसलेले आहे. चिपळूण ते समुद्रकिनाऱ्यापर्यंत नदीच्या दुतर्फा व सागर किनाऱ्याला मुखाजवळ ठिकठिकाणी मँग्रूव्हची वाढ झालेली दिसते. किनाऱ्यापासून सुमारे 30 किमी आत वाशिष्ठी एकेकाळी नैसर्गिक मँग्रूव्हची वनस्पतींनी समृध्द होती.

साधारणतः 1965 पासून कोयना जलविद्युत प्रकल्पातून फार मोठया प्रमाणावर पोफळी जवळ वाशिष्ठीत अवजल सोडण्यात येऊ लागले. तेव्हा पासून गोडयापाण्याच्या प्रादुर्भावामुळे नदीतील पाण्याचा खारेपणा कमी झाला. त्यामुळे निसर्गतः खाऱ्यापाण्याच्या पार्श्वभूमीवर वाढणाऱ्या मँग्रूव्हच्या रचनेत, घडणीत आणि पोषक अन्नद्रव्यात कमालीचा बदल झाला. परिणामी पूर्ण भारतभरात येथील मँग्रूव्ह ही अशा प्रतिकूलतेमुळे वैशिष्ठयपूर्ण ठरतात. कोयनेच्या अवजलामुळे समुद्राजवळील बरेच किमी आत नदीतटावर मानवी हस्तक्षेप वाढला. भातशेती करण्यासाठी नदीकाठच्या जमिनीचे पुनर्प्रापण करण्याचे प्रमाण वाढले. खबरदारी म्हणून मँग्रूव्ह खालच्या जमिनी लागवडीखाली आणण्याच्या प्रयत्नांना कितपत आळा घालणे हवे आहे याचा वेळीच अभ्यास करुन घेणे आवश्यक आहे.

12.11 सागरसंगमापासून सुमारे 5 किमी आत वाशिष्ठी नदीमध्ये पावसाळ्यात समुद्राच्या भरती-ओहटीचा प्रभाव साधारणतः कमी जाणवतो. या भागात नदीला असलेला बेताचा उतार, थोडका व तोही दोलायमान विसर्ग, भरती-ओहटी तसेच निर्वनीकरण झालेल्या नदीच्या वरच्या भागात जमिनीची होणारी धूप यामुळे नदीच्या मुखाशी हळूहळू गाळ साचून sand bar तयार झालेला आढळतो. तरी सुध्दा एकूण लांबी व जलवाहतुकीस असलेली अनुकूलता या दृष्टीने वाशिष्ठी ही महत्वाची नदी ठरते. सुमारे 45 किमी लांबी, भरती ओहोटीच्या दोन्ही अवस्थेत नौकावहनात न येणारा अडथळा, गोवळकोटच्या खाली नदीचे रुंदावलेले पात्र तसेच कोयना जलाशयातून (जलविद्युत निर्मिति नंतर) येणारे विपुल पाणी या सर्वांमुळे जलवाहतुकीला अनुकूलता प्राप्त झालेली आहे. चिपळूण पासून खाली सुमारे 5 किमी अंतरावर नदी दुभागली जाऊन मधील त्रिकोणात गोवळकोट वसलेले आहे. नौकावहनात त्यामुळे नैसर्गिकरित्या थांब्याची सोय उपलब्ध झालेली आहे. गोवळकोटला ऐतिहासिक किल्ला आहे. या सर्वांचा अनुकूल उपयोग करुन घेण्याच्या दृष्टिने औद्योगिकरण, वाहतूक, वाशिष्ठीच्या पाण्यावरील उपसा व्यवस्था, साठवणी बंधाऱ्यांची खोऱ्यातील शृंखला असा सम्यक विकासाचा आराखडा या खोऱ्यासाठी तयार करणे उपयुक्त राहील असे दिसते.

12.12 जलसंधारणाचा कार्यक्रम वाशिष्ठी उपखोऱ्यात 1993 पासून राबविण्यात येत आहे. आतापावेतो (1997) 400 च्या वर घळीचे बांध, 1500 सलग समपातळी बांध (CCT) बांधलेले असून 4 पाणलोट क्षेत्रात 652 हेक्टर क्षेत्र या कार्यक्रमाखाली आणलेले आहे. आंबा (40 हेक्टर), काजू (10 हेक्टर), केळी व इतर (51 हेक्टर) इत्यादी फळफळावळे घेतली जातात. अशा कार्यक्रमाचे नियतकालिन मूल्यांकन करुन ते अभ्यासकांना उपलब्ध होणे जरुरीचे आहे.

000

सारणी : 23.1

## हवामानाचा तपशील

पर्जन्यमान, बाष्पीभवन-मिमी

| अक्र | महिना | पर्जन्यमान | बाष्पीभवन |
|---|---|---|---|
| 1 | जानेवारी | 0 | 140 |
| 2 | फेब्रूवारी | 0 | 174 |
| 3 | मार्च | 0 | 183 |
| 4 | एप्रिल | 0 | 140 |
| 5 | मे | 34 | 196 |
| 6 | जून | 889 | 140 |
| 7 | जुलै | 1438 | 41 |
| 8 | ऑगस्ट | 1004 | 80 |
| 9 | सप्टेंबर | 421 | 119 |
| 10 | ऑक्टोबर | 160 | 148 |
| 11 | नोव्हेंबर | 0 | 141 |
| 12 | डिसेंबर | 0 | 196 |
| | एकूण : | 3946 | 1698 |

हंगामनिहाय बाष्पीभवन

| अक्र | हंगाम | बाष्पीभवन |
|---|---|---|
| 1 | खरीप | 314 |
| 2 | रब्बी | 725 |
| 3 | उन्हाळी | 659 |
| | एकूण : | 1698 |

सारणी : 23.1 (चालू)

पर्जन्यमानाचा तपशील

केंद्र : चिपळूण

पर्जन्यमान-मिमी

| अक्र | वर्ष | वार्षिक सरासरी पर्जन्यमान | उतरत्या क्रमाने पर्जन्यमान | संगत वर्ष | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1901 | 3776 | 6978 | 1955 | |
| 2 | 1902 | 3095 | 5763 | 1954 | |
| 3 | 1903 | 3553 | 5175 | 1931 | |
| 4 | 1904 | 3286 | 5130 | 1983 | |
| 5 | 1905 | 2230 | 4839 | 1970 | |
| 6 | 1906 | 3219 | 4829 | 1958 | |
| 7 | 1907 | 3430 | 4791 | 1946 | |
| 8 | 1908 | 4242 | 4639 | 1964 | 10 |
| 9 | 1909 | 3716 | 4480 | 1938 | |
| 10 | 1910 | 3198 | 4455 | 1933 | |
| 11 | 1911 | 2614 | 4433 | 1916 | |
| 12 | 1912 | 3561 | 4377 | 1953 | |
| 13 | 1913 | 2911 | 4338 | 1914 | |
| 14 | 1914 | 4338 | 4288 | 1956 | |
| 15 | 1915 | 3165 | 4242 | 1908 | |
| 16 | 1916 | 4433 | 4148 | 1917 | |
| 17 | 1917 | 4148 | 4096 | 1957 | 20 |
| 18 | 1918 | 2294 | 4047 | 1937 | |
| 19 | 1919 | 3915 | 4028 | 1927 | |
| 20 | 1920 | 2356 | 4018 | 1978 | |
| 21 | 1921 | 3119 | 4013 | 1949 | |
| 22 | 1922 | 3627 | 3969 | 1977 | |
| 23 | 1923 | 2965 | 3950 | 1974 | |
| 24 | 1924 | 2908 | 3938 | 1926 | |
| 25 | 1925 | 2770 | 3934 | 1975 | 30 |
| 26 | 1926 | 3938 | 3928 | 1962 | |
| 27 | 1927 | 4028 | 3915 | 1919 | |
| 28 | 1928 | 3751 | 3891 | 1934 | |
| 29 | 1929 | 3327 | 3882 | 1960 | |

पर्जन्यमान-मिमी

| अक्र | वर्ष | वार्षिक सरासरी पर्जन्यमान | उतरत्या क्रमाने पर्जन्यमान | संगत वर्ष | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 30 | 1930 | 3660 | 3852 | 1976 | |
| 31 | 1931 | 5175 | 3831 | 1959 | |
| 32 | 1932 | 3636 | 3798 | 1985 | |
| 33 | 1933 | 4455 | 3776 | 1901 | |
| 34 | 1934 | 3891 | 3751 | 1928 | |
| 35 | 1935 | 2645 | 3716 | 1909 | |
| 36 | 1936 | 3613 | 3660 | 1930 | |
| 37 | 1937 | 4047 | 3652 | 1971 | |
| 38 | 1938 | 4480 | 3643 | 1943 | |
| 39 | 1939 | 3204 | 3636 | 1932 | |
| 40 | 1940 | 3249 | 3627 | 1922 | |
| 41 | 1941 | 2239 | 3613 | 1936 | |
| 42 | 1942 | 3588 | 3588 | 1942 | 50 |
| 43 | 1943 | 3643 | 3585 | 1967 | |
| 44 | 1944 | 3190 | 3561 | 1912 | |
| 45 | 1945 | 3231 | 3559 | 1965 | |
| 46 | 1946 | 4791 | 3553 | 1903 | |
| 47 | 1947 | 3293 | 3538 | 1973 | |
| 48 | 1948 | 3420 | 3475 | 1981 | |
| 49 | 1949 | 4013 | 3430 | 1907 | |
| 50 | 1950 | 3242 | 3420 | 1948 | |
| 51 | 1951 | 3365 | 3417 | 1980 | |
| 52 | 1952 | 2796 | 3365 | 1951 | |
| 53 | 1953 | 4377 | 3365 | 1982 | |
| 54 | 1954 | 5763 | 3327 | 1929 | |
| 55 | 1955 | 6978 | 3293 | 1947 | |
| 56 | 1956 | 4288 | 3286 | 1904 | |
| 57 | 1957 | 4096 | 3261 | 1979 | |
| 58 | 1958 | 4829 | 3249 | 1940 | |
| 59 | 1959 | 3831 | 3242 | 1950 | |
| 60 | 1960 | 3882 | 3231 | 1945 | |
| 61 | 1961 | 2583 | 3219 | 1906 | |

पर्जन्यमान-मिमी

| अक्र | वर्ष | वार्षिक सरासरी पर्जन्यमान | उतरत्या क्रमाने पर्जन्यमान | संगत वर्ष | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 62 | 1962 | 3928 | 3204 | 1939 | |
| 63 | 1963 | 2206 | 3198 | 1910 | |
| 64 | 1964 | 4639 | 3190 | 1944 | |
| 65 | 1965 | 3559 | 3184 | 1984 | |
| 66 | 1967 | 3585 | 3165 | 1915 | |
| 67 | 1968 | 816 | 3119 | 1921 | |
| 68 | 1969 | 2988 | 3095 | 1902 | |
| 69 | 1970 | 4839 | 2988 | 1969 | |
| 70 | 1971 | 3652 | 2965 | 1923 | |
| 71 | 1972 | 2544 | 2911 | 1913 | |
| 72 | 1973 | 3538 | 2908 | 1924 | 90 |
| 73 | 1974 | 3950 | 2901 | 1986 | |
| 74 | 1975 | 3934 | 2796 | 1952 | |
| 75 | 1976 | 3852 | 2770 | 1925 | |
| 76 | 1977 | 3969 | 2645 | 1935 | |
| 77 | 1978 | 4018 | 2614 | 1911 | |
| 78 | 1979 | 3261 | 2583 | 1961 | |
| 79 | 1980 | 3417 | 2544 | 1972 | |
| 80 | 1981 | 3475 | 2356 | 1920 | |
| 81 | 1982 | 3365 | 2294 | 1918 | |
| 82 | 1983 | 5130 | 2239 | 1941 | |
| 83 | 1984 | 3184 | 2230 | 1905 | |
| 84 | 1985 | 3798 | 2206 | 1963 | |
| 85 | 1986 | 2901 | 816 | 1968 | |

| | |
|---|---|
| सरासरी | 3599 |
| प्रमाप विचलन | 843 |
| दोलायमानता गुणांक | 23 |

सारणी : 23.1 (चालू)

पर्जन्यमानाचा तपशील

केंद्र : दापोली

पर्जन्यमान-मिमी

| अक्र | वर्ष | वार्षिक सरासरी पर्जन्यमान | उतरत्या क्रमाने पर्जन्यमान | संगत वर्ष | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1901 | 3073 | 5452 | 1985 | |
| 2 | 1902 | 2735 | 5149 | 1963 | |
| 3 | 1903 | 3429 | 4759 | 1955 | |
| 4 | 1904 | 2575 | 4621 | 1916 | |
| 5 | 1905 | 2447 | 4605 | 1983 | |
| 6 | 1906 | 2693 | 4604 | 1978 | |
| 7 | 1907 | 3083 | 4387 | 1960 | |
| 8 | 1908 | 3483 | 4347 | 1931 | 10 |
| 9 | 1909 | 3536 | 4305 | 1959 | |
| 10 | 1910 | 3024 | 4273 | 1933 | |
| 11 | 1911 | 2103 | 4238 | 1954 | |
| 12 | 1912 | 3576 | 4236 | 1975 | |
| 13 | 1913 | 3485 | 4200 | 1964 | |
| 14 | 1914 | 3987 | 4144 | 1958 | |
| 15 | 1915 | 3224 | 4111 | 1974 | |
| 16 | 1916 | 4621 | 4097 | 1970 | 20 |
| 17 | 1917 | 3704 | 4015 | 1962 | |
| 18 | 1918 | 1993 | 3987 | 1914 | |
| 19 | 1919 | 3507 | 3961 | 1981 | |
| 20 | 1920 | 1912 | 3947 | 1946 | |
| 21 | 1921 | 3181 | 3911 | 1938 | |
| 22 | 1922 | 3466 | 3886 | 1943 | |
| 23 | 1923 | 3184 | 3868 | 1937 | |
| 24 | 1924 | 2544 | 3856 | 1928 | |
| 25 | 1925 | 2281 | 3852 | 1977 | 30 |
| 26 | 1926 | 3506 | 3827 | 1961 | |
| 27 | 1927 | 3614 | 3798 | 1934 | |
| 28 | 1928 | 3856 | 3759 | 1953 | |
| 29 | 1929 | 2776 | 3704 | 1917 | |

पर्जन्यमान-मिमी

| अक्र | वर्ष | वार्षिक सरासरी पर्जन्यमान | उतरत्या क्रमाने पर्जन्यमान | संगत वर्ष | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 30 | 1930 | 3324 | 3698 | 1957 | |
| 31 | 1931 | 4347 | 3698 | 1947 | |
| 32 | 1932 | 3254 | 3661 | 1944 | |
| 33 | 1933 | 4273 | 3649 | 1979 | |
| 34 | 1934 | 3798 | 3629 | 1956 | |
| 35 | 1935 | 2725 | 3627 | 1949 | |
| 36 | 1936 | 3198 | 3614 | 1927 | |
| 37 | 1937 | 3868 | 3576 | 1912 | |
| 38 | 1938 | 3911 | 3555 | 1942 | |
| 39 | 1939 | 3144 | 3536 | 1909 | |
| 40 | 1940 | 3105 | 3507 | 1919 | |
| 41 | 1941 | 1528 | 3506 | 1926 | 50 |
| 42 | 1942 | 3555 | 3500 | 1973 | |
| 43 | 1943 | 3886 | 3485 | 1913 | |
| 44 | 1944 | 3661 | 3483 | 1908 | |
| 45 | 1945 | 3113 | 3466 | 1922 | |
| 46 | 1946 | 3947 | 3429 | 1903 | |
| 47 | 1947 | 3698 | 3414 | 1980 | |
| 48 | 1948 | 3213 | 3384 | 1976 | |
| 49 | 1949 | 3627 | 3324 | 1930 | |
| 50 | 1950 | 2745 | 3254 | 1932 | |
| 51 | 1951 | 2567 | 3224 | 1915 | |
| 52 | 1952 | 2676 | 3213 | 1948 | |
| 53 | 1953 | 3759 | 3198 | 1936 | |
| 54 | 1954 | 4238 | 3184 | 1923 | |
| 55 | 1955 | 4759 | 3181 | 1921 | |
| 56 | 1956 | 3629 | 3144 | 1939 | |
| 57 | 1957 | 3698 | 3113 | 1945 | |
| 58 | 1958 | 4144 | 3105 | 1940 | |
| 59 | 1959 | 4305 | 3083 | 1907 | |
| 60 | 1960 | 4387 | 3073 | 1901 | |
| 61 | 1961 | 3827 | 3048 | 1984 | |

पर्जन्यमान-मिमी

| अक्र | वर्ष | वार्षिक सरासरी पर्जन्यमान | उतरत्या क्रमाने पर्जन्यमान | संगत वर्ष | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 62 | 1962 | 4015 | 3035 | 1971 | |
| 63 | 1963 | 5149 | 3024 | 1910 | |
| 64 | 1964 | 4200 | 2953 | 1967 | |
| 65 | 1967 | 2953 | 2904 | 1986 | |
| 66 | 1968 | 2071 | 2899 | 1982 | |
| 67 | 1970 | 4097 | 2776 | 1929 | |
| 68 | 1971 | 3035 | 2745 | 1950 | |
| 69 | 1972 | 2612 | 2735 | 1902 | |
| 70 | 1973 | 3500 | 2725 | 1935 | |
| 71 | 1974 | 4111 | 2693 | 1906 | |
| 72 | 1975 | 4236 | 2676 | 1952 | 90 |
| 73 | 1976 | 3384 | 2612 | 1972 | |
| 74 | 1977 | 3852 | 2575 | 1904 | |
| 75 | 1978 | 4604 | 2567 | 1951 | |
| 76 | 1979 | 3649 | 2544 | 1924 | |
| 77 | 1980 | 3414 | 2447 | 1905 | |
| 78 | 1981 | 3961 | 2281 | 1925 | |
| 79 | 1982 | 2899 | 2103 | 1911 | |
| 80 | 1983 | 4605 | 2071 | 1968 | |
| 81 | 1984 | 3048 | 1993 | 1918 | |
| 82 | 1985 | 5452 | 1912 | 1920 | |
| 83 | 1986 | 2904 | 1528 | 1941 | |

सरासरी 3449

प्रमाप विचलन 732

दोलायमानता गुणांक 21

सारणी : 23.2

**पर्जन्यमापन केंद्रांचा तपशील**

पर्जन्य-मिमी

| अक्र | केंद्राचे नाव | प्रकार | स्वामित्व | आधारसामूग्री उपलब्धतेचा कालावधी | वार्षिक सरासरी पर्जन्य |
|---|---|---|---|---|---|
| 1 | नांदिवसे ता.चिपळूण | सा.प.,स्व.प. | पा.खा. | 1991-96 | 3946 |
| 2 | लवेल ता.खेड | सा.प.,स्व.प. | पा.खा. | 1989-96 | 3847 |
| 3 | करंबवणे ता.चिपळूण | सा.प.,स्व.प. | पा.खा. | 1991-96 | 3320 |
| 4 | तळसर ता.चिपळून | सा.प.,स्व.प. | पा.खा. | 1991-96 | 3324 |
| 5 | शिरगाव ता.खेड | सा.प.,स्व.प. | पा.खा. | 1990-96 | 4971 |
| 6 | संगलट ता.खेड | सा.प.,स्व.प. | पा.खा. | 1991-96 | 3246 |
| 7 | गोवळकोट ता.चिपळूण | सा.प.,स्व.प. | पा.खा. | 1991-96 | 3166 |
| 8 | पायनार ता.खेड | सा.प.,स्व.प. | पा.खा. | 1983-96 | 3563 |
| 9 | पिंपळी ता.चिपळूण | सा.प.,स्व.प. | पा.खा. | 1991-96 | 3860 |
| 10 | चाटव ता.खेड | सा.प.,स्व.प. | पा.खा. | 1983-96 | 4523 |
| 11 | बिरमणी ता.खेड | सा.प.,स्व.प. | पा.खा. | 1989-96 | 4841 |
| 12 | दाभोळ ता.कुहागर | सा.प.,स्व.प. | पा.खा. | 1990-96 | 3065 |
| 13 | कोलथरे ता.दापोली | सा.प.,स्व.प. | पा.खा. | 1990-96 | 3180 |
| 14 | पंचनदी | सा.प.,स्व.प. | पा.खा. | 1982-93 | 2941 |
| 15 | गुहागर | सा.प. | म.खा. | 1901-93 | 2710 |
| 16 | वाकवली | सा.प. | कृ.खा. | 1980-93 | 3676 |
| 17 | खेड | सा.प. | म.खा. | 1901-93 | 3695 |
| 18 | चिपळूण | सा.प. | मा.ह.खा | 1901-86 | 3624 |
| 19 | मालघर | सा.प.,स्व.प. | पा.खा. | 1981-93 | 3261 |
| 20 | कळवंडे | सा.प.,स्व.प. | पा.खा. | 1981-93 | 3507 |
| 21 | फणसवाडी | सा.प. | पा.खा. | 1979-93 | 3531 |
| 22 | अडरे | सा.प.,स्व.प. | पा.खा. | 1991-93 | 3779 |
| 23 | कुडुप | सा.प.,स्व.प. | पा.खा. | 1989-93 | 4221 |
| 24 | शिरवली | सा.प.,स्व.प. | पा.खा. | 1978-93 | 3603 |
| 25 | नातूवाडी | सा.प.,स्व.प. | पा.खा. | 1989-93 | 4297 |
| 26 | भरणे | सा.प.,स्व.प. | पा.खा. | 1986-93 | 4171 |
| 27 | दापोली | सा.प. | मा.ह.सा. | 1901-86 | 3449 |

टिप : सा.प.- सामान्य पर्जन्यमापन केंद्र स्व.प.- स्वयंचलित पर्जन्यमापन केंद्र

पा.खा.-पाटबंधारे खाते म.खा.-महसूल खाते,कृ.खा-कृषी खाते

सारणी : 23.3

**जलसंपत्तीची उपलब्धता**

ठिकाण : पोयनार, चाटवा ता.खेड येवा-दलघमी

| अक्र | वर्ष | वार्षिक सरासरी येवा | उतरत्या क्रमाने येवा | संगत वर्ष | विश्वासार्हता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1964 | 7806 | 8862 | 1983 | |
| 2 | 1965 | 5479 | 8254 | 1970 | |
| 3 | 1966 | 4873 | 7806 | 1964 | 10 |
| 4 | 1967 | 5535 | 7782 | 1993 | |
| 5 | 1968 | 1279 | 6759 | 1990 | |
| 6 | 1969 | 6455 | 6561 | 1978 | 20 |
| 7 | 1970 | 8254 | 6455 | 1969 | |
| 8 | 1971 | 5962 | 6414 | 1977 | |
| 9 | 1972 | 3184 | 6321 | 1974 | 30 |
| 10 | 1973 | 5434 | 6306 | 1975 | |
| 11 | 1974 | 6321 | 6033 | 1976 | |
| 12 | 1975 | 6306 | 5962 | 1971 | 40 |
| 13 | 1976 | 6033 | 5591 | 1988 | |
| 14 | 1977 | 6414 | 5535 | 1967 | |
| 15 | 1978 | 6561 | 5479 | 1965 | 50 |
| 16 | 1979 | 4863 | 5434 | 1973 | |
| 17 | 1980 | 5378 | 5378 | 1980 | |
| 18 | 1981 | 5298 | 5298 | 1981 | 60 |
| 19 | 1982 | 5281 | 5281 | 1982 | |
| 20 | 1983 | 8862 | 5080 | 1985 | |
| 21 | 1984 | 4261 | 4873 | 1966 | 70 |
| 22 | 1985 | 5080 | 4863 | 1979 | |
| 23 | 1986 | 2766 | 4522 | 1989 | 75 |
| 24 | 1987 | 4408 | 4408 | 1987 | 80 |
| 25 | 1988 | 5591 | 4320 | 1992 | |
| 26 | 1989 | 4522 | 4261 | 1984 | |
| 27 | 1990 | 6759 | 3813 | 1991 | 90 |
| 28 | 1991 | 3813 | 3184 | 1972 | |
| 29 | 1992 | 4320 | 2766 | 1986 | |
| 30 | 1993 | 7782 | 1279 | 1968 | |

$$\frac{\text{10 टक्के उपलब्धता}}{\text{90 टक्के उपलब्धता}} = 2.05$$

$$\frac{\text{50 टक्के उपलब्धता}}{\text{90 टक्के उपलब्धता}} = 1.44$$

$$\frac{\text{50 टक्के उपलब्धता}}{\text{75 टक्के उपलब्धता}} = 1.21$$

## सारणी : 23.4

### प्रकल्पांची सद्य:स्थिती

जलपाणीसाठा - दलघमी
पाणीवापर - दलघमी
सिंचनक्षेत्र - हेक्टर

| अक्र | प्रकल्पाचा संवर्ग | पूर्ण झालेले प्रकल्प | | | | बांधकामाधीन प्रकल्प | | | | भविष्यकालीन व अन्वेषणाधीन प्रकल्प | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | जल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | संख्या | जल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | संख्या | जल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र | संख्या | जल पाणीसाठा | पाणी वापर | सिंचन क्षेत्र |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 1) राज्यस्तरीय प्रकल्प | | | | | | | | | | | | | | | | | |
| अ) | मोठे | 0 | | | | | | | | | | | | | 0 | 0 | 0 |
| ब | मध्यम | 0 | | | | नातूवाडी | 28.08 | 27.23 | 2050 | | | | | | 28.08 | 27.23 | 2050 |
| | | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 28.08 | 27.23 | 2050 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 28.08 | 27.23 | 2050 |
| क | लघु प्रकल्प | शिरवली | 3.365 | 2.969 | 57 | पंचनदी | 1.737 | 1.461 | 91 | किंजळे | 19.398 | 18.42 | 998 | | 24.5 | 22.854 | 1146 |
| | | भरणे | 0.979 | 0.979 | 98 | पिंपळवाडी | 25.167 | 21.616 | 1336 | कुरवळ | 2.63 | 2.588 | 142 | | 28.776 | 25.183 | 1576 |
| | | आंबडस | 0.82 | 0.764 | 120 | कोंडिवली | 4.685 | 4.628 | 264 | मुडदे | 0.302 | 0.27 | 25 | | 5.807 | 5.662 | 409 |
| | | कुडोशी | 1.314 | 0.807 | 109 | शेलडी | 1.87 | 1.749 | 134 | नांदिवसे | 0.45 | 0.41 | 24 | | 3.634 | 2.966 | 267 |
| | | फणसवाडी | 1.408 | 1.306 | 47 | तळवट | 3.49 | 2.59 | 274 | शिरगांव | 0.28 | 0.25 | 16 | | 5.178 | 4.146 | 337 |
| | | मालघर | 1.996 | 1.711 | 142 | न्यु मांडवे | 20.433 | 20.251 | 996 | देवके | 1.48 | 1.302 | 109 | | 23.909 | 23.264 | 1247 |
| | | कळवंडे | 1.967 | 1.927 | 114 | शिवथर | 3.318 | 3.016 | 231 | पोयनार | 27.799 | 26.96 | 1051 | | 33.084 | 31.899 | 1396 |
| | | गुहागर | 4.471 | 4.05 | 100 | अडरे | 3.424 | 3.289 | 267 | शेलारवाडी | 16.233 | 15.86 | 785 | | 24.128 | 23.199 | 1152 |
| | | | | | | खोपड | 1.863 | 1.541 | 101 | निळवणे | 2.127 | 1.756 | 149 | | 3.99 | 3.297 | 250 |
| | | | | | | मोरवणे | 3.84 | 3.09 | 286 | संगलट | 3.05 | 2.371 | 211 | | 6.89 | 5.461 | 497 |
| | | | | | | तळवली | 1.608 | 1.432 | 120 | बावळे | 2.264 | 1.964 | 168 | | 3.872 | 3.396 | 288 |
| | | | | | | पाटपन्हाळे | 1.968 | 1.705 | 111 | तिवरे | 2.451 | 2.222 | 174 | | 4.419 | 3.927 | 285 |
| | | | | | | | | | | खेर्डी | 2.08 | 1.834 | 128 | | 2.08 | 1.834 | 128 |
| | | 8 | 16.32 | 14.51 | 787 | 12 | 73.403 | 66.368 | 4211 | 13 | 80.544 | 76.21 | 3980 | 33 | 170.267 | 157.088 | 8978 |
| स्था.स्तर | | | | | | | | | | | | | | | | | |
| अ) | वळण बंधारे | 80 | 0 | 15.28 | 1340 | 46 | 0 | 7.125 | 625 | 93 | 0 | 10.67 | 936 | | 0 | 33.071 | 2901 |
| | पाझर तलाव | | | | | 3 | 0 | 1.129 | 99 | | | | | | 0 | 1.129 | 99 |
| | | 80 | 0 | 15.28 | 1340 | 49 | 0 | 8.254 | 724 | 93 | 0 | 10.67 | 936 | 222 | 0 | 34.2 | 3000 |
| | एकूण सर्व | 88 | 16.32 | 29.79 | 2127 | 62 | 101.483 | 101.85 | 6985 | 106 | 80.544 | 86.88 | 4916 | 256 | 198.347 | 218.518 | 14028 |

सारणी : 23.5

## जलसंपत्तीचा ताळेबंद

जलसंपत्ती - दलघमी

| अक्र | उपलब्धता | | अक्र | वापर (सन2030) | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **भूपृष्ठावरील** | | 4 | **भूपृष्ठावरील** | |
| | अ) नैसर्गिक | | | अ) घरगुती वापरासाठी | |
| | 1) 75 टक्के विश्वासार्हतेने | 4522 | | 1) नागरी | 4 |
| | 2) 50 टक्के विश्वासार्हतेने | 5479 | | 2) ग्रामीण | 15 |
| | 3) सरासरीने | 5496 | | 3) पशुधन | 7 |
| | 4) नियोजनासाठी | 219 | | एकूण | 26 |
| | ब) मानवप्रबंधित | | | ब) उद्योगधंदयासाठी | 45 |
| | 1) नागरी वापरातून पुनरुद्भव (80 %) | 3.2 | | एकूण सिंचनेतर वापर | **71** |
| | 2) उद्योग धंदयातील पुनरुद्भव (97.5%) | 44 | 5 | जलविद्युत निर्मितीसाठी | |
| | 3) इतर खोऱ्यातून संक्रमित झालेले पाणी | 1911 | 6 | सिंचनासाठी उपलब्ध भूपृष्ठावरील पाणी | |
| | **एकूण (1 ब)** | **1958** | | (219+1958-71)+15=2106+15 | 2121 |
| 2 | मानवनिर्मित | | 7 | शिल्लक पाणी | 5277 |
| | लाभक्षेत्रातील पुनर्भरण (2106-1958) च्या10 % | 15 | | (7469-71-2121) | |
| 3 | **एकूण उपलब्धता 5496+1958+15** | **7469** | 9 | एकूण | **7469** |


1) भूजल उपलब्धता (वार्षिक एकूण पुनर्भरण) 87 — अ) भूजलाचा सध्याचा सिंचनासाठी वापर 3

2) भूजल वापरास मुभा ( 87 च्या 65 %) 57

टीपा : 1) भूजल उपलब्धतेमूळे उपखोऱ्याच्या एकूण उपलब्धतेत वाढ होणार नाही ; भूजलाचा जेवढा उपसा होईल तेवढा नदी प्रवाह घटत जाईल म्हणून एकूण उपलब्धतेचा आकडा काढतांना भूजल उपलब्धतेचा विचार घेतलेला नाही.

2) संकलीत अंदाजासाठी सर्व पाण्याचा उपयोग भूपृष्ठावरील पाण्यातून दाखविला आहे. पण एकूण वापरापैकी 57+15= 72 भूजल माध्यमातून शक्य आहे.

3) पाणी वापराचे नियोजन उपलब्ध येवा मालिकेवर आधारित आहे.




| उपखोऱ्याचे स्थान | उपखोरे क्र. | उपखोऱ्यांची नावे |
|---|---|---|
| 22, 15, 24 (अरबी समुद्र) | 15 | ऊर्ध्व कृष्णा (पश्चिम) |
| | 24 | दक्षिण कोकण |
| | 22 | मध्य कोकण |

# उपखोरे : 24

# दक्षिण कोकण

## 1.0 भौगोलिक तपशील

या खोरेसमूहाचा (अ) दक्षिण कोकण (रत्नागिरी) व (आ) दक्षिण कोकण (सिंधुदुर्ग) अशा दोन घटकांमध्ये विचार करता येणे शक्य आहे. त्यापैकी रत्नागिरी घटक क्षेत्रात शास्त्री,मुचकुंदी,काजवी, कोदवली, वाघोटन या खोऱ्यांचा प्रदेश येतो (नकाशा 24.1), तर त्याच्या दक्षिणेस असलेल्या देवगड, गड, कर्ली, आचरा व वेंगुर्ल्या जवळ समुद्राला मिळणाऱ्या नद्यांची खोरी सिंधुदुर्ग घटकात येतात. या खोरेसमूहाचे एकूण क्षेत्रफळ 9020 चौकिमी आहे. या पैकी (अ) दक्षिण कोकण (रत्नागिरी) घटकाचे क्षेत्र 4735 चौकिमी व (आ) दक्षिण कोकण (सिंधुदुर्ग) घटकाचे क्षेत्र 4285 चौकिमी आहे. चिंचोळी खोरी, उत्तम वृक्षराजी, दुर्गमता पण विस्तारित साक्षरता व शिक्षणाचा प्रसार हे या प्रदेशाचे वैशिष्ठ्य आहे. दक्षिण कोकण खोरेसमूहात रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयांतील खालील तालुक्यांचे क्षेत्र येते.

**(अ) रत्नागिरी**

**रत्नागिरी** :1) संगमेश्वर 2) चिपळूण 3) गुहागर 4) रत्नागिरी 5) लांजा 6) राजापूर.

**(आ) सिंधुदुर्ग**

**रत्नागिरी** : 1)राजापूर.

**सिंधुदुर्ग** : 1)कणकवली 2) कुडाळ 3) सावंतवाडी 4) वेंगुर्ले 5) मालवण 6) देवगड 7) वैभववाडी.

उपखो-यातील नद्या,त्यांची लांबी इत्यादी बाबतची माहिती खालील प्रमाणे आहे.

लांबी- किमी तलांक -मी.

| अक्र | नदी | लांबी | उगमस्थान | | संगमस्थान | |
|---|---|---|---|---|---|---|
| **(अ) दक्षिण कोकण( रत्नागिरी)** | | | ठिकाण | तलांक | ठिकाण | तलांक |
| 1 | शास्त्री | 64 | कोंडभैरव ता.संगमेश्वर | 900 | जयगड | 5 |
| 2 | मुचकुंदी | 79 | मांचाळ ता.लांजा | 746 | गावखडी | 7 |
| 3 | काजवी | 75 | वडीवल ता.संगमेश्वर | 762 | भाटये | 11 |
| 4 | कोदवली | 74 | आंबेवाडी ता.राजापूर | 853 | जैतापूर | 18 |
| **(आ) दक्षिण कोकण( सिंधुदुर्ग)** | | | | | | |
| 5 | वाघोटन | 95 | मोडे ता.राजापूर | 579 | विजयदुर्ग खाडी | 3 |
| 6 | देवगड | 70 | शिराळे ता.देवगड | 899 | वाडातर | 15 |
| 7 | गड | 84 | भेरडेवाडी ता.कुडाळ | 553 | मसूरा | 13 |
| 8 | कर्ली | 92 | शिराळे ता.देवगड | 899 | देवळी | 7 |
| 9 | आचरा | 53 | ढामरे ता.कणकवली | 137 | गावीतवाडी | 8 |
| 10 | वेंगुर्ल्याजवळ समुद्रास मिळणाऱ्या | 23 | स्थानिक टेकडया | - | - | - |

1.1 विस्तार : या खोरे समूहाचा क्षेत्रीय विस्तार खालील प्रमाणे आहे.

**(अ) दक्षिण कोकण (रत्नागिरी)**

अक्षांश 16° 58' ते 17° 48' उत्तर व रेखांश 73° 05' ते 73° 44' पूर्व यामध्ये आहे.

**(आ) दक्षिण कोकण (सिंधुदुर्ग)**

अक्षांश 17° 57' ते 16° 12' उत्तर व रेखांश 73° 46' ते 74° 00' पूर्व यामध्ये आहे.

1.2 चतु:सीमा : या खोरे समूहाचा एकत्रित आकार केळीच्या पानासारखा आहे. पूर्व-पश्चिम लांबी 50 किमी आहे तर दक्षिणोत्तर लांबी 97 किमी आहे. चतु:सीमा खालील प्रमाणे आहेत.

| अक्र | दिशा | तपशील | |
|---|---|---|---|
| | | **(अ) दक्षिण कोकण (रत्नागिरी)** | **(आ) दक्षिण कोकण (सिंधुदुर्ग)** |
| 1 | उत्तर | वाशिष्ठी उपखोरे | दक्षिण कोकण-रत्नागिरी घटक |
| 2 | पूर्व | सहयाद्री पर्वताच्या रांगा,ऊर्ध्व कृष्णा (पश्चिम-उत्तर) घटक | ऊर्ध्व कृष्णा (पश्चिम-उत्तर) घटक |
| 3 | पश्चिम | अरबी समुद्र | अरबी समुद्र |
| 4 | दक्षिण | तेरेखोल- तिल्लारी उपखोरे क्र 25, दक्षिण कोकण (सिंधुदुर्ग ) घटक | तेरेखोल-तिल्लारी उपखोरे क्र 25 |

**2.0 हवामान**

येथील हवामान दमट आहे. साधारणतः 97 टक्के पाऊस नैऋत्य मौसमी वाऱ्यांमुळे जून ते सप्टेंबर या कालावधीत तर 3 टक्के पाऊस ईशान्य मोसमी वाऱ्यामुळे पडतो. उपखोऱ्याचे एकत्रित वार्षिक सरासरी पर्जन्यमान 3570 मिमी आहे.कोकणातील हा खोरेसमूह सर्वाधिक पावसाचा आहे. उपखोऱ्यातील हवामान विषयक इतर बाबी व पर्जन्यमानातील दोलायमानता खालील प्रमाणे आहे.

पर्जन्यमान-मिमी,तपमान-अंश सें

| **(अ) दक्षिण कोकण (रत्नागिरी)** | | | | |
|---|---|---|---|---|
| अक्र | तपशील | परिमाण | वर्ष | ठिकाण |
| 1 | सर्वात अधिक पाऊस | 4744 | 1993 | मिरवणे |
| 2 | सर्वात अधिक तपमान | 41 | 1997 | पवारवाडी |
| 3 | सर्वात कमी तपमान | 11 | 1989 | करक |

कृषि-हवामान वर्गीकरणानुसार या घटकाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

1-अतिपावसाचा जांभ्या खडकाच्या जमिनीचा विभाग (VRL) व 3- घाट विभाग (GH) .

या घटकातील पर्जन्यमानातील दोलायमानता गुणांक 22 (तक्ता 2.5.8) आहे.

| (आ) दक्षिण कोकण (सिंधुदुर्ग) | | | | |
|---|---|---|---|---|
| अक्र | तपशील | परिमाण | वर्ष | ठिकाण |
| 1 | सर्वात अधिक पाऊस | 6162 | 1983 | शिवापूर ता.कुडाळ |
| 2 | सर्वात अधिक तपमान | 42 | 1998 | दुकानवाडी ता.सावंतवाडी |
| 3 | सर्वात कमी तपमान | 12 | 1985 | दुकानवाडी ता.सावंतवाडी |

कृषि-हवामान वर्गीकरणानुसार या घटकाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

1-अतिपावसाचा जांभ्या खडकाच्या जमिनीचा विभाग (VRL) व 3-घाट विभाग (GH) .

या घटकातील पर्जन्यमानातील दोलायमानता गुणांक 24 (तक्ता 2.5.8) आहे.पर्जन्यमानाचा माहवार तपशील सारणी 24.1 मध्ये दर्शविला आहे. पर्जन्यमापन केंद्रांचा तपशील सारणी 24.2 मध्ये दिला आहे.

2.1 बाष्पीभवन : या उपखो-यातील सर्वाधिक बाष्पीभवन मे महिन्यात सरासरी 291 मिमी तर सर्वात कमी बाष्पीभवन ऑगष्ट महिन्यात 39 मिमी होते. केंद्रनिहाय व माहवार तपशील सारणी 24.1 मध्ये दर्शविला आहे.

## 3.0 जलसंपत्तीची उपलब्धता

3.1 भूपृष्ठीय जलसंपत्ती : या खोरेसमूहातील एकत्रित वार्षिक सरासरी उपलब्धता 18616 दलघमी आहे. 1964 ते 1993 या 30 वर्षातील माहितीवर आधारभूत या खोरेसमूहातील घटकनिहाय पाण्याची उपलब्धता खालीलप्रमाणे आहे.

(सर्व दलघमी )

| विश्वासार्हता | अ) रत्नागिरी | आ) सिंधुदुर्ग |
|---|---|---|
| 75 टक्के | 9704 | 5970 |
| 50 टक्के | 11558 | 7177 |

येवा मोजण्याची ठिकाणे व वेगवेगळया विश्वासार्हतेच्या येव्यांची काही मर्यादित माहिती सारणी 24.3 व 24.4 मध्ये दिली आहे.

3.2 भूशैलीय रचना :

भूपृष्ठीय स्थिती (भूरुप वर्णन) : रत्नागिरी घटकातील भूभाग 20 टक्के अतिविच्छेदित व डोंगराळ व उर्वरीत 80 टक्के भूभाग जांभा ( laterite ) पठाराचा आहे. यात भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा निर्देशित 11 पाणलोट क्षेत्रांचा समावेश आहे.

सिंधुदुर्ग घटकातील भूभाग 23 टक्के अतिविच्छेदीत व डोंगराळ, 70 टक्के जांभा पठाराचा व 7 टक्के पठारी आहे. यात भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा निर्देशित 8 पाणलोट क्षेत्रांचा समावेश आहे.

भूपृष्ठीय शैल स्थिती : रत्नागिरी घटक प्रामुख्याने लाव्हा थरांपासून तयार झालेल्या बहुस्तरीय दक्षिणी कातळ खडकांनी (डेक्कन ट्रॅप प्रस्तर) व्यापलेला आहे. त्यांचा समुद्राकडील वरचा भाग, अतिपर्जन्यमान व तपमानामुळे जांभा खडकात रुपांतरीत झालेला आहे व त्याची व्याप्ती जवळ जवळ 80 टक्के क्षेत्रावर आहे. समुद्र किनाऱ्या जवळील वाळू व काही नद्यांच्या काठावर गाळाचे पट्टे विभक्त स्वरुपात आढळतात.

सिंधुदुर्ग घटकातील भूशास्त्रीय परिस्थिती अत्यंत गुंतागुंतीची आहे.त्यात अतिप्राचीन खडकापासून ते अर्वाचीन खडकांपर्यंत विविध प्रकारच्या खडकांचा समावेश आहे त्यात सर्वात खाली आर्कीयन परंपरेतील सर्वात जुने ग्रॅनाईट नाईसेस/शिस्ट त्यावर कलादगी मालेतील क्वार्ट झाईट व लाईमस्टोन, त्यावर लाव्हा थरांनी तयार झालेला बहुस्तरीय दक्षिणी कातळ खडक (डेक्कन ट्रॅप प्रस्तर) व समुद्र किनार पट्टी कडील भागात असलेला जांभा खडक व सर्वात वर समुद्राकाठची वाळू व गाळाचा प्रदेश आढळतो. या उपखोऱ्यामधील सर्वाधीक क्षेत्र जांभा खडकाने व्यापलेले आहे.

ग्रॅनाईट नाईसच्या खडकात पेग्मॅटाईटच्या ( Dykes ) मोठया प्रमाणावर आहेत.

3.3 भूजल संपत्ती : पर्जन्यमान जास्त असूनही भूपष्ठीय उताराची स्थिती व भूस्तर अनुकूल नसल्यामुळे दोन्ही घटकातील भूजल उपलब्धता अत्यंत मर्यादीत आहे. जांभा खडकाची भूजल धारण क्षमता चांगली असूनही मुरलेले पाणी झऱ्यावाटे निघून जात असल्यामुळे भूजल उपलब्धी तात्पुरती (हंगामी) आहे.

सिंधुदुर्ग घटकात मात्र काही भागात जांभा खडकाची खोली 30 ते 40 मीटर असून तेथील भूजल उपलब्धी चांगली आहे. त्याच प्रमाणे ग्रॅनाईट नाईस, नाईसेस, शिस्ट,लाईमस्टोन या खडकांतील विघटीत भागात भूजल उपलब्धी बऱ्यापैकी आहे.

दोन्ही घटकात समुद्रकिनाऱ्यालगतच्या वाळूच्या व नदी लगतच्या गाळाच्या प्रदेशात मात्र भूजल उपलब्धी खूप चांगली आहे. परंतू समुद्र किनाऱ्यालगत काही भागात खाऱ्या पाण्याची समस्या सुध्दा भेडसावत आहे. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या 1990 च्या भूजल अंदाजानुसार रत्नागिरी व सिंधुदुर्ग घटकात एकूण पुनर्भरण अनुक्रमे150 व 190 दलघमी असून सिंचनाखालील विहिरींची संख्या अनुक्रमे 3878 व 6287 इतकी आहे.

सद्य:स्थितीत दोन्ही घटकातील भूजल विकास अत्यल्प झालेला असून भविष्यात त्याच्या विकासास काहीसा वाव आहे. विहिरींचा कार्यक्रम उपलब्ध भूजल संपत्तीच्या मर्यादेतच राबवावा लागेल.

## 4.0 जमिनीचा तपशील

या उपखो-यातील जमीन जांभ्या दगडापासून बनलेली आहे. जमिनीचे प्रकार व त्याची टक्केवारी खालील प्रमाणे आहे.

| अक्र | तपशील | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | जांभ्या खडकाची जमीन | 43 |
| 2 | गाळाची जमीन | 38 |
| 3 | समुद्र किनाऱ्यावरील खारवट जमीन | 19 |

या प्रदेशात पूर्णगड, मालगुंड या समुद्र किनाऱ्या लगतच्या क्षेत्रात एलमेनाइट, राजापूर व मालवण तालुक्यात सिलीका चे साठे, कणकवली तालुक्यांत नाहळ ते भिरवंडी परिसरात व कुडसळ तालुक्यांत कडावळ येथे अभ्रकाचे साठे आहेत. वेंगुर्ला तालुक्यांत लोह हे खनीज सापडते तेंव्हा या क्षेत्रांत त्या त्या खनीज संपत्तीवर आधारीत उद्योग उभारणीस वाव आहे.

## 5.0 जमिनीचा वापर

लागवडीयोग्य क्षेत्र, वन खात्याच्या ताब्यातील क्षेत्र, पडीक क्षेत्र इत्यादी खालील प्रमाणे आहे.

क्षेत्र - हजार हेक्टर

| अक्र | तपशील | क्षेत्र | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | 24 (अ) | भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी | 24 (आ) | भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी |
| 1 | भौगोलिक क्षेत्र | 474 | | 428 | |
| 2 | वन खात्याच्या ताब्यातील क्षेत्र | 6 | 1.2 | 35 | 8.2 |
| 3 | पेरणीसाठी उपलब्ध नसलेले क्षेत्र | | | | |
| | अ) ओसाड जमीन | 132 | 28 | 88 | 20.6 |
| | ब) बिगर शेती उपयोगाकरिता आणलेली जमीन | 8 | 1.7 | 16 | 3.7 |
| 4 | मशागत योग्य पडीक जमीन | 78 | 16.5 | 133 | 31.1 |
| 5 | कायमची कुरणे व चराऊ कुरणे | 8 | 1.7 | 1 | 0.2 |
| 6 | किरकोळ झाडे-झुडपे यांच्या समूहाखालील क्षेत्र | 4 | 0.7 | 9 | 2.1 |
| 7 | चालू पडीक जमीन | 16 | 3.3 | 2 | 0.5 |
| 8 | इतर पडीक जमीन | 79 | 16.7 | 40 | 9.3 |
| 9 | पेरणीचे निव्वळ क्षेत्र | 143 | 30.2 | 104 | 24.3 |
| 10 | लागवडीयोग्य क्षेत्र (4+5+6+7+8+9) | 328 | 69 | 289 | 68 |
| 11 | दुसोटा क्षेत्र | 5 | | 14 | |
| 12 | पिकाखालील एकूण क्षेत्र (9+11) | 148 | | 118 | |
| 13 | पीक घनता(12÷9X100) | 103 | | 113 | |

रत्नागिरी घटकक्षेत्रांतील वन जमिनीच्या तुलनेत सिंधदुर्ग घटक क्षेत्रांत वनजमीन बरीच जास्त आहे. त्याच प्रमाणे पीक घनताही जास्त आहे. एकंदरीनेच सिंधुदुर्ग घटकक्षेत्र जमीन आणि पाणी यांच्या संयोगात अधिक विकसित आहे. दक्षिण कोकणच्या खोऱ्यांमधील पूर्वेकडील भाग डोंगराळ असला तरी पश्चिमेकडे तुलनात्मक सपाट जमीनी आहेत. त्यांना सिंचनाची सुविधा कशी उपलब्ध करुन देता येईल याचा विचार करायचा आहे.

## 6.0 लोकसंख्या व पशुधन

6.1 लोकसंख्या :सन 1991 च्या जनगणनेनूसार या खोरे समूहातील एकूण लोकसंख्या 15 लक्ष 89 हजार आहे.तसेच सन 2030 पर्यन्त होणारी लोकसंख्येतील वाढ,लोकसंख्या घनता पूढील प्रमाणे अपेक्षीत आहे.

लोकसंख्या-हजारात,घनता-प्रति चौकिमी

| अक्र | तपशील | 24 (अ) | | 24 (आ) | |
|---|---|---|---|---|---|
| | | 1991 | 2030 | 1991 | 2030 |
| 1 | नागरी | 93 | 39 | 42 | 51 |
| 2 | ग्रामीण | 812 | 1624 | 642 | 1284 |
| 3 | एकूण : | 905 | 1878 | 684 | 1335 |
| 4 | लोकसंख्या घनता | 191 | 397 | 160 | 312 |
| 5 | ग्रामीण लोकसंख्या घनता | 171 | 342 | 150 | 300 |

6.2 पशुधन : सन 1992 च्या मोजणीनुसार या उपखो-यात एकूण पशुधन 7.6 लक्ष आहे तपशील पुढील प्रमाणे आहे.

| घटक | म्हैस व रेडे | गाय व बैल | एकखुरी व उंट | डुकरे | शेळी मेंढी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| 24 (अ) | 51954 | 325228 | 212 | 134 | 37660 | 415188 |
| 24 (आ) | 89638 | 210908 | 31 | 2891 | 41403 | 344871 |
| एकूण : | | | | | | 760059 |

6.3 इतर तपशील : या उपखो-यात 1) रत्नागिरी2) राजापूर3) वेंगुर्ला 4)मालवण या नगरपालीका आहेत. मजूर संख्या खालील प्रमाणे आहे.

| घटक | शेत मजूर | इतर मजूर |
|---|---|---|
| (अ) दक्षिण कोकण, रत्नागिरी | 104317 | 35097 |
| (आ) दक्षिण कोकण, सिंधुदुर्ग | 174362 | 18765 |

## 7.0 पाणीवापर

7.1 सिंचनासाठी वापर : उपखो-यातील वर्गनिहाय प्रकल्प म्हणजे मोठे,मध्यम,बृहत लघु,लघु प्रकल्प, कोल्हापूर पध्दतीचे बंधारे यांची संख्या, पाणीसाठा,पाणी वापर,सिंचन क्षेत्र याची,तसेच पूर्ण झालेले, प्रगतीपथावरील व भविष्यकालीन प्रकल्प याची तपशीलवार माहिती सारणी 24.5 मध्ये दिली आहे. पूर्ण झालेल्या प्रकल्पांची सिंचन क्षमता 9902 हेक्टर असून त्यातील प्रस्तावित पाणीवापर 123 दलघमी आहे. सिंचनासाठी आणखी 71732 हेक्टर क्षेत्र उपलब्ध होऊ शकते पण त्यासाठी सध्याच्या पाणीवापर पध्दती प्रमाणे आणखी 1122 दलघमी पाणी लागेल.

7.2 सिंचनेतर पाण्याचा वापर : सिंचनेतर उपयोगासाठी या उपखो-यातील सध्याची गरज 53 दलघमी आहे सन 2030 पर्यन्तची ती 103 दलघमी होईल. या गरजांचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

पाणी-दलघमी

| अक्र | तपशील | 24 (अ) | | 24 (आ) | |
|---|---|---|---|---|---|
| | | 1991 | 2030 | 1991 | 2030 |
| 1 | घरगुती वापरासाठी | 30 | 57 | 23 | 41 |
| 2 | उद्योगासाठी | 0 | 0 | 0 | 0 |
| | एकूण | 30 | 62 | 23 | 41 |

घरगुती वापरासाठी सध्या लागणारे पाणी व सन 2030 साली आवश्यक असलेले पाण्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

पाण्याची गरज दलघमी

| अक्र | वर्ष | पाणी | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | नागरी | ग्रामीण | पशुधन | एकूण |
| **अ) दक्षिण कोकण (रत्नागिरी)** | | | | | |
| 1 | 1991 | 3 | 16 | 11 | 30 |
| 2 | 2030 | 8 | 33 | 16 | 57 |
| **आ) दक्षिण कोकण, सिंधुदुर्ग** | | | | | |
| | | नागरी | ग्रामीण | पशुधन | एकूण |
| 1 | 1991 | 1 | 13 | 9 | 23 |
| 2 | 2030 | 2 | 26 | 13 | 41 |

7.3 जलसंपत्तीचा ताळेबंद :भूपृष्ठावरिल व भूपृष्ठाखालील उपलब्ध जलसंपत्ती,घरगुती वापरासाठी, उद्योगासाठी व सिंचनासाठी वापर व त्यातून होणारा पुनरुदभव याचा ताळेबंद सारणी 24.6 मध्ये दिलेला आहे.

7.4 लाभक्षेत्र विकास: सद्य:स्थिती पूढील प्रमाणे आहे.

क्षेत्र -हजार हेक्टर

| भाग-1ची(शेतचाऱ्या इ) कामे | | | भाग-2 ची(सपाटीकरण इ) कामे | | | प्रकल्पाच्या लाभक्षेत्रा |
|---|---|---|---|---|---|---|
| लाक्षेविप्रा कडील प्रकल्प | लाक्षेविप्रा बाहेरील प्रकल्प | एकूण | लाक्षेविप्रा कडील प्रकल्प | लाक्षेविप्रा बाहेरील प्रकल्प | एकूण | व्यतिरिक्त अन्य क्षेत्रात झालेले जमीन सपाटीकरणाचे(भाग-2) क्षेत्र |
| **24 अ)** | | | | | | |
| 77.59 | 60.62 | 138.21 | 22.86 | 50.79 | 73.65 | 24.36 |
| **24 आ)** | | | | | | |
| 102.46 | 14.61 | 117.07 | 36.26 | 10.58 | 46.84 | 13.81 |

7.5 1970 पूर्वीची धरणे : या उपखोऱ्यात 1970 पूर्वी सिंचनाचे प्रकल्प बांधलेले नाहीत त्यामुळे सिंचनाचा विस्तार या खोऱ्यांना तसा नवीनच आहे. पूर्वी परंपरेने पऱ्हयांवर पावसाळ्यानंतरचे

सिंचन होत असे व त्यावर बागा असत, दुसोटा पिकेहि होत. काही प्रमाणात अजूनहि काही ठिकाणी अशा प्रकारची व्यवस्था चालते पण एकंदरीने सिंचनाच्या संदर्भात या खोऱ्यामधे अजून बरेच काही व्हावयाचे आहे.

## 8.0 पीक रचना

या उपखो-यात पेरणी खालचे क्षेत्र 2.47 लक्ष हेक्टर आहे. यात प्रामुख्याने खरीप पीक क्षेत्र आहे. भात,आंबा,काजू,केळी,उन्हाळी भूईमूग,कोकम नारळ यापीकास जमीन व हवामान अनुकूल आहे. प्रमुख धान्य पिकाची सरासरी ऊत्पादकता खालील प्रमाणे आहे.

उत्पादकता-क्विंटल/हेक्टर

| घटक | पीक | उत्पादकता |
|---|---|---|
| अ) दक्षिण कोकण, रत्नागिरी | भात | 22.34 |
| आ) दक्षिण कोकण, सिंधुदुर्ग | भात | 21.25 |

## 9.0 उद्योगधंदे

या उपखो-यात कृषी आधारीत उद्योगधंदे नाहीत. पण 12 रासायनिक तर 81 इतर अभियांत्रिकी उद्योग आहेत.

## 10.0 जलविद्युत निर्मिती

या सर्वच खोऱ्यांची भौगोलिक परिस्थिती जलविद्युत निर्मितीस अनुकूल आहे. या खोऱ्यांच्या नद्या बव्हंशी सरळ पूर्व पश्चिम उताराने वहात असल्याने व 50 किमी मधे 300/400 मीटरचे अवतरण करीत असल्यामुळे या चांगल्या उताराचा लाभ हंगामी का होईना जलविद्युत निर्मितीसाठी कसा अधिकाधिक करुन घेता येईल याचा विचार होणे आवश्यक आहे. जलविद्युत प्रकल्पांच्या बृहत आराखडया प्रमाणे 8 प्रकल्पांच्या अन्वेषणाचे काम या खोऱ्यामध्ये चालू आहे व जपानच्या सहाय्याने बृहत आराखडयाअंतर्गत 6 जलविद्युत केंद्रे प्रस्तावित आहेत.

प्रस्तावित जलविद्युत केंद्रांची एकूण वीज निर्मिति क्षमता 4904 मेगॅवॅट राहील.

वीजनिर्मिति क्षमता - मेवॅ

| अक्र | योजनेचे नाव | क्षमता |
|---|---|---|
| 1 | बाव | 40 |
| 2 | मार्लेश्वर टप्पा-1 | 30 |
| 3 | मार्लेश्वर टप्पा-2 | 34 |
| 4 | श्रृंगापूर | 10 |
| 5 | अबलोणी | 16 |
| 6 | नरवे | 4 |
| 7 | जावरा | 19 |
| 8 | कुवेवाडी | 4 |
| 9 | नाफेड ता.वैभववाडी | 6 |
| 10 | गड ता.कणकवली | 17 |
| 11 | अरूणा ता.वैभववाडी | 440 |

देवगड तालुक्यामध्ये पवनचक्की पासून विद्युतनिर्मिति करण्यात येत आहे. त्या अनुभवाच्या आधारे दक्षिण कोकणातील पवन उर्जा विस्ताराचा विचार करता येईल.

## 11.0 दळणवळणाची साधने

या खो-यातून मुंबई-मंगलोर हा रेल्वे मार्ग जातो. शिवाय मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.17 तसेच रत्नागिरी कोल्हापूर व कणकवली - कोल्हापूर या जिल्हामार्गांद्वारे वाहतुकीची सोय उपलब्ध आहे.सागरी वाहतूकीसही वाव आहे.

## 12.0 भावी नियोजनाची दिशा

12.1 खो-यातील लागवडीयोग्य क्षेत्रफळानुसार व भूपृष्ठावरील येव्याच्या विश्वासार्हतेने जलसंपत्तीची दर हेक्टरी उपलब्धता रत्नागिरी घटकात 34448 घमी तर सिंधुदुर्ग घटकात 25318 घमी आहे.

सन 1960 पूर्वी दक्षिण कोकणात पाणी आणण्याचा विचार झालेला होता. त्यानंतर आता उदंचन-विद्युत निर्मितीचे नवे तंत्र रुढ झाले आहे त्याच्या आधाराने या योजनांचा नव्याने वेळीच विचार होणे उपयुक्त राहील.

12.2 दक्षिण कोकण खोरेसमूहामध्ये स्थानिक जलपातळी उंचावण्यासाठी जलसंधारण कार्यक्रमास पुष्कळ वाव आहे. रत्नागिरी पासून जवळच असलेल्या विल्हे या गांवाजवळ गोकुळ प्रतिष्ठानच्या पुढाकाराने व इंडोजर्मन प्रकल्प सहाय्याने मोठया प्रमाणावर 'गोकुळ' बंधाऱ्यांची मालिका बांधण्यांत आली आहे. आयोगाने या कार्यक्षेत्राला भेट दिली होती. जलसंधारणाचा तशा प्रकारचा कार्यक्रम उंचवटयापासून नदी पर्यन्त (ridge to valley) राबविणे युक्त वाटते. या दृष्टीने gully plug ,गोकुळ बंधारे, खडकाचा भराव (loose boulders) यासारख्या बांधकामांनी जमिनीत पाणी मुरविण्याचे व मातीची धूप थांबविण्याचे काम मोठया प्रमाणात या खोऱ्याच्या पाणलोट क्षेत्रामध्ये करायला हवे आहे. तांत्रिक दृष्टीने ही कामे अधिकाधिक निर्दोष व सहजसाध्य व्हावीत या दृष्टीने त्यांच्या तपशिला बाबत वारंवार कार्यशाळा भरवत राहून स्थानीय संदर्भात अनुकूल अशी कार्यपध्दती विकसित करणे गरजेचे आहे. देशावरील पाणलोटक्षेत्र विकासाचे तपशील येथे लागू पडणारे नाहीत.

शास्त्री नदीचे खोरे भौगोलिकदृष्टया उंचवटयाचे व अरुंद पात्र असलेले आहे. धरणाच्या शृंखला निर्मितीस अनुकूलता आहे. अशा शृंखलेतून पुनरावर्ती उपयोगाने त्याच पाण्याचा वाढीव उपयोगही वीज निर्मितीस होतो. यादृष्टीने जलविद्युत निर्मितीची क्षमता या खोऱ्यात चांगली आहे. त्यासाठी खोऱ्याचा बृहत् आराखडा लवकर तयार करणे इष्ट राहील.

12.3 दक्षिण कोकण खोरेसमूहात जयगड बंदर नौका वहनासाठी अनुकूल आहे. सागरी किनाऱ्यावरील जलवाहतूक ही वाढत्या उत्पादनांच्या बाजारपेठांसाठी यापुढे उपयोगी ठरणार आहे. बंदरांचा विकास करण्यासाठी त्यांना बारमाही प्रवाही पाण्याची खाडीत उपलब्धता निर्माण करुन देऊन गाळ साचण्याच्या प्रक्रियेस कांही प्रमाणात तरी उपचार शक्य आहे. त्यादृष्टीने बंदर विकास व नद्या बारमाही वाहत्या करणे यांची सांगड घालणारे प्रकल्प दक्षिण कोकण खोऱ्यात उपयुक्त ठरतील.

12.4 तळंबा हा एकमेव मोठा प्रकल्प दक्षिण कोकण खोरेसमूहात आहे. इतकी सलग सिंचनाची जमीन अन्य खोऱ्यामध्ये नाही; म्हणून लाभक्षेत्र विकास संकल्पनेला सर्वाधिक अनुकूलता या प्रकल्पात रहाणार आहे. यादृष्टीने त्याची तपशीलात रचना होऊन तो लवकर पूर्ण होणे दक्षिण कोकण खोऱ्याला अतिशय उपयुक्त राहील.

12.5 दक्षिण कोकण उपखोऱ्याचा बव्हंशी भाग जांभ्या दगडाने व्यापलेला आहे. सिंचन,शेती,वृक्षराजी या संदर्भात त्याच्या गुणधर्मांचा योग्य उपयोग करुन घेण्याची कार्यपध्दती यावर स्वतंत्रपणे विस्तृत संशोधन होणे गरजेचे आहे. त्यासाठी एक सर्वंकष संशोधन प्रकल्प या परिसरासाठी लवकर राबविणे अतिशय आवश्यक आहे.

12.6 दक्षिण कोकण खोऱ्यात सिंधुदुर्ग व रत्नागिरी (तसेच रायगडचा भाग) या भागात भूगर्भात जांभ्या खडकाचे प्राबल्य आहे. कोकणात या खडकाने व्यापलेले क्षेत्र 4402 चौकिमी ( सुमारे 15 टक्के ) आहे. या खडकाच्या थराची जाडी 3 ते 20 मीटर पर्यन्त आढळते. हा खडक सच्छिद्र असल्यामुळे पावसाचे पाणी फार मोठया प्रमाणात हयातून जाते. पण पाणी धरुन ठेवण्याची क्षमता फारच कमी आहे. बसॉल्ट मध्ये सच्छिद्रता व पाणी मुरवून घेण्याची क्षमता तुलनेने फारच कमी असल्यामुळे बसॉल्ट असलेल्या कोकणच्या भागात वृक्ष आच्छादन तुलनेने कमी आढळते. तेच रत्नागिरी,सिंधुदुर्ग भागात दाट व लुसलुशीत दिसते. पण या भागात जंगल दाट असून सुध्दा उन्हाळ्यात ओढे/नाले कोठेही पाण्याने भरभरुन वाहताना दिसत नाहीत. मे 1998 मध्ये आयोगाने या उपखोऱ्यास भेट दिली होती. खूप पडणारा पाऊस व जांभा (laterite) या खडकांनी व्यापलेला भूभाग, सूर्यप्रकाश जास्त व आर्द्रता पण जास्त, तपमान तुलनेने कमी म्हणून बाष्पीभवन कमी. जांभ्या खडकातील साच्छिद्रता पाणी झिरपण्यास अनुकूल अशा परिस्थितीमुळे हा सर्व प्रदेश म्हणजेच एक नैसर्गिक green house आहे असे म्हणावयास हरकत नाही.

12.7 मालगुंड या खारभूमी विकास योजनेलाही आयोगाने कोकण दौऱ्याच्या वेळी (मे 98) भेट दिली होती. खारभूमीचा प्रश्न हा जवळ जवळ सर्व कोकण प्रदेशातील एक वेगळीच समस्या आहे. या जमिनी खाऱ्या पाण्यापासून सुरक्षित ठेवल्या तर त्यांच्यात खरीपात भाताचे पीक व नंतर रब्बी हंगामा मध्ये पावटयासारखी पिके घेता येतात. आयोगाच्या अहवालात (खंड 1 मध्ये ) खारभूमी योजनांचा परामर्ष 'किनार पट्टीच्या खार जमिनीचे व्यवस्थापन ' या स्वतंत्र विषयात घेतलेला आहे.

12.8 दक्षिण कोकण खोऱ्यातील पावशी प्रकल्पाच्या सिंचन क्षेत्रात वाढ व्हावी, पीक पध्दतीत बदल व्हावा, वितरण व्यवस्था टिकाऊ व्हावी या साठी जुन्या उघडया वितरण व्यवस्थेचे बंद पाईप लाईनमध्ये (R.C.C. or P.V.C. ) रुपांतर करुन त्याचे नूतनीकरण करण्यात आले आहे. बंद पाईप लाईनमुळे पाझर कमी होऊन भातानंतर दुसरे पीक घेण्यास मार्ग मोकळा झाला आहे. याचे कारण जमीन कोरडी राहिल्यामुळे मशागतीस अनुकूल राहते. आता मूल्यदायी पर्यायी पीक व्यवस्था विकसित व्हायला हवी आहे. नळांची सिंचन वितरण प्रणाली खर्चिक असल्यामुळे तिचा विस्तृत वापर व प्रसार हा अधिक मूल्यदायी पीकरचना विकसित होण्यावर अवलंबून राहील.

000

सारणी :24.1

**हवामानाचा तपशील**

पर्जन्य, बाष्पीभवन - मिमी

| अक्र | महिना | पर्जन्यमान | | बाष्पीभवन | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 24अ | 24आ | 24अ | | | 24आ | | सरासरी |
| | | | | पवारवाडी | पास्तेवाडी | सरासरी | दुकानवाडी | शिवडाव | |
| 1 | जानेवारी | 0 | 0 | 96 | 109 | 102.5 | 158 | 147 | 153 |
| 2 | फेब्रुवारी | 0 | 0 | 124 | 135 | 129.5 | 183 | 154 | 169 |
| 3 | मार्च | 0 | 0 | 162 | 176 | 169 | 226 | 179 | 203 |
| 4 | एप्रिल | 18 | 0 | 186 | 188 | 187 | 262 | 197 | 230 * |
| 5 | मे | 26 | 52 | 196 | 207 | 201.5 | 291 | 216 | 254 * |
| 6 | जून | 842 | 708 | 117 | 98 | 107.5 | 130 | 125 | 128 |
| 7 | जुलै | 1601 | 1483 | 4 | 44 | 24 | 70 | 62 | 66 |
| 8 | ऑगस्ट | 770 | 912 | 72 | 39 | 55.5 | 72 | 60 | 66 |
| 9 | सप्टेंबर | 145 | 308 | 75 | 45 | 60 | 114 | 78 | 96 |
| 10 | ऑक्टोंबर | 96 | 180 | 82 | 58 | 70 | 121 | 98 | 110 |
| 11 | नोंव्हेंबर | 0 | 0 | 91 | 64 | 77.5 | 128 | 122 | 125 |
| 12 | डिसेंबर | 0 | 0 | 84 | 96 | 90 | 118 | 120 | 119 |
| | एकूण | 3498 | 3643 | 1289 | 1259 | 1274 | 1873 | 1558 | 1716 |

**हंगामनिहाय बाष्पीभवन**

बाष्पीभवन -मिमी

| अक्र | हंगाम | बाष्पीभवन | |
|---|---|---|---|
| | | 24अ | 24आ |
| 1 | खरीप | 174 | 283 |
| 2 | रब्बी | 435 | 620 |
| 3 | उन्हाळी | 665 | 813 |
| | एकूण | 1274 | 1716 |

* अत्यंतिक बाष्पीभवन

सारणी 24.2

**पर्जन्यमापन केंद्रांचा तपशील**

पर्जन्य - मिमी

| अक्र | केंद्र | प्रकार | स्वामित्व | आधार सामुग्री उपलब्धोचा कालावधी | वार्षिक सरासरी पर्जन्य |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| **24 अ दक्षिण कोकण, रत्नागिरी** | | | | | |
| 1 | मिरवणे | सा.प. स्व.प. | पा.खा. | 1983 - 96 | 3529 |
| 2 | मालगुंड | सा.प. | पा.खा. | 1983 - 96 | 2862 |
| 3 | लाजूळ | सा.प. | पा.खा. | 1991 - 96 | 3796 |
| 4 | कुरधुंडा | सा.प. | पा.खा. | 1970 - 96 | 3785 |
| 5 | कुडूप | सा.प. | पा.खा. | 1989 - 96 | 4011 |
| 6 | कुंभारखाणी | सा.प. | पा.खा. | 1975 - 96 | 4022 |
| 7 | कोंडीवरे | सा.प. | पा.खा. | 1983 - 96 | 4022 |
| 8 | हेदवी | सा.प. | पा.खा. | 1984 - 96 | 3279 |
| 9 | गुळवणे | सा.प. | पा.खा. | 1991 - 96 | 3374 |
| 10 | देवघर | सा.प. | पा.खा. | 1991 - 96 | 2789 |
| 11 | असूर्डे | सा.प. | पा.खा. | 1991 - 96 | 3654 |
| 12 | हरचेरी | सा.प. | पा.खा. | 1991 - 96 | 3500 |
| 13 | खेरवसे | सा.प. | पा.खा. | 1991 - 96 | 3496 |
| 14 | प्रभावनवल्ली | सा.प. | पा.खा. | 1986 - 96 | 4213 |
| 15 | बेनी | सा.प. | पा.खा. | 1991 - 96 | 2805 |
| 16 | आडीवरे | सा.प. | पा.खा. | 1991 - 96 | 2263 |
| 17 | हर्दखळा | सा.प. | पा.खा. | 1991 - 96 | 3706 |
| 18 | विलवडे | सा.प. | पा.खा. | 1985 - 96 | 3441 |
| 19 | येरडव | सा.प. | पा.खा. | 1985 - 96 | 4122 |
| 20 | सोलगाव | सा.प. | पा.खा. | 1985 - 96 | 2832 |
| 21 | केळंबा | सा.प. | पा.खा. | 1986 - 91 | 5192 |
| 22 | सोलीवडे | सा.प. | पा.खा. | 1981 - 96 | 2834 |
| 23 | रत्नागिरी | सा.प. | म.खा. | 1901 - 93 | 4472 |
| 24 | लांजा | सा.प. | म.खा. | 1901 - 93 | 3892 |
| 25 | राजापूर | सा.प. | म.खा. | 1901 - 93 | 4278 |
| 26 | संगमेश्वर | सा.प. | म.खा. | 1901 - 93 | 3972 |
| **24 आ दक्षिण कोकण, सिंधुदुर्ग** | | | | | |
| 1 | गिर्ये | सा.प. स्व.प. | पा.खा. | 1985 - 96 | 2783 |
| 2 | खारेपाटण | सा.प. | पा.खा. | 1991 - 96 | 3795 |
| 3 | ऐनारी | सा.प. | पा.खा. | 1984 - 96 | 3811 |
| 4 | आरवणे | सा.प. | पा.खा. | 1991 - 96 | 3841 |

पर्जन्य - मिमी

| अक्र | केंद्र | प्रकार | स्वामित्व | आधार सामुग्री उपलब्धीचा कालावधी | वार्षिक सरासरी पर्जन्य |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 5 | राजापूर | सा.प. | म.खा. | 1901 - 93 | 3940 |
| 6 | तळेरे | सा.प. स्व.प. | पा.खा. | 1990 - 96 | 4053 |
| 7 | देवगड | सा.प. | पा.खा. | 1990 - 96 | 2533 |
| 8 | लोरे | सा.प. | पा.खा. | 1991 - 96 | 3685 |
| 9 | देवगड | सा.प. | म.खा. | 1901 - 93 | 4145 |
| 10 | नरडवे | सा.प. | पा.खा. | 1990 - 96 | 3705 |
| 11 | दिगवले | सा.प. | पा.खा. | 1985 - 96 | 4126 |
| 12 | शिवडाव | सा.प. | पा.खा. | 1985 - 96 | 4047 |
| 13 | कणकवली | सा.प. | पा.खा. | 1985 - 96 | 3643 |
| 14 | तरंदळे | सा.प. | पा.खा. | 1990 - 96 | 3263 |
| 15 | पळसंद | सा.प. | पा.खा. | 1991 - 96 | 3353 |
| 16 | कसाल | सा.प. | पा.खा. | 1991 - 96 | 3346 |
| 17 | गोळवण | सा.प. | पा.खा. | 1990 - 96 | 2890 |
| 18 | कणकवली | सा.प. | म.खा. | 1901 - 93 | 3972 |
| 19 | शिवापूर | सा.प. | पा.खा. | 1985 - 91 | 5192 |
| 20 | उपवडे | सा.प. | पा.खा. | 1985 - 96 | 4557 |
| 21 | अंजिवडे | सा.प. | पा.खा. | 1985 - 96 | 4517 |
| 22 | नेरूर | सा.प. | पा.खा. | 1989 - 96 | 4754 |
| 23 | दुकानवाडी | सा.प. | पा.खा. | 1965 - 96 | 4321 |
| 24 | आवळेगाव | सा.प. | पा.खा. | 1986 - 96 | 3516 |
| 25 | वालावल | सा.प. | पा.खा. | 1990 - 96 | 2864 |
| 26 | कुडाळ | सा.प. | म.खा. | 1901 - 93 | 4314 |
| 27 | मालवण | सा.प. | म.खा. | 1901 - 93 | 3747 |
| 28 | वेंगुर्ला | सा.प. | म.खा. | 1901 - 93 | 3969 |

टिप सा.प. : सामान्य पर्जन्यमापन केंद्र

स्व.प. : स्वयंचलित पर्जन्यमापन केंद्र

पा.खा : पाटबंधारे खाते, म.खा- महसूल खाते

सारणी : 24.3

**सरिता मापन केंद्रे**

| अक्र | केंद्राचे नांव | स्वामित्व | आधार सामुग्री उपलब्धतेचा कालावधी |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| **24 अ** | **दक्षिण कोकण, रत्नागिरी** | | |
| 1 | मिरवणे | पा.खा. | 1983 - 96 |
| 2 | कुंभारखाणी | पा.खा. | 1975 - 96 |
| 3 | पास्तेवाडी | पा.खा. | 1969 - 96 |
| 4 | करक | पा.खा. | 1983 - 96 |
| 5 | पवारवाडी | पा.खा. | 1985 - 96 |
| 6 | रायपाटण | पा.खा. | 1985 - 96 |
| 7 | आसगा | पा.खा. | 1989 - 96 |
| 8 | शेंबवणे | पा.खा. | 1993 - 96 |
| **24 आ** | **दक्षिण कोकण, सिंधुदूर्ग** | | |
| 1 | दुकानवाडी | पा.खा. | 1965 - 96 |
| 2 | आवळेगाव | पा.खा. | 1986 - 96 |
| 3 | शिवडाव | पा.खा. | 1985 - 96 |
| 4 | बापर्डे | पा.खा. | 1991 - 96 |
| 5 | घोणसरी | पा.खा. | 1985 - 96 |
| 6 | काकेवाडी | पा.खा. | 1991 - 96 |
| 7 | सांगुळवाडी | पा.खा. | 1995 - 96 |
| 8 | हेत | पा.खा. | 1991 - 96 |

पा.खा. - पाटबंधारे खाते

सारणी : 24.4

**जलसंपत्तीची उपलब्धता**

**अ) रत्नागिरी घटक** — येवा -दलघमी

| अक्र | वर्ष | वार्षिक सरासरी येवा | उतरत्या क्रमाने येवा | संगत वर्ष | विश्वासाहता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | 1964 | 12090 | 16205 | 1983 | |
| 2 | 1965 | 9074 | 15895 | 1990 | |
| 3 | 1966 | 6487 | 14963 | 1993 | 10 |
| 4 | 1967 | 8692 | 13328 | 1978 | |
| 5 | 1968 | 8618 | 13261 | 1988 | |
| 6 | 1969 | 11940 | 13058 | 1970 | 20 |
| 7 | 1970 | 13058 | 12813 | 1985 | |
| 8 | 1971 | 9738 | 12729 | 1991 | |
| 9 | 1972 | 7426 | 12588 | 1974 | 30 |
| 10 | 1973 | 10494 | 12335 | 1992 | |
| 11 | 1974 | 12588 | 12502 | 1975 | |
| 12 | 1975 | 12502 | 12090 | 1964 | 40 |
| 13 | 1976 | 10393 | 11940 | 1969 | |
| 14 | 1977 | 11558 | 11751 | 1981 | |
| 15 | 1978 | 13328 | 11558 | 1977 | 50 |
| 16 | 1979 | 9184 | 11339 | 1984 | |
| 17 | 1980 | 9704 | 10702 | 1987 | |
| 18 | 1981 | 11751 | 10660 | 1982 | |
| 19 | 1982 | 10660 | 10494 | 1973 | |
| 20 | 1983 | 16205 | 10393 | 1976 | |
| 21 | 1984 | 11339 | 10192 | 1989 | |
| 22 | 1985 | 12813 | 9738 | 1971 | |
| 23 | 1986 | 8089 | 9704 | 1980 | 75 |
| 24 | 1987 | 10702 | 9184 | 1970 | |
| 25 | 1988 | 13261 | 9074 | 1969 | |
| 26 | 1989 | 10192 | 8692 | 1967 | |
| 27 | 1990 | 15895 | 8618 | 1968 | 90 |
| 28 | 1991 | 12529 | 8089 | 1986 | |
| 29 | 1992 | 12535 | 7426 | 1972 | |
| 30 | 1993 | 14963 | 6487 | 1966 | |

$$\frac{\text{10टक्के उपलब्धता}}{\text{90टक्के उपलब्धता}} = 1.74 \qquad \frac{\text{50टक्के उपलब्धता}}{\text{90टक्के उपलब्धता}} = 1.34$$

$$\frac{\text{50टक्के उपलब्धता}}{\text{75टक्के उपलब्धता}} = 1.19$$

सारणी : 24.4

जलसंपत्तीची उपलब्धता

आ) सिंधुदुर्ग घटक                                   येवा -दलघमी

| अक्र | वर्ष | वार्षिक सरासरी येवा | उतरत्या क्रमाने येवा | संगत वर्ष | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | 1964 | 7771 | 12268 | 1983 | |
| 2 | 1965 | 6602 | 10170 | 1985 | |
| 3 | 1966 | 6260 | 9602 | 1970 | 10 |
| 4 | 1967 | 7286 | 9194 | 1981 | |
| 5 | 1968 | 5579 | 9168 | 1993 | |
| 6 | 1969 | 7029 | 9009 | 1990 | 20 |
| 7 | 1970 | 9602 | 8750 | 1975 | |
| 8 | 1971 | 5923 | 8501 | 1979 | |
| 9 | 1972 | 3709 | 8225 | 1988 | 30 |
| 10 | 1973 | 5983 | 8126 | 1991 | |
| 11 | 1974 | 8083 | 8095 | 1992 | |
| 12 | 1975 | 8750 | 8083 | 1974 | 40 |
| 13 | 1976 | 4909 | 8061 | 1982 | |
